प. ग्रं. सं. ठाणें
विषय ग्रीबंध
सं. क्र. ३७८

REFBK-0022779

Marathi Granth

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

20 JAN 1980
3 FEB 1980
13 FEB 1980
27 FEB 1980
23 MAR 1980
23 MAR 1980
16 APR 1980
9 AUG 1980
27 JUL 1980
7 AUG 1980
24 AUG 1980
7 OCT 1980
12 NOV 1980
25 JAN 1981
11 MAR 1981
18 MAR 1981
26 APR 1981
24 MAY 1981
9 AUG 1981

(5. M. 4.)

प्रेस्टीज
प्रकाशन

प्रास्ताविक



'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये गेली काही वर्षे 'वाचता वाचता' हे सदर प्रसिद्ध होत असते. अनेक वाचकांनी याचा संग्रह करावा अशी सूचना केली होती. श्री. प्रभाकर पाध्ये यांनी यासंबंधात विशेष आत्मीयता प्रगट केली. तथापि या ना त्या कारणाने संग्रह प्रसिद्ध होण्याचे लांबणीवर पडत गेले. श्री. सर्जेराव घोरपडे यांनी केवळ प्रकाशक म्हणून नव्हे, तर मित्र या नात्याने प्रकाशनाचे काम करण्याचे ठरविले. पुस्तकाचा आकार, छपाई व सजावट यावरून त्यांच्या कल्पकतेचा व जिव्हाळ्याचा प्रत्यय येईल.

संग्रहातील लेख प्रसिद्ध करण्याची परवानगी दिल्याबद्दल 'महाराष्ट्र टाइम्स' ज्या कंपनीतर्फे प्रसिद्ध होतो त्या बेनेट कोलमन कंपनीच्या व्यवस्थापकांचे आभार मानणे आवश्यक आहे. मुद्रिते तपासण्याचे काम ज्येष्ठ मित्र डॉ. ना. गो. कालेलकर यांनी हौसेने केले, हे कृतज्ञतापूर्वक नमूद करावयास हवे.

संग्रहातील 'ॲटलीचे प्रशासन-कौशल्य' हा लेख महाराष्ट्र सरकारच्या शासकीय मुद्रणालयातर्फे प्रसिद्ध झालेल्या पुस्तिकेवर आधारला आहे. ॲटली यांचे चिटणीस सर डेव्हिड हंट यांचा तो लेख असा जो उल्लेख आहे तो चुकीचा आहे.
काही किरकोळ मुद्रणदोष राहून गेले आहेत त्याबद्दल क्षमस्व.

'वाचस्पती'

मुंबई, ४ ऑगस्ट १९७९

वाचता वाचता

भाग पहिला

REFBK-0022779

'वाचस्पती'

वाचता
वाचता

'वाचस्पती'

...

©
लेखकाधीन

...

मुद्रक
सर्जेराव जी. घोरपडे
प्रिंटेक्स्ट
४६१/१ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

...

प्रकाशक
सर्जेराव जी. घोरपडे
प्रेस्टीज पब्लिकेशन्स
४६१।१ सदाशिव पेठ
टिळक रोड
पुणे ४११ ०३०

...

प्रथमावृत्ती
१ सप्टेंबर १९७९

...

२५ रुपये

निबंध
२७७९
२२७७९
९।१२।७९
संदर्भशास्त्र

डॉ. ना. गो. कालेलकर

यांच्या अकृत्रिम स्नेहास

वाचता
वाचता

'वाचस्पती'

...

©
लेखकाधीन

...

मुद्रक
सर्जेराव जी. घोरपडे
प्रिंटेक्स्ट
४६१/१ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

...

प्रकाशक
सर्जेराव जी. घोरपडे
प्रेस्टीज पब्लिकेशन्स
४६१।१ सदाशिव पेठ
टिळक रोड
पुणे ४११ ०३०

...

प्रथमावृत्ती
१ सप्टेंबर १९७९

...

२५ रुपये

निबंध
२००९
२२००९
२।१२२।०९
संदर्भशारदा

डॉ. ना. गो. कालेलकर

यांच्या अकृतिम स्नेहास

सर विन्स्टन चर्चिल

सर विन्स्टन चर्चिल यांच्या हयातीत व निधनानंतर त्यांच्यासंबंधी सतत काही ना काही वाङ्मय प्रसिद्ध होत असते. चर्चिल यांनी स्वतः विपुल लिखाण केले आणि त्यांच्याबद्दलच्या वाङ्मयालाही कमतरता नाही. त्यांच्या जन्माला ३० नोव्हेंबर १९७४ ला शंभर वर्षे झाली. जन्मशताब्दी वर्षात दहा लाख पौंडाचा निधी जमा होणार असून चर्चिल यांचे वाङ्मय सुन्दर मोहर-बंद अशा कागदावर प्रसिद्ध व्हावयाचे आहे. ३० नोव्हेंबरला बी.बी.सी.ने चर्चिल यांच्या युद्धकालीन भाषणातील सुप्रसिद्ध परिच्छेद त्यांच्याच ध्वनिफिती लावून ऐकून दाखवले. बी. बी. सी. च्या दूरचित्रवाणीने चर्चिल यांच्यावर एक चित्रपट तयार केला होता. रिचर्ड बर्टन यांनी चर्चिल यांची भूमिका केली. हा चित्रपट दूरचित्रवाणीवर दाखवण्यापूर्वी आठवडाभर आधी बर्टन यांनी 'न्यूयॉर्क टाइम्स' ला मुलाखत देताना चर्चिल यांची भरपूर निंदा केली; तेव्हा बी. बी. सी. ने बर्टन यांच्यावर बहिष्कार घाल-ण्याचे जाहीर केले. पण अतिरिक्त दारू पिऊन आपण वाटेल ते बहकलो असा खुलासा बर्टन यांनी केला व मग हा चित्रपट दाखवला गेला. बर्टन हे चर्चिल यांच्यासारखे दिसत नाहीत. त्यांचा आवाजही सारखा नाही, पण मनःचक्षूपुढे चर्चिल उभे करण्यात बर्टन यांनी उत्कृष्ट यश मिळवले, असे समीक्षकांनी म्हटले आहे.

व्यक्तित्व

चर्चिल हे अतिशय मनस्वी गृहस्थ होते. त्यांचे रागलोभ तीव्र असत. त्यांच्या या व्यक्तित्वावर प्रकाश टाकणारे लेख लंडन टाइम्स, गार्डियन, टेलिग्राफ, ऑब्झर्व्हर वगैरे पत्रांनी प्रसिद्ध केले आहेत. चर्चिल यांच्या स्वभावाला पक्षाची बंधने मानवली नाहीत. ते हुजूर पक्षाचे, पण नंतर लिबरल पक्षात गेले आणि नंतर पुन्हा हुजूर पक्षाचे नेते झाले. श्री. रोस हे प्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ आहेत. त्यांनी वीस वर्षांपूर्वी एक दिवस चर्चिल यांच्यावरोबर कसा घालवला याबद्दल लेख लिहिला आहे. युद्धकाळातील अनुभव सांगताना चर्चिल यांचे डाल्टन, बेव्हिन इत्यादी मजूर नेत्यां-बद्दलचे प्रेम स्पष्ट झाले. सरकार हलवण्याची वेळ आली असती तर लंडनमध्ये ते स्वतः, बीव्हरब्रूक व बेव्हिन असे तिघेच राहण्याचे त्यांनी ठरवले होते. चर्चिल हे हुजूर पक्षाचे खरे, पण त्या पक्षीयांबद्दल बोलताना चर्चिल आमचे सदस्य असे म्हणत नसत, तर 'ते' असे म्हणत.

चर्चिल यांच्या पक्षबदलाचा एक परिणाम असा झाला की लिबरल पक्षाचे लॉइड जॉर्ज यांचे संबंध दुरावले. पुढे २७ सालची गोष्ट. चर्चिल बाल्डविन मंत्रिमंडळात अर्थमंत्री होते. त्यावेळी ते 'वर्ल्ड क्राइसिस' या आपल्या पहिल्या महायुद्धविषयक ग्रंथाचा शेवटचा भाग लिहीत होते. त्यांना काही माहिती हवी होती. लॉर्ड बुथबी हे त्यांचे संसदीय चिटणीस होते व त्यांचे आणि लॉईड जॉर्ज यांचे सख्य विशेष. तेव्हा लॉईड जॉर्ज आपल्याला भेटण्यास येतील काय असे चर्चिल यांनी लॉर्ड बुथबी यांना विचारले. त्यांनी भेट ठरवली. तासभर चर्चा झाली. बुथबी चर्चिल यांच्या दालनात गेले व भेट कशी झाली असे त्यांनी विचारले. चर्चिल म्हणाले, 'उत्तम. मला हवी ती माहिती मिळून माझ्या शंकांचे निरसन झाले. पाच मिनिटांत आमचे पूर्वीचे संबंध पुन्हा प्रस्थापित झाले.'

'हे संबंध कोणते?'

'लॉईड जॉर्ज धनी व मी त्यांचा नोकर, हे.'

रोस यांनीही चर्चिल यांच्या कामातील व्यग्रतेची कल्पना दिली आहे. मार्लबरोविषयी ते पुस्तक लिहीत होते. चर्चिल यांच्याशी त्यांना चर्चा करावयाची होती. चर्चिल यांनी प्रुफे वाचावयास घेतली तेव्हा, रोस म्हणतात, त्यांना इतर कशाचेही भान नव्हते, इतके ते वाचनात गुंगून गेले होते. भोजनाच्या वेळी व नंतरही ते त्याच विषयावर बोलत राहिले.

सर विन्स्टन चर्चिल आपल्या अभ्यासिकेत

सतत काम करीत राहिल्याखेरीज आपल्याला चैनच पडत नाही असे चर्चिल यांनी त्यांना सांगितले.

युद्धकाळात

युद्धकाळातील चर्चिल यांच्याविषयीच्या अनेक आठवणी पूर्वी प्रसिद्ध झाल्या आहेत व आताही आणखी काही झाल्या आहेत. ग्रामीण भागातील चार्टवेल या चर्चिल यांच्या निवासस्थानावर बॉम्बफेक होणार असे कळल्यानंतर शनिवार-रविवार ते रोनाल्ड ट्री यांच्या डिचली येथील निवासस्थानी सुटी घालवीत. एकदा डिचलीकडे ते निघाले असता त्यांच्या चिटणीसाने मोटरीत त्यांना गुप्त संदेशांची फाइल दिली. लंडनवर त्याच रात्री बॉम्बफेक होणार असा संदेश होता. अशा वेळी आपण लंडनपासून दूर सुरक्षित स्थळी राहणे अयोग्य असा विचार करून चर्चिल यांनी मोटर वळवण्यास सांगितले. ते १० डाऊनिंग स्ट्रीटला परत आले व त्या रात्री तेथेच राहिले. सुदैवाने बॉम्बहल्ला मात्र झाला नाही. बॉम्बफेकीने उध्वस्त झालेल्या ठिकाणी चर्चिल तावडतोब जात; त्यामुळे लोकांना प्रचंड धीर येत असे. युद्ध जिंकण्याचा चर्चिल यांचा आत्मविश्वास दांडगा होता आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीत आठवड्यातून एकदा ते सहकाऱ्यांना धीर देणारे व्याख्यान देत. त्याचे टिपण डाल्टन यांनी ठेवले होते.

युद्धकाळानंतरची एक आठवण अशी, की अमेरिकेचे जनरल जॉर्ज मार्शल चर्चिल यांच्याकडे पाहुणे म्हणून आले असता जर्मन नेत्यांवर न्यूरेनबर्ग येथे झालेल्या खटल्याचा विषय निघाला. असे खटले पुन्हा होता कामा नये असे त्यांचे म्हणणे होते. मार्शल यांना ते म्हणाले, 'समजा डाव उलटला असता तर काय झाले असते? आपल्यावर खटले झाले असते. अखेरीस हिरोशिमा व नागासाकीवरील अणुबॉम्बफेकीच्या जबाबदारीत माझाही वाटा आहे.' थोडे थांबून मात्र ते म्हणाले, 'याचा जाब परमेश्वराच्या न्यायासनापुढे मला द्यावा लागेल. तेव्हा मात्र त्याला सांगेन, की आमची सर्वांची माथी तप्त झाली असता अणूचे रहस्य तूच आमच्या हाती दिल्याने हे झाले!'

चर्चिल हे कट्टर हिटलरविरोधी. पण रोमेल, माइन्स्टाइनसारख्या

युद्धवीरांबद्दल त्यांना असीम आदर. रोमेलच्या मृत्यूनंतर त्यांनी कॉमन्स सभागृहात त्याचा गौरव केला होता, तर माइन्स्टाइनवर युद्धगुन्हेगारीसाठी खटला झाला तेव्हा त्यांनी त्याला शंभर पौंड धाडले होते !

ढंगदार व्यक्तित्व

चर्चिल यांचे व्यक्तित्व अतिशय ढंगदार होते. धनिक, ऐतिहासिक घराण्यात त्यांचा जन्म झाला, पण निवडणुकीच्या रणधुमाळीत त्यांना अतिशय रस होता. त्यांच्या उतावीळ, मनस्वी स्वभावाला पायबंद घालताना त्यांच्या पत्नीच्या नाकी नऊ येत. आपल्या लेखणीने व वाणीने त्यांनी सर्वांना मंत्रमुग्ध केले होते. बी. बी. सी. ने ३० नोव्हेंबरला त्यांच्या भाषणातील जे परिच्छेद ऐकवले, त्यावरून त्याची पुन्हा कल्पना आली. आजकाल उत्कृष्ट राजकीय भाषणे आकाशवाणीवर दुर्मिळ झाली आहेत, असे सांगताना लंडनच्या इंडिपेन्डन्ट टेलिव्हिजनचे कॉलिन्स, चर्चिल यांच्या भाषणांचा गौरवपूर्वक उल्लेख करतात. केनेडीवर ग्रंथ लिहिणारे व्हाइट हे चर्चिल यांच्याशी वक्तृत्वाबद्दल बोलत असता चर्चिल म्हणाले की, 'उत्तम वक्तृत्व करावयाचे असेल तर तुम्हाला गिबन उत्तमपैकी माहीत असला पाहिजे. त्याशिवाय तुमची भाषा कमावलेली होणारच नाही.' असे सांगून त्यांनी व्हाइट यांना गिबनच्या ग्रंथातील काही उतारे तोंडपाठ म्हणून दाखवले.

चर्चिल आपली भाषणे लिहून काढून पाठ करीत. परंतु लिहिलेल्या भाषणाचे कागद त्यांना भाषण करताना समोर हवे असत. एकदा टंकलेखकाने एका टंकलिखित कागदाची दुसरी प्रतही ठेवली, ती काढण्याचे तो विसरला. भाषणाच्या नादात चर्चिल यांनी अगोदर बोलून दाखवलेला भागच परत बोलण्यास सुरुवात केली. चर्चिल यांच्या व्यक्तित्वाने व वक्तृत्वाने भारावलेल्या श्रोत्यांच्या हे लक्षात आले नाही. पण भाषणाची प्रत वाचणाऱ्या वार्ताहरांच्या लक्षात आले. अर्ध्याअधिक भागाची अशारीतीने द्विरुक्ती झाल्यावर चर्चिल यांनी 'मी पूर्वी जे म्हटले होते ते महत्त्वाचे असल्याने त्याची येथे द्विरुक्ती करणे आवश्यक आहे !' असे सांगून वेळ निभावून नेली.

चर्चिल यांच्या आजारानंतर त्यांचे भाषण ठरले. पण भाषण करतानाच हृदयविकाराचा झटका येऊन ते कोसळले तर काय ? या विचाराने सर्वजण हवालदिल होते. परंतु असा प्रसंग उद्भवलाच, तर ते छायाचित्र ऐतिहासिक ठरणार होते. हा ऐतिहासिक क्षण हुकता कामा नये म्हणून छायाचित्रकार चर्चिल यांचे भाषण चालू असेपर्यंत सतत सुसज्ज राहिले. पण चर्चिल यांना काही झटका आला नाही. भाषण संपवल्यावर त्यांनी मिस्किलपणे छायाचित्रकारांना विचारले, 'काय ? अगदीच वाईट झालं, नाही का ?'

खोडकरपणा

चर्चिल हे लहानपणी हूड होते व त्यांच्या स्वभावातील बालिशपणा शेवटपर्यंत कायम राहिला. यासंबंधीची एक गंमतीदार आठवण सर फिटझरॉय मॅकलीन यांनी दिली आहे. ते युद्धकाळात युगोस्लाव्हियात ब्रिटिश लष्करी मंडळाचे प्रमुख होते. त्यांनी मार्शल टिटो व चर्चिल यांच्या भेटीची आठवण दिली आहे. ही भेट नेपल्सजवळ एका प्रासादात झाली. मार्शल टिटो यांचे दोन शरीररक्षक दोन मशीनगन्स घेऊन सतत पहारा करीत होते. दुपारच्या भोजनाची वेळ झाली. टिटो व चर्चिल हात धुण्यासाठी वेगवेगळ्या दिशांच्या बाथरूममध्ये गेले. थोड्या वेळाने बाहेर येतात तो टिटो यांच्याबरोबरचे मशीनगनधारी रक्षक बघून चर्चिल यांना चेष्टा करण्याची लहर आली. ते टिटो यांच्याजवळ गेले आणि स्वतःच्या खिशात चिरूट ठेवण्याची एक सोन्याची पेटी होती, ती त्यांनी बाहेर काढली. पेटी पिस्तुलाएवढी होती. टिटो यांच्या पोटाशी नेऊन चर्चिल यांनी कळ दाबली; लांबून भास व्हावा ते पिस्तुल उडवीत आहेत. टिटो यांच्या हे लक्षात येऊन ते मोठ्याने हसले. पण तिकडे मॅकलीन यांना घाम फुटला. आपल्या नेत्यावर पिस्तुल रोखले आहे, अशी कल्पना करून त्या रक्षकांनी बंदूक झाडली असती तर काय, या विचाराने मॅकलीन घाबरून गेले. पण दोघाही नेत्यांचा हसण्याचा आवाज ऐकून त्यानी खिशातून रुमाल काढला व घामाने डबडबलेले कपाळ पुसले !

२२-१२-७४ ⊙

लॉइड जॉर्ज व चर्चिल

माजी ब्रिटिश पंतप्रधान हॅरॉल्ड मॅकमिलन हे यशस्वी पंतप्रधान म्हणून गाजले. त्याचप्रमाणे त्यांची पुस्तकेही ऐतिहासिक महत्त्वाची ठरत आहेत. त्यांच्या सहा खंडांतील आत्मचरित्रास ऐतिहासिक महत्त्व आहे. आता 'पास्ट मास्टर्स' हे त्यांचे पुस्तक प्रसिद्ध झाले असून ते मुख्यतः व्यक्तिरेखांचे आहे. लॉइड जॉर्ज, मॅकडोनाल्ड, चर्चिल, चेंबर्लेन, बाल्डविन इत्यादींच्या व्यक्तिरेखा मॅकमिलन यांनी रेखाटल्या आहेत. (प्र. मॅकमिलन अँड कंपनी. किं. ४५ रु.)

कोणताही नावाजलेला ब्रिटिश राजकारणी हा पार्लमेन्टच्या इतिहासात, परंपरेत मुरलेला, त्यावर प्रेम करणारा असतो. मॅकमिलन यांनी पार्लमेन्टच्या या परंपरेचे व प्रभावाचे मोठ्या आत्मीयतेने वर्णन केले आहे. ब्रिटिश पार्लमेन्टचे स्वरूप कसे बदलले? त्यातील स्वतंत्र सभासदांचे स्थान काय? वेगवेगळ्या पक्षातील जे जहाल सभासद असतात त्यांची कामगिरी कोणती? महिला सभासदांचे स्थान कोणते? इत्यादीविषयी मॅकमिलन यांनी रंगून जाऊन मतप्रदर्शन केले आहे.

तथापि पार्लमेन्ट म्हणजे हे स्वतंत्र वा जहाल सभासद किंवा महिला सभासदच नव्हेत. आपल्या व्यक्तिवैशिष्ट्याने अनेकांनी पार्लमेन्टच्या व त्यायोगे ब्रिटनच्या इतिहासावर आपला ठसा उमटवला आहे. मॅकमिलन यांना यांपैकी ज्यांचा सहवास लाभला त्यांच्या व्यक्तिरेखा काढून त्यांचे ऐतिहासिक महत्त्व त्यांनी मोठ्या मार्मिकपणे वर्णन केलेले आढळेल.

यांपैकी सर्वांत अधिक प्रभाव पडलेला दिसतो तो लॉइड जॉर्ज यांचा. लॉइड जॉर्ज हे पट्टीचे वक्ते, पहिल्या प्रतीचे संसदपटू आणि यशस्वी युद्धकालीन पंतप्रधान होते. मॅकमिलन म्हणतात, 'लॉइड जॉर्ज हे नुसतेच चळवळे नव्हते, तर त्यांच्यापाशी विधायक कर्तृत्व होते. त्यांनी वृद्धांसाठी पेन्शनची योजना सुरू केली आणि राष्ट्रीय विम्याची योजनाही त्यांचीच. यामुळे एक नवे पर्वच त्यांनी सुरू केले. सर्व पक्षांतल्या अनेकांनी गरिबीच्या प्रश्नाचा अभ्यास केला होता, पण तो सोडवण्यासाठी सरकारी रीत्या पाऊल टाकले ते लॉइड जॉर्ज यांनी. यामुळे कल्याणकारी राज्याचे तेच खरे जनक ठरतात.'

प्रशासक याही नात्याने लॉइड जॉर्ज यांनी मोलाची कामगिरी बजावली. पहिल्या महायुद्धात पंतप्रधानपद हाती आल्यावर त्यांनी युद्धसामग्री तयार करण्यासाठी स्वतंत्र खाते स्थापन केले. या खात्यासाठी फारच थोडी साधनसामग्री दिली गेली होती. पण काही महिन्यांतच लॉइड जॉर्ज यांनी हे खाते अतिशय महत्त्वाचे बनवले आणि युद्धाच्या गरजा ते भागवू लागले. सेनापतींना आपल्याला किती साधनसामग्री लागेल याचा अंदाज घेता येत नव्हता, तो लॉइड जॉर्ज घेऊ शकले आणि त्यामुळे सैन्याला व्यवस्थित पुरवठा होऊ लागला. मॅकमिलन मग दुसऱ्या युद्धात पुरवठामंत्री झाले तेव्हा त्यांनी फक्त लॉइड जॉर्ज यांचीच यंत्रणा नव्या परिस्थितीला शोभेल अशा रीतीने घासून स्वच्छ केली. याचा फार मोठा उपयोग झाला. मॅकमिलन यांच्या मते लॉइड जॉर्ज हे आपल्या काळातले सर्वश्रेष्ठ असे युद्धमंत्री होते. पुढे युद्ध थांबले आणि जर्मनीकडून नुकसानभरपाई घेण्याचा प्रश्न आला. फ्रेंच नेते जास्तीत जास्त भरपाई घेऊ पाहात होते. पण लॉइड जॉर्ज यांनी त्याला मोडता घातला. अर्थात हे जे यश त्यांना मिळत गेले त्याचा परिणाम अधिकारपदाच्या अखेरच्या काळात लॉइड जॉर्ज हे आत्मकेंद्रित बनण्यात झाला. ते कोणाला विश्वासात घेईनातसे झाले आणि भ्रष्टाचारही वाढला.

लॉइड जॉर्ज हे उत्कृष्ट वक्ते होते. चर्चिल हे नामवंत वक्ते खरे, पण ते आपले भाषण लिहून आणीत. लॉइड जॉर्ज थोड्या टिपणांच्या साहाय्याने भाषण करीत. त्यामुळे त्यांच्या भाषणात लवचिकपणा येई. हजरजबाबीपणा,

विनोद, उपहास इत्यादी पट्टीच्या वक्त्याचे सर्व गुण त्यांच्यापाशी होते. पार्लमेन्टमध्ये भाषण करताना अनेक मुद्दे आणू नयेत एक वा दोन मुद्देच यावेत म्हणजे सभासदावर छाप पडते व प्रसिद्धीही मिळते, अशी सूचना त्यांनी मॅकमिलन यांना देऊन ठेवली होती.

रम्से मॅकडोनाल्ड हे एक रोमॅन्टिक गृहस्थ होते. ते मजूरपक्षीय खरे, पण त्यांनी मार्क्सवादाचा अभ्यास केला होता, असे मॅकमिलन याना वाटत नाही. ब्राल्डविन यांची प्रतिक्रिया झटकन होत नसे, पण संकटकाळी त्यांच्यातील सुप्तशक्ती जागृत होई. नॉर्थक्लिफ वगैरे काही पत्रसृष्टीचे सम्राट राजकारणात हस्तक्षेप करून मंत्रिमंडळ बनविण्याच्या उद्योगात आपणास सहभागी करून घ्यावे यासाठी खटपट करीत होते. पण ब्राल्डविन यांनी त्यांना जाहीरपणे चमकावले.

चेंबर्लेन व चर्चिल

चेंबर्लेन हे अयशस्वी ठरलेले पंतप्रधान. परंतु त्यांच्यात काही गुण मोठे होते. त्यांच्या शरीरयष्टीवरून ते मनानेही अशक्त असतील असे वाटे. पण मॅकमिलन म्हणतात की, चेंबर्लेन यांना भलताच आत्मविश्वास होता. किंबहुना यामुळेच त्यांना हिटलरच्या खोटेपणाची कल्पना आली नाही आणि नामुष्की होऊन अधिकारपद सोडून द्यावे लागले.

चेंबर्लेन यांनी अधिकारपद सोडले तेव्हा युद्धकालीन नेतृत्व करण्यासाठी नेता हवा होता. चर्चिल यांच्या रूपाने तो मिळाला. चर्चिल यांच्यासंबंधी बरेच लिहिले गेले असल्याने मॅकमिलन यांनी तपशीलवार लिहिले नाही. पण त्यांनी दिलेली एक आठवण उल्लेखनीय ठरेल.

मुसोलिनीने ॲबिसिनियावर स्वारी केल्याची बातमी ज्यावेळी आली तेव्हा चर्चिल आपल्या चार्टवेलच्या निवासस्थानी होते व मॅकमिलन त्यांचे पाहुणे होते. बातमी आल्याबरोबर चर्चिल यांनी नकाशे मागवले, त्यांच्या सेक्रेटरींची धावपळ सुरू झाली. फोन खणखणू लागले. चर्चिलने प्रश्न केला. 'ब्रिटिश आरमार या वेळी कोठे आहे?' चौकशा सुरू झाल्या. माहिती कळली की, भूमध्य समुद्रात ते सर्वत्र विखुरलेले होते. चर्चिल यांनी मग पार्लमेन्टमध्ये यावरच हल्ला केला. मॅकमिलन म्हणतात, की चर्चिल हे काही अधिकारपदावर नव्हते, पण सर्व परिस्थितीवर त्यांचीच हुकमत आहे अशा थाटात ते वावरत व बोलत होते.

लॉइड जॉर्ज आणि चर्चिल

९-५-७६

चर्चिलचे मद्यप्रेम

मरहूम सर विन्स्टन चर्चिल यांचे मद्यप्रेम सुप्रसिद्ध आहे. सकाळच्या छोट्या न्याहरीपासून किंवा कधी कधी त्याही अगोदर ते शेरी किंवा ब्रॅन्डीपासून प्रारंभ करीत. दिवसातून अनेक वेळा ते शॅम्पेन, व्हिस्की, जीन, ब्रॅन्डी यांचा आस्वाद घेत. सर्व मिळून दिवसभरातून अनेकदा दोन बाटल्या मद्य ते पचवीत. त्यांच्या या मद्यप्रेमामुळे दुसरे महायुद्ध दोन वर्षांनी लांबले, असे विधान डॉ. ज्युलीअस मरे या मद्यविषयक तज्ज्ञ डॉक्टराने लंडनमध्ये एका सभेत बोलताना नुकतेच केले. या विधानाचा अधिक खुलासा त्यांनी केला नाही. पण डॉ. मरे यांच्या विधानाबद्दल ब्रिटनमध्ये चर्चा सुरू झाली आहे. सकाळी, दोन्ही वेळच्या जेवणाच्या बरोबर व अगोदर मद्यप्राशन करणारे चर्चिल हे दिवसातून डझनभर चिरूटही ओढीत. त्यांचा आहारही चांगला होता आणि क्रीम त्यांना मानवणारे नसले तरीही ते त्यांना फार आवडत असे. उत्तम मद्य, उत्तम आहार व उत्तम चिरूट हे सर्व चर्चिल यांच्या आवडीचे विषय. एवढे करून त्यांची प्रकृती उत्तम होती. आणि ऐंशीच्या पलीकडेही ते जगले. फिल्डमार्शल मॉंटगोमरी यांचा व चर्चिल यांचा एक संवाद प्रसिद्धच आहे. मॉंटगोमरी म्हणाले, 'मी मद्य घेत नाही, धूम्रपान करीत नाही आणि जाग्रणेही करीत नाही, त्यामुळे माझी प्रकृती शंभर टक्के उत्तम आहे.' यावर चर्चिल म्हणाले, 'मी धूम्रपान व मद्यपान करतो आणि जाग्रणेही करतो, पण माझी प्रकृती दोनशे टक्के उत्तम आहे.' एका मद्यपान व धूम्रपान न करणाऱ्या संपादकाला ते म्हणाले, 'तुम्ही दोन्ही करीत नाही, मग सॉड्रेन द्यायला तुमच्यापाशी काय आहे?'

अशा या चर्चिल यांच्या मद्यप्रेमामुळे युद्ध लांबले, हे डॉ. मरे यांचे विधान अनेकांना मान्य नाही. 'टेलिग्राफ' ने याबाबत कार्हींच्या मुलाखती घेतल्या आहेत. यांत ए. जी. पी. टेलर यांच्यासारखे इतिहासतज्ज्ञ आहेत, त्याचप्रमाणे लॉर्ड शिनवेल यांच्यासारखे नव्वद वर्षांचे मजूरपक्षीय आहेत. टेलर म्हणतात, 'इतके मूर्खपणाचे विधान मी कधी ऐकले नव्हते. चर्चिल यांना मद्य आवडत होते, पण त्यामुळे त्यांच्या बौद्धिक शक्तीवर कधीच परिणाम झाला नाही. १९ व्या शतकात बिस्मार्क जर्मनीवर प्रभुत्व गाजवीत होता. तो आपला दिवसच शॅम्पेनची बाटली पिऊन सुरू करीत असे आणि दिवसभरात ब्रॅन्डीची एक बाटली तरी त्याने पचवलेली असे.' लॉर्ड डन्कन सॅन्डस् हे चर्चिल यांचे जावई. त्यांनीही डॉ. मरे यांचे विधान मूर्खपणाचे ठरवले आहे. अनेक वर्षे पार्लमेन्टच्या कामकाजाचे वृतान्त लिहिणाऱ्या एका पत्रकाराचे मतही असेच आहे. तो म्हणतो, 'चर्चिल हे मद्यप्रेमी होते हे सर्वश्रुत आहे. पण पार्लमेन्टमध्ये त्यांच्या वागण्या-बोलण्यात मद्याचा परिणाम झाल्याचे कधीही आढळले नाही.' लॉर्ड शिनवेल हे चर्चिल यांचे विरोधक. पण त्यांचेही मत या वार्ताहरासारखे आहे. ते म्हणतात, 'चर्चिल यांना नशा येत होती ती त्यांच्या वक्तृत्वाची, मद्याची नव्हे! प्रचंड उत्साह व प्रचंड बौद्धिक उंची असलेले ते नामवंत ब्रिटिश होते.'

१४-९-७५ ◉

चर्चिल । स्टालीन । रुझवेल्ट

अॅव्हरल हॅरिमान हे सत्तरीच्या घरात आहेत. युद्धकाळात अध्यक्ष रुझवेल्ट यांचे ते ब्रिटन व पुढे रशिया येथील खास राजदूत होते. राजदूत असले तरी ते अमेरिकन परराष्ट्र खात्यातर्फे नव्हे, तर अध्यक्ष रुझवेल्ट यांच्याशी साक्षात संपर्क ठेवू शकत होते. इंग्लंडमध्ये अमेरिकेचा वकील होता; पण रुझवेल्ट यांनी हॅरिमान यांना खास राजदूत नेमले होते. या काळात हॅरिमान यांनी फार मोलाची कामगिरी बजावली. त्या-संबंधी त्यांनी कागदपत्र जपून ठेवले होते आणि त्यांची मुलगी कॅथलीन ही आपल्या बहिणीला, मैत्रिणींना पत्रे लिही. या सर्वांचा उपयोग करून हॅरिमान यांच्या सहकार्याने एली एबेल यांनी 'स्पेशल एन्व्हॉय' हे पुस्तक लिहिले आहे. एबेल हे अमेरिकेतील नावाजलेले पत्रकार आहेत.

हॅरिमान हे रुझवेल्ट यांच्या विश्वासातले. त्यांच्या अनेक स्वभाववैशिष्ट्यांवर हॅरिमान यांनी प्रकाश टाकला आहेच; पण त्याचबरोबर चर्चिल आणि स्टालीन यांचाही विश्वास त्यांनी संपादन केला असल्याने त्यांचीही स्वभाव-वैशिष्ट्ये अनेक संभाषणातून व प्रसंगातून व्यक्त झाली आहेत. वस्तुतः हॅरिमान यांचे हे पुस्तक तीस वर्षे उशिरा प्रसिद्ध होत आहे. कारण या काळात चर्चिलपासून अनेकांच्या आठवणींचे ग्रंथ प्रसिद्ध झाले. त्यामुळे यातील काही भाग हा सर्वश्रुतच आहे. तरीही वैयक्तिक दृष्टिकोणाचा प्रभाव असतो व महत्त्व असते. म्हणून उशिरा प्रसिद्ध होऊनही हॅरिमान यांचा हा ग्रंथ आकर्षक, चटकदार झाला आहे.

रुझवेल्ट

रुझवेल्ट यांनी युद्धाच्या प्रारंभी ब्रिटनला व पुढे रशियाला मदत करण्याचे आटोकाट प्रयत्न केले. त्यांचे राजकीय कौशल्य या निमित्ताने पुन्हा एकदा प्रगट झाले. रुझवेल्ट यांची बोलण्याची एक लकब होती. त्यांना एखाद्या विषयावर दुसऱ्या कोणाचे मत पसंत नसले व त्यावरील चर्चा त्यांना थांबवावयाची असली तर ते त्याला होकार देत. ऐकणाराला वाटे आपले म्हणणे अध्यक्षांनी मान्य केले. पण रुझवेल्ट यांच्या शब्दकोशात या होकाराचा अर्थ वेगळाच असे. चर्चा टाळण्यासाठी त्यांनी होकार भरलेला असून आपल्या मनाप्रमाणे वागण्यास यामुळे ते मुभा घेत. यातून अनेक गैरसमज होत व रुझवेल्ट खोटे बोलतात, बनवतात असा ग्रह होई. रुझवेल्ट यांच्या बोलण्याची ही ढब युद्धकाळात स्टालीनबरोबरच्या चर्चेच्या वेळी बरीच महाग पडली. अप्रिय मुद्यावर चर्चा नको असेल तर रुझवेल्ट होकार देत. पण नंतर वेगळी पावले टाकीत. त्यामुळे स्टालीनने नंतर रुझवेल्ट व अमेरिका यांच्यावर विश्वासघाताचे आरोप केले. रुझवेल्ट यांनी स्टालीनवर विश्वास बराच टाकला आणि चर्चिल यांचे न जुमानता स्टालीनला खूष करण्याच्या नादात अंगाशी येणाऱ्या सूचना मान्य केल्या. युद्धोत्तर युरोपला रुझवेल्ट यांच्या गफलतींचे परिणाम भोगावे लागले. याल्टा परिषदेच्या वेळी तर ते आजारीच होते आणि हे आजारपण अनेक चुकीचे निर्णय घेण्यास कारणीभूत ठरले.

क्रिप्स वगैरे

हॅरिमान यांचा या काळात केवळ रुझवेल्ट, स्टालीन यांच्याशीच संबंध आला नाही, अनेकांशी आला. रशियावर हिटलरने हल्ला केला तेव्हा अनेक ब्रिटिश व अमेरिकन अधिकारी तीन आठवड्यात रशिया कोसळेल असे मानीत होते. तीन उलटून गेले तरीही पुढे आणखी तीन आठवड्यांचा अवधी दिला जात होता. जनरल इस्मे हे त्यांपैकी एक. मॉस्कोत हॅरिमान व बीव्हरब्रूक स्टालीनशी वाटाघाटी करावयास गेले तेव्हा क्रिप्स व अमेरिकन राजदूत यांनाही रशिया फारसा तग धरील असे वाटत नव्हते. क्रिप्सनी त्यांच्या पद्धतीने शब्दबंबाळ पण अवास्तव असा अहवाल तयार

डावीकडून (बसलेले) स्टालीन, रुझवेल्ट व चर्चिल
उभे : हॉपकिन्स, मोलोटोव्ह, हॅरीमान, सराई चर्चिल, ईडन

केला होता. पण हॅरिमान यांनी तो अमान्य केला. हॉपकिन्स व हॅरिमान यांचा रशियाच्या प्रतिकारशक्तीवर विश्वास होता आणि त्यांनी त्याप्रमाणे रुझवेल्ट यांना कळवलेही होते.

बीव्हरब्रूक हे चर्चिल यांचे मित्र, डेली एक्स्प्रेसचे मालक व ब्रिटिश मंत्रिमंडळातील पुरवठामंत्री. ते हॅरिमानबरोबर स्टालीनशी चर्चा करण्यासाठी आले. प्रथम थोडी गरमागरम चर्चा झाली. चर्चिल यांनी स्टालीनला पत्र दिले होते, ते त्याने धड वाचलेही नाही. अर्थात दुसऱ्या दिवशी स्टालीन चांगला वागला व बीव्हरब्रूक आणि हॅरिमान यांची भेट बरीच सफल ठरली. भोजनाच्या वेळी बऱ्याच गप्पा रंगल्या. बीव्हरब्रूकनी स्टालीनला विचारले, 'क्रिप्स कसे काय वाटतात ?' स्टालीनने फारसा उत्साह दाखवला नाही. बीव्हरब्रूक म्हणाले, 'क्रिप्स एरवी चांगले आहेत. पण कंटाळवाणे आहेत.' स्टालीन त्यावर हसला आणि त्याने विचारले, 'लंडनमधील आमच्या राजदूत मेस्कीसारखे काय ?' बीव्हरब्रूक म्हणाले, 'नाही, मिसेस मेस्कीसारखे.' तेव्हा एकच हशा पिकला !'

बीव्हरब्रूक हे दडपेगिरी करण्यात पटाईत. चर्चिल व हॅरिमान यांचे पहिल्या भेटीपासूनच सख्य जमले होते. पण बीव्हरब्रूक हॅरिमानना दमात घेऊ पाहात होते. कॅथलिन लिहिते, 'हॅरिमान यांना सभ्य व गुंडगिरीची अशा दोन्ही भाषा अवगत असल्याने बीव्हरब्रूकना त्यांनी सरळ केले.' तिचे मत असे, की चर्चिल सभ्य गृहस्थ आहेत तर बीव्हरब्रूक दांडगेश्वर, गुंड आहेत. याच बीव्हरब्रूकचा सल्ला पुढे चर्चिल यांना महाग पडला, असे हॅरिमानचे म्हणणे. हा सल्ला म्हणजे निवडणूक घेण्याचा. डेली एक्स्प्रेस हे सर्वांत अधिक खपाचे दैनिक. ब्रिटिश नागरिकाला ते रोज न्याहरीच्या वेळी हवे; पण त्यातील मतेही त्याला ग्राह्य वाटतात हा बीव्हरब्रूक यांचा समज. पण त्यांना ब्रिटिशांच्या राजकीय मतांचा थांग नव्हता. म्हणून निवडणूक घेऊन चर्चिल यांनी पराभव ओढून घेतला.

चर्चिल

हॅरिमान यांनी चर्चिल यांचे या पुस्तकात घडवलेले दर्शन मार्मिक आहे. चर्चिल यांचे अनेक राजकीय आडाखे हॅरिमान यांना अचूक वाटत.

त्यांची भावनात्मकता त्यांना आकर्षक वाटत होती. चर्चिल यांचे साम्राज्य-प्रेम मात्र त्यांना मान्य नव्हते. हॅरिमान रुझवेल्ट यांचे प्रतिनिधी म्हणून लंडनमध्ये आले आणि त्यांनी एकदा चर्चिल यांच्याबरोबर बॉम्बवर्षाव झालेल्या भागाला भेट दिली. लोक धैर्याने वागत होते. चर्चिल यांचे त्यांनी हर्षभराने स्वागत केले. आगगाडीने हे दोघे परत निघाले तेव्हा असंख्य लोक पोचवण्यास आले होते. गाडी सुटून हे लोक दृष्टीआड झाले. तेव्हा हॅरिमान म्हणतात चर्चिल यांनी आपल्या डोळ्यांतील अश्रू लपवण्यासाठी वृत्तपत्र समोर धरले व म्हणाले, 'या लोकांचा इतका विश्वास असल्याने केवढी प्रचंड जबाबदारी माझ्यावर आहे!' (हॅरिमान यांनी आणखी एका मोठ्या व्यक्तीला असे भावनाविवश होताना पाहिले व ते म्हणजे जनरल वेव्हेल यांना. 'आफ्रिकेतील युद्धात तुम्ही मोलाची कामगिरी बजावली' असे हॅरिमान म्हणाले तेव्हा वेव्हेल यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. ते म्हणाले, 'माझे सैनिक खरोखर उत्तम काम करीत आहेत. सारे श्रेय त्यांना आहे!') हॅरिमान लंडनला प्रथम आले तेव्हा सामान्य लोक, मंत्री व पंतप्रधान चर्चिल यांच्या राहाणीतील साधेपणा त्यांच्या नजरेत भरला. चर्चिल तर आपल्याला मिळणाऱ्या रेशनमध्ये भागवण्याबाबत फार काटेकोर राहात. याउलट हॅरिमान मॉस्कोला गेले तेव्हा स्टॉलीनने त्यांना बादशाही खाना दिला! हॅरिमान यांनी ब्रिटिश वरिष्ठ सनदी नोकरांच्या कार्यक्षमतेबद्दलही धन्यवाद दिले आहेत. अनेक विषयांवरील चर्चेनंतर घेतलेले निर्णय नमूद करताना या अधिकाऱ्यांचे भाषाप्रभुत्वही स्पष्ट दिसून येई. अशा रीतीने सारा ब्रिटिश समाज बरोबर घेऊन चर्चिल युद्धात उतरले होते.

चर्चिल व स्टालीन

चर्चिल व स्टालीन यांच्या भेटीची मार्मिक वर्णने हॅरिमान यांनी केली आहेत. पहिल्या भेटीत पहिल्या दिवशी दोघांची चकमकच उडत होती, पण नंतर वातावरण बदलले. चर्चिल यांचे शब्दप्रेम विलक्षण. आपल्या दुभाषाला ते ढोपराने ढोसून सारखे विचारीत, 'तू हे सांगितलेस, ते सांगितलेस?' स्टालीन थोड्या वेळाने त्यांना म्हणाला, 'हे पहा मि. चर्चिल, तुमचे शब्द महत्वाचे नाहीत. त्यामागची भावना महत्त्वाची आहे.' भोजनप्रसंगी स्टालीन व चर्चिल यांनी भरपूर मद्यपान केले. स्टालीनने मग चर्चिल यांना सांगितले की नॅन्सी ॲस्टर वगैरेंचे शिष्टमंडळ आले असता मी तुमची चौकशी केली, पण नॅन्सी ॲस्टर म्हणाली, 'चर्चिल आता संपले आहेत.' मी म्हणालो, 'चर्चिल संपले नाहीत, कठीण प्रसंग येईल तेव्हा ब्रिटिश लोक चर्चिलकडेच वळतील. आणि झाले तसेच.'

चर्चिल त्यावर म्हणाले, 'रशियन क्रांतीनंतर मी जी भूमिका घेतली होती त्यामुळे ॲस्टर तसे म्हणाली असेल. पण त्या भूमिकेबद्दल तुम्ही मला क्षमा कराल काय?' स्टालीनने उत्तर दिले, 'मी कोण क्षमा करणार? परमेश्वर करू शकेल.' युद्धापेक्षाही शेतीच्या सामुदायीकरणाच्या वेळी शेतकऱ्यांनी विरोध केला, तेव्हा आपल्यापुढे मोठे संकट होते व त्याचा अधिक ताण होता, असेही स्टालीनने चर्चिल यांच्यापाशी कबूल केले. चर्चिलनी विचारले. 'लंडनला कधी आला होता काय?' स्टालीन म्हणाला, 'होय. त्यावेळी लेनिन वगैरे कम्युनिस्ट पक्षाच्या बैठकीसाठी जमले होते.' चर्चिलनी मुद्दामच विचारले, 'आणि ट्रॉटस्की? तो होता की नाही?' स्टालीन म्हणाला, 'ट्रॉटस्की होता, पण तो कोणाचाच प्रतिनिधी नसल्याने थोड्या वेळात निघून गेला!'

एकदा एका भोजनप्रसंगी रशियन व ब्रिटिश प्रतिनिधी मद्याचे टोस्ट देतघेत होते. ब्रिटिश राजदूताने बेरियाचे शुभचिंतन केले व 'आपल्या सर्वांच्या रक्षणाची जबाबदारी त्यांची आहे' असे तो म्हणाला. त्याबरोबर चर्चिल त्याच्याजवळ गेले व त्याला 'सावध राहा, सावध राहा' असा इशारा देऊ लागले.

युद्धसमाप्ती जवळ आली असता रुझवेल्ट, स्टालीन, चर्चिल यांच्या बैठकीत स्टालीनने कमीत कमी ५० हजार जर्मन अधिकारी ठार मारले पाहिजेत, अशी सूचना केली. तेव्हा चर्चिल लालबुंद झाले. ब्रिटिश पार्लमेन्ट व लोक हा नरमेध कधीही सहन करणार नाहीत, असे चर्चिल तावातावाने सांगू लागले. स्टालीनही आपला आग्रह सोडीना. वातावरण तापते आहे असे पाहून रुझवेल्ट विनोदाने म्हणाले, '५० हजार नाही

मारावयाचे ना, मग आपण ४९,००० मारू.' या विनोदावर तिघेही हसले व स्टालीनने हा प्रश्न सोडून दिला.

स्टालीन व भारत, फ्रान्स

तेहरानच्या बैठकीत रुझवेल्ट स्टालीनला म्हणाले, 'हिंदुस्थानात रशियाच्या धर्तीवर तळापासून सुधारणा व परिवर्तन व्हावयास हवे.' त्यावर स्टालीन म्हणाला, 'तळापासून सुधारणा म्हणजे क्रांतीच झाली. पण ती हिंदुस्थानात होणे कठीण आहे. कारण तेथे अनेक सांस्कृतिक थर आहेत, शिवाय जातीचा प्रश्न आहे.' स्टालीनने मग जातीसंबंधी रुझवेल्टना माहिती दिली व त्यामुळे रुझवेल्ट व हॅरिमान दोघेही आश्चर्यचकित झाले.

फ्रान्स व द गॉल यांच्यासंबंधी चर्चिल, स्टालीन व रुझवेल्ट यांची काही मते होती. फ्रान्सने हिटलरपुढे शरणागती पत्करली आणि आता जर्मनीला तो मदत करतो, तेव्हा युद्धोत्तर काळात फ्रान्सला कसलीही दयामाया दाखवू नये, असे स्टालीनने सुचवले. चर्चिल यांना ते मान्य नव्हते. 'विकसित फ्रान्सखेरीज सुसंस्कृत युरोपची कल्पना करता येत नाही' असे चर्चिल म्हणताच स्टालीन म्हणाला, 'युद्धोत्तर फ्रान्सला कसलीही महत्त्वाची भूमिका देता कामा नये. द गॉल हे एक प्रतीक आहेत, पण ते सर्व फ्रान्सचे प्रतिनिधी नाहीत. राजकीय व इतर बाबतीत द गॉल यांना महत्त्व देण्यात काहीही अर्थ नाही.'

स्टालीनचे असे मत, तर द गॉल यांच्या स्वतःबद्दल व फ्रान्सबद्दल वेगळ्याच कल्पना होत्या. त्यांचे मत असे, की युद्धोत्तर काळात अमेरिका दूर राहील. ब्रिटन दुर्बळ बनेल व मग फ्रान्सलाच महत्त्व येईल. रशियाशी सख्य करून युरोपीय राजकारणात फ्रान्सचे महत्त्व वाढवावे, अशी द गॉल यांची कल्पना होती.

द गॉल यांच्या अहंकारी वृत्तीवर हॅरिमान यांनी बराच प्रकाश पाडला आहे. स्टालीनने द गॉल यांना मोकळेपणाने बोलावयाला लावण्याचा प्रयत्न केला. बरेच मद्य पाजले, पण काहीही उपयोग झाला नाही. एकदा द गॉल यांनी बुल्गानिनकडे बोट दाखवून विचारले, 'यांनीच अनेक रशियन जनरल्स मारले काय?' त्यानंतर स्टालीनने मोलोटोव्हला हाक मारली व 'एक मशीनगन आण, म्हणजे आज काही मुत्सद्दीच मारून टाकू' असे तो म्हणाला. या प्रकारचा रांगडा विनोद चालू होता, पण द गॉल यांच्यामुळे वातावरण कमालीचे गंभीर राहिले.

रुझवेल्ट नंतर मरण पावले. चर्चिल यांच्याऐवजी ॲटली पंतप्रधान झाले. ट्रुमन अध्यक्ष झाल्यावर यांनी रुझवेल्ट यांचे रशियाबाबतचे धोरण बदलले. मोलोटोव्हला तर त्यांनी एकदा आपल्या फटकळपणाचा चांगलाच तडाखा दिला. हॅरिमान कालांतराने निवृत्त झाले. ⊙

४-७-७६

ॲव्हरल हॅरिमान

'गार्डियन' या दैनिकात प्रसिद्ध होणाऱ्या बिनराजकीय लेखांतील निवडक लेख दरवर्षी पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत असतात. 'बेडसाइड गार्डियन' हे या संग्रहाचे नाव. पडल्या पडल्या ललित, आल्हाददायक काही वाचावयास मिळावे, हा या संग्रहामागील हेतू. आता २४ वा संग्रह प्रसिद्ध झाला आहे. ललितनिबंध हे याचे मुख्य स्वरूप आहे. पण ह्या संग्रहातून व्यक्तिविषयक असेही लेख असतात. नुकताच एका जुन्या पुस्तकांच्या दुकानात 'बेडसाइड गार्डियन' चा तिसऱ्या वर्षाचा खंड हाती आला. त्यात अनेक ललितपूर्ण लेख आहेत आणि दोन आहेत ॲटलीसंबंधी.

ब्रिटिश मजूर पक्षाचे दिवंगत नेते आणि माजी पंतप्रधान ॲटली यांचे आत्मचरित्र त्यावेळी नुकतेच प्रसिद्ध झाले होते. त्याचे परीक्षण नव्हे, पण त्यावरून ॲटलींच्या व्यक्तित्वावर प्रकाश टाकणारा लेख, 'गार्डियन'च्या तिसऱ्या खंडात आहे. 'ॲज इट् हॅपन्ड' हे ॲटलींच्या आत्मचरित्राचे नाव. या नावातच ॲटली यांच्या स्वभावाचे दर्शन होते. वास्तविक भारताला स्वातंत्र्य देण्याचा महान निर्णय झाला तो ॲटलींच्या कारकीर्दीत. पण ते स्वतःचा बडेजाव मिरवीत नाहीत. या अशा घटना घडल्या व आपण त्यांचे साक्षीदार वा साधनभूत होतो अशी एकंदर ॲटलींची वृत्ती दिसते. ते स्वतः अहंकारविरहित, निगर्वी होते व चर्चिल यांनी काहीशा उपहासाने म्हटले होते, की अहंकारविरहित राहावे असेच त्यांच्यापाशी बरेच होते, म्हणजे नव्हते. तथापि याचा अर्थ ॲटली म्हणजे भुशाच्या पोत्यासारखे असतील अशी कल्पना करणे चूक आहे. खुद्द चर्चिल यांनाही याची चांगली जाणीव होती. ॲटली यांच्या शांत, सौम्य प्रकृतीने त्यांची फसगत झाली नव्हती, कारण प्रसंगी ॲटली हे किती कठोर होऊ शकतात हे चर्चिल यांना माहीत होते. म्हणून 'शेळीच्या वेशातील शेळी' (अ शीप इन शीपस क्लोदिंग) असे चर्चिल यांनी ॲटलींचे वर्णन केले होते. मंत्रिमंडळाच्या उपसमितीची बैठक असो वा सबंध मंत्रिमंडळाची बैठक असो, चर्चिल बराच वेळ स्वगत बोलल्यासारखे बोलत राहात; त्यामुळे बैठक लांबे आणि निर्णय होत नसत. युद्धकाळात प्रत्येक मंत्रालयाला व मंत्र्याला कामाचे डोंगर उपसावयाचे असता ही स्वगते अनावश्यक होती.

ॲटली

एक दिवस ॲटली यांनी चर्चिलना चिठ्ठी पाठवून स्वगतापायी मंत्रिमंडळाचा विनाकारण वेळ न घेतलेला बरा, असे कळवले, तेव्हा चर्चिल संतप्त झाले. त्यांचा संताप पाहण्यासाठी त्यांच्या पत्नी होत्या आणि संतापाचे कारण कळले, तेव्हा श्रीमती चर्चिल म्हणाल्या, 'विन्स्टन, ॲटली म्हणतात यात चूक काय आहे? मंत्रिमंडळाचा वेळ घेणे बरोबर नाही.' त्यानंतर चर्चिल यांचा पारा उतरला.

ॲटलींचे वजन

चर्चिल यांचे पाठांतर उत्तम. पण मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यांनी शेक्सपियर वगैरेचे वचन उद्धृत केले, तर तितक्याच परिणामकारक पद्धतीने दुसरे वचन त्यांच्या तोंडावर ॲटली फेकत असत. याचे रहस्य काय? याचे उत्तर 'गार्डियन' च्या या तिसऱ्या खंडात मिळते. 'ॲटली पुस्तके चाळतात' हा यातील लेख उल्लेख करण्यासारखा आहे.

चर्चिल व ॲटली यांनी एकमेकांना बांधणारे बंध कोणते, याचा खुलासा एका भाषणात केला होता. लष्करी इतिहास हा या दोघांचा आवडता विषय आणि त्यामुळे आपण जवळ आलो, असे त्यांचे म्हणणे. तथापि त्यांच्यात आणखी एक समान दुवा होता. तो म्हणजे आजारात ॲन्थनी ट्रोलॉप यांच्या कादंबऱ्या वाचणे. ॲटलींनीच लिहिलेल्या लेखावरून हे स्पष्ट झाले होते. त्यांचा ग्रंथसंग्रह चांगला होता आणि त्यातील बरीच पुस्तके त्यांनी वाचलेली होती. पंतप्रधान होईपर्यंत त्यांनी गिबनचे ग्रंथ

लॉर्ड क्लेमंट ॲटली

वाचले नव्हते, पण पंतप्रधान झाल्यावर 'चेकर्स' ला गिबनची उत्कृष्ट आवृत्ती मिळाली आणि ती त्यांनी वाचून काढली. ॲटलींना ग्रीक व लॅटिन येत होते आणि फ्रेंच व इटालियनही समजत होते. युरोपातील प्रबोधनाचा (रनेसांस) काळ हा त्यांच्या वाचनाचा खास विषय होता. त्यांनी डान्टेही वाचला होता. डान्टे वाचणारे तेच शेवटचे ब्रिटिश पंतप्रधान होते काय ? याचे उत्तर मिळालेले नाही. मॅकमिलन कदाचित डान्टे वाचीत असतील व त्यामुळे ॲटली हे त्या मालिकेतील शेवटचे पंतप्रधान ठरणार नाहीत. इंग्लिश लेखकांत जेन ऑस्टिन, स्विनबर्न, रस्कीन, मेरिडिथ हे त्यांचे आवडते लेखक. परंतु काव्याने ते भारावून गेलेले होते. ॲटली हे इतके काव्यप्रेमी असतील, हे त्यांच्या छायाचित्रात दिसणाऱ्या चेहऱ्यावरून वाटत नाही किंवा त्यांच्या लिखाणावरूनही वाटत नाही. पण ते तसे होते. त्यांनी लिहिले आहे की दूरवरचा प्रवास असला किंवा युद्धकाळात प्रदीर्घ रात्री खंदकात घालवाव्या लागल्या, की अनेक कवींच्या शेकडो ओळी पाठ म्हणून ते स्वतःची करमणूक करीत ! पण ॲटलींना तत्कालीन नव्या कवींच्या कविता पाठ होत नसत. आपण एकोणीसवीस वर्षांचे असताना जे वाचतो तेच उत्तमपैकी मनावर ठसते व लक्षात राहते, असा ॲटलींचा अंदाज होता. कदाचित आधुनिकांकडून अभिजात वाङ्मय निर्माण होत नाही, असे त्यांना वाटत असावे.

अभिजात वाङ्मय

अभिजात वाङ्मय आणि समकालीनांचे वाङ्मय यांची मार्मिक तुलना व्हर्जिनिया वूल्फ यांनी केली आहे. ती या संदर्भात आठवते. व्हर्जिनिया वूल्फ या चांगल्या कादंबरीकार होत्या, त्याचप्रमाणे त्या मर्मज्ञ समीक्षक होत्या. त्यांच्या समीक्षालेखांचे संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्या एका लेखात म्हणतात, आधुनिक जीवनात व वाङ्मयात अशा अनेक गोष्टी आहेत, की त्यांचा आपल्या मनावर प्रभाव असतो. एखाद्या नातेवाईकाला आपण टाकून बोलावे, पण त्याच्याशिवाय आपले चालू नये, असे हे वाङ्मय आहे. तसे पाहिले तर आजच्या काळात जेवढे उत्तम लेखक आहेत, तेवढे कदाचित दुसऱ्या कोणत्या काळात नसतील. काव्य, कादंबरी, नाटक

इत्यादींमधून लेखकांच्या धैर्य, कल्पकता इत्यादी गुणांचा प्रत्यय येतो, त्यांचा निश्चितच प्रभाव पडतो. पण कोणतेही पुस्तक घ्या, ते वाचण्यास घेताना आपल्या ज्या अपेक्षा असतात, त्यांचा भंग पुस्तकाच्या अखेरीस होतो. काही काल असा असतो, की तो एखाद्या विद्युल्लतेप्रमाणे तळपून जातो, पण क्षणार्धात ही वीज नष्ट होते आणि आपण मात्र असमाधानी होतो. त्यांच्या बाबतीत आनंद जेवढा मोठा तेवढीच निराशा तीव्र! उलट जेन ऑस्टिन, स्कॉट, वर्ड्स्वर्थ वाचावयास घेतले तर त्यांच्या वाङ्मयात संथपणा आहे, पण आपल्या मनावर कायमचा परिणाम होतो तो याच अभिजात लेखकांचा. स्कॉट आपल्या डोळ्यासमोर अनेक स्वप्ने उभी करतो, स्वप्नमय राजवाडे उभे करतो, जेन ऑस्टिन तर आनंद देण्यासाठीच लिहीत होती. स्कॉट काय, जेन काय किंवा वर्ड्स्वर्थ काय, यांना जीवन हे काही विशिष्ट दर्जाचे, गुणांचे आहे असे वाटत होते. एक वेगळेच जग ते तयार करतात. आधुनिक लेखक स्वतःलाच संत्रस्त करणाऱ्या घटना रंगवतील आणि आपल्या मनालाही त्या वाचून क्लेश होतील. कारण त्यांना श्रद्धा नाही, त्यांचा विश्वास कशावर नाही. ते स्वतः नवे जग आपल्यापुढे उभे करू शकत नाहीत, कारण इतर व्यक्तींपासून ते स्वतःची मुक्तता करून घेण्यास असमर्थ असतात. ते आपल्याला गोष्टी सांगू शकत नाहीत, कारण गोष्टींवर त्यांचाच विश्वास नसतो. इंग्रजी भाषेचे एवढे संपन्न भांडार असतानाही यांची भाषा म्हणजे तांब्याच्या चिल्लर नाण्यांसारखी असते. यामुळे यांचे वाङ्मय म्हणजे वर्तमानकाळाची टिपणवही बनते. काळ हा एक शिक्षक आहे. तो या टिपणवह्या पाहील, त्यातील काही मजकूर खोडून काढील व इतर विद्यार्थ्यांना उपयोगी पडतील म्हणून या वह्या तो फेकून देणार नाही. कारण यातूनच एखाद्या अभिजात कलाकृतीला स्फूर्ती मिळेल. ६-६-७६ ◉

डाउनिंग स्ट्रीट विरुद्ध फ्लीट स्ट्रीट

राजकारणी व पत्रकार यांचे एकमेकांशी जमत नाही व त्यांना एकमेकांशिवाय गमतही नाही. सरकारी कारभाराभोवती तटबंदी तयार करण्याची कोशीस राजकारणी नेते करीत असतात, तर ही तटबंदी फोडून तीमागे काय चालले आहे, हे दाखवण्याची खटपट पत्रकारांना करावयाची असते. यात दोघांकडूनही काही वेळा अतिरेक होत असतो. पण अतिरेकाची उदाहरणे घडली तरी वृत्तपत्रांविरुद्ध कायम उपाययोजना लोकशाहीत होत नाही आणि या संघर्षातून वृत्तपत्रीय स्वातंत्र्य शाबीत होते व शाबूत राखले जाते. अशा कांही घटनांवर प्रकाश टाकणारे पुस्तक जेम्स मार्गाक यांनी लिहिले आहे. त्याचे नाव आहे 'द अब्यूज ऑफ पॉवर' (प्र. डब्ल्यू. एच. ॲलन, लंडन. कि. ५॥ पौंड). जेम्स मार्गाक हे चाळीस वर्षे राजकीय प्रतिनिधी म्हणून बावरत असून यातील बहुतेक वर्षे 'संडे टाइम्स' या वजनदार पत्रात गेली आहेत. पंतप्रधानांपासून अनेक लहानमोठ्या राजकारणी व्यक्तींशी त्यांचा जवळचा संबंध आला. ब्रिटनमध्ये लॉबी कॉरस्पॉन्डन्ट असा एक वर्ग आहे. पार्लमेंटच्या लॉबीत या पत्रप्रतिनिधींना प्रवेश असतो, याचा अर्थ पंतप्रधानांपासून अनेकविध मंत्री व सभासद यांच्याशी त्यांना मोकळेपणाने बोलता येते. या प्रतिनिधींसाठी

खास मुलाखती दिल्या जातात, त्यांना सरकारी धोरणांची पार्श्वभूमी समजावून सांगितली जाते. मार्गाक हे असे एक प्रतिष्ठित प्रतिनिधी असून त्यांनी 'द अॅब्यूज ऑफ पॉवर' या पुस्तकात लॉईड जॉर्ज ते कॅलाहन यांच्यापर्यंतच्या पंतप्रधानांचा वृत्तपत्रांशी असलेल्या संबंधाचा आढावा घेतला आहे. मंत्री वा त्याचे अधिकारी देतील ती माहिती प्रसिद्ध करावी, सरकारी पत्रके संपादित करून ती प्रसिद्ध करावी, एवढ्यापुरतेच आपले क्षेत्र मर्यादित आहे असे ज्या वार्ताहरांचे मत असते त्यांनी मंत्र्याच्या रोषाला बळी पडण्याचे कारण संभवत नाही. जे त्यापलीकडे जातात त्यांनाच अनेक कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागते.

मार्गाक यांनी लॉइड जॉर्ज यांच्या काळापासून सध्यापर्यंतच्या पंतप्रधानांचे वृत्तपत्रांशी असलेले संबंध अनेक प्रसंगांतून वर्णन केले असले आणि निरनिराळ्या पंतप्रधानांनी आपल्या अधिकाराचा कसा गैरवापर केला हेही स्पष्ट केले असले, तरी काही पत्रकारांनीही आपल्या सवलतींचा दुरुपयोग केला हे मान्य केले आहे.

लॉइड जॉर्ज

प्रत्येक पंतप्रधानाची तऱ्हा वेगवेगळी होती. लॉइड जॉर्ज यांनी वृत्तपत्रांच्या मालकांना पदवीदान करून वश करून ठेवले होते. त्यांचे स्वतःचे काही आवडते पत्रकार होते. बीव्हरब्रूक, नॉर्थक्लिफ वगैरे वृत्तपत्रसम्राट हे लॉइड जॉर्ज याचे दोस्त आणि त्या काळात या सम्राटांचा हस्तक्षेप वृत्तपत्रांत फार होत असे. तरीही अनेक पत्रकार हे स्वतंत्रपणे बातम्या देत आणि सरकारी गुपिते बाहेर काढीत. लेफ्टनंट कर्नल रेपिंग्टन हे डेली टेलिग्राफचे लष्करी वार्ताहर होते. त्यांनी दोस्तांच्या काही लष्करी डावपेचांबाबत लेख लिहिले व त्यांत लॉइड जॉर्ज यांच्यावर टीका होती. फिल्ड मार्शल हेग व रॉबर्टसन या सेनाधिकाऱ्यांचे लॉइड जॉर्ज यांच्याशी पटत नव्हते आणि त्यांनी ही माहिती रेपिंग्टन यांना दिली असावी अशी लॉईड जॉर्ज यांची समजूत. पुढे रेपिंग्टन व त्यांचे संपादक यांच्यावर सरकारी गुप्ततेचा भंग केल्याबद्दल खटला होऊन त्यांना दंड झाला. त्या काळात वृत्तपत्रे वैयक्तिक स्वरूपाच्या बातम्या देत नसत. एरवी लॉइड जॉर्ज यांच्यासारखा वैषयिक आणि स्त्रीसहवासलोलुप वृत्तपत्रांच्या कचाट्यातून सुटला नसता. याबद्दल सर्व वृत्तपत्रांनी मौन पाळले होते!

बॉल्डविन वृत्तपत्रांशी फारशी दोस्ती ठेवीत नसत. तथापि त्यांना ते टाळतही नसत. परंतु नॉर्थक्लिफ वगैरेंना वृत्तपत्रीय सामर्थ्याच्या जोरावर मंत्रिमंडळ बनविण्यात आपला हात असावा असे वाटू लागले व त्यांनी तशी मागणीही केली. बॉल्डविन यांनी याबद्दल जाहीर वाभाडे काढले. या पत्रसम्राटांना सत्ता हवी, पण जबाबदारी नको. जबाबदारीशिवाय सत्ता हा अधिकार शतकानुशतके वेश्याच फक्त उपभोगीत आल्या आहेत. बॉल्डविन यांचा हा आघात मर्मभेदक ठरला आणि नॉर्थक्लिफच नव्हे तर इतर पत्रसम्राटही गप्प बसले.

मॅक्डोनाल्ड यांच्या कारकीर्दीत बरीच सरकारी गुह्ये बाहेर आली, त्यामुळे त्यांनाही वृत्तपत्रांचा राग असे. चेंबर्लेन यांची स्थिती वेगळी. ते शांततावादी. लंडन टाइम्सचे तेव्हाचे संपादक डॉसन हेही त्यांच्याच मताचे. त्यामुळे डॉसन आपल्या प्रतिनिधींच्या बातम्या दुरुस्त करीत. हिटलर व मुसोलिनी यांना राग येऊ नये यासाठी चेंबर्लेन व डॉसन यांची कशी धडपड चाललेली असे यावर मार्गाक यांनी प्रकाश टाकला आहेच, पण युद्धाचे ढग जमत असता चेंबर्लेन यांच्या शरणागतीच्या धोरणावर नाराज असलेल्या हुजूर पक्षाच्या पुढाऱ्यांवरही गुप्त पोलिसांची पाळत चेंबर्लेन ठेवीत, अशी माहिती त्यांनी दिली आहे. ज्या ठिकाणी ईडन वगैरे जमत तेथील टेलिफोन ऐकण्याची व्यवस्था त्यांनी केली होती. हे इंग्लंडमधील वॉटरगेट होते. चेंबर्लेन यांच्या धोरणाशी अनेक पत्रे व पत्रकार यांचे जमले नाही व त्यामुळे त्यांचे खटके उडत. पुढे चेंबर्लेन पूर्णतः अपमानित व पराभूत झाले!

चर्चिल

चर्चिल यांनी आयुष्याच्या सुरुवातीस वृत्तपत्रीय लिखाण करून पैसा मिळवला व नंतरही दुसऱ्या महायुद्धानंतर त्यांच्या ग्रंथांतील उतारे अनेक वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होऊन त्यांना गडगंज पैसा करता आला. पण पार्लमेन्टमधील ज्येष्ठ पत्रकारांनाही ते विश्वासात घेऊन काही सांगत नसत.

प्रत्येक धोरण हे सरकारी गुपित अशी त्यांची समजूत होती. युद्धकाळात तर ते फार हळुवार बनले होते व आपल्यावरील टीका हा देशद्रोह आहे, युद्धविरोध आहे, असे ते मानीत. पार्लमेंटमधील विरोधी भाषणांवर प्रसिद्धि-पूर्व नियंत्रणाचा वरवंटा फिरवण्यासही ते निघाले होते, पण त्यांना ते जमले नाही. लॉईड जॉर्ज यांच्याप्रमाणेच चर्चिल यांचेही वृत्तपत्र मालकांशी निकटचे संबंध होते, पण अखेरच्या काळात त्यांना कळून चुकले, की अशा संबंधांचा काही उपयोग होत नाही.

ईडन यांना फार थोडा अवधी मिळाला आणि सुवेझमुळे त्यांच्या राजकीय जीवनाचा अंत झाला. मॅकमिलन यांचे व वृत्तपत्रांचे संबंध चांगले होते. त्यांच्या कारकीर्दीत प्रोफ्युमो प्रकरण गाजले. पण त्याचा फायदा घेऊन अनेक खऱ्या खोट्या रहस्यांची चर्चा होऊ लागली. व्हसल ह्या गुप्तहेर असल्याचे एक प्रकरण बाहेर आले. पण मॅकमिलन यांनी चौकशी करावयास लावून ते खोटे ठरवले व त्यामुळे वृत्तपत्रांची अब्रू गेली. मॅकमिलन यांनी एकच टोला दिला, पण तो भीमटोला ठरला. यातूनच पुढे प्रेस कमिशनची स्थापना झाली.

अलेक ह्यूम यांचीही पंतप्रधानपदाची मुदत बेताची. त्यांच्याबद्दल गैरसमज फार. मॅकमिलन यांनी त्यांना परराष्ट्रमंत्री नेमले होते तेव्हाच टीका झाली. पण ते एक कर्तबगार परराष्ट्रमंत्री होते. पाठीच्या आजाराने पूर्वी ते आजारी असता अंथरुणाला खिळून होते. दोन वर्षे अशी गेली. त्यात त्यांनी मार्क्स, एंजल्स बगैरेंचे ग्रंथ पालथे घेतले, म्हणूनच पुढे परराष्ट्रमंत्री म्हणून रशियनांशी वागताना ते भराभर मार्क्सवादी वाङ्मयातील व रशियन इतिहासातील दाखले देत.

ॲटली

ॲटलींनी वृत्तपत्रांना फारसे महत्त्व दिले नाही. ते वृत्तपत्रे वाचीतही नसत. टाइम्समधील शब्दकोडे मात्र ते वर्षानुवर्ष सोडवीत. मार्गाक यांनी त्यांच्या एका पत्रकार परिषदेचा वृत्तांत दिला आहे. तासदीडतासासाठी ठरलेली मुलाखत अर्ध्या तासात संपुष्टात येण्याची पाळी आली. कारण एक-दोन वाक्यांखेरीज ॲटली उत्तरेच देत नव्हते. शिवाय ती उत्तरेही मोघम. अखेरीस एकाने त्यांना त्या दिवशीच्या शब्दकोड्यातील उत्तर विचारले, तेव्हा ॲटली यांची कळी खुलली व पंधरा मिनिटे ते त्यावर बोलत होते. ॲटली यांची त्यांच्या पक्षावर, कामगार संघटनांवर पकड होती आणि त्यांचा आत्मविश्वास दांडगा होता. मॅकमिलन यांना मजूर पक्षात आणण्याचे प्रयत्न करण्यात आपण होतो आणि ते मजूर पक्षात आले असते तर युद्धानंतर तेच पहिले मजूरपक्षीय पंतप्रधान झाले असते, यशस्वी पंतप्रधान झाले असते, इतपत कबूल करण्याचा प्रांजळपणाही त्यांच्यापाशी होता. ॲटली यांचे योग्य मूल्यमापन पूर्वी झाले नाही. आता ते होत असून त्यांच्या व्यक्तित्वाची उंची वाढवणारी ही माहिती मार्गाक यांनी दिली आहे.

संशयी विल्सन

ॲटली वृत्तपत्रांची फारशी काळजी करीत नसत, तर विल्सन यांचा खाक्या वेगळा. वृत्तपत्रांचे बारकाईने वाचन त्यांच्याइतके क्वचितच कोणी करीत असेल. बातम्या कशा नियंत्रित कराव्या यात ते तरबेज होते. त्यांना थोडीही टीका सहन होत नव्हती आणि आपल्याविरुद्ध आपले सहकारी कट करीत असल्याची त्यांची भावना वाढत गेली त्या प्रमाणात ते अधिकाधिक असहिष्णू बनत गेले. त्यामुळे टीका करणाऱ्या वार्ताहरांना, स्तंभलेखकांना नोकरीतून काढून टाकण्याची सूचना ते मालकांना करीत. डेव्हिड वूड हे टाइम्सचे राजकीय स्तंभलेखक व नोरा बेलॉफ या ऑब्झर्व्हरच्या. त्या दोघांनाही काढण्याचा त्यांनी दोन्ही पत्रांच्या संपादकांना व मालकांना आग्रह केला होता. दोघांनीही तो ऐकला नाही. नोरा बेलॉफ यांच्यामागे तर त्यांनी गुप्त पोलीस ठेवून त्या कोठे जातात, कोणाला भेटतात याची माहितीच जमा केली होती. संशय व असहिष्णुता यामुळे विल्सन हे इतक्या क्षुद्र कोटीला पोहोचले होते व आपल्याकडील काही मंत्र्यांच्या पातळीवर आले होते. विल्सन यांच्या सूचनेनंतर टाइम्सने डेव्हिड वूड यांना राजकीय स्तंभलेखकाचे राजकीय संपादक बनवून विल्सन यांना चोख उत्तर दिले. एडवर्ड हीथ हेही फार क्षुद्रपणाने वागत. कॅलहान यांना वृत्तपत्रांशी कसे वागावे याची चांगली माहिती आहे. विल्सन वा हीथ यांच्या-

प्रमाणे ते क्षुद्र बनत नाहीत किंवा ॲटली यांच्याप्रमाणे ते वृत्तपत्रांकडे दुर्लक्षही करीत नाहीत.

अशी ही ब्रिटिश पंतप्रधान व ब्रिटिश पत्रे यांच्यातील झगड्याची कहाणी आहे. १० डाउनिंग स्ट्रीट हे पंतप्रधानांचे निवासस्थान, तर फ्लीट स्ट्रीट-वर ब्रिटिश पत्रांच्या कचेऱ्या. या दोन रस्त्यांचे प्रेम व संघर्ष यांची ही कहाणी वृत्तपत्रीय स्वातंत्र्याच्या दृष्टीने उद्‌बोधक ठरेल. १८-६-७८ ⊙

ॲटलींचे प्रशासन-कौशल्य

'आर्ट ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन' या ॲटली यांचे एका काळचे चिटणीस सर डेव्हिड हंट यांनी लिहिलेल्या छोट्या लेखात ॲटली हे कसे उत्तम प्रशासक होते यावर उद्‌बोधक प्रकाश टाकला आहे. विल्सन यांनी तर त्यांना पंतप्रधानांतील राजे असेच म्हटले आहे. त्यांच्याच कारकीर्दीत भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा पार्लमेन्टमध्ये आला आणि बीव्हरीज योजना लागू होऊन ब्रिटनमध्ये सामाजिक सुरक्षितता, सामाजिक कल्याण यांचे पर्व सुरू झाले. यामुळे तेथील समाजाचा पायाच बदलला. ही दोन्ही क्रांतिकारक पावले फाजील गाजावाजा न करता टाकली गेली, हे ॲटलींच्या स्वभावाचे निदर्शक होते.

ॲटली यांचा मितभाषी स्वभाव, आकर्षक व्यक्तित्वाचा अभाव वगैरेंमुळे त्यांच्यासंबंधी अनेकांचे चुकीचे ग्रह झाले होते. हर्बर्ट मॉरिसन हेच मजूर पक्षाचे नेते होणार असे तेव्हा मानले जाई. पण ॲटली यांची पक्षावर अधिक पकड होती, याची बऱ्याच जणांना कल्पना नव्हती. ते प्रभावी नेते होणेच शक्य नाही अशी माल्कम मगरिज यांची कल्पना होती. ऑर्वेल यांना ॲटली हे मेलेल्या माशासारखे वाटत होते. चर्चिल यांनी त्यांची कुचेष्टा करण्यासाठी म्हटले होते की, 'एकदा एक रिकामी टॅक्सी १० डाउनिंग रस्त्यापाशी आली आणि तीमधून ॲटली उतरले!' पण या सर्वांची टीका व्यर्थ असल्याचे ॲटली यांनी दाखवून दिले. वास्तविक युद्धकालीन राष्ट्रीय मंत्रिमंडळात ॲटली उपपंतप्रधान होते आणि त्यावेळच्या त्यांच्या कार्यक्षमतेची, खंबीर स्वभावाची चर्चिल यांना कल्पना होती. त्यामुळे ॲटली यांची कुचेष्टा करण्याचे त्यांना कारण नव्हते. ॲटलींची मते स्पष्ट व ठाम असत आणि ते कोणाच्याही प्रभावाखाली दबून जात नसत. लॉर्ड बीव्हरब्रूक हे चर्चिल यांचे मित्र आणि वृत्तपत्र-सम्राट. पण युद्धकालीन मंत्रिमंडळात ॲटली त्यांच्या अनेक योजनांना व कल्पनांना विरोध करीत. बीव्हरब्रूक व क्रिप्स हे रशियाच्या प्रभावाखाली होते आणि युद्धसाहित्य-पुरवठा असो किंवा दुसरी आघाडी उघडणे असो, दोघेही भावनात्मक निर्णय घेत. ॲटली यांनी त्यांना विरोध केला. बीव्हरब्रूक आणि ॲटली यांच्या वादात ॲटली यांचीच बाजू घेणे राष्ट्रीय मंत्रिमंडळ टिकवण्याच्या दृष्टीने श्रेयस्कर असल्याची चर्चिल यांना जाणीव असल्यामुळे त्यांनी बीव्हरब्रूक यांचा राजीनामा पत्करला.

४५ साली ॲटली यांनी कनिष्ठ मजूर मंत्र्यांपुढे भाषण करताना सांगितले की, आपण कमी बोलतो पण ज्यांना आपले प्रश्न मांडावयाचे असतील त्यांनी ते आपल्यापुढे मोकळेपणाने मांडावे. काही लोक फार बोलतात; पण त्याने फसू नका. उदाहरणार्थ बीव्हरब्रूक. त्यांच्या स्तुतीने

भाळून जाऊ नका.' ॲटलींना मुद्दा सोडून उगाच कोणी लांबण लावलेली आवडत नसे. म्हणून युद्धकालीन मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चिल यांच्या भाषणबाजीने कंटाळून त्यांनी एक दिवस त्यांना स्वदस्तुरचे पत्र लिहिले आणि यामुळे आपल्या सहकाऱ्यांचा तुम्ही निष्कारण वेळ वाया दवडता असे सांगितले. चर्चिल यामुळे संतप्त झाले खरे, पण श्रीमती चर्चिल यांनी ॲटली म्हणतात तेच बरोबर असे मत दिले होते. चर्चिल यांच्या या स्वगतपर भाषणाचा उपयोग ॲटली यांनी युद्धोत्तर पार्लमेन्टमध्येही चपखलपणे करून घेतला. एकदा एका विशिष्ट प्रश्नाची राष्ट्रीय मंत्रिमंडळात भरपूर चर्चा झाली असता तीच पुन्हा का उपस्थित करण्यात येत आहे असा प्रश्न चर्चिल यांनी केला; तेव्हा ॲटली उठून म्हणाले, 'मंत्रिमंडळातील स्वगत म्हणजे चर्चा व निर्णय नव्हे.' चर्चिल यावर गप्प बसले. दुसऱ्या एका प्रसंगी त्यांच्या पक्षाचा एक मंत्री त्याच्या खात्यापुढील प्रश्नाची अगदी भावनात्मक भाषेत माहिती देत होता. ॲटली यांनी ते सर्व न बोलता ऐकून घेतले आणि त्याचे वक्तव्य संपल्यावर विचारले, 'तुझी आई कशी काय आहे?'

योग्य पारख

माणसाची पारख, स्पष्ट निर्णय व कठोर निर्णय घेण्यास मागेपुढे न पाहणे आणि कोणाच्याही दडपणाला न जुमानणे हे नेत्याचे प्रमुख गुण ॲटली यांच्यापाशी होते. फील्ड मार्शल मॉंटगोमरी हे एक प्रश्न होते. त्यांच्या निवृत्तीनंतर स्लीम यांना नेमण्याचे ॲटली यांनी टरवले होते. पण स्लीम यांना नेमण्यास आपल्या प्रतिमेला धक्का लागेल अशी मॉंटगोमरी यांना भीती. म्हणून त्यांनी क्रॉकर यांची शिफारस केली. ॲटली यांनी ती मानली नाही. त्यावर क्रॉकर यांना त्यांची शिफारस केल्याचे आपण सांगितले आहे, असे मॉंटगोमरी म्हणाले. ॲटली म्हणाले 'मग त्यांना नाही म्हणून सांगा.' हॅरॉल्ड लास्की हे विद्वान व मजूर पक्षाचे अध्यक्ष. त्यांची वक्तव्ये मजूर सरकारला अडचणीची होऊ लागली तेव्हा ॲटलींनी त्यांना पत्र लिहिले आणि 'तुमचे मौन स्वागतार्ह टरेल' असे कळवले. लास्की यांना गप्प बसणे भाग पडले. 'अनेक विद्वान लोकांपाशी बरेच गुण असतात पण शहाणपण नसते' हे त्याचे उद्गार लास्कींच्याच संदर्भात काढले गेले होते. पक्षाची कुरघोडी सरकारवर करण्याचा लास्कींचा प्रयत्न ॲटलींनी हाणून पाडला. तथापि योग्य वेळी व योग्य कारणास्तव तडजोड घडवून आणण्याचे कसबही त्यांच्यापाशी होते. मॉंटगोमरी व बेव्हिन यांच्यात संघर्ष निर्माण झाला असता ॲटलींनी तडजोड घडवून आणली. त्यांच्या सूचना अगदी स्पष्ट असत आणि एकदा निर्णय घेतला की ते त्याबद्दल काळजी करीत नसत. सकाळी साडेनऊला त्यांचे काम सुरू होई व मध्यरात्रीपर्यंत चाले. ज्या दिवसाचे काम त्याच दिवशी ते पुरे करीत. बऱ्याच वेळा समोरच्या कागदपत्रांवर 'हो', 'नाही' एवढेच शेरे ते मारीत. ॲटली यांचे जबाब मर्मभेदक असत. हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याबाबतच्या विधेयकावर चर्चिल यांनी बरेच भावनात्मक भाषण करून विरोध केला तेव्हा ॲटली यांनी या भाषणाचे थोडक्यात, पण उत्तमपैकी वाभाडे काढले. युद्धानंतरच्या निवडणूक प्रचारात भाषण करताना समाजवाद म्हणजे गुप्त पोलिस संघटना (गेस्टॅपो) असे समीकरण चर्चिल यांनी मांडले असता ॲटलींनी उत्तर दिले, 'हे भाषण करताना आवाज चर्चिल यांचा होता. पण त्यामागील मन बीव्हरब्रूक यांचे होते.' चर्चिल यांना हा टोला मर्मी बसला. नंतर बीव्हरब्रूक यांच्या वृत्तपत्रातून ॲटली यांचे भाषण मिळमिळीत झाल्याची टीका झाली, पण चर्चिल यांना ते पटले नव्हते. अत्यंत महत्त्वाच्या निर्णयाच्या वेळी ॲटली यांच्या मनाचा तोल गेलेला नसे व ते अगदी थंड असत. अणुबॉंबच्या निर्णयाची माहिती कळल्यानंतर ते विल्सन यांच्याशी आपल्याला कोणता इतिहासज्ज्ञ आवडतो यावर बोलत होते.

काही काही व्यक्तींबाबतची त्यांची मतेही प्रसिद्ध आहेत. नेहरूंबद्दल त्यांनी म्हटले होते की त्यांना सत्ता म्हणजे काय हे समजते व काव्य म्हणजे काय हेही कळते, पण एक केव्हा सुरू होते व दुसरे केव्हा संपते याचे भान राहात नाही. मॉरिसन यांना लहान गोष्टी कोणत्या व मोठ्या कोणत्या हे कळत नाही. चुकीच्या धोरणाच्या समर्थनार्थ सायमन केव्हाही युक्तिवाद शोधून काढू शकतात.

ॲटली हे अगदी साधे राहात व साध्या, सामान्य माणसाचे ते असा-

ान्य प्रतिनिधी होते. वैयक्तिक हितापेक्षा सार्वजनिक हिताचा विचार करून त्यांनी बेव्हिन यांना ते फार आजारी झाले असता परराष्ट्रखात्यातून राजूला करून विनखात्याचे मंत्री केले. बेव्हिन यांना परराष्ट्रमंत्री म्हणून पराचयाचे होते.

स्वतःही त्यांनी सेवानिवृत्तीचा निर्णय योग्य वेळी घेतला. तो घेताना ते म्हणाले, 'या शतकातले प्रश्न सोडवण्यासाठी या शतकात जन्मलेला मजूर पक्षाचा पुढारी हवा. आपल्याकडे बऱ्याच पुढाऱ्यांना हे समजेल तो सुदिन.'

२-७-७८ ⊙

हॅरॉल्ड विल्सन

हॅरॉल्ड विल्सन चौथ्यांदा ब्रिटनचे पंतप्रधान झाले आहेत. मजूर पक्षाचे यापूर्वी मॅक्डोनाल्ड व ॲटली हे पंतप्रधान झाले. पण विल्सन हे जितकी वर्षे पंतप्रधानपद भोगीत आहेत तेवढे ते या दोघांना मिळाले नाही. विल्सन प्रथम पंतप्रधान झाले ते दहा वर्षांपूर्वी. आपल्या ६४ ते ७० या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीसंबंधी त्यांनी 'द लेबर गव्हर्नमेंट' म्हणून पुस्तक लिहिले आहे (हे आता पेंग्विनमध्ये मिळते). ६४ सालची निवडणूक ऑक्टोबरमध्ये झाली होती. प्रस्तुत लेखकास विल्सन यांचे निवडणुकीतील भाषण ऐकण्याचा तेव्हा योग आला होता. विल्सन फर्डे वक्ते आहेत, पण त्यांचे पुस्तक मात्र रुक्ष आहे. ताज्या निवडणुकीतील त्यांच्या प्रचारसभेचे समालोचन देताना ब्रिटिश पत्रांनी विल्सन यांच्या वक्तृत्वाचा गौरवपूर्वक उल्लेख केला होता. एका निवडणूकसभेत स्थानिक वक्ते पाऊण तास बोलत होते. रात्रीचे अकरा वाजले होते. पण नंतर विल्सन यांनी पन्नास मिनिटे भाषण केले तेव्हा लोक वारंवार टाळ्या वाजवून त्यांना प्रतिसाद देत होते. श्रोते विल्सन यांच्या आक्रमक भाषण-पद्धतीवर खूष होते, असे एका ब्रिटिश पत्राच्या समीक्षकाने म्हटले आहे.

विल्सन यांनी ६४ साली पहिल्यांदा मंत्रिमंडळ बनवले, तेव्हा ब्रिटिश पत्रांनी विल्सन लहान असताना त्यांच्या वडलांनी दहा डाउनिंग स्ट्रीट या पंतप्रधानांच्या निवासस्थानाच्या दरवाजापाशी विल्सन यांना उभे करून काढलेले चित्र प्रसिद्ध केले होते. या दहा डाउनिंग स्ट्रीटवरील निवासस्थानात वास्तव्य करण्यासाठी येणाऱ्या पंतप्रधानाला अधिकारपद स्वीकारण्यापूर्वी राजा वा राणी यांची भेट घ्यावी लागते. बकिंगहॅम राजवाड्यावरून आमंत्रण येताच विल्सन राणी एलिझाबेथ यांना भेटावयास गेले. रीतसर मंत्रिमंडळ बनवण्यास त्यांना सांगण्यात आले. ब्रिटिश रिवाज असा आहे की, राजा असेल तर राजाच्या वा राणी असेल तर राणीच्या हाताचे चुंबन घेऊन पंतप्रधानपद वा कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्याने अधिकार स्वीकारावयाचे. पण विल्सन आपल्या पुस्तकात सांगतात की, राणी एलिझाबेथ या हात पुढे करण्यास विसरल्या आणि त्यांच्या हाताचे चुंबन न घेताच विल्सन पंतप्रधान झाले. त्यांच्या मंत्र्यांना राणी एलिझाबेथ यांच्यापुढे दुसऱ्या दिवशी पाचारण करण्यात आले, तेव्हा त्या मंत्र्यांनी राणीच्या हाताचे चुंबन घेतले; पण विल्सन यांच्या बाबतीत गफलत झाली होती. अर्थात चुंबन घेतले गेले असे राणीसाहेबांच्या कार्यालयातून त्यांना सांगण्यात आले! अशा

हॅरॉल्ड विल्सन

गफलती होतच असतात. आपल्याकडे ४७ साली स्वातंत्र्य मिळून पहिले मंत्रिमंडळ स्थापन झाले तेव्हाही एक गफलत झाली होती. पंतप्रधान म्हणून पं. नेहरूंना लॉर्ड माउंटबॅटन यांनी पाचारण केले, तेव्हा नेहरूंनी आपल्या मंत्रिमंडळाची यादी असलेले पाकीट माउंटबॅटन यांच्या हाती दिले व ते निघून गेले. माउंटबॅटन यांनी पाकीट उघडले तेव्हा ते कोरेच होते. त्यात यादीच नव्हती. मंत्रिमंडळाची पहिली बैठक झाली तेव्हा कॅबिनेट बैठकीत धूम्रपान करायचे की नाही हा पहिला मुद्दा पुढे आला. ॲटली पंतप्रधान असता टंचाई, आर्थिक दुःस्थिती लक्षात घेऊन त्यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत धूम्रपान न करण्याचा आदेश दिला. पुढे चर्चिल पंतप्रधान झाले व हा नियम दूर सारला गेला. विल्सन यांनी चर्चिल यांचा मार्ग अनुसरला.

जॉन्सन व विल्सन

पंतप्रधानपद मिळाले की अमेरिकेच्या अध्यक्षाची गाट शक्य तितक्या ताबडतोब घेणे, हाही ब्रिटिश पंतप्रधानांचा रिवाज आहे. त्याप्रमाणे ६४ साली पंतप्रधान झाल्याबरोबर अमेरिकेचे तेव्हाचे अध्यक्ष जॉन्सन यांची भेट घेण्यासाठी विल्सन गेले. जॉन्सन यांचा उघडावाघडा स्वभाव, त्यांची मते वगैरे पाहता विल्सन यांना ही भेट कशी काय होईल याची शंका होती. त्यातच विल्सन यांच्या अगोदरचे पंतप्रधान सर ॲलेक हयूम यांच्या व जॉन्सन यांच्या भेटीचा चुकीचा वृत्तान्त ब्रिटिश पत्रांनी प्रसिद्ध केल्यामुळे जॉन्सन यांनी एका संपादकाला सांगितले होते की, 'ब्रिटिश पंतप्रधानांच्या भेटीला मी महत्त्व देत नाही. त्यांना निवडणुकीचे राजकारण करावयाचे असते.' या पार्श्वभूमीवर विल्सन यांची भेट ठरली. विल्सन यांना जॉन्सन यांनी आपले मत ऐकवले. पण विल्सन यांनी त्यांना आश्वासन दिले व ते पार पाडले. त्यामुळे दोघामध्ये स्नेहभाव निर्माण झाला आणि वाढला. पुढे तर व्हिएतनामवरील बॉम्बफेकीबद्दल विल्सन यांनी जॉन्सन यांना लंडनहून रात्री फोन केला तेव्हा अमेरिकेतील रात्रीचे अडीच वाजले होते. जॉन्सन झोपेतूनच उठले व आपल्या टेक्सन भाषेत त्यांनी विल्सन यांना सुनावले, की ब्रिटिशांचा एकही सैनिक

व्हिएतनाममध्ये नाही, तेव्हा त्यांनी आपल्याला यासंबंधी काही सांगू नये. ' मलेशियात काय चालले आहे ते पाहा व ते निस्तरा ' असेही ते म्हणाले. तथापि सकाळी उठल्यावर जॉन्सन यांनी पुन्हा विल्सन यांच्याशी संपर्क साधला, आपली बाजू मांडली आणि विल्सन यांना वाटाघाटीसाठी आमंत्रण देण्यात आले !

बटलर

दहा वर्षांपूर्वी विल्सन यांनी पंतप्रधानपद घेतल्यानंतर काही दिवसांतच श्री. बटलर यांना केंब्रिज विद्यापीठाच्या ट्रिनिटी कॉलेजचे डीन नेमले. विल्सन आपल्या पुस्तकात लिहितात की, ' हुजूर पक्षाने बटलर यांना फार वाईट वागणूक दिली होती व म्हणून ट्रिनिटी कॉलेजच्या डीनची जागा खाली होताच ती मी त्यांना देऊ केली. ' मॅकमिलन यांच्यानंतर बटलर हे हुजूर पक्षाचे नेते व्हावयाचे पण त्यांना डावलून सर अलेक हयूम यांची निवड झाली होती. बटलर यांचा जन्म भारतात झाला आहे. ते हुजूर पक्षाचे कार्यक्षम पुढारी होते. ज्या वेळेला हा पक्ष सत्तेवर नव्हता तेव्हा प्रचाराची मोहीम त्यांनी अतिशय कार्यक्षमतेने हाताळली. ३५ सालच्या भारत सरकारविषयक कायद्याचे विधेयक कॉमन्स सभागृहात संमत होण्यासाठी त्यांनी फार प्रयत्न केले होते. पुढे ५४ साली ते भारतात पं. नेहरूंच्या निवासस्थानी त्यांचे पाहुणे म्हणून राहिले, तेव्हा ३५ च्या कायद्याचा आधार भारतीय राज्यघटना तयार करताना घेतला असल्याची कबुली नेहरूंनी त्यांच्यापाशी दिली. या कायद्यामुळे चर्चिल कसे भडकले होते, ते नेहरूबद्दल अद्वातद्वा बोलू लागताच त्यांच्या पत्नीने त्यांना कसे चापले, याची हकीगत बटलर यांनी ' आर्ट ऑफ द पॉसिबल ' (पेंग्विन) या आपल्या आत्मचरित्रात निवेदन केली आहे. त्यांना ट्रिनिटीचे डीन नेमताना हुजूर पक्षाचा पुढारी फोडला ही विल्सन यांची दृष्टी नव्हती. ती राजकीय नेमणूकही नव्हती. ब्रिटनच्या शैक्षणिक पुनर्रचनेच्या विधेयकाचे जनक बटलर होते व त्यामुळे त्यांची नेमणूक झाली होती.

२०-१०-७४ ◉

विल्सन यांचा सत्तात्याग

सत्ता, संपत्ती यांचा मोह विलक्षण असतो आणि सत्तेचा उपभोग घेतलेल्यांना ती सोडणे सोपे नसते. या स्थितीत आपखुषीने सत्तेचा त्याग करण्यास एक प्रकारचे नैतिक बळ लागते. अध्यात्माची वायफळ चर्चा न करताही असे बळ ब्रिटिश पंतप्रधानपद सोडणाऱ्या हॅरॉल्ड विल्सन यांनी दाखवले आहे. ब्रिटिश मजूर पक्षातील दोन्ही गटांना एकत्र ठेवण्याची शक्ती विल्सन यांच्यापाशी होती. आणि राजकारणी डावपेचात ते तरबेज होते व आहेत. मजूर पक्षाला एकाचेच मताधिक्य होते, पण मंत्रिमंडळ गडगडण्याचा धोका नव्हता. या पक्षातील जहाल गटाने कडक टीका करून बंडखोरीचा आव अनेकदा आणला, पण मंत्रिमंडळ कोसळून निवडणुकी घेण्यास यापैकी कोणाची तयारी नव्हती. यामुळे विल्सन यांच्या पंतप्रधानपदावर गदा आलेली नव्हती. तरीही त्यांनी अधिकारपद सोडण्याचा निर्णय घेतला. गलितगात्र होऊनही मंत्रिपद सोडू नये, सुटले तर

राज्यपालपद व काहीच नाही तर एखाद्या महामंडळाचे अध्यक्षपद वा कुलगुरुपद मिळावे व शाही इतमामात शवयात्रा निघावी, अशी एकंदर आपल्याकडे आध्यात्मिक श्रेष्ठत्वाच्या गोष्टी करूनही प्रवृत्ती दिसते. विल्सन यांचा निर्णय म्हणूनच नैतिकदृष्ट्या उल्लेखनीय. ४८ व्या वर्षी आपल्याला पंतप्रधानपद मिळाले आणि म्हणून ६० व्या वर्षी हे पद सोडणे योग्य असे विल्सन म्हणाले. एकतीस वर्षे मजूर पक्षात अग्रभागी काढली, तेरा वर्षे मजूर पक्षाचे नेतृत्व केले आणि साडेसात वर्षांपेक्षा अधिक काळ पंतप्रधानपद भोगले. यापेक्षा अधिक काही मिळण्याची अपेक्षा का करावी, असा सवाल त्यांनी मंत्रिमंडळापुढे वाचलेल्या निवेदनात विचारला आहे. महत्त्वाकांक्षेला आणि अधिकारभोगालाही मर्यादा असावी हा त्यांचा विचार अनुकरणीय आहे. पंतप्रधान या नात्याने आपण बारा हजार प्रश्नांना उत्तरे दिली, ४२०२ समित्यांचे अध्यक्षपद भूषविले आणि इतर असंख्य समित्यांचे नेतृत्व केले अशी माहिती विल्सन यांनी दिली असून आपण पार्लमेंटमध्ये राहणार आणि देशात वा परदेशात व्याख्यानांचे दौरे केले तरी पार्लमेन्टच्या कामात व्यत्यय येणार नाही याची काळजी घेणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली आहे. याच कारणास्तव ते कोणत्याही कंपनीचे अध्यक्षपद वगैरे स्वीकारणार नाहीत किंवा विद्यापीठात डीन वा कुलगुरु होणार नाहीत. पार्लमेन्टचे जीवन त्यांना मनस्वी आवडते आणि त्यावर त्यांची निष्ठा आहे. यासंबंधात पं. नेहरूंची आठवण येईल. संसदेत ते जास्तीत जास्त वेळ घालवीत. आपल्या सहकाऱ्यांना सावरीत आणि विरोधी पक्षांचाही मान राखीत.

पत्रकारांना कोपरखळ्या

राजकारणी व पत्रकार यांचे नाते विलक्षण आहे. दोघांचे एकमेकाशिवाय चालत नाही, पण एकमेकांचे पाय ओढण्याची दोघांनाही हौस. विल्सन व पत्रकार यांच्यात असेच नाते होते. त्यांनी आपल्या राजीनाम्याच्या प्रकरणात पत्रकारांची भलतीच फजिती केली. विल्सन यांच्या वाढदिवसानिमित्त अनेक राजकीय प्रतिनिधींनी वृत्तपत्रांत लेख लिहिले आणि विल्सन कधी गादी सोडतील याविषयी या लेखात व पूर्वीही तर्कवितर्क केले. राणीच्या राज्यरोहणाला पंचवीस वर्षे ७८ साली होतात, तेव्हा तो समारंभ पार पडल्यावर मग ते राजीनामा देतील असा काहींचा अंदाज, तर राजीनामा देणारच नाहीत, कारण चर्चिलसुद्धा सत्तरीच्या पुढे पंतप्रधान झाले होते तर आपण का होऊ नये, असे विल्सन यांना वाटत असल्याचा दावा काहींनी केला होता. पॉल जॉन्सन हे 'न्यू स्टेटस्मन'चे माजी संपादक. त्यांनी 'संडे टाइम्स'मध्ये विल्सन यांच्या वाढदिवसानंतर लेख लिहिला होता व त्यात स्पष्टपणे म्हटले होते की, 'दहा वर्षांपूर्वीचा ध्येयवाद विल्सन यांच्यापाशी नसून ते केवळ अधिकारपदाच्या मोहात पडले आहेत. पक्षातील दोन्ही गट ते सांभाळू शकतात ही त्यांची शक्ती व त्यामुळे त्यांचे स्थान अढळ, त्याचप्रमाणे पक्षाची एकी टिकली तर सध्याचे पार्लमेन्टचे सभासदत्व टिकणे व नंतर निवडणूक जिंकणे शक्य, यामुळे मजूरपक्षीय विल्सन यांच्या मागे, असे दृश्य आहे. पण हे फारसे स्तुहणीय नाही. आठ वर्षे पंतप्रधानपदावर विल्सन असल्याने त्यांचा कंटाळा आला असून या कंटाळ्याचे रूपांतर वैतागात होईल. विल्सन राजीनामा वगैरे देणार नाहीत, पण ज्येष्ठ मुत्सद्दी या नात्याने त्यांनी आपल्या जहरी भाषेत तरी सुधारणा करावी!' यानंतर आठ-बारा दिवसांनी विल्सन यांनी राजीनामा दिल्याने पॉल जॉन्सन यांच्या लेखातील टीका बिनबुडाची ठरली. राजीनामा देण्याचा निर्णय विल्सन यांनी गेल्या वर्षीच घेतला होता व मार्चमध्ये आपण जाणार हे त्यांनी राणीला स्पष्टपणे सांगितले होते. सभापतींनाही याची कल्पना दिली होती. हे सर्व अत्यंत गुप्त राहिले. राजनैतिक लिखाण करणाऱ्या ब्रिटिश पत्रकारांना याची गंधवार्ताही नव्हती. त्यांची खोड मोडल्याचा आनंद विल्सन यांनी आपल्या पत्रकार-परिषदेत व्यक्त केला. एका पत्रकाराने विचारले, 'तुमचा हा निर्णय धक्कादायक होता असे तुम्हाला वाटत नाही काय?' विल्सन म्हणाले, 'नाही, तुम्हा मंडळींना याचा वाससुद्धा लागला नव्हता, म्हणून तो तुम्हाला धक्कादायक वाटतो.' 'आब्झर्व्हर'चे बॅटकिन्सन हे या सत्याच्या थोडे जवळ आले होते. तसेच 'आब्झर्व्हर'च्या १४ मार्चच्या अंकातल्या अग्रलेखात एक वाक्य असे आहे, की त्यावरून संपादकास विल्सन यांच्या राजीनाम्याची अटकळ आहे की काय असे वाटावे. पण त्यास खात्री नसावी. एरवी त्यांनी

सर्वांच्या अगोदर बातमी झळकवली असती.

प्रकृतीच्या कारणास्तव आपण राजीनामा दिलेला नाही हे स्पष्ट करताना विल्सन यानी पत्रकाराना आणखी एक टोला मारला. ते म्हणाले, 'मी वीस वर्षांपूर्वी जेवढा प्रकृतीने व्यवस्थित होतो तेवढाच आजही आहे. पंतप्रधानपदावर राहूनही मला उत्तम झोप लागत होती. झोपेची गोळी घ्यावी लागली नाही. डॉक्टरकडून मी नियमितपणे प्रकृती तपासून घेत आलो असून त्याचे अहवाल दप्तरात आहेत. तरीही काही पत्रकारमित्रांनी माझ्या प्रकृतीबद्दल अनेकदा काळजी (!) व्यक्त केली. या सर्व मित्रांच्या खात्रीशीर माहितीचाच विचार केला, तर आतापर्यंत मला दोनदा हृदय-विकाराचा झटका आला होता, तीन वेळा मेंदूचा रक्तस्राव झाला, रक्ताचा कॅन्सर झाला, फुप्फुसाचा कॅन्सर तसेच शरीराच्या ज्या अवयवाचा कमी उल्लेख होतो अशा अवयवाचाही कॅन्सर झाला होता! माझा गुडघाही सुजला होता!' पत्रकारानी विश्वासार्ह माहितीच्या जोरावर केलेल्या निदानांना वैद्यकीय आधार मात्र नव्हता. विल्सन यानी नंतर आपला चष्मा काढून दाखवला. तो त्यांनी ५१ साली घेतला आहे. पण त्यामुळे काही पत्रकारमित्रांना विल्सन यांना लवकरच अंधत्व येणार असे वाटू लागले होते! लंडन 'टाइम्स'चा स्तंभलेखक म्हणतो ही मुलाखत ऐकत असता असे वाटले, की (राजकीय रंगभूमीवरील) या कलावंताने आपला नित्याच्या वर्तनात काहीही फरक केला नव्हता!

बारा वर्षांपूर्वी

हॅरॉल्ड विल्सन यांच्या राजीनाम्याच्या या प्रसंगी त्यांनी प्रथम जेव्हा पंतप्रधानपद बारा वर्षांपूर्वी घेतले त्याकाळची आठवण येणे साहजिक आहे. (त्यावेळच्या निवडणूक दौऱ्यातील भाषण ऐकण्याचा योगही प्रस्तुत लेखकाला आला होता.) आपल्या सहा वर्षांच्या कारकीर्दीतील अनुभवांचे वर्णन विल्सन यांनी 'द लेबर गव्हर्नमेन्ट' या पुस्तकात केले आहे. हे पुस्तक 'पेंग्विन'मध्येही मिळू शकते. 'त्यातले काही भाग 'टाइम्स'ने प्रसिद्ध केले तेव्हा त्याचे तुम्हाला किती पैसे मिळाले' असा प्रश्न बी. बी. सी. च्या प्रतिनिधीने केला असता विल्सन यांचा संताप अनावर झाला होता.

विल्सन यांची भाषणे ज्याप्रमाणे प्रभावी होतात, टेलिव्हिजनचे माध्यम ते ज्या कौशल्याने हाताळतात, त्याप्रमाणे त्यांचे हे पुस्तक असेल अशी कल्पना केली तर ती फोल ठरेल. पुस्तक बऱ्याच वेळा कंटाळवाणे व निष्कारण वाढवलेले आहे. त्यातील काही प्रसंग गंमतीदार आहेत.

६४ साली मजूर मंत्रिमंडळ अस्तित्वात आले. मंत्रिमंडळाची पहिली बैठक भरली तेव्हा बैठकीत धूम्रपानाची परवानगी द्यावी की नाही हा प्रश्न प्रथम निघाला. चर्चिल व ॲटली यांच्या कारकीर्दीत धूम्रपान मंत्रिमंडळाच्या बैठकीत होत होते. पण ४७ साली इंग्लंडमध्ये तंबाखूच्या आयातीवर डॉलर्सच्या टंचाईमुळे निर्बंध आले. डाल्टन यांनी या संदर्भात सुचवले की, हे निर्बंध लक्षात घेऊन मंत्रिमंडळाच्या बैठकीत तरी धूम्रपान करू नये व आपण लोकांच्या बरोबर आहोत हे दाखवून द्यावे. ही सूचना मान्य झाली. तथापि दुपारी एकनंतर बैठक लांबली तर मात्र धूम्रपानास परवानगी होती (बेव्हिन यांचे घड्याळ नेहमी पाच मिनिटे जलद चालत असे!). ॲटली यांच्या कारकीर्दीतील या नियमाचे काय करावे हा प्रश्न आला. धूम्रपान न करणारे मंत्रिमंडळ त्वरित निर्णय घेते; पण चर्चा होतेच असे नाही. उलट, धूम्रपान करणारे मंत्री दीर्घकाळ बोलत असतात. यातून मार्ग काढावयाचा होता. अर्थात धूम्रपानाच्या बाजूनेच निर्णय घेतला गेला!

२८–३–७६ ⊙

हॅरॉल्ड मॅकमिलन

भूतपूर्व ब्रिटिश पंतप्रधान हॅरॉल्ड मॅकमिलन नुकतेच भारतात आले होते. ५८ साली ते भारतात आले, तेव्हा ब्रिटिश पंतप्रधान म्हणून आले होते. यावेळी ते स्वतःच्या कंपनीच्या कामाच्या निमित्ताने आले. या निमित्ताने 'न्यू स्टेटस्मन प्रोफाइल्स' आणि मॅकमिलन यांच्या सहा खंडांतील आठवणी पुन्हा चाळताना काही उल्लेखनीय प्रसंग व वैशिष्ट्ये आढळली.

'न्यू स्टेटस्मन प्रोफाइल्स' हे व्यक्तिरेखाचे पुस्तक असून हॅरॉल्ड मॅकमिलन यांचीही व्यक्तिरेखा त्यात आहे. मॅकमिलन यांचे एकंदर वागणे, बोलणे हे अनौपचारिक असले, तरी एक प्रकारचे गूढही त्यांच्याबद्दल राहाते. पहिल्या महायुद्धात ते तीन वेळा जायबंदी झाले. असे सांगतात, की युद्धभूमीवर ते जखमी होऊन पडले असता त्यांच्या खिशात 'पॅरडाइज लॉस्ट'ची छोटी प्रत होती! मॅकमिलन या जगप्रसिद्ध प्रकाशन कंपनीच्या मालक घराण्यात जन्म झालेल्या हॅरॉल्ड मॅकमिलन यांनी राजकारणाचा मार्ग युद्धानंतर स्वीकारला आणि वर्गवर्चस्व असलेल्या त्यावेळच्या इंग्लंडमध्ये मॅकमिलन यांच्या स्वतःच्या घराण्याच्या प्रतिष्ठेला डचूक ऑफ डेव्हॉनशायर यांच्या घराण्याच्या प्रतिष्ठेची जोड मिळाली व त्यामुळे मॅकमिलन यांचा राजकारणाचा मार्ग अधिक सुकर बनला. मॅकमिलन यांनी डचूक ऑफ डेव्हॉनशायर यांची सुन्दर व गुणी मुलगी डोरोथी हिच्याशी विवाह केला. ते जेव्हा हाऊस ऑफ कॉमन्सवर निवडून गेले, तेव्हा त्यांचे सोळा नातेवाईक कॉमन्सचे सभासद होते. हुजूर पक्षातील सुधारणावादी म्हणूनच त्यांनी राजकारणात प्रवेश केला आणि मंदीची लाट पसरली तेव्हा मजूर पक्षात पुढे वेव्हन यांचे स्थान होते ते मॅकमिलन यांचे हुजूर पक्षात होते. 'द मिडल वे' हे त्यांचे पुस्तक त्यावेळी बरेच गाजले. आज ते प्रतिगामी ठरेल, पण तेव्हा अनेक हुजूरपक्षीयांचा या पुस्तकामुळे मॅकमिलन यांनी राग ओढवून घेतला.

दुसऱ्या युद्धानंतर प्रथम मजूर मंत्रिमंडळ अधिकारावर आले व नंतर हुजूर. चर्चिल यांच्या या मंत्रिमंडळात मॅकमिलन हे गृहबांधणी खात्याचे मंत्री झाले. त्यांनी बराच मोठा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला होता. पुढे ते परराष्ट्रमंत्री झाले. परदेशच्या दौऱ्यावर असताना ते आपल्या मंत्रालयाला खलिते पाठवीत आणि त्यात व्हर्जिलच्या ओळी येत. ते पाहून मंत्रालयाचे वरिष्ठ कर्मचारी बुचकळ्यात पडत. परराष्ट्रमंत्र्याने याप्रमाणे व्हर्जिल वगैरेंच्या काव्यपंक्ती कधी उद्धृत केल्या नव्हत्या.

'न्यू स्टेटस्मन'च्या व्यक्तिरेखेचा शेवट झाला आहे याप्रमाणे : 'मॅकमिलन हे फार प्रगती करू शकणार नाहीत. ते हुशार आहेत आणि स्वतःच्या कर्तृत्वाबद्दलही ते तटस्थपणे विचार करू शकतात. राजकारणाबद्दल त्यांचा दृष्टिकोण निराशावादी आहे. राजकारणी व्यक्तीत हे दोन्ही क्वचित आढळते. मॅकमिलन हे अतिशय तल्लख बुद्धीचे आणि स्वतःबद्दल सर्वात कमी विश्वास असलेले असे आहेत व त्याचमुळे ते पंतप्रधान व्हावेत, असे अनेक हुजूरपक्षीयांना वाटते. हुजूर पक्षात जेव्हा सदसद्विवेकबुद्धी व सत्ता यांचा संघर्ष होईल, तेव्हा मॅकमिलन हे सदसद्विवेकबुद्धीच्या बाजूने असल्याने त्यांना पंतप्रधानपद मिळणार नाही.' 'न्यू स्टेटस्मन'ची ही व्यक्तिरेखा ५५ सालच्या नोव्हेंबरमध्ये प्रसिद्ध झाली आणि त्या पत्राच्या अनेक भाकितांप्रमाणे हेही खोटे ठरून मॅकमिलन हे ५७ च्या जानेवारीत पंतप्रधान झाले.

'मॅक वंडर'

ॲन्थनी ईडन यांना सुवेझच्या पराभवाचा जबर धक्का बसला आणि चर्चिल यांनी दीर्घकाळ पंतप्रधानपद भोगल्यामुळे ईडन यांना दुसऱ्या पदावर फार वर्षे राहावे लागले. पुढे पंतप्रधानपद मिळाले, पण सुवेझमुळे

हॅरॉल्ड मॅकमिलन

राजकीय अब्रू गेली आणि प्रकृती ढासळल्यामुळे राजीनामा देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. हा निर्णय त्यांनी तेव्हा अर्थमंत्री असलेल्या मॅकमिलन यांना सांगितला व लगेच वारस नेमण्याची तयारी सुरू झाली. मॅकमिलन यांनी आपल्या आत्मचरित्रात या दिवसाची आठवण दिली आहे. पंतप्रधानाच्या निवासस्थानाला (१० डाउनिंग स्ट्रीट) लागूनच अर्थमंत्र्याचे निवासस्थान आहे. ईडन यांचा निरोप घेऊन मॅकमिलन घरी आले. तिकडे ज्येष्ठ मंत्री म्हणून लॉर्ड सॅलिसबरी व अर्ल किलमूर यांनी हुजूर पक्षीयांचे मत अजमावयास सुरुवात केली. दोघांनीही आपला कल व्यक्त केला नाही. सॅलिसबरी यांना 'र' चा उच्चार करता येत नसल्याने ते विचारीत; 'हॅवॉल्ड' की 'वॅब' ? वॅब म्हणजे रॅब बटलर. नंतर सॅलिसबरी व चर्चिल यांना राणीने बोलावले आणि सॅलिसबरी यांनी स्वतःचे मत न देता पक्षसदस्यांचे मत सांगितले (मॅकमिलन यांना हे सर्व नंतर कळले). हे सर्व चालू असता मॅकमिलन लिहितात, 'मला कोणाला फोन करणे वा ईडन यांच्याशी गप्पा मारण्यासाठी जाणेही कठीण झाले. कारण यामुळे आपण स्वतःचा प्रचार करतो, असे दृश्य दिसले असते.' म्हणून ते स्वतःच्या निवासस्थानीच राहिले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी उठून 'प्राइड अँड प्रेज्युडिस'चे वाचन त्यांनी पुन्हा सुरू केले. थोड्या वेळाने दुपारी दोन वाजता बकिंगहॅम राजवाड्यावर बोलावल्याचा फोन आला. मॅकमिलन यांनी आपल्या पत्नीला हे काही न सांगता फक्त बरोबर एक वाजता जेवण तयार हवे, असे सांगितले. भोजनासाठी ते दरबारी पोषाख घालून आल्याचे पाहिले, तेव्हा त्यांच्या पत्नीने खरे काय ते ताडले ! मॅकमिलन पंतप्रधान झाले. ते पंतप्रधान होणार नाहीत असे 'न्यू स्टेटस्मन'चे भाकित होते, पण मॅकमिलन सहा वर्षे या पदावर राहिले. त्या काळात ब्रिटनची आर्थिक परिस्थिती बरीच सुधारली. इतकी चांगली स्थिती कधी नव्हती. 'वुइ नेव्हर हॅड इट सो गुड' ही निवडणुकीतील हुजूर पक्षाची घोषणा होती. मॅकमिलन यांच्याच कारकिर्दीत अनेक आफ्रिकी ब्रिटिश वसाहती स्वतंत्र झाल्या. 'विंड ऑफ चेन्ज' या शब्दांत याचे वर्णन केले गेले. हुजूर पक्ष समर्थ बनला आणि 'मॅक बंडर' या नावाने मॅकमिलन ओळखले जाऊ लागले. आत्मविश्वास, घाई-गर्दी न करता

शांतपणे निर्णय घेणे इत्यादी त्यांचे गुण वाखाणले जात होते. एवढेच नव्हे, तर राज्यकारभार, कॉमन्सचे कामकाज व पक्ष-कारभार यांच्यावर पकड ठेवून मॅकमिलन ज्या सहजतेने काम करीत तो आदर्श हॅरॉल्ड विल्सन यांनीही ठेवला आहे. त्यात ते यशस्वी होतातच असे नव्हे. दुर्दैवाने मॅकमिलन यांच्या कारकिर्दीच्या अखेरीस प्रोफ्युमो-प्रकरण व अनेक मंत्र्यांची हकालपट्टी यामुळे वादळ झाले. राजीनामा द्यावा न द्यावा अशा संभ्रमात असताना त्यांनी तो न देण्याचा निर्णय घेतला व ६४ सालची निवडणूक लढविण्याचे ठरवले. पण चोवीस तासात ते बरेच आजारी होऊन त्यांच्यावर शस्त्रक्रिया करावी लागली व मग त्यांना (६३ साली) राजीनामा द्यावा लागला.

नेहरूंशी भेट

मॅकमिलन यांनी आपल्या आत्मचरित्रात भारतातील दौऱ्याचा उल्लेख केला आहे. ते व त्यांच्या पत्नी पं. नेहरूंच्याच निवासस्थानी राहिल्या. नेहरूंनी त्यांचे अतिशय उत्साहाने स्वागत केले. दोघांची बरीच आत्मीयतेने बोलणी झाली. लाल किल्ल्यापाशी स्वागतसमारंभ झाला. या सर्व स्वागताने मॅकमिलन भारावून गेले. याच भेटीत नेहरूंनी त्यांना चीन व रशिया यांच्यात मतभेद होत असून दोन्ही देशात वितुष्ट येईल, असे सांगितले होते. मॅकमिलन यांनी ते किती गंभीरपणे लक्षात घेतले, हे समजण्यास मार्ग नाही.

मॅकमिलन नेहरूंच्या निवासस्थानी राहात असता तेथे सुकानोंही होते. एका सकाळच्या न्याहारीला बरेच पदार्थ होते. सुकार्नो यांना न्याहारीचा हा थाट विशेष आवडल्याचे सांगून मॅकमिलन लिहितात, नेहरूंना सुकार्नो यांचे वागणे पसंत नसावे असा ग्रह झाला. त्यांचा लष्करी पोषाख, सतत छोटी काठी हाती ठेवण्याची पद्धत, जेवताना वा न्याहरी करतानाही ती काठी टेबलावर ठेवण्याची रीत, हे नेहरूंना आवडत नव्हते हे मॅकमिलन यांनी हेरले.

पुढे ६२ साली चीनने आक्रमण केले. मॅकमिलन म्हणतात, या आक्रमणाबद्दल ब्रिटिश अधिकाऱ्यांनी योग्य विश्लेषण केले होते. चीन भारताचा प्रदेश व्यापणार नाही, सीमा आपल्याला सोयीची करील, असे या अधिकाऱ्यांनी कळवल्याने आपण या लढाईने विचलित झालो नाही, अमेरिकन सरकार मात्र बरेच अस्वस्थ झाले होते. २९-२-७६ ⊙

फेबियन सोसायटी –बर्नाड शॉ, सिडने वेब वगैरे

इंग्लंडमध्ये व नंतर ब्रिटिश साम्राज्यातील भारतासारख्या तेव्हाच्या वसाहतींत समाजवाद, कल्याणकारी राज्य इत्यादी विचारांचा, कल्पनांचा प्रसार करण्याचे श्रेय फेबियन सोसायटीकडे जाते. या संस्थेला नव्वदपेक्षा अधिक वर्षे पूर्ण झाली आहेत आणि तिचा खर्च व्यवस्थितपणे चालावा यासाठी सर हॅरॉल्ड विल्सन यांच्या अध्यक्षतेखाली निधी गोळा करण्यासाठी समिती स्थापन झाली आहे. दोन लाख पौन्डांचे लक्ष्य ठेवण्यात आले असून त्यापैकी ५० हजार पौन्ड जमलेले आहेत. या वर्षअखेर नॉर्मन मॅकेन्झी यांचे 'द फर्स्ट फेबियन्स' हे पुस्तक प्रसिद्ध होणार असून त्यातील काही भाग 'न्यू स्टेटस्मन'ने प्रसिद्ध केला आहे. त्यावरून या पुस्तकाबद्दल उत्सुकता निर्माण होते.

फेबियन सोसायटीच्या संस्थापकांपैकी पर्सिव्हल चब यांचे नाव विसरले गेले आहे. वास्तविक अशा संस्थेच्या कल्पनेचा तो जनक होता. पर्सिव्हल चब हा सनदी नोकर. एक नवे चैतन्य निर्माण करणारी चळवळ सुरू करणारे मंडळ स्थापन करावे ही कल्पना त्याने १८८२ सालीच बोलून दाखवली व तिचा प्रचार केला. पुढे ८३ सालच्या पावसाळ्यात फेबियन सोसायटीची स्थापना झाली. पण संस्था स्थापन करताना संस्थापकांना कार्याची कल्पना नव्हती. ही एक वादविवाद सभा असावी की सामुदायिक जीवन जगणारा संघ असावा की कॅलिफोर्नियात जाऊन एक आदर्श वसाहत स्थापन करावी याविषयी निश्चित मत झाले नव्हते. संस्थापक होते शॉ, वेब, हचूबर्ट ब्लांड, वालास वगैरे. ८४ सालात या संस्थेतर्फे पहिली पुस्तिका प्रसिद्ध झाली. अनेक लोक गरीब का असतात?' हे तिचे नाव. एका मद्यपी रंगाऱ्याने ती लिहिली होती. प्रारंभी संस्थेचे विशेष काही कामही नव्हते. ८८ सालच्या मेमध्ये झालेल्या संस्थेच्या बैठकीचे इतिवृत्त शॉने लिहिले : 'बर्नार्ड शॉ हे प्रथम हजर झाल्याने ही बैठक संस्मरणीय झाली.' त्या काळात इंग्लंडात गरिबाचा कोणी वाली नव्हता, तेव्हा त्यांची परिस्थिती सुधारावी यासाठी मध्यमवर्गीयात जाणीव निर्माण करण्याचे उद्दिष्ट फेबियन सोसायटीने समोर ठेवले व कामगारवस्ती, गलिच्छ वस्ती, दारिद्र्य इत्यादीसंबंधात पुस्तिका, पत्रके असे साहित्य प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. बर्नार्ड शॉ, सिडने वेब हे या सोसायटीचे आधारस्तंभ.

पण मॉरिस यांच्यासारखा सभासद पुस्तिका लिहायचा, त्याकरिता माहिती, आकडेवारी न कंटाळता जमा करावयाचा. एका विशिष्ट ध्येयाने, सेवा-भावनेने या सदस्यांवर पूर्ण पगडा टाकला होता आणि फेबियन सोसायटीचे हेच खरे वैशिष्ट्य होते.

शॉ व वेब

मॅकेन्झी यांनी शॉ व वेब यांच्या कार्याचे महत्त्व मार्मिकपणे वर्णन केले आहे. हे दोघे तसेच ब्लांड व वालास या जुन्या 'टोळी 'बद्दल काही नवे सभासद कुरकुर करीत, पण त्यांचे तिच्यापुढे काही चालत नसे. कारण एक तर कोणत्याही बाहेरच्या अधिकाराच्या जागेकरिता ते प्रयत्न करीत नसत. फेबियन सोसायटीचे राजकीय पक्षात रूपांतर न होऊ देण्यास हेच संस्थापक कारणीभूत होते. बर्नार्ड शॉ हे वादविवादपटू व वादाची अतिशय हौस असलेले. वाद सुरू झाला की शॉ विरोधकाची त्रेधा उडवीत, पण त्याचबरोबर नंतर विरोधकाच्या गुणांची प्रशंसाही करीत; सोसायटीच्या कार्यकारिणीवर नाव सुचवीत आणि निवडणुकीसाठी पाच पौन्डही काढून देत! शॉ यांची ही जी वागण्याची वृत्ती होती ती फेबियन सोसायटीचे स्वरूप बनवण्यात प्रभावी ठरली. बर्नार्ड शॉ यांच्या तिखट लेखणीची जाणीव सोसायटीच्या इतिवृत्तातूनही मिळते. ब्लंड यांच्या एका भाषणानंतर त्यांनी लिहिले, की अशाच दोनतीन सभा झाल्या तर कोणतीही संस्था बंद होईल! पण ती तशी होऊ नये यासाठी वेब व शॉ यांनी मेहनत केली.

वेब हे पैशाला फार जपत व सोसायटीचा पैसा आवश्यक त्या कामासाठी व आवश्यक तेवढाच खर्च करीत. लंडन कौन्टी कौन्सिलमध्ये पुरोगामी सभासदांचा पक्ष, न्यू स्टेट्समनची स्थापना आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सची मुहूर्तमेढ ही वेब यांची कामगिरी. या तिन्हींनी ब्रिटिश राजकारणावर, विचारांवर, सार्वजनिक जीवनावर फार मोठा परिणाम केला.

फेबियन सोसायटीला प्रारंभापासून दीर्घकाळ नव्या सभासदांचा कधी तोटा पडला नाही. किंबहुना शॉ, वेब वगैरेंच्या अस्तित्वाने लंडनच्या बौद्धिक जगात या सोसायटीला प्रतिष्ठा मिळाली आणि तरुण रक्त तिच्याकडे सतत आकर्षित होत गेले. कल्याणकारी राज्याच्या कल्पनेने भारावलेल्या या मंडळींनी समाजवाद हे ध्येय मानले खरे, पण पोथीनिष्ठा त्यांना मानवणारी नव्हती. शॉ यांच्यासारख्या बुद्धिवंताला चाकोरीतून विचार करणे जमणारे नव्हते व तो स्वतंत्र बुद्धीच दाखवणार हे उघड होते. त्यामुळे काही अतिजहाल, तर काही सौम्य असे सभासद सोसायटीत आले. त्यांचे कडाक्याचे वाद होत, पण या सर्वांनी एक पथ्य पाळल्याचे मॅकेन्झी सांगतात व ते हे, की या मतभेदांना व्यक्तिगत उखाळ्या-पाखाळ्यांचे स्वरूप येऊ द्यायचे नाही. काहींना सोसायटीने राजकारण करावे असे वाटे व त्यांना राहवले नाही, की मग ते मजूर पक्षात जात. पण सोसायटी व पक्षीय राजकारण, निवडणुकीचे राजकारण अशी भेसळ करू देण्यात आली नाही. यात शॉ यांचा वाटा फार मोठा. सोसायटीने अनेक तत्कालीन विषयांवर पुस्तिका प्रसिद्ध केल्या, वादविवाद घडवून आणले आणि पक्षीय राजकारणाच्या विरहित अशी सार्वजनिक प्रश्नांची चर्चा करण्याची परंपरा सुरू केली. इंग्लंडच्या वैचारिक जीवनात सोसायटीला म्हणूनच फार महत्त्व आहे. या जीवनाचा आपल्याकडेही परिणाम झाला असल्याने फेबियन सोसायटीच्या निधीला पं. नेहरूंनी मदत केली असती. त्यांच्या कन्येनेही करावी ही अपेक्षा राहील. (१८-७-७६) ◉

दोन इतिहासकार

'ऑब्झर्व्हर'मध्ये ब्रिटिश इतिहासकारांसंबंधी लेखमाला प्रसिद्ध होत असून, पहिला लेख लॉर्ड मेकॉले व दुसरा लॉर्ड ॲक्टन यांच्यासंबंधी आहे. मेकॉले यांच्यासंबंधी नेहमी होणारी टीका म्हणजे ते भाषा-शैलीच्या मागे लागून विचारांना पारखे होतात ही. पण त्यांच्याइतका लोकप्रिय लेखक त्यांच्या काळात नव्हता आणि आजही इतिहास चटकदारपणे कसा लिहावा याचे उदाहरण द्यायचे तर ते मेकॉले यांचेच दिले जाते. मेकॉले यांची स्मरणशक्ती जबरदस्त होती. एकदा वाचले की त्यांना ते पाठ होई असे ते एकपाठी होते. आयर्लंडला ते लंडनहून बोटीने गेले तेव्हा रात्रभरच्या प्रवासात त्यांनी सबंध 'पॅरडाइज लॉस्ट' म्हणून वेळ काढला. त्यांना काय काय पाठ असायचे? अगदी कॅन्टरबरीच्या आर्चबिशपांची यादीच्या यादी ते पाठ म्हणून दाखवीत. पैसे मिळवण्याचे साधन म्हणून त्यांना वृत्तपत्रीय लेखन उपयोगी पडले आणि त्यांनी जेव्हा इंग्लंडचा इतिहास लिहिला तेव्हा एक इतिहासच घडला. त्याच्या भराभर आवृत्त्या निघाल्या. आपण असा इतिहास लिहू, की जो महिलांच्या टेबलावरील कादंबऱ्यांची जागा घेईल अशी त्यांची प्रतिज्ञा होती आणि प्रत्यक्षात ती खरी ठरली. मेकॉले यांच्या इंग्लंडच्या इतिहासाची प्रत घरोघर दिसू लागली. फ्रेंच क्रांतीचे त्यांनी विशेष कौतुक केले नाही, पण इंग्लंडमधील औद्योगिक व सामाजिक क्रांती ही त्यांना महत्त्वाची वाटत असे. मेकॉले यांच्या ग्रंथांचा व इतिहासाचा बोलबाला फार झाला. त्यांना अनेक मानसन्मान मिळाले. पिट, वॉरन हेस्टिंग्ज, क्लाइव्ह यांच्यावरील त्यांचे प्रदीर्घ निबंध गाजले आणि त्यांच्या संग्रहांना सतत मागणी राहिली. मेकॉले यांचा भारताशीही निकटचा संबंध आला होता.

लॉर्ड ॲक्टन

लॉर्ड मेकॉले यांच्यापेक्षा लॉर्ड ॲक्टन हे अगदी वेगळ्या परिस्थितीत वाढले. जर्मनी, इटली व इंग्लंड असा त्यांचा काळ गेला. ते रोमन कॅथॉलिक होते, त्यामुळे ब्रिटिश सत्ताधारी वर्गाचे ते स्वतःला जरी एक घटक मानीत, तरी हा वर्ग त्यांना तितका जवळ करीत नसे. ॲक्टन यांचा जन्म नेपल्सचा आणि पॅरिस व पुढे बर्मिंगहॅमच्या जवळ ऑस्कॉट येथे शिक्षण झाले. कॅंब्रिजमध्ये प्रवेश मिळाला नाही म्हणून त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण म्युनिक येथे पुरे झाले. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन व इटालियन या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांची ज्ञानपिपासा जबरदस्त होती आणि म्हणून आल्डनहॅम येथील त्यांच्या निवासस्थानाला लागून त्यांनी ग्रंथालयासाठी एक इमारत बांधली. तेथे पुस्तकांची सतत आवक होत असे. त्यांच्या संग्रहालयात ५,९ हजार ग्रंथ होते आणि युरोपच्या अनेक ग्रंथविक्रेत्यांकडून ते विकत घेतलेले होते. लॉर्ड ॲक्टन यांचे ग्रंथालय कॅंब्रिज विद्यापीठाला त्यांच्या निधनानंतर मिळाले. मेकॉले यांच्याप्रमाणे ॲक्टन यांचीही स्मृती असामान्य होती आणि ग्रंथांच्या सहवासात त्यांचा वेळ जाई. ते वाचत त्यापैकी त्यांना कशाचाच विसर पडत नसे.

लॉर्ड ॲक्टन यांचे वडील वारल्यावर त्यांच्या आईने दुसरे लग्न केले. आपल्या सावत्र पित्यामुळे त्यांची व ग्लॅडस्टन यांची ओळख झाली व त्यातून जन्मभरचे ते मित्र बनले. या मैत्रीमुळेच ॲक्टन यांना उमरावपद मिळाले. ॲक्टन हे कॅथॉलिक असले तरी पंथवादी नव्हते. पोप हे कधीच चूक करू शकत नाहीत, हा संकेत मान्य करण्याचा समारंभ व्हावयाचा होता तेव्हा १८७० साली लॉर्ड ॲक्टन यांनी रोमला जाऊन विरोधी भाषण केले. त्यामुळे त्यांचे नाव अधिक गाजले. अर्थात् त्यांची वकिली या प्रकरणी यशस्वी झाली नाही. 'इंग्लिश हिस्टॉरिकल रिव्हचू'ची स्थापना करण्यात त्यांचा पुढाकार होता. त्या नियतकालिकात त्यांचे विद्वत्ताप्रचुर लेखही येत. परंतु ग्रंथलेखन रेंगाळत होते. 'स्वातंत्र्याचा

इतिहास' हा ग्रंथ त्यांना लिहायचा होता. पण ते जमले नाही. याचे कारण आळस नव्हे, तर वाचन. वाचलेल्या ग्रंथांतून ते टिपणे करीत आणि त्या त्या विषयाचे वाचन संपत नसे. टिपणे ते एका कार्डावर करीत. अशी शेकडो हजारो कार्डे तयार झाली आहेत आणि आता इतिहासाचे अभ्यासक केंब्रिज विद्यापीठातील लॉर्ड ॲक्टन यांच्या या कार्डांचा उपयोग व अभ्यास करीत आहेत. प्रत्येक विचार ग्रथित करणारे एक कार्ड, अशीही विभागणी त्यांनी केली होती. 'सत्ता ही भ्रष्ट करते आणि अनिर्बंध सत्ता ही अनिर्बंधपणे भ्रष्ट करते,' यासारखी त्यांची वाक्ये सुप्रसिद्ध असून ती सुभाषितेच झाली आहेत. केंब्रिज विद्यापीठातील त्यांची इतिहासविषयक भाषणे गाजली आणि ती नंतर संग्रहरूपाने प्रसिद्ध झाली. लॉर्ड मेकॉले हे १६८८ मधील इंग्लिश क्रांतीने प्रभावित झाले होते, तर फ्रेंच क्रांती हीच खरी क्रांती, असे लॉर्ड ॲक्टन यांचे मत होते. पुढे केंब्रिज विद्यापीठाने आधुनिक इतिहासाचे खंड प्रसिद्ध करण्याचे ठरवले, तेव्हा लॉर्ड ॲक्टन हे त्याचे प्रमुख संपादक झाले. यामुळे ज्ञानाचे एक सुवर्णयुग सुरू होईल अशी त्यांची कल्पना होती, पण या इतिहासाचे लेखन करणाऱ्या इतर काही लेखकांना ग्रंथाच्या अनेक आवृत्त्या कशा निघतील, याची विशेष काळजी होती. नंतर लॉर्ड ॲक्टन आजारी पडले व त्यांनी संपादकपद सोडले. त्यांच्यानंतर इतिहासाचे खंड प्रसिद्ध झाले. ते भरभक्कम आहेत, विद्यार्थ्यांना उपयुक्त आहेत, पण त्यापलीकडे त्यात प्रतिभा, दृष्टिकोन वगैरे नाही. २६-१२-७६ ⊙

प्रासादिक इतिहास-लेखन

इतिहासलेखन प्रासादिक भाषेत करण्याची एक परंपरा ब्रिटिश लेखकांत आहे. गिबनसारख्यांनी वजनदार भाषा वापरली आणि इंग्रजी भाषाच समृद्ध केली. मेकॉले, ट्रेव्हलिन यांचा प्रकार वेगळा. त्यांची भाषा प्रासादिक आहे. मेकॉलेने तर इंग्लिश स्त्रिया आपल्या टेबलावरील कादंबरी बाजूला करून आपल्या इतिहासग्रंथाला स्थान देतील अशी प्रतिज्ञा केली होती व ते खरे झाले. ट्रेव्हलिन यांचा चार खंडांतील इंग्लिश समाजाचा इतिहास असाच कादंबरीसारखा चटकदार आहे. या परंपरेत ए. जी. पी. टेलर यांचा समावेश होतो. टेलर आता सत्तर वर्षांचे झाले आहेत. पण त्यांची उद्योगशीलता जबर असून अद्यापही त्यांचे स्फुट लेखनसुद्धा अतिशय मनोवेधक असते. नेपोलियननंतरचा युरोप, पहिले महायुद्ध, दुसऱ्या महायुद्धाची कारणे, बीव्हरब्रुक असे एक ना एक त्यांचे ग्रंथ केव्हाही कोठल्याही पानावर उघडावे की लगेच आपण त्यात रमून जातो. ऑब्झर्व्हर, संडे टाइम्स, न्यू स्टेट्समन यामध्ये त्यांची पुस्तकपरीक्षणे व लेख येत असतातच. इतके विपुल लिखाण करूनही त्याचा दर्जा आणि प्रासादिक गुण कमी होत नाही. अर्थात् टेलर हे काही वेळा आपली मते बनवतात व मग अधिक पुरावा जमा करण्याच्या भानगडीत पडत नाहीत अशी त्यांच्यावर टीका होते, हेही नमूद केले पाहिजे. त्यांच्या एका विद्यार्थ्याने मध्यंतरी ऑक्सफर्ड विद्यापीठातील त्यांच्या वर्गातील शिकवण्याच्या पद्धतीचा उल्लेख केला होता. सकाळी नऊ वाजता त्यांचा तास सुरू होई तेव्हा कितीही थंडी असली तरी विद्यार्थी गर्दी करीत आणि

फारशी टिपणे न बाळगता, टेलर यांच्या वाणीचा ओघ अखंड चालू झाला की हे विद्यार्थी वेळेचे भान विसरून जात. अशा या टेलर यांच्या काही लेखांचा संग्रह 'एसेज इन इंग्लिश हिस्टरी' या नावाने आता प्रसिद्ध झाला आहे. (पेंग्विन, किं. ९५ पेन्स.)

लॉइड जॉर्ज

या संग्रहात अनेकविध विषय आहेत. त्यात क्रॉमवेल आला आहे, तसेच लॉइड जॉर्ज व चर्चिल. पहिल्या महायुद्धाच्या काळात ब्रिटिश राजकारणाची स्थिती काय होती याची चर्चा टेलर करतात; तर हिंदुस्थान वगैरे देश ताब्यात घेणाऱ्या ईस्ट इंडिया कंपनीचा इतिहास देतानाच ज्याला पुढे साम्राज्यवाद म्हणून म्हणण्यात येऊ लागले त्याची मीमांसा ते करतात. ही मीमांसा करताना साम्राज्यामुळे ब्रिटनचा किती फायदा झाला याबद्दल ते पारंपरिक मतांपेक्षा वेगळी मते मांडतात.

लॉइड जॉर्ज यांनी नोकरशाहीची चाकोरी अनेकदा मोडली. आरोग्यविम्याची त्यांची योजना ही समाजकल्याणाच्या दृष्टीने क्रांतिकारी. पण त्यासाठी समित्या, उपसमित्या, त्यांचे अहवाल या साऱ्या खटाटोपात ते पडले नाहीत. बिस्मार्कच्या जर्मनीत आरोग्यविम्याची योजना कशी अमलात येते हे पाहण्यासाठी लॉइड जॉर्जनी अर्थखात्यातील एका दुय्यम अधिकाऱ्याला जर्मनीत धाडले. तो जर्मनीचा दौरा करून फ्रान्समध्ये विश्रांती घेत असलेल्या लॉइड जॉर्जना भेटला आणि लगेच ही योजना जाहीर झाली. महायुद्धात त्यांनी अनेक सेनाधिकाऱ्यांचे बच्चरवही याच रीतीने संपुष्टात आणले. पार्लमेंटपेक्षाही लॉइड जॉर्ज जनतासंपर्क, जाहीर भाषणे यावर विशेष अवलंबून राहात. पार्लमेंटमध्ये ते अर्थातच प्रभावी वक्ते होते. वक्तृत्वाची त्यांना देणगीच होती. म्हणून त्यांच्याबाबत एकाने म्हटले आहे की लॉइड जॉर्ज बोलू लागले तर झाडावरचा पक्षीसुद्धा एकाग्रतेने ते ऐकू लागेल. जाहीर भाषणाप्रमाणेच लॉइड जॉर्ज यांची वृत्तपत्रांवर भिस्त होती आणि त्या काळात ब्रिटिश पत्रांच्या मालकांचे महत्त्व अतोनात असल्याने मालक आपल्या बाजूला ठेवून वृत्तपत्रे नियंत्रणाखाली ठेवण्याचे धोरण लॉइड जॉर्ज यांनी अवलंबले होते. परंतु पुढे नॉर्थक्लिफ हे त्यांच्या राजकारणात विशेष ढवळाढवळ करू लागले, तेव्हा त्यांनी नॉर्थक्लिफना बाजूलाही केले. लॉइड जॉर्ज यांनी पक्ष व पार्लमेंट यांची फारशी पर्वा केली नाही व अखेरीस त्यांचा यामुळे बळीही गेला. शिवाय सत्ता त्यांच्या डोक्यात शिरली. सन्मान, पदव्या देताना त्यांनी उघडउघड पैसा जमा केला. स्त्रियांच्या बाबतीत ते ढिले होते व त्यांचे त्यांच्या सेक्रेटरीबरोबरच प्रेमप्रकरण होते. चर्चिल यांना कनक व कांता यांच्याबाबतीत कसलाच दोष देता येत नव्हता आणि त्यांच्या कर्तृत्वाचा आवाकाही मोठा होता.

इतिहास, मेकॉले, कार्लाइल

टेलर यांच्या या संग्रहातील पहिलाच लेख इतिहासाबद्दल आहे. ते म्हणतात, इतिहास याच्या समानार्थी कथा असा शब्द अनेक युरोपियन भाषांत आहे, इंग्रजीत मात्र तसा तो नाही. त्यामुळे एखाद्याने प्रासादिक आकर्षक भाषेत इतिहासलेखन केले, की काही टीकाकार म्हणतात, काय आख्यान लावले आहे! आजकाल अनेक इतिहासकार समाजाचे विश्लेषण करतात, भावी काळातील घडामोडींचे अंदाज वर्तवतात वगैरे. पण हे सर्व जरी केले, तरीही 'पुढे काय झाले?' हा जो लहान मुलाचा प्रश्न गोष्ट ऐकत असताना विचारला जातो, तोच इतिहास वाचणाऱ्या वाचकाचाही असतो आणि इतिहासकाराने त्याचे उत्तर द्यायचे असते. टेलर स्वतः हे सूत्र कधी सोडत नाहीत. त्यामुळे त्यांचे इतिहासलेखन इतके चटकदार झाले आहे. पण गोष्ट सांगण्यासाठी ते ऐतिहासिक सत्याकडे पाठ फिरवतात असेही नव्हे. उलट अनेक गृहीतकृत्यांवर त्यांनी प्रहार केलेला दिसेल. पहिल्या महायुद्धाच्या वेळी ब्रिटिश राजकारणी लोक किती गैरशिस्त होते आणि अनेक बाबतीत ते किती उथळपणे वागत, याची अनेक उदाहरणे टेलर यांनी दिली आहेत.

मेकॉले आणि कार्लाइल यांच्यावरील तुलनात्मक लेख हा टेलर यांच्या लेखनाची सर्व वैशिष्ट्ये प्रगट करणारा ठरेल. टेलर म्हणतात, मेकॉले हा त्याच्या मतांमुळे, दृष्टिकोणामुळे मोठा इतिहासकार ठरला नाही, तर त्याच्या कथनशक्ती व कथनशैलीमुळे. त्याच्याइतक्या चटकदारपणे कोणी कथा सांगितल्या नाही. मेकॉलेच्या लिखाणात अनेकदा तत्कालीन राजकारण

डोकावते. त्यामुळे मेकॉले हा त्याच्या वर्ण्य व्यक्तींच्या अंतरंगात प्रवेश करू शकला नाही. त्याला ते राजकीय रंगभूमीवरील नट वाटत. त्यातच मेकॉलेने सत्ताधारी वर्गाचा इतिहास लिहिला. कार्लाइल याच्या उलट. तो जनतेतून आलेला एक मोठा भाषाप्रभु होता. पण यामुळे सामान्य जनतेबद्दल त्याला प्रेम होते असे नव्हे, उलट त्याला तिरस्कारच होता आणि तो एका उमराव घराण्यातील स्त्रीच्या प्रेमात पडला. पण जनतेच्या भावना, कल्पना यांची त्याला जाण होती. या जनतेचा विजय फ्रेंच क्रांतीच्या वेळी झालेला त्याला दिसला. कार्लाइलमध्ये अनेक परस्पर-विरोधी घटक होते. तो लांबलचक लिहिणाऱ्या लेखकांचा तिरस्कार करी, पण तो स्वतः अतिशय लांबलचक लिही. श्रमाचे त्याला आकर्षण होते, पण स्वतः तो काही काम करीत नसे. साध्य जीवनाचे तो गुणगान करी, परंतु श्रीमंतांच्या संबंधी लिखाण करून तो स्वतः श्रीमंत झाला होता. जे त्याला होता येत नव्हते त्याचा त्याला मोह होता आणि त्याचा संताप हा या दृष्टीने स्वतःविरुद्धच होता. या भावनेला फ्रेंच क्रांतीने वाट करून दिली.

कार्लाइल मेकॉलेपेक्षा अधिक प्रतिभावान असेल, पण कार्लाइलपेक्षा मेकॉलेला मूल्यविषयक कल्पना अधिक चांगली होती. मुख्यतः दुसऱ्याला वेगळे मत धारण करण्याचा अधिकार आहे, ही त्याची धारणा होती. टेलर म्हणतात, तुम्ही स्वतःच्या मताइतकाच दुसऱ्याच्या मताचा आदर करता की इतरांची मते पायदळी तुडवण्याइतका तुम्ही स्वतःबद्दल विश्वास बाळगता, हा खरा प्रश्न आहे. याचे उत्तर मेकॉलेने स्वातंत्र्य असे दिले, तर कार्लाइलने दडपशाही हे. एका दुष्ट अशा उद्दिष्टाला कार्लाइलच्या रूपाने प्रभावी:पुरस्कर्ता मिळाला, पण त्यामुळे या उद्दिष्टाचा दुष्टपणा कमी होत नाही.

२३-१-७७ ◉

बॅजट आणि 'इकॉनॉमिस्ट'

अर्थशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रविशारद, साहित्यिक, समीक्षक व बँकर अशा विविध नात्यांनी वॉल्टर बॅजट (वेब्स्टर कोशाने दिलेला उच्चार) हा प्रसिद्ध असून त्याच्या निधनाला २४ मार्च १९७७ रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली. त्याचा सासरा म्हणजे 'इकॉनॉमिस्ट' या विख्यात ब्रिटिश साप्ताहिकाचा संस्थापक जेम्स विल्सन. या इकॉनॉमिस्ट पत्राचा बॅजट हा १८६० साली संपादक झाला आणि १८७७ साली त्यांचे निधन होईपर्यंत तो त्याचा संपादक होता. त्याच्या निधनाला शंभर वर्षे झाली म्हणून 'इकॉनॉमिस्ट'ने बॅजटबद्दल आणि इकॉनॉमिस्टबद्दल दोन लेख प्रसिद्ध केले आहेत. इंग्रजी राज्यशास्त्रीय व अर्थशास्त्रीय वाङ्मयात बॅजट याच्या लिखाणाला विशेष महत्त्व असून त्याचे विचार आणि शैली यांचा प्रभाव अनेकांवर पडला आहे. बॅजट हा एक सिद्धहस्त लेखक होता आणि त्याने विपुल लिखाण केले. त्याच्या लिखाणाचे सहा सात लेखसंग्रह 'इकॉनॉमिस्ट'तर्फेच प्रसिद्ध झाले आहेत आणि 'द इंग्लिश कॉन्स्टिट्यूशन' हा त्याचा ग्रंथ अभिजात मानला जातो.

राजकारणी व्यक्तींना तत्कालीन समाजात लोकप्रियता मिळवून राहावे लागते. काही राजकारणी व्यक्ती कदाचित भावी पिढ्यांना आपले महत्त्व कळेल असे मानून राहात असतील. पण या भावी पिढ्यांचा तसा उपयोग काय? त्या उदयाला येण्यापूर्वी या राजकारणी व्यक्ती अस्तंगत झालेल्या असतात. पण लेखकांचे तसे नाही. ते भावी पिढ्यांवर विसंबून

राहू शकतात आणि लेखकाचे लिखाण भावी पिढ्यांनी वाचणे यापेक्षा दुसरा सन्मान कोणता ? बॅजट याचा असा सन्मान होत आला आहे. बॅजट हा साहित्याचा समीक्षक होता, पण त्यासाठी विद्यालयीन तयारी त्याने केली होती असे नव्हे. अर्थशास्त्र व इतिहास यांचाही तो तज्ज्ञ होता. पण त्यासाठीही त्याने विद्यालयीन पदवी वगैरे मिळवली नव्हती. त्याला अनेकविध विषयांत रस होता आणि त्याच्या बुद्धीची झेप विलक्षण होती. वास्तविक आपल्या वडलांच्याप्रमाणे तो कुटुंबाच्या नियंत्रणाखाली असलेल्या बँकेत शिरून तेथेच आयुष्य व्यतीत करायचा; पण तो तेथे फारसा रमला नाही. बॅजटला वाङ्मयाचा समीक्षक होण्याची महत्त्वाकांक्षा होती, म्हणून त्याने 'नॅशनल रिव्हचू' हे नियतकालिक सुरू केले होते. त्याचा मित्र हटन हा त्याचा सहकारी होता. या काळात बॅजटची 'इकॉनॉमिस्ट'चा संपादक व मालक जेम्स विल्सन याच्याशी ओळख झाली व त्याने बॅजटला इकानॉमिस्टमध्ये नियमित लिखाण करण्यास सांगितले. विल्सनच्या एका मुलीशी बॅजटचा पुढे विवाह झाला व विल्सन हिन्दुस्थानात सरकारी नोकरीवर आला असता बॅजट इकॉनॉमिस्टचा संचालक बनला. पुढे विल्सनच्या मृत्यूनंतर संपादकपद व मालकी ही दोन्ही त्याच्याकडे आली.

इकॉनॉमिस्टचा संपादक या नात्याने बॅजटचा समाजावर व तेव्हाच्या राजकारणावर बराच प्रभाव होता. त्याच्या वडिलांमुळे त्याला बँकिंगच्या क्षेत्राची चांगली ओळख होती आणि सासऱ्यामुळे राजकीय जीवनाची. त्याने इंग्लिश घटनेवर ग्रंथ लिहिला, त्याचप्रमाणे लंडनच्या नाणेबाजाराची माहिती देणारे पुस्तकही लिहिले. इकॉनॉमिस्टमधील त्याच्या विचारप्रवर्तक राजकीय व आर्थिक लिखाणाचा परिणाम असा होई, की राजकीय नेते त्याला विश्वासात घेण्याचा व ठेवण्याचा सतत प्रयत्न करीत. त्यामुळे हे लिखाण विशेष माहितीपूर्ण होत असे. बॅजटचे इकॉनॉमिस्टमधील आर्थिक प्रश्नांसंबंधीचे लिखाण ग्लॅडस्टनप्रभृती मंत्री नियमित वाचीत. किंबहुना बॅजट हा अनधिकृत अर्थमंत्री म्हणूनच ओळखला जात होता.

ब्रिटिश राज्यघटनेवरील त्याचा ग्रंथ हा अभिजात मानला जातो आणि मिलने प्रातिनिधिक सरकारवर लिहिलेल्या ग्रंथापेक्षा तो आजही प्रमाण मानण्यात येतो. तसे पाहिल्यास ब्रिटिश घटना ही लिखित नाही. काही कायदे आणि मुख्यतः परंपरा यामुळे ब्रिटिश राज्यपद्धतीत बदल होत आले आहेत. ब्रिटिश राज्यपद्धतीचे प्रमुख आधार म्हणजे राजघराणे, मंत्रिमंडळ, उमरावसभा व लोकसभा. या सर्वांचे महत्त्व व उपयुक्तता यांची चिकित्सा बॅजट याने शैलीदार भाषेत केली आहे. या राज्यपद्धतीच्या अंतरंगाचा वेध घेण्यात त्याची विश्लेषणबुद्धी प्रत्ययाला येते आणि आजही अनेकदा त्याच्या या ग्रंथाचा आधार घेतला जातो. ब्रिटिश राज्यशास्त्रीय विचारांवर बॅजटचा प्रभाव इतका आहे, की रिचर्ड क्रॉसमन यांनाही राज्यघटनेवरील त्याच्या ग्रंथाला प्रस्तावना लिहावीशी वाटली. फॉन्टाना प्रकाशनामार्फत प्रसिद्ध झालेल्या आवृत्तीला क्रॉसमन यांनी लिहिलेली प्रस्तावना ही ग्रंथाप्रमाणेच उल्लेखनीय ठरेल. क्रॉसमन यांनी या प्रस्तावनेत मिल आणि बॅजट यांच्या विचारांतील भेद स्पष्ट केला आहे. मिलपेक्षा बॅजटने मंत्रिमंडळाचे महत्त्व जाणले होते. आणि मंत्रिमंडळाचा विचारच न केल्याबद्दल मिल हा बॅजटच्या टीकेचा विषय झाला होता. तथापि मिल व बॅजट या दोघांनाही १८३२ च्या कायद्याने मध्यमवर्गीयांच्या हाती सत्ता आली याचे समाधान होते. पण उदारमतवादी मिल काय की बॅजट काय, यांना मध्यमवर्गापलीकडे सामान्य लोकांकडे सत्तांतर होऊ नये असे वाटे. बॅजटने स्पष्टच म्हटले आहे, की कनिष्ठ वर्गाची एकजूट ही एक आपत्ती ठरेल. ही एकजूट कायम झाली तर शासनावर त्यांचा प्रभाव राहील आणि हा प्रभाव अज्ञानाचा असेल.

अर्थात बॅजट यांच्यासाठी कालप्रवाह थांबला नाही. त्यांच्या मृत्यूनंतर थोड्याच वर्षांत सामान्य लोकांकडे सत्ता येण्यास सुरुवात झाली व दुसऱ्या महायुद्धानंतर मजूर पक्ष व मजूर संघटना यांचा प्रभाव जबरदस्त वाढला. तरीही या मजूर पक्षाचे एक पुढारी क्रॉसमन यांना या काळातही बॅजट यांच्या घटनाविषयक ग्रंथाचा विचार करावसा वाटतो; कारण या निमित्ताने राज्यशास्त्रविषयक काही मूलभूत विचार त्यात प्रगट झाले आहेत. बॅजट यांच्या नियतकालिक लिखाणालाही महत्त्व प्राप्त झाले ते या वैचारिक अधिष्ठानामुळे.

१०-४-७७ ⊙

वृत्तपत्र सम्राट बीव्हरब्रूक

इंग्लंडमधील वृत्तपत्र सम्राट बीव्हरब्रूक हे अतिशय ढंगदार, मनस्वी गृहस्थ होते आणि ए. जी. पी. टेलर हे रंगतदार लेखक आहेत. असा विषय व असा लेखक यांची गाठ पडल्यावर नऊशे पानांचे चरित्रही अतिशय वाचनीय झाले तर नवल काय? बीव्हरब्रूक यांचे हे चरित्र पेंग्विनमध्ये मिळते. या ग्रंथात ज्या तळटीपा आहेत त्या पाहिल्या तरी टेलर यांचा साक्षेपी स्वभाव लक्षात येतो. बीव्हरब्रूक यांच्या काही विधानांना कसलाही आधार नाही, असे या तळटीपांतून टेलर दाखवून देतात. बीव्हरब्रूक हे टेलर यांचे जवळचे मित्र. पण मित्र म्हणून ते सर्वच गोष्टींचे समर्थन करीत नाहीत.

बीव्हरब्रूक हे मूळचे कॅनेडियन. ते काही मूळचे श्रीमंत नव्हेत, पण त्यांना पैसे कमावण्याची जणू उपजतच कला होती. ते लहानसहान व्यापार, शेअरबाजारात सट्टेबाजी करीत करीत थोड्याच वर्षांत लखपती झाले. इंग्लंडमध्ये येऊन त्यांनी काही कंपन्यांचे शेअर्स मिळवले, कामे मिळवली आणि पुढे डेली एक्स्प्रेस, इव्हनिंग स्टॅन्डर्ड यांचे शेअर्स मोठ्या प्रमाणावर खरेदी करून ते त्यांचे नियंत्रक बनले. याखेरीज त्यांचे इतर उद्योग, शेअरबाजारात तेजीमंदीही जवळजवळ जन्मभर चालली. इंग्लंडमध्ये ते आले तेच कोट्यधीश म्हणून. तेथे त्यांची बोनर लॉ, लॉईड जॉर्ज, चर्चिल, ब्रेन्डन ब्रॅकन इत्यादींशी दोस्ती जमली. पुढे तर लॉईड जॉर्जऐवजी बोनर लॉ हे पंतप्रधान व्हावेत म्हणून त्यांनी अनेक उलाढाली केल्या. त्या यशस्वी झाल्या नाहीत. पण बीव्हरब्रूक हे ब्रिटनच्या

राजकारणातील एक प्रस्थच होऊन बसले.

डेली एक्स्प्रेस व इव्हनिंग स्टॅन्डर्ड त्यांच्या हाती आल्यावर कार्यक्षम व्यवस्थापन, कल्पक संपादकीय वर्ग व भरपूर भांडवल यांच्या जोरावर त्यांनी या पत्रांचा खप प्रचंड प्रमाणावर वाढवला. खिश्चन्सन यांच्यासारखा संपादक मिळाला आणि डेली एक्स्प्रेसचे मथळेसुद्धा गाजू लागले. 'हेडलाइन्स ऑल माय लाइफ' हे खिश्चन्सन यांचे पुस्तक त्यांच्या कर्तबगारीची कल्पना देणारे आहे. डेली एक्स्प्रेसचा रोजचा खप चाळीस लाखाच्या घरात गेला. अनेक नवे वाद, विषय हाताळले गेले आणि मोठमोठे लेखक या पत्रांशी संबंधित होते. रुडयार्ड किपलिंग, अर्नोल्ड बेनेट हे तर बीव्हरब्रूक यांचे दोस्तच होते.

वृत्तपत्र-मालक

बीव्हरब्रूक हे ब्रिटनमधील एक यशस्वी वृत्तपत्र-सम्राट मानले जात. आणि सम्राटाच्या लहरी स्वभावाचा प्रत्यय त्यांच्या पत्रकारांना नेहमी येत असे. ते कोठेही असले तरी कोठून केव्हा फोन करतील याचा नेम नसे. छोट्या जाहिराती किती प्रसिद्ध झाल्या, दुसऱ्या पत्रात त्या किती आहेत येथपासून निरनिराळी सदरे, लेख, अग्रलेख यापर्यंत त्याचे लक्ष असे आणि त्यांची हुकमत चाले. ब्रिटिश साम्राज्य हा त्यांच्या भक्तीचा विषय होता. साम्राज्यसत्ता म्हणून ब्रिटनला व्यापार वगैरे बाबतीत सवलती मिळाल्या पाहिजेत ही त्यांची कल्पना. यामुळेच चर्चिल वगैरेंशी त्यांचे सख्य होते. आपल्या वृत्तपत्रांवर त्यांचे सर्वस्वी वर्चस्व असे. यामुळे एखाद्याचा पुरस्कार त्यांनी करायचे ठरवले की तसा प्रचार चालू होई आणि विरोध करायचे ठरवले तर विरोधी प्रचाराचा धडाका चालू होई. त्यांच्यावर टीका केलेल्यांची ते कधी गय करीत नसत. त्यांचे संपादकीय मंडळ एक प्रकारे धाकात वावरे. पण आपल्या पत्रकारांचे कौतुकही ते करीत.

एकाने घर खरेदी करण्यासाठी कर्ज मागितले. बीव्हरब्रूक म्हणाले, 'डेली एक्स्प्रेस कंपनी कोणाला कर्ज देत नाही.' पण नंतर त्यांनी स्वतः घर खरेदी करून ते भेट म्हणून त्या कर्ज मागणाऱ्या पत्रकाराला देऊन टाकले. आपल्या ज्येष्ठ पत्रकारांना त्यांनी डेली एक्स्प्रेसचे काही हजार पौंडांचे शेअर्स दिले होते. त्यांची मते साम्राज्यवादी असली तरी स्टॅन्डर्डमध्ये त्यांनी डेव्हीड लो या जगप्रसिद्ध व्यंगचित्रकाराला नोकरीस ठेवले आणि त्याच्या उदारमतवादी भूमिकेला पूर्ण वाव दिला. डेव्हीड लो खुद्द बीव्हरब्रूक यांचेही व्यंगचित्र काढीत असे, मग चर्चिल वगैरे त्याच्या कचाट्यातून कसे सुटतील? परमेश्वराने सहा दिवस सृष्टी निर्माण केली व सातव्या दिवशी सुटी घेतली असे खिस्ती पुराण म्हणते. बीव्हरब्रूक म्हणत परमेश्वरापेक्षाही अधिक काम करण्याची ज्याची तयारी असेल त्यानेच पत्रव्यवसायात पडावे. अशांची ते फार कदर करीत. तथापि त्यांच्या वर्चस्वामुळे बीव्हरब्रूक हे नाव ब्रिटिश पत्रसृष्टीत एक हडेलपप्पी मालक म्हणून ओळखले जात होते.

कर्तृत्व व मित्र

बीव्हरब्रूक हे अत्यंत धडाडीचे गृहस्थ होते. दुसऱ्या युद्धात चर्चिल यांनी त्यांना विमानांच्या निर्मितीसाठी मंत्री नेमले. त्यांनी थोड्याच दिवसांत ब्रिटनचे हवाई दल सुसज्ज केले. ज्याला बॅटल ऑफ इंग्लंड–इंग्लंडची लढाई–म्हणतात त्या काळात जर्मनीची विमाने इंग्लंडवर आग ओकीत होती, पण बरीच पाडली जात. ब्रिटिश हवाई दलाने तेव्हा जे सामर्थ्य दाखवले त्यात बीव्हरब्रूक यांच्या कर्तृत्वाचा मोठा वाटा होता. रूझवेल्ट व स्टालीन या दोघांशीही त्यांची चांगलीच गट्टी जमली होती. एकदा रूझवेल्ट यांना भेटण्यास चर्चिल व बीव्हरब्रूक गेले तेव्हा चर्चिल यांच्या लांबलचक भाषणबाजीचा रूझवेल्ट यांना कंटाळा आला. मध्येच उठून त्यांनी बीव्हरब्रूक यांना दुसऱ्या खोलीत नेले आणि दोघे रूझवेल्ट यांचा पोस्टाच्या तिकिटांचा संग्रह पाहात बसले! दुसरी आघाडी सुरू करण्याचा आग्रह धरणारे बीव्हरब्रूक असल्याने स्टालीनला त्यांच्याबद्दल आत्मीयता होती. बीव्हरब्रूक मॉस्कोला गेले तेव्हा स्ट्रॅफर्ड क्रिप्स हे ब्रिटिश राजदूत होते, पण त्यांना बाजूला सारून त्यांनी स्टालीनशी वाटाघाटी केल्या आणि रशियाला युध्दसाहित्य मोठ्या प्रमाणावर देण्याचा करार केला.

बीव्हरब्रूक यांची राजकीय मते ही साम्राज्यवादी, पण त्यांच्या मित्रांत

चर्चिल होते त्याचप्रमाणे जहाल मजूर पक्षीय वेव्हन हेही होते. गेट-स्केलही त्यांचा पाहुणचार घेत. मायकेल फूट हे सध्याचे जहाल मजूर-पक्षीय मंत्री बीव्हरब्रूक यांच्या ईव्हनिंग स्टॅन्डर्डमध्ये सदर चालवीत. वेव्हन यांचा बंडखोर स्वभाव व चटकदार संभाषण यामुळे बीव्हरब्रूक यांचे व त्यांचे विशेष सख्य जमले होते. त्यांचे खरे प्रेम मात्र बोनर लॉ यांच्यावर होते व नंतर चर्चिल यांच्यावर. ज्यांना मित्र मानले त्यांना त्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अत्यंत सढळपणे मदत केली. त्यांच्या नावे शेअर्स घ्यावे व भाव वाढले की ते विकून पैसे मित्राच्या नावे करावे, असे तर त्यांनी अनेकांच्या बाबतीत केले. शेवटी शेवटी चर्चिल तासन तास न बोलता बसत, त्यावेळी बीव्हरब्रूक त्यांना अनेक विनोदी गोष्टी ऐकवून त्यांचे मनोरंजन करीत. आणि सुवेझच्या गोंधळानंतर ईडन यांनी राजीनामा दिला तेव्हा बीव्हरब्रूक यांचे निवासस्थान ईडन पतिपत्नींना सदैव उघडे असे. अशा या मनस्वी व्यक्तीचे हे चरित्र अतिशय सरस झाले आहे.

युद्धातील हेरगिरी

गेल्या महायुद्धासंबंधी असंख्य ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत व होत आहेत. निरनिराळ्या ग्रंथात निरनिराळ्या व्यक्तींच्या कामगिरीसंबंधी बरेच लिहिले आहे. पण या सर्वांचा पाया उखडला जाईल असे पुस्तक प्रसिद्ध झाले असून बी. बी. सी. वरून त्याचे परीक्षण झाले आणि 'लिसनर'ने ते प्रसिद्ध केले. या पुस्तकाचे नाव आहे 'द अल्ट्रा सिक्रेट' व लेखक आहेत विन्टरबोथॅम. ते स्वतः गुप्तहेर खात्यात वरिष्ठ अधिकारी होते. इ.स. साली ब्रिटिश हेरखात्याने पोलंडच्या मदतीने एक यंत्र मिळवले होते. ते जर्मनीत तयार झालेले होते. गुप्तसंदेशवाहक यंत्राची जी गुप्त लिपी असते ती ओळखली की, शत्रूच्या बातम्या कळतात. यासाठी जर्मनीने वेगळेच संदेशवाहक यंत्र तयार केले. त्याद्वारे गुप्त लिपी केव्हाही बदलता येत असे आणि ज्याला या यंत्रणेची कळ माहीत असेल त्यालाच फक्त गुप्त संदेशाचा अर्थ कळत असे. इंग्लंडने जर्मनीचे हे यंत्रच मिळवल्यामुळे जर्मनीचे अनेक गुप्त संदेश ब्रिटिश सरकारला, चर्चिल यांना माहीत असत. कैरोवर मुसंडी मारण्यापूर्वी अल्मा हल्फावर स्वारी करण्याचे रोमेलने ठरवले. त्यावेळी जी व्यूहरचना करण्याची योजना रोमेलने आखली तिचा सर्व तपशील याच यंत्राच्या सहाय्यामुळे मॉंटगोमरीस अगोदरच कळला होता व त्यामुळे तो रोमेलविरुद्ध पहिली लढाई जिंकू शकला. ४० सालात या यंत्राच्या द्वारे जी गुप्तहेरगिरीची यंत्रणा उभी केली गेली ती पुढे वाढत गेली. या यंत्रणेची माहिती चर्चिल व आणखी अगदी निवडक व्यक्तींनाच होती, इंग्लंडवर हिटलर स्वारी करणार होता, पण ते बेत त्याने १७ सप्टेंबर ४० ला सोडला. त्याची बातमी विन्टरबोथॅम यांनी चर्चिल यांना अगोदर दिली होती. या रीतीने चर्चिल यांना हिटलरच्या खलबतखान्यात काय चालले होते ते लगोलग कळत असे. हे सर्व वाचल्यावर मॉंटगोमरी वगैरेंच्या पराक्रमात अभूतपूर्वपणा किती याबद्दल फेरविचार करण्याची गरज निर्माण होते.

२-३-७५ ◉

आणखी एक वृत्तपत्र-सम्राट

साठी आली की, बहुतेकजण आपले व्यवहार आवरते घेऊ लागतात. गेल्या आठवड्यात निधन पावलेले वृत्तपत्र-सम्राट लॉर्ड थॉमसन यांच्या बाबतीत असे झाले नाही. साठीनंतर त्यांनी वृत्तपत्रीय जगतातील आपला पसारा अधिक वाढवला. म्हणून त्यांनी आपल्या आत्मकथनाला 'साठ वर्षांनंतर' 'आफ्टर आय वॉज सिक्स्टी' असे नाव दिले आहे. साठीच्या पूर्वीही कॅनडा व अमेरिकेमध्ये त्यांनी अनेक वृत्तपत्रे विकत घेतली आणि यशस्वी केली. वृत्तपत्रांप्रमाणेच दूरचित्रवाणी केन्द्रेही त्यांनी यशस्वीरीत्या चालवली होती. पण लॉर्ड थॉमसन हे जगविख्यात झाले आणि लॉर्डही बनले ते त्यांनी इंग्लंडमध्ये वृत्तपत्रीय क्षेत्रात पाऊल ठेवले तेव्हा. इंग्लंडमध्ये दोन कॅनेडियन वृत्तपत्र सम्राट झाले. एक लॉर्ड बीव्हरब्रूक आणि दुसरे लॉर्ड थॉमसन. लॉर्ड बीव्हरब्रूक यांचे चरित्र सुप्रसिद्ध लेखक व इतिहासकार श्री. ए. जी. पी. टेलर यांनी लिहिले आहे. बीव्हरब्रूक व टेलर यांचा गाढ स्नेह होता. थॉमसन यांना कोणी टेलर यांच्यासारखा लेखकमित्र मिळाला होता की नाही हे समजू शकले नाही.

अर्थात बीव्हरब्रूक आणि लॉर्ड थॉमसन यांच्यात फरक बराच आहे. दोघेही प्रचंड उद्योग करणारे आणि वृत्तपत्रव्यवसाय हा व्यवसाय म्हणून कसा यशस्वी करावा यांचे जाणकार खरे, पण यापलीकडे दोघात फारसे साम्य नाही. थॉमसन यांचा त्यांच्या व्यवसायामुळे देशोदेशींच्या अग्रेसर पुढाऱ्यांशी चांगला स्नेह जमला होता. क्रूश्चेव्ह आणि चाऊ एन लाय यांच्याशी त्यांचा स्नेह होता व त्यांच्या मुलाखतीची हकीगत थॉमसन यांनी आपल्या पुस्तकात दिली आहे. पण यापलीकडे त्यांनी राजकारणात रस घेतला नाही. उल्लेखनीय गोष्ट अशी, की युद्धकाळात चर्चिल यांच्या मंत्रिमंडळातील मंत्री व चर्चिल यांचे स्नेही म्हणून बीव्हरब्रूक यांचे स्टालीनबरोबर चांगले जमले होते. इतके की ते वाजवीपेक्षा फाजील प्रमाणात रशियाची बाजू मांडतात, असा चर्चिल यांचा ग्रहही झाला होता. बीव्हरब्रूक यांनी स्टालिनचा विश्वास संपादन केला होता, तर थॉमसन यांनी क्रूश्चेव्ह यांचा. पण त्यात राजकारण नव्हते, व्यवसायच अधिक होता. बीव्हरब्रूक यांना राजकीय आकांक्षा होती. लॉईड जॉर्ज, बोनार लॉ, चर्चिल इत्यादींच्या राजकीय उलाढालीत भाग घेणे, राजकीय पुढाऱ्यांच्या बैठका घडवून आणणे असे अनेक उद्योग बीव्हरब्रूक करीत. लॉर्ड थॉमसन यांनी हे कधी केले नाही. त्यांनी आपले वृत्तपत्रीय साम्राज्य वाढवून शंभरापेक्षा अधिक पत्रे व नियतकालिके ताब्यात आणली आणि कॅनडा व ब्रिटनमधील टेलिव्हिजन कंपन्याही ताब्यात घेतल्या. बीव्हरब्रूक यांच्यावर त्यांनी ताण केली ती 'लंडन टाइम्स' व 'संडे टाइम्स' या दोन प्रतिष्ठित पत्रांची मालकी मिळवून. बीव्हरब्रूक यांचा 'डेली एक्स्प्रेस' वा 'संडे एक्स्प्रेस' यांनी खपाच्या बाबतीत 'टाइम्स' व 'संडे टाइम्स' यांना कधीच जवळ येऊ दिले नाही; पण डेली व संडे एक्स्प्रेसला टाइम्स व संडे टाइम्सची प्रतिष्ठाही मिळाली नाही. थॉमसन फौन्डेशन स्थापन करून थॉमसन यांनी राष्ट्रकुलातील पत्रकारांच्या प्रशिक्षणाची योजना राबवली. तसे प्रतिष्ठान बीव्हरब्रूक यांनी स्थापन केले नव्हते. बीव्हरब्रूक व थॉमसन यांच्यात आणखी एक महत्त्वाचा फरक आहे; तो हा की, बीव्हरब्रूक पहिल्या पानाच्या मथळ्यापासून संपादकीयापर्यंत सतत ढवळाढवळ करीत; आपले राजकीय सूडही ते एक्स्प्रेसमधून उगवून घेत. थॉमसन यांचे वर्तन या उलट होते. त्यांनी आपल्या संपादकांना स्थानिक परिस्थितीशी जमवून घ्या आणि स्थानिक लोकांचे मुखपत्र बनवा, असाच दंडक घालून दिला होता. त्यामुळे त्यांच्या अनेकविध वृत्तपत्रांतून अनेकविध मते प्रदर्शित होत. आपल्या पत्रांचा खप वाढण्याला याचा उपयोग होत असल्याचा त्यांचा अनुभव होता. लॉर्ड थॉमसन यांचे लक्ष हिशेबाच्या ताळेबंदाकडे असे. किंबहुना छंद कोणता, असे विचारले

असता ताळेबंद (बॅलन्स-शीट) वाचणे असे त्यांनी उत्तर दिले होते. राजकीय क्षेत्रात ढवळाढवळ न करता वृत्तपत्र व्यवसायातच स्वतःला त्यांनी इतके गाडून घेतले होते, की त्यांना लॉर्ड ही पदवी देण्याचे ठरले तेव्हा लॉर्ड ऑफ द फ्लीट अशी पदवी त्यांनी निवडली. फ्लीट स्ट्रीट हा लंडनच्या वृत्तपत्रांचा विभाग. त्यावरूनच त्यांनी या पदवीची निवड केली. टाइम्स व संडे टाइम्सच्या कचेऱ्या मात्र या रस्त्यावर नव्हत्या व नाहीत. या पदवीच्या संदर्भात एक नमूद करण्यासारखी घटना आहे. रॉय थॉमसन यांना लॉर्ड ही पदवी हवी होती. पण कॅनेडियन व कॅनडाच्या सरकारने आपल्या नागरिकांना ब्रिटिश पदव्या घेण्यास कायद्याने बंदी घातलेली. तेव्हा थॉमसन ब्रिटिश नागरिक बनले. पण दुसरी अडचण आली. तेव्हा मॅकमिलन पंतप्रधान जाऊन अलेक हचूम हे त्या पदावर आले होते. त्या-वेळी संडे टाइम्सचे प्रमुख संपादक हॅमिल्टन यांना हचूम यांच्या काही धोरणावरून त्यांच्यावर टीका करावयाची होती. ती केली तर पदवीचे काय ? हा प्रश्न होता. हॅमिल्टन यांनी थॉमसन यांच्यापुढे हा प्रश्न काढला तेव्हा थॉमसन म्हणाले. " तुम्हाला पाहिजे ते लिहिण्याची मुभा आहे. " हॅमिल्टन यांनी टीकात्मक संपादकीय लिहिले. पण हचूम यांनी थॉमसन यांना लॉर्ड ही पदवी देण्यास आडकाठी आणली नाही. हचूम, थॉमसन व हॅमिल्टन या तिघांनाही हे भूषणावह.

इंग्लंडमध्ये

लॉर्ड थॉमसन यांचा इंग्लंडच्या वृत्तपत्रीय क्षेत्रात प्रवेश झाला तो स्कॉटलंडमधील स्कॉट्समन व इव्हिनिंग डिस्पॅच या पत्रांची मालकी मिळ-वून. आर्थिकदृष्ट्या बुडत चाललेली ही पत्रे थॉमसन यांनी मिळवली आणि रात्रंदिवस खपून ती यशस्वी केली. ही मालकी त्यांच्याकडे ५३ साली आली. स्कॉट्समनमध्ये त्यांनी कॉमिक्स देण्याची कल्पना बोलून दाखवताच जुन्या मालकांना धक्का बसला, तर संपादकाने तुमच्या सूचना कोणत्या असे विचारले असता स्कॉटिश जनतेच्या भावनांचे प्रति-निधित्व करून वृत्तपत्र आर्थिकदृष्ट्या यशस्वी करा. यापलीकडे काहीही नाही म्हणताच संपादकालाही धक्का बसला. कोणतेही वृत्तपत्र विकत घेताना त्याची आर्थिक बाजू लक्षात घेऊन व्यावसायिकदृष्ट्या ते कसे यशस्वी होईल याची सर्व काळजी थॉमसन घेत असतात. जाहिरातींचा महसूल कसा वाढेल यासाठी त्यांनी अनेक मार्ग शोधले. स्कॉट्समननंतर केम्स्ले गटाची वृत्तपत्रे त्यांच्याकडे आली. यामुळे इंग्लंड व वेल्समध्ये त्यांचे बस्तान बसले. यात संडे टाइम्स त्यांच्या हाती आला. आज खप व प्रतिष्ठा या दृष्टीने संडे टाइम्स हे एक अग्रेसर पत्र बनले आहे. आपल्या प्रत्येक पत्रात त्यांनी अत्यंत वाकबगार माणसे नेमली. त्यांना अनेकविध सोयी सवलती मिळतात; पण त्याचबरोबर व्यवसाय सुधारण्यासाठी त्यांना जीवापाड मेहनत करावी लागते. संडे टाइम्सबरोबर एक सप्तरंगी पुरवणी दिली जाते. थॉमसन यांच्या प्रेरणेने ती बार वर्षांपूर्वी सुरू झाली, तेव्हा हा खर्चिक प्रयोग कसा यशस्वी होणार अस प्रश्न पडला. पण आज तो पूर्णतः यशस्वी झाला आहे. या पुरवणीला वर्ष झाले तेव्हा लॉर्ड थॉमसन यांनी एक विलक्षण कल्पना काढली. त्यांनी १६८ ब्रिटिश उद्योगपतींना स्वतःच्या खर्चाने रशियात नेले. रशियन सरकारने त्यांना निरनिराळ्या ठिकाणी फिरवले. मॉस्कोत क्रुशेव यांनी लॉर्ड थॉमसन यांना भेटीला बोलावले व बराच वेळ अनेक प्रश्नांची चर्चा केली. याची जगभर प्रचंड प्रसिद्धी झाली. संडे टाइम्सचा या उद्योगपतींच्या प्रवासावर खर्च झाला होता त्यापेक्षा कितीतरी पटीने या जाहिरातीने वसुली झाली आणि संडे टाइम्सच्या रंगीत पुरवणीचा खप तेव्हापासून झपाट्याने वाढत गेला.

' टाइम्स'ची जोखीम

लॉर्ड थॉमसन चीनला गेले तेव्हा चाऊ एन लाय यांनी त्यांचे चांगले स्वागत केले. आपली दूरचित्रवाणी केन्द्रे म्हणजे नोटा छापण्याचा कारखाना असे लॉर्ड थॉमसन यांनी एकदा थट्टेने म्हटले होते. चाऊ एन लाय यांनी बरोबर याची त्यांना आठवण करून दिली. रशिया हा अमेरिकेपेक्षाही आपल्याला दूरचा आहे असे टाम मत चाऊ एन लाय यांनी बोलून दाखवल्याचे लॉर्ड थॉमसन यांनी आपल्या पुस्तकात नमूद केले आहे. दूरचित्रवाणीचा प्रयोग करताना आपली मदत घ्यावी असे पं.

नेहरूंनी आपल्या अधिकाऱ्यांना सांगितल्याचा उल्लेख लॉर्ड थॉमसन यांनी केला आहे. त्यांच्या ग्लासगोच्या दूरचित्रवाणी केन्द्राची कथा त्यांनी ऐकवली आहे. या केन्द्रासाठी शेअर खरेदी करा म्हणून त्यांनी इंग्लंडमधील अनेक नामवंतांना लिहिले होते, पण त्यांना फारसा प्रतिसाद मिळाला नाही. तथापि लॉर्ड थॉमसन यांनी धाडस केले. थोड्याच दिवसात त्यांना पैशाचा ओघ सुरू झाला आणि ज्यांनी शेअर्स घेतले नव्हते त्यांच्यावर पस्तावण्याची पाळी आली. इंग्लंडच्या उत्तर समुद्रातून तेल काढण्याचा उद्योग चालू झाला तेव्हा खाजगी कंपन्यांना पैसे गुंतवण्याचे आवाहन केले गेले. थॉमसन यांनी त्याला प्रतिसाद दिला आणि यातूनही त्यांना बराच पैसा मिळत असतो.

तथापि त्यांच्या पैशाला प्रचंड गळती लावणारी जोखीम त्यांनी स्वीकारली व ती म्हणजे लंडन टाइम्सची मालकी. लॉर्ड थॉमसन यांच्याकडे अनेक पत्रे आली तरी लंडनमधील राष्ट्रव्यापी असे दैनिक त्यांच्यापाशी नव्हते. पण लंडन टाइम्स बुडतीत निघाल्यावर लॉर्ड थॉमसन यांनी पुढाकार घेतला. हे वृत्तपत्र म्हणजे एक संस्थाच आहे. त्याचा खप कमी, पण प्रतिष्ठा फार. असे पत्र हाती याचे यात लॉर्ड थॉमसन यांचा गौरव होता. पण त्यासाठी लाखो पौंड खर्च करण्याची किंमत त्यांना द्यावी लागली व आता त्यांच्या मुलाला ती द्यावी लागेल. लंडन टाइम्स घेताना विश्वस्त मंडळ स्थापन करण्याची अट लॉर्ड थॉमसन यांना मान्य करावी लागली. संपादकीय स्वातंत्र्य अबाधित राहील व टाइम्स बंद करणार नाही हे सुद्धा बंधन त्यांनी स्वीकारले. गेल्या दहाअकरा वर्षात टाइम्सची आर्थिक तूट भरून काढण्यासाठी लॉर्ड थॉमसन यांचे लाखो पौंड खर्च झाले, पण त्यांनी ते केले. अर्थात टाइम्स गटातील शैक्षणिक व साहित्यविषयक पुरवण्यांमुळे एकंदर गटाला तोटा कमी येतो. पण टाइम्सचा तोटा भरून काढणे सोपे नाही. ही जबाबदारी लॉर्ड थॉमसनच घेऊ शकत होते. म्हणून वृत्तपत्र-सम्राटपदाचा उपभोग त्यांनी घेतला खरा, परंतु या पदाबरोबर त्यांना फार मोठी जोखीम उचलावी लागली.

१५-८-७६ ◉

ऑब्झर्व्हरचे संपादक

संडे ऑब्झर्व्हर हे समतोल विचाराचे साप्ताहिक. त्याच्या संपादक व मालक वर्गातील एक श्री. डेव्हीड ॲस्टर हे सत्तावीस वर्षे या पत्राचे संपादकपद भूषवून सेवानिवृत्त झाले. ॲस्टर हे मालक वर्गातले होते म्हणून संपादक झाले नव्हते, हे त्यांच्या सत्तावीस वर्षांच्या कारकिर्दीवरून त्यांनी सिद्ध केले. तसे पाहिल्यास ऑब्झर्व्हर हा दीर्घकालीन संपादकीय कारकिर्दीबद्दल प्रसिद्ध. ॲस्टर यांच्या पूर्वीचे गार्व्हिन हे तीस वर्षे संपादक होते. आपल्या अखेरच्या दिवसात ॲस्टर यांना एक कठोर निर्णय घ्यावा लागला. तो त्यांना मालक या नात्याने घेणे भाग होते. हा निर्णय म्हणजे ऑब्झर्व्हर हा आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण ठेवण्यासाठी नोकरवर्ग कमी करणे. पाश्चात्य देशात वृत्तपत्रांचा खर्च इतका वाढला आहे, की त्यात काटकसर केल्याखेरीज जगणे अशक्य. ब्रिटनमध्ये वृत्तपत्रक्षेत्रास लागलेला रोग म्हणजे वाजवीपेक्षा फाजील कर्मचारीवर्ग. अमेरिकेत व प. जर्मनीत अनेक वृतपत्रांनी अत्यंत आधुनिक यंत्रसामग्री वापरून वाढीव कर्मचारी वर्ग काढून टाकला. ब्रिटनमध्ये याला विरोध होत होता. पण ऑब्झर्व्हरने मार्ग दाखवला व तीस टक्के नोकरवर्ग कमी केला. तो पस्तीस टक्क्यांनी कमी करणे जरूर होते, पण तीस टक्क्यांवर तडजोड झाली. डेव्हीड ॲस्टर यांनी ही तडजोड घडवून आणली. आता सेवानिवृत्त होत असता त्यांनी स्वतःलाच काही प्रश्न विचारले आहेत व त्यांची उत्तरे दिली आहेत. ही मुलाखत अशा अभिनव स्वरूपात प्रसिद्ध झाली आहे.

ॲस्टर यांनी या मुलाखतीत दिलेली माहिती उद्बोधक ठरेल. ते

म्हणतात गार्व्हिन यांच्या कारकिर्दीत 'ऑब्झर्व्हर' हा टोरी पक्षाचे पत्र बनला होता. पण ॲस्टर यांनी त्याला अपक्ष वा स्वतंत्र बनवला. बहुतेक महत्त्वाची वृत्तपत्रे पक्षाला बांधून राहू इच्छीत नाहीत. ॲस्टर यांनी ऑब्झर्व्हरच्या सत्तावीस वर्षांच्या संपादकीय कारकिर्दीतील ऋणनिर्देश केला आहे. अनेक लेखक, विचारवंत यांच्याकडून निरनिराळ्या कल्पना मिळाल्या आणि नवी नवी सदरे, विषय हाताळले गेले. काही लेखक, विचारवंत जोडणे हे प्रत्येक पत्राला उपयुक्त असते. ॲस्टर यांनी कोण जमा केले? जॉर्ज ऑर्वेल, आर्थर कोस्लर, आयझॅक डॉयश्चर, ॲलस्टर बुकन, एडवर्ड क्रॅन्कशॉ इत्यादी. यांनी आपल्या ज्ञानाचा, लेखणीचा फायदा ऑब्झर्व्हरला करून दिला. भारतात ज्याप्रमाणे दीर्घकाळ ब्रिटिश सत्ता राहिली त्याप्रमाणे आफ्रिकेत ती राहू नये, असे ऑर्वेल यांचे मत होते आणि ऑब्झर्व्हरने याचा पुरस्कार केला. त्याचप्रमाणे ग्रंथपरीक्षणात गटबाजी येऊ नये याकरिता समीक्षक वारंवार बदलण्याची सूचना ऑर्वेल यांचीच होती. ॲस्टर यांनी ती पाळली. न्यू स्टेटसमन या डाव्या विचारसरणीच्या साप्ताहिकाने स्टालिनच्या नरमेधाकडे काणाडोळा केला होता. ऑर्वेल यांच्यामुळे ऑब्झर्व्हरमधून यावर टीका होत असे. फाशीच्या शिक्षेविरुद्धची मोहीम आर्थर कोस्लर यांच्यानंतर ॲस्टर यांनी चालवली. आयझॅक डॉयश्चर हे ट्रॉटस्कीवादी. ते कार्यालयात व्याख्यानबाजी करीत. ट्रॉटस्कीवादी असून ते उदारमतवादी होते आणि आपल्या मतांचा प्रभाव ते एखाद्या घटनेचा वा मुलाखतीचा वृत्तांत लिहिताना त्यावर पडू देत नसत, असे ॲस्टर शिफारसपत्र देतात. ॲस्टर यांनी उदारमतवादी धोरण स्वीकारले व म्हणून त्यांनी मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. अनावश्यक राष्ट्रीयीकरणाने उत्पादन तर कमी होतेच, पण शासन हेच सर्वंकष बनते, म्हणून त्यांनी मिश्र-अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. सुवेझवरून इजिप्तशी युद्ध पेटले तेव्हा ऑब्झर्व्हरने ब्रिटिश सरकारच्या धोरणाच्या विरुद्ध भूमिका घेतली. यामुळे काही प्रमाणात त्याला जाहिरातही गमवावी लागली. पण पुन्हा त्याच प्रसंगावर लिहावे लागले तर आपण आपली भूमिका बदलणार नाही असे ॲस्टर म्हणतात.

१८-१-७६

ब्रिटिश वृत्तपत्रांचा संसार

ब्रिटिश वृत्तपत्रांचा व्यवसाय हा इंग्लंडमधील फार मोठा व्यवसाय आहे.

यापूर्वीच मधूनमधून त्याची पहाणी करण्यासाठी सरकारने चौकशी मंडळे नेमलेली होती. तीस वर्षात एकंदर तीन मंडळे नेमली गेली. त्यानंतर चौथे ७४ मध्ये नेमण्यात आले. प्रा. मॅकग्रेगर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या या मंडळाने अनेकविध व्यावसायिक प्रश्नांची चर्चा केली आहे. वृत्तपत्रे ही पूर्वग्रहदूषित आहेत की वस्तुनिष्ठ वार्ता देतात, हाही चौकशीचा विषय होता.

धंदा की धर्म? ही आपल्याकडील ठराविक चर्चा मॅकग्रेगर कमिशनने केली नाही. वास्तविक आपल्याकडेही अनेक व्यावसायिक प्रश्न वृत्तपत्रांपुढे आहेत. त्याची माहिती न घेता किंवा खोलात न जाता वृत्तपत्रे हा धंदा म्हणून न चालवता धर्म म्हणून चालवावी हा ठराविक सूर काढला, की प्रश्न मिटतो अशी अनेकांची समजूत आहे.

सुमारबुद्धी, अभ्यासाचा अभाव, आळस तसेच धाडस व उत्सुकता यांचा अभाव अशांनी धर्म म्हणून या क्षेत्रात प्रवेश केला तरी उपयोग काय? येथे धड धर्मही नाही व उत्तम व्यवसायही नाही अशी बहुतांश स्थिती आहे. महाराष्ट्रात तर टिळक-आगरकरांचे नाव घेतले की, वृत्तपत्रव्यवसायापुढील प्रश्नांची चर्चा करण्याचा प्रश्नच उरत नाही. ब्रिटिश पत्रांची चौकशी करणाऱ्या मॅकग्रेगर-कमिशनने अशी सोयीची वाट काढलेली नाही.

ब्रिटिश वृत्तपत्रसृष्टी दोन भागात विभागली आहे. लंडनहून प्रसिद्ध होणारी दैनिके व साप्ताहिके आणि निरनिराळ्या शहरातील पत्रे. यापैकी

लंडनच्या वृत्तपत्रांचा दैनिक खप एक कोटी ४० लक्ष आहे आणि साप्ताहिकांचा खप दोन कोटींच्या घरात जातो. लंडनच्या वृत्तपत्रांतही काही लोकप्रिय आहेत व काही प्रतिष्ठित आहेत. या प्रतिष्ठित पत्रांचा खप कमी, पण त्यांची प्रतिष्ठा अधिक अशी स्थिती आहे. गेल्या काही वर्षांत वृत्तपत्रांची संख्या आणि ती प्रसिद्ध करणाऱ्या कंपन्यांची संख्या घटत आली आहे. ६१ साली ४९० कंपन्या होत्या. आता २२० आहेत. काही कंपन्या केवळ वृत्तपत्रेच चालवतात तर काहींचे इतर अनेक उद्योग आहेत. गेल्या आठदहा वर्षांत लंडनमधून एकही नवे वृत्तपत्र सुरू झाले नाही. उलट निरनिराळी वृत्तपत्रे अधिक आपत्तीत सापडली. यापैकी ऑब्झर्व्हरची मालकी एका अमेरिकन कंपनीकडे गेली. लंडन टाइम्सची मालकी थॉमसन यांच्याकडे आहे. ज्या लॉर्ड थॉमसन यांनी ते घेतले ते कॅनेडियन होते. ब्रीव्हरब्रूक गटाची डेली व संडे एक्सप्रेस ही पत्रेही वेगळ्या ब्रिटिश कंपनीकडे नुकतीच गेली आहेत. आता मिरर गटाचे बहुधा हस्तांतर होईल. काही कंपन्यांच्या हाती दूरदर्शन, उत्तर समुद्रातील तेल इत्यादी क्षेत्रात बरेच शेअर भांडवल आहे. त्यामुळे आपल्या वृत्तपत्रांचा तोटा त्या भरून काढतात.

वारंवार संप

सध्या या पत्रांपुढील मुख्य प्रश्न आर्थिक आहे. वाढता खर्च, कमी आवक आणि वारंवार होणारे संप व बंद यामुळे वृत्तपत्रीय क्षेत्रात अराजक माजण्याची वेळ आली आहे. केवळ कागदाचा खर्च पाहिला तरी ५७ साली एका टनाला ५९ पौंड पडत तर ७७ साली मे मध्ये हीच किंमत २२९ पौंड होती. वृत्तपत्रांत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात अशीच वाढ झाली आहे. आणि वाढीसाठी वारंवार संप होऊन अनेक वृत्तपत्रांवर अनिष्ट परिणामही झाला आहे. जगातल्या कोणत्याही वृत्तपत्राला केवळ खपावर खर्च भागवता येत नाही. त्याला जाहिरातींचा आधार लागतो. अमेरिकेतही हा आधार कमी होऊन न्यूयॉर्कमध्ये केवळ दोन दैनिके उरली आहेत. त्या मानाने लंडनमध्ये वृत्तपत्रांची संख्या अधिक आहे. पण आर्थिक पाठबळाअभावी एकेक धोक्यात येत आहे. जाहिरातींच्या बाबतीत प्रादेशिक वृत्तपत्रे (कौंटि पेपर्स) सुखी आहेत. उद्योगधंदे विखुरले गेले, नव्या वसाहती झाल्या, यामुळे या पत्रांची जाहिरात बरीच वाढली. उलट लंडनच्या पत्रांना टेलिव्हिजनवरील जाहिरातींची स्पर्धा नडली आहे. जाहिरातीचा महसूल अशा रीतीने कमी झाला असतानाच खर्च मात्र वाढत गेला.

या आर्थिक अडचणीवर मुख्य उपाय म्हणजे खर्च कमी करणे; त्याकरिता आधुनिक यंत्रसामग्री हवी. याहीबाबत अनेक प्रादेशिक पत्रांनी आघाडी मारली. आधुनिक यंत्रसामग्री आणून कर्मचाऱ्यांची संख्या कमी करण्यात आल्याने या पत्रांचा फायदा वाढला. उलट लंडनच्या वृत्तपत्रात नवी यंत्रसामग्री आणण्याच्या कामी कामगार संघटनांनी विरोध केला. या विरोधापायी तेथे एकदम बदल होऊ शकला नाही. आता काही पत्रांत करारमदार झाले आहेत. पण आधुनिक यंत्रसामग्रीपायी कमी कराव्या लागणाऱ्या कर्मचाऱ्यांना नुकसानभरपाईदाखल द्यावयाच्या रकमेचा भुर्दण्ड जबर आहे. याबाबत कमी व्याजाने कर्जाऊ रकमा द्याव्या अशी सूचना मॅकग्रेगर कमिशनने केली आहे. आपल्याकडेही वेगळी परिस्थिती नाही. एकतर वृत्तपत्रीय यंत्रसामग्री बाहेरून आणावी लागते आणि किंमत बरीच वाढली आहे. ती आणू नये तर जुनी यंत्रसामग्री विशिष्ट मर्यादेपुढे चालू शकत नाही. यासाठी इंग्लंडच्या धर्तीवर येथेही कमी व्याजाने यंत्रसामग्रीसाठी कर्ज देण्याचा विचार व्हावा. जपान, जर्मनी, अमेरिका, स्वीडन इत्यादी देशांत आधुनिक यंत्रसामग्रीला कामगारांनी विरोध केला नाही. त्यामुळे इंग्लंडच्या पत्रांप्रमाणे त्या देशातील पत्रांपुढे हा प्रश्न नाही.

कागदासाठी मदत

कागदाच्या बाबतीत सरकारने आर्थिक मदत द्यावी व इतरही प्रकारे आर्थिक मदत करावी अशा सूचना केल्या जातात. स्वीडनमध्ये अशी मदत मिळते. पण स्वीडीश पत्रे ही बहुधा पक्षीय पत्रे आहेत. त्यामुळे या पक्षांनाच मदत होत असते. खाजगी वृत्तपत्रे व सरकारी मदत हे जुळणारे गणित नव्हे. याचा परिणाम वृत्तपत्रीय स्वातंत्र्यावरही होईल असे

मॅकग्रेगर कमिशनचे मत आहे. वृत्तपत्रे व पत्रकार यांना आर्थिक सवलती देण्यात इटलीचा हात कोणी धरणार नाही. येथे एस. टी. चेही फुकट पास मागणारांनी इटालियन, सवलतींची माहिती घेऊन त्या धर्तीवर अद्याप मागण्या कशा केल्या नाहीत हे कळत नाही! मॅकग्रेगर कमिशनचा या प्रकारच्या सवलतींना विरोध आहे.

जाहिरातींच्या महसूलातील तफावतींवर तोडगा म्हणून ब्रिटिश मजूर पक्षाने एक उपाय सुचवला होता. जाहिरातींचे समान वाटप करण्याची त्याची सूचना होती. पण यामुळे टाइम्स, गार्डियन यासारखी जी प्रतिष्ठित पण कमी खपाची पत्रे आहेत त्यांच्या महसूलावर विपरीत परिणाम होईल असे मॅकग्रेगर कमिशन म्हणते आणि इतरही दृष्टीने जाहिरातींचे समान वाटप त्याला मान्य नाही. दुसरे असे, की कोणते माध्यम वापरावे हे जाहिरातदाराने ठरवायचे असते. त्याच्यावर अन्याय करण्याचा सरकार व इतर कोणासही अधिकार मिळू नये. जाहिरातदारांचे वृत्तपत्रावर दडपण येते काय? कमिशनला तसा फारसा पुरावा आढळलेला नाही. जाहिरातदारांना प्रसिद्धी मिळू शकते, पण त्यांचा प्रचार होतो किंवा त्यांच्याकडून संपादकीय विभागावर मतप्रदर्शनाच्या कामी दडपण येते असे कमिशनला दिसले नाही.

पूर्वग्रहदूषित

हे कमिशन नेमण्यापूर्वी हॅरॉल्ड विल्सन यांनी तक्रार केली होती, की ब्रिटिश पत्रे ही मजूर पक्षाबाबत पूर्वग्रहदूषित आहेत. या संबंधात ते स्वतः पुरावा देऊ शकले नाहीत. कमिशनने असे मत दिले आहे, की प्रतिष्ठित पत्रे मजूर पक्षावर टीका करतात; पण ती पूर्वग्रहदूषित आहेत असे नव्हे. औद्योगिक संबंधाबाबत कमिशनचे म्हणणे असेच आहे. ही पत्रे कामगारविरोधी आहेत असा त्यांच्यावर शिक्का मारता येणार नाही. अर्थात संपाच्या बातम्या जेवढ्या ठळकपणे येतात तितक्या संप मिटल्याच्या येत नाहीत. पण बातमी कशाला म्हणावे याबद्दलच्या कल्पनेचा हा परिणाम असेल असे कमिशनचे म्हणणे आहे. तथापि औद्योगिक संबंधाबाबत वृत्तपत्रांनी अधिक तत्परता दाखवावी, अधिक माहिती मिळवावी, व छापावी अशीही त्याची इच्छा आहे. आद्योगिक संबंध म्हणजे केवळ संप नव्हे. त्यापलीकडे पहाणी करून औद्योगिक क्षेत्रातील वातावरणाचे चित्रण वृत्तपत्रातून व्हावे ही कमिशनची अपेक्षा आहे. पत्रकारांच्या शिक्षणाची व प्रशिक्षणाची आवश्यकता त्याने प्रतिपादन केली आहे. केवळ पूर्वसुरींचा महिमा गाऊन आजचे प्रश्न सुटत नसतात.

१६–१०–७७ ◉



पार्लमेंटचा वार्ताहर

जेम्स मार्गाक हे संडे टाइम्सचे ब्रिटिश पार्लमेन्टमधील वार्ताहर. पार्लमेन्टच्या राजनैतिक प्रतिनिधित्वाची चाळीस वर्षे गाठीला घेऊन ते आता सेवानिवृत्त झाले आहेत. या काळात त्यांनी पार्लमेन्टच्या कामकाजात, स्थानात झालेली स्थित्यंतरे पाहिली आणि अकरा पंतप्रधानांचा कारभार पाहिला. या चाळीस वर्षांतले अनुभव थोडक्यात वर्णन करणारा लेख मार्गाक यांनी संडे टाइम्समध्ये लिहिला आहे. ब्रिटिश पार्लमेन्ट असो, अमेरिकन कॉंग्रेस असो वा आपली संसद असो, तेथील कामकाजाचे वृत्त देणारे वार्ताहर अनेक असतात. पण त्यातील थोड्यांनाच राजनैतिक वार्ताहराचा दर्जा मिळतो. याला लॉबी कॉरस्पॉंडन्ट म्हणतात. पार्लमेन्टच्या या खास कक्षात मंत्री व खासदार यांच्याशी बातचीत या प्रतिनिधींना करता येते आणि मंत्री आणि अधिकारी त्यांना विश्वासात घेऊन अनेक गोष्टी सांगतात. त्यातील काही प्रसिद्ध करायच्या असतात, तर काही केवळ माहितीसाठी असतात. मार्गाक हे अशा मोजक्या पत्रप्रतिनिधींपैकी होते. यापैकी काही प्रतिनिधी असे असतात, की जे थोड्या शब्दांत पार्लमेंटच्या दिवसाच्या कामकाजाचे वर्णन करून वाचकांच्या मनश्चक्षूपुढे पार्लमेंटच उभे करतात. गार्डियनचे बोर्डमन हे असे प्रतिनिधी होते. त्यांचा कामकाजाच्या नियमांचा अभ्यास एवढा होता, की मंत्री, अधिकारी व



खासदार काही वेळा याबाबत त्यांच्याशी सल्लामसलत करीत. बोर्डमन वारल्यावर चर्चिल यांनी भर पार्लमेंटमध्ये त्यांना श्रद्धांजली वाहिली होती.

पार्लमेंटचे बदलते स्वरूप

ब्रिटिश पार्लमेंटचे स्वरूप आता बदलले आहे. ब्रिटन जेव्हा साम्राज्य-सत्ता भोगीत होते, तेव्हा परराष्ट्र धोरणविषयक चर्चेच्या वेळी पार्लमेंट-मधील राजदूतांचा विभाग भरलेला असे. या विभागात जागा मिळावी म्हणून निरनिराळ्या देशांचे राजदूत हे रांगा लावीत. पण मार्गाक म्हणतात, आजकाल ब्रिटनचे जागतिक राजकारणातील स्थान घसरल्याने या विभागात काहीही उपस्थिती नसते. अनेक राजदूत असे आहेत, की त्यांना पार्लमेंटच्या या विभागात कसे यायचे, हेही धड माहीत नाही. इतर परदेशी प्रवासी ज्याप्रमाणे पार्लमेंट पाहण्यासाठी येतात, तसे बरेच राजदूत येतात. यापलीकडे त्यांना पार्लमेंटच्या कामकाजात वा परराष्ट्रविषयक चर्चेत स्वारस्य नाही.

मार्गाक यांना जाणवणारे आणखी एक स्थित्यंतर म्हणजे पार्लमेंटच्या अधिकारांचा संकोच आणि मंत्री व नोकरशाही यांच्या अधिकाराचा विस्तार. नोकरशाही गेल्या चाळीस वर्षात बरीच वाढली आणि तिचे अधिकार वाढले. मार्गाक यांनी व्यवसायाला प्रारंभ केला, तेव्हा परराष्ट्र खाते, हवाई खाते व युद्ध खाते यात प्रसिद्धी अधिकारी होते. आता निरनिराळ्या मंत्रालयांचे मिळून लहानमोठे दीड हजार अधिकारी आहेत. नोकरशाही व मंत्री यांच्यापेक्षा पंतप्रधानांचे अधिकार विशेष वाढले आणि विल्सन यांच्यावर तर जॉर्ज ब्राऊन यांनी अमेरिकन अध्यक्षाप्रमाणे पंत-प्रधानपदाचे स्वरूप बदलले असल्याची टीका केली होती.

दुसरा फरक म्हणजे पक्षांतर्गत लोकशाही वा सहिष्णुतेचा. १९३५ चे भारतविषयक विधेयक पार्लमेंटपुढे आले, तेव्हा हुजूर पक्षाचे ८०–९० खासदार चर्चिल यांच्या नेतृत्वाखाली हुजूरपक्षीय मंत्रिमंडळाला उघड विरोध करीत होते. आता तसे फारसे होत नाही व अंतर्गत विरोध झाला तर पक्षनेते विरोधी पक्षसदस्यांना धारेवर धरतात.

पार्लमेंटमधील चर्चेच्या विषयाचा विचार केला तर काय दिसते? मार्गाक म्हणतात, चाळीस वर्षे झाली, ब्रिटिश पार्लमेन्टपुढे तेच महत्त्वाचे प्रश्न आहेत. एक प्रश्न बेकारीचा. त्या काळात बेकारांची संख्या तीस लाखां-वर गेली, मोठी चर्चा झाली. पुढे हा आकडा पंचवीस लाखांवर आला, तेव्हा बरीच प्रगती झाल्याचे समाधान मिळाले. आजही ब्रिटिश पार्ल-मेन्टपुढे बेकारीचा प्रश्न आहेच. याखेरीज म्हातारपणाचे पेन्शन किती द्यावे, जपान वगैरेंच्या स्वस्त मालावर आयात निर्बंध घालून ब्रिटिश मालाला होणारी स्पर्धा टाळावी काय, कापडगिरण्या इत्यादी काही उद्योग आर्थिक अडचणीत आहेत, ती कशी निवारावी, हे व असेच प्रश्न साधारणतः त्याच स्वरूपात आजही चर्चिले जातात. असे काही प्रश्न अशा रीतीने ब्रिटिश समाजाच्या पाचवीला पुजले आहेत की काय, असे वाटण्याजोगी परिस्थिती आहे.

पत्रकारांवर प्रसंग

मार्गाक यांनी पत्रकारांवर ओढवलेल्या प्रसंगांची माहिती दिली आहे. लंडन टाइम्स हा युद्धपूर्व काळात जर्मनी व इटली यांच्याशी तडजोड करण्याच्या पंथाचा पुरस्कर्ता. या धोरणाचे खंदे पाठीराखे म्हणजे संपादक डॉसन. हिटलर, मुसोलिनी व त्यांची राजवट यांच्याविरुद्ध एक अक्षरही आपल्या पत्रात येणार नाही याविषयी त्यांचा कटाक्ष. याच काळात डफ कूपर यांनी चेंबर्लेन यांच्या शरणागतीच्या धोरणावर टीका करणारे अतिशय प्रभावी भाषण केले व राजीनामा दिला. टाइम्सचा वार्ताहर अँथनी विन हा या भाषणाने भारावून गेला आणि सभागृहाचीही तीच भावना होती. हे सर्व मार्मिकपणे वर्णन करणारा आढावा त्याने लिहिला. पण रात्री डॉसन यांनी त्यात इतक्या दुरुस्त्या केल्या, की टाइम्सच्या वाचकाला दुसऱ्या दिवशी डफ कूपर यांचे भाषण हास्यास्पद व मूर्खपणाचे झाले, असे वाटावे! संपादकीय स्वातंत्र्याची डॉसन यांची कल्पना अशी मुलखावेगळी होती. अर्थात अँथनी विन यांना राजीनामा देण्याखेरीज गत्यंतर नव्हते.

दुसरा प्रसंग न्यूज क्रॉनिकलचा वार्ताहर जॅक कर्क याच्यावर ओढवला. एक दिवस टेलिग्राफ व न्यूज क्रॉनिकल यात सविनय कायदेभंगाबद्दल म.

गांधींना अटक करण्याची अनुमती ब्रिटिश मंत्रिमंडळाने व्हाइसरॉयला दिल्याचे वृत्त आले. त्याबरोबर पंतप्रधान मॅकडोनाल्ड गरम झाले. नाझी वगैरे हेरांचा प्रभाव वाढत चालल्याच्या तक्रारी त्या काळात होत. तेव्हा मंत्रिमंडळातील चर्चेचे ध्वनिमुद्रण झाले काय, असा हेर कोण इ. प्रश्न मॅकडोनाल्ड यांना पडले. त्यांनी स्कॉटलंड यार्डला तपास करण्याची सूचना केली. गुप्त पोलीस अधिकाऱ्यांनी दोन्ही पत्रांच्या संपादकांपाशी राजनैतिक प्रतिनिधींची माहिती विचारली पण त्यांनी सहकार्य दिले नाही. तथापि न्यूज क्रॉनिकलच्या कार्यकारी संपादकाने जॅक कर्क या पार्लमेन्टच्या प्रतिनिधीची माहिती दिली. पोलीस त्याच्या घरी गेले व पोलीस चौकीवर चलण्यास त्यांनी कर्क यास सांगितले. पोलीस आल्याचे पाहताच कर्कच्या बायकोला मूर्च्छा आली. पण ती येत असता कर्क तिच्या कानात म्हणाला, 'हे सर्व तू न्यूज क्रॉनिकलचा माझा सहकारी ट्रूलव्ह यास सांग, तिने नंतर ट्रूलव्हला फोन केला व झालेली हकिगत निवेदन केली. ट्रूलव्ह मग गृहमंत्री क्लिन्स यांच्याकडे गेला. क्लिन्स यांनी सहज बोलता बोलता ट्रूलव्ह याला उडत उडत गांधींच्या अटकेबद्दल काही सांगितले होते. त्यावरून त्याने जॅकला बातमी देण्यास सांगितले. क्लिन्स यांनी मग मॅकडोनाल्डना कळवले की यात हेरगिरी नाही. आपणच ट्रूलव्हला माहिती दिली. जॅक यामुळे सुटला.

पंतप्रधान

मार्गारेट यांनी अकरा पंतप्रधानांची कारकीर्द पाहिली. त्यांच्या मते लॉइड जॉर्ज व चर्चिल हे सर्वांत मोठे युद्धकालीन पंतप्रधान, तर बॉल्डविन हा शांततेकालातील सर्वांत श्रेष्ठ पंतप्रधान. त्याच्या खालोखाल मॅकमिलन व नंतर विल्सन. ॲटलीचे महत्त्व त्यांच्या मृत्यूनंतर कळू लागले आहे. ॲथनी ईडन दुर्दैवी. परराष्ट्र राजकारणात त्यांचा इतका काळ गेला होता, की त्यांना सम्यक दृष्टी आली नाही व त्यामुळे सुवेझ प्रकरणी त्यांनी एकांतिक भूमिका घेतली. बॉल्डविन यांनी सार्वत्रिक संपाला यशस्वी तोंड दिले. तर हिथ यांचे खाण कामगारांच्या संपाच्या वेळी धैर्य सुटले. लॉइड जॉर्ज हे पट्टीचे वक्ते. चेंबर्लेन यांच्या शरणागतीच्या धोरणाच्या चिंधड्या उडवणारे त्यांचे भाषण, मार्गारेट म्हणतात, अजरामर ठरले. चेंबर्लेन यांची एकाकी भेदरलेली मूर्ती हे सर्वांत मोठे करुण दृश्य होते. लॉइड जॉर्ज पत्रकारांशी मैत्रीचे संबंध ठेवीत. ते भावनाप्रधान होते. उलट चर्चिल यांनी असे संबंध ठेवले नाहीत. त्यांच्या पासपोर्टावर पत्रकार हा आपला व्यवसाय म्हणून त्यांनी नोंदवला होता, पण या व्यवसायातील लोकांशी त्यांचे संबंध बेतास बात. एकदा एका पत्रकाराने स्वतःची ओळख करून दिली असता चर्चिल गुरगुरले, 'मी तुम्हाला ओळखतो काय ? छे ! बिलकूल नाही.' असे म्हणून ते निघून गेले. चर्चिल पत्रकार परिषदा घेत नसत. एकदा अमेरिकेहून रुझवेल्ट यांना भेटून चर्चिल परतले, तेव्हा त्यांनी वार्ताहरांना छोटी मुलाखत दिली. पण प्रत्येक प्रश्नाला त्यांनी उडवाउडवीचे उत्तर दिले. 'मला प्रथम पार्लमेंटला माहिती दिली पाहिजे.' 'ब्रिटिश जनतेला उद्देशून मी आकाशवाणीवर यानंतर भाषण करीन त्यात हा विषय येईल.' 'मला अद्याप मंत्रिमंडळाची अनुमती नाही.' या प्रकारची चर्चिल यांची विविध प्रश्नांना उत्तर होती. त्यांच्या पत्रपरिषदेचा अशा रीतीने फज्जा उडाला.

२३-५-७६ ⊙

आँखो देखा हालकी हालत

मालकम मगरीज यांच्याइतके मिष्कील आणि कोणाचीही टोपी सहज उडवण्यात पटाईत असे लेखक विरळा. त्यांनी अनेक वृत्तपत्रांतील चक्षुर्वैसत्यम् अशा हकिगतीसुद्धा कशा बोगस असतात, यावर प्रकाश टाकणारा लेख 'ट्रेड सॉफ्टली फॉर यू ट्रेड ऑन माय जोक्स' या पुस्तकात ग्रथित केला आहे. सध्या वृत्तपत्रविषयक बरीच चर्चा होते. अनेक मान्यवर पत्रांनी आपल्या संपादकीय धोरणामुळे वस्तुस्थितीचा कसा विपर्यास अनेकदा केला, याची मासलेवाईक उदाहरणे मगरीज यांनी नमूद केली आहेत. ते स्वतः चाळीस वर्षे या क्षेत्रात वावरत आहेत. गार्डियन, कलकत्त्याचा स्टेटसमन, लंडनचा इव्हिनिंग स्टँडर्ड, पंच अशा पत्रांत त्यांनी प्रतिनिधी, परदेशस्थ प्रतिनिधी, सहसंपादक व संपादक म्हणून काम केले आहे.

गार्डियन हे उदारमतवादी पत्र. मगरीज लिहितात : वसाहतीत कोणीही ब्रिटिश सैनिकाला ठार मारले तर तो स्वातंत्र्यसैनिक आणि ब्रिटिश सैनिकांनी मारले तर मरणारा हा हुतात्मा अशी गार्डियनची सी. पी. स्कॉट यांच्या संपादकीय कारकीर्दीतील भूमिका होती. त्या काळात सी. एफ. अँड्रचूज हे भारतविषयक वार्तापत्रे धाडीत. भारतातील उदारमतवादी नेते हे प्रभावी आहेत. काँग्रेस वसाहतीच्या स्वराज्यावर समाधान मानील, जीना अखिल भारतीय प्रजासत्ताकात सामील होतील, असे एकंदर मोठे आशादायक चित्र अँड्रचूज रंगवीत. ते किती अवास्तव होते, हे पुढे इतिहासाने सिद्ध केले. मगरीज यांनी दुसरे उदाहरण टाइम्स जेव्हा जॉफ्रे डॉसन यांच्या संपादकत्वाखाली निघत होता, तेव्हाचे दिले आहे. डॉसन हे जर्मनीशी सख्य करावे या मताचे होते. त्यामुळे जर्मनीच्या विरुद्ध कसलीच बातमी टाइम्समध्ये येत नसे. बीव्हरब्रूक हेसुद्धा जर्मनीचे मित्र होते. त्यांची पत्रेही युद्ध होणार नाही, असाच भास निर्माण करीत होती. ३२-३३ सालात मगरीज मॉस्कोत गार्डियनचे प्रतिनिधी होते. त्यावेळी न्यूयॉर्क टाइम्सचे मॉस्कोतील प्रतिनिधी होते वॉल्टर डुरांटी. एरवी हे सज्जन गृहस्थ. पण रशियाचे जे चित्र ते न्यूयॉर्क टाइम्समधून रंगवीत, ते पूर्णतः चुकीचे. त्यावेळी स्टालिनने सामुदायिक शेतीचा प्रयोग सक्तीने सुरू केला होता. त्यामुळे धान्याची प्रचंड तूट निर्माण होऊन लोकांची उपासमार चालू होती. अनेक लोक मरत होते. पण रशिया हा तेव्हा धनधान्याने समृद्ध असून, दुधाचे पाट वाहात आहेत, फळफळावळ तर अतोनात आहे, असा आभास डुरांटी आपल्या वार्तापत्रांतून निर्माण करीत. आँखो देखा हाल म्हणून ही वार्तापत्रे लिहिली जात. प्रत्यक्षात मात्र रशियन लोक प्रचंड दुष्काळाने उपासमार काढीत होते व मरत होते. पुढे क्रुशॉव यांनी यावर प्रकाश टाकलाच आहे.

पण डुरांटी हा पत्रकारच या प्रकारची दिशाभूल करीत होता, असे नव्हे. वेब दांपत्य, बर्नार्ड शॉ वगैरे मंडळीही त्याच माळेतील. शॉ मॉस्कोत असताना त्यांचा ७५ वा वाढदिवस साजरा झाला. आपल्या भाषणात त्यांनी रशियातील धान्यसमृद्धीचे गोडवे गायले. पण मगरीज म्हणतात, यामुळे आमची करमणूक झाली. कारण शॉ कधी खेड्यापाड्यांत जाऊन परिस्थिती पाहून आलेच नव्हते. त्यांचा स्वतःचा जो पाहुणचार झाला, त्यावरून त्यांनी हे अनुमान बांधले होते. हॅरॉल्ड लास्की हे तर कमालीचे खोटे बोलणारे गृहस्थ होते, असे मगरीज स्पष्टपणे म्हणतात.

न्यूज क्रॉनिकल हे उदारमतवादी ब्रिटिश पत्र होते. त्यात न्यूरेन्बर्ग खटल्याची हकिगत प्रसिद्ध होत असे. वास्तविक गोरिंगने आत्महत्या केली होती. त्यामुळे न्यूरेन्बर्गच्यात खटल्यात तो येण्याचा प्रश्न नव्हता. न्यूज क्रॉनिकलने याच न्यूरेन्बर्गला गोरिंग कसा धैर्याने चालत होता, न्यायासनापुढे त्याने न डगमगता कशी साक्ष दिली आणि अखेरीस तो शांतपणे कसा फासावर गेला, याचा आँखो देखा हाल प्रसिद्ध केला होता!

११-८-७५ ◉

अध्यक्ष निक्सन निवृत्तीनंतर

अमेरिकेचे माजी अध्यक्ष निक्सन यांच्या अधिकारत्यागाला ज्या अनेक शक्ती कारणीभूत झाल्या, त्यांत वृत्तपत्रांचा समावेश होतो. निक्सन यांना निवृत्त होऊन ऑगस्टमध्ये वर्ष पूर्ण झाले. त्या निमित्ताने ऑब्झर्व्हरचे प्रतिनिधी चार्लस फॉले यांनी कॅलिफोर्नियातील -सान क्लेमेन्ट या ठिकाणी असलेल्या निवासस्थानी निक्सन यांची भेट घेतली, त्यांचे जीवन कसे चालले आहे हे पाहिले व लेख लिहिला.

निक्सन आता फिरायला जातात तेव्हा किंवा समुद्रकिनाऱ्यावर फिरतात तेव्हा, थांबून येणाऱ्या जाणाऱ्यांशी हास्यविनोद करतात. वृत्तपत्रे त्यांच्याविषयी थोडी आस्था दाखवू लागली आहेत. निक्सन यांनी जेवढे सहन केले तेवढे खूप झाले, यापलीकडे त्यांना शिक्षा वा प्रायश्चित्त मिळू नये, असे वाटणारांची संख्या अमेरिकेत कमी नाही. निक्सन यांच्यावर जे अनेक खटले चालू आहेत, त्यांसाठी खूप पैसा लागणार आहे. त्यांना अमेरिकन काँग्रेसने कमी रक्कम दिली. जॉन्सन सेवानिवृत्त झाल्यावर जेवढी रक्कम त्यांना दिली गेली, त्यापेक्षा तर ही रक्कम फारच कमी आहे. त्यांच्याबद्दल सहानुभूती व्यक्त करणारांची संख्या वाढत आहे. त्यामुळेच निक्सनसंरक्षण निधीसाठी बऱ्याच रकमा जमा होत आहेत. त्यांना ज्याप्रमाणे माओ, ब्रेझनेव्ह यांच्याकडून पत्रे येतात, त्याचप्रमाणे इराणचे शहा न चुकता कॅन्हिअर धाडत असतात. निक्सन यांचे विश्वासू पत्रकार म्हणजे सफरि. त्यांनी निक्सन यांची गेलेली पत परत मिळवून देण्यासाठी प्रसिद्धीची एक मोहीम चालवली आहे. या मोहिमेचाच एक

भाग म्हणून त्यांनी नुकत्याच लिहिलेल्या लेखात नमूद केले, की केनेडी यांनी त्यांच्या कारकीर्दीत कॅस्ट्रोच्या खुनाचा आदेश सी. आय. ए.ला दिला, तसा निक्सननी कोणाबाबत दिला नव्हता किंवा जॉन्सन यांनी साठ लाख डॉलर्सची माया आपल्या कारकीर्दीत जमा केली, तशी निक्सन यांनी केली नाही. यापुढे निक्सन हे आंतरराष्ट्रीय प्रश्नाबाबत लिखाण करणार आहेत. त्यासाठीही या पत्रकारमित्राचा त्यांना उपयोग होईल.

निक्सन आपल्या आठवणींचा संग्रह लिहीत आहेत. त्याला प्रचंड मागणी अपेक्षित असून, त्यासाठी प्रकाशक त्यांना अवाढव्य रक्कम देणार आहेत. दूरचित्रवाणीवरही त्याच आठवणींच्या आधारे कार्यक्रम सादर व्हावयाचे आहेत. हा मिळणारा पैसा निक्सन यांना अनेकविध देणी व खटल्यांचा खर्च यासाठी आवश्यक आहे. अधिकारपद सोडल्यावर निक्सन म्हणाले होते, की एक कार्य पुरे झाल्यावर स्वस्थपणे काही न करता बसणे, हे माझ्या स्वभावात नाही. पण ते काय करणार, हे माहीत नसल्याने त्याबद्दल अंदाज करणे हा बऱ्याच जणांचा छंद होऊन बसला आहे. ११-८-७५ ⊙

टी. एल. एस. ची ७५ वर्षे

केवळ साहित्यविषयक व त्यातही प्रायः ग्रंथपरीक्षणाला वाहिलेले साप्ताहिक चालवणे ही सोपी गोष्ट नव्हे. असे साप्ताहिक अव्याहत पाऊणशे वर्षे चालवणे हे केव्हाही कौतुकास्पद. टी. एल. एस.ने हा विक्रम केला असून, १७ जानेवारीला या साप्ताहिकाला पाऊणशे वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने या साप्ताहिकाचे पंधरा वर्षे संपादक असलेले आर्थर क्रूक यांनी लंडन टाइम्समध्ये लेख लिहिला आहे, तर टी. एल. एस.ने जादा पाने देऊन वाढदिवस साजरा केला आहे. टी. एल.एस.चा पहिला अंक १७ जानेवारी १९०२ रोजी निघाला, तेव्हा टाइम्सबरोबरची एक पुरवणी असे त्याचे स्वरूप होते. टाइम्सकडे अभिप्रायार्थ पुस्तकांचा पाऊस पडत असल्याने व टाइम्समध्ये या सर्वांना जागा देणे कटीण असल्याने ही पुरवणीची कल्पना निघाली. काही थोडे अंक थर्सफिल्ड यांच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध झाले. पण नंतर ब्रूस लिटलटन रिचमंड यांची संपादक म्हणून नेमणूक झाली. रिचमंड पस्तीस वर्षे संपादक होते. या साप्ताहिकाला वैचारिकदृष्ट्या भरभक्कम पायावर उभे करून त्याला वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त करून देण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते.

पहिले संपादक

रिचमंड हे अतिशय साक्षेपी संपादक होते. योग्य समीक्षकाकडे योग्य पुस्तक हे त्यांचे उद्दिष्ट असल्याने ते समीक्षकांची निवड चोखंदळपणे करीत आणि अशा अनेक समीक्षकांची त्यांच्याकडे यादी होती. रिचमंड यांचा दुसरा विशेष असा, की त्यांच्या साप्ताहिकात छापून येणार असलेला प्रत्येक मजकूर ते स्वतः वाचीत आणि त्यावर संपादकीय संस्कार करीत. त्यामुळे कोणाही समीक्षकाला रिचमंड यांनी घालून दिलेल्या कसोटीला उतरावे लागे. म्हणूनच ६० साली जेव्हा रिचमंड यांचा नव्वदावा वाढदिवस साजरा झाला तेव्हा टी. एस. इलियट यांनी त्यांचे दोन प्रकारचे ऋण मानले. एक म्हणजे रिचमंड यांनी समीक्षणाचे काम देऊन विशिष्ट प्रकारची शिस्त लिखाणाला लावली आणि दुसरे हे, की संपादकीय दर्जा काय असावा याचे उदाहरण घालून दिले. त्यावेळी टी. एल. एस. मध्ये निनावी समीक्षणे प्रसिद्ध होत; पण अनेक नामवंत तसेच ऐन उमेदीचे लेखक मोठ्या हौसेने लिखाण करीत. इलियट यांच्या बरोबरीने व्हर्जिनिया वूल्फ, हेन्री जेम्स, एडमंड ब्लेंडेन, वाल्टर द ला मेर, पर्सी लबॉक असे एकेक परीक्षक रिचमंड यांना मिळाले होते. व्हर्जिनिया वूल्फ यांनी केलेल्या अनेक समीक्षणांचे संग्रह प्रसिद्ध झाले असून आजही ते ताजे वाटतात आणि ग्रंथपरीक्षण कसे असावे याचे धडे मिळत असतानाच एखादी सर्जनशील वाङ्मयकृती वाचल्याचा आनंद होतो. निनावी टीकालेख येत असल्याने अनेक लेखक संतापत. एच. जी. वेल्स हे यापैकीच एक होते. त्यांच्या कादंबऱ्यांवरील परीक्षणे त्यांना आवडली नाहीत व म्हणून त्यांनी टी. एल. एस. ला लेख देण्याची रिचमंड यांची विनंती अमान्य केली. अर्थात काही लेख लेखकांच्या नावानेही प्रसिद्ध होत. रिचमंड यांना टाइम्सचे संपादक जॉफ्रे डॉसन यांचा भरभक्कम पाठिंबा होता, पण टाइम्सचे मालक लॉर्ड नॉर्थक्लिफ हे मात्र मधूनमधून त्यांना काढण्याच्या गोष्टी करीत. २१ साली तर साप्ताहिकच बंद करण्याचा मनोदय नॉर्थक्लिफ यांनी व्यक्त केला होता.

रिचमंड यांची एक सवय अशी, की लेखांवर संपादकीय संस्कार करून ते मुद्रणासाठी पाठवून दिले, की सहा महिन्यांनी ते हस्तलिखिते नष्ट करीत. त्यामुळे व्हर्जिनिया वूल्फ, हेन्री जेम्स प्रभृतींच्या हस्तलिखितांचा मागमूस लागत नाही. पत्रांचीही उत्तरे दिली की त्यांची रिचमंड विल्हेवाट लावीत. म्हणून अनेक मोठ्या लेखकांची पत्रे नाहीशी झाली.

लॉर्ड नॉर्थक्लिफ यांच्या मृत्यूनंतर ॲस्टर कुटुंबाकडे टाइम्सची

मालकी आली. थोड्या दिवसांनी म्हणजे ३७च्या अखेरीला रिचमंड हे सेवानिवृत्त होऊन त्यांचे सहसंपादक मरे हे संपादक झाले. टी. एल. एस. अधिक आकर्षक करण्याचे त्यांनी आश्वासन दिले खरे, पण या साप्ताहिकाचा खप घसरत गेला. युद्धकाळात तर तो अधिकच कमी झाला. कारण केवळ बारा पानेच देणे शक्य असे. यामुळे जाहिरातीचा महसूलही कमी. युद्धानंतर आपण कादंबरीलेखनाकडे वळणार व संपादकपद सोडणार, असे मरे सांगत. ४९ साली त्यांची जागा मॉरिसन यांनी घेतली. त्यांची कारकीर्द दोन वर्षांची होती. या काळात त्यांनी पहिल्या पानावर अधिकारवाणीने लांबलचक लेख प्रसिद्ध केले, अनेक गंभीर विषय हाताळले. टी. एल. एस. वाचण्यास कठीण करण्याचे कार्य आपण केले, असे ते चेष्टेने म्हणत.

युद्धोत्तर

सत्तेचाळीस साली त्यांची जागा प्रिस जोन्स यांनी घेतली. कागदावरील नियंत्रण उठले. टी. एल. एस. ची पाने वाढली आणि मग स्पर्धाही वाढली. प्रिस जोन्स हे इंग्रजीप्रमाणेच फ्रेंच व जर्मन या भाषांत प्रवीण होते. काव्य, संगीत याची त्यांना जाण होती. युद्धोत्तर काळातील नवे टीकाकार, लेखक पुढे आणण्याचे श्रेय त्यांना आहे. एक काळ असा होता की, टी. एल. एस. चे ग्राहक ८७ देशांत पसरले होते. सर्जनशील प्रतिभेच्या ते शोधात असत. ब्रिटिश ग्रंथ व टी. एल. एस. यांचा त्यांच्याइतका प्रसार क्वचित कोणी केला असेल. त्यांना प्रवासाची आवड होती आणि परदेशी संस्कृती व तेथील बुद्धिमान लेखक यांच्या शोधार्थ ते केव्हाही प्रवासाला निघत. बारा वर्षे संपादकीय कामगिरी बजावून प्रिस जोन्स फोर्ड फौण्डेशनकडे गेले. त्यानंतर आर्थर ब्रूक यांच्याकडे संपादकपद आले व ते पंधरा वर्षे होते. ब्रूक यांनी सौजन्य व सभ्यता यामुळे स्वतःविषयी टी. एल. एस. संबंधीच्या लेखात काहीही लिहिले नाही. ७४ साली त्यांची जागा जॉन ग्रॉस यांनी घेतली. चौदा वर्षे ते टी. एल. एस. मध्ये निनावी लिखाण करीत असल्याने ते त्याच्या परिवारातीलच होते. त्यांनी निनावी परीक्षणे व लेख बंद केले. आज तेच संपादक आहेत.

पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त टी. एल. एस. ने एक वैशिष्ट्यपूर्ण चर्चा घडवून आणली. गेल्या पंचाहत्तर वर्षांत कोणत्या पुस्तकांना वाजवीपेक्षा जास्त महत्त्व मिळाले व गुणवत्ता असतानाही कोणती गौण लेखली गेली, असा प्रश्न करून काही लेखकांकडून मते मागविण्यात आली. त्यातील काही उल्लेखनीय आहेत. इतिहासतज्ज्ञ टॉयनबी हे विशेषकरून टीकेचे लक्ष्य झालेले दिसतात. ए. जी. पी. टेलर यांनी म्हटले आहे, की टॉयनबी यांचा 'इतिहासाचा अभ्यास' हा प्रचंड ग्रंथराज फार महत्त्व पावला. वास्तविक त्यात अभ्यासही नाही व इतिहासही नाही ? गालब्रेथ यांच्या मते जॉर्ज ऑर्वेलला वाजवीपेक्षा जास्त महत्त्व मिळाले, तर विल्सन यांनी फोर्स्टर यांच्या 'हावर्डस् एन्ड' या कादंबरीचा निष्कारण गाजावाजा झाल्याचा अभिप्राय दिला आहे. इसाय बर्लिन यांचे हन्ना आर्डेट यांच्या ' द ह्यूमन कन्डिशन ' बद्दल हेच मत आहे. टेलर, बर्लिन, गालब्रेथ यांच्यासंबंधी कोणाचा अभिप्राय आला असता तर बरे झाले असते !

६-२-७७ ⊙

लंडन 'टाइम्स'मधील ७५ वर्षांतील वाचकांचा पत्रव्यवहार

लंडन टाइम्समधील वाचकांचा पत्रव्यवहार हा त्या पत्राचे एक खास वैशिष्ट्य आहे आणि इंग्लिश समाजाची स्पंदने त्यातून प्रगट होत असल्याने या पत्रव्यवहाराला त्या समाजाच्या दृष्टीने महत्त्व आहे. आता १९०० पासून ७५ पर्यन्त, म्हणजे पाऊणशे वर्षांतील, काही निवडक पत्रे 'द फर्स्ट कुकू' या नावाने प्रसिद्ध करण्यात आली असून या नावाच्या मागेही इतिहास आहे. ब्रिटिश समाज हा निसर्गप्रेमी असून दरवर्षी कोकिळेचा आवाज देशात कोणी प्रथम ऐकला, हे लंडन टाइम्समध्ये पत्र लिहून जाहीर होत असते. एका पत्रलेखकाने कळवले, की आपण त्या वर्षी फेब्रुवारीतच असा आवाज ऐकला. पण दुसऱ्या दिवशी त्याने लगेच आपली चूक झाल्याचे कळवले. उलट एक धर्मोपदेशक तक्रार करतो, की रविवारी चर्चमध्ये तो धर्मपर व्याख्यान देत असताना कोकिळेचा आवाज सारखा येत होता व त्यामुळे व्याख्यानात व्यत्यय आला!

केनेथ ग्रेगरी यांनी संपादित केलेल्या या पत्रसंग्रहात कोणाकोणाची पत्रे आहेत बर्नार्ड शॉ, एच. जी. वेल्स, रसेल, गॉल्सवर्दी, फिल्डमार्शल मॉंटगोमरी, लिडेल हार्ट, यहुदी मेनुहिन, पी. जी. वुडहाऊस, जॉर्ज मिकेश, रॉबर्ट ग्रेव्हज, टी. एस. इलियट अशा अनेकांची ही नावेच पत्रव्यवहाराचे वैशिष्ट्य आणि प्रतिष्ठा स्पष्ट करणारी आहेत. एका पत्रलेखकाने म्हटले आहे, की लंडन टाइम्समध्ये पत्र लिहिणे हे नामवंत आपले कर्तव्य मानतात आणि सर्वसामान्य तो आपला मान समजतात! दुसरा म्हणतो टाइम्सने पत्र नाकारणे याचाही अर्थ नामवंतांच्या पायापर्यन्त पोहोचण्यासारखे आहे. अशा या पत्राकडे आलेली सर्व पत्रे प्रसिद्ध करायची तर जाहिरातींची पाने सोडून बत्तीस पानांपैकी इतर मजकुरास तिलांजली द्यावी लागेलच, पण आणखी तेवढीच पाने खर्ची पडतील. पाऊणशे वर्षांतील टाइम्सकडे आलेली सर्व पत्रे वाचायची तर ग्रेगरी यांना तीस लाख पत्रे तरी वाचावी लागली असती; पण प्रसिद्ध झालेलीच पत्रे त्यांनी वाचली व त्यांची संख्या तीन लाख होती. एका पत्रलेखकाचे बऱ्याच वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेले पत्र त्याचेच आहे काय याची चौकशी ग्रेगरी यांनी त्याच्याकडे केली, तेव्हा इतके मूर्खासारखे पत्र आपण कसे लिहू असा प्रतिप्रश्न त्याने केला. यावर त्याला त्याच्या हस्ताक्षरातले

'द फर्स्ट कुकू' पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील रेखाचित्र

ते पत्रच दाखवले गेले, तेव्हा आपल्या क्लबमध्ये दुपारी यथेच्छ मद्यपान व भोजन करून झोपेने जडावलेल्या मनाने आपण ते लिहिले असावे, असा खुलासा आला !

मासलेवाईक

या पाऊणशे वर्षांत दोन महायुद्धे झाली. ब्रिटिश साम्राज्य संपुष्टात आले. पण मानवी स्वभाव मूलतः फारसा बदलला नाही. विशेषतः ब्रिटिश समाजात ज्या चांगल्या अर्थाने चक्रमपणाचे (एक्सेन्ट्रिसिटी) कौतुक केले जाते तसे आजही होते. असे चक्रमपणाचे काही नमुने या पत्रात दिसतात. एकजण विचारतो, माझ्या बगिच्यावरून विमान जाते व त्यामुळे मला फार त्रास होतो. यासाठी माझी हद्द बेकायदा ओलांडल्याबद्दल कोर्टात फिर्याद करता येईल काय? त्यानंतर आलेल्या जेट व सुपरसॉनिक विमानांच्या युगात त्याची काय स्थिती झाली असेल कोणास ठाऊक! दुसरा एक लिहितो, की लंडनमधील गायींचे गोठे हलविण्याचे धोरण चुकीचे आहे; मी लहान असता सेंट जेम्स पार्कमध्ये गायींची खिल्लारे फिरत व आम्ही मुले कौतुकाने पाहात असू. लंडनसारख्या शहरातील रहिवाशांना गोठे हलविले तर गायी कशा बघावयास मिळणार? मुम्बईकरांपुढे हा प्रश्न नाही. येथे भर रस्त्यात गायी सुखेनैव फिरतात व रेल्वेच्या पुलावरही ठाण मांडून बसतात. आपण गायीला गाय न मानता गोमाता मानीत असल्याने मातेचा अवमान कसा करणार? १९०३ साली दोनतीन दिवसातील मोटरच्या अपघातांचे वृत्त वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेले पाहून एक वाचक मोटर चालवण्यावर जबळजबळ बंदी घालावी अशी मागणी करतो. हा पत्रलेखक आज जिवंत आहे की नाही हे स्पष्ट झालेले नाही. पासपोर्टसाठी श्री. डिग्बी या गृहस्थाने अर्ज केला होता. त्याने फॉर्मवर 'चेहरा' या सदराखाली लिहिले 'हुशार!' पण असे असताही पासपोर्टावर मात्र अधिकाऱ्याने 'अंडाकृती चेहरा' असे लिहिले, याचा डिग्बी यांना राग आला. म्हणून टाइम्समध्ये पत्र लिहून ते विचारतात, मी हुशार असे लिहिले असताना त्यामध्ये बदल करण्याची हुशारी पासपोर्ट अधिकाऱ्याने का दाखवावी? एका ब्रिटिश कृष्णराव मराठेचे लंडनमधील नाइटक्लबमुळे पित्त खवळले. क्लब वा हॉटेलातील वेटर कसा असावा याची अनुभवजन्य कसोटी एका वेटरनेच पत्रातून स्पष्ट केली असून, टाइम्सने वेटरसंबंधी काही हलके-फुलके लिहिले हे बाष्कळपणाचे असल्याची समजही दिली आहे. तो असेही म्हणतो, की इंग्लंडमध्ये चांगल्या वेटर्सपेक्षा चांगले वकील बरेच आहेत हे खरे, पण याचे कारण काय? तर वकील होण्यासाठी फारसे परिश्रम करावे लागत नाहीत, पण चांगला वेटर होण्यासाठी फार परिश्रम पडतात, त्याची कसोटी फार कडक असते! अशी मासलेवाईक पत्रे अनेकांनी लिहिली आहेत.

नामवंतांची पत्रे

नामवंतांच्या पत्रांचे विषय अनेकविध आहेत. बर्नार्ड शॉ एका पत्रात तक्रार करतात, की ते एका संगीताच्या कार्यक्रमास गेले असता, त्यांना नियमाप्रमाणे काळा सूट, बो वगैरे पोषाख करावा लागला; पण पोशाखाचे नियम अशा कार्यक्रमांना येणाऱ्या स्त्रियांना लागू नाहीत काय? शॉ यांच्यासमोर बसलेल्या एका स्त्रीने आपल्या कानावर एका काळ्या पक्षाची पीन लावली होती. जणू नुकताच पक्षी मारून व तो भरून कानावर बसवला होता! हे सर्व हिडीस दिसत होते. ही स्त्री उशिरा आली याबद्दल तक्रार नाही. वस्तुतः ती अधिक उशिरा येऊन लवकर गेली असती तर बरे झाले असते! दुसऱ्या एका पत्रात बीबीसीवरून बातम्या देण्याऱ्यांच्या इंग्रजी उच्चारांची शॉ यांनी भरपूर टिंगल केली आहे. आपल्या आकाशवाणीवरील मराठी (!) बोलणाऱ्या अनेकांबद्दल असे कोणी पत्र लिहील काय? टी. एस. इलियट यांना इंग्लंडमध्ये प्रथम टेलिव्हिजन आला तेव्हा सावधगिरीचा इशारा द्यावासा वाटला. यामुळे मुलांचा अभ्यास बुडेल ही भीती त्यांना होतीच, पण एकंदरीतच कला, ज्ञान इत्यादींचा दर्जा कमी होईल असे वाटून त्यांनी टेलिव्हिजनचा फारसा प्रसार होऊ नये असे म्हटले होते. इलियट यांच्या या पत्राचा काहीच परिणाम झाला नाही हे उघड आहे. गॉल्सवर्दी यांनी युद्धाला विरोध केला आहे आणि सर्वसाधारण ब्रिटिश माणसाच्या हलाखीच्या जीवनाविषयी पार्लमेन्ट उदासीन असल्याची व्यथा बोलून दाखविली आहे. थॉमस हार्डी यांनी मिल्ल यांच्या

जन्मशताब्दीनिमित्त १९१० साली पत्र लिहिले असून १८६५ च्या एका दुपारी मिल्ल यांचे निवडणूक मोहिमेतील भाषण आपण कसे ऐकले याची आठवण सांगितली आहे. जॉर्ज मिकेश यांनी लंडन टाइम्सच्या एका अग्रलेखाच्या संदर्भात ब्रिटिश लोक हे सौजन्यशील पण अकार्यक्षम असल्याबद्दलचे तीन अनुभव दिले आहेत. त्यांचा टेलिव्हिजन सेट अनेकदा स्मरण देऊन दुरुस्त झाला नाही, घरातील उष्णतायंत्र दहा दिवस दुरुस्त झाले नाही आणि झाडे विकणाऱ्या दुकानदाराला झाडांची काही माहिती नव्हती. उलट एका जर्मन कंपनीकडे काही विचारणा केली असता उलटटपाली उत्तर व हवी ती माहिती मिळाली.

असे जरी असले तरी यहुदी मेनुहिन यांनी लंडन हे अद्यापही कसे सुन्दर शहर आहे याचे वर्णन करून त्यातील उद्याने, मोकळ्या जागा इत्यादींची प्रशंसा केली आहे. लंडन हे अद्याप राहण्यास योग्य असून त्यावर प्रेम करण्यासारखे (लिव्हेबल व लव्हेबल) आहे असे मेनुहिन म्हणतात आणि त्यांच्या या म्हणण्यास कोणीही दाद देईल ! २८-८-७६ ◉



एका सभ्य आणि यशस्वी प्रकाशकाची कथा

जोनाथन केप ही ब्रिटिश प्रकाशन संस्था प्रसिद्धच आहे. तिला अर्धशतक होऊन गेले. पेंग्विनने या प्रकाशनसंस्थेचा व प्रकाशक जोनाथन केप यांचा उद्‌बोधक इतिहास प्रसिद्ध केला आहे. हेमिंग्वे, टी. ए. लॉरेन्स, सिंक्लेअर लिविस असे नामवंत लेखक या प्रकाशनसंस्थेला मिळाले. यापैकी काहींच्या पहिल्याच पुस्तकाने इतिहास निर्माण केला. व्हिक्टर गोलॅन्झ यांनी आपल्या प्रकाशनसंस्थेवर स्वतःच्या व्यक्तित्वाचा प्रभाव टाकलेला होता. तीच स्थिती जोनाथन केप यांची. पण गोलॅन्झ यांच्या मते जोनाथन केप हे अधिक चांगले प्रकाशक होते.

अर्ध्या शतकाची या प्रकाशनसंस्थेची कहाणी ही एकप्रकारे या काळातील इंग्रजी वाङ्मयाचाच आलेख स्पष्ट करणारी आहे. लंडनमध्ये ब्रिटिश म्युझियमच्या आसपास ग्रंथविक्रीची दुकाने व प्रकाशनसंस्था यांचा पसारा आहे. किंग्जहुना ज्याला ब्लूम्सबरी हा भाग म्हणतात तो विद्यापीठ, महाविद्यालये, लेखकांची निवासस्थाने, पुस्तकांची सुसज्ज दुकाने आणि प्रकाशनसंस्था यांनीच संपन्न आहे. तेथेच ३० बेडफर्ड स्क्वेअर हा जोनाथन केप या प्रकाशनसंस्थेचा पत्ता सापडेल.

प्रारंभ व यश

जोनाथन केप यांनी आपल्या आयुष्याला सुरुवात केली तीही पुस्तकाच्या दुकानात निरोप्याचे काम करण्यापासून. वयाच्या सोळाव्या वर्षी ते 'हॅचर्ड' या पिकॅडलीतील पुस्तकांच्या प्रसिद्ध दुकानात नोकरीला होते. पुस्तकांच्या आत्माऱ्यांच्या मागे राहून ते पुस्तके वाचीत. आठवड्याला बारा शिलिंग एवढा पगार मिळे. चार वर्षे हे काम केल्यावर हार्पर ॲन्ड ब्रदर्स या प्रकाशनसंस्थेचे फिरते विक्रेते म्हणून त्यांनी काम करण्यास सुरुवात केली. हार्पर ॲन्ड ब्रदर्स ही अमेरिकन प्रकाशनसंस्था. तिचे लंडनमध्ये कार्यालय होते. या संस्थेने 'ए हिस्टरी ऑफ अमेरिकन पीपल' हा प्रिन्स्टन विद्यापीठाचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांचा ग्रंथ प्रसिद्ध केला होता.

एकदा विल्सन हे आपल्या पुस्तकाचा खप कसा होत आहे हे पाहण्यासाठी या कार्यालयात आले तेव्हा जोनाथन केप हे तेथे होते. त्यांनी हा ग्रंथ वाचला होता व त्यामुळे त्याविषयी ते बोलू शकत होते. विल्सन यांनी मग त्यांना भोजनाला बोलावले. पुढे विल्सन अमेरिकेचे अध्यक्ष झाले व अमेरिकन अध्यक्षाबरोबर भोजन केल्याचा दावा जोनाथन केप यांना करता आला.

हार्पर ॲन्ड ब्रदर्स यांच्यानंतर डकवर्थ यांच्याबरोबर ते लंडनमधील विक्रेते म्हणून काम करू लागले व सात वर्षांत मॅनेजर झाले. पण पुढे डकवर्थ त्यांना भागीदार करून घेईनात, तेव्हा स्वतःचीच प्रकाशनसंस्था काढण्याचे त्यांनी ठरवले. मात्र प्रत्यक्षात अशी संस्था स्थापन होण्यास वेळ लागला. तथापि विक्रेता व व्यवस्थापक या नात्याने जोनाथन केप यांना चांगला व विविध स्वरूपाचा अनुभव आला होता आणि या जोरावरच त्यांनी आपली संस्था स्थापन केली होती.

जॉर्ज रेन हॉवर्ड व ते मिळून त्यांनी ही संस्था स्थापन केली. हॉवर्ड हे अतिशय शिस्तबद्ध व काटेकोरपणे काम करणारे गृहस्थ होते आणि ग्रंथ प्रकाशनाचा त्यांचा अनुभवही चांगला होता. त्यावेळी डाऊटी यांचे 'अरेबिया डेझर्टी' हे पुस्तक गाजले होते. त्याची आवृत्ती संपली होती. पण डकवर्थ दुसरी आवृत्ती काढण्यास राजी नव्हते. मग जोनाथन केप यांनी उत्तमपैकी आवृत्ती काढली. टी. ए. लॉरेन्स यांची त्यात प्रस्तावना होती. या ग्रंथाने जोनाथन केप यांनी आपल्या प्रकाशनसंस्थेचे नाव केले. आपल्या संस्थेत त्यांनी गार्नेट यांना हस्तलिखित वाचून मत देण्याचे काम दिले होते. गार्नेट हे ब्रिटिश म्युझियमचे ग्रंथपाल. त्यांचा व्यासंग दांडगा. त्यांच्याकडे आलेल्या हस्तलिखितांचे ते काळजीपूर्वक वाचन करीत आणि आपली मते देत. नवे लेखक पुढे आणण्यात त्यांना आनंद होता. वाङ्मयाचा त्यांचा व्यासंग खोल होता. जोनाथन केप यांच्याकडे सोळा वर्षे त्यांनी हे काम केले.

अनेक उपक्रम

प्रकाशनसंस्था स्थापन केल्यावर पहिल्याच वर्षात ते अमेरिकेत गेले आणि त्यांनी नॉफ वगैरे नामवंत प्रकाशकांकडून काही गाजलेल्या पुस्तकांच्या प्रकाशनाचे हक्क थोडक्यात मिळवले. यानंतर दरवर्षी अमेरिकेला भेट देऊन या प्रकारचा व्यवहार करण्याचा जोनाथन केप यांचा परिपाठ त्यांच्या मृत्यूपर्यंत कायम राहिला. प्रकाशनसंस्थेच्या दुसऱ्याच वर्षात सिंक्लेअर लिविस यांच्या 'बॅबिट' या कादंबरीने नाव कमावले. याच वर्षी जोनाथन केप यांनी 'नाऊ ॲन्ड देन' या नांवाचे नियतकालिक सुरू केले. यात ग्रंथांची माहिती, ग्रंथप्रकाशनविषयक प्रश्नांची चर्चा येत असे. हे नियतकालिकसुद्धा तत्कालीन इंग्रजी वाङ्मयाची माहिती करून घेण्यास उपयुक्त होते.

प्रारंभीच्या काळातील त्यांचा मोठा लेखक म्हणजे एच. जी. वेल्स. यांच्या कादंबऱ्यांचा खप मोठ्या प्रमाणात होऊन प्रकाशकाचेही नाव झाले. नंतर फोरस्टर हेही त्यांचे लेखक झाले. त्या पाठोपाठ जेम्स जॉइस यांच्या चार कादंबऱ्या प्रसिद्ध करण्यात आल्या आणि त्यांचा फार बोलबाला झाला. इंग्रजी कादंबरीला नवे वळण लागले ते जॉइस यांच्या या कादंबऱ्यांनी. दरवर्षी उत्कृष्ट लघुकथांचा संग्रह प्रसिद्ध करण्याची नवी प्रथा जोनाथन केप यांनी पाडली.

तथापि या प्रकाशन संस्थेला आर्थिकदृष्ट्या प्रचंड उठाव कोणी दिला असेल तर तो टी. ए. लॉरेन्स यांच्या 'सेव्हन पिलर्स'ने. सहा महिन्यांत त्याच्या नव्वद हजार प्रती संपल्या आणि विशिष्ट काळानंतर अधिक प्रती न छापण्याची अट असल्याने नव्वद हजारावर विक्री झाल्यानंतर आणखी आवृत्ती काढण्याचे थांबवावे लागले. बर्नार्ड शॉ यांनी लॉरेन्स यांना ही युक्ती सुचवली होती. यामुळे पुस्तकाची मागणी कायम राहाते व पुढे आवृत्ती प्रसिद्ध झाली की लेखकाला चांगले पैसे मिळतात. लॉरेन्स यांच्या या पुस्तकाने जोनाथन केपनीचा नफा दोन हजार पौंडावरून अठ्ठावीस हजार पौंडापर्यंत गेला. पुढे १९३५ साली 'सेव्हन पिलर्स'च्या पुनर्मुद्रणाची परवानगी लॉरेन्स यांनी दिली. त्याच्या छपाईची प्रचंड तयारी करण्यात आली आणि थोड्याच दिवसात एक लाख प्रती हातोहात उडाल्या. प्रकाशकाने अर्थात विक्रेत्यांचे कमिशन कमी केले; पण विक्री तुफान होत होती. कंपनीचा नफा एकदम वाढला. संचालकांना भागभांडवलावर दहा

हजार पौंड लाभांश म्हणून मिळाले.

पेंग्विन पुस्तकाची कल्पना निघाली तेव्हा जोनाथन केप यांना तिच्या यशाची खात्री नव्हती तरी त्यांनी आपली सहा प्रकाशने पेंग्विनसाठी दिली. पुढे पेंग्विनचे यश हे जोनाथन केप यांना लाभदायक ठरले. युद्धानंतर ईअन फ्लेमिंग यांच्या कादंबऱ्या हा जोनाथन केप प्रकाशनाच्या यशाचा मानबिंदू ठरला.

अनेकविध माला हे या प्रकाशनसंस्थेचे आणखी एक वैशिष्ट्य. इतिहास, प्रवास, वन्य प्राणी इत्यादिसंबंधी ग्रंथांच्या माला प्रकाशित करण्यात आल्या व त्या गाजल्या. डफ कूपर यांचे 'तालेराँ' वगैरे ग्रंथ याच मालेत प्रसिद्ध झाले. युद्धकाळात अनेक सैनिकांनी केलेल्या कवितांचा संग्रह वेव्हेल यांनी संपादित केला होता तोही लोकप्रिय ठरला.

जोनाथन केप यांच्या व्यक्तित्वाचा ठसा त्यांच्या प्रकाशनावर पडलेला असे. पण कर्तबगार व्यक्तीची खरी कर्तबगारी संस्था उभी करण्यात असते. जोनाथन केप यांनी प्रकाशनसंस्था उभी केली म्हणून त्यांच्या मागे ती प्रतिष्ठा टिकवून आहे. एक सभ्य आणि यशस्वी प्रकाशक अशी त्यांची ख्याती होती. ३०-७-७८ ⊙

इंग्लंडचा साहित्यिक परिचय

बहुतेक पाश्चात्य देशांनी आपली ऐतिहासिक आणि साहित्यिक स्मारके उत्तमपैकी जतन केली आहेत. तुम्ही पॅरिसची सफर काढा, लंडनची काढा की बर्लिनची. वाटाड्या तुम्हाला ही अनेक स्मारके दाखवतो. पॅरिसच्या प्रवासी बसमध्ये निरनिराळ्या भाषेतून मार्गदर्शकाचे वर्णन ऐकण्याची व्यवस्था आहे आणि इतर शहरातल्यापेक्षा पॅरिसच्या वाटाड्याचे वर्णन अधिक काव्यमय असते. तथापि ज्यांना ही शहरे पहायला मिळाली वा मिळतील त्यांची ही सोय झाली, तरी अखेरीस हे तात्पुरतेच असते.

पण इंग्लंडचा साहित्यिक परिचय करून देण्याचे डोरोथी ईगल व हिलरी कार्नेल यांनी ठरवून एक ग्रंथच प्रसिद्ध केला आहे. 'द ऑक्सफर्ड लिटररी गाईड टू द ब्रिटिश आइल्स' (ऑक्सफर्ड प्रेस, कि. ३·९५ पौंड) हे त्याचे नाव. यात विद्यमान लेखकांना वगळण्यात आले आहे. त्यामुळे आजचे अनेक नामवंत कोठे राहतात, याची कल्पना येणार नाही. विद्यमान लेखकांचे उल्लेख का वगळण्यात आले, हे समजणे कठीण. पण हा भाग वगळला, तर इंग्लंडची ही साहित्यिक सफर आल्हाददायक वाटते.

हा परिचय करून देताना लेखकांची नावे व पत्ते असे निर्जीव लिखाण केले गेलेले नाही. तर निरनिराळ्या लेखकांच्या साहित्यकृती कोठे जन्मल्या, कोठल्या साहित्यात, कोठल्या भागाचे, व कोणत्या लोकांचे चित्रण आहे याची थोडक्यात ओळख करून दिलेली असल्याने हा परिचय कंटाळवाणा होत नाही. काही ब्रिटिश पत्रांत या पुस्तकाचे परीक्षण करताना काही अनुल्लेख असल्याचे वा काही चुकीचे उल्लेख असल्याची टीका आली होती.

पण हे दोष अगदीच थोडे व क्षुल्लक आहेत. लेखकद्वयांनी किती मेहनत घेतली असेल, याची कल्पना कोणतेही पान उघडल्यावर येते. कारण अनेक शतकांची स्मारके यात ग्रथित आहेत. त्यांतील काही वास्तु आता अस्तित्वात नाहीत. त्याऐवजी तेथे दुसरेच काही आढळेल. या सर्वांचा उल्लेख करताना फार मेहनत ध्यावी लागली असणार, हे उघड आहे.

इंग्लंडमधील अनेक शहरांपेक्षा लंडनमध्ये साहित्यिक, कवी, तत्त्वज्ञ, नाटककार यांचे वास्तव्य पूर्वापारच विशेष प्रमाणात आहे. त्यामुळे लंडनवर या पुस्तकात बरीच पाने खर्ची पडणे साहजिक आहे. लंडनच्या अनेक भागांत वास्तव्य करण्यात डॉ. जॉन्सन व डिकन्स यांचा हात धरणारा कोणी आढळणार नाही. डिकन्स तर अगदी भिकार विभागांतून अतिशय उच्च वस्तीत राहायला आला होता. ब्लॅकफायरसारख्या भागात सतराव्या शतकातही सातशे प्रेक्षक बसतील एवढे नाट्यगृह होते. शेक्सपियरचे 'सिंबेलिन' हे नाटक तेथे १६२० साली झाले. नाटककंपनीत शेक्सपियरची भागीदारी होती आणि ती त्याला किफायतशीर पडे. याच ब्लॅकफायरसारख्या भागात डिकन्सच्या डेव्हिड कॉपरफिल्डचा काही काळ गेला. डेव्हिड कॉपरफिल्डचे तेथील जीवन दारिद्र्य, दैन्य यांनीच परिपूर्ण होते. खुद्द डिकन्स त्या भागात एक काळ राहात असल्याने त्याने हे अनुभवजन्य वर्णन पुस्तकात केले. त्याला मिकॉबर हे पात्रही येथेच भेटले. मिकॉबर हा कमालीचा आशावादी आणि कायम कर्जबाजारी. त्याच्या व्यक्तित्वाचा ठसा वाचकावर कायमचा पडतो.

ब्लॅकफायर्सवरून पुढे गेले की, फ्लीट स्ट्रीट. लंडनमधील वृत्तपत्रांचे हे माहेरघर. बेन जॉन्सनने येथे 'अपोलो क्लब' स्थापन केला. थॉमस रॅंडॉल्फ याला त्याचे सभासद व्हावयाचे होते, पण तो कफल्लक. तेव्हा त्याने कविता केली व ती क्लबची फी म्हणून स्वीकारली गेली! येथील 'डिक्स कॉफी हाऊस' हे ॲडिसन व स्टील यांचे नित्यभेटीचे ठिकाण. त्यावेळचे काही क्लब, मद्यपान व कॉफीगृहे आता अस्तित्वात नाहीत. शेक्सपियर, बेन जॉन्सन हे 'ट्रु मिटर्स' या खानावळीत अनेकदा येत. ती आता अस्तित्वात नाही. 'सेंट डन्स्टन इन द वेस्ट' हे धर्ममंदिर. डिकन्सच्या एका कथेचे लिखाण येथे झाले. फ्लीट स्ट्रीट हा डॉ. जॉन्सनचा विशेष आवडता रस्ता. येथे 'चेशायर चीज' या नावाचा पब (मद्यपान-गृह) आहे. त्याच्या शेजारीच डॉ. जॉन्सनचे घर आहे आणि राष्ट्रीय स्मारक म्हणून ते जपले आहे. चेशायर चीज या पबमध्ये डॉ. जॉन्सन, डिकन्स वगैरे कोणत्या ग्राकावर बसत याचा निर्देश करणारे लहान फलक लावले आहेत. अर्थात चेशायर चीजमध्ये गेल्यावर या साहित्यिकांच्या स्मृत्यर्थ दुपार असेल तर जिन ॲंड टॉनिक, व संध्याकाळ असेल तर बिअर आणि रात्र असेल तर व्हिस्की पिणे अटळ बनते!

गोल्डस्मिथचे घर याच भागात होते. त्याला कर्ज झाले आणि घरमालकीण त्याला पोलिसांच्या ताब्यात ग्रावयास निघाली. तेव्हा डॉ. जॉन्सनने त्याला सोडवले आणि त्याच्याजवळील 'व्हिकार ऑफ वेकफिल्ड' या कादंबरीचे हस्तलिखित प्रकाशकाला विकून गोल्डस्मिथला थोडे पैसे मिळवून दिले. पुढे प्रकाशकाने गोल्डस्मिथला आपल्या घरापाशीच राहायला जागा देऊन त्याची देखभाल केली.

याच भागातल्या टाइट स्ट्रीट या रस्त्यावर ऑस्कर वाइल्डचे घर आहे. त्याची बहुतेक महत्त्वाची नाटके तेथेच लिहिली गेली. रॉयल कोर्ट थिएटर या नाट्यगृहाच्या दर्शनी भागात बर्नार्ड शॉचा अर्धपुतळा आहे. कारण १९०४ ते १९०७ या काळात त्याची तेथे अकरा नाटके झाली. एकूण ७०१ प्रयोग झाले. केन कोर्ट या इमारतीत 'पंच' या अद्वितीय नियतकालिकाचा जन्म झाला.

ब्लूम्सबेरी हा भाग असाच नावाजलेला. कार्लाइलपासून व्हर्जिनिया वूल्फपर्यंत अनेकांचे वास्तव्य येथे होते. ब्रिटिश म्युझियम व लायब्ररी ही जगविख्यात संस्था येथेच आहे. हॅम्पस्टेट हिथपाशी कीटस् राहात होता व त्याची प्रेयसी फॅनी ब्रॉन शेजारीच राहात असे. कीटस्च्या बागेतील नाइटिंगेलचे गाणे ऐकूनच त्याने 'ओड टू द नाइटिंगेल' ही सुरेख कविता लिहिली.

अशी एक ना अनेक स्मारके साऱ्या देशभर विखुरली आहेत. लंडनमध्ये त्यांची संख्या अधिक. लंडन हे केवळ राजकारण व व्यापार उद्योगाचे शहर नाही. ती सांस्कृतिक राजधानी आहे हे या इतिहासवरूनही स्पष्ट होईल.

१४-८-७७

लंडनवर प्रेम करणारा रशियन राजदूत इव्हान मेस्की

अलेक्झांडर नेकरिच हा रशियन इतिहासकार नुकताच रशिया सोडून पाश्चात्य देशात आला असून त्याने 'सव्हें' या त्रैमासिकात इव्हान मेस्की याच्यासंबंधी लेख लिहिला आहे. इव्हान मेस्की हा पहिल्या युद्धाच्या काळात लंडनमध्ये वास्तव्य करीत होता. तो मेन्शेव्हिक, पण रशियन क्रांतीच्या वेळी तो बोल्शेव्हिक झाला. झारची सत्ता उलथण्यासाठी क्रांती करण्याचा ध्यास त्याला लागला होता आणि याच कारणास्तव त्याला परागंदा व्हावे लागले होते. निरनिराळे देश फिरत फिरत तो इंग्लंडमध्ये आला. क्रांतीनंतर तो रशियात गेला आणि पुढे १९३२ ते ४५ या काळात मेस्की हा रशियाचा वकील म्हणून इंग्लंडमध्ये राहात होता. एक विद्वान, चतुर राजदूत असा त्याचा नावलौकिक होता आणि इंग्लंडच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवनातील मोठमोठ्या व्यक्तींशी त्याचे मित्रत्वाचे संबंध होते. स्टालीनच्या अनेक शुद्धीकरण मोहिमांतून तो वाचला खरा, पण पुन्हा एकदा अटकेचे सत्र सुरू झाले तेव्हा मेस्कीही त्यात सापडला.

मेस्कीला स्टालीनने विनाकारण अटकेत टाकले असे गुप्त पोलीस-प्रमुख बेरिया याला वाटत होते व म्हणून स्टालीनच्या मृत्यूनंतर त्याने मेस्कीला सोडण्याचे ठरवले. तशी नोंद त्याने केली होती. पण पुढे बेरियाचेच शिरकाण झाले आणि बेरियाची ही नोंद मेस्कीच्या विरुद्ध गेली. कारण क्रुश्चेव; बुल्गानिन वगैरेंची समजूत झाली, की मेस्की हा बेरियाचाच माणूस आहे. एवढेच नव्हे तर मेस्कीला तो परराष्ट्रमंत्री करणार होता असासुद्धा त्यांना संशय होता. त्यामुळे स्टालीनच्या मरणानंतरही दोन-अडीच वर्षे मेस्कीला कारावासातच राहावे लागले. पुढे सुटल्यावर मात्र तो ॲकडमी ऑफ सायन्सेसमध्ये काम करीत असे. नेकरिच याची तेथेच त्याची ओळख झाली व त्याच्या मार्गदर्शनाखाली नेकरिच संशोधन करीत असे. नेकरिच आपल्या लेखात म्हणतो, की मेस्कीला मॉस्कोपेक्षा लंडन अधिक आवडत असे, तेथे तो अधिक रमे.

मेस्कीने चार भागांत आपले आत्मचरित्र लिहिले असून त्याचा दुसरा खंड आकस्मिकपणे एका ग्रंथविक्रेत्याकडे मिळाला. तो वाचल्यावर नेकरिच याच्या म्हणण्याचा प्रत्यय आला. १९३२ साली रशियाचा वकील म्हणून मेस्की लंडनला आला तेव्हा साहजिकच त्याचे सरकारी इतमामाने स्वागत

झाले. परंतु क्रांतीपूर्व काळात तो लंडनला आला तेव्हा परिस्थिती वेगळी होती. तो आला तो बोटीच्या तिसऱ्या वर्गाने. प्रवास करणाऱ्या परदेशी प्रवाशापाशी पाच पौंड नसतील तर त्याला तेव्हा परत पाठवीत, मेस्कीजवळ एवढी रक्कम नव्हती म्हणून परत जाण्याचा प्रसंग त्याच्यावर आला होता. तथापि जकात अधिकाऱ्याने मेहेरबानी केली. नंतर मेस्कीचे लंडनमधील जीवन सुरू झाले. या जीवनाचे वर्णन त्याने आत्मचरित्राच्या दुसऱ्या खंडात केले आहे. खिशात पैसे नसत आणि म्हणून लंडनच्या अनेक भागांत पायीच फिरण्याखेरीज गत्यंतर नव्हते. मेस्कीच्या बरोबरचे अनेक रशियन क्रांतिकारक हेही असेच कफल्लक होते. त्यांच्या जीवनाचे मार्मिक चित्रण मेस्कीने केले आहे.

लंडनमधील उद्याने असोत की चारिंग क्रॉससारखे स्टेशन असो मेस्की त्यासंबंधी अगदी रंगून वर्णन करतो. मग ब्रिटिश म्युझियमच्या ग्रंथालयाचे त्याने किती प्रेमाने वर्णन केले असेल याची कल्पनाच केलेली बरी. मेस्की हा या ग्रंथालयाचा नियमित वाचक. सकाळी दरवाजा उघडल्यापासून या ग्रंथालयात येणाऱ्यांपैकी तो एक. मार्क्स व लेनिन जेथे बसत त्या जागेबद्दल त्याला भक्तिभाव. लेनिन ब्रिटिश म्युझियममध्ये वाचनलेखन करी तेव्हा त्याच्या वाचनाचा वेग आणि व्याप्ती पाहून तेथील सेवकवर्ग आश्चर्यचकित होई, पण अशा वाचकांवर प्रेम करणारा तो सेवकवर्ग होता (आणि आहे). याच ग्रंथालयात मेस्कीला एक चिनी तत्त्वज्ञानाच्या इतिहासावर ग्रंथ लिहिण्यासाठी अभ्यास करणारा ऐंशी वर्षांचा म्हातारा इंग्रज भेटला. एक फ्रेंच म्हातारी येत असे. तिचे कपडे फाटके-तुटके असत. तिची दैन्यावस्था करुणाजनक होती. ही फ्रेंच म्हातारी संगीताची पौकिन. तेव्हा ती नामवंत संगीतकारांचे ग्रंथ घेऊन तासनतास वाचीत बसे. यामुळे आपल्याला त्यांचे संगीत ऐकण्याचा ब्रह्मानंद मिळतो असे तिचे म्हणणे. एक दिवस ही फ्रेंच बाई वारली आणि आश्चर्याची गोष्ट अशी की एक लाख फ्रँकच्या नोटा तिच्या गादीत शिवून ठेवलेल्या होत्या! एकदा कम्युनिस्ट क्लबमधील एका जर्मन तरुणीबरोबर मेस्कीने जेवण घेतले व तिला तो तिच्या घरी पोहोचवायला गेला तेव्हा रात्रीचा दीड झाला होता. आगगाड्यांची वेळ संपली होती व टॅक्सी करणे परवडणारे नव्हते. तेव्हा मेस्की चालत निघाला. हायगेटमधील त्याच्या खोलीवर तो आला तेव्हा चांगले उजाडले होते. चारपाच तास त्याला चालावे लागले, पण या परिक्रमेत त्याला लंडनच्या जीवनाचे दर्शन घडले. (हायगेटमधील दफनभूमीत मार्क्सचे दफन झाले व तेथे त्याचा पुतळाही आहे.)

लंडनमध्ये लिटव्हिनॉव्ह, क्रोपोटकीन, चिचेरिन अशा व्यक्तींची व मेस्कीची मैत्री जमली. लिटव्हिनॉव्ह हा क्रांतीपूर्वी लंडनमध्ये वास्तव्य करून लेखन करी, सभा भरवी, रशियातून आलेल्यांना त्याचा आधार होता. तो नाटकातसुद्धा काम करीत असे. पुढे क्रांतीनंतर तो रशियन वकील म्हणून नेमला गेला. पण नव्या सरकारला ब्रिटनची मान्यता नव्हती म्हणून परराष्ट्रमंत्री बाल्फर लिटव्हिनॉव्हला भेटू शकत नसत. तथापि त्यांनी एका दुय्यम अधिकाऱ्याकडे हे काम सोपवले होते. ब्रिटनने रशियावर स्वारी केली तेव्हा अर्थात लिटव्हिनॉव्हचे अनधिकृत राजदूतपदही संपले. एवढेच नव्हे तर त्याला दहा दिवस तुरुंगवास घडला.

रशियातील क्रांतिकारक उठावाची व झार पदच्युत झाल्याची बातमी मेस्कीला मिळाली ती ब्रिटिश हुजूर पक्षीय पत्राच्या कचेरीमुळे. तेथे गेलेल्या एका रशियन पत्रकाराला हे वृत्त कळले. त्याने त्याची मुद्रितेच घेतली व ती घेऊन तो मेस्कीच्या घरी रात्री उशिरा आला. मग ते दोघे आपल्या मित्रांकडे ही वार्ता सांगण्यासाठी गेले. या भेटीगाठीत मध्यरात्र उलटली. मेस्की खोलीवर परत येण्यासाठी जवळच्या भुयारी रेल्वेच्या स्टेशनवर गेला ते बेल्साइझ पार्क हे स्टेशन होते. तेथे एक जोडपे तिकिटाच्या खिडकीशी उभे होते. मेस्कीला राहवले नाही, तो त्यांच्याजवळ जाऊन म्हणाला 'रशियात क्रांती झाली, झार उडाला.' ते जोडपे हा कोणीतरी वेडा असावा अशा दृष्टीने पाहात होते. गाडी आली, पण हायगेटच्या आपल्या खोलीवर मेस्की गेलाच नाही. क्रांतीची वार्ता सांगण्यासाठी तो आपल्या रशियन मित्रांच्या घरांचे दरवाजे मध्यरात्रीनंतर ठोठावत होता. सर्वांनी जल्लोश केला आणि मग थोड्याच दिवसात मेस्की स्वदेशी परतला.

१९-६-७७ ◉

साहित्यिकांच्या कथा आणि दंतकथा

ब्रिटिश साहित्यिकांच्या कथा व दंतकथांचा संग्रह प्रसिद्ध झाला आहे. (ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटी प्रेस. पृष्ठे ३८२, किं. ३ पौंड ७५ पेन्स). शेक्सपिअर, चॉसर यांच्यापासून इलियटपर्यंत अनेक कवी, नाटककार, कादंबरीकार, इतिहासकार यांच्या अनेकविध कथा आणि दंतकथा यात समाविष्ट केलेल्या आहेत. साहित्यिकांमधील वैमनस्य, मैत्री, त्यांचा तऱ्हेवाईकपणा इत्यादी अनेक गुणांची ओळख करून देणारा हा संग्रह आहे.

मुद्राराक्षस

१६८१ मध्ये रॉबर्ट बार्कर व मार्टिन लुकास यांनी बायबलच्या एक हजार प्रती छापून प्रसिद्ध केल्या. पण त्यात मुद्राराक्षसाने कहर केला. खिस्ताच्या ज्या दहा आज्ञा आहेत त्यांतील एक तुम्ही व्यभिचार करू नका अशी आहे. पण या बायबलमध्ये तुम्ही व्यभिचार करा असे छापले गेले. साहजिकच हजार प्रती नष्ट करण्याखेरीज गत्यंतर राहिले नाही. त्यावेळी पहिला चार्लस् राज्यावर होता. त्याने या प्रकाशकांना तीन हजार पौंड दंड केला. यातून आवश्यक त्या ग्रीक आवृत्त्या (मेट्रिसेस) वेण्यात आल्या. तत्पूर्वी लंडनच्याच छापखान्यात छापलेल्या एका बायबलच्या आवृत्तीत एक श्लोकच नव्हता. त्याबद्दलही तक्रार झाली होती व त्यामुळे सरकार बायबलच्या प्रकाशनाबाबत जागरूक बनले. त्यानंतर केंब्रिज प्रेस व लंडनचे प्रकाशक यांच्यात बायबल छापण्याबाबत स्पर्धा सुरू झाली.

बायकांची आफत

ड्रायडन आणि त्याची बायको यांचे फारसे कधी जमत नसे. ड्रायडन हा आपल्या काव्यानंदात मग्न राही आणि अभ्यासिकेत बसून तासनतास ग्रंथवाचनात घालवी. एक दिवस त्याच्या बायकोला राहवेना. ती म्हणाली, 'तुम्ही सारखी ती धुळींनी भरलेली जुनाट पुस्तके वाचण्यात गढलेले असता; मला वाटते मीच पुस्तक झाले असते तर बरं झालं असतं.' त्यावर ड्रायडनने उत्तर दिले, की 'तू पुस्तकच होणार होतीस तर वार्षिक पंचांग बनली असतीस तर बरं झालं असतं. कारण ते दरवर्षी बदलता तरी येतं!'

ड्रायडनच्या बायकोचा हा किस्सा, तर वूडहाऊसचा नक्षा दुसऱ्या एका स्त्रीने उतरवला. एकदा मेजवानीच्या प्रसंगी वुडहाऊसच्या शेजारी एक म्हातारी बाई बसली होती. आपल्या शेजारी बसलेला लेखक आहे एवढे तिला समजले होते. तिने आपल्याला व त्याहीपेक्षा आपल्या मुलाला त्याच्या कादंबऱ्या किती आवडतात हे सांगण्यास सुरुवात केली. ती म्हणाली, 'माझे मुलगे तुमच्या कादंबऱ्यांसाठी वेडे झाले आहेत. त्यांच्या टेबलावर कायम तुमच्या कादंबऱ्यांची चळत असते. आता मी त्यांना जेव्हा सांगेन की मी एडगर वालेसच्या शेजारी भोजनासाठी बसले होते, तेव्हा ते काय म्हणतील याची मी कल्पनाच करू शकत नाही!' वुडहाऊसला आपल्या कीर्तीचा नक्षा उतरला असेच वाटले असेल.

संकटात सापडलेले साहित्यिक

गोल्डस्मिथ हा नेहमीच कफल्लक. गोल्डस्मिथने बॉस्वेलला सांगितले होते, की 'व्हिकार ऑफ वेकफिल्ड' ही आपली कादंबरी चारशे पौंडांना विकली गेली. पण डॉ. जॉन्सनचे म्हणणे ती साठ पौंडालाच विकली होती. जॉन्सनने यासंबंधात बॉस्वेलला पुढील हकिगत सांगितली. जॉन्सन म्हणतो, एक दिवस सकाळी माझ्याकडे गोल्डस्मिथकडून निरोप आला, की तो फार अडचणीत असून माझ्याकडे येऊ शकत नसल्याने मीच त्याच्याकडे जावे. मी त्याला एक चिठ्ठी पाठवली व लवकरच येऊन

भेटतो असे कळवले. थोड्या वेळाने कपडे करून मी गोल्डस्मिथच्या घरी गेलो तेव्हा घरमालकिणीने त्याला भाडे थकल्याबद्दल अटक केल्याचे दिसून आले. मी जी गिनी त्याला पाठविली होती त्यातून त्याने एक मद्याची बाटली आणली होती व ती बाटली आणि ग्लास घेऊन तो बसला होता. मी बाटली बंद केली व या प्रसंगातून कसा मार्ग काढायचा याविषयी बोलू लागलो. मग आपल्यापाशी एका कादंबरीचे हस्तलिखित असल्याचे तो म्हणाला व ते त्याने माझ्यापुढे ठेवले. मी ते चाळले व ते मला आवडले; म्हणून मी मालकिणीकडे गेलो व थोड्याच वेळात परत येतो असे तिला सांगून एका पुस्तकविक्रेत्याकडे गेलो. त्याला ते हस्तलिखित साठ पौंडाला विकले. त्यातून मग गोल्डस्मिथने भाडयाची रक्कम दिली, पण ती देताना आपल्याला वाईट रीतीने वागवल्याबद्दल मालकिणीला त्याने बरेच सुनावले !

शेले हा वेगळ्या रीतीने संकटात सापडला होता. साउदे हा त्याचा समकालीन कवी. त्याला वाचनाचे विलक्षण वेड. त्याच्या हातात कायम एखादे पुस्तक असायचे. ते वाचताना त्याला खाण्यापिण्याची शुद्ध राहात नसे. रात्री बराच वेळ असा गेला तर त्याला दिवसा केव्हाही बसल्या बसल्या झोप लागे आणि मग जेथे बसला असेल तेथेच खाली पसरलेल्या गालिच्यावर तो गाढ झोपी जाई. साउदेला दुसरा एक छंद होता, तो म्हणजे त्याच्या प्रदीर्घ रुक्ष कविता जो येईल त्याला वाचून दाखवण्याचा. एकदा त्याला शेले दिसला. त्याने त्याला घरी आणले आणि खुर्चीत आपल्या समोर बसवून काव्यवाचन सुरू केले. तत्पूर्वी त्याने आतून दरवाजा बंद करून खिशात किल्ली ठेवण्याची काळजी घेतली होती. मग त्याने हस्तलिखित उघडले व वाचायला सुरवात केली. तो आपल्याच काव्यावर खूष होता, मधूनमधून तो त्यावर भाष्यही करी. शेले त्याची पाठ थोपटेल असे त्याला वाटे. पण शेले अगदी गप्प होता. तो थोड्याच वेळात वैतागला. थोड्या वेळाने सर्वत्र अगदी शांत झाल्याचे साउदेला जाणवले. हस्तलिखित बाजूला करून पाहतो तो शेले गायब. दरवाजा बंद, खिडकी बरीच उंच ! मग शेले गेला कोठे म्हणून साउदे पाहू लागला. तेव्हा शेले टेबलाखाली झोपी गेला असल्याचे त्याला दिसले !

साहित्यिकांचे 'प्रेम'

साहित्यिक मंडळी क्वचितच एकमेकाबद्दल भले बोलतात. शेरिडन व कंबर्लन्ड यांचे असेच विरोधी प्रेम होते. शेरिडनचे 'स्कूल फॉर स्कॅन्डल' हे नाटक रंगभूमीवर आले तेव्हा कंबर्लन्डच्या मुलांनी ते पाहण्याचा अगदी हट्ट धरला. तो पुरवणे भाग पडले म्हणून कंबर्लन्ड मुलांना घेऊन शेरीडनचे नाटक बघण्यास गेला. नाटक पाहात असता त्यातील विनोदी प्रसंगांच्या वेळी मुले हसत, पण कंबर्लन्ड त्यांना दटावी आणि हसण्यासारखे काय आहे, उगाच हसू नका, असे बजावी. पुढे हे शेरिडनला कळले तेव्हा तो म्हणाला, कंबर्लन्ड हा अगदी कृतघ्न आहे. त्याने मुलांना या रीतीने दुखवायला नको होते. कारण मी कंबर्लन्डने लिहिलेली शोकान्तिका बघावयास गेलो, तेव्हा नांदीपासून भरतवाक्यापर्यन्त खो खो हसत होतो !

मेकॉलेचा विषय निघाला असता स्मिथ म्हणाला, 'हिंदुस्थानहून परत आल्यापासून त्याच्यात सुधारणा झाली आहे. पूर्वी तो अखंड बोलत राही, आता मधूनमधून त्याला मूक राहण्याचे झटके येतात. त्यामुळे त्याचे संभाषण गंमतीदार होते.'

कीटस् व डिकन्स

चार्लस् ब्राउन याने कीटस्बद्दल सांगितलेली हकिगत: कीट्सला कविता स्फुरली, की दिसेल त्या कागदाच्या कपट्यावर तो कवितेचे चरण लिहू लागे. हे कागदाचे कपटे मग पुस्तकात खुंणेसाठी तो ठेवी किंवा कोठेही टाकून देई. एकदा ब्राउनला कीट्सच्या हातात काही कपटे आढळले व ते तो पुस्तकांच्या मागे घुसवीत असल्याचे त्याने पाहिले. ब्राउनने ते कपटे मग जमा केले. त्या सर्वांत मिळून एक कविता होत होती. पण पहिल्या चरणांचा क्रम कळत नव्हता. कीट्सच्या सहाय्याने त्याने क्रम लावलाही. ही कविता म्हणजेच 'ओड टू द नाइटिंगेल' !

डिकन्सच्या 'पिकविक पेपर्स'ची कथा काहीशी वेगळी. दर आठवड्याला एक प्रकरण प्रसिद्ध होत होते तेव्हा या कादंबरीने लोक अगदी भारावून गेले. न्यायमूर्ती असो वा एखादा वाणी असो, प्रत्येकजण पुढचा हप्ता

केव्हा येतो म्हणून वाट पहात असे. पिकविकच्या धर्तीवर अनेक नकला प्रसिद्ध झाल्या, नाटकसुद्धा निघाले. त्यासाठी डिकन्सने खटला केला, पण तो काढून घ्यावा लागला.

'ओल्ड क्युरिऑसिटी शॉप' या कादंबरीत नेल या मुलीला मृत्यू येतो असे दाखवणे कलात्मकदृष्ट्या योग्य असे फॉर्स्टरने डिकन्सला पटवले. त्याचप्रमाणे ही छोटी मुलगी नेल मरणार याची अटकळ वाचकांना येऊ लागली तेव्हा डिकन्सवर पत्रांचा मारा होऊन नेलला मारू नये अशी विनवणी होऊ लागली. त्याचा डिकन्सला फार मानसिक त्रास झाला. अखेरीस नेल मरते असा भाग असलेला कादंबरीचा हप्ता प्रसिद्ध झाला, तेव्हा मॅकॉडी याला ती वाचल्यावर दुःख अनावर झाले. डॅनिअल ओकोनेल हा पार्लमेंटचा आयरिश सभासद. ही कादंबरी गाडीत वाचत असता नेलच्या मृत्यूचा भाग वाचून झाल्यावर त्याने उद्विग्नतेने पुस्तक गाडीतून भिरकावून दिले. न्यूयॉर्कच्या बंदरात लंडनहून 'क्युरिऑसिटी शॉप'चे हप्ते प्रसिद्ध करणाऱ्या नियतकालिकाचे अंक येत तेव्हा अनेक लोक धक्क्यावर उभे राहून खलाशांना विचारीत, 'नेल मेली काय?'

२०-६-७६ ◉

सामान्य माणसाची वाटचाल

एक राज्यकर्ते जाऊन दुसरे येतात; उत्पादनाची साधने बदलतात; अनेक स्थित्यंतरे घडतात – पण सामान्य माणूस कसा राहातो, काय करतो, याचा शोध घेण्याचा प्रयत्न क्वचित होतो. राजे वा राज्यकर्ते यांचा इतिहास हाच खरा इतिहास अशी समजूत आता कोणी ग्राह्य धरीत नाही. तरीही सामान्य माणसाच्या जीवनाचा शोध घेणे कठीण असते. असा प्रयोग बी. बी. सी. ने केला. पंचेचाळीस मिनिटांचा एक याप्रमाणे सव्वीस कार्यक्रमांच्याद्वारे १७५० ते १९६० या साधारणतः दोनशे वर्षांच्या काळातील ब्रिटनमधील सर्वसामान्य माणसाचे जीवन कसे होते याचे वर्णन करण्यात आले. त्यासाठी निरनिराळ्या ग्रंथांचा, लेखांचा मार्मिकपणे उपयोग केला गेला. त्यातील अर्ध्या कार्यक्रमांवर आधारित असे पुस्तक 'द लॉंग मार्च ऑफ एव्हरीमन' या नावाने पेंग्विनने प्रसिद्ध केले आहे. संपादक सांगतात, की बी. बी. सी. च्या कार्यक्रमात ध्वनीचा उपयोग बराच होता व तो विशेष प्रभावी झाला होता. ते तसे असेलही. पण पुस्तकही उल्लेखनीय झाले आहे.

१७६०पर्यंत ब्रिटन हा शेतीप्रधान देश होता. पण १७६० ते १८३० या काळात औद्योगिक क्रांतीने त्याचे स्वरूप आमूलाग्र बदलले. भटका मनुष्यप्राणी शेती करून स्थिर झाला हे जसे एक क्रांतिकारक परिवर्तन होते, त्या स्वरूपाचेच हे स्थित्यंतर झाले. औद्योगिक क्रांतीमुळे पंचमहाभूतांपैकी काहींवर नियंत्रण ठेवणे शक्य असल्याचे दिसून आले. या क्रांतीपूर्वी ग्रामोद्योग व हस्तोद्योग यांचीच चलती होती; औद्योगिक क्रांतीने यात एकदम बदल झाला, बिघाड झाला. सामान्य लोकांची अवस्था काय होती? १८८० मध्ये एक विणकर आपल्या कुटुंबाबद्दल लिहितो : पीठ स्वस्त होते, पण तेही पुरेशा प्रमाणात आम्हाला घेता येत नव्हते आणि आमची भूक भागत नसे. नाक्यावर ओढलेल्या चेहऱ्याने उभे असलेले लोकांचे

जथे हीच करुण कहाणी सांगत. हा विणकर उन्हाळ्यात तर अनेकदा पहाटे तीन वा चारला उठे आणि फारच थोडा वेळ थांबून रात्री आठ ते नऊपर्यंत काम करी. हातमाग चालविण्यासाठी मेहनत करावी लागे आणि असे अनेक विणकर होते की एखाद्याला आपल्या घोड्याबद्दल आत्मीयता वाटावी तशी त्यांना त्याच्या मागाबद्दल वाटत असे. पण यंत्रमाग आले आणि ही आत्मीयता संपली. रॉबर्ट ओवेन हा सूत गिरणीचा एक यशस्वी मालक. १८१५ मध्ये तो लिहितो, स्वस्तात स्वस्त कापूस घ्यावा आणि जेवढा नफा मिळवता येईल तेवढा मिळवण्याच्या हेतूने सूत विकावे ही वृत्ती वाढीला लागली. स्पर्धा आली आणि स्पर्धेबरोबर बनवाबनवी, फसवणूकही आली.

गिरण्यांतून सातआठ वर्षांच्या मुलामुलींनाही आईबाप कामाला धाडीत. या मुलांना अनेकदा अंधारातून यावे लागे. कधी बर्फ पडलेला असे तर कधी पावसाने चिखल होई. गिरण्यांत बरीच उष्णता असल्याने तेथे काम करणे अशक्य होत असे. याच वातावरणात दुपारी बारापर्यंत काम चाले. मग तासभर जेवणाची सुटी आणि नंतर रात्री आठपर्यन्त पुन्हा कामाला जुंपले जाई.

लष्करी जीवन

या काळात लष्करी जीवन कसे होते? ते कष्टाचे व धोक्याचे होते असे म्हणणे म्हणजे त्याचे अगदी सौम्य वर्णन झाले. अनेक आमिषे व खोटी आश्वासने देऊन सैन्यभरती होत होती. लहानशा अपराधासाठी फटक्यांची शिक्षा होत होती आणि शंभर शंभर फटकेही खावे लागत आणि या माराखाली अनेकजण मरत. अत्यंत कष्टप्रद अशा या जीवनानंतर सैन्याचे काम संपल्यावर इतके थोडे पेन्शन मिळे की उरलेले आयुष्य अगदीच कंगाल बने. असे असूनही लोक सैन्यात का जात? कारण तेथे जे मिळत होते तेवढेही बाहेर मिळणे शक्य नव्हते. सैनिकांना प्रतिष्ठा अशी नव्हतीच. हिंदुस्थानातील १८५७च्या उठावाच्या वेळचे अनुभव चार्लस् विकिन्स याने लिहिले आहेत. तो म्हणतो, की लखनौच्या वेढ्यातून सैनिकांनी प्रतिष्ठित इंग्रजी स्त्रिया व मुले यांची धाडस करून सुटका केली. पण आम्हाला या बायांनी अनेक नावे ठेवली, आम्ही घाणेरडे आहोत, कुरूप आहोत अशी निर्भर्त्सना केली. एक सैनिक या धाडसापायी जखमी झाला आणि त्याला तहान लागली. त्याने या स्त्रियांपाशी पिण्यासाठी पाणी मागितले, तर त्यांनी त्याला विहिरीचा रस्ता दाखवला! आरमारातही हीच स्थिती होती. अनेक जण रोगराईने मरत. त्यांना औषधोपचार मिळत नव्हते. शेवटी १७९७ मध्ये बंड झाले. बोटीवर गर्दी फार असल्याने विषमज्वर, अतिसार वगैरे रोग होत व बरेच दगावत. १८३४मध्ये कॅप्टन चेमियर लिहितो, की त्याची नेमणूक झाल्यावर त्याने जेव्हा बोटीवरील एकंदर जीवन पाहिले, तेव्हा नेल्सनचे वैभव, देशाचा अभिमान या सर्वांचा त्याला विसर पडला आणि हातरुमालात तोंड खुपसून तो लहान मुलासारखा रडला.

१७९१-९२ च्या सुमारास इंग्लंड फ्रान्सविरुद्धच्या लढाईस सिद्ध झाले. फ्रान्समध्ये क्रांती झाली होती आणि इंग्लंडमध्ये तिचे पडसाद उमटू लागले. लंडन, शेफिल्ड, नॉर्विच वगैरे शहरांत संघटना स्थापन झाल्या आणि प्रौढ पुरुषांना मतदानाचा हक्क द्यावा, राजकीय लोकशाही यावी, दरवर्षी पार्लमेन्ट भरावे, अशी मागणी पुढे आली. या संघटना चर्चा करीत, वादविवाद होत, नियतकालिके व पुस्तके प्रसिद्ध करीत. अनेक ठिकाणी कामगार संघटित होऊन त्यांनी अशा संस्था चालवल्या होत्या. राजकीय व आर्थिक सुधारणांची त्यांची मागणी होती.

तीव्र जीवनकलह

औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंड हा जगाचा कारखाना बनला. पण त्याचबरोबर देशातील वर्गावर्गामधील विषमता वाढू लागली. डिझरायलीने यावरूनच इंग्लंड हे एक राष्ट्र नसून दोन आहेत असे म्हटले. कारखानदारी वाढल्याने गरीब व श्रीमंत यांच्यातील विषमतेची दरी मात्र वाढली. जीवनकलह तीव्र होऊ लागला. सामान्य कष्टकऱ्यांना पंधरासोळा तास काम करावे लागले आणि एवढे करून खर्चाची तोंडमिळवणी कठीण झाली. शहरे वाढू लागली व बकाल बनली. १७२० मध्ये डॅनियल डेफो या लेखकाला लंडनचा तेव्हाचा विस्तार भयावह वाटत होता. त्यावेळी



एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी लंडन शहरातील एका बकाल कामगार वस्तीचे एक रेखाचित्र
चित्रकार : स्टाव्ह डोअर

साधारणतः पाच लाखांपर्यंत वस्ती होती, ती १८०१ मध्ये दहा लाखांवर गेली; पण त्यानंतर पन्नास वर्षांत ती तीस लाख झाली. याच अर्धशतकात शेफिल्ड व लीडस् या शहरांची लोकसंख्या दुपटीने वाढली, तर मँचेस्टर, बर्मिंगहॅम, ग्लासगो यांची तिपटीने. १८४४ मधील इंग्लंडच्या कामगार-जीवनावर लिहिताना एंगल्सने लंडनच्या गलिच्छ वस्त्या पाहिल्या आणि या लंडनवासियांच्या बकाल जीवनाबद्दल त्याने उबग व्यक्त केला. कष्टकरी लोक हे माणसे राहिलेच नाहीत, ते केवळ यंत्रे बनले, असे तो म्हणतो. पण गरीब इंग्लंड श्रीमंत इंग्लंडच्याविरुद्ध द्वेषाने जळू लागले होते. म्हणून त्या काळात अनेक इमारतींवर हल्ले होत. लुटालूट होई. पण या दंग्यांचा बंदोबस्त करण्यासाठी सरकारने लगेच पावले टाकली. निषेधपर दंगलींसाठी कडक शिक्षा होत होती. १८३० मध्ये एकोणीस कामगारांना फाशी देण्यात आले, ६४० जणांना कोठडी मिळाली व ४८० जणांना ऑस्ट्रेलियात धाडले. तथापि याच काळात कामगार संघटना मूळ धरू लागल्या.

लोकसंख्या वाढत होती त्यामुळे तरुणवर्ग बराच मोठा होता. १८२१ चा शिरगणती अहवाल म्हणतो, की इंग्लंडच्या लोकसंख्येपैकी एकपंचमांश व्यक्ती दहा ते वीस या वयोगटातल्या आहेत. वाहतुकीची साधने या काळात सुधारली. आगगाड्या आल्या आणि टपाल जलद जाऊयेऊ लागले. या बदलत्या जगातील कष्टमय जीवनाचे वर्णन डिकन्सच्या कादंबऱ्यांतून होत होते. व्हिक्टोरियाचा काळ आला आणि ब्रिटिश साम्राज्य स्थिरावले या काळात वरच्या वर्गाच्या जीवनात कमालीचे स्थैर्य होते. हे लोक नियमाने रोजनिशी ठेवीत, प्रदीर्घ भाषणे करीत, खूप बोलत व खूप लिहीत.

कल्याणकारी

१८९० पासून पहिल्या महायुद्धाच्या काळापर्यंत इंग्लंडमधील गरिबी-बद्दल बरीच चर्चा व पाहणी होत असे. चार्लस् बूथ हा आगबोटींचा मालक आणि रौन्ट्री हा चॉकोलेट धंद्यातला धनिक. गरिबीबद्दल ते बरेच जागरूक होते. त्यांनी यासंबंधी पाहणी अहवाल तयार केले व त्यांच्या प्रसिद्धीमुळे जागृती निर्माण झाली. या पाहणीत असे दिसले की, १८९० मध्ये लंडनची तीस टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली वा रेषेपर्यंत होती.

प्राइस कोलियर हा अमेरिकन १९०९ मध्ये लिहितो, की मेक्सिको, अमेरिका इत्यादी देशांत लोकांचे थवेच्या थवे मी पाहिले आहेत, पण लंडनमधील कंगालांइतके कंगाल मी इतरत्र पाहिले नाहीत. घोड्याच्या गाडीमागोमाग हमाली मिळण्यासाठी अनेकजण धावत.

मोटर आली की ती विकत घेण्यासाठी अनेकजण कर्ज काढीत; घराच्या देखभालीपेक्षा मोटर चकचकीत ठेवण्यात वेळ घालवीत. यातूनच प्रवास वाढला. १९१४ पूर्वी आणखी एक बदल झाला. तो म्हणजे कुटुंब लहान होऊ लागले. स्त्रिया वाचू लागल्या, विचार करू लागल्या. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत झाले. पहिले महायुद्ध आले. कामगारांचा प्रभाव वाढला. स्त्रियांचे नोकरीतील प्रमाण वाढले आणि त्या सार्वजनिक मद्यपानगृहात मद्यपान करू लागल्या. युद्धाचा परिणाम भ्रष्टाचार वाढण्यातही झाला. सरकारातील भ्रष्टाचाराबद्दल लोक लिहू व बोलू लागले.

युद्ध संपले. १९२९च्या सुमारास मंदीचा फटका बसला. त्यापूर्वीच १९२३ पासून आग्नेय आशियाकडे अनेकांनी प्रस्थान ठेवले होते. १९२३ ते ३८ या काळात दहा लाख इंग्रजांनी स्थलांतर केले. पहिले युद्ध हे जगातून युद्ध नाहीसे करण्यासाठी असल्याचे सांगितले गेले, तेव्हा ते संपल्यावर कायमची शांतता आली असा ग्रह झाला. तो काही काळ टिकला. पण दुसरे युद्ध आले आणि विषमतेवर जोरदार हल्ला सुरू झाला. दुसऱ्या युद्धानंतर कल्याणकारी योजना अंमलात येऊ लागल्या. आकाशवाणी व दूरदर्शन यांचा सार्वत्रिक प्रसार झाला. सामान्यांचे जीवन कमी कष्टाचे झाले, कंगालपणा कमी झाला. २७-८-७८ ◉

विसाव्या शतकाच्या प्रारंभीचे ब्रिटनमधील समाज-जीवन

'लाँग मार्च ऑफ एव्हरीमन' या पुस्तकात साधारणतः दोनशे वर्षांतील इंग्लंडची परिस्थिती वर्णन केली होती. याच धर्तीचे 'द एडवर्डीयन्स' हे पुस्तक आहे. अर्थात पहिल्यापेक्षा याचा वर्णनकाळ कमी असल्याने अधिक तपशिलाने विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या दशकातील सामाजिक परिस्थितीचे दर्शन या पुस्तकात घडविण्यात आले आहे. ते घडविताना अनेकांच्या मुलाखतींचा उपयोग केला आहे.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी पैसा, उच्च कुळातील जन्म आणि शिष्टाचार यांना अतिशय महत्त्व होते. संपत्तीचे प्रदर्शन करण्यात मध्यम व वरिष्ठवर्गीयांना अभिमान वाटे. हिवाळ्यात श्रीमंत लोक समशीतोष्ण हवेच्या ठिकाणी परदेशात वास्तव्य करीत; पण इंग्लंडमध्येही ग्रामीण भागात आरामगृहे बांधण्यात, मेजवान्या, नाचगाण्यांचे समारंभ करण्यात त्यांचा बराच पैसा खर्च होई. वारसा कर होता, पण त्याचे प्रमाण अल्प होते. संपत्तीचे वाटप विषमतेने झाले होते. १९११ ते १३ या काळात १ टक्का लोकांच्या हाती ६९ टक्के संपत्ती होती. १९१४ च्या सुमारास नऊ दशांश जमीन ही मोजक्या श्रीमंत जमीनमालकांकडे होती. तसेच बहुतेक व्यापारी वा औद्योगिक कंपन्यांची मालकी निवडक कुटुंबांकडे होती. मालक व मजूर संबंध हे सरंजामदारी स्वरूपाचे होते. स्त्रिया नोकऱ्या करीत पण त्यांना कमी वेतन मिळे. श्रीमंतांना भरपूर खावयास मिळे तर गरिबांची उपासमार होई. परिणामतः दोघांच्या आयुष्यमानात फरक होता. धनिकांची

आयुर्मर्यादा पन्नास होती तर कामगार वस्तीत ती छत्तीस. बर्मिंगहॅम वगैरे भागात क्षयाची साथ मोठ्या प्रमाणात असे. गरिबांची मुले उन्हाळ्यात अनवाणीच जात आणि हिवाळ्यात पोलिस वा धर्मादाय संस्था यांचेकडून पादत्राणे मिळतील या आशेने अवलंबून असत.

एडवर्डीयन काळात अशी अनेक कुटुंबे असत की त्यांना एकभुक्तच राहावे लागे. आणि त्यातही काहींना लोकांनी अर्धवट टाकलेली अंडी, पाव वगैरेंचा उपयोग करणे भाग पडे. गरीब कुटुंबात चहा व पाव हाच आहार होता. मिळवत्या बापाचा रोजगार चुकला तर चहाला दूध वा साखर मिळत नसे. काही वेळा रात्रीच्या जेवणाशिवायच झोपी जाणे मुलांनाही भाग पडे. अनेक पुरुष रात्रीचा उपवास करूनच भल्या पहाटे कामाला जात.

अनेक धनिकांची घरे भरभक्कम आणि सुखसोयींनी युक्त होती. ग्रामीण भागातील निवासस्थाने शंभर-शंभर खोल्यांचीही असत. पण अशा प्रत्येक निवासस्थानी नळाच्या पाण्याची सोय असण्याची खात्री नव्हती. ती नसेल तर नोकरांना पाणी सतत वाहून आणावे लागे. याउलट सामान्य एडवर्डीयन कुटुंबाला एक वा दोन खोल्यात राहावे लागे. दोन वा तीन मुले एकाच बिछान्यात झोपत. अनेकांना घरच नव्हते. त्यामुळे लंडनमध्ये दोन हजार लोक पदपथावर झोपत. या लोकांना मद्यसेवनाचे व्यसनही मोठ्या प्रमाणात असे.

लेडी व्हायोलेट ब्रॅन्डन ही आपल्या आठवणीत म्हणते, की एका नृत्यसमारंभानंतर बऱ्याच उशीरा रात्री घरी परतत असताना तिला काहीजण पदपथावर आडवे झालेले दिसले. त्यांच्याकडे लक्ष न देता भराभर चलण्याचा आपल्या नवऱ्याने आपल्याला आग्रह केला. खेड्यातील जीवन अधिकच कंटाळवाणे व कष्टाचे होते. शहरात गोंगाट होता, पण नळाचे पाणी, वीज वगैरे सोयी होत्या. खेड्यात हे काही नव्हते. शहरातही गलिच्छ वस्तीतील जीणे भयानक होते. बेकारीमुळे रोजगारीचे दर कमी असत आणि गरिबीमुळे काहीही वाया जाऊ न देण्याचा कटाक्ष ठेवला जाई. मुले गटारात व रस्त्यात पडलेल्या वस्तूंतून जे काही उपयोगाचे वाटेल ते गोळा करण्यात दंग असत.

मध्यमवर्गीय कुटुंबांत शिक्षण व नैतिक शिक्षण यावर भर होता.

एडवर्डीयन काळात अनेक लोकांना फूटपाथवरच रहावे लागे. शिवाय मद्याचे व्यसन सामान्य लोकांत मोठ्या प्रमाणावर होते. अतिरिक्त मद्यपानाचे चित्रीकरण करणारे एक चित्र.
चित्रकार : विल्यम होगार्थ

संध्याकाळी मुलींनी बाहेर फिरण्यास मनाई होती. संध्याकाळी फार वेळ कोणाबरोबर बोलत बसल्यास तरुण मुलींना मारही खावा लागे. अर्थात् बरेच तरुण स्वतंत्रपणे राहात. मुलगा व मुलगी यांच्यात आईबाप फरक करीत. मुलाचे विशेष लाड होत. मुलाने कपडे शिवणे, स्वयंपाक करणे निषिद्ध होते. ही सर्व कामे मुलींची. स्वतःचे कपडेही मुलाने धुवावयाचे नसत, एवढेच नव्हे; तर बिछाना तयार करण्याचे कामही त्याने करू नये अशीच समजूत होती.

बेकारांसाठी कामे काढली जात. त्यांच्या राहाण्याची व्यवस्था अतिशय वाईट होती. तेथील दैन्य पाहूनच काहींनी समाजवादी ध्येय पत्करले. पण यात मार्क्सवादापेक्षा मानवतावादी अनुकंपाचा प्रभावी होती. जे कामगार कुशल होते त्यांची स्थिती बरी होती. सुस्थितीतील तरुणांनी विवाह केल्यावर सासरकडून अनेक प्रकारे मदत होत असे. कधी बापाकडून तर कधी सासरकडून आर्थिक मदत मिळे आणि त्यामुळे अशा तरुणांना चैनीत राहाता येई.

गेल्या शतकाच्या अखेरपासून १९२० पर्यन्त खरे वेतन कमी होण्याचा वेग हा किंमतीच्या वाढीच्या वेगाच्या मानाने कमी होता. तथापि १९०० ते १९१८ या काळात वेतनवाढ थांबली, याच काळात अमेरिकेतील लोकांचे वेतन मोठ्या प्रमाणात वाढले. १९१४ च्या सुमारास जागतिक व्यापारातील ब्रिटनचा वाटा ३१ टक्के म्हणजे सर्वांपेक्षा जास्त होता. पण याच काळात तो कमी होण्याच्या मार्गाला लागला व जर्मनीचा वाटा वाढू लागला. एका दशकात जर्मनी हा इंग्लंडच्या बरोबरीने आला आणि अमेरिका तर जबर प्रतिस्पर्धी बनली. ब्रिटन कापड व्यापारात पुढे होते. पण जगाच्या एकंदर व्यापारात कापड व्यापाराचे महत्त्व कमी होऊन पोलाद, यंत्रसामग्री यांना महत्त्व आले. यात अमेरिका व जर्मनीने ब्रिटनवर आघाडी मारली. तसेच वीजेची उपकरणे आणि रसायने यातही ते इंग्लंडच्या पुढे होते. इंग्लंडचा कोळशाच्या व्यापारात जी वाढ झाली त्याने फक्त या प्रतिस्पर्धी देशांच्या कारखान्यांना इंधन पुरवले. ब्रिटनने औद्योगिक क्रांतीला अगोदर सुरुवात केली. पण नंतर नवे शोध, उत्पादनाची नवी क्षेत्रे धुंडाळण्यात ते मागे राहिले. उद्योगधंद्यांची व्यवस्था, तंत्र जुने राहिले. उलट जर्मनी व अमेरिकेत नवी यंत्रे, नवी उत्पादनपद्धती व व्यवस्थापन यांची आवक झाली. दुसरे असे, की इंग्लंडची अंतर्गत भांडवल-गुंतवणूक ही परदेशातील गुंतवणुकीपेक्षा कमी होती. अमेरिकन कामगाराच्या वेतनातील वेगवान वाढ ही तो अधिक काम करीत होता म्हणून झाली नाही तर आधुनिक तंत्र व यंत्र यामुळे झाली. इंग्लंड व अमेरिका यातील ही तफावत पुढे वाढतच गेली. या काळात इंग्लंडमध्ये शेतीवरील काम करणारांची संख्या झपाट्याने घटली व उद्योगधंद्यातील कामगारांची वाढली.

एडवर्डीयन काळात करमणुकीची साधने म्हणजे संगीत, नाटके आणि मद्यपान ही होती. बहुसंख्य लोकांना मद्यपान हाच विरंगुळा होता. त्या काळात लंडनमध्ये झिंगलेले दारूडे टिकटिकाणी आढळत. दर आठवड्याला साडेचार हजार दारुड्यांवर खटले होत होते. चर्चमध्ये जाणारांची संख्या घटत चालली होती. राजकीय जीवनात वृद्धांचे प्राबल्य होते, पहिले महायुद्ध आले आणि ब्रिटनमधील या साऱ्या जीवनात आमूलाग्र बदल झाला.

११-९-७८ ⊙

बर्ट्रान्ड रसेल

दिवंगत ब्रिटिश तत्त्वज्ञ बर्ट्रान्ड रसेल यांच्या व्यक्तित्वावर प्रकाश टाकण्याचा एक नवा प्रयत्न जिराल्ड ब्रेनन यांनी केला आहे. ब्रेनन हे स्वतः कादंबरी, प्रवासवर्णने, आत्मकथात्मक लिखाण यासाठी प्रसिद्ध असून रसेल, व्हर्जिनिया वूल्फ, लिटन स्ट्रॅची इत्यादींचे मित्र होते. ते आता ऐंशीच्या पुढे गेले असून आपल्या आत्मचरित्राचा दुसरा भाग त्यांनी प्रसिद्ध केला आहे. त्याचे नाव आहे 'पर्सनल रेकॉर्ड'- लंडनच्या ऑब्झर्व्हरने या आत्मचरित्रातील रसेल विषयक महत्त्वाचा भाग उद्धृत केला आहे. ब्रेनन यांची पत्नी सात वर्षांपूर्वी वारली आणि सध्या ते आपल्यापेक्षा बऱ्याच तरूण व सुंदर स्त्रीबरोबर वयाच्या ब्याऐंशी चौऱ्याऐंशी वर्षी संसार करीत आहेत.

रसेल हे निरीश्वरवादाचे पुरस्कर्ते. त्यांनी व त्यांच्या काही मित्रांनी बायबलचे वाचन विशिष्ट हेतूने केले होते. त्यातील अनेक उतारे रसेल यांना हास्यास्पद व चमत्कारिक वाटत आणि अनेकदा गप्पा मारताना हे उतारे ते तोंडपाठ म्हणून दाखवून ऐकणाराला धक्का देत. काही वाक्यांतून ते अश्लिल अर्थही काढून दाखवीत. परंतु बायबलमधील मानवी स्वरूपाच्या कथा रसेल यांना फार आवडत. ते खरोखर निरीश्वरवादी होते काय? ब्रेनन म्हणतात, रसेल स्वतःलाच निरीश्वरवादी म्हणवीत नसत. मानवी जीवनात, या सृष्टीत अशा असंख्य गोष्टी आहेत, घटना आहेत, की त्या आकलनच होऊ शकत नाहीत व या अनाकलनीयत्वाची जाणीव रसेल यांना जितकी होती तितकी ती फार थोड्यांना असेल असे ब्रेनन यांचे म्हणणे. काही काळानंतर रसेल यांनी तत्त्वज्ञानविषयी लिखाण करण्याचे सोडून दिले, कारण, या विषयात नव्याने सांगण्यासारखे आपल्यापाशी काही नाही असे ते म्हणत. ही जाणीव असणे हेही मोठेपणाचेच लक्षण म्हटले पाहिजे. तत्त्वज्ञान व गणित या विषयांवर रसेल बोलू लागले की त्यांना भान राहात नसे आणि ऐकणाराला हे विषय कळत नसले तर ते का कळू नयेत असा प्रश्न त्यांना पडे. गणितासारखा सोपा विषय नाही अशी त्यांची भावना होती. परंतु आपल्यापेक्षा कमी बुद्धिमान माणसांत मिसळताना रसेल यांना कमीपणा वाटत नसे. कारण मनुष्यप्राणी हाच त्यांच्या आवडीचा होता. त्यामुळे एखाद्याचा सहवास हा कंटाळवाणा आहे असे ते कधी म्हणत नसत. त्यांच्याशी कोणीही बोलावयास आले तर ते त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेत, त्याच्या बोलण्याचा आणि स्वभाववैशिष्ट्याचा ते अत्यंत बारकाईने निरीक्षण करून अभ्यास करीत.



संततिनियमनाचा प्रसार करण्याबद्दल शासन झालेले रसेल मुलांचे मात्र भोक्ते होते. ते स्वतः निपुत्रिक होते आणि स्त्रियांच्या विषयात त्यांना विशेष रस होता. स्त्रीसहवास त्यांना फार प्रिय असे. ब्रेनन पतिपत्नींचे ते व त्यांची पत्नी पेटर हे मित्र होते. स्पेनमध्ये ही दोन्ही कुटुंबे एकत्र राहात असताना रसेल यांचे ब्रेनन यांच्या पत्नीवर मन जडले आणि एकमेकांनी आपापल्या बायकांची देवाणघेवाण करण्याची अफलातून कल्पनाही त्यांना सुचली. पुढे ब्रेनन यांच्या पत्नीला ते पत्र पाठवीत आणि ती लंडनला गेली, की ते तिला जेवायला हॉटेलमध्ये नेत. फिरायलाही घेऊन जात. परंतु ब्रेनन यांच्या पत्नीला रसेल यांचा 'लघळपणा' आवडला नसावा किंवा तापदायक वाटला असावा व म्हणून पुढे तिने त्यांचे नाव टाकले व ती त्यांना भेटेनाशी झाली.

८-१२-७४ ◉

ऑकिन्लेक

भारत स्वतंत्र होण्यापूर्वी व झाल्यावर काही काळ भारताचे मुख्य सेनानी होते फिल्ड मार्शल ऑकिन्लेक. ते सध्या मोरोक्कोत वास्तव्य करून राहतात. त्यांना ९० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त बी. बी. सी. ने त्यांची मुलाखत घेतली. ऑकिन्लेक सांगतात डी रोमेल यांचा ब्रिटिश सैनिक व अधिकारी यांच्यावर विलक्षण प्रभाव होता आणि रोमेल यांचा पराभव करणे शक्य नाही अशी भावना झाली होती. ही भावना ऑकिन्लेक यांनी दूर केली. चर्चिल यांनी युद्धक्षेत्राला भेट दिली तेव्हा ऑकिन्लेक कैरोत आरामात न राहता प्रत्यक्ष युद्धभूमीवरच सैनिकांच्या बरोबर राहत होते. तेथे माशा वगैरे फार होत्या. चर्चिल यांना ते वातावरण मानवले नाही. ऑकिन्लेक याच्या सोयीनुसार चढाई करण्यास चर्चिल यांचा विरोध होता, म्हणून त्यांनी लंडनला परतल्यावर ऑकिन्लेक यांचे सेनापतीपदाचे अधिकार काढून घेतले. चर्चिल हे जर लढाई लढलेले सैनिक म्हणून कधी काळी वावरले असते तर त्यांनी असे न वागता प्रत्यक्ष भेटीतच आपला मनोदय सांगितला असता असे ऑकिन्लेक यांचे म्हणणे. चर्चिल यांच्याबद्दलचा त्यांचा आदर मात्र कमी झालेला नाही. भारतीय लष्कराबद्दल त्यांना विलक्षण प्रेम. फाळणीच्या वेळी या लष्कराचे विभाजन करण्याची वेळ आली तेव्हा अनेक मुसलमान व हिंदू सैनिक व अधिकारी रडले. आपणही रडलो असतो असे ते सांगतात, जीनांनी एकदोन वेळा या दोन देशांत युद्धाचा प्रसंग निर्माण केला होता. एकदा तर ऑकिन्लेक पहाटेच विमानाने कराचीला गेले व काश्मीरमध्ये पाकिस्तानचे सैनिक जर घुसले तर सर्व ब्रिटिश अधिकारी काढून घेतले जातील जशी समज त्यांनी दिली तेव्हाच जीनांनी हात आवरला.

अव्वल इंग्रजीतील युरोपियनांचे जीवन

ईस्ट इंडिया कंपनी व त्यानंतरच्या ब्रिटिश राजवटीच्या सुरवातीच्या काळातील विविध क्षेत्रांतील इंग्रजांचे जीवन कसे होते यावर दोन सुंदर पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. एक आहे 'टू मॉन्सून्स' व दुसरे 'प्लेन टेल्स फ्रॉम द राज'. पहिल्याचे लेखक आहेत विल्किन्सन व दुसऱ्याचे चार्लस ॲलन. विल्किन्सन भारतात आले असता त्यांनी काही दफनभूमी पाहिल्या. त्यातील मृत्यूलेख पाहाताना त्यांना पूर्वीच्या काळातील इंग्रजांचे जीवन कसे होते याचा अभ्यास करावासा वाटला. त्याप्रमाणे त्यांनी भारतातील अनेक ठिकाणच्या दफनभूमी पाहिल्या आणि अनेकांची पुस्तके, पत्रव्यवहार वगैरेंचे परिशीलन केले व त्यावर आधारित असे पुस्तक लिहिले आहे. अनेकांचे व्यक्तिजीवन यात येऊन जाते व ते चित्रित करण्यासाठी लेखकाने केलेले परिश्रम लक्षात येतात. चितोड हे त्याने चुकून दक्षिणेत असल्याचे नमूद केले आहे; पण या दोषाकडे दुर्लक्ष करण्यास हरकत नाही.

'प्लेन टेल्स फ्रॉम द राज' या पुस्तकाची कल्पना वेगळी आहे. चार्लस ॲलन यांनी ब्रिटिश आमदानीशी ज्यांचा संबंध आला अशा अडीचशे व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या. यात जसे ऑकिन्लेक यांच्यासारखे सेनाधिकारी आहेत, तसे सर पेन्डेरल मून यांच्यासारखे आय. सी. एस. आहेत. तसेच आता जे हयात नाहीत अशांचे नातेवाईकही आहेत. या सर्वांच्या मुलाखती ध्वनिफीतीवर घेण्यात आल्या आणि संपादकीय संस्कार करून त्या बी. बी. सी. ने ऐकून दाखवल्या. हा कार्यक्रम

इंग्लंडमध्ये फार लोकप्रिय झाला होता असे काही ब्रिटिश मित्रांनी सांगितले.

मृत्यूचे थैमान

'टू मॉन्सून्स' हे नाव पुस्तकाला का दिले? विल्किन्सन सांगतात, की ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरीनिमित्त जे लोक येथे येत त्यातले बहुतेक दोन पावसाळे जेमतेम बघत आणि मरत. येथील हवापाणी त्यांना मानवत नसे. असे जे शेकडो इंग्रज मेले त्यांच्या जीवनाची ओळख यात आहे; पण ती वाचून मनाला विषण्णता येते. यात पंधरासोळा वर्षांची कोवळी मुले आहेत; पण औषधावाचून मृत्युमुखी पडलेली त्याहूनही लहान मुले आहेत. याखेरीज ऐन तारुण्यात विधवा व विधुर झालेले स्त्री-पुरुष आहेत. यापैकी काहींनी स्वतःचे जीवन पत्रव्यवहार, रोजनिशा यातून रंगविले होते तर इतर काहींनी या मंडळींचे जीवन रंगविले आहे. कंपनीच्या वा ब्रिटिश सरकारच्या नोकरीत मरण पावणारात गव्हर्नर-जनरल, न्यायाधीश, सेनाधिकारी आहेत तसेच डॉक्टर, धर्मगुरू वगैरेही आहेत.

ओव्हिंग्टन हा १६९० मध्ये पावसाळ्याच्या प्रारंभी मुंबईत आला. त्याच्याबरोबर आणखी चोवीसजण होते. पावसाळा संपण्यापूर्वी त्यापैकी वीस मरण पावले; शिवाय तो ज्या बोटीने आला होता तिचे सर्व खलाशीही मृत्युमुखी पडले. त्यावेळी मुंबईत ८०० युरोपियन होते, पण दोन वर्षांत सातशेजण मेल्याने केवळ शंभर राहिले. कलकत्त्यात एका वर्षात ऑगस्ट व सप्टेंबर या दोन महिन्यांत बाराशेपैकी एकतृतियांश निंधन पावले. अनेकवेळा वर्षातून शेकडा पन्नास हे मृत्युचे प्रमाण असल्याचे दिसेल. मृत्यू हा बरेच वेळा आकस्मिक येत असे. दुपारी भोजनासाठी आलेल्याची घरी पाठवणी करावी तो रात्री त्याच्यावर मृत्युची झडप पडल्याचे दुसऱ्या दिवशी सकाळी समजावे. कोणी मेजवानीसाठी बोलावले तर यजमान वा आमंत्रित यांच्यापैकी अगोदरच दगावला नसेलच असे नाही. इतक्या मोठ्या प्रमाणावर व इतक्या सातत्याने मृत्यूच्या छायेत रहावे लागत असल्याने लोकांच्या मनावर परिणाम होत असे. मद्रासजवळील एका सर्जनने १८३३ साली तेथील लष्करी अधिकाऱ्याला कळविले, की शवयात्रेच्या वेळी बॅन्ड अगदी सावकाश वाजवावा कारण वारंवार तो



आधुनिक कलकत्ता वसविणाराचे स्मारक

ऐकून ऐकून मन अत्यंत उदासिन आणि बधीर झाले आहे.

या स्थितीत अनेकांचे जीवन उध्वस्त झाले आणि आपल्या प्रियजनांच्या मृत्युने त्यांच्या मनाला खोल जखम होऊन ते दुःख ते आपल्या

हयातभर बाळगीत राहिले. अर्थात कित्येकांची हयातही फारशी नसे. लॉर्ड कॅनिंग यांची गुणी व सुंदर पत्नी ऐन तारूण्यात वारली त्याचा कॅनिंग यांच्या मनावर फार परिणाम झाला. रोज रात्री ते स्मशानभूमीत जात आणि पत्नीच्या समाधीपुढील दिव्याच्या प्रकाशात तिची पत्रे, रोजनिशी वगैरे वाचतांना त्यांना रडू कोसळत असे. कित्येकांनी मृताच्या स्मरणार्थ कविता शिलाखंडावर कोरल्या आहेत. कित्येकांनी आपल्या भावना गद्यात व्यक्त केल्या आहेत. त्या वाचून आजही मन हेलावते.

मृतांच्या कथा

हैद्राबादचा रेसिडेन्ट सर अलेक्झान्डर हा मरण पावला तेव्हा त्याची शवयात्रा सुरू होण्यापूर्वी प्रार्थना म्हणण्यात आली. पण त्याबरोबर घराच्या छपरातील शेकडो गांधीलमाशा शवयात्रेसाठी जमलेल्यांना डसू लागल्या. सर्वांची धावपळ झाली. ज्या घोडागाडीवरून शव नेले जाणार होते त्याचे घोडेही उधळले. हे सर्व अशुभसूचक मानण्यात आले. पुढे या साहेबाच्या घरात काम करणाऱ्या आयाने आपल्याजवळील किडूकमिडूक विकून आपल्या साहेबाची समाधी बांधली.

सर रॉबर्ट ग्रान्ट हा मुंबईचा गव्हर्नर १८३४ ते १८३८ या काळात होता. पुण्याच्या राजभवनावर तो राही तेव्हा रोज संध्याकाळी आवारात विशिष्ट ठिकाणी फेऱ्या मारी. एक दिवस त्याच्यावर मृत्यूने झडप घातली. त्याच सुमारास बंगल्यातून एक मांजर ग्रान्ट ज्या दरवाजातून बाहेर पडे तेथून बाहेर पडले. सेवेकऱ्यांना वाटले ग्रान्टचा आत्मा या मांजरात गेला. पण पुढे निश्चित मांजर कोणते ते कळेना, कारण बरीच मांजरे होती, म्हणून राजभवनावरच्या सर्व मांजरांना शिपायी सशस्त्र वंदना देत. हे वीस वर्षे चालले होते !

कष्टाचे जीवन

ॲलन यांचे पुस्तक केवळ मृत्यूचा विचार करणारे नाही. त्यांनी इंग्रजांचे जीवन वर्णन केले आहे. या जीवनात कष्ट अपार होते; पण काहींच्या बाबतीत मानमरातब, अधिकारही होते. सर्वांनाच उन्हाळ्याचा अतोनात त्रास सहन करावा लागे. पाणी, भाजीपाला यातून जंतूंचा प्रसार होऊन आजार व मृत्यू यांची गाठ पडे. अनेकांना दीर्घकाळ एकटे राहावे लागे, कारण लग्न केल्यास खर्च झेपत नसे. मग येथल्याच काही स्त्रियांशी संबंध येई. कित्येक वेळा इंग्लंडमधून तरुण मुली येथे पती शोधण्यासाठी येत. त्या आपल्या नातेवाईकांकडे राहात. सर्वांचीच मोहीम यशस्वी होत होती असे नव्हे. सैनिकांचे जीवन उन्हाळ्यात अधिकच असह्य होई. सकाळी परेड झाली की, बराकीत उघड्या अंगाने पडून राहाण्याखेरीज काही करता येत नसे. मनस्वी उकाड्याने त्वचा-रोग होत, तर काहींना वेड लागे. एकलकोंड्या अधिकाऱ्यांच्या जीवनात त्यांचा नोकर बरेच महत्त्वाचे स्थान मिळवी. पेन्डेरेल मून सांगतात, की त्यांचा नोकर त्यांना दर महिन्याला केस कापण्याची सूचना करी व नापिताला बोलावून आणी. केशकर्तन चालू असता नापिताला तोच सूचना देई.

अधिकारपरत्वे लहानमोठा भेद मानला जात असे. कित्येकांना आपल्या वरिष्ठांच्या संमतीशिवाय लग्न करता येत नसे. एखाद्याने स्थानिक तरुणीशी विवाह जमविला व वरिष्ठाला तो मान्य नसल्यास त्याची बदली होई. येथे वर्ग, अधिकार यांना महत्त्व अधिक होते. त्यामुळे साहेब व हिंदी यांच्यात केवळ आपसात क्रिकेटचा सामना झाला तरी साहेबाला बाद केला जात नसे. तथापि साहेबाचा स्पर्श हा निषिद्ध मानला जाई. सिमिंग्टनला चिपळूणकर हे मराठी शिकवीत, संस्कृत शिकवीत, त्यांच्याबरोबर फिरत. पण घरी जाऊन स्नान करून शुद्ध होत. काहींनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला खरा, पण बहुतेकांनी आपल्यावर काही नैतिक जबाबदारी असल्याचे मानले. डोंगराळ प्रदेश, थंडीवारा, पाऊस, उन्हाळा या सर्वांना तोंड देऊन राज्यकारभार केला. त्या अधिकाऱ्यांचा लोकांशी अधिक जवळचा संबंध येत होता. यातून अनेकांनी ग्रंथनिर्मिती केली. अनेकांना निरनिराळे छंद होते. यातून त्यांनी स्वतःचे व येथील जीवन समृद्ध व विविधतापूर्ण करण्यास मदत केली.

इंग्रजांनी साम्राज्य स्थापले, भोगले, काहींनी अत्याचारही केले; पण त्यांनी अधुनिक ज्ञानविज्ञान आणले; नवी राज्यपद्धती आणली. हे साम्राज्य म्हणजे नुसती चैन नव्हती. ते जीवन कष्टमय होते. १९-३-७८ ◉

पेशव्यांचा प्रदेश आणि एलफिन्स्टन

एक राजवट जाऊन दुसरी आली तरी नव्या राज्यकर्त्यांना एकदम आमूलाग्र बदल करणे कठीण जाते. विशेषतः शहाणे प्रशासक धीसेपणाने सुधारणा करतात व ज्या सुधारणा करावयाच्या त्यांचा पाया पक्का होईल असे पहातात. ब्रिटिशांनी जेव्हा येथे राज्य करावयास सुरुवात केली तेव्हा त्यांना माल्कम, एलफिन्स्टन यांच्यासारखे कार्यक्षम, व दूरदर्शी प्रशासक मिळाले होते. १८१८ मध्ये पेशवाई संपुष्टात आली त्यावेळी एलफिन्स्टन हा ब्रिटिश प्रतिनिधी पुण्यात होता. १८२१ पर्यंत तो दक्षिणेचा सुभेदार म्हणून वावरला व मग मुंबईचा गव्हर्नर झाला. पेशव्यांचा मोठा प्रदेश ताब्यात आल्यावर एलफिन्स्टनने त्याचे चार विभाग केले व त्यावर एकेक प्रमुख नेमला. या प्रमुखांच्या हाताखाली निरनिराळे मुलकी अधिकारी नेमले गेले. एलफिन्स्टनने पेशव्यांच्या राजवटीच्या अनेकविध अंगाबाबत या लहान-मोठ्या अधिकाऱ्यांकडून अगदी तपशिलवार अहवाल मागितले. त्याने स्वतः विविध प्रश्नांबाबत उत्तरे देण्याची सूचना त्यांना केली होती. ही सारी माहिती जमा झाल्यावर एलफिन्स्टनने तिचा बारकाईने अभ्यास करून एक अहवाल तयार केला. तो पुनर्मुद्रित झाला असून मराठशाहीतील समाजव्यवस्था, न्यायदान, महसुलाची पद्धती, लोकस्थिती यांची चांगली कल्पना येते. एलफिन्स्टन हा काही झाले तरी हा देश पादाक्रांत करावयास आलेल्या ब्रिटीश सत्तेचा प्रतिनिधी होता. त्याला प्रदेश काबीज करावयाचा होता तर पेशवे व इतर मराठे सरदार यांना स्वतःचा प्रदेश सोडायचा नव्हता. राजकीय डाव व प्रतिडाव खेळले जात होते आणि यामुळे एकमेकांच्या दोषांची; अवगुणांची त्यांना विशेष तीव्रतेने जाणीव झाली तर नवल नव्हे. पूर्वग्रहांचाही प्रभाव अपरिहार्य होता. यासाठी एलफिन्स्टनने येथील समाजाबद्दल जर काही टीका केली असली तरी ती पूर्णतः खरी मानता येणार नाही; पण त्याची टीका सर्वस्वी खोटी होती वा वस्तुनिष्ठतेचा त्याच्यापाशी पुरता अभाव होता असेही म्हणता येणार नाही, कारण स्वानुभवावर त्याने आपली मते व्यक्तविली आहेत.

ब्राह्मण व मराठे

कॅप्टन चॅपलिनने ब्राह्मण हे कारस्थानी, खोटे बोलणारे व बरेचसे अनिर्बंध वागणारे आहेत असे म्हटले होते व एलफिन्स्टनला हे मान्य होते. पण तो म्हणतो की हे ब्राह्मण अंधश्रद्ध आहेत, स्वतःच्या जातीविषयी जागरूक आहेत; पण एकंदरीत सौम्य आणि बुद्धिमान आहेत. अनेक बाबतीत ते उदार आणि जाणकार आहेत. कौर्य व रक्तपात त्यांना

एलफिन्स्टन

स्वभावतः आवडत नाही. यापैकी अनेकांच्या सल्ल्यावर आपण अवलंबून असतो असेही तो म्हणतो.

मराठे सरदार हे सत्ताधीश असले, त्यांच्यापाशी सैन्य असले की ते रांगडे, अज्ञानी आणि जुलूमजबरदस्ती करणारे असतात. परंतु ज्यांचा दरबार वा लष्कर यांच्याशी संबंध नसतो ते अधिक चांगले असतात. ते सौम्य, कष्टाळू व शेतीला उत्तेजन देणारे असतात.

मराठे सैनिक हे चपळ, कष्टाळू असतात आणि कितीही त्रास झाला, दमण्याची वेळ आली तरी त्यांचा तोल जात नाही. दूरवरच्या प्रदेशावर ते चालून जाण्यात धैर्य दाखवितात तथापि त्यांचा तरवारीपेक्षा स्वतःच्या घोड्यावर अधिक विश्वास आहे. मराठे सरळ शत्रूवर हल्ला करीत नाहीत. ते शत्रूचा प्रदेश लुटतात, त्याची रसद तोडतात. हल्ला झाला की ते हुलकावणी देतात आणि शत्रू दमला की त्यावर हल्ला चढवतात. यामुळे आपल्यापेक्षा जबर सैन्याला ते तोंड देऊ शकतात.

एकंदर मराठा शेतकरी हा सैन्यात जाऊन जी लूटमार करील ती वेगळी, पण साधारणतः हा समाज सौम्य आहे; शांततावादी आहे. हे लोक कमी खर्चिक, कष्टाळू आहेत. त्यांचा एकमेकांतला व्यवहार बराचसा प्रामाणिकपणाचा असतो. त्यांच्या सरकारातील दोषांमुळे या समाजात काही दोष वा अवगुण शिरले आहेत. सरकारकडूनच लुबाडले जात असल्याने त्यांना शाश्वती नसते आणि ती नसल्याने लग्नासारख्या प्रसंगी वाटेल तसा खर्च ते करतात. पाटील वगैरेंचा राज्यकर्त्यांशी अधिक संबंध येतो व या राज्यकर्त्यांच्या दोषांचा त्यांच्यावर परिणाम होतो. मराठा सैन्य हे ज्ञान, संस्कृती, औदार्य व कदाचित धैर्य यांच्याबाबतीत मुसलमानांपेक्षा कमी भरेल; पण मग्रूरी, क्रौर्य, व्यसनाधिनता, व्यभिचार, वैषयिकता याबाबतीत ते मुसलमानांपेक्षा अधिक चांगले आहे.

मराठा राजवटीतील साधेपणा टिकविला पाहिजे असा एलफिन्स्टनचा आग्रह होता. बंगालमध्ये साधा नागरिक आणि इंग्रज यांच्यात फार मोठे अंतर होते तसे ते येथे राहू नये असे सांगून एलफिन्स्टन म्हणतो, की बंगालमध्ये हिंदी नागरिक इंग्रज अधिकाऱ्यापुढे बसून बोलणे अशक्य आहे. पण येथे हरकारा सोडला तर कोणीही पेशव्यापुढे बसून बोलतो. या रीतीने स्थानिक लोकांशी संपर्क इंग्रज अधिकाऱ्यांनी ठेवावा. अर्थात स्थानिक लोकांचा सहवास हा फारसा आल्हाददायक असतो असे नव्हे. त्यांच्याशी बोलणे सुरू करताच ते स्तुती करू लागतात, एकमेकांविरुद्ध कागाळ्या करतात आणि काहीना काही मागण्या करतात हे सर्व खरे असले तरी यांच्याशी संपर्क वाढविणे आवश्यक आहे, असे एलफिन्स्टनचे म्हणणे.

यासाठी सरदार, दरकदार यांचा मान राहील अशी व्यवस्था करावी असे तो सांगतो. हे मानकरी व सरकारी अधिकारी यांच्याशी संबंध ठेवला की आपोआपच लोकमत काय आहे हे कळून येईल. यासाठी सामाजिक रचनेत आमूलाग्र फरक करण्याची एलफिन्स्टनची कल्पना नव्हती. कलेक्टरने केवळ कागदोपत्री लोकांचे म्हणणे ऐकून न घेता रोज दोन तास तरी त्यांची गाऱ्हाणी ऐकून घ्यावी असे त्याचे म्हणणे. त्याचप्रमाणे जिल्ह्यात कलेक्टरने फिरले पाहिजे असा त्याचा आग्रह. पूर्वी हे होत होते. आता मंत्र्याच्या दौऱ्यातच कलेक्टरचा सारा वेळ खर्ची पडतो आहे.

महाराष्ट्र त्या काळात कसा होता ? एलफिन्स्टन लिहितो : लोकसंख्या थोडी आहे व त्या मानाने लागवडीयोग्य जमीन बरीच आहे. लोक धडधाकट, दणकट आहेत व नेहमी सशस्त्र असतात. घरगुती काम अनेकांना मिळते. कनिष्ठ वर्गाच्या लोकांची स्थिती चांगली आहे आणि वरचे वर्ग तर संपन्न आहेत. करपद्धती अशी आहे, की नागरिकाने आपल्या कर भरण्याच्या बाबतीत चूक केली नसेल तर बारीकसारिक मुद्दे उपस्थित करून त्याचा छळ होत नाही. वरच्या वर्गात व्यभिचार बराच आहे; तर खालच्या वर्गात दारूचे व्यसन जवळजवळ नाही. सरकारला दारूपासून अबकारी कराच्या रूपाने फारसा पैसा मिळत नाही असे सांगून एलफिन्स्टन दारूबंदी करावी असे सुचवितो.

महसूल व न्याय

जमाबंदी अहवालावरून एलफिन्स्टनने महाराष्ट्रातील महसुलाच्या पद्धतीचे तपशिलवार वर्णन केले आहे. महसूल खात्याचा अधिकारीवर्ग वर्णन करून तो मग महसुलाच्या तपशिलात शिरतो. मामलेदार, पाटील व

जहागीरदार साधारणतः एकमेकांना आदर देत, पण पाटलाचा वरचष्मा चालत होता. बलुतेदारांची पद्धती होती व त्यामुळे कामाची विभागणी होऊन प्रत्येकाला त्याचा उत्पन्नातील भाग मिळत होता.

न्यायदानाची पद्धती सध्यापेक्षा वेगळी होती. गुन्हेगाराला शिक्षा देताना विशिष्ट कायद्याचा आधार घेतला जात होता असे नव्हे. कायद्याचा आधार नसल्याने निवाडा बदलला जात असे. ब्राह्मण व वरिष्ठ वर्गीय यांना गुन्ह्याबाबतची सजा सौम्य होती. फटक्यांची शिक्षा सरसकट होती आणि नाक-कान तोडण्याचीही होती. खुनाबद्दल फाशीची शिक्षा दिली जाई, तर राजद्रोहाबद्दल तोफेच्या तोंडी देण्यात येत असे. स्त्रियांना फाशीची शिक्षा नव्हती. वकील वगैरेंचा खर्च आरोपीला करावा लागत नव्हता; कारण वकील देण्याची पद्धतीच नव्हती. इंग्रज आल्यावर त्यांनी आरोपीची जबानी, उलटतपासणी वगैरे सुरू केले. पण न्यायनिवाडा करताना शास्त्रीपंडितांचे साहाय्य घेतले जात होते. मुख्यतः ग्रामपंचायतच गावातले तंटेबखेडे सोडवीत असल्याने न्यायालयीन पद्धती साधी होती. पुढे मेकॉलेने दंडविधान तयार केले. यानंतर न्याय अधिक खर्चिक व दीर्घसूत्री बनला. प्रत्येक पद्धतीचे काही फायदे व तोटे असतात. तसे ते मराठी न्यायपद्धतीत होते. पण तिचा साधेपणा व कमी खर्चिकपणा एल्फिन्स्टनला विशेष आकर्षक वाटत होता.

प्राप्त परिस्थितीत मंदगतीने बदल वा सुधारणा करण्यावर त्यांचा कटाक्ष होता म्हणून धार्मिक पुस्तकांचा वापर करून शिक्षणप्रसार करण्यास तो महत्त्व देत होता.

हा सारा अहवाल एका चाणाक्ष व कार्यक्षम प्रशासकाचा आहे. नवी पद्धती आणताना तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास करण्याची एल्फिन्स्टनची वृत्ती वाखाणण्यासारखी व आपल्या तज्ज्ञांनी अनुकरण करण्यासारखी आहे.

१८-१२-७७ ⊙

साहेबाच्या राज्यातील 'मेमसाहेब'

ब्रिटिशांची येथे राजवट होती तेव्हाच्या काळातील जीवनाचे दर्शन घडविणारी पुस्तके आजकाल लोकप्रिय होत आहेत. 'प्लेन टेल्स फ्रॉम राज' हे पुस्तक बरेच गाजले. तितके रोचक नसले तरी कोणालाही आवडावे असे आणखी एक छोटेखानी पुस्तक आता आले आहे. त्याचे नाव 'मेमसाहेब' असे असून लेखक आहेत पॅटबार. व्हिक्टोरिया राणीच्या काळातील ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या बायकांचे येथील जीवन कसे होते याचे चित्रण निरनिराळ्या पुस्तकांतील उताऱ्यांच्या द्वारे यात केले आहे. हे अलाइडचे प्रकाशन आहे.

अगदी प्रारंभी जेव्हा ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य होते तेव्हा, एवढेच नव्हे, तर त्यानंतरही येथील ब्रिटिश अधिकाऱ्यांचे जीवन बरेच कष्टमय होते. कंपनी सरकार पगार कमी देई आणि अधिकाराबरोबरचा इतमाम टिकविताना अनेकांना जड जाई. तथापि, येथील उष्ण हवा, आरोग्यविघातक वातावरण, करमणुकीचा अभाव, स्थानिक लोकांशी मोजकाच संबंध असल्याने अलग जीवन वाट्यास येत असे. यांचा अनेकांवर परिणाम होऊन बरेच जण अकाली निधन पावत. यात स्त्रियांचा भरणा अधिक होता. या मेमसाहेबांचे जीवन अधिकच एकाकी व कंटाळवाणे बनत असे. त्या काळात सरकारी अधिकारी खेड्यापाड्यातून घोडा, बैलगाडी यांचा वापर करून दौरा काढीत, तर इकडे त्यांच्या बायका कसेबसे दिवस काढीत. डास, धुळ, उष्णता यांनी त्या हैराण होत. न मानवणारी हवा व वैद्यकीय उपचारांची कमतरता यामुळे

मुलांचे आजार काढण्यात या मेमसाहेबांचे दिवसच्या दिवस जात. बरेच वेळा ही मुले दगावत. त्यावेळी कलकत्त्यात राजधानी होती. गव्हर्नर जनरल शनिवार-रविवार शहरापासून दूर अशा बराकपुरात जाऊन राहात. त्यांचे अनेक स्नेही बरोबर असत. हे दोन दिवस त्यांचे मजेत जात. तथापि कामाच्या निमित्ताने वा बदली झाल्यास प्रवास करावा लागला की अधिक हाल होत. तो काळ हा राजकीयदृष्ट्याही अस्थिर होता. अफगाणिस्तानविरुद्ध लढाई चालू होती आणि पठाणांशी लढता लढता ब्रिटिश सैनिक बेजार झाले होते. यात अनेक दगावले आणि त्यांच्या मेमसाहेबांचे हाल झाले.

येथे ब्रिटिश अधिकारी होते तसेच व्यापारीही होते. सर्वांचाच व्यापार चांगला चालत होता असे नव्हे. त्या काळातही मुंबईची राहाणी खर्चाची होती. सारा टेरी या बाईने आपल्या मुलीला लिहिलेल्या पत्रात या खर्चाच्या राहाणीचा तपशिल दिलेला आहे. घरासमोरील बागेत फळझाडे व भाज्या टेरी कुटुंब लावीत असे आणि स्वस्त कापडचोपड आणण्याचे काम आपल्या दासींवर मिसेस टेरी सोपवी. घरगुती कामात तिचा सारा वेळ जाई. संध्याकाळी नवरा परत आला, की तो काहीतरी वाचत पडतो आणि झोपतो, आपल्याला अगदी कंटाळा आला आहे असे ती लिहिते. एखाद वेळी गव्हर्नरच्या बंगल्यावर पार्टीचे आमंत्रण येई आणि तो दिवस मजेत जाई. गव्हर्नरच्या बंगल्यावर हिंदी स्त्री-पुरुषांना आमंत्रण नसायचे. फक्त फारशी मंडळींना आमंत्रण येई व तेही १८३५ पासून.

यानंतर १८५७ चा उठाव झाला. तो अर्थात् देशभर झाला नव्हता. पण अवध, कानपूर, झाशी, दिल्ली, मिरत येथे तुंबळ लढाया झाल्या. त्या-वेळचे अनुभव काही स्त्रियांनी लिहून ठेवले आहेत. मिरतला मोठा लष्करी तळ होता. तेथे एकदम शिपायांनी उठाव करून जाळपोळ सुरू केली तेव्हा ब्रिटिश अधिकारी त्यांच्या बायका व सैनिक यांची पाचावर धारण बसली. मे महिना आणि त्यामुळे उन्हाळ्याने सर्वांचा जीव घाबरा झालेला, त्यात हा उठाव. यात अनेकांची कत्तल झाली. दंगलीतून जे जिवंत राहिले त्यांना जन्मभर याचे विस्मरण झाले नाही. अंगावर शहारे आणणारे अनेक प्रसंग नमूद करण्यात आले असून त्यातील काही या पुस्तकात आले आहेत.

१८५७ चा उठाव थोड्याच दिवसांत संपला. त्याच्या कटू आठवणी फार काळ राहिल्या. यापुढील काळात ब्रिटिश अधिकारी व त्यांच्या मेम-साहेब यांच्या जीवनात बदल झालेला दिसेल. सुवेझ कालव्यामुळे इंग्लंड व हिंदुस्थान यांतील अंतर कमी होऊन दळणवळण वाढले व थोड्या काळात प्रवास होऊ लागला. हिंदुस्थानात रेल्वेचे जाळे वाढत गेले. रेल्वेमुळे प्रवास सुकर झाला. या प्रवासाची वर्णनेही अनेकांनी लिहून ठेवली आहेत. रेल्वेमुळे उन्हाळ्यात थंड हवेच्या ठिकाणी अनेक इंग्रज लोक जाऊ लागले. पण तेथेही साहेबापेक्षा मेमसाहेबांचा मुक्काम अधिक असे. एका लेखिकेने लिहिले आहे की सिमल्यासारख्या ठिकाणी हवा थंड, सुटीचे वातावरण यामुळे गंभीर प्रकृतीच्या लोकांनाही मौज करावीशी वाटे; मग जे खुशाल-चेंडू होते त्यांचे काय विचारावे ? या मोकळ्या वातावरणात स्वच्छंदीपणा वाढत गेला आणि काही स्त्रिया बऱ्याच वाहावत गेल्या.

काही मेमसाहेब सामाजिक कार्यात भाग घेत. त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. त्यांना वेळ कसा घालवावा याची चिंता पडत नव्हती. काहींनी हिंदी, उर्दू वा स्थानिक भाषा आत्मसात केली. त्यांचा आपल्या पतिराजांना बराच उपयोग होत असे.

८-१० ७८ ⊙

पंडिता रमाबाईचे पत्रात्मक दर्शन

श्री. हरिभाऊ मोटे यांना असाधारण असे साहित्य, कागदपत्रे जमवण्याचा नाद असल्याने रमाबाई मिशनचे श्री. आढाव यांच्याकडून त्यांनी पंडिता रमाबाईंचा पत्रव्यहार मिळवावा हे साहजिक म्हणावे लागेल. तथापि हा पत्रव्यवहार संपादित करून प्रसिद्ध करणे हे जिकिरीचे काम प्रा. अ. भि. शहा यांनी केले व महाराष्ट्र साहित्य संस्कृति मंडळाने प्रकाशनाचे काम अंगावर घेतले. प्रा. शहा यांना श्री. आढाव व प्रा. सरोजिनी वैद्य यांची मदत झाली असून पं. रमाबाईंचा पत्रव्यवहार पुस्तकरूपाने आता उपलब्ध झाला आहे (किंमत ३५ रु.). सरकारी मंडळाचे काम असल्यामुळे दिरंगाईने ते होणे, त्यात अनेक मुद्रणदोष राहाणे व बांधणीसुद्धा ढिली असणे हे सर्व ओघानेच आले.

सिस्टर जेराल्डिन या इंग्रज मिशनरीबाई १८७८ मध्ये भारतात होत्या. त्यांची व पंडिता रमाबाईंची चांगली गट्टी जमली. पं. रमाबाई त्यांना आजीबाई म्हणत. पं. रमाबाईंनी त्यांना पाठवलेल्या पत्रांचा मायनाही 'प्रिय आजीबाई' असाच आहे. या आजीबाईंच्या संग्रही काही टिपणवह्या होत्या, कागदपत्रे होती. ती मिस फुलर या मिशनरीबाईंकडे आली व त्यांनी ती श्री. आढाव यांना दिली. हा पत्रसंग्रह यामुळेच आता प्रकाशात येत आहे.

ब्राह्मो समाजाचा प्रभाव

पंडिता रमाबाई या मनस्वी स्वभावाच्या व विलक्षण कर्तबगार होत्या. कर्नाटक, मद्रास, बंगाल व आसाम इत्यादी विविध प्रांतात त्यांचे वास्तव्य झाले होते. बंगाल-आसामच्या वास्तव्यात राजा राममोहन रॉय व त्याहीपेक्षा केशवचंद्र सेन या सुधारकाग्रणींच्या विचारांचा त्यांच्या मनावर ठसा उमटला आणि ब्राह्मो समाजाचाही प्रभाव पडला. त्यांचा विवाहही एका बंगाली गृहस्थाशी झाला होता; पण एका अपत्याच्या जन्मानंतर त्यांच्यावर पतिनिधनाचा आघात झाला. तत्पूर्वी त्यांचा आधार जो त्यांचा भाऊ तोही निवर्तला होता, पण ही बाई डगमगली नाही. तिने मुंबईचा रस्ता धरला. ब्राह्मो समाजाच्या प्रभावामुळे ख्रिस्ती धर्माबद्दल त्यांना आकर्षण निर्माण झाले व पुढे धर्मांतर करून त्या ख्रिस्ती झाल्या. संस्कृत विद्येचे गाढ संस्कार झालेल्या पंडिता रमाबाई ख्रिस्ती झाल्या त्या विचारपूर्वकच हिंदू विधवा स्त्रियांच्या दुर्दैवाने त्यांचे मन हेलावले होते आणि अशा. स्त्रियांसाठी आपण काही करावयास हवे यासाठी त्यांची धडपड चालू

होती. शिक्षण व वैद्यकीय उपचार यांच्याद्वारे आपण समाजसेवा करावी असे त्यांच्या मनाने घेतले. त्यासाठी त्या इंग्लंडला गेल्या. त्यांनी प्रशिक्षित शिक्षिका होऊन वैद्यकीय शिक्षण जेवढे घेता येईल तेवढे घेतले. त्यांच्या नातेवाईक डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या पदवीदान समारंभासाठी पुढे त्या अमेरिकेला गेल्या. तिथे त्यांची हिंदू विधवांच्यासंबंधात झालेली भाषणे गाजली, भारतात परतल्यावर मुंबईत त्यांना अशा पीडित स्त्रियांसाठी शारदासदन काढायचे होते. या अमेरिकाभेटीत त्यासाठी त्यांना पैसाही गोळा करता आला.

एक दुःखद वाद

शारदासदन निघाले मुंबईला व नंतर पुण्याला हलवण्यात आले. या सदनात धर्मविहीन शिक्षण देण्याचे धोरण रमाबाईंनी अवलंबले होते. कोणा विद्यार्थिनीस ख्रिस्ती व्हायचे असेल तर त्यांची आडकाठी नव्हती. या स्थितीत कोणी आश्रमवासिनी ख्रिस्ती होताच शारदासदन हे टीकेचे लक्ष्य झाले. लोकमान्य टिळकांनी तीव्र शब्दात टीका केली आणि रानडे, भांडारकर यांनी सदनाच्या विश्वस्तपदाचे राजीनामे दिले. पंडिता रमाबाई या धार्मिक शिक्षण देत होत्या हे ख्रिस्ती मिशनऱ्यांना मान्य नव्हते, तर त्या धर्मांतराला आडकाठी करीत नव्हत्या म्हणून टिळकप्रभृती संतप्त होते. स्त्रिया, विशेषतः विधवा, यांच्यासंबंधात थोडी जरी उदारदृष्टी त्या वेळी टिळकप्रभृतींनी ठेवली असती तर पुढे उघडपणे धर्मांतर करवण्याचे कार्य पंडिता रमाबाईंनी केले तसे केले असते की नाही याविषयी शंका वाटते. परंतु महाराष्ट्राच्या समाजजीवनात त्यावेळी किमान उदारपणा या विधवांच्या प्रश्नांबाबत दाखवला गेला नाही हे खरे. तथापि या प्रश्नाकडे आजच्या काळाचा चष्मा लावून पाहणेही गैर आहे. औदार्य पाहिजे होते हे तर खरेच; पण ज्यांनी ते दाखवले नाही त्यांना किंवा समाज-सुधारकही दडपणाला बळी पडले म्हणून त्यांना डरपोक म्हणणे हे न्याय्य होणार नाही. सामाजिक सुधारणेची गती मंदच असते आणि हे लक्षात घेऊनच समाजधुरिणांना मार्ग काढायचा असतो. ज्या काळात स्त्रीशिक्षण, विधवाविवाह इत्यादी संबंधात आपले पुढारी विरोधी भूमिका घेत होते त्याच वेळी युरोपांत–इंग्लंडमध्ये–काय परिस्थिती होती. याचा पं. रमाबाईंच्या पत्रावरून उलगडा होतो. त्या तेथे तरुण मुलांच्या वर्गापुढे भाषण देण्यास गेल्या असत्या सिस्टर जेराल्डिन यांना ते आवडले नाही. त्यांच्या भाषणाचे वृत्त ऐकल्यावर मुंबईचे बिशप संतापले. पं. रमाबाईंनी यास धूप घातली नाही. आपल्या नवऱ्याच्या मित्राला त्या ब्रिस्टल येथे भेटल्या हेही त्यांच्या मिशनरी पालकांना मान्य नव्हते. यासंबंधात बराच पत्रव्यवहार झाला आहे. पण यामुळे ब्रिटिश समाजही त्या काळी सनातनीच होता हे सिद्ध होते. अर्थात् पं. रमाबाईंच्या बाबतीत येथील पुढारी जर उदारपणे वागते तर त्यांच्या कर्तृत्वाचा चांगला उपयोग करून घेता आला असता.

स्वतंत्र वृत्ती

तथापि पंडिता रमाबाईंचा स्वतंत्रपणा दिसतो तो त्यांनी जेराल्डिन व इतर व्यक्तींशी धार्मिक बाबतीत घातलेल्या वादातून. ख्रिस्ती धर्मकल्पना, धर्मशास्त्र यासंबंधात रमाबाईंनी उपस्थित केलेले प्रश्न मिशनऱ्यांना मान्य होणे शक्यच नव्हते. आपल्या गळ्यात घालावयाच्या क्रुसावर लॅटिन वाक्ये नकोत, संस्कृत हवीत अशी त्यांची मागणी होती. ख्रिस्ताचा जन्म शारीरिक संबंधातून झालेला नाही हे त्यांना मान्य नव्हते. त्याचप्रमाणे कॅथॉलिक पंथाच्या अनेक कल्पना, विधी इत्यादींवर त्यांनी टीका केली आहे. ही टीका म्हणजे पाखंड आहे, कॅथॉलिक पंथाखेरीज इतर पंथ हेही पाखंडी आहेत, हे जेराल्डिन यांचे मत त्यांना बिलकूल मान्य नव्हते. रोमन चर्चपेक्षा अँग्लिकन चर्च हे जर वेगळे आहे व तरी ते पाखंडी नाही तर बाकीचे पंथ कसे पाखंडी ठरतात, हा त्यांचा सवाल होता. त्यांचा मुख्य रोख ख्रिस्ती पुरोहितांवर होता. हे पुरोहित धर्माचा जो अर्थ लावतील, जे यमनियम घालून देतील ते तसेच्या तसे मान्य करण्याची त्यांची तयारी नव्हती. त्या सरळच विचारतात की, हिंदु पुरोहित वर्गाविरुद्ध आपण बंड केले तर ख्रिस्ती पुरोहितशाही आपण का मानावी? इंग्लंडमधून हिंदुस्थानात आलेल्या मिशनऱ्यांना हिंदी समाजाची आपल्यापेक्षा जास्त माहिती आहे हे त्या कबूल करण्यास तयार नव्हत्या. आपल्या मुलीला कसे शिक्षण द्यावे, तिने प्रार्थना कोणत्या व कशा म्हणाव्या याही बाबतीत त्यांनी कोणाचा हस्तक्षेप मान्य केला नाही.

या स्वमतापायी आपल्या कार्यासाठी आर्थिक मदत झाली नाही तरी चालेल, आपले हातपाय धड आहेत व त्यामुळे आपण स्वावलंबी बनू शकतो असे त्या कळवतात.

अर्थात त्या अखेरपर्यंत खिस्तीच राहिल्या. मुक्ती आश्रमात त्यांनी धर्मांतरही घडवून आणले. प्रा. अ. भि. शहा यांनी आपल्या प्रस्तावनेत खिस्त व खिस्ती धर्म यांच्यासंबंधीचे आजकालच्या काही विद्वानांचे वाङ्मय वाचल्यावर रमाबाईंनी कोणती भूमिका घेतली असती असा प्रश्न केला आहे. असा विचार सुचणे क्रमप्राप्तच आहे. पण एकेश्वरवाद, एक धर्मग्रंथ व एकच प्रेषित ही धार्मिक भूमिका घेतली नाही तरच विविध विचारांचे स्वागत करण्याची बुद्धी होऊ शकते. पं. रमाबाई अनेकविध खिस्ती धर्मपंथ मान्य करीत होत्या. खिस्तेतर धर्मासंबंधी त्यांनी काय भूमिका घेतली असती हा अंदाजाचा विषय झाला. त्याची चर्चा या पत्रांत नाही. तथापि त्यांच्या स्वतंत्र वृत्तीला धर्मपंथाची बंधने जाचक वाटत होती व आपली मते खिस्ती धर्माच्या परिघात राहून त्या स्पष्टपणे मांडण्यास कचरत नव्हत्या हेच या पत्रव्यवहारावरून दिसते व एका मनस्वी जीवनाची ओळख होते.

१-१-७८ ◉

जेम्स कॅमेरॉन

जेम्स कॅमेरॉन हे नावाजलेले ब्रिटिश पत्रकार. जगभर त्यांनी प्रवास केलेला असून, कोठे महत्त्वाची घटना घडत असेल, तेथे ते नाहीत, असे कधी घडलेले नाही. युद्धकाळात भारतीय पुढाऱ्यांशी वेव्हेल यांनी सिमल्याला वाटाघाटी केल्या, तेव्हा सिमल्यात ते होते; स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा दिल्लीत होते. कोरियाचे युद्ध असो वा व्हिएतनामचे, कॅमेरॉन यांची हजेरी ठरलेलीच. ग्रीसमधील उठावाच्या वेळी ते तेथे होते आणि क्युबामधील घडामोडीही त्यांनी पाहिल्या. त्याचप्रमाणे अरब-इस्रायली संघर्षही प्रत्यक्षात पाहिला. 'न्यूज क्रॉनिकल' या उदारमतवादी पत्राचे ते फिरते प्रतिनिधी होते. पण ते पत्र बंद पडल्यावर त्यांनी वेगवेगळ्या पत्रांसाठी स्वतंत्रपणे लिखाण केले, त्याचप्रमाणे बी. बी. सी. साठी काही कार्यक्रम केले व अद्यापही त्यांचा हाच उद्योग चालू आहे. या जगपर्यटनात त्यांचा मोठमोठ्या व्यक्तींशी परिचय झाला. आपल्याकडे पं. नेहरूंशी

त्यांची चांगली मैत्री होती. जे विविध अनुभव कॅमेरॉन यांना आले ते वर्णन करण्याची त्यांची हातोटीही विलक्षण आहे. आपल्या अनुभवांकडे ते तटस्थपणे पाहतात, पण त्यामुळे त्यांची शैली रुक्ष झालेली नाही. उलट कॅमेरॉन यांची शैली जेवढी ओघवती तेवढीच ती आल्हाददायक आहे. मानवी दोष ते खुबीने दाखवतात; त्यात सुधारकाचा आव नाही आणि स्वतःवरही विनोद करण्यात ते मागे राहात नाहीत. उगाच फापटपसारा न करता मोजक्या, अर्थगर्भ शब्दांत ते आपले अनुभव व्यक्त करतात. त्यांची शैली प्रसन्न आहे. या प्रसन्न शैलीतच त्यांनी लिहिलेले 'इंडियन समर' हे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे.

भारतदर्शन

जेम्स कॅमेरॉन यांनी मोनी नामक एका हिंदी मुलीशी विवाह केला. त्यांची पत्नी कुर्गी आहे आणि सासुरवाड बंगलोरला आहे. सासऱ्याने बंगलोरला बंगला बांधून आवारात उत्तम फुलबाग व फळबाग केली आहे. कॅमेरॉन तीन वर्षांपूर्वी येथे सपत्नीक आले. मुंबई, बंगलोर, उटी, मद्रास, दिल्ली, जयपूर, उदेपूर, कलकत्ता असा प्रवास केला आणि अनेकांच्या भेटीगाठी घेतल्या. अखेरीस बांगला देशच्या संघर्षाची माहिती घेण्यासाठी ते सीमेनजीक गेले आणि जखमी झाले. जायबंदी स्थितीतच त्यांना इंग्लंडला परतावे लागले. या भारतभेटीवर त्यांनी 'इंडियन समर' हे पुस्तक लिहिले आहे. मुंबई व त्याहीपेक्षा कलकत्त्यातील गर्दी, दिल्लीचे राजकीय व सामाजिक जीवन, राजा-महाराजांचे जीवन यांचे त्यांनी त्यांच्या दृष्टीतून दर्शन घडवले आहे. कधी नर्म विनोद, कधी विश्लेषण इत्यादींचा आश्रय घेत आजच्या भारतीय जीवनाचे त्यांनी घडवलेले दर्शन जेवढे आल्हाददायक तेवढेच ते अंतर्मुख होण्यास मदत करणारे आहे. मुंबईसारखे गलिच्छ शहर सापडणार नाही, हे त्यांचे मत कोणाला चुकीचे वाटेल? मुंबईची गर्दी, बकालपणा व त्यामुळे जीवघेणी धावपळ, मर्यादा न ठेवता चाललेली वाहतुक इत्यादींचे मर्मभेदक वर्णन कॅमेरॉन करतात. तर कलकत्ता हे शहर कधीकाळी सुधारेल, याची त्यांना आशा नाही. राजकारणी लोकांनी कलकत्ता शहराचा पुरता बट्ट्याबोळ करण्याचा जणू कटच केला आहे, हे कॅमेरॉन यांचे मत रास्त वाटते. त्याचबरोबर बंगाली बाबूंची बोलूकाका वृत्ती, आत्मघातक भावनाशीलता या सर्वांवर कॅमेरॉन यांनी फटके मारले आहेत, तेही अनाठायी नाहीत.

समाजदर्शन

कॅमेरॉन हे स्वतःच्या जीववेण्या आजाराचेही विनोदाचा आश्रय करून वर्णन करतात, तेथे ते इतर समाजाच्या वा व्यक्तींच्या दोषांची चिकित्सा गुळमुळीतपणे कसे करतील? भारतीय लोकांच्या व्यक्तिगत स्वच्छतेची नोंद ते करतात, पण सामाजिक गलिच्छतेचेही विदारक भाषेत दर्शन घडवतात. भारतीय स्त्री-पुरुष पार्टीला जमले तर हलकेफुलके बोलायचे झाल्यास फारच फालतू, कंटाळवाणे बोलतात असे सांगताना त्यांनी एका ठिकाणचे संभाषणच दिले आहे. ते वाचल्यावर पुनःप्रत्ययाचा अनुभव येईल. कॅमेरॉन यांनी भारतीयांची आणखी काही वैशिष्ट्ये नमूद केली आहेत. ते म्हणतात, हा एक कमालीचा गोंगाट करणारा समाज आहे. या लोकांना हळू बोलताच येत नाही. बाहेरचा वाहनांचा आवाज आणि आतला लोकांच्या मोटमोठ्याने बोलण्याचा आवाज. बरे, या लोकांशी संभाषण होते काय? तेही नाही. कॅमेरॉन यांच्या मते भारतीय माणूस चर्चा वा संभाषण करीत नाही, तर भाषण करतो. तो आपले मत ठामपणे मांडीत असतो. त्यामुळे चर्चा, संभाषण संभवत नाही. अध्यात्मिक चर्चा भरपूर होते. पाश्चात्य व्यक्तीला येथील गोंधळ, बेशिस्त यामुळे घाबरे झाल्यासारखे होते, पण भारतीय व्यक्ती मात्र अगदी शांत व निर्विकार असते. अध्यात्मिकतेचा बुरखाही वरवरचा आहे आणि सर्वव्यापी अशा भ्रष्टाचाराचा विचार केला तर कसले अध्यात्म व कसली उच्च संस्कृती? कॅमेरॉन यांनी हे सर्व फुगे फोडले आहेत, पण ते हलक्या हाताने.

सिमला परिषद

दिल्लीतील मुक्कामात भारतीय स्वातंत्र्याचा पंचविसावा वाढदिवस साजरा होत असता स्वातंत्र्यपूर्वकाळ, स्वातंत्र्यानंतरचे लग्नातचे दिवस यांच्या आठवणी कॅमेरॉन यांना येणे स्वाभाविकच होते. सिमला-परिषदेच्या वेळी ते

सिमल्याला होते. तेथे घोड्यावरून इकडे तिकडे फिरण्याचा उपक्रम त्यांनी सुरू केला व पं. नेहरूही घोड्यावरूनच फिरत असल्याने त्यांच्या वारंवार भेटीगाठी होत. गांधीजी, वल्लभभाई, आझाद, पंडितजी या पुढाऱ्यांशी कॅमेरॉन यांची चांगली जानपेहचान होती. ही सिमला-परिषद अयशस्वी झाली. हिंदी पुढाऱ्यांनी वेव्हेल व ब्रिटिश सरकार यांना दोष दिला. ब्रिटिश सरकारने हिंदी नेत्यांना जबाबदार धरले. वेव्हेल अयशस्वी ठरले. आता त्यांची रोजनिशी प्रसिद्ध झाली आहे. ती पाहिल्यावर वेव्हेल यांना ब्रिटिश सरकारने निश्चित कोणती भूमिका घ्यावयास हवी याची चांगली कल्पना होती हे स्पष्ट होते. कॅमेरॉन यांनी याकडे लक्ष वेधताना म्हटले आहे, की ॲटली यांना स्वातंत्र्य प्रयत्नाचे बरेच श्रेय दिले जाते, पण सिमला-परिषदेच्या वेळी ॲटली यांची भूमिका स्वातंत्र्यप्रदानाची नव्हती. किंबहुना ॲटली पंतप्रधान झाल्यावरही भारताला स्वातंत्र्य देण्याची निश्चित काल-मर्यादा घातली नाही तर पेचप्रसंग उद्भवणार, राहणार याची ब्रिटिशांना जाणीव होती. Alternative to deadline is deadlock हे सूत्र ॲटलींचे नव्हते, तर वेव्हेल यांचे होते हे आता सरकारी कागदपत्रांवरूनही सिद्ध होते. कॅमेरॉन विचारतात आम्हा पत्रकारांचेसुद्धा हे अपयश नव्हे काय? की आम्हाला वेव्हेल कोणती भूमिका घेत होते याची काहीही कल्पना तेव्हा आली नाही?

जीना व नेहरू

सिमला परिषदेच्या वेळी कॅमेरॉन जीनांना भेटले. जीनांचे व्यक्तिचित्र त्यांनी सुरेख रंगवले आहे. ते म्हणतात, जीना केवळ ठराविक ठशाची पत्रके काढीत. पुढे पाकिस्तान हा एकच शब्द सतत उच्चारत राहिले आणि कोणतीच तडजोड न स्वीकारता त्यांनी पाकिस्तान मिळवले. जीनांचा पोशाख इतका रेखीव व बेतीव असे, की तो पोषाखच लक्षात राहून त्यातील व्यक्तित्वाचा विसर पडे. या व्यक्तित्वाविषयी आत्मीयता वाटावी असे ते नव्हते. पोषाखाविषयी जीना किती दक्ष असत? कॅमेरॉन त्यांच्या भेटीला गेले असता संभाषण सुरू झाले, पण थोड्याच वेळात जीना उठले. कॅमेरॉनना वाटले जीनांची प्रकृती बिघडली असावी. जीना आतल्या दालनात गेले व पाच मिनिटांत बाहेर आले. कॅमेरॉनना ते म्हणाले, 'माझ्या नोकराने शर्टाच्या हाताची चुकीची बटने लावली होती व म्हणून ती बदलून आणण्यासाठी मी आत गेलो होतो!'

उलट नेहरूंच्या व्यक्तित्वाने कॅमेरॉन आकर्षित झाले होते. इतके की कोरियन युद्धक्षेत्रावरून परत जाताना ते दिल्लीला उतरले आणि नेहरूंशी गप्पागोष्टी करून त्यांना मानसिक समाधान मिळाले. नेहरूंच्या अनेक गुणांची कॅमेरॉन यांनी प्रशंसा केली आहे, पण पंतप्रधान, देशाचा नेता या नात्याने नेहरू यशस्वी झाले, असे त्यांना वाटत नाही. नेहरूंच्या हाती एवढी सत्ता होती, की या देशात ते समृद्धी आणू शकले असते व त्यास शिस्तही लावू शकत होते. पण इतिहासाच्या आहारी जाऊन त्यांना वर्तमानाचा विसर पडला आणि लोकांची अप्रीती ओढवेल असे निर्णय घेण्याचे त्यांनी टाळले. त्यांच्या आत्मकेंद्रित स्वभावामुळे तोंडपुजे लोक जमा झाले आणि कार्यक्षमतेपेक्षा लाचारीला प्राधान्य मिळाले, असे कॅमेरॉन यांचे मत आहे. त्यांनी सध्याच्या काळातील बोलघेवड्या समाज-वाद्यांची रेवडी उडवली आहे आणि निष्फळ घोषणा, आणि काहीतरी चमत्कार करण्याची भूमिका यामुळे गरिबीही हटत नाही व समाजवादही येत नाही, हेही दाखवून दिले आहे.

कॅमेरॉन हे भारताविषयी प्रेम बाळगणारे गृहस्थ आहेत. त्यांची भूमिका असहिष्णू टीकाकाराची नाही, तर मित्राची आहे. खऱ्या मित्राने खरेच बोलले पाहिजे, त्याला वाटते ते बोलून दाखवले पाहिजे. कॅमेरॉन या दृष्टीने आपले खरे मित्र आहेत. ८-६-७६ ⊙

जिम कॉर्बेटचा प्रदेश

कथा, कादंबऱ्या, इतिहास, आत्मचरित्र व प्रवासवर्णनपर ग्रंथ यांमुळे काही प्रदेश आपल्याला तेथे न जाताही ओळखीचे झालेले असतात. अनेक इंग्रजी लेखकांच्या लिखाणामुळे लंडन वा इंग्लंडचे अनेक भाग, रस्त्यांची नावे ही तेथे न जाताही आपल्याला ठाऊक असतात. चालू वर्षापूर्वी नैनीताल व त्याच्याही वर असलेल्या मुक्तेश्वरला जाण्याचा योग आला. दिल्लीहून मोटरने निघून मोरादाबाद, बरेली वगैरे गावे गेल्यावर प्रदेश ओळखीचा वाटला आणि नैनितालची चढण सुरू होण्यापूर्वी कठगोंडम येथे लाकडाच्या वखारी, लाकडाचा व्यापार चालू असलेला पाहिला तेव्हा हा जिम कॉर्बेटचा प्रदेश असल्याचे जाणवले. कॉर्बेटच्या जंगल लोअर, माय इंडिया, मॅन इटर्स ऑफ कुमाऊं, मॅन इटिंग लेपर्ड ऑफ रुद्रप्रयाग (ऑक्सफर्ड प्रेसने ही पुस्तके अगदी स्वस्तात काढली आहेत) इत्यादी पुस्तकांतून या भागातील लोक, मानवी रक्ताला चटावलेले वाघ, चित्ते, घरादारांचा नाश करणारी रानडुकरे, अनेक प्रकारचे पक्षी, गारुप्पूचे जंगल यांचे आत्मीयतेने उल्लेख आहेत.

मुक्तेश्वर, नैनितालहून परतताना कॉर्बेटचे कालाढुंगी हे गाव व त्यांचे घर पहावे असा विचार करून एका आडव्या वाटेने निघालो. जाताना कॉर्बेटने वर्णन केलेले ओढे, मोठमोठ्या वृक्षांचे जंगल, ही सर्व लागली आणि अखेरीस कालाढुंगी व त्यांचे घरही आले. हिवाळ्यात कॉर्बेट व त्यांची बहीण मॅगी यांचा मुक्काम याच घरात असे. हे निवासस्थान डाकबंगल्याच्या धर्तीवर आहे आणि उत्तर प्रदेशच्या सरकारने ते चांगल्या स्थितीत ठेवले आहे. कॉर्बेटच्या घरातील काही सामान जसेच्या तसेच आहे. घराचे आवार चांगले प्रशस्त असून त्यातच कॉर्बेटच्या कुत्र्याची समाधी आहे. मॅगॉग, रॉबिन, डेव्हिड असे त्यांचे अनेक कुत्रे होते आणि त्यांचे मोठ्या प्रेमाचे उल्लेख कॉर्बेटच्या पुस्तकात आहेत.

कालाढुंगी गाव आता थोडे वाढले आहे; पण कॉर्बेट यांच्या घराच्या थोडे पुढे गेले की एक लांबलचक, काहीशी गोलाकार भिंत दिसते. 'माय इंडिया' या पुस्तकात या भिंतीची जन्मकथा आहे. त्यावेळी एक रानडुकर या भागात फार धुमाकूळ घालीत असे. रात्री तो अनेकांची शेते उध्वस्त करी. या डुकराला कॉर्बेट यांनी पुढे मारले खरे, पण डुकरे व

साळू यांचा त्रास गावकऱ्यांना होऊ नये म्हणून कॉर्बेट यांनी गावाला वेढा देणारी ही भिंत बांधून घेतली. मोकामे घाट येथे मालवाहतूक करण्याचे कंत्राट कॉर्बेट यांच्याकडे होते. थोडा फायदा होऊ लागताच त्यांनी 'आपल्या' गावकऱ्यांच्या रक्षणासाठी ही भिंत बांधली. ती पाहिल्यावर कॉर्बेट यांनी वर्णन केलेल्या अनेक गावकऱ्यांचीही आठवण आली. संध्याकाळ झाली होती आणि कॉर्बेट यांच्या बंगल्याच्या व्हरांड्यात उभे राहिल्यावर आता एखादा मोती, एखादा हॉटसिंग, कुंवरसिंग येईल आणि कॉर्बेटसाहेब व त्यांची बहिण मॅगी यांच्याशी जंगलच्या गोष्टी सुरू होतील, अशी एक कल्पना चमकून गेली. अर्थात ती कल्पनाच होती. कारण यापैकी आता कोणीच हयात नाही.

'माय इंडिया'

जिम कॉर्बेट यांच्या शिकारविषयक पुस्तकांचा जेवढा बोलबाला झाला आहे, तेवढा 'माय इंडिया' या पुस्तकाचा झाला नाही. वास्तविक हे एक उत्कृष्ट पुस्तक आहे कालाढुंगीच्या आसपासचा प्रदेश आणि तेथील अनेक व्यक्ती कॉर्बेटनी साकार केल्या आहेत. कॉर्बेट हे या प्रदेशात व माणसांत रमले होते आणि लिनलिथगो, वेव्हेल यासारख्या व्हाइसरॉयशी त्यांचा स्नेह जमला होता व त्यामुळे राजकीय घडामोडींची त्यांना कल्पना येई. तरीही सर्वसामान्य, निरक्षर व गरीब लोकांत ते अधिक रमत होते. त्यांच्या सुखदुःखाशी समरस झाले होते. त्यांच्या चालीरीती त्यांना चांगल्या अवगत होत्या. 'माय इंडिया' हे पुस्तक त्यांनी याच कोट्यवधी गरीब भारतीयांना अर्पण केले आहे.

या पुस्तकात कुंवरसिंग भेटतो. कॉर्बेटना पहिली बंदुक मिळाली तेव्हा कॉर्बेटइतकाच कुंवरसिंगला अभिमान वाटला. कॉर्बेट यांचा वडील भाऊ टॉम याच्या निशाणबाजीबद्दल या कुवरसिंगला अतिशय अभिमान. एकदा एका साहेबाची दोन रानडुकरांनी कशी त्रेधा केली व टॉमने दोन गोळ्यात ती डुकरे कशी लोळवली याचे रसभरीत वर्णन कुंवरसिंगनेच कॉर्बेटना ऐकवले होते. त्या भागातील अनेक वृक्ष हे या दोघांच्या परिचयाचे होते. रात्री शिकार मारल्यावर खाणाखुणा सांगितल्या की कुँवरसिंग कोठूनही ती शिकार शोधून आणीत असे.

शेरसिंग या छोट्या मुलाची व्यक्तिरेखा कॉर्बेटनी आत्मीयतेने रंगवली आहे. रानावनात जनावरे चरण्यासाठी सोडून बासरी वाजवीत, मुक्तकंठाने गात फिरणारा हा शेरसिंग अतिशय निर्भय होता. पक्षांची शिकार करताना कॉर्बेटना त्याचा फार उपयोग होत असे. या शेरसिंगाचे आपल्या लालू बैलावर निरतिशय प्रेम. लालू हा आपल्या छोट्या धन्याप्रमाणेच निर्भय. एकदा एका मारलेल्या गायीचे मास भक्षण करणाऱ्या वाघाला या लालू बैलाने उधळून लावले होते. शेरसिंग पुढे मलेरिया होऊन मरण पावला.

या जंगलभ्रमंतीत, एखादा वाघाने आतडी बाहेर काढलेला इसम भेटतो; तर दोन लहान मुले जंगलात हरवल्याने त्यांच्या मातापित्यांची काय अवस्था झाली, या मुलांच्या शोधार्थ ते कसे वणवण फिरत होते व अखेरीस एका खड्ड्यात ती मुले मिळाल्याने कसा आनंदी आनंद झाला याचे हृदयस्पर्शी वर्णनही कॉर्बेटनी केले आहे.

पुढे मोकामे घाट येथे रेल्वे यार्डातील मालवाहतुकीचे कंत्राट कॉर्बेटना मिळाले. या कामात त्यांनी शिस्त आणली. पण पुढे सरकारकडून वेळेवर पैसे येईनात. लोकांची उपासमार होऊ लागली म्हणून कामकरी संतापून त्यांच्याकडे आले. कॉर्बेट स्वतःही अल्प अन्नसेवन करीत असल्याचे पाहून कामकऱ्यांचा संताप गेला. नंतर कॉर्बेटनी ताबडतोब पैसे पाठवा, नाहीतर काम बंद अशी तार केली. पैसे वेळेवर आले. इतर कंत्राटदारांप्रमाणे न वागता कामगारांशी समरस होऊन कॉर्बेटनी जे हे काम केले ते उल्लेखनीय ठरेल. 'माय इंडिया'मध्ये या प्रकारची अनेक व्यक्तिचित्रे, प्रसंग व आठवणी आहेत. कॉर्बेट हे केवळ वन्यप्राण्यांची शिकार करणारे नव्हते, तर वन्यप्राणी, जंगले, पक्षी यावर प्रेम करणारे होते. नैनीताल वगैरे भागातील पक्ष्यांच्या चारशे जाती त्यांनी शोधल्या होत्या. या विलक्षण माणसाच्या नावाने उत्तर प्रदेशात कॉर्बेट नॅशनल पार्क आहे व उत्तर प्रदेश सरकार कॉर्बेट यांची शताब्दी येत्या आठवड्यात साजरी करीत आहे, ही चांगली घटना आहे.

२०-६-७५ ◉

पत्रकाराच्या आठवणी

बी. शिवराव हे ज्येष्ठ पत्रकार निधन पावले. बी. एन. राव, रामराव हे त्यांचे नामवंत भाऊ. बी. शिवराव हे ॲनी बेझंट यांच्या प्रभावी व्यक्तित्वाने भारावले व तारुण्यातच राजकारण, समाजकारण, थिऑसॉफी याकडे आकर्षित झाले. 'इंडियाज फ्रीडम मूव्हमेन्ट' हे त्यांचे पुस्तक आठवणीवजा असून भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांचा ज्यांच्याशी संबंध आला किंवा त्यांच्यावर ज्यांचा प्रभाव पडला त्यांच्या व्यक्तिरेखा त्यांनी या पुस्तकात रंगवल्या आहेत. नेकनामदार गोखले, म. गांधी, पं. मोतीलाल नेहरू, सप्रू, पं. जवाहरलाल नेहरू, सुभाषबाबू, ॲनी बेझंट अशा मोठमोठ्या व्यक्तींचा सहवास त्यांना लाभला होता. एवढेच नव्हे, तर व्हाइसरॉय लिनलिथगो व स्ट्रॅफर्ड क्रिप्स यांचाही विश्वास संपादन करून त्यांनी राजकीय समस्यांच्या वेळी मध्यस्थाची भूमिका अनेक वेळा केली होती.

ॲनी बेझंट यांच्या 'न्यू इंडिया'मध्ये शिवराव त्यांना साहाय्य करीत. पुढे त्यांनी मद्रासमध्ये स्वदेशी व ग्रामोद्योग यांच्या प्रसाराचे काम केले. म. गांधींना यामुळे त्यांच्याबद्दल आत्मीयता होती. त्यांनी शिवराव यांना पत्र पाठवून वर्ध्याला बोलावले व ग्रामोद्योग धंद्याच्या उभारणीच्या कार्यात मदत करण्यास सांगितले. शिवराव यांनी महात्माजी व त्यांचे सहकारी यांच्याशी चर्चा करून या संघटनेचा तपशील ठरवला, परंतु तिचे पूर्ण-वेळचे चिटणीसपद घेण्याची गांधींची सूचना त्यांना मान्य नव्हती. याच वेळी त्यांना हिंदू व मँचेस्टर गार्डियन या पत्रांच्या दिल्लीतील प्रतिनिधीची जागा मिळाली. या निमित्ताने त्यांचा शासनातील वरिष्ठ अधिकारी व ज्येष्ठ हिंदी राजकीय नेते त्यांच्याशी घनिष्ठ संबंध आला. त्यावेळच्या आठवणी त्यांनी 'इंडियाज फ्रीडम मूव्हमेंट' या पुस्तकात ग्रथित केल्या आहेत.

पं. मोतीलाल व जीना

पं. मोतीलाल यांची एक आठवण शिवराव यांनी दिली आहे ती सिमल्याची. स्वराज्य पक्षाचे नेते या नात्याने मोतीलाल नेहरू तेव्हा वावरत होते. त्यांनी एका खान्याच्या वेळी विनोदप्रचुर भाषण केले. या मेजवानीत मद्यही होते. मोतीलाल नेहरू यांनी मद्याच्या बाटल्या पाहून एक पर्शियन काव्यपंक्ती म्हणून दाखवली. तिचा अर्थ असा, की मद्य जर मोफत मिळत असेल तर ते पाहून काझीच्यासुद्धा तोंडाला पाणी सुटेल. महात्मा गांधींना जेव्हा हे कळले तेव्हा स्वराज्य पक्षाच्या नेत्याने मद्यपानात सामील व्हावे, मद्याची प्रशस्ती करावी हे त्यांना आवडले नाही. या मेजवानीच्या वेळी शिवराव हजर होते. पण त्यांनी 'हिंदू'मध्ये हा भाग दिला नाही. नंतर पं. मोतीलाल नेहरू सिमल्याच्या माल भागात सायंकाळी फेरफटका करीत असता त्यांना शिवराव दिसले, तेव्हा त्यांनी शिवरावना बोलावून विचारले, 'अरे! तू असा कसा पत्रकार? मी एवढी मद्यप्रशस्ती केली तरी तू तुझ्या बातमीपत्रात उल्लेखसुद्धा केला नाहीस!' शिवराव म्हणाले, 'सामाजिक समारंभाचा उपयोग राजकीय कारणास्तव न करण्याची दीक्षा मला बेझंटबाईंकडून मिळाली असल्याने मी तशी बातमी पाठवली नाही.'

पण तेव्हापासून मोतीलाल व शिवराव यांचे चांगले सख्य जमले.

जीना व शिवराव यांची चांगली दोस्ती होती. जीना आधी राष्ट्रवादी होते. हिंदू व मुसलमान ही दोन राष्ट्रे नाहीत असे ते तेव्हा ठासून सांगत असत.

सप्रूंना ते एकदा म्हणाले, 'तुम्ही सर्व पुरोहित नष्ट करा आणि आम्ही सर्व मुल्ला नाहीसे करतो. म्हणजे मग जातीय सलोखा होईल.'

म. गांधींच्या आठवणी

महात्मा गांधींच्या महत्त्वाच्या आठवणी शिवराव यांनी कथन केल्या आहेत. एका आठवणीत शिवराव यांनी राजकीय मध्यस्थाची भूमिका कशी केली यावर प्रकाश पडतो. १९३५ च्या कायद्याखाली निवडणुका होऊन अनेक प्रांतात काँग्रेसला बहुमत मिळाले. पण व्हाइसरॉयला जे खास अधिकार या कायद्यान्वये दिले होते ते न वापरण्याचे आश्वासन मिळाले तरच अधिकारग्रहण करू ही काँग्रेसची भूमिका असल्याने घटनात्मक पेच उभा झाला होता. त्यावेळी राजाजींनी एक तोडगा काढला होता आणि राजाजींशी चर्चा करून शिवराव यांनी हिन्दू व मँचेस्टर गार्डियन यात घटनात्मक पेचप्रसंगावर तोड सुचवली. भारतमंत्री झेटलँड यांनी ते वाचले आणि व्हाइसरॉय लिनलिथगो यांच्याकडे विचारणा केली. मग लिनलिथगो यांनी शिवराव यांना बोलावले आणि म. गांधींकडून तीन-चार मुद्यांबाबत खुलासा घेण्याची कामगिरी शिवराव यांच्यावर सोपवण्यात आली. शिवराव काश्मीरला जाणार होते पण त्याऐवजी ते गांधींना भेटण्यासाठी हुबळीला गेले. त्यांनी गांधींना खाजगीत आपण कोणाकडून आलो याची कल्पना दिली; पण उघडपणे फक्त गार्डियन व हिन्दूचे प्रतिनिधी म्हणून प्रश्न विचारू असे सांगितले. गांधींनी ते मान्य करून शिवराव यांच्या प्रश्नांवर आधारित असे निवेदन तयार केले. पण त्यांनाच तो मसुदा आवडला नाही, तेव्हा हुबळी ते पुणे असा त्यांनी शिवराव यांना प्रवास करावयास लावला आणि दुसऱ्या दिवशी आपला मसुदा शिवराव यांच्या हाती दिला. रात्री जागून प्रवासात त्यांनी तो तयार केला होता. हा मसुदा शिवराव यांच्या हाती देताना गांधी त्यांना म्हणाले, 'मी तुझ्या-पेक्षा चांगला पत्रकार आहे, हे खरे की नाही?'

गांधींची दुसरी एक आठवण उल्लेखनीय आहे. स्वातंत्र्य आले. स्वतंत्र भारताची घटना तयार करायची होती. शिवराव महात्माजींच्याकडे गेले आणि त्यांनी विचारले, 'तुम्ही स्वातंत्र्याच्या चळवळीत कायदेभंग करायला शिकवलात खरा, पण आता घटना तयार करताना काँग्रेसेतर तज्ज्ञांचे साहाय्य लागणार नाही काय?' महात्माजींनी ते मान्य केले. ते म्हणाले, 'नामदार गोखले यांच्याप्रमाणे एकेका प्रश्नाचा खोल अभ्यास करून मग त्याबद्दल बोलावे ही शिकवण मी काँग्रेसजनांच्या मनावर बिंबवू शकलो नाही.' त्यानंतर तेजबहादूर सप्रू, आंबेडकर वगैरे सोळा काँग्रेसेतर घटना-तज्ज्ञांची घटनासभेवर नियुक्ती झाली!

पं. नेहरू यांची एक आठवण

पं. जवाहरलाल नेहरू व शिवराव यांचे चांगले सख्य होते. सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स आपली योजना घेऊन आले तेव्हा क्रिप्स यांच्याशीही शिवराव यांची मनमोकळी चर्चा होत असे. त्यावेळी रुझवेल्ट यांनी आपला खास दूत विल्यम फिलिप्स यास धाडले होते. ब्रिटिश सरकारवर दबाव आणून हिंदी नेत्यांबरोबर त्यास तडजोड करण्यास भाग पाडणे ही फिलिप्स यांची जबाबदारी होती. शिवराव यांनी वाटाघाटी कोणत्या मुद्यावर अडल्या आहेत याची कल्पना फिलिप्स यांना दिली आणि पं. नेहरूंशी बोलणी करणे कसे अगत्याचे आहे हे त्यांना पटवले. पण भेट व्हावयाची कोठे? फिलिप्स व्हाइसरॉयच्या निवासस्थानी राहात होते, तेथे भेट शक्य नव्हती. नेहरूंच्या निवासाभोवती वार्ताहर नेहमीच घिरट्या घालीत म्हणून तेही अयोग्य. मग शिवराव यांनी कोचीन हाऊस येथे दोघांची भेट टरवली. शिवराव यांच्या मोटारीतून नेहरू कोचीन हाऊसला गेले. पण त्या बाजूस स्टेटस्मनचा वार्ताहर फिरत होता. त्याने फिलिप्स व नेहरू यांच्या भेटीची रसभरीत माहिती दुसऱ्या दिवशी प्रसिद्ध केली आणि त्यामुळे गोंधळ उडाला आणि फिलिप्स यांच्या शिष्टाईस पायबंद बसला.

शिवराव यांच्या या साऱ्या आठवणी स्वतःचा बडेजाव मिरवण्यासाठी नाहीत. त्या प्रांजल आहेत आणि म्हणूनच त्या हृद्य झाल्या आहेत.

२१-१२-७५ ◉

मोतीलाल-दंतकथा

मोठमोठ्या व्यक्तींबद्दल अनेक दंतकथा प्रसृत असतात व त्यांचा इन्कार अधिकृतपणे केला गेला तरी त्यांचे चर्वितचर्वण होत असते. पं. मोतीलाल नेहरू यांच्याबद्दलच्या अशाच काही दंतकथा अस्तित्वात आहेत. एक म्हणजे नेहरू कुटुंबाचे कपडे पॅरिसहून धुवून येत. ही निव्वळ दंतकथा असून तीत काहीही तथ्य नाही हे पं. जवाहरलाल नेहरू यांनीच आपल्या आत्मचरित्रात स्पष्ट केले आहे. दुसऱ्या कथेचा इन्कार मोतीलालजींनी केल्याचे श्री. बी. आर. नंदा यांच्या 'नेहरूज' या पितापुत्राबद्दलच्या पुस्तकात नमूद आहे. पं. मोतीलाल हे गांधीजींच्या चळवळीत सामील होण्यापूर्वी मद्यप्रेमी होते. पुढे चळवळीत सामील होऊन त्यांना शिक्षा झाली तेव्हा उत्तर प्रदेशचा (तेव्हाचा संयुक्त प्रांत) गव्हर्नर त्यांना रोज संध्याकाळी शॅम्पेनची बाटली घाडीत असल्याची कथा प्रसृत होती. मोतीलालजींनी तिचा इन्कार केला आणि सत्याग्रहाची दीक्षा घेतली तेव्हाच आपण आपल्या निवासस्थानातील सर्व 'वाईनसेलर' (मद्यकोष) रिकामा केला, असे त्यांनी निक्षून सांगितले आहे. तरीही दंतकथा त्या दंतकथाच. त्या थांबत नाहीत. गांधींच्याबद्दलही अशीच एक दंतकथा बी. आर. नंदा यांनी खोटी ठरवली आहे. क्रिप्स–योजना म्हणजे बुडत्या बँकेवरील पुढच्या तारखेचा चेक आहे (पोस्ट-डेटेड चेक ऑन अ क्रॅशिंग बँक) असे वर्णन गांधींनी केल्याचे प्रसिद्ध आहे. पण नंदा सांगतात, की हे खरे नाही व गांधींनीही ते खरे नसल्याचे म्हटले आहे. दुसऱ्या कोणीतरी असे वर्णन केले व गांधींना ते एकदम मान्य झाले. पण त्याचे जनकत्व पुढे गांधीजींकडेच गेले !

मोतीलालजींचा रुबाब

पं. मोतीलाल नेहरू यांचे व्यक्तित्व एखाद्या रोमन सरदारासारखे होते. वकिलीत ते खोऱ्याने पैसा मिळवीत. रोज संध्याकाळी सात ते नऊपर्यंत मद्यांचा आस्वाद घेत मित्रमंडळीत त्यांच्या गप्पा रंगत. दिल्लीला दरबार भरला तेव्हा मोतीलाल व त्यांच्या पत्नी यांना आमंत्रण होते आणि त्यांची व्यवस्था उत्तर प्रदेशच्या गव्हर्नरने स्वतःच्या तंबूत केली होती. गव्हर्नरच्या खास गाडीतूनच त्यांचा प्रवास झाला. दरबारासाठी विशिष्ट पोषाखाची सक्ती होती. मोतीलालनी जवाहरलालना तार धाडून लंडनच्या खास शिंप्याकडून पोषाख करवून घेतला. हॅट, बूट वगैरे सर्वच लंडनहून आले. मोतीलालजींच्याकडील मेजवानीचे वर्णन ब्रॅ. जयकरांनी केले आहे. मेजवानीतील पदार्थ राजघराण्यातील भोजनाला लाजवणारे असत, उंची मद्याचा

(वाइन्स) अखंड ओघ असे. भोजनानंतर उत्कृष्ट सिगार वा सिगरेटचे सेवन करीत असतानाच लिक्युअर्स येत आणि हे सर्व चालू असता हास्य-विनोदाला बहर आलेला असे, असे जयकरांनी म्हटले आहे. पुढे सत्याग्रहाचे पर्व सुरू झाले. मोतीलालजींनी मद्यकोष रिकामा केला. परदेशी कपडे अनेक खटारे भरून होते त्यांची होळी केली. वकिली सोडल्यावर नोकरवर्ग व उंची राहणी कमी झाली. सारे कुटुंब खादीधारी झाले. पण खादीधारी होणे म्हणजे गबाळग्रंथी बनणे नव्हे. मोतीलालजींचा खादीचा पोषाखही त्यांना अतिशय शोभून दिसे. सुरवारीवर ते जरीच्या काठाचे चढाव घालीत. सत्याग्रहाच्या काळात त्यांच्यावर पकडवॉरंट काढण्यात आले व त्यांच्या घराची झडती घेण्याचा हुकूम निघाला. हे हुकूम घेऊन आलेला पोलीस इन्स्पेक्टर स्वतःच घाबरून गेला होता. मोतीलालजींपुढे आल्यावर त्याने अदबअर्ज म्हणून सलाम ठोकला. घराची झडती घेण्याचा हुकूम त्याने प्रथम दाखवला तेव्हा मोतीलाल म्हणाले, 'झडती घेण्यासाठी काही दिवस घालवावे लागतील.' नंतर इन्स्पेक्टरने भीतभीत अटकेचे वॉरंट दाखवले. मोतीलालजींच्या रुबाबदार व्यक्तित्वाने घाबरलेल्या इन्स्पेक्टरला पकडवॉरंट दाखवण्याचेही भान राहिले नव्हते. पुढे मोतीलालजी युरोपात गेले होते तेव्हाची एक गोष्ट. जवाहरलाल, कमला, विजयालक्ष्मी, कृष्णा वगैरे सर्व परिवार बरोबर घेऊन त्यांचा लंडन, पॅरिस, बर्लिन असा प्रवास चालला होता. ज्या हॉटेलात ते उतरत तेथील मॅनेजर त्यांना लगोलग भेटावयास येऊन त्यांची स्वतः व्यवस्था पाही आणि रोज फुलांचे गुच्छ धाडीत असे. एकदा ही कुटुंबीय मंडळी पॅरिसला असताना मोतीलाल कृष्णाला (हाथीसिंग) पोषाख आणण्यासाठी लंडनला गेले. त्यांना मोजमापे आठवेनात. तेव्हा स्टोअर्सच्या मॅनेजरला त्यांनी स्टोअर्समधील सर्व मुलींना रांगेत उभे करण्यास सांगितले व कृष्णाच्या शरीरयष्टीची मुलगी दिसताच तिच्या मापाप्रमाणे पोषाख देण्याची आज्ञा दिली. मॅनेजर या विलक्षण आदेशाने बावचळला, पण मोतीलालजींना नकार देणे मात्र त्याला शक्य झाले नाही.

४-६-७५ ⊙

स्टेट्स्मनचे शतक

कलकत्त्याच्या स्टेट्स्मन पत्राला शंभर वर्षे पूर्ण झाली. भारतीयांच्या मालकीचे हे पत्र पूर्वी ब्रिटिशांचे होते व बंगालमधील ब्रिटिश उद्योगपती, व्यापारी व अधिकारी यांचे ते मुखपत्र होते. माल्कम मगरिज या प्रसिद्ध लेखकाने जे आत्मचरित्र लिहिले आहे त्यात त्यांच्या स्टेट्स्मन-मधील कालावधीचा उल्लेख आहे. युद्धकाळाच्या अगोदर त्यांची सहसंपादक म्हणून नेमणूक झाली होती. नेमणुकीचा हुकूम हाती येण्यापूर्वी त्यांना माजी व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांना भेटावे लागले, कारण ते स्टेट्स्मनच्या विश्वस्त निधीचे आर्थिक सल्लागार होते. त्याचवेळी गांधीजींच्या विरुद्ध सनातनी हिंदू खवळले होते. हरिजनोद्धाराचे त्यांचे कार्य या मंडळींना पसंत नव्हते. गांधींना होणारा हा विरोध लॉर्ड रिडींग यांना संतोषकारक वाटला होता. मगरिज कलकत्त्याला आले तेव्हा स्टेट्स्मनच्या संपादक-पदावर आर्थर मूर या आयरिश गृहस्थाची नेमणूक झाली होती. कारण मूर तेथे सहसंपादक असताना त्यांच्या काही लेखांमुळे संपादक वॅटसन यांच्यावर दहशतवाद्यांनी पिस्तूल झाडले होते. त्यामुळे वॅटसन यांना सेवानिवृत्त होऊन स्वदेशी जावे लागले. मूर यांच्या हाती स्टेट्स्मन आल्यावर त्यांनी आपल्या पत्राचे धोरण बदलून सरकारवर वेळप्रसंगी कडक टीका सुरू केली. मगरिज व मूर यांचे विशेष जमले नाही; तेव्हा मगरिज यांना सिमला येथे स्टेट्स्मनचे खास प्रतिनिधी म्हणून धाडण्यात आले. त्यावेळी लॉर्ड विलिंग्डन हे व्हाइसरॉय होते. विलिंग्डन व मगरिज यांच्या अनेकदा गाठीभेटी होत. व्हाइसरॉय आपल्या स्वतःच्या कारकीर्दीवर

खूष होते. हिंदुस्थानावर राज्य करणे फारसे कठीण नाही, असा त्यांचा समज होता. मगरिज सिमल्याला स्थायिक झाल्यानंतर थोड्याच दिवसात त्यांची अमृता शेरगिल या चित्रकर्तीची भेट झाली आणि मग आपल्या पत्राचे कसलेही काम न करता मगरिज अमृताच्या सहवासात तासन् तास घालवीत. तिचे वडील शीख व आई हंगेरियन होती. कलागुणांप्रमाणे विषयासक्तीबद्दल अमृताच्या अनेक गोष्टी सांगितल्या जातात. अमृता व मगरिज यांचा संबंध काही काळ टिकला. पण त्यानंतर लंडनच्या ईव्हिनिंग स्टॅंडर्डमध्ये नोकरी लागली म्हणून मगरिज सिमला व स्टेट्स्मन सोडून गेले.

आर्थर मूर

स्टेट्स्मनचे संपादक म्हणून आर्थर मूर यांची कारकीर्द भारतमंत्री अमेरी, व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो व येथील ब्रिटिश लहानमोठे अधिकारी यांना फार तापदायक ठरली. मूर हे आयरिश होते आणि त्यांनी त्यांचा स्वतंत्र बाणा वारंवार प्रगट केला. त्यांच्या लिखाणाने लिनलिथगो वगैरे कसे संतप्त होत, हे पाहायचे असेल, तर ब्रिटिश सरकारतर्फे १९४२ ते ४७ या कालखंडातील जे सरकारी पत्रव्यवहाराचे खंड 'ट्रान्सफर ऑफ पॉवर' या नावाखाली प्रसिद्ध होत आहेत, त्यातील पहिला, दुसरा व तिसरा खंड पाहावा. आर्थर मूर यांनी क्रिप्स येथे येण्यापूर्वी लिहिले होते, की व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो आणि इतर नोकरशाहा हे इंग्लंड व भारतीय जनता यांच्यात गैरसमज वाढवीत आहेत. सरकारी धोरण ताठर बनते ते यांच्यामुळे. म्हणून लिनलिथगो यांच्याऐवजी सर मॉरिस ग्वायर यांची नेमणूक व्हाइसरॉय म्हणून करावी. लिनलिथगो यामुळे रागावले. त्यांनी हा अग्रलेख भारतमंत्री अमेरी यांच्याकडे धाडला आणि सरकारबद्दल अप्रीती निर्माण होत असून, मूर यांना पायबंद घालण्यासाठी स्टेट्स्मनच्या विश्वस्तनिधीच्या सल्लागारांना भाग पाडावे, असे सुचवले. पण तावडतोब यात यश आले नाही. मूर यांचे हल्ले वाढत गेले आणि त्या प्रमाणात लिनलिथगो यांच्या तक्रारी. पुढे कलकत्त्यात रिचर्डसन या नावाच्या स्टेट्स्मनमधील अधिकाऱ्याला मूर यांना नियंत्रणाखाली ठेवण्याचा व मूर ऐकत नसतील तर त्यांना बडतर्फ करण्याचा आदेश लंडनच्या कचेरीतून आला. नंतर ४२ च्या आंदोलनाला सुरुवात होण्यापूर्वी मुम्बईत काँग्रेस महासमितीची बैठक झाली आणि पुढाऱ्यांना पकडण्यात आले. त्यावेळी १० ऑगस्ट ४२ ला मूर यांनी अग्रलेखात म्हटले की, काँग्रेसचे धोरण मूर्खपणाचे आहे, पण सरकारचेही शहाणपणाचे नाही. दुसरे असे, की अलाहाबादच्या ठरावाप्रमाणे काँग्रेस काही अटींवर सहकार्य करण्यास तयार होती, त्याप्रमाणे संधी का दिली नाही? हे दडपशाहीचे जे धोरण ब्रिटिश सरकारने स्वीकारले आहे, ते दोस्त राष्ट्रांच्या वरिष्ठ मंडळाशी विचारविनिमय करून स्वीकारले आहे काय? कारण अखेरीस हा प्रश्न युद्ध जिंकण्याचा आहे. दोस्त राष्ट्रांच्या वरिष्ठ मंडळानेच ब्रिटिश सरकारला काँग्रेसबद्दल कडक धोरण स्वीकारण्यास सांगितले असेल तर गोष्ट वेगळी, पण तसे नसेल तर त्याने भारत सरकारला जाब विचारावा.

मूर यांच्या अग्रलेखाने लिनलिथगो व ब्रिटिश नोकरशाही यांचा तिळपापड उडाला. लंडनकडे तक्रारी झाल्या. अखेरीस मूर यांचे कंत्राट नोव्हेंबरमध्ये संपत होते, तत्पूर्वी त्यांनी रजेवर जावे, असे ठरले व त्यांना रजेवर धाडण्यात येऊन स्टीफन्स यांची संपादकपदावर नेमणूक झाली. पण लिनलिथगोंना भीती होती, की स्टेट्स्मनचे संपादकपद गेले, तरी आर्थर मूर यांना लंडन टाइम्सचे दिल्लीतील खास प्रतिनिधी नेमतील. तशी नेमणूक होऊ नये म्हणून लिनलिथगो यांनी अमेरी यांना लंडनमध्ये हालचाली करण्यास सांगितले. मूर यांची नेमणूक न होता होलबर्न यांची झाली. त्यांचे व लिनलिथगो यांचे बरेच सख्य जमले. २-२-७५ ⊙

संसदप्रेमी प्रा. हिरेन मुखर्जी

प्रा. हिरेन मुखर्जी यांचे 'पोट्रेट ऑफ पार्लमेंट' हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. (विकास : ३५ रु.) प्रा. हिरेन मुखर्जी हे लोकसभेतील एक अभ्यासू वक्ते आणि कम्युनिस्ट असूनही आगलावी भाषणे करण्यापेक्षा अभ्यासू भाषणे करण्यावर त्यांचा कटाक्ष फार. वास्तविक कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाप्रमाणे संसद म्हणजे भांडवलशाहीची रक्षणकर्ती. पण या संसदेवर मनापासून प्रेम करणारे जे सभासद होते त्यात मुखर्जींचा क्रम लागतो. परवाच्या निवडणुकीत काँग्रेसप्रमाणेच कम्युनिस्ट पक्षाचाही धुव्वा उडाला. यामुळे हिरेन मुखर्जी नव्या लोकसभेत नाहीत. १९५२ सालापासून ७७ सालापर्यंत ते लोकसभेचे सभासद होते आणि या काळात त्यांनी काही संस्मरणीय भाषणे केली. इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, अभ्यासू वृत्ती आणि शिष्टाचाराबाबतचा कटाक्ष यामुळे त्यांच्या भाषणांचा प्रभाव पडत असे. हिरेन मुखर्जी यांचे संसद, संसदीय जीवन यावर इतके प्रेम, की त्यांना सभागृहाचे नियम मोडणे, आरडाओरडा करणे इत्यादींचा मनस्वी वीट व राग. त्यांनी या पुस्तकात याविषयी टीका केली आहेच. मुखर्जी हे एरवी गंभीर वाटत असले तरी चांगल्या विनोदाचे त्यांना आकर्षण आहे. सभागृहात चाललेल्या चर्चेच्या अनुरोधाने कामथ, नाथ पै व स्वतः त्यांनी केलेल्या काही झटपट काव्यांचे नमुने या पुस्तकात पेश केले आहेत. त्यावरूनही त्यांच्या विनोदबुद्धीची कल्पना येते.

संसदेतील व्यक्तिरेखा

या पुस्तकाचे उद्दिष्ट पंचवीस वर्षांत संसदेत जे काही झाले त्याचा आढावा घेणे हे नव्हे. त्यांनी काही आठवणी दिल्या आहेत. व्यक्तिरेखा रंगवल्या आहेत. यात मंत्री आहेत, सभापती आहेत आणि सभासद आहेत. राष्ट्रपतींत राजेंद्रप्रसाद यांच्यापासून तो गिरी यांच्यापर्यंत त्यांनी थोडक्यात व्यक्तिरेखाटन केले आहे. डॉ. राधाकृष्णन व डॉ. झाकिर हुसेन यांची विद्वत्ता, उमदेपणा आणि खानदानी आदब यांचा कोणावरही प्रभाव पडे. तसा तो मुखर्जी यांच्यावरही पडलेला होता. सभापतींपैकी त्यांनी मावळंकर, हुकुमसिंग आणि संजीव रेड्डी यांची विशेष प्रशस्ती केली आहे. मावळंकर हे पहिले सभापती. त्यांनी काही चांगले आदर्श निर्माण केले. त्यांचा सभागृहावर वचक होता. हुकुमसिंग हे पूर्वाश्रमीचे न्यायाधीश. त्यांनीही न्यायबुद्धीने सभागृहाचा कारभार चालवला, पण संजीव रेड्डी यांचे सभागृहातील कौशल्य विशेष वाखाणण्यासारखे होते. त्यांच्या वेळेला सभागृहातील वातावरण तापण्याचे प्रसंग वारंवार येत. पण संजीव रेड्डी मोठ्या युक्तीने ते निवळवीत. हिरेन मुखर्जी यांनी त्यांना विशेष धन्यवाद दिले तर आश्चर्य नव्हे. अनंतशयनम अय्यंगार हे

व्यक्तिशः सर्वांच्या आदराचे विषय होते. पण सभापतीने सहसा बोलू नये असा रिवाज आहे. अनंतशयनम याउलट बरेच बोलत. म्हणून हिरेन मुखर्जी सांगतात की, सरदार पटेल यांनी त्यांचे नाव अनंतवचनम ठेवले होते. या संदर्भात नाथ पै यांनी सांगितलेली गेट्स्केल यांच्या भेटीच्या वेळची आठवण नमूद करण्यासारखी आहे. गेट्स्केल दिल्लीत आले असता नाथ पै यांनी त्यांना लोकसभेत आणले व ते दोघे नामवंत प्रतिनिधींच्या सजात बसून सभागृहाचे कामकाज पहात होते. अनंतशयनम हे सतत हस्तक्षेप करून बराच वेळ बोलत राहिल्याचे पाहिल्यावर गेट्स्केल नाथ पैंना म्हणाले, 'Now I know what is meant by speaker!'

संसदीय वक्तृत्वात हिरेन मुखर्जी यांनी शामाप्रसाद मुखर्जी, [illegible]रू, डॉ. आंबेडकर, कामथ इत्यादींचा खास उल्लेख केला आहे. किंबहुना संसदेत पुढे यावयाचे असेल तर काय करावे लागते याचे धडे हिरेन मुखर्जी यांना शामाप्रसाद यांनी दिले. शामाप्रसाद हे हजरजबाबी होते. त्यांचे एक उदाहरण मुखर्जी देतात. शामाप्रसादांना एकदा सांगण्यात आले, की त्यांनी सत्याला तोंड द्यावे, कल्पनेच्या विश्वात वावरू नये. शामाप्रसाद ताडकन उत्तर देते झाले, 'सत्याला सामोरे जाण्याची माझी तयारी आहे; पण माझ्यासमोर जर मंत्रिमंडळ बसले आहे तर मी सत्याला सामोरा कसा जाणार?'

नेहरू, शास्त्री व इंदिरा

हिरेन मुखर्जी यांनी पं. नेहरू, लालबहादूर शास्त्री आणि इंदिरा गांधी यांच्या संसदीय कारकिर्दीची मार्मिक तुलना केली आहे. लालबहादूर हे संसदपटू होते आणि त्यांच्या साधेपणाचा प्रभाव पडत असे. तथापि पं. नेहरूंनी संसदेवर जेवढा प्रभाव टाकला तेवढा नंतरचे दोन्ही पंतप्रधान टाकू शकले नाहीत. याचे मुख्य कारण पं. नेहरूंचे व्यक्तित्व हे तर खरेच, पण संसदेच्या प्रतिष्ठेची ते काळजीपूर्वक जपणूक करीत. अखेरच्या काळात उभे राहून भाषण न करता त्यांनी बसूनच बोलावे असा सभागृहाचा आग्रह असे. पण त्यांनी तो ऐकला नाही. कधी त्यांच्याच पक्षाचे सभासद भावनेच्या भरात त्यांना प्रत्युत्तर देत; पण मुखर्जी म्हणतात याची त्यांना कधी झळ लागली नाही. नंतर इंदिरा गांधींच्या काळात हे शक्य नव्हते. नेहरूंच्या अगदी उलट त्यांच्या कन्येची वृत्ती. त्या सभागृहात फारशा नसतच आणि त्याच्या कामात रस घेत नसत. संसदेच्या प्रतिष्ठेवरच त्यांनी पुढे आघात केला.

फसगत व फजिती

हिरेन मुखर्जी यांनी आणीबाणी, कम्युनिस्ट पक्षाची भूमिका आणि निवडणुकीनंतर झालेला पालट याचीही दखल घेतली आहे. कम्युनिस्ट पक्षाने आणीबाणीला पाठिंबा देण्यात चूक केली असे ते म्हणतात; पण त्याबद्दल ते पक्षाला विशेष दोष देतात असे दिसत नाही. वीस कलमी कार्यक्रम प्रारंभी चांगला होता, पण संजय गांधींच्या पाच कलमी कार्यक्रमाची भर पडली व पुढे सर्वच गोंधळ झाला असे त्यांचे म्हणणे. पण वीस कलमी कार्यक्रमासही वैचारिक अधिष्ठान नव्हते. बँकांच्या राष्ट्रीयीकरणामागे ज्याप्रमाणे सत्तेचा संघर्ष होता तीच या वीस कलमीची अवस्था. गरिबांना आश्वासने देऊन त्यांची मते मिळवावी व श्रीमंतांकडून निवडणुकीसाठी पैसा मिळवून दोघांनाही एकमेकांपासून संरक्षण द्यावे या कलेत इंदिरा गांधी प्रवीण होत्या असे हिरेन मुखर्जी म्हणतात. पण कम्युनिस्ट पक्षाला याची जाणीव उशिरा झाली. रशिया इंदिरा गांधींच्या मागे उभा होता. त्यानेही काँग्रेसविरोधी पक्षांची निंदानालस्ती करण्यात धन्यता मानली. कम्युनिस्ट पक्ष त्याच्याच पावलावर पाऊल टाकीत होता. मार्क्सवादामुळे वास्तव परिस्थितीचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करता येते असा दावा करण्यात येतो, तर मग कम्युनिस्ट पक्षाची इंदिरा गांधींबाबत फसगत व नंतर फजिती का झाली? हिरेन मुखर्जी याचे उत्तर देत नाहीत. त्यांच्यापाशी असणेही शक्य नाही. तथापि संसदेबद्दलची त्यांची आत्मीयता आणि गेल्या निवडणुकीत सामान्य जनतेने लोकशाहीचे प्रेम दाखवल्यामुळे तिला हिरेन मुखर्जी यांनी केलेले अभिवादन यामुळे पक्षाच्या चाकोरीबाहेर ते जाऊ शकतात हे मात्र सिद्ध होते.

४-१२-७८ ◉

कार्ल मार्क्स आणि त्याचा मित्र



जुन्या पुस्तकांच्या दुकानात काही वेळा इतरत्र सहज न मिळणारे पुस्तक मिळून जाते. असेच एक पुस्तक नुकतेच मिळाले. मार्क्स व एंजल्स यांच्या आठवणींचा हा संग्रह आहे. या दोघांचे कुटुंबीय, मित्र यांनी त्यांच्या आठवणी लिहिल्या आहेत आणि त्यामुळे या दोघांचे स्वभाव, त्यांचे जीवन यावर चांगला प्रकाश पडतो. मार्क्स व एंजल्स ही एक प्रकारे रामलक्ष्मणाची जोडी होती. रामलक्ष्मण हे निदान बंधू तरी होते, पण हे दोघे केवळ मित्र होते. त्यांचे मित्रप्रेम मात्र विलक्षण होते. मार्क्सला पैशाची नेहमीच चणचण. अमेरिकन पत्राला तो लेख पाठवी व एका लेखाला एक पौंड मिळे. ही त्याची निश्चित कमाई. बाकी लिखाणावर थोडा पैसा मिळे. तथापि एंजल्स त्याला नेहमी पैसे देत असे. एंजल्सचे वडील कापडाच्या उद्योगात होते आणि एंजल्सही त्या उद्योगात होता. पण दिवसभराचे काम झाल्यावर त्याचे अभ्यासाचे विषय सुरू होत आणि तो त्यात पुरता रमलेला असे. तथापि एंजल्स हा उद्योग व अभ्यास यात बुडून गेला तरीही मँचेस्टर हे जे त्याचे वास्तव्याचे ठिकाण. तेथील व्यापारी जगतात वावरणाऱ्यांच्या क्रीडाजीवनातही तो रस घेत असे. तसे पाहिल्यास एंजल्स हा मदिरा व मदिराक्षी यांचा भोक्ताच होता. त्या काळात रविवारी इंग्लंडमधील मद्यालये बंद असत व यामुळे रविवारी संध्याकाळी एंजल्सच्या घरचे खानपान त्याच्या मित्र-मंडळींना विशेष स्वागतार्ह वाटे. रविवारच्या एंजल्सच्या घरच्या बैठका या हास्यविनोद, चवदार भोजन व आनंददायक मद्य यामुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरत.

कष्टाळू मित्र

एंजल्स व मार्क्स यांच्यात आणखी काही साम्यस्थळे होती. एक म्हणजे दोघेही अतिशय कष्टाळू होते. पंधरापंधरा, अठराअठरा तास ते काम करीत आणि ज्या विषयाला वाहून घेतले त्याच्या मुळाशी गेल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे. दोघांतील आणखी एक साम्य म्हणजे त्यांचे भाषाप्रेम : एंजल्सला वीस भाषा व बोली येत होत्या. क्रिमियन युद्धाच्या वेळी तो तुर्की व अरबीसुद्धा शिकला. मार्क्सलासुद्धा अनेक भाषा येत. जर्मन भाषेचे त्याचे व्याकरण विशेष पक्के होते. एंजल्सला युद्धशास्त्राची आवड विशेष. म्हणून त्याला जनरल या नावाने त्याचे मित्र ओळखत. असा हा एंजल्स मार्क्सला भेटण्यासाठी लंडनला येई तेव्हा मार्क्सच्या आनंदास पारावर राहात नसे. तो मग इतरांना फारसा थारा न देता एंजल्ससाठी सर्व वेळ खर्च करी आणि रात्र-रात्र त्यांच्या गप्पा, चर्चा, वादविवाद चालत.

मार्क्सचा कामाचा उरक, त्याचा कष्टाळूपणा जबरदस्त होता. त्याला रात्री जागून काम करण्याची सवय व आवड होती. तरुणपणात तो रात्रीच वाचनलेखन करीत असे. पुढे रात्री जागण्यास प्रकृतीनेच बंदी केली. तरीही काही प्रमाणात जाग्रणे होतच. पण रात्री झोपण्यास कितीही उशीर झाला तरी सकाळी आठ वाजता उठून मार्क्स प्रथम वर्तमानपत्रे चाळी आणि न्याहरी झाल्यावर त्याचे लेखनवाचन सुरू झाले, की ते दुपारचे दोनतीन वाजेपर्यंत चाले. त्याची भूक फार थोडी; म्हणून भोजनात त्याचा वेळ कमी जाई. दुपारी कधीकधी तास अर्धा तास झोप घेतली, की पुन्हा मार्क्स कामाला लागे व संध्याकाळी फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडे. त्याने व्यायाम केला नाही, पण तो बराच चालत असे व त्यामुळे व्यायामाची कसर भरून निघे.

रविवारी मार्क्सला त्याच्या मुली काम करून देत नसत आणि आपल्या कुटुंबावर मार्क्सचे फार प्रेम असल्याने व त्याला मुले आवडत असल्याने तो आपल्या मुलींचा हट्ट पुरवी. त्यांच्याशी खेळण्यात, गप्पा मारण्यात त्याचा वेळ जाई. रविवारी संध्याकाळी मुलींना घेऊन तो फिरायला जाई. मुली लहान होत्या त्यावेळी त्यांना खांद्यावर घेऊन तो फिरत असे. फेरफटका लांबचा झाला तर मुलींना कंटाळा येऊ नये म्हणून तो त्यांना गोष्टी सांगत असे. आपल्या मुलींच्या आग्रहावरून तो नाटकही लिहिणार होता. अनेक वेळा तो मुलींबरोबर बुद्धिबळाचा डाव मांडून बसे. मित्रांबरोबर बुद्धिबळ खेळताना त्याच्यावर मात झाल्यास त्याला राग येई. रस्त्यातून जाताना मार्क्सला एक सवय होती व ती म्हणजे कोठे भांडण लागले तर ते सोडवण्यासाठी धावून जाण्याची. एकदा एका मद्यालयात एक बेभान झालेली बाई आपल्या नवऱ्याला मारत होती तेव्हा मार्क्स व त्याचा मित्र नवऱ्याला सोडवण्यासाठी गेला. पण मग नवराबायको एक झाले आणि हे कोण परकी मध्यस्थी करणार म्हणून त्यांच्याच अंगावर धावले. पोलीस वेळेवर आल्याने मार्क्स व त्याचा मित्र यांची सुटका झाली.

एंजल्सच्या घरी पुस्तके व्यवस्थित लावलेली, तर मार्क्सकडे अस्ताव्यस्त. पण त्याला कोठले पुस्तके कोठे आहे हे पूर्णपणे माहीत असल्याने कोणीही आपली पुस्तके व्यवस्थित लावू नयेत अशी त्याची ताकीद असे. जुन्या बाजारात त्याला हवी ती पुस्तके मिळत आणि पार्लमेन्टचे सभासद त्यांना मिळणारे सरकारी अहवाल एकतर रद्दीत विकत किंवा नेमबाजीसाठी लक्ष्य म्हणून उपयोगात आणीत. एका रद्दीवाल्याकडे मार्क्सने संधान बांधले आणि म्हणून त्याला हे अहवाल अगदी स्वस्तात मिळत. त्याला तर्कशास्त्र आणि तत्त्वज्ञानाचा इतिहास हे ग्रंथ लिहावयाचे होते; पण ते राहून गेले.

काव्य व गणिताचे प्रेम

तथापि हा उग्र चेहऱ्याचा आणि क्रांतीची स्वप्ने पाहणारा मार्क्स काव्य व कादंबरी यांचा फार मोठा भोक्ता होता. मार्क्सने आपल्या लिखाणाची सुरुवात कवितेपासून केली होती. फावल्या वेळात तो अनेक कादंबऱ्या व कवितासंग्रह वाचीत असे. ड्यूमा, स्कॉट हे तेव्हाचे कादंबरीकार त्याचे आवडते होते. एखाद्या विषयाची चर्चा करताना गैरमाहितीवर वा अपुऱ्या माहितीवर कोणी बोलू लागले, की मार्क्स संतप्त होई. त्याच्याकडे येणाऱ्यांना तो 'अभ्यास, सतत अभ्यास' हा संदेश देत असे. तो लंडनमध्ये आला तेव्हा ब्रिटिश म्युझियमचे ग्रंथालय नुकतेच सुरू झाले होते आणि मार्क्स हा याचा भोक्ता व आश्रयदाता होता.

आपल्या पत्नीच्या शेवटच्या आजारात मार्क्सच्या लेखनवाचनात खंड पडला. तो फार अस्वस्थही होता. पण मनाची अस्वस्थता त्याने कशाने दूर केली असेल, तर ती गणिताची प्रमेये सोडवून. गणित हा त्याचा आवडता विषय. बुद्धीलाही यामुळे शिस्त लागते असे त्याचे म्हणणे होते. पत्नी व नंतर मोठी मुलगी यांच्या मृत्यूने मार्क्स अगदी हादरून गेला. मग त्याची प्रकृती बरी राहीनाशी झाली व यातच तो निधन पावला.

३-७-७७ ⊙

एंजल्सचे अखेरचे दिवस

कार्ल मार्क्सची कनिष्ठ कन्या एलिनॉर हिचे दोन खंडातील चरित्र इंग्लंडमध्ये प्रसिद्ध झाले असून त्यातील एंजल्सचे अखेरचे दिवस वर्णन करणारा भाग 'न्यू स्टेट्समन'ने दिला आहे. मार्क्सच्या कुटुंबाची दायी –मोलकरीण– हेलेन डीमथ ही तिच्या म्हातारपणी एंजल्सकडे कामासाठी राहात असे. ती १८९१ मध्ये वारली. या स्थितीत घर सांभाळण्याकरिता एंजल्सला कोणाची तरी गरज होती. या वेळी त्याला मार्क्सची कनिष्ठ कन्या एलिनॉर हिची आठवण झाली. मार्क्सला तीन मुली. पहिली लॉरा ही लग्न करून फ्रान्समध्ये राहात होती. जेनी ही दुसरी मुलगी निधन पावली होती. एलिनॉर ही एडवर्ड ॲव्हलिंग याच्याबरोबर त्याच्या बायकोप्रमाणे राहत असे. ती राजकीय कार्य करी आणि व्याख्याने देई.

एंजल्स सत्तर वर्षांचा झाला होता. त्याने मग कार्ल कौटस्की या जर्मन राज्यशास्त्रज्ञाच्या घटस्फोटित तरुण पत्नीला (लुई) आपल्या घरी राहायला बोलावले. तीन वर्षांच्या अवधीत तिने लुडविग फ्रेबर्गरबरोबर लग्न केले. फ्रेबर्गर हा व्हिएन्नाचा एक महत्त्वाकांक्षी डॉक्टर होता. हे दांपत्य एंजल्सच्या घरीच त्याच्याबरोबर राहू लागले. पण मार्क्सची कन्या एलिनॉर हिला या दोघांबद्दल व त्यातल्या त्यात फ्रेबर्गरसंबंधी अतिशय तिटकारा व संशय होता. मार्क्सचा पत्रव्यवहार, हस्तलिखिते यांच्यावर तो डल्ला मारील ही एलिनॉरची धास्ती. लुईमुळे आपण बापाप्रमाणे असलेल्या एंजल्सपासून दूर जात आहोत ही तिची भावना होती आणि याचमुळे मार्क्सची कागदपत्रे व हस्तलिखितेही आपल्याकडे येणार नाहीत या संशयाने तिच्या मनात घर केले.

संशयाने या प्रकारे घर केल्यानंतर तिने आपली बहीण लॉरा हिला पत्र लिहिले आणि मार्क्सच्या 'कॅपिटल' या ग्रंथाच्या चौथ्या भागाच्या प्रकाशनाचे काम रेंगाळत असल्याने हस्तलिखित उतरवून घेण्यासाठी आपण इंग्लंडला येऊ इच्छिते असे तिने एंजल्सला लिहावे असे सुचवले. यामुळे मार्क्सच्या हस्तलिखितावर आपला अप्रत्यक्षपणे हक्क शाबित होईल ही यामागची कल्पना. या सूचनेप्रमाणे लॉराने एंजल्सला उद्देशून जरा कडक भाषेत पत्र लिहीले व ते एलिनॉरला पाठवले. हे पत्र आले तेव्हा एलिनॉर व्याख्यानाच्या दौऱ्यावर होती. परतल्यावर ती व तिचा नवरा एडवर्ड हे दोघे एंजल्सकडे गेले. एंजल्स हा त्यावेळी एकटाच होता. दुसऱ्या दिवशी एलिनॉर तेथे नसताना लॉराचे पत्र एडवर्डने एंजल्सला द्यावे असे ठरले होते. एडवर्डने त्याप्रमाणे पत्र दिल्यावर कॅपिटलच्या चौथ्या खंडाच्या हस्तलिखिताची आणखी एक प्रत तयार करण्याचे काम एलिनॉरने करावे असे एंजल्सने लगेच कबूल केले. मार्क्सच्या सर्व हस्तलिखितांचे, पत्रांचे, कागदपत्रांचे अधिकार त्याच्या दोन्ही मुलींकडे आहेत हेही त्याने सांगून टाकले. हे झाल्यावर एडवर्डने दुपारची झोप काढली. तेवढ्या अवधीत फ्रेबर्गर पतिपत्नींनी एंजल्सची गाठ घेतली होती. म्हणून एडवर्ड उठल्यावर एंजल्सने पुन्हा लॉराचे पत्र मागितले. ते वाचल्यानंतर एंजल्स संतापला आणि आपल्याविरुद्ध कटकारस्थाने चालू आहेत, गैरविश्वास व्यक्त होत आहे असे त्याला वाटले. हे सर्व एडवर्डने कळवल्यावर एलिनॉरने एंजल्सला पत्र लिहून विचारले, की आपल्या वडिलांच्या कागदपत्रांचे भवितव्य काय हा साधा प्रश्न विचारल्यानंतर एवढी आदळआपट करण्याचे प्रयोजन काय? तुमच्या मनात काही पाप असल्याखेरीज हे आकांडतांडव शक्य नाही. पण पुढे एंजल्सही शांत झाला व त्याने स्वतःच लॉराला पत्र लिहून मार्क्सचे कागदपत्र आपण केवळ विश्वस्त म्हणून आपल्याकडे ठेवले असून, त्यांचे हक्क मुलींकडेच आहेत, हे त्याने स्पष्ट केले. लॉरानेही

त्याला उत्तर लिहून गैरसमज करून न घेण्याची विनंती केली.

एंजल्सला कॅन्सर झाला होता. त्याला मात्र याची कल्पना दिली गेली नव्हती. यातून आणखी एक भांडण झाले व ते कौटस्कीबरोबर. कौटस्की, बर्नस्टिन, मेहरिंग, लाफार्ग व इतर यांनी समाजवादाचा चार खंडांत इतिहास लिहिण्याचे ठरवले. त्याप्रमाणे कामाला सुरुवात झाली. त्यांनी अशी कल्पना काढली, की मार्क्सचे चरित्र एंजल्स लिहिणारच होता; त्यानिमित्ताने केलेल्या टिपणीच्या आधारे त्याने चौथ्या खंडाला प्रस्तावना लिहावी. वीस ते तीस पानांची ही प्रस्तावना लिहून घेण्यासाठी कौटस्कीने एंजल्सला पत्र लिहिले. ते वाचून एंजल्स संतापला. त्याने कौटस्कीला लिहिले, की समाजवादाचा इतिहास लिहिण्यास आपल्याइतका दुसरा माहितगार लेखक नाही. असे असता चार खंडांच्या इतिहासाची योजना ठरते, पण आपल्याला त्याची कल्पना दिली जात नाही, साहाय्यही मागण्यात आले नाही, हे बरोबर नाही. कोणताही संपादक आपले सहकारी निवडू शकतो, पण या साऱ्या प्रकरणात जी गुप्तता राखण्यात आली, ती आपल्याला विशेष उद्वेगजनक वाटली हे एंजल्सने स्पष्ट केले. वास्तविक कौटस्की प्रभृतींची भावना वेगळी होती. एंजल्स कॅन्सरचा रोगी असून तो फार दिवसांचा सोबती नाही, हे त्यांना माहीत असल्याने त्यांनी एंजल्सला त्रास न देण्याचे किंवा दीर्घकालीन अशी काही लिखाणाची जबाबदारी त्याच्यावर न सोपवण्याचे ठरवले होते. म्हणून त्यांनी समाजवादाचा इतिहास लिहिण्याच्या योजनेचा उच्चार एंजल्सपाशी केला नाही. पण हेच त्याच्या मनाला फार लागले. कौटस्की वगैरेंच्यापुढे मोठा पेच होता. इतिहासाबद्दल सांगून जबाबदारी टाकावी, तर एंजल्स थोड्या दिवसांचा सोबती होता. आणि तो तसा आहे हे त्याला सांगावे, तर तो धक्क्याने अगोदरही मरण पावला असता. या स्थितीत कौटस्कीला एंजल्सचा राग मात्र ओढवून घ्यावा लागला. याच मनःस्थितीत एंजल्स निधन पावला. त्याने आपले दहन करावे असे सांगितले होते. त्याप्रमाणे दहन केले गेले. त्यानंतर रक्षाविसर्जन समुद्रात झाले. त्यावेळी जे पाचजण हजर होते, त्यांत एक एलिनॉर होती. ९-१-७७ ⊙

राजकारणबाह्य लेनिन

आयझाक डुश्चर हे प्रसिद्ध ट्रॉट्स्कीवादी लेखक होते. त्यांची पत्नी तमारा डुश्चर हिने 'नॉट बाय पॉलिटिक्स अलोन' हे लेनिनच्या व्यक्तित्वावर प्रकाश टाकणारे पुस्तक लिहिले आहे. यात लेनिनच्या लेखातील उतारे व लेनिनबद्दलच्या अनेकजणांच्या आठवणी संग्रहित केल्या असून माणूस म्हणून लेनिन कसा होता हे फार सुन्दर रीतीने दाखवले आहे. तीस वर्षांच्या राजकीय जीवनापैकी चोवीस वर्षे लेनिनला परदेशात घालवावी लागली, पण रशियातून येणाऱ्या हद्दपार रशियनास तो भेटे. त्यामुळे तो क्रांतीच्या वेळी रशियात आला तेव्हा त्याला स्वदेशातील परिस्थितीची उत्कृष्ट माहिती होती. विजनवासात असताना लेनिनचा दिनक्रम कसा असे? तमारा डुश्चरने म्हटले आहे, की लेनिनला वाचण्यासाठी व लिहिण्यासाठी एक खुर्ची व टेबल असले, की पुरे असे. टेबल, खुर्ची कशी आहे, ती सुबक आहे की नाही याकडे त्याचे कधीच लक्ष नसे. भरपूर वाचन व लेखन तो करी, पण त्याचबरोबर बुद्धिबळासारख्या बैठ्या खेळांप्रमाणे सायकलवरून दूरदूरचा फेरफटका, गिर्यारोहण, पोहणे, बर्फावरचे खेळ यांचा तो अतिशय भोक्ता होता. दिवसाचा काही वेळ तो यापैकी कशात तरी घालवीत असे. त्यामुळे प्रकृतीप्रमाणे त्याची मनःस्थितीही चांगली राही. कोणतेही काम हाती घेतले, की लेनिन त्यात पूर्णतः हरवून जाई, मग वाचन असो, लेखन असो, वादविवाद असो. एकदा बुद्धिबळाचा डाव चालला असता प्रतिस्पर्ध्याने पेच टाकला, तेव्हा लेनिनचे डावावर इतके लक्ष केन्द्रित झाले, की त्याचे कपाळ घामाने डबडबले आणि

कपाळाच्या शिरा ताठ झाल्या.

लेनिनचे वागणे बोलणे अगदी साधे होते. अनेकदा पुढारी कोणत्याही सभेला उशिरा येतात, पण लेनिन अगदी वेळेवर हजर राही. क्रांतीनंतर त्याचा पगार एकाएकी वाढविला गेला, तेव्हा त्याने लगेच ही एवढी वाढ का दिली असा प्रश्न करून ती कमी करवली. लेनिन व त्याची पत्नी अगदी साधेपणाने राहात असत. स्वतःचा बडेजाव मिरवलेला त्याला आवडत नसे. एक दिवस त्याने वर्तमानपत्रात काही लेख पाहिले. त्यात त्याच्या अनेक गुणांचे अतिशयोक्त वर्णन केले होते आणि त्याची प्रकृती चांगली राहावी अशी प्रार्थना केली होती. लेनिन हे सर्व वाचून भडकला आणि हा सारा तमाशा बंद करण्याचा आदेश त्याने दिला. कोणा एका व्यक्तीचा बडेजाव वाढवायचा नाही हे ठरले असता या प्रकारचे लिखाण कसे येते, असा सवालही त्याने केला. पुढे स्टालिनने मात्र बरोबर याविरुद्ध धोरण स्वीकारले. सरकारी प्रकाशनसंस्थेने लेनिनच्या पुस्तकाच्या लक्षावधी प्रती छापल्या. लेनिनने सरकारी संस्थेने हा वायफळ खर्च कशासाठी केला म्हणून धारेवर धरले. क्रांतीनंतर दर शुक्रवारी तो मॉस्कोत येणाऱ्या रशियन शेतकऱ्यांना ठराविक वेळी भेटत असे. पुढे ही गर्दी वाढत गेली व क्रेमलिनमध्ये सर्वांना प्रवेश मिळणे मुष्किल झाले. तेव्हा क्रेमलिनबाहेर एका ठिकाणी लेनिन या शेतकऱ्यांना भेटे. प्रत्येकाची चौकशी करून व अनेक प्रश्न विचारून देशात काय चालले आहे याची माहिती घेई आणि या माहितीच्या आधारे शासकीय कार्यवाही करी. या शेतकऱ्यांना केवळ दर्शन देणे हा त्याचा उद्देश नव्हता. सामान्य रशियनांशी असलेला लेनिनचा हा संबंध पुढच्या राज्यकर्त्यांनी मात्र अनुसरला नाही. अनेकदा रशियन शेतकरी आपल्याबरोबर मोरंबे, अंडी, मांस, भाजी, फळे वगैरे आणीत; पण लेनिन हे सर्व हॉस्पिटलकडे किंवा अनाथ विद्यार्थीगृहाकडे पोहोचते करी !

लेनिन पॅरिसमध्ये परागंदा म्हणून राहात असताना त्याची इनेसा अमेंदि हिच्याशी ओळख झाली. लेनिन पॅरिस सोडून गेल्यावरही ती रशियन क्रांतिकारकांची प्रतिनिधी म्हणून राहात होती. ती उत्तम गात असे, नाटकात कामेही करी. तिला फ्रेंच, जर्मन, इंग्लिश वगैरे अनेक भाषा येत. ती एक चैतन्याची मूर्तीच होती आणि लेनिन-कुटुंबात ती आपल्या अस्तित्वाने चैतन्याची झळाळी निर्माण करी. लेनिनचा व तिचा पत्रव्यवहार बराच आहे. १९१७ च्या जानेवारीत साधारणतः दिवसाला एक असे लेनिनने पत्र लिहिलेले दिसेल. तो तिला कम्युनिस्ट परिषदांतून भाषणे करण्यास प्रोत्साहन देई. पण या दोघांतल्या पत्रव्यवहारावरून त्यांच्यात प्रेमाचे नाजुक बंध होते असे समजून कोणी प्रेमकथा लिहायला जाईल, तर त्याची गफलत होईल असे तमारा डुश्चरचे म्हणणे आहे. १९२० साली इनेसा मरण पावली. लेनिनला दुःख झाले. तो तिच्या अंत्ययात्रेला हजर होता, पण अंत्ययात्रा संपवून तो सरळ कार्यालयात गेला व कामाला लागला.

कला, संगीत, साहित्य याबाबतची लेनिनची आवड मर्यादित होती. आपल्याला यात काही विशेष कळते असे त्याला वाटत नव्हते. (स्टालिन

मात्र स्वतःला सर्वज्ञ मानी) लेनिनला बिथोवनचे संगीत फार आवडे. टॉलस्टॉयच्या वाङ्मयाचा तो भोक्ता होता. पण गॉर्कीशी त्याचा साहित्याबद्दल जो पत्रव्यवहार झाला आहे तो पाहिला तर कलेच्या, साहित्याच्या क्षेत्रात तो स्वातंत्र्यवादी होता असे दिसत नाही. नव्या पद्धतीच्या चित्रकलेचा तो तिटकारा करी व अशा चित्रकारांना फटके मारावे असेही म्हणे.

संस्कृतीचा प्रवाह अखंड असतो आणि कम्युनिस्टांनी याची जाणीव ठेवावी असे त्याचे म्हणणे होते. एका कॉम्रेडने त्याला सांगितले, की जुन्या काळात झार वगैरेंनी ज्या बागा तयार केल्या, रस्त्याने दुतर्फा वृक्षराजी उभी केली ती आपल्याला आवडत नाही, कारण हे सरंजामशाहीचे अवशेष व पिळवणुकीचे नमुने आहेत. लेनिनला हे मान्य झाले नाही. तो म्हणाला, 'प्राचीन व्यवस्था ही पिळवणुकीवरच आधारित होती. म्हणून प्राचीन धर्ममंदिरे, प्रासाद यांच्या शिल्पसौन्दर्याचा नायनाट करण्याचे कारण नाही. गाईचं दूध मी काढलं नाही म्हणून ते प्यायचं नाही काय ? स्ट्रॉबेरीज मी लावल्या नाहीत म्हणून त्या खायच्या नाहीत काय ?' असे प्रश्न करून त्याने या कॉम्रेडला गप्प केले.

लेनिनला जडजंबाल भाषेचा तिटकारा असे. नोकरशाहीने जडजंबाल भाषा तयार केली असून सामान्य लोकांना ती कळणार नाही यासाठी वर्तमानपत्रांनी तरी लोकांना कळेल अशी सुबोध भाषा वापरावी असा त्याचा आग्रह असे. आपले कॉम्रेड ठोकळेबाज, मार्क्सवादावर अंधश्रद्धा ठेवणारे, अडाणी नसावेत तर इमानी हवेत असे तो आग्रहाने प्रतिपादन करी. रशियातील ग्रंथालयांत अनेक यमनियम होते. त्यामुळे सामान्य नागरिकांना पुस्तके मिळताना कष्ट पडत. अमेरिकेतील ग्रंथालयांची तुलना करून लेनिनने लिहिले, 'न्यूयॉर्कच्या सार्वजनिक ग्रंथालयाचा १९११ सालचा अहवाल माझ्यापुढे आहे. हे ग्रंथालय नव्या इमारतीत गेले आहे. त्यात २० लाख पुस्तके आहेत. त्यास वर्षभरात साडेसोळा लाखांपेक्षा अधिक लोकांनी भेट दिली. २ लाख ४६ हजार ९५० वाचकांनी वाचनालयाचा उपयोग केला व त्यांनी ९ लाख ११ हजार ८९१ पुस्तके नेली. या ग्रंथालयाच्या ४२ शाखा आहेत आणि त्यामुळे न्यूयॉर्कच्या अनेक विभागांतील लोकांना फायदा घेता येतो. या सर्व शाखांचा विचार केला तर ८० लाख पुस्तके घरी वाचनासाठी नेली गेली. १९१० पेक्षा ही संख्या ४ लाखांनी अधिक आहे ! लहान मुलांनी २८ लक्ष ५९ हजार ८८८ पुस्तके नेली !' ही माहिती देऊन लेनिन विचारतो, 'न्यूयॉर्कमध्ये हे असे घडते आणि रशियात ?' या प्रश्नातच त्याचे उत्तर होते.

११-५-७५ ⊙

ट्रॉट्स्कीचा 'लेनिन'

रशियन क्रांती, स्टालीन इत्यादी ट्रॉट्स्कीचे ग्रंथ विख्यात आहेत. त्याने 'तरुण लेनिन' असेही पुस्तक लिहिले होते. रशियन भाषेतील त्याच्या पुस्तकाचे रूपांतरकार श्री. मॅक्स इस्टमन यांना ट्रॉट्स्कीने आपल्या लिखाणाचे भाषांतर करणे, त्याच्या विक्रीची व्यवस्था ठरवणे वगैरेचे अधिकार दिले होते. त्याप्रमाणे 'तरुण लेनिन' या पुस्तकाचे रशियन भाषेतील हस्तलिखित ट्रॉट्स्कीने इस्टमन यांना दिले आणि मग इस्टमन यांनी त्याचे भाषांतर सुरू केले. ट्रॉट्स्कीला लेनिनवर दोन खंड प्रसिद्ध करायचे होते, पण एकच पुरा झाला व त्याला त्याने 'तरुण लेनिन' हे नाव दिले. १९३४ सालात ट्रॉट्स्कीकडून हस्तलिखित आल्यावर इस्टमन यांनी भाषांतराला प्रारंभ करून बारा प्रकरणे संपवली आणि लिखाण बाजूला ठेवले. एक दिवस ते त्यात दुरुस्ती करण्यासाठी स्वतःचे हस्तलिखित शोधू लागले तर ते गहाळ झाल्याचे आढळले. त्यांना त्याचा कोठेच पत्ता लागेना.

पुढे वीस वर्षांनी इस्टमन यांचे आकाशवाणीवर एक भाषण झाले असता त्यांनी रशियाकडून इतिहास कसा विकृत बनवला जातो याची उदाहरणे दिली व त्या ओघात 'लेनिन' या पुस्तकाच्या गहाळ हस्तलिखिताचा उल्लेख केला. नंतर दोन दिवसांनी हॉवर्ड विद्यापीठाच्या ग्रंथपालाकडून त्यांना पत्र आले की त्यांचे हस्तलिखित विद्यापीठाच्या ग्रंथालयात आहे. ते कसे आले याचा मात्र ग्रंथालयास पत्ता नव्हता ! इस्टमन यांनी ते मग ताब्यात घेतले. पण त्यानंतरही हे पुस्तक प्रकाशित होण्याचे बरीच वर्षे लांबले.

१९६८ साली बारा प्रकरणांचे हे भाषांतरित हस्तलिखित इस्टमन यांनी आपल्या मित्राला प्रकाशक शोधण्यासाठी दिले. डबलडे या प्रकाशनसंस्थेच्या व्हॉन यांनी ते वाचून प्रसिद्ध करण्याचे ठरवले. पण भाषांतर अपुरे होते. शेवटची तीन प्रकरणे रूपांतरित झाली नव्हती. तेव्हा ट्रॉट्स्कीचे मूळ रशियन हस्तलिखित शोधणे भाग झाले. अखेरीस इस्टमन यांच्या पत्नीला ते घराच्या माळ्यावर सापडले. जी तीन प्रकरणे भाषांतर केलेली नव्हती तीही त्यात होती. इस्टमन यांनी ती रूपांतरित केली व १९७२ सालामध्ये ट्रॉट्स्कीचे 'तरुण लेनिन' हे पुस्तक इंग्रजीत प्रसिद्ध झाले. आता ते पेंग्विनमध्ये उपलब्ध आहे.

लेखणी, वाणी व तरवार या तिन्हींवर ट्रॉट्स्कीचे विलक्षण प्रभुत्व होते. त्यांच्या लेखणीचा विलास या पुस्तकातही सर्वत्र दिसतो. अत्यंत ओघवती भाषा, प्रतिभा, विश्लेषण या सर्वांमुळे वाचक ट्रॉट्स्कीच्या लेखणीच्या प्रवाहाबरोबर वाहत जातो. ट्रॉट्स्कीला लेनिनबद्दल आत्मीयता आहे. पण त्याने त्याला अवतार मानलेले नाही. यामुळे तरुण लेनिनच्या मानसिक वाढीचा आलेख ट्रॉट्स्की हा वस्तुनिष्ठतेने काढतो. त्या ओघात तत्कालीन रशियन राजकीय व धार्मिक परिस्थितीचेही दर्शन होऊन जाते.

लेनिनचा आवाज लहानपणापासूनच मोठा होता. उन्हाळ्यात नौकेतून सहलीला जाताना आजूबाजूच्या लोकांची तमा न बाळगता लेनिन मोठ-मोठ्याने बोले व मग त्याची आई त्याला हळू बोलायला सांगत असे. लेनिनच्या या मोठ्या आवाजावरून लो. टिळकांची आठवण होईल. त्यांचाही आवाज मोठा होता आणि अन्यांनी लिहिले आहे की, लोकमान्य माडीवर अग्रलेख तोंडी सांगत तेव्हा तो खाली ऐकू येत असे. शाळेत लेनिन हा चांगल्यापैकी मार्क मिळवी. त्याचा भाऊ अलेक्झांडर हा त्याचा आदर्श होता. वडील झारच्या राज्यात शिक्षण-खात्यात अधिकारी होते आणि या कुटुंबाची तशी सुस्थिती होती. अर्थात लेनिनला भावंडे बरीच होती. लेनिन आपल्या मोठ्या भावाबरोबर बुद्धि-बळे खेळण्यात रंगून जात असे. कमालीचा आत्मविश्वास, टाकून बोलणे इत्यादी लेनिनचे गुण लहानपणीच दिसू लागले होते. आपल्या काही शिक्षकांच्या विरुद्ध तो बराच बोलत असे. त्याचे वडील मेंदूच्या रक्तस्त्रावाने एकाएकी वारले. त्यामुळे या कुटुंबाला काटकसरीने राहावे लागे. परंतु लेनिनच्या आईला पेन्शन चांगले मिळत असे. वडील असताना आईचे न ऐकायला लेनिन धजावला नाही, पण नंतर तो अनेकदा ऐकत नसे. वडलांच्या मृत्यूनंतर लेनिन व त्याचे कुटुंबीय यांच्यावर आणखी एक संकट कोसळले, ते म्हणजे लेनिनचा मोठा भाऊ अलेक्झांडर याच्या फाशीचे. आणि त्याची मोठी बहीणही तुरुंगात होती. झारविरोधी दहशत-वादी कार्य केल्यामुळे अलेक्झांडरला फाशी दिले. भावाच्या फाशीची बातमी ऐकल्यावर आपण यापेक्षाही अधिक परिणामकारक मार्ग स्वीकारू असे लेनिन तावडतोब म्हणाल्याचे त्याच्या एका चरित्रकाराने म्हटले आहे. ट्रॉट्स्की लिहितो, की हे अशक्य आहे. त्याची आई पीटसबर्गला होती, मोठी बहीण तुरुंगात होती. मग लेनिन हे कोणाजवळ बोलला ? तेरा वर्षांच्या भावाबरोबर काय ? असा उपहासगर्भ प्रश्न ट्रॉट्स्कीने विचारला आहे. तो विचारण्याचे कारण असे की, भावाच्या फाशीच्या वेळी लेनिन राजकीय-दृष्ट्या समंजस झाला नव्हता. तो तसा झाला होता हे आता रंगवणे चूक आहे व त्यामुळे लेनिनचा मोठेपणा वाढतो असेही नव्हे. भावाच्या फाशीनंतरही लेनिन विद्यापीठात शिक्षणासाठी गेला होता. पुढे त्यालाही विद्यापीठातून बाहेर काढले.

विद्यापीठातून बाहेर काढल्यावर सहा वर्षे लेनिनला काही उद्योग नव्हता. विद्यापीठ बंद. परदेशात जाऊन शिकायचे तर परदेशगमनाला बंदी. या स्थितीत लेनिन समारा येथील शेतीवाडीवर अभ्यास करू लागला. हा अभ्यास होता मार्क्सवादाचा. 'कॅपिटल' हा ग्रंथ त्याच्या नित्य पाठाचा झाला. मार्क्सवादी दृष्टीतून तो मग रशियाचा इतिहास व प्रचलित घडामोडींचा अभ्यास करू लागला. अनेक प्रकारचे अहवाल जमा करून त्यांची छाननी त्याने सुरू केली. आर्थिक व सामाजिक प्रश्नां-वरील हे अहवाल व आकडेवारी लेनिन अनेक दिवस अभ्यासत असे. जी पुस्तके पुन्हा पुन्हा वाचावीशी वाटतील तीच तो वाची व त्याचा पुढेही हा परिपाठ राहिला. याच काळात त्याने कायद्याचा अभ्यास करून काही शेतकऱ्यांचे खटलेही चालवले. एक अपवाद वगळता बाकी सर्व खटले तो हरला.

२४-११-७४ ⊙

ट्रॉट्स्की : जीवन आणि मृत्यू

ट्रॉट्स्कीची पत्नी नातालिया आणि मेक्सिकोतील त्याच्या विजनवासातील सहकारी व्हिक्टर सर्ज यांनी मिळून 'लाइफ ॲण्ड डेथ ऑफ लिऑं ट्रॉट्स्की' हे पुस्तक लिहिले आहे. रशियन क्रांतीच्या काळातील ट्रॉट्स्कीचे आयुष्य व नंतर स्टालीनने त्याची ससेहोलपट केल्यानंतरचे त्याचे जीवन यावर या दोघांनी चांगला प्रकाश टाकला आहे. ट्रॉट्स्कीबरोबरच लेनिन, स्टालीन, बुखारिन, कॅमेनिव्ह वगैरे अनेक रशियन नेत्यांच्या व्यक्तित्वाचे दर्शन या पुस्तकामुळे होते. हे काही ट्रॉट्स्कीचे चरित्र नव्हे, पण त्याच्या चरित्रातील महत्त्वाचे टप्पे त्यात आहेत आणि या सर्वांतून ट्रॉट्स्की ही व्यक्ती आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते.

कृतीवर ट्रॉट्स्कीचा विशेष विश्वास होता आणि तसे पाहिले तर अधिकार गाजवण्याचीच त्याची वृत्ती होती. क्रांतीच्या पहिल्या काळात व नंतरही, ट्रॉट्स्कीचे संघटनाकौशल्य, त्याचे बुद्धिवैभव वेळोवेळी पणाला लागले. पोषाख असो वा कार्यालयातील काम असो, त्याला साधेपणा व टापटीप पसंत असे. पसारा किंवा गचाळपणे केलेले काम त्याला आवडत नसे. तात्विक वादविवाद त्याला आवडे व त्यात त्याचे तासन्तास जात. पण पक्षाच्या सभेत कोणी लांबण लावून भाषण करू लागला तर मात्र तो त्याला थांबवीत असे. लेनिनच्या शेजारी बसून अनेकदा ट्रॉट्स्कीच सभेचे नियंत्रण करी. तीन-चार मिनिटांपेक्षा अधिक वेळ कोणाला बोलणे शक्य नव्हते. त्याची उपाययोजना नेहमी कडक असे. म्हणूनच क्रांतीपूर्वी त्याने रशियन जनतेला बँकांतील ठेवी काढून घेण्याचा संदेश सरकार दुबळे करण्यासाठी दिला होता. ट्रॉट्स्कीचा हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यावर जवळजवळ साडेनऊ कोटी रुबल्स बँकेतून काढले गेले. क्रांतीच्या काळात व नंतर ट्रॉट्स्की हा कामाचे ढीग उपसत असल्याने स्वतःच्या मुलांशी बोलण्यासही त्याला सवड मिळत नसे. अनेकदा ही मुले ट्रॉट्स्कीच्या सभेला जात व त्यावेळी त्यांची दृष्टीभेट झाल्यावर ट्रॉट्स्की हसत असे एवढेच. घरी आल्यावर दिवसभरातल्या कामाचा पाढा वाचण्याची त्याला सवय नव्हती; पण कोणी चांगले काम केले हे मात्र तो हटकून आपल्या पत्नीला सांगत असे. वक्तशीरपणाविषयी त्याचा विशेष कटाक्ष होता. त्यामुळे त्याच्या भेटी अगदी ठरलेल्या वेळी होत.

प्रारंभी ट्रॉट्स्की कुटुंबाला मॉस्कोत लहान जागेत रहावे लागे. पुढे क्रेमलिनमध्ये सर्वच महत्त्वाचे पुढारी राहायला आले तसा ट्रॉट्स्कीही आला. लेनिन नेहमी स्नेहभावाने वागत असे, पण नातालिया म्हणते, की स्टालीन हा तुसडेपणाने वागे व काही वेळा आपल्याला तो ओळखसुद्धा दाखवीत नसे. क्रेमलिनमधील वातावरण बरेचसे अनौपचारिक होते. एकदा ट्रॉट्स्कीची मुले दंगामस्ती करीत असता दरवाजावर आढळली व मग दरवाजा उघडला गेला. आत पॉलिटब्युरोची बैठक चालू होती. त्या काळात क्रेमलिनमध्ये राहणारे हे पुढारी अतिशय साधेपणाने राहात. आपण विजनवासात राहत होतो त्यापेक्षा अधिक चांगल्या प्रकारे वा आरामात राहता कामा नये असे ट्रॉट्स्कीचे मत होते. काही सरकारी अधिकारी मात्र चैनीत राहत. लोकांना ज्या वस्तू मिळत नसत त्या कशा मिळवायच्या याची युक्ती त्यांना माहीत होती. पुढे स्टालीनची राजवट आली. तिच्या प्रारंभीच या साध्या राहणीत बदल झाला. एकदा नाताळच्या समारंभासाठी ट्रॉट्स्की गेला असता तेथे जमलेल्या कम्युनिस्ट नेत्यांचे व अधिकाऱ्यांचे दिमाखदार पोषाख, त्यांच्या गप्पा हे सर्व पाहून व ऐकून ट्रॉट्स्कीला वीट आला आणि म्हणून तो लगेच घरी निघून

आला. स्टालीनच्या कारकीर्दीत ताबडतोब जाणवलेला बदल म्हणजे खोटा वृत्तपत्रीय प्रचार. पक्षाच्या सभेत प्रत्यक्ष घडलेल्या घटनाही स्टालीनला अनुकूल अशा रीतीने छापल्या जाऊ लागल्या होत्या. स्टालीनच्या प्रत्येक कृत्याला देशातूनच नव्हे तर, जगभर पाठिंबा मिळाल्याच्याही खोट्या बातम्या प्रसिद्ध होत. यामुळे ट्रॉट्स्की सकाळी उठल्यावर वृत्तपत्र हाती घेई व दोन मिनिटांत फेकून देत असे. तो स्टालीनची पर्वा करीत नव्हता म्हणून एकदा पक्षाच्या सभेत त्याने स्टालीनची 'क्रांतीचा मुडदेफरास' या शब्दात संभावना केली. स्टालीनच्या खोटेपणाचा पुरावा ट्रॉट्स्कीला लेनिन मृत्युशय्येवर असल्यापासून मिळत होता. त्याचवेळी ट्रॉट्स्कीही आजारी पडल्याने त्याला डॉक्टरां[illegible] विश्रांतीचा सल्ला दिला. कॉकेशस विभागात [illegible] दौऱ्यावर गेला असता टिफलीस स्टेशनवर [illegible] का अधिकाऱ्याने ट्रॉट्स्कीच्या हाती लेनिन मरण पावल्याची तार दिली. दुसरी तार स्टालीनची होती. त्याने ट्रॉटस्कीला विश्रांती घेण्याची विनंती केली होती व लेनिनचे दफन लगेच होणार असल्याने ट्रॉट्स्कीने परत येऊनही उपयोग नाही, असेही स्टालीनने लिहिले होते. वास्तविक त्याचवेळी लेनिनच्या मृतदेहात मसाले भरून तो जतन करून ठेवण्याची योजना अमलात येत होती. ट्रॉट्स्कीला हे कळले तेव्हा तो संतापला. अशा रीतीने आपला देह जतन करून ठेवण्याची कल्पना लेनिनला मान्य होणारी नव्हती.

ट्रॉट्स्की-स्टालीनवादात ट्रॉट्स्कीचा पराभव झाला. ट्रॉट्स्कीला प्रथम विजनवासात धाडण्यात आले पण तो जागा सोडेना. तेव्हा त्याच्या घराचा दरवाजा फोडण्यात आला. हे काम करणारा नोकर कर्तव्य म्हणूनच ते करीत होता. पण त्यालाही राहवेना व म्हणून दरवाजा फोडता फोडता तो ओरडत होता. 'कॉम्रेड ट्रॉट्स्की! तुम्ही मला गोळी घाला.' पुढे त्या नोकराला स्टालीनच्या पोलिसांनी गोळी घातली. ट्रॉट्स्कीला नंतर देशत्याग करावा लागला आणि अखेरीस तो मेक्सिकोत रहायला आला. तेथे त्याचे लिखाण चालू होते. एकाच वेळी तो अनेक विषयांवरील लिखाण हाती घेई. तो काम भरपूर करी आणि निद्रानाशाचा विकार जडल्यामुळे त्याला थकवा येत असे. आपण फार थकलो आहोत असे तो स्वतःशीच बोलत असल्याचे त्याच्या पत्नीच्या अनेकदा कानांवर पडे, एवढेच नव्हे तर स्वतःशीच तो अनेकदा बोलत राही. वास्तविक कॅमेनिव्हचा स्टालीनने कधीच बळी घेतला होता, पण तो जिवंत आहे असे मानून ट्रॉट्स्की त्याच्याशी बोलत असे. असे त्याचे दिवस जात होते. पण पूर्वीप्रमाणेच त्याचे लिखाण चालू होते. तो पूर्वीइतकाच काटेकोरपणे लिहीत होता. त्याला फ्रेंच, जर्मन, इंग्रजी अशा भाषा येत. स्टालीनवर त्याने पुस्तक लिहायला घेतले होते. ते पुरे होण्यापूर्वीच स्टालीनच्या मारेकऱ्याने त्याला ठार केले. त्याच्या डोक्यावर हातोडी बसली व तो अखेरचा आजार व आघात ठरून ट्रॉट्स्की मरण पावला.

१-२-७६ ◉

रशियात लुई फिशर

पंचविसाव्या कम्युनिस्ट कॉंग्रेसचे अधिवेशन मॉस्कोत नुकतेच पार पडले. या अधिवेशनात ब्रेझनेव्ह यांचे सहा तासांचे भाषण झाले खरे, पण त्यासाठी दोन वेळा कामकाज थांबवून विश्रांती घेण्यात आली. या निमित्ताने लेनिनच्या काळातील रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या बैठका कशा होत, लेनिन, ट्रॉट्स्की वगैरेंचे व्यक्तित्व कसे होते, याचा शोध घेण्यासाठी लुई फिशर यांच्या 'मेन ॲन्ड पॉलिटिक्स' या ग्रंथाचे वाचन करावे लागेल.

१९२२ साली लुई फिशर रशियात पत्रकार म्हणून गेले. ते कोणत्याही अमेरिकन पत्राच्या नोकरीत नव्हते, तर स्वतंत्रपणे लिखाण करून पैसे मिळवीत. त्यावेळच्या रशियन लोकजीवनाचे फिशर यांनी वर्णन केले आहे. युद्ध व क्रांती यामुळे हे जीवन विस्कळीत झाले होते आणि ते सुधारण्याची प्रचंड जबाबदारी रशियन नेत्यांनी लेनिनच्या नेतृत्वाखाली स्वीकारली होती. अशा या काळात फिशर रशियात होते. १९२२ मध्येच लेनिनला पक्षघाताचा पहिला झटका आला व सहा महिने त्याला रुग्णशय्येवर काढावे लागले. त्यानंतर ऑक्टोबरमध्ये तो बरा झाला व कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीच्या बैठकीला हजर झाला. ही बैठक झारच्याच जुन्या राजवाड्यात भरली होती. क्रिलेन्की याचे भाषण चालू असता लेनिन आला आणि योगायोगाने तो लुई फिशर यांच्याजवळच्या खुर्चीवर बसला. लेनिनच्या पुढेमागे कोणी शरीररक्षक नव्हते. थोड्याच क्षणात लेनिनचे अस्तित्व प्रतिनिधींना जाणवले व लेनिन, लेनिन अशी कुजबुज होऊन ती वाढत गेली. लगेच क्रिलेन्की याने आपले अहवाल-वाचन आवरते घेतले. अध्यक्ष कालिनिन याने लेनिनचे नाव पुकारले. लेनिन व्यासपीठावर गेला. अर्धा मिनिट टाळ्या वाजल्या. लेनिनने खिशातून घड्याळ काढले व डॉक्टरने आपल्याला केवळ पंधरा मिनिटेच बोलण्याची परवानगी दिल्याचे सांगून भाषणाला सुरुवात केली. त्याच्या भाषणाचे वेळी श्रोते मधूनमधून हसत, टाळ्या वाजवून प्रतिसाद देत. लेनिनची बोलण्याची पद्धती अनौपचारिक आणि संभाषण करावे अशी होती. श्रोते व वक्ता दोघांचीही दिलजमाई झाल्याची स्पष्ट जाणीव होत होती. लेनिनचे भाषण झाल्यावर बैठक संपली व एका दालनात छायाचित्रासाठी शंभर एक प्रतिनिधी जमले. लुई फिशर या चित्राच्या वेळीही लेनिनच्या अगदी जवळच उभे होते.

त्यानंतर काही आठवड्यांनी कोमिन्टर्नची बैठक त्याच ठिकाणी झाली आणि फिशर यांना लेनिनचे पुन्हा भाषण ऐकता आले. यावेळी लेनिनने जर्मनमध्ये भाषण केले. डॉक्टरनी त्याला तासभर भाषण करण्याची परवानगी दिली होती. लेनिन भाषण करीत असता कार्ल रॅडेक हा त्याच्या पायाशी बसला होता. लेनिनला बोलताना अचूक जर्मन शब्द आठवेनासा झाला, की रॅडेक आपला कुरूप चेहरा वर करून शब्द सुचवी व लेनिन त्याचा पुनरुच्चार करी. पण कित्येकदा रॅडेकने सुचवलेला शब्द अन्वर्थक वा बोलका नाही असे लेनिनला वाटे, मग तो रशियन शब्द उच्चारी व त्याला कोणता जर्मन प्रतिशब्द आहे असा श्रोत्यांना सवाल करी. निरनिराळे शब्द श्रोत्यांतून येत व त्यातला पसंत पडेल तो लेनिन स्वीकारी.

लेनिननंतर ट्रॉट्स्कीचे भाषण झाले. ट्रॉट्स्की हा पट्टीचा वक्ता. त्याने क्षणार्धात श्रोत्यांवर प्रभाव टाकला. त्याने अडीच तास भाषण केले ते उत्कृष्ट जर्मन भाषेत, नंतर त्याने तितक्याच प्रभावशालीपणे फ्रेंच भाषेचा उपयोग केला आणि शेवटी रशियन. एकूण साडेसात तास भाषण करून ट्रॉट्स्कीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले! लेनिन अगदी क्वचित शापयुक्त भाषा वापरी किंवा शपथा घेई. स्टालीन वारंवार याचा अवलंब करी, पण ट्रॉट्स्की कधीच हे करीत नसे. शाप देणे हा गुलामगिरीचा वारसा असल्याचे त्याचे मत होते.

लेनिनच्या काळातील काही वैशिष्ट्ये उल्लेखनीय आहेत. लुई फिशर म्हणतात, की लेनिनच्या स्तुतिपर लेख व उल्लेख फारच क्वचित असत.

अपरिहार्य असेल तेव्हाच व्यक्तीचा उल्लेख येई. स्टालीनचा उल्लेख जवळजवळ येत नसे इतका तो त्यावेळी मागच्या रांगेतला पुढारी होता. क्रांतीसंबंधी आलेल्या प्रवदातील लेखात मेन्शेव्हिकांचाही उल्लेख होता. यांनीही क्रांतीच्या कार्यात काही कामगिरी बजावली हे या लेखात मान्य केले होते. पुढे सर्व इतिहासच बदलला गेला. स्टालीनची राजवट सुरू झाल्यावर स्टालीनच्या प्रशंसेशिवाय पान हलत नव्हते. प्रवदाच्या १९३७ सालच्या एका अंकात स्टालीनचा उल्लेख ८८ वेळा आहे असे फिशर सांगतात. स्टालीनच्या प्रशंसेला मर्यादा नव्हती. त्याचप्रमाणे ट्रॉट्स्की वगैरेंच्या निर्भर्त्सनेला धरबंद नव्हता. त्यांची दरोडेखोर, डाकू वगैरे शब्दांत संभावना होत असे.

आपल्याकडे सध्या लेखकांना भारतीयत्वाचा अभिमान बाळगण्याचा उपदेश बराच केला जातो. या संदर्भात लेनिनचे मत उल्लेखनीय ठरेल. तो पक्का रशियन, पण विजनवासातला त्याचा काळ स्वित्झर्लंड, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंडमध्ये गेला होता. त्याला पाश्चात्य संस्कृतीच्या मोठेपणाची कल्पना होती. ४ जानेवारी १९२३ च्या 'प्रवदा'तील त्याच्या लेखाचा लुई फिशर उल्लेख करतात. या लेखात लेनिन म्हणतो, 'आपण श्रमिक संस्कृतीबद्दल बरेच मूर्खपणाचे बोलतो व भांडवलदारी संस्कृतीशी तिची तुलना करतो; पण लेखन आणि वाचन या दोन्हीबाबत रशिया किती मागासलेला आहे हे आकडेवारीवरूनही सिद्ध होईल. झारच्या पाडावानंतर आपण या बाबतीत फार थोडी प्रगती केली आहे. पण यामुळेच पश्चिम युरोपातल्या सर्वसाधारण सुसंस्कृत देशाच्या पातळीवर येण्यासाठी आपल्याला किती परिश्रम करावे लागतील याची कल्पना येईल.' आपल्या कार्यकर्त्यांना त्याने अभ्यास, अभ्यास व आणखी अभ्यास, अशी हाक दिली होती. येथे भारतात ती कोण देणार? आणि कोण ऐकणार?

१४-३-७६ ⊙

स्टालीनच्या नरमेधाचा बळी : बुखारिन

स्टालीनच्या हत्याकांडात बळी पडलेल्यांपैकी प्रमुख पुढारी बुखारिन याच्याविरुद्ध स्टालीनने केलेले आरोप मागे घ्यावेत आणि बोल्शेव्हिक नेता म्हणून त्याची रशियन इतिहासात पुन्हा नोंद केली जावी, अशी मागणी बुखारिनचा मुलगा युरी लारिन याने नुकतीच केली होती. युरी लारिन याने इटालियन कम्युनिस्ट पुढारी बर्लिंगर याला तसे पत्र लिहिले व बर्लिंगर यानेही या मागणीला दुजोरा दिला. रशियन सरकारने बुखारिन याच्यावरील आरोप मागे घेतले आहेत, पण नेतेमंडळात त्याची पुनःस्थापना केलेली नाही. बुखारिनचा नव्वदावा वाढदिवस आता येत असून त्यानिमित्त पुन्हा या मागणीला जोर येत असला तरी रशियन सरकार कितपत दाद देईल याची शंका आहे. या संदर्भात स्टीफन कोहेन यांनी लिहिलेले बुखारिनचे चरित्र वाचनीय ठरेल. ज्याला राजकीय चरित्र

म्हणतात त्याचा एक उल्लेखनीय नमुना म्हणून या चरित्राचा निर्देश करणे योग्य होईल.

बुखारिनचे वडील हे विद्वान होते. अनेक वर्षे त्यानी शिक्षकी पेशात काढली व नंतर ते सरकारी नोकरीत शिरले. आपल्या मुलाला त्यांनी उत्तम शिक्षण दिले. प्राणीशास्त्र, साहित्य आणि चित्रकला यांची त्याला विशेष आवड होती आणि यात त्याची गतीही चांगली होती. त्याच्या संग्रही अनेक पक्षी व फुलपाखरे असत. आपली साहित्य व कलेची आवड त्याला अर्थातच क्रांतीसाठी बाजूस ठेवावी लागली होती. तथापि त्याचा उमदा स्वभाव, हसरे व्यक्तित्व आणि बुद्धिमत्ता यामुळे तो सर्वांना हवाहवासा वाटे. त्याची ही ख्याती शेवटपर्यंत टिकली. स्त्रियांच्याही तो आकर्षणाचा विषय असे. लेनिनने त्याचा उल्लेख अनेकदा अतिशय प्रेमाने केला आहे.

बुखारिन १९०५ च्या उठावानंतर कम्युनिस्ट पक्षात सामील झाला. लगेच त्याला भूमिगत काम करावे लागले आणि या कार्यामुळे तो जर्मनी, फ्रान्स, स्वीडन, स्वित्झर्लन्ड, अमेरिका व इंग्लंड अशा देशांत वास्तव्य करू लागला. परदेशातील या वास्तव्यातच त्याची व लेनिनची प्रत्यक्ष भेट झाली आणि मैत्री जमली. बुखारिनने साम्राज्यशाहीसंबंधी त्यावेळी एक अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिला. लेनिनचा साम्राज्यशाहीवरील ग्रंथ नंतर प्रसिद्ध झाला व त्याने बुखारिनच्या ग्रंथातील माहितीचा भरपूर उपयोग केला. बुखारिनने आधुनिक भांडवलशाहीचे विश्लेषण करताना सरकार अर्थकारणात कसा हस्तक्षेप करते याची छाननी केली. सरकारी वा शासकीय भांडवलशाहीचे हे स्वरूप त्याने स्पष्ट केले. मागासलेल्या अर्थव्यवस्थेत सरकारच्या हाती याप्रकारचे अधिकार येणे महत्त्वाचे व आवश्यक आहे, असे लेनिनचे मत होते.

रशियात क्रांती झाली तेव्हा बुखारिनचा तीत मोठा भाग होता. अर्थात ट्रॉट्स्कीप्रमाणे तो काही लाल सैन्याचा जनक नव्हे. क्रांतीनंतर मात्र युद्धविरामाच्या करारावरून लेनिन व बुखारिन यांच्यात मतभेद झाले. हे मतभेद लेखांच्या व भाषणांच्या रूपाने जगजाहीर होत असले तरी लेनिन आणि बुखारिन यांच्यात वैयक्तिक वितुष्ट आले नाही. पुढे लेनिनने जेव्हा नवे आर्थिक धोरण स्वीकारले तेव्हा कम्युनिस्ट पक्षातील अनेक जहालांचा त्याला विरोध होता. बुखारिन मात्र लेनिनच्या बाजूचा होता. या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या हाती थोडा अधिक पैसा येत होता आणि तसा तो आल्यानेच उद्योगधंद्यांना चालना मिळेल अशी बुखारिनची धारणा होती. त्यामुळे लेनिनच्या धोरणाला पाठिंबा देऊन तो विरोधकांवर तुटून पडे.

कम्युनिस्ट पक्षाच्या व त्यातही पदाधिकाऱ्यांच्या हातात वाढत जाणारी सत्ता, नोकरशाहीची वाढ हाही बुखारिनला चिंतेचा विषय होता. या संदर्भात लेनिनच्या अखेरच्या काळातील एक प्रसंग नमूद करण्यासारखा आहे. स्टालीन सरचिटणीस झालेला होता आणि त्याच्या धोरणाला विरोध करणारा एक वर्ग जॉर्जियात होता. या विरोधकांविरुद्ध स्टालीन शिस्तीचा बडगा वापरीत होता. लेनिनने प्रारंभी स्टालीनला पाठिंबा दिला, पण त्याला जेव्हा स्टालीनच्या सत्तापिपासेचे स्वरूप उमजले तेव्हा त्याने जॉर्जियातील स्टालीनविरोधकांना संरक्षण देण्याची सूचना केली. परंतु बाराव्या काँग्रेसच्या अधिवेशनात ट्रॉट्स्की गप्प बसला. त्याने स्टालीन, कॅमनेव्ह व झिनोव्हिव यांना पाठिंबा दिला आणि स्टालीनला नामोहरम करण्याची संधी दवडली. इतर सर्व जेव्हा गप्प बसले तेव्हा बुखारिन जॉर्जियनांच्या मदतीला धावला. त्याने लेनिनच्या टिपणांचा हवाल देऊन स्टालीन आणि झिनोव्हिव यांची नावे घेऊन त्यांच्यावर हल्ला केला. रशियातील निरनिराळ्या राष्ट्रसमूहांना दडपण्याचे धोरण त्याने निषेधार्ह ठरविले. अर्थात तो एकाकी पडला. पुढे झिनोव्हिव व कॅमनेव्ह यांच्या साहाय्याने स्टालीनने ट्रॉट्स्कीला खतम केले. पक्षातील नोकरशाही व अधिकारशाहीविरुद्धही बुखारिन टीका करू लागला होता, पण त्याची दखल घेतली गेली नाही.

स्टालीनच्या हाती सत्ता आली व मग त्याने विरोधकांचा काटा काढण्याचे अत्यंत अमानुष तंत्र वापरले. औद्योगीकरणाचा वेग मोठ्या प्रमाणावर वाढवण्यासाठी त्याने शेतकऱ्यांची लांडगेतोड केली. या धोरणाला बुखारिनचा सक्त विरोध होता. पण याचाही उपयोग झाला नाही. औद्योगीकरणासाठी प्रचंड व असमर्थनीय अशी किंमत देणे गैर आहे हा बुखारिनच्या टीकेचा रोख होता. सामुदायिक शेतीचा कार्यक्रम ट्रॉट्स्कीचा होता. स्टालीनने बुखारिनला या कार्यक्रमाला विरोध करू दिला आणि

ट्रॉट्स्कीचा काटा काढला. पुढे स्टालीनने हाच कार्यक्रम अमलात आणून लाखो लोक ठार मारले.

या हत्याकांडाच्या काळात विरोधकांना शांत करावे म्हणून स्टालीनने नवी राज्यघटना तयार करण्याचे ठरवून बुखारिनला ते काम दिले. या घटनेत मूलभूत स्वातंत्र्याचे प्रकरण आहे. घटना पुढे संमत झाली. पण मूलभूत स्वातंत्र्याचे प्रकरण आणि देशातील हत्याकांड याचा मेळ बसत नव्हता. ही विसंगती नको म्हणून घटना लिहिणाऱ्या बुखारिनलाच स्टालीनने फासावर दिले. स्टालीनऐवजी बुखारिन प्रमुख झाला असता तर काय झाले असते हा एक चर्चेचा मुद्दा आहे. पण रशियाची परंपरा आणि मार्क्सवादी पद्धती याचा प्रभाव पडून बुखारिन हाही कोणी स्वातंत्र्योपासक ठरला नसता.

बुखारिनला फाशीची शिक्षा झाली तेव्हा तो मोठा धैर्याने वागला असे त्याचा चरित्रकार म्हणतो. पण त्याला रशियन वरिष्ठ पुढाऱ्यांत मानाचे स्थान द्यायचे म्हणजे सक्तीच्या सामुदायिक शेतीला झालेला विरोध मान्य करायचा असे सध्याच्या रशियन नेत्यांना वाटत असेल. याला त्यांची तयारी नाही. २४-९-७८ ◉

अराजकवादी महिला एमा गोल्डमन व रशिया

गेल्या शतकाच्या शेवटी व या शतकाच्या प्रारंभी रशिया, युरोपातील काही देश व अमेरिका या राष्ट्रात अराजकवादी पंथ बराच फोफावला होता. प्रिन्स क्रोपोटकीन हे रशियन उमराव या पंथाचे एक अध्वर्यू होते. त्यांच्या आठवणींचे पुस्तक या अराजकवादी पंथाची चांगली माहिती देणारे आहे. गेल्या शतकाच्या उत्तरार्धातील रशियन धनिक समाजाचे जीवन त्यात मार्मिकपणे रंगवले आहे. तथापि, आत्मचरित्र या नात्याने विचार केला तर एमा गोल्डमन या अराजकवादी स्त्रीची दोन खंडांतील आत्मकथा (प्रकाशक डोव्हर) अधिक सरस आहे. दीर्घकाळ ती उपलब्ध नव्हती, आता आहे. एमा गोल्डमन ही रशियन ज्यू. पुढे ती अमेरिकेत गेली आणि अराजकवाद्यांच्या पुढारी मंडळात समाविष्ट झाली. अमेरिका, इंग्लंड, रशिया यात ती वावरत असे. कोणतीही सरकारी यंत्रणा मान्य न करणे हे या पंथाचे मुख्य उद्दिष्ट. कामगारांचे लढे या पंथाच्या लोकांनी लढवले आणि त्यापायी अनेक प्रकारच्या हालअपेष्टा सोसल्या. एमा गोल्डमनने स्वतः तसेच तिचा एक प्रियकर साशा व इतर यांनी काबाडकष्टाचे जिणे भोगले त्याचे दर्शन या आत्मचरित्रात होते. समाजजीवन निर्बंधरहित हवे असे अराजकवादी एमा गोल्डमनचे मत होते. तसेच तिचे वैयक्तिक जीवनही अनिर्बंध होते. तिच्या जीवनात अनेक पुरुष आले व त्यांच्या सहवासातील दिवसांचे तिने वर्णन केले आहे. यात तिच्यापेक्षा वयाने मोठे असलेले पुरुष होते, तसेच लहानही होते. देश व धर्म यांचे बंधनही या बाबतीत आढळत नाही. एमा गोल्डमनच्या व्यक्तित्वातच जीवनाचा एक विलक्षण स्रोत होता. यामुळे तिचे लिखाण जिवंत व रसरशीत वाटते. क्रांतीची स्वप्ने पाहणारी ही स्त्री रूप, गंध, खाद्यपेये यांची भोक्ती होती. जीवनाला विटलेली नव्हती. तिने ज्या हालअपेष्टा भोगल्या त्यांचेच पुन्हा स्मरण करून कडवटपणाचे प्रदर्शन ती

करीत नाही ही उल्लेखनीय गोष्ट आहे.

अत्याचार

एमा गोल्डमनच्या आत्मचरित्राच्या दुसऱ्या खंडात रशियन क्रांतीनंतरचा काळ आला आहे. यात लेनिन, ट्रॉट्स्की यांची व तिची कशी ओळख झाली; क्रांतीनंतरच्या काळातील रशियाचे लोकजीवन कसे होते इत्यादींचा उहापोह असून तो बराच उद्‌बोधक आहे. वास्तविक रशियन कम्युनिस्टांच्या पूर्वी तेथील अराजकवाद्यांनी झारविरोधी वातावरण तापवण्यास प्रारंभ केला होता. साम्यवादाचे रशियात आगमन होण्यापूर्वी अराजकवाद वाढू लागला होता. क्रांतीनंतर अराजकवाद्यांचा नायनाट करण्याचे सत्र पद्धतशीर सुरू झाले. एमा गोल्डमन प्रथम पेट्रोग्राडला आली तेव्हा मॉस्कोमधील अराजकवाद्यांच्या मुख्य कचेरीवर ट्रॉट्स्कीनेच मशीनगनचा मारा करण्याचा कसा हुकूम दिला, अनेकांना यमसदनाला कसे धाडण्यात आले याची माहिती तिला मिळाली. तिला सांगण्यात आले होते, की फाशीची शिक्षा रद्द झाली आहे; पण प्रत्यक्षात अनेकजणांना गोळ्या घालून मारले जात होते, फासावर लटकावले जात होते. यात अराजकवादीही होते. पुढे ती व साशा यांची लेनिनबरोबर मॉस्कोत भेट झाली तेव्हा अनेक अराजकवादी तुरुंगात का आहेत, असा प्रश्न या दोघांनी लेनिनला केला. लेनिनने ताबडतोब उत्तर दिले, की अराजकवादी तुरुंगात नाहीतच, जे आहेत ते दरोडेखोर आहेत! राजकीय मतांसाठी तुरुंगात टाकायचे तर भांडवलशाही देशात व रशियात फरक काय, असा प्रश्न एमा गोल्डमनने विचारला, तेव्हा मतस्वातंत्र्य हा भांडवलशाहीतील गुण झाला. भांडवलशाहीतील सामाजिक अन्यायावर रंगसफेती करण्यासाठी हे स्वातंत्र्य दिले जाते असे लेनिनचे उत्तर होते. लेनिनचे उत्तर एमा गोल्डमनला समाधानकारक वाटले नाही व पुढे जेव्हा तिला रशियन पोलीस व गुप्त पोलीस यंत्रणेची व्याप्ती, अत्याचार, दडपशाही यांची अधिकाधिक माहिती मिळत गेली, तेव्हा एका मतपंथाच्या प्रभावाने भारावून गेलेले बोल्शेव्हिक हे कोणत्याही अत्याचाराला कसे तयार होतात याची तिला जाणीव झाली.

लोकजीवन

रशियन लोकजीवनावरही एमा गोल्डमनने प्रकाश टाकला आहे. तिचा मित्र साशा हा अनेक कारखान्यांत फिरून आला तेव्हा प्रत्यक्ष काम करणारांपेक्षा पक्षाचे कार्यकर्तेच अधिक व मोक्याच्या जागा बळकावून बसलेले आढळले. कम्युनिस्ट पक्षाच्या लहानमोठ्या अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिकाराच्या प्रमाणात सवलती व सुखसोयी होत्या. त्यांना धान्य, कापड, जीवनावश्यक वस्तू यांचे खास रेशन होते. राहण्याच्या जागाही त्यांच्यासाठी प्रथम मिळत. सार्वजनिक वाहनेही त्यांच्यासाठी राखून ठेवली जात. लेनिनग्राड जवळच्या जंगलातील लाकूड तोडण्याची परवानगी नसल्याने नागरीक थंडीने गारठून जात. कम्युनिस्ट पक्षाच्या पदाधिकाऱ्यावर ही पाळी कधी आली नाही. शेतकऱ्याविरुद्ध कम्युनिस्ट पक्षात बराच संताप होता. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध अनेक प्रकारची उपाययोजना करण्यात आली. सर्व प्रकारच्या दडपशाहीबद्दल, क्रौर्याबद्दल एमा गोल्डमनने गॉर्की यांच्याकडे तक्रार केली पण गॉर्की यांनी या गोष्टीचे समर्थनच केले. रशियन बहुजनसमाज हा अडाणी आहे, सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेला आहे, तेव्हा यापेक्षा वेगळे काही होणे अशक्य आहे असे मत त्यांनी दिले. लेखकांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे धैर्यही गॉर्कीने दाखवले नाही, ही तक्रार एमा गोल्डमनने ऐकली होतीच.

अनेक प्रकारचे परवाने हा रशियन जीवनाचा विशेष बनला. त्याखेरीज देशाबाहेर पडता येणे कोणालाही अशक्य झाले. कामगारांना स्वातंत्र्य देण्याऐवजी गुलाम बनवण्यात आले. आपल्या गावाच्या बाहेर पडणेही परवान्याशिवाय शक्य नसल्याने एका कारखान्यात कामाला लागले, की जन्मभर तेथेच काम करण्याखेरीज गत्यंतर राहिले नाही. या सुमाराला ब्रिटिश मजूर पक्षाचे एक शिष्टमंडळ रशियात आले होते. पोलिसांची दडपशाही, एकंदर निर्घृण राजवट हे रशियात अटळ असल्याचे या शिष्टमंडळातील बहुतेकांचे मत होते. याला अपवाद बर्ट्रान्ड रसेल यांचा.

या सर्व अनुभवाने एमा गोल्डमन निराश झाली. ती म्हणते, की आपण क्रांती व राजवट यांची गल्लत केली. क्रांतीची जी उद्दिष्टे होती ती कम्युनिस्ट राजवटीने धुळीला मिळवली. पक्षाची सत्ता टिकवणे व मजबूत

करणे हेच मुख्य उद्दिष्ट बनले आणि मग सर्व प्रकारची जुलूमजबरदस्ती क्रांतीच्या रक्षणार्थ सुरू झाली. क्रांतीसंबंधी आपल्या स्वप्नाळू कल्पना होत्या, पण भांडवलशाही उलथून पाडली तरीही भांडवलदार नष्ट होतात असे नव्हे, विषमता जाते, स्वातंत्र्याचे वारे वाहतात असेही नव्हे, असा निष्कर्ष लेखिका काढते. नंतर ती लंडनला स्थानांतरित झाली. हे पुस्तक तिने फ्रान्समध्ये लिहिले. १५-१-७८ ⊙



रॉयल ॲकॅडमी

लंडनचे वैभव वाढवणाऱ्या ज्या अनेक संस्था आहेत त्यात रॉयल ॲकॅडमीचा समावेश करावयास हवा. पिकॅडली भागात असलेल्या या ॲकॅडमीची ओळख 'टेलिग्राफ'च्या रंगीत साप्ताहिकात सचित्र करून देण्यात आली आहे. १७६८ मध्ये स्थापन झालेल्या या ॲकॅडमीची आर्थिक परिस्थिती कधी नव्हे एवढी आज बिघडली आहे. तिला दरवर्षी पन्नास हजार पौंडांचा तोटा येतो. प्रारंभापासूनच सरकारी कृपाछत्रापासून ॲकॅडमी दूर ठेवण्यात आली. तसे पाहिल्यास ॲकॅडमी स्थापन झाल्यापासूनच ती तोट्यात चालली आहे. अगदी पहिल्याच वर्षी ३७० पौंड तोटा आला आणि तिसऱ्या जॉर्जने स्वतःच्या पैशातून तो भरून काढला. लॉर्ड बर्लिंग्टन यांच्या अठराव्या शतकातील प्रासादात ही ॲकॅडमी आहे. तिच्यात स्टुडिओ आहेत त्याप्रमाणे प्रदर्शनासाठी वेगळी दालने आहेत. १८५४ मध्ये लॉर्ड बर्लिंग्टन यांच्या वारसाकडून सरकारने हा प्रासाद विकत घेतला आणि रॉयल ॲकॅडमीला दिला. या ॲकॅडमीवर ७५ वर्षांच्या वरच्या व्यक्तीला निवडणूक लढवता येत नाही.

इंग्लंडमधील फार नामवंत कलावंत व कलेचे मर्मज्ञ ॲकॅडमीचे पदाधिकारी आहेत. ॲकॅडमी वारंवार जी प्रदर्शने भरवते ती पाहण्यासाठी तुफान गर्दी होते. गेल्या वर्षीच्या उन्हाळ्यातील प्रदर्शनासाठी ९० हजार प्रेक्षक आले होते. दहा रुपये प्रवेश फी भरून एवढ्या लोकांनी प्रदर्शन पाहिले. प्रदर्शनातील चित्रांची विक्री होते. १९७४ मध्ये अशा विक्रीतून दीड लाख पौंड मिळाले. ॲकॅडमीचा यात वाटा नसतो. पण व्हिक्टोरियन काळात उन्हाळ्यातील प्रदर्शन पाहण्यास चार लाखांपर्यंत प्रेक्षक येत, त्या मानाने आता एकचतुर्थांश येतात. उन्हाळ्याच्या प्रदर्शनापूर्वी एक भोजनसमारंभ होतो. युद्धकाळात ही प्रथा बंद पडली, पण नंतर ती चर्चिल यांनी सुरू केली. या ॲकॅडमीला जो तोटा येतो तो कसा भरून काढणार? चाळीस वर्षे सेक्रेटरी म्हणून काम केलेल्या हचिन्सन यांचे म्हणणे असे आहे, की जे चित्रकलेचे भोक्ते आहेत त्यांच्याकडून पैसा उभारणे वा मिळणे कठीण. सामान्य लोक आले तरच पैसा मिळेल. पण त्यांना कथा सांगणारे चित्र लागते, ते कसे मिळणार? या स्थितीत तोटा भरून निघण्याची शक्यता कमी. १६-३-७५ ⊙

आन्द्रे साखारॉव यांचे विचार

रशियन लेखक सोल्झिनिटसिन यांनी देश सोडण्यापूर्वी त्यांना उघडपणे पाठिंबा देणाऱ्या रशियातील ज्या काही महत्त्वाच्या व्यक्ती होत्या त्यात शास्त्रज्ञ साखारॉव यांचा क्रम वरचा लागेल. त्यांनी आपली मते निर्भीडपणे मांडण्याचे व्रत सोडलेले नाही. त्यांचे काही लेख, मुलाखती वगैरेंचा संग्रह 'साखारॉव स्पीकस्' या नावाने प्रसिद्ध झाला आहे. 'न्यूयॉर्क टाइम्स'चे नामवंत प्रतिनिधी हॅरिसन सॅलिसबरी यांनी हा संग्रह संपादित केला आणि त्याला प्रस्तावना लिहिली आहे. सॅलिसबरी हे रशियात बरीच वर्षे राहात होते. रशियातील मानवी हक्कासंबंधीच्या आंदोलनाचे साखारॉव हे एक अध्वर्यू आहेत. त्यांचे विचार आणि चरित्र यांची ओळख या संग्रहावरून होऊ शकेल.

पदार्थविज्ञानशास्त्रात साखारॉव यांनी केलेल्या कामगिरीमुळे त्यांचे नाव शास्त्रज्ञांच्या विश्वात फार आदरणीय मानले जाते. त्यांच्या बुद्धिमत्तेचा प्रभाव वीसबावीसाव्या वर्षीच दिसू लागला. रशियाने तयार केलेल्या हायड्रोजन बॉम्बचे जनकत्व साखारॉव यांच्याकडे जाते. यामुळे त्यांना स्टालीनकडून गुप्तपणे स्टालीन पारितोषिकही मिळाले होते. वयाच्या बावीसाव्या वर्षीच रशियन ॲकॅडमी ऑफ सायन्सेसचे सदस्य म्हणून साखारॉव यांची निवड झाली आणि त्यांना डॉक्टरेटही मिळाली. हायड्रोजन बॉम्बचा शोध लावला परंतु साखारॉव यांचे मन मात्र युद्ध की शांतता या प्रश्नामुळे व्यग्र बनले. अणुबॉम्बचा शोध लावणाऱ्या ओपेनहायमर यांची हीच अवस्था झाली होती. क्रुशॉव्ह यांनी काही काल अणुबॉम्बचे चाचणी-स्फोट स्थगित केले होते. ते कायमचे बंद करावे आणि भूमिगत स्फोट करावे असा प्रयत्न साखारॉव यांनी केला, पण क्रुशॉव्ह यांनी त्यांचे ऐकले नाही. १९६३ साली रशिया व अमेरिका यांनी हवेत व पाण्यात अणुविषयक चाचण्या बंद केल्या तेव्हा साखारॉव यांच्या मताचा विजय झाला.

पुढे शिक्षणातील सुधारणेचा प्रश्न आला. क्रुशॉव्ह यांना पुस्तकी शिक्षणाच्या बरोबरीने व्यावहारिक शिक्षण हवे होते. पण साखारॉव यांच्या मते गणित, विज्ञान इत्यादी क्षेत्रात अगदी तरुण वयातच विद्यार्थ्याला काही करून दाखवता येते. म्हणून माध्यमिक शाळातील हुशार विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड निर्माण न करता त्यांना पुढील शिक्षण द्यावे ही साखारॉव यांची मागणी होती ती मान्य झाली. विज्ञानाच्या क्षेत्रात राजकीय सिद्धान्ताचा प्रभाव पडता कामा नये असे साखारॉव यांचे मत होते. याउलट लिसेन्कोची भूमिका होती. त्याची भूमिका मान्य होऊन त्याला महत्त्व आल्यास रशियन शेतीचे नुकसान होईल असे साखारॉव यांनी बजावले. क्रुशॉव्ह त्यामुळे भडकले आणि साखारॉव यांना धडा देण्याचा आदेश त्यांनी दिला. पण थोड्याच दिवसात क्रुशॉव्ह पदच्युत झाल्यामुळे हे साध्य झाले नाही. या निमित्ताने साखारॉव यांनी रशियन समाजव्यवस्थेची तपासणी केली. वैचारिक स्वातंत्र्याच्या अभावी हा समाज प्रगत होऊ शकत नाही हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी व इतर चोवीस शास्त्रज्ञांनी २३ व्या कम्युनिस्ट काँग्रेसला एक निवेदन धाडून स्टालीनचे पुनर्वसन न करण्याची विनंती केली.

स्वातंत्र्याचा पुरस्कार

रशियन समाज, जग इत्यादी संबंधात साखारॉव यांची काही मते बनली होती. त्याआधारे त्यांनी एक जाहीरनामा आपल्या मित्रांत प्रसृत केला. प्रगती, सहजीवन व वैचारिक स्वातंत्र्य हे त्याचे नाव. ६८ च्या जूनमध्ये तो प्रसिद्ध झाला. रशियातील वैचारिक स्वातंत्र्याच्या, मानवी

हक्काच्या चळवळीत याला फार महत्त्व आहे. रशिया व अमेरिका यांच्यात खरोखरीचे सहजीवन नांदावे, दोन्ही समाजपद्धतींचे मीलन व्हावे ही अपेक्षाही या जाहीरनाम्यात व्यक्त झाली आहे. खुद्द रशियातील अनेक निर्बंध रद्द व्हायला हवे ही साखारॉव यांची मुख्य मागणी. साहजिकच त्यांचा हा जाहीरनामा रशियात प्रसिद्ध झाला नाही. तो गुप्तपणे प्रसृत केला गेला. याच सुमाराला रशियाने चेकोस्लोव्हाकियात लष्करी हस्तक्षेप केला आणि साखारॉव यांच्या आशा धुळीला मिळाल्या. त्यांच्या भोवतीचे वातावरणही बदलले. साखारॉव हे रशियाच्या अणुशस्त्रास्त्रांच्या प्रकल्पात काम करीत होते. त्यांना कामावरून दूर करण्यात आले. पहिल्या प्रतीचे शास्त्रज्ञ म्हणून त्यांना चांगले वेतन होते, सोयीसवलती होत्या. त्या सर्व गेल्या. काही दिवस त्यांना नोकरीच नव्हती. पुढे एक लहानशी नोकरी दिली गेली. साखारॉव यांना पहिल्या लग्नापासून झालेली तीन अपत्ये – दोन विवाहित मुली व एक मुलगा – त्यांना टाळू लागली. मुलगा मोठ्या बहिणीकडे राहायला गेला. त्यांच्या दुसऱ्या बायकोची मुलगी वृत्तविद्येचे शिक्षण घेत होती. तिचे शिक्षण बंद केले गेले. तिचा नवरा इंजिनियर होता. त्याची नोकरी गेली. सावत्र मुलाला मॉस्को विद्यापीठाचे दरवाजे बंद झाले. साखारॉव यांनी आपली सर्व बचत पूर्वीच कॅन्सर संशोधन संस्थेला दिली असल्यामुळे त्यांच्यापाशी काही पुंजी राहिली नाही. ही देणगी एक लक्ष एकोणचाळीस हजार रुबल्स एवढी होती.

साखारॉव हे आता लेखक, कवी, चित्रकार, शास्त्रज्ञ वगैरेंच्या स्वातंत्र्यासाठी चाललेल्या कोणत्याही प्रयत्नांना जाहीर पाठिंबा देतात. रशिया सोडून जाण्याची त्यांची तयारी नाही. ते धार्मिक स्वातंत्र्याचाही पुरस्कार करू लागले आहेत. साखारॉव यांचे म्हणणे असे आहे, की पाश्चात्य देशांनी रशियाबरोबर केवळ व्यापारी करार करावे आणि अंतर्गत दडपशाहीचा विचार करू नये, हे बरोबर नाही. व्यवहारी राजकारणी मात्र अशा ध्येयवादी शास्त्रज्ञाच्या भूमिकेची दखल घेणे कठीण.

१७-३-७५ ◎

साखारॉव यांच्या शब्दांत रशिया

आन्द्रे साखारॉव यांना नोबेल पारितोषिक मिळाले. ते त्यांना स्वतःला घेता आले नाही. कारण त्यांना रशिया सोडून जायला बंदी होती. नोबेल पारितोषिक त्यांच्या पत्नीने स्वीकारले. डोळ्याच्या विकाराने ती आजारी होती. तिच्या डोळ्यावर शस्त्रक्रिया झाली ती पाश्चात्य देशात. स्टालीनच्या राजवटीत हे काहीच झाले नसते. साखारॉव व त्यांची पत्नी हे दोघेही केव्हाच यमसदनाला गेले असते. आज ते जिवंत आहेत, ही क्रुशॉव्ह यांची रशियनांना देणगी !

साखारॉव यांचे 'माय कन्ट्री अँड द वर्ल्ड' हे पुस्तक नोव्हेंबरमध्ये अमेरिकेत प्रसिद्ध झाले. पुढच्याच्या बांधणीप्रमाणेच स्वस्तात मिळणारी पेपरबॅक आवृत्तीही प्रसिद्ध झाली. न्यूयॉर्कच्या बाजारात ही आवृत्ती दोन दिवसांत संपली. साखारॉव यांनी या छोट्या पुस्तकात प्रथम रशियन समाजाचे स्वरूप वर्णन केले आहे आणि नंतर अमेरिका व रशिया यांच्यातील सहकार्याचा विचार केला आहे. या सहकार्याच्या धोरणामुळे रशियात सुधारणा घडवू पाहणाऱ्या शक्ती खचीं होत आहेत. ही त्यांची तक्रार.

रशियन समाज

साखारॉव रशियन समाजाचे आजचे स्वरूप वर्णन करताना म्हणतात, या समाजाचे अंतरंग तपासले तर दैन्य, दुःख, दुस्वास, क्रौर्य यांचा आढळ होईल. लोक दमलेले आहेत आणि कोणाला कोणाबद्दल पर्वा नाही. अनेक दशकांचे हे साचलेले पाप आहे. रशियात असंख्य दुर्दैवी लोक आहेत. ते कोणते ? तर आज पेन्शन असलेले वृद्ध. त्यांना कधी चांगले जीवन लाभलेच नाही आणि कधी चांगल्या जागेतही राहता आले नाही. असंख्य लोक असे आहेत, की जे दीर्घकाल रुग्ण आहेत, पण त्यांना हॉस्पिटलमध्ये जाऊन उपचार करून घेणेच शक्य नाही. पंधरा लाख लोक तुरुंगात खितपत पडले आहेत. अनेक जण दारूच्या आहारी जाऊन पक्के दारुडे बनले आहेत. आजचा रशियन समाज हा सरकारी भांडवलशाही (स्टेट कॅपिटॅलिझम) असलेला आहे. या समाजाची भांडवलशाहीच्या पहिल्या अवस्थेत होत होती तशी अद्याप पिळवणूक होते. त्यामुळे फ्रान्स, प. जर्मनी, इटली, स्वित्झर्लन्ड या देशांत जेवढे वेतन मिळते, तेवढेही कोणाला मिळत नाही. रशियात किमान मासिक वेतन साट रूबल्स आहे आणि सर्वसाधारण वेतनाचे प्रमाण ११० रूबल्स पडते. रूबलची क्रयशक्ती पाहिली, तर हे प्रमाण ३० डॉलर्स एवढेच बसते. अमेरिकेत ६०० ते ८०० डॉलर्स हे सर्वसाधारण मासिक उत्पन्न आहे. पाश्चात्य देशांत कमी उत्पन्नाच्या नागरिकांना ज्या सोयी व सवलती मिळतात, त्यांची कल्पना रशियन नागरिकाला स्वप्नातही येणार नाही. अमेरिकेत नागरिकाच्या उत्पन्नापैकी वीस ते पंचवीस टक्के खर्च अन्नावर होतो; पण रशियात या उत्पन्नापैकी फार मोठा भाग अन्नावरच खर्च होतो. लोकांच्या दारिद्र्याचे हे लक्षण मानावे लागेल. पाश्चात्य देश आज चलनवाढ, महागाई यांच्या फेऱ्यात सापडले आहेत खरे, पण साखारॉव म्हणतात, पाश्चात्यांनी आपल्या राहणीचा दर्जा १/५ ने कमी केला, तरीही ते काही भुकेने व्याकुळ होणार नाहीत आणि रशियापेक्षा त्यांच्या राहणीचा दर्जा कितीतरी अधिक असेल. हे जे कमी वेतन मिळते ते शिक्षक, इंजिनियर्स, डॉक्टर्स वगैरेंना फार त्रासदायक ठरते. काही क्षेत्रातील लोकांना बाहेरचे उत्पन्न असते, पण ते या मंडळींना नाही. कामाचे तास पाश्चात्यांपेक्षा अधिक आहेत. सुट्ट्या कमी आहेत आणि पेन्शन तर फारच थोडे आहे. एखाद्याने आत्महत्या केली, तर त्याच्या कुटुंबाला पेन्शन मिळत नाही. दरवर्षी अनेक शनिवार व रविवार हे कामाचे दिवस म्हणून या ना त्या कारणास्तव जाहीर केले जातात. शिवाय त्या दिवसाचे वेतन मिळत नाहीच. तो पैसा सरकारी तिजोरीत जमा होतो आणि हे सर्व स्वयंस्फूर्तीने झाले म्हणून सांगण्यात येते.

घरांची चणचण

निवासस्थानांची चणचण मोठ्या प्रमाणावर आहे. घरे सामान्य प्रतीची व सोयीही थोड्या असलेली अशी असतात. राहायला स्वतंत्र जागा मिळणे कठीण. अनेक शहरांत घरबांधणीचा मोठा कार्यक्रम पार पडला व अद्याप चालू आहे. पण राहत्या जागांची अडचण कमी नाही. काही महत्त्वाच्या शहरांचा अपवाद सोडला, तर बाकीच्या ठिकाणी अन्नपदार्थ पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत. पाव हलक्या प्रतीचा असतो. अनेक ठिकाणी मांस मिळवण्यासाठी तासन् तास रांगेत उभे रहावे लागते व एवढे करून ते चांगल्या दर्जाचे नसतेच. शेकडो खेड्यांत व शहरांत पावासाठी सकाळपासून रांग लावावी लागते. शेतीचा हंगाम असतो, तेव्हाही बायकांना पाव वगैरे मिळवण्यासाठी रांगा धराव्या लागतात. या रांगांतील शेकडो लोक हे निरुद्योगी आणि दारुडे असतात. म्हाताऱ्या बायका सांगतात, की पूर्वी इतके दारुडे दिसत नव्हते. दारूच्या व्यसनाचे प्रमाण विलक्षण वाढले आहे. झारच्या काळात दारूचा माणशी खप होता त्यापेक्षा तो आता तिपटीने वाढला आहे. दरवर्षी दहा हजार तरी दारुडे रस्त्यावर कोसळून पडतात आणि मरतात. नैराश्य, निरुद्योग, दैन्य यामुळे हे मद्याचे व्यसन वाढले आहे. लहान गावात व खेड्यात आरोग्याची अतिशय आबाळ होते. एवढेच नव्हे, तर साखारॉव यांच्या मते रशियातील वैद्यक शिक्षणाची पातळी घसरली असून, अनेक ठिकाणी वैद्यक महाविद्यालयांत गेल्या शतकातील उपकरणे आहेत. बायकांनाही मेहनतीची अवजड कामे करावी लागतात. त्याचा त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो. एकंदरच दैन्य असल्याने व अपार कष्ट करावे लागल्याने कौटुंबिक जीवन शांत आणि समाधानी राहात नाही.

सांस्कृतिक अवनती

साखारॉव सांगतात, की कम्युनिस्ट पक्षाचे अधिकारी मात्र चैनीत राहतात. त्यांचा खर्च समाजावर पडतो. एकंदरच नोकरशाही वाढली आहे. त्यामुळे नासाडी व दिरंगाई यांचाच अनुभव येतो. भाजीपाला असो वा पोलाद, यांची ने-आण करताना दिरंगाई होते आणि नासाडीही होते. मोठमोठे अधिकारी कोटलेही नियम न पाळता शिकार करतात. जंगले तोडतात. शेती असो वा उद्योगधंदे, नोकरशाहीच्या प्रभावामुळे नियोजनाचा बट्ट्याबोळ माजला आहे. ज्यू किंवा निरनिराळ्या वंशाचे लोक यांना अपमानास्पद वागणूक मिळते. रशियनांच्या अहंकारी वागणुकीमुळे अनेक अरब देशांत विरोधी वातावरण तयार झाले आहे. अर्थात पूर्वीपेक्षा लोकांचे जीवन सुधारले आहे आणि म्हणून इंग्रज, फ्रेंच, जर्मन, अमेरिकन नागरिकांच्या जीवनाशी रशियन नागरिक तुलना करीत नाही. तो आपल्या आजोबाच्या जीवनाशी करतो आणि गप्प बसतो. कम्युनिस्ट पक्ष व सरकार यांच्याच हाती आर्थिक व राजकीय सत्ता केंद्रित झाली असल्याने तोंडपुजे, संधिसाधु यांचा भरणा झाला आहे. त्यांचीच चलती असून, निकोप बौद्धिक जीवनाचा अनुभव येऊच शकत नाही. या स्थितीत साखारॉव यांचे पाश्चात्यांना, विशेषतः अमेरिकनांना, असे आवाहन आहे, की सहकार्याचे करार करताना त्यांनी रशियन नागरिकांच्या बंधमुक्तीचाही विचार करावा.

४-१-७६ ◉

रशियात अमेरिकन वार्ताहर

'वॉशिंग्टन पोस्ट' चे रॉबर्ट कैसर हे रशियात तीन वर्षे पत्रप्रतिनिधी म्हणून होते. त्यांना रशियन भाषा येते आणि यामुळे रशियातील वास्तव्यात त्यांनी जो हजारो मैलांचा प्रवास केला त्यात त्यांना अनेक सर्वसामान्य रशियन नागरिकांत मिसळता आले. वॉशिंग्टन पोस्टप्रमाणे अनेक दैनिकांत त्यांचे वृत्तांत प्रसिद्ध होत. आता त्यांनी 'रशिया' या नावाचे एक पुस्तक लिहिले आहे. (सेकर अॅण्ड वॉरबर्ग, किं. ५ पौंड ९० पे.) सामान्य रशियनाचे जन्मापासून मृत्यूपर्यंतचे जीवन हा कैसर यांच्या ग्रंथाचा विषय आहे. त्यांनी राजकारणाची चर्चा केलेली नाही; पण रशियनांचे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवन रंगवले आहे. सोल्झिनिटसिन व साखारॉव यांची त्यांनी रंगवलेली व्यक्तिचित्रेही मार्मिक आहेत. जन्मापासून मृत्यूपर्यंत आपण चांगले जीवन जगतो असे अनेकांनी कैसर यांना सांगितले आणि पूर्वीपेक्षा हे जीवन खरोखरच सुधारलेही आहे. पण सुधारले म्हणजे किती ? तसेच या जीवनातल्या उणिवा आणि वैशिष्ट्ये कोणती, यावर कैसर यांनी प्रकाश टाकला आहे. रशियात शिक्षणाचा प्रसार भरपूर झाला आहे; स्टालीनच्या राजवटीपेक्षा मतभेदाला निदान भूमिगत राहून वाचा फोडता येते. अर्थात विरोधी मताला वाव नाही व त्याकरिता सैबेरियाची हवा खावी लागते हेही खरे.

मद्यपानाचा अतिरेक

कैसर यांना सर्वत्र आढळणारा एक विशेष म्हणजे रशियनांचे मद्यपान. व्होडका या कडक मद्याचे सेवन अतिशय मोठ्या प्रमाणावर होते. सार्वजनिक स्नानगृहात मद्यपानास बंदी आहे, पण तेथेही रक्षकाला पैसे देऊन व्होडका पिणारे अनेक लोक कैसर यांनी पाहिले आहेत. सैबेरियात काम केलेल्या अझबेल या विद्यार्थ्याने कैसर यांना सांगितले, की तो जेथे काम करीत होता तेथे गावकरी व्होडका पिऊन गुंगलेले असत. फारच थोडेजण काम करीत. शेतावर विद्यार्थी राबत. क्रुश्चॉव्ह यांनीही अतिरिक्त मद्यपानाविषयी अनेकदा टीका केली होती. या व्यसनापायी अनेक कारखान्यात पुरेसे काम होत नाही आणि गैरहजेरीचे प्रमाणही अधिक आहे. याला आळा घालण्यात रशियन सरकार यशस्वी ठरलेले नाही.

मात्र वैद्यकीय उपचारांची व्यवस्था रशियात जेवढी दूरवर पोहोचली आहे तेवढी ती इतरत्र क्वचित दिसेल. पण याही क्षेत्रात गुणवत्तेपेक्षा संख्येला महत्त्व अधिक मिळते. रशियन डॉक्टर्सना सरकार सांगेल तेथेच काम करावे लागते. कित्येक वेळा स्थानिक लोकांना प्राधान्य देण्याच्या धोरणामुळे वैद्यकीय परीक्षातही कमी गुण मिळालेल्यांना पास केले जाते. याचे अनेकदा भयंकर परिणाम होतात. कैसर यांनी एका ठिकाणच्या वैद्यकीय विद्यार्थ्यांचे उदाहरण दिले आहे. या विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाच्या अहवालात अनेक कठीण केसेसचा अंतर्भाव होता. पण प्रत्यक्षात त्यांनी असे रोगी हाताळलेले नव्हते. ज्या बाहेरच्या डॉक्टरने परीक्षा घेताना हे उघडकीला आणून विद्यार्थ्यांना नापास केले त्याच्यावरच बदनामीची फिर्याद होऊन त्याला शिक्षा झाली. स्थानिक न्यायाधिशाला आपण अन्याय करतो याची जाणीव असावी, पण त्याचे काही चालले नाही. स्थानिक लोकांना प्राधान्य देण्याच्या मागणीला येथे अनेक जण विरोध करून पुरोगामित्वाचे प्रदर्शन करतात. पण रशियात स्थानिकांना प्राधान्य देण्याच्या बाबतीत अतिरेक झाला आहे हे त्यांच्या गावी नाही.

योजनाबद्ध अकार्यक्षमता

अत्यंत तपशीलवार नियोजनामुळे अकार्यक्षमतेत मात्र वाढ झाली आहे. प्रत्येक कारखान्याला त्याचे लक्ष्य ठरवून दिले जाते. पण त्याप्रमाणे कच्चा माल इत्यादींचा पुरवठा होतोच असे नव्हे. मग लक्ष्य गाठल्याचे दाखवण्याच्या अनेक युक्त्या शोधल्या जातात. काच कारखाना घेतला, तर तो ठराविक जाडीची काच करण्याऐवजी पातळ काच तयार करतो. अशा काचा

फुटतात, पण ठराविक लक्ष्य गाठल्याचे समाधान. चोऱ्यामाऱ्याही भरपूर होत असतात. कित्येक वेळा कारखाना वा उत्पादनाचा प्रारंभ हा एक उपचार असतो. उद्घाटन होते व वर्षभर दुरुस्तीसाठी कारखाना बंद राहातो. सर्वंकष नियोजन हे याचे कारण आहे. यातून अकार्यक्षमता येते. म्हणून कारखान्याची जी उत्पादनक्षमता असते त्या मानाने उत्पादन कमी होते. काही टिकाणी ते केवळ वीस टक्केसुद्धा आहे. याचा सर्व जीवनावर परिणाम झाला आहे. मॉस्कोबाहेर वस्तू मिळत नाहीत व मॉस्कोत त्यासाठी रांगा लावाव्या लागतात. रांगा लावणे हा एक उद्योग होऊन बसला आहे. त्यातल्या त्यात जे सुखवस्तू लोक आहेत ते यातून अनेक मार्ग शोधून काढतात. ते अधिक पैसा मोजून आपल्याला हवा तो माल खरेदी करतात. पाश्चात्य पॉप संगीताच्या ध्वनिमुद्रिका काळ्या बाजारात खपतात. सरकार व कम्युनिस्ट पक्ष यातील अधिकारपदस्थांची राहाणी अतिशय चैनीची असते. यासंबंधात एक विनोदी कथा प्रचलित आहे. ती अशी : एकदा ब्रेझनेव्ह यांनी आपल्या विश्रांतीसाठीच्या निवासस्थानी (डाचा) आपल्या म्हाताऱ्या आईला आणले आणि तेथील अनेक सुखसोयी दाखवल्या. त्या पाहून त्या वृद्धेला फार आनंद झाला; पण नंतर तिने आपल्या मुलाला –ब्रेझनेव्ह यांना– विचारले, ' हे सर्व उत्तम आहे, पण बोल्शेव्हिक येतील आणि सर्व लुबाडतील, याची तुला भीती वाटत नाही काय ? '

सर्वसाधारण रशियन माणूस संगीत, नृत्य व निसर्गप्रिय आहे. त्याचबरोबर तो धार्मिकही आहे. रशियन चर्चमध्ये नियमित जाणारांची संख्या कम्युनिस्ट पक्षाच्या सभासदांपेक्षा कित्येक पटींनी अधिक आहे. चर्चमध्ये विवाह लावणारांची संख्या वाढत्या प्रमाणावर आहे. तथापि घटस्फोटाचे प्रमाणही मोठे आहे. तिनांत एक विवाह घटस्फोटात परिणत होतो. विवाहाची वयोमर्यादा खाली येत असून अठराएकोणीसाव्या वर्षीही लग्ने लागतात. आर्थिक व सामाजिक परिस्थितीच्या दबावाखाली संततिनियमन हे अपरिहार्य बनले आहे. पण संततिनियमनाची साधने सुधारलेली नाहीत. या स्थितीत गर्भपाताचे प्रमाण मोठे आहे.

शास्त्रज्ञ, कलावंत, लेखक इत्यादींचे वैचारिक जीवन नियंत्रित आहे. सामाजिक व आर्थिक प्रश्नांची मोकळेपणाने चर्चा होऊ शकत नाही. शास्त्रीय संशोधनाच्या क्षेत्रातही वर्गवर्चस्व असल्याने संशोधनाला मर्यादा पडतात. जे लेखक, कलावंत सरकारी नियमाप्रमाणे वागतात, लिखाण करतात, त्यांना ऐषआरामी जीवन लाभते. तथापि याकडे पाठ फिरवणारेही बरेच आहेत. साखारॉव व सोल्झिनिटसिन हे यातले प्रमुख. सोल्झिनिटसिन याचा विश्वास कैसर यांनी संपादन केला होता आणि म्हणून त्यांनी कैसर यांना प्रदीर्घ मुलाखती दिल्या. त्याच प्रथम पाश्चात्य देशात प्रसिद्ध झाल्या. सोल्झिनिटसिन व साखारॉव यांच्या व्यक्तित्वावर प्रकाश टाकणारे लिखाण आतापर्यंत बरेच प्रसिद्ध झाले आहे. त्यामुळे या पुस्तकातले वर्णन नाविन्यपूर्ण नाही. कैसर यांचे वैशिष्ट्य हे, की त्यांनी या दोन स्वतंत्र बुद्धीच्या विचारवंतांशी फार पूर्वीच स्नेहसंबंध राखले होते.

२६-९-७६ ◉

प्रागमध्ये ग्रॅहॅम ग्रीन

ग्रॅहॅम ग्रीन हे एक भटके गृहस्थ आहेत; आणि त्यांच्या सुदैवाने वा दुर्दैवाने ते अशा वेळी एखाद्या देशात असतात, की तेथे क्रांती होत असते किंवा नुकतीच होऊन गेलेली असते. १९३० सालानंतर ते रिगा येथे होते. तेथून ते बर्लीनला आपल्या भावाकडे आले. भावाने ग्रॅहॅम ग्रीन यांना गाडीतून उतरताच विचारले रिगामधील परिस्थिती कशी आहे? ते काही सांगू शकले नाहीत. भावाकडून त्यांना कळले, की मध्यरात्री लष्कराने सत्ता काबीज केली होती व रिगाच्या रस्त्यावर लष्करी बंदोबस्त होता.

१९४८ च्या फेब्रुवारीतील गोष्ट. ग्रॅहॅम ग्रीन व्हिएन्नात होते व तेथून त्यांना प्रागला जायचे होते. विमान सुटायला उशीर झाला कारण बर्फ पडत होते. विमानात दोन वार्ताहर होते व चेकोस्लोव्हाकियात त्याच वेळी कम्युनिस्टांनी सत्ता काबीज केल्याच्या बातम्या आल्याने ते प्रागला जाण्याला निघाले होते. प्रागमध्ये हॉटेलात जागा मिळणार नाही तेव्हा तुम्ही आमच्याबरोबर राहा, असे या वार्ताहरांनी ग्रॅहॅम ग्रीन यांना सांगितले. दोघेही ब्रिटिश होते. प्रागला गेल्यावर हॉटेलात खरोखरच जागा नव्हती. तिघेजण एकाच खोलीत राहिले. रात्र बरीच झाली होती व तिघांनाही भूक लागली होती. नोकर लोकांसाठी हॉटेलात वेगळी व्यवस्था होती तेथे हे तिघे गेले. तेथे नाचगाणी, खाणेपिणे चालू होते. एका सामान्य नोकराणीच्या भोवतीही एका देशाचा राजदूत पिंगा घालताना ग्रॅहॅम ग्रीन यांना आढळला. खाणेपिणे झाल्यावर ग्रीन व त्याचे सहकारी परत आले. क्रांतीची बातमी देण्यासाठी आलेल्या वार्ताहरांनी जी ताणून दिली ती सकाळी दहाला ते जागे झाले. तत्पूर्वी ग्रॅहॅम ग्रीन यांची बाहेर पडण्याची सर्व तयारी झाली होती. ते बाहेर पडले. रस्त्यावर लाल ध्वज घेऊन मोर्चे निघत होते, घोषणा दिल्या जात होत्या. रस्त्यात त्यांना एक चेक नागरिक आपल्या मागे मागे येत असलेला आढळला. थांबून त्यांनी त्याला प्रश्न केला. तेव्हा आपण विशिष्ट प्रकारचा पॅराशूट शोधला असून तो रशियनांच्या हाती पडू नये अशी त्याची इच्छा होती. ग्रॅहॅम ग्रीन याबाबत काही करू शकत नव्हते. आठ दिवसांच्या वास्तव्यात क्रांतीची झिलई जाऊन लोक चेक कम्युनिस्ट नेते ग्रोटवॉल्ड यांच्या गलेलठ्ठ पत्नीवरून विनोद करू लागलेले ग्रॅहॅम ग्रीन यांना आढळले. त्यांच्या खोलीत परराष्ट्र खात्याचा एक अधिकारी एक दिवस आला आणि समाजवादी नेता जॅन मसारिक याने, कम्युनिस्टांनी सत्ता काबीज करण्यापूर्वी आपल्या कर्मचाऱ्यांचा निरोप कसा घेतला, त्यावेळी तो कसा रडला याची हकीकत सांगितली.

एकवीस वर्षांनी म्हणजे १९६९ च्या फेब्रुवारीत ग्रॅहॅम ग्रीन प्रागमध्ये परत गेले. डयुबचेक प्रभृतींना पदच्युत करून रशियनांनी रणगाड्यांच्या जोरावर स्वतःला अनुकूल असे राज्यकर्ते चेकोस्लोव्हाकियात राज्यावर आणले होते. डयुबचेक यांच्याबरोबर स्मरकोव्हस्की हेही बडतर्फ झाले होते. ग्रॅहॅम ग्रीन यांनी त्यांना 'ब्रेझनेव्हपेक्षा कोसिगिन हे सहानुभूती असलेले गृहस्थ असावेत' असे म्हटले, तेव्हा स्मरकोव्हस्की म्हणाले 'ब्रेझनेव्ह, कोसिगिन व सुस्लाव हे तिघे रशियन नेते प्रागमध्ये आले व ते आमच्याशी बोलले पण तिघेही सारखेच वाटले. कोणालाही आमच्याबद्दल सहानुभूती नव्हती.'

'टेलिग्राफ'च्या रंगीत पुरवणीत ग्रॅहॅम ग्रीन यांच्या काही आठवणी प्रसिद्ध होत आहेत. त्यातील ही एक. १९६८ सालच्या ऑक्टोबरच्या सुमारास चेकोस्लोव्हाकियात रशियन रणगाडे घातले गेले. त्यानंतर चार-सहा महिन्यांत ग्रॅहॅम ग्रीन प्रागला गेले. त्यांनी त्यावेळच्या वातावरणाचे चित्रण या लेखात केले आहे. १९६९ सालच्या जूनमध्ये 'वाचस्पती'ला प्रागला तीन दिवस मुक्काम करण्याचा योग आला. ग्रॅहॅम ग्रीन यांनी वर्णन केलेले वातावरण तेव्हाही होते.

५-१-७५ ◉

उध्वस्त धर्मशाळा

प्रागमध्ये नुकताच स्कॉटिश फुटबॉल संघाचा सामना झाला. तेव्हा 'तुम्ही जर के. जी. बी. चा (रशियन हेर संघटना) द्वेष करीत असाल तर टाळ्या वाजवा' असे काहीजण ओरडले. पण त्यांना प्रेक्षकांकडून दाद मिळाली नाही. हाच प्रकार बुडापेस्टला झाला असता तर वेगळा अनुभव हंगेरियन प्रेक्षकांनी दिला असता, असे गार्डनर या 'डेली वर्कर' या ब्रिटिश कम्युनिस्ट पक्षाच्या पत्रात काम केलेल्या एकेकाळच्या कम्युनिस्ट पत्रकाराने म्हटले आहे. पक्ष व पत्र या दोन्हींचा त्याग आपण हंगेरियन उठावाच्यामुळे कसा केला यासंबंधी गार्डनर यांनी 'न्यू स्टेट्समन'मध्ये प्रत्ययकारी लेख लिहिला आहे.

गार्डनर म्हणतात, १९५६ मध्ये सुवेझच्या प्रश्नावरून ब्रिटिश मजूर पक्ष ईडन यांच्या सरकारविरुद्ध वातावरण तापवीत असताना हंगेरीवर झालेल्या रशियन आक्रमणामुळे ब्रिटिश कम्युनिस्ट पक्षात दुफळी निर्माण होत होती. या आक्रमणाला आता वीस वर्षे झाली. ब्रिटिश कम्युनिस्ट पक्षात जे अंधभक्त होते त्यांच्या मते प्रतिक्रांती ठेचून काढण्यासाठी रशियाने केलेले आक्रमण न्याय्य होते, तर बऱ्याचजणांना आपण दीर्घकाळ जोपासलेल्या तत्त्वांशी द्रोह झाल्याचे वाटत होते. डेली वर्करचे जे वयस्क कर्मचारी होते ते रडकुंडीला आले होते, तर तरुण वार्ताहर व उपसंपादक हताश व संतप्त झाले होते. डेली वर्करमधील काहींची मनःस्थिती विसाव्या काँग्रेसमधील क्रुशॉव्ह यांच्या भाषणापासूनच चलबिचल झाली होती. हे भाषण प्रसिद्ध झाल्यानंतर डेली वर्करच्या सकाळच्या संपादकीय बैठकीत अनेकांनी प्रश्न उपस्थित केले. यावर चर्चा होऊ नये अशी ब्रिटिश कम्युनिस्ट पक्षाची इच्छा होती, पण या संपादकवर्गाने ती जुमानली नाही. कम्युनिस्ट पक्षाचा इतिहासलेखक हा खोटे बोलणारा होता की, मूर्ख होता ? असा प्रश्न गार्डनर यांनी संपादकाला विचारला. त्याला अर्थातच उत्तर मिळाले नाही. त्या सुमाराला रजनी पामदत्त यांचा लेबर मंथलीत लेख प्रसिद्ध झाला होता. त्यात त्यांनी म्हटले होते, की सूर्यावरही डाग आहेत हे कळल्याने फक्त अंधभक्तांनाच धक्का बसला असेल. डेली वर्करच्या संपादकालाही याचा राग आला आणि यातील अग्रदूत कोण होते हे पामदत्त यांना सांगायला हवे काय असा त्यांचा प्रश्न होता. पामदत्त यांनी पगडी फिरवली हे यावरून स्पष्ट होते. अशा मानसिक अवस्थेत संपादकवर्ग असतानाच हंगेरीचे प्रकरण उद्भवले. प्रत्येकजण भावनात्मकदृष्ट्या हादरला होता. वास्तविक डेली वर्करचा संपादक तर पक्षासाठी तुरुंगातही जाऊन आला होता. कार्यकर्त्यांच्या एकनिष्ठेवरच पक्षाची भिस्त होती. पक्ष सोडणे म्हणजे द्रोह मानला जाणार होता. अशा वेळी पक्ष सोडून तरी जायचे कुठे हा प्रश्न हंगेरीनंतर उभा राहिला.

या हंगेरीच्या प्रकरणावरून थॉम्पसन व सॅव्हिल यांनी लेख लिहिला असता त्यांच्यावर कडक टीका पक्षाच्या पुढाऱ्यांनी केली. रशियासंबंधी चिकित्सक भूमिका घेण्याचे आश्वासन ब्रिटिश कम्युनिस्ट नेत्यांनी दिले खरे, पण ते मोडले गेले. हंगेरीला डेली वर्करतर्फे प्रतिनिधी पाठवण्याचा प्रश्न आला. ग्रिफिथ्स् हा बरीच वर्षे हंगेरीत राहिलेला तेव्हा त्याला पाठवणे युक्त होते, पण त्याच्या निष्ठेविषयी संशय असल्याने त्याला धाडण्यात आले नाही. गार्डनर यांची स्वतःची तीच स्थिती होती. मग पिटर फ्रायर यास धाडण्यात आले. तो पक्षावर एकनिष्ठ श्रद्धा असलेला होता. पण त्याचबरोबर फ्रायर हा उत्कृष्ट वार्ताहर होता. तो हंगेरीत गेला आणि पक्षनिष्ठेपेक्षा त्याच्यातील वार्ताहर जागृत झाला, वरचढ ठरला. रशियन टँक्स् बुडापेस्टमध्ये लोकांना चिरडून टाकीत असल्याचे व लोकांची स्वातंत्र्याकांक्षा दडपत असल्याचे त्याने पाहिले. मग त्याने जे पाहिले ते वार्तापत्रात लिहून पाठवण्यास सुरवात केली. त्याची ती वार्तापत्रे न वापरण्याचा संपादकाने निर्णय घेतला. ज्यांनी ती वाचली होती, त्यांनी त्यासंबंधी मौन पाळावे अशी ताकीद दिली गेली. बुडापेस्टमधील संघर्ष उग्र झाला, तेव्हा इतर ब्रिटिश पत्रकारांप्रमाणे फ्रायर यानेही तेथील ब्रिटिश वकिलातीचा आश्रय घेतला. नंतर तो डेली वर्करमध्ये पुन्हा कामाला आला नाही. स्वतःची व जगाची प्रतारणा करण्याची त्याची तयारी नव्हती.

याच सुमाराला गार्डनर हे एकदा ट्रॅफल्गार चौकातून जात असता अन्युरिन बेव्हन हे प्रचंड मेळाव्यापुढे भाषण करीत असलेले त्यांनी पाहिले. बेव्हन हे पट्टीचे वक्ते. सुवेझच्या प्रश्नावरून ईडन सरकारविरुद्ध ते तोफा डागीत होते. भाषणाच्या ओघात बेव्हन म्हणाले, 'ईडन यांना कदाचित आपण करतो ते बरोबर करतो, असे वाटत असेल.' एवढे म्हणून ते किंचित थांबले. श्रोत्यातील एक जण ओरडला, 'हो, त्यांना तसेच वाटते.' बेव्हन म्हणाले, 'तसे असेल तर या देशाचे ते एक महामूर्ख पंतप्रधान आहेत.' त्यावर हशा व टाळ्या यामुळे हलकल्लोळ उडाला. गार्डनर यांनी हे सर्व पाहिले व ऐकले. त्यांनी विचार केला, की सुवेझवरील ब्रिटिश आक्रमणाचा आपण निषेध करतो, तर हंगेरीवरील रशियन आक्रमणाला पाठिंबा कसा देणार? बेव्हन यांच्या सभेमुळे त्यांना आपल्या भूमिकेतील विसंगती तीव्रतेने जाणवली आणि मग गार्डनर यांनी पक्ष सोडला व डेली वर्कर्लाही रामराम ठोकला. त्यांचाच मार्ग इतरही काहींनी स्वीकारला. त्यांचे भावनाविश्व उध्वस्त झाले होते!

१४-११-७६ ◉

वृत्त-नियंत्रणाची पोलिश आवृत्ती

आणीबाणीत आपल्याकडे वृत्तपत्रांवर नियंत्रण घालण्यात आले. या-संबंधीचे नियम एका परदेशी वकिलातीने पुरवले असे म्हणतात. या वकिलातीकडे फिलिपिन्सच्या सरकारने वृत्तनियंत्रणाची जी नियमावली केली होती तिची प्रत होती आणि ती भारत सरकारला देण्यात आली. अशा प्रकारचे नियंत्रण भारतात पुन्हा येऊ नये ही अपेक्षा. तथापि एक-प्रकारे आपल्याकडील वृत्त-नियंत्रण हे सौम्य म्हणावे लागेल अशा प्रकारचे नियंत्रण कम्युनिस्ट व इतर हुकुमशाही देशात असते. याचा नमुना तोमाझ स्त्रीझीझेवस्की या पोलिश गृहस्थाने पुस्तकरूपाने पेश केला आहे. तो पोलिश सरकारच्या वृत्तनियंत्रण कचेरीत एक अधिकारी होता. १९७७ साली तो स्वीडनमध्ये आला व तेथे त्याने राजकीय आसरा मिळवला. येताना त्याने वृत्तपत्रे, नियतकालिके आणि सर्व लेखनप्रकार यांच्यावरील नियंत्रणांचे नियम ज्यात अंतर्भूत केले आहेत ते पुस्तक बरोबर आणले होते. ते आता लंडनमधील पोलिश प्रकाशनसंस्थेने प्रसिद्ध केले आहे. या पुस्तकाचा परिचय न्यूयॉर्क रिव्हचू ऑफ बुक्स या पाक्षिकाने प्रसिद्ध केला असून पोलंडमध्ये वृत्तनियंत्रण किती सर्वंकष आहे याची कल्पना त्यावरून येईल. न्यूयॉर्क रिव्हचू ऑफ बुक्सचे अंक त्यावरील तारखेच्या अगोदर महिना पाऊण महिना प्रसिद्ध होतात. आता पंधरा ऑगस्टचा अंक जुलै-अखेरला आला असून त्यातच हा परिचय सापडेल. वस्तुस्थिती काय आहे यापेक्षा ती जशी असावी असे राज्यकर्त्यांना वाटते त्याप्रमाणे ती वृत्तपत्रातून प्रदर्शित करण्याची सक्ती करणे हे वृत्तनियंत्रणाचे मुख्य सूत्र असते. याची अनेक उदाहरणे या पुस्तकात दिलेली आहेत.

पूर्व जर्मनीकडे पोलंडचा काही भाग युद्धात गेला आहे. त्याचा उल्लेख पोलिश पत्रात करता येत नाही. पोलंड दक्षिण कोरियाचे अस्तित्वच मानीत नाही, म्हणून उत्तर कोरिया न म्हणता केवळ कोरिया असे म्हटले जाते. दक्षिण कोरियाचा उल्लेख सेऊलची राजवट असा केला जातो. काय प्रसिद्ध करू नये याचेही हुकूम केलेले आहेत. पोलंडमध्ये कॉफीचा खप किती हे प्रसिद्ध करता येत नाही. कारण यामुळे बाहेरून आयात केलेली कॉफी पुन्हा किती प्रमाणात निर्यात होते हे समजू नये. रशियाला किती मांस पाठवले जाते हे प्रसिद्ध करण्यावरही बंदी आहे. ज्या नद्या चेकोस्लाव्हा-कियात उगम पावून पोलंडमध्ये येतात त्या कारखान्यांमुळे प्रदूषित झाल्या असतील तर त्या किती प्रमाणात प्रदूषित झाल्या याची चर्चा करता कामा नये. चेकोस्लाव्हाकियातील नद्यांचे पाणी प्रदूषित झाले असल्यास त्याची माहिती देण्यास हरकत नाही. पोलंडमध्ये दारूचा खप बराच आहे. पण यासंबंधीची आकडेवारी देण्यास मज्जाव आहे. समाजवादी देशात याप्रकारे

मद्यपानाचा अतिरेकी प्रसार झाल्याचे प्रगट करणे हेच चूक. म्हणून हा प्रसार झाला असताही त्याची वाच्यता करायची नाही. याचमुळे रोगराईने गुरांचा वा पिकांचा नाश झाल्याची माहिती उजेडात आणण्यास बंदी आहे. समाजवादी देश ही आदर्श राज्यव्यवस्था असे ते समजत असल्याने तिथे रोग पडत नाही व पडला तरी पिके वा जनावरे मरत नाहीत! परंतु पशुतज्ज्ञ व शेतीतज्ज्ञ जनावरांचे व पिकांचे रोग हटवण्यासाठी जे प्रयत्न करतात त्यांना प्रसिद्धी द्यायला हरकत नसते. अन्नविषबाधेचे बळी किंवा साथीचे रोग यांची लागण झाल्यास त्या साथीविषयी कसलीही माहिती प्रसिद्ध करण्याची मनाई आहे. समाजवादी देशात पूर, अपघात, नैसर्गिक आपत्ती यांनाही मज्जाव आहे! म्हणून अपघात झाला, पूर आला तरी त्याचे बळी किती हे कोणाला कळू न देण्याची खबरदारी वृत्तपत्रांनी घ्यायची असते.

पोलंडमध्ये हिप्पी चळवळ सुरू झाली तरी तिचा उल्लेख करता कामा नये. सैनिकांनी लांब केस ठेवण्याची मागणी काही पाश्चात्य देशात केली होती, पण त्या मागणीला पोलिश पत्रातून वाचा फुटू नये अशी व्यवस्था करण्यात आली. अमेरिकेत वॉटरगेट प्रकरण फार गाजले, पण त्यासंबंधी पोलंडमध्ये माहिती देण्यास वृत्तपत्रांना बंदी होती. वॉटरगेटच्या निमित्ताने उच्चपदस्थांच्या भ्रष्टाचाराच्या गोष्टींची चर्चा सुरू झाली तर आपल्याला ते अडचणीचे जाईल असे पोलिश सरकारला वाटत असावे.

वृत्तनियंत्रणाचा आणखी एक नियम असाच विचित्र आहे. अमेरिकन पेटंट विकत घेऊन रंगीत टी.व्ही. सेट पोलंडमध्ये तयार केले जातात, इटालियन फियाट मोटारीचे पेटंट घेऊन मोटारी बनवल्या जातात, तर क्रेन्स व ट्रॅक्टर्स यासाठी जर्मन पेटंट आहे. पण बाहेरच्या देशांचे पेटंट घेतले हे जाहीर करण्यास बंदी आहे. कारण अशा पेटंटची यादी वाचकांपुढे आली तर त्यांना वाटेल, की पोलंडमधील कारखानदारीची वाढ केवळ परकी पेटंटमुळे झाली आहे. याच कारणास्तव पोलंडच्या परराष्ट्रीय कर्जाचीही माहिती प्रसिद्ध करता येत नाही. देश कर्जबाजारी आहे असे वाटू नये हा हेतू. निरनिराळ्या समाजवादी देशांच्या चलनाबरोबर पोलिश चलनाचे विनिमयमूल्य काय हे त्या देशात जाणाऱ्या पोलिश नागरिकांना माहीत असते. पण वृत्तपत्रातून हा दर छापता येत नाही.

पोलंड हा कम्युनिस्ट राष्ट्रांच्या गटातला असा एकच देश आहे, की ज्याने अनेक बुद्धिजीवी लोकांना परदेशी जाऊन वास्तव्य करण्यास बंदी घातलेली नाही. त्यामुळे अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, प. जर्मनी इ. देशांतील विद्यापीठांत व इतरत्र काम करणारे निदान तीन हजार पोलिश बुद्धिवंत परदेशात असतील. त्यांचा उल्लेख मात्र केला जात नाही. या बुद्धिवंतांपैकी काहींच्या पुस्तकांना पारितोषिके मिळाली तरी त्यांची दखल घेण्यात येत नाही. त्यांच्या सिद्धांताबद्दलच्या चर्चेला बंदीच आहे. त्यांची नावे शास्त्रीय ग्रंथात, नियतकालिकात आली तर चालतात; पण वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन येथे त्यांना प्रवेश नाही.

सरकार लेखकांवर निरनिराळ्या प्रकारचे नियंत्रण घालते. काहींच्या ग्रंथांना सरसकट बंदी असते. काहींना आकाशवाणी व दूरदर्शन यावर मज्जाव असतो. काहींचे लेख प्रादेशिक पत्रात प्रसिद्ध केले तर चालतात, पण राजधानीतील वृत्तपत्रात त्यांना प्रसिद्धी देता येत नाही. एखादे पुस्तक बरेच लोकप्रिय झाले तरी त्याचे पुनर्मुद्रण करायचे की नाही, केल्यास किती प्रती काढायच्या, पुस्तकाचा आकार काय ठेवायचा या सर्वांचा निर्णय सरकार करते. काही वेळा पुस्तक प्रसिद्ध होते, पण त्याच्या परीक्षणावर बंदी घालण्यात येते.

एवढे करूनही भूमिगत स्वरूपाची दहा नियतकालिके पोलंडमध्ये प्रसिद्ध होतात. यासंबंधात रशियापेक्षा वेगळी स्थिती आहे. रशियातही भूमिगत नियतकालिके आहेत, पण पोलंडमधील अशा नियतकालिकांवर संपादकांचे पत्ते, लेखकांची नावे वगैरे छापण्यात येतात. बेकायदेशीर कथा, कादंबऱ्या कवितांवर लेखक व कवी आपली नावे घालतात. एवढेच नव्हे तर अनेक पोलिश लेखकांचे साहित्य पॅरिस व लंडनमधील पोलिश प्रकाशनसंस्था प्रकाशित करतात.

१३-८-७८ ⊙

भणंग माओ

माओ यांचा कौमारकाल हा फार हलाखीत गेला. त्यावेळी त्यांचे मित्र असलेले व पुढे फ्रान्समध्ये स्थायिक झालेले प्रा. सिआओ यांनी 'माओ त्से तुंग अँड आय वेअर बेगर्स' या नावाचे पुस्तक लिहिले आहे. चिनी पद्धतीच्या अतिशय नाजूक व वैशिष्ट्यपूर्ण रेखाचित्रांनी व माओ यांच्याबद्दलच्या व्यक्तिगत उल्लेखांनी हे पुस्तक उल्लेखनीय झाले आहे. सिआओ व त्यांची पत्नी फ्रान्समध्येच राहतात. हे पुस्तक प्रकाशित होण्यापूर्वी श्रीमती सिआओ मात्र वारल्या. प्रा. सिआओ हे स्वतः कवी आहेत आणि त्यांच्या पत्नी याही कवयित्री, चित्रकार होत्या. हे पुस्तक प्रा. सिआओ यांना लिहिण्यास प्रवृत्त केले ते लिन युटांग यांनी. सिआओ यांनी चिनी व फ्रेंच भाषांतून आपल्या आठवणी लिहिल्या व त्यांचा इंग्रजी अनुवाद केला त्यांच्याच पत्नीने. चीनमध्ये नव्या विचारांचा पुरस्कार करणारांपैकी सिआओ हे एक होते आणि आपल्या देशाची सामाजिक, राजकीय व आर्थिक सुधारणा करण्यासाठी स्वतःची सिद्धता व्हावी म्हणून ज्या पुढारलेल्या चिनी लोकांनी फ्रान्स वगैरे देशात शिक्षण घेण्याचे ठरवले त्यात सिआओ हे प्रमुख होते. पुढे चाऊ एन लाय त्यांना येऊन मिळाले. तारुण्यात सिआओ यांनी मार्क्सवादाचा स्वीकार केला होता. पण रशियाचे अनुकरण करावे, पक्षाची हुकूमशाही स्थापन करावी याला त्यांचा विरोध होता. चीनची परिस्थिती पाहून आपण मार्क्सवादाला मुरड घालावी ही त्यांची भूमिका. माओ यांना ती त्यावेळी मान्य नव्हती. माओ व ते यांच्यातील अनेक संभाषणे त्यांनी नमूद केली आहेत. राजकारण हा सत्तेचाच खेळ आहे, या खेळात खच्याखोट्याची तमा बाळगावी असे नव्हे, नेत्याला निर्घृणपणे वागावेच लागते, असे माओचे विचार होते व ते सिआओ यांना मान्य नव्हते. पुढे कम्युनिस्ट राजवट आली तेव्हा सिआओ यांच्या घराची नासधूस केली गेली. कागदपत्रे, चित्रे वगैरे नष्ट करण्यात आली. सांस्कृतिक क्रांतीच्या त्या दूतांना माओ यांच्याविषयी काही साहित्य त्या घरात होते याची कल्पना नसल्याने ते आगीच्या भक्ष्यस्थानी पडले!

सिआओ यांनी या पुस्तकात माओ यांच्या कौमारकालातील व्यक्तित्वावर चांगला प्रकाश टाकला आहे. माओ अंगापिंडाने फार मजबूत होते. ज्या हुनान प्रांतातून ते आले तो दरोडेखोरांसाठी कुप्रसिद्ध होता. माओ व

त्यांचे पिताजी यांचे कधीच जमले नाही. अखेरीस घराला रामराम ठोकून त्यांनी प्राथमिक शाळेत प्रवेश मिळवला. एवढ्या मोठ्या व दांडग्या मुलाला प्राथमिक शाळेत प्रवेश देता येणार नाही असे शिक्षकाने सांगितले, पण पुढे मुख्य शिक्षकांनी तो दिला. माओ यांनी लहानपणी दोन पुस्तकांची पारायणे केली होती. ती एका दरोडेखोराच्या साहसावद्दलची होती. ही पुस्तके हाच इतिहास आहे असा माओ दावा करी, पण त्याच्या शिक्षकाने तो खोडून ती पुस्तके म्हणजे कादंबऱ्या आहेत असे परोपरीने पटवण्याचा प्रयत्न केला. माओने ते न ऐकता शिक्षकाविरुद्ध मुलांना उभे करण्याचा घाट घातला व त्यात त्याला शाळा सोडून दुसरीकडे जावे लागले. सिआओ व माओ यांची गाठ पडली तेव्हा सिआओ शिक्षण संपवून शिक्षक झाले होते. एकदा त्या दोघांनी उन्हाळ्याच्या मोठ्या सुटीत भिकाऱ्याचा वेष करून लांबवर पायी प्रवास करावा व भीक मागून गुजराण करावा असे ठरवले. सिआओनी या भिक्षांदेहीच्या काळात माओ यांच्याशी अनेक विषयांवर केलेली संभाषणे नमूद केली आहेत. हे दोघे रोज आपल्या रोजनिशा लिहीत. काही ठिकाणी त्यांना अनपेक्षितपणे सहाध्यायी भेटले व त्यांनी त्या दोघांचे उत्तम स्वागत केले.

या भटकंतीत माओ व सिआओ यांना एका गावी एक खाणावळ दिसली. दोघेही आत गेले तो एक वीस वर्षांची मुलगी पुढे आली. माओ व सिआओ या दोघांनी जेव्हा आपण भिकारी आहोत असे सांगितले, तेव्हा त्या तरुणीने ते मान्य केले नाही. तुम्ही भिकारी नाही, चांगल्या घरातले आहात असे ती म्हणाली. त्यावेळी माओने तिला विचारले, 'तू हे कसे काय म्हणतेस ? आमच्या चेहऱ्यावरून सांगत आहेस काय ?' ती तरुणी म्हणाली, 'हो, मी तुमच्या चेहऱ्यावरून सांगते.' मग दोघांनी चहा घेतला आणि सिआओनी त्या मुलीला विचारले, 'तू चेहऱ्यावरून भविष्य सांगतेस की काय ?' तिने होकार दिला, तेव्हा सिआओने माओचे भविष्य सांगण्याची सूचना केली. ती म्हणाली, 'माओ हे एक दरोडेखोर तरी बनतील किंवा देशाचे पंतप्रधान वगैरे होतील. राजकारणात त्यांचा प्रभाव फार वाढेल. त्यांना काळीज नाही, ते अनेक लोकांची कत्तल सहज करतील.' इत्यादी. माओ व सिआओ यांनी या भविष्यवाणीची फारशी दखल घेतली नाही. सिआओ म्हणाले, 'माओ पंतप्रधान झाले तर तुला भविष्य वगैरे सांगण्यासाठी सल्लागार म्हणून बोलवतील.' ती म्हणाली, 'ते काही मला बोलवणार नाहीत. कारण त्यांना काळीज नसल्याने त्यांना ते पंतप्रधान होतील तेव्हा माझा विसरच पडेल.' माओ यांनी या भविष्यवेत्तीला बोलावले की नाही हे सिआओंना माहीत नाही. तिने माओ निदान सहा बायका करतील असे म्हटले होते. यापैकी चौघींबाबत भविष्य खरे झाले. एक त्यांच्या लहानपणी वडलांनी ठरवून करून दिलेली. तिला माओंनी सोडली. दुसरीला त्यांनी गोळी घालून मारले. तिसरी चँग कै शेक यांच्या सैनिकाकडून मारली गेली. चौथी आहे ती आता जिवंत आहे. ती नटी होती आणि पेकिंगहून येनानला आली व प्रदीर्घ मोहिमेत (लाँग मार्चमध्ये) सामील झाली. तिच्याही अगोदर एकीबरोबर माओ यांचे सूत जमले होते. दोघेही मिळून पेकिंगमध्ये पुस्तकाचे एक दुकान चालवीत. त्यांचे एकमेकांवर प्रेम होते. पण विचार जमत नाहीत म्हणून त्यांनी लग्न केले नाही. त्या भविष्यवेत्तीच्या दृष्टीने पाहिले तर पाच स्त्रिया माओ यांच्या जीवनात आल्या. सहावीचा पत्ता नाही !

१३-१०-७४ ⊙

माओच्या तुरुंगातील कैदी

चीनच्या सीमेवरून १३ नोव्हेंबर १९६४ रोजी एक राजबंदी हाँगकाँगला आला. राजबंदी म्हणून सुटल्यावर त्याला एक सूट सरकारने दिला होता व त्याच्या खिशात एक डॉलर होता. या राजबंद्याचे नाव पास्कलिनी. त्याचा बाप कॉर्सिकन फ्रेंच होता आणि आई चिनी. चीनमध्येच तो वाढला आणि १९४५ साली फ्रेंच नौदलात सामील झाला. नंतर त्याचे लग्न झाले तेही चिनी तरुणीशी. १९५० साली कम्युनिस्ट राजवट आली व थोड्याच वर्षांत पास्कलिनी हा राजबंदी झाला. १९६४ साली फ्रान्सने चीनला मान्यता दिली आणि म्हणून त्याची सुटका झाली. पास्कलिनी चीनमध्ये

वाढला म्हणून त्याचे चिनी नांव बाओ रुओ वॉंग असे होते. १९६४ साली तो आपली मातृभूमी वा पितृभूमी म्हणून फ्रान्सला चालला होता खरा, पण त्याने फ्रान्स कधी बघितलाच नव्हता. पॅरिसला गेल्यानंतर १९६९ साली त्याची व रूडॉल्फ चेलमिन्स्की याची गाठ पडली. चेलमिन्स्की हा लाइफचा प्रतिनिधी म्हणून पॅरिसमध्ये काम करीत असे. पास्कलिनीच्या चीनविषयीच्या कथा ऐकल्यावर त्या लिहून काढण्यास रूडॉल्फने त्याला सांगितले. पण आपल्याला नीट लिहिता येणार नाही असे त्यांचे म्हणणे पडले. म्हणून पास्कलिनीने आठवेल तसे सांगावे व रूडॉल्फने ते लिहून काढावे असे ठरले व त्या दोघांच्या सहकार्याने 'प्रिझनर ऑफ माओ' या पुस्तकाचा जन्म झाला. हे पेंग्विनने प्रसिद्ध केले आहे. पास्कलिनी हा सात वर्षे चिनी तुरुंग व मजूर छावण्या यात स्थानबद्ध होता. परंतु रूडॉल्फच्या म्हणण्याप्रमाणे त्याची स्मरणशक्ती तीव्र असल्याने त्याला तारखा, नावे वगैरे चांगली आठवतात. बंदिवासातील जीवनाची तपशीलवार माहिती त्यानी दिली आहे.

फ्रेंच नागरिक म्हणून पास्कलिनीला पकडले होते, पण त्याचबरोबर एका हिंदी डॉक्टरशी व त्याच्या कुटुंबाशी चांगली जानपहचान म्हणूनही त्याला पकडण्यात आले होते. हिंदुस्थानबरोबरचे चीनचे संबंध १९५७-५८ नंतर बिघडू लागले होते, पण म्हणून तेथील प्रत्येक हिंदी हा हेरगिरी करीत होता अशा समजुतीने चिनी सरकार पछाडण्याचे कारण नव्हते. तरीही ते तसे पछाडले होते आणि पास्कलिनीने या हिंदी कुटुंबाची माहिती द्यावी, म्हणजे त्याच्या (काल्पनिक) हेरगिरीचा वृत्तान्त कथन करावा, हा चिनी अधिकाऱ्यांचा आग्रह होता. पास्कलिनी याला बळी पडला नाही.

कडवेपणापासून दूर

सात वर्षांच्या अवधीत त्याने वेगवेगळे तुरुंग आणि मजूर छावण्या पाहिल्या. एवढा तुरुंगवास सोसूनही पास्कलिनी अतिशय कडवा झालेला दिसत नाही. उलट चिनी अधिकारी हे त्याला निष्ठावान वाटले. पास्कलिनीबरोबर एक धर्मोपदेशक तुरुंगात होता. तो रात्री प्रार्थना म्हणे. याची खबर मिळताच पास्कलिनीला माहिती विचारण्यात आली. पण म्हातारी मंडळी आपल्याशीच बडबड करतात असे सांगून त्याने वेळ मारून नेली. परमेश्वर असेल वा नसेल, पण कम्युनिस्ट हे परमेश्वराप्रमाणेच दयाळूपणे वागवतात की नाही असे एका अधिकाऱ्याने पास्कलिनीला विचारले. होकार देणे त्याला भाग होते. मजूर छावणीत चोऱ्यामाऱ्या भरपूर होत. एकदा काही कैदी आगगाडीतून जात असता गार्डासाठी राखून ठेवलेले पदार्थही त्यांनी चोरले. मजूर छावणीत भरपूर काम पडे आणि अधिकाधिक काम करून घेण्याची चढाओढ लागत असे. छावणीपर्यंतचा प्रवास अनेकदा पायी करावा लागे व त्यामुळे फार पायपीट होई. पंधरा दिवसांनी एकदा आंघोळ करायला मिळे. एका वेळेला कृत्रिम तलावात हजार कैदी उतरत. अगदी प्रथम नंबर लागला तर स्वच्छ पाणी मिळत असे, नाहीतर हजार जणांच्या स्नानानंतर कोणत्या प्रकारचे पाणी असेल याची कल्पनाच केलेली बरी.

एकदा एका कैद्याला सर्व कैद्यांच्यासमोर आणण्यात आले. त्याने कैदेतच अनैसर्गिक लैंगिक गुन्हे केले होते. चोऱ्या केल्या होत्या. म्हणून त्याला जनता न्यायालयाने फाशीची शिक्षा दिली! न्याय झटपट व त्याची अंमलबजावणीही. पण त्याचबरोबर वॉर्डरही काटेकोर वागत. एका वॉर्डरची बायको तुरुंगाच्या बागेतून काही भाजीपाला घेऊन गेली. पास्कलिनी ते पाहात होता, पण त्याने भाजीपाला किती होता त्याचे वजन वगैरे केले नाही. तथापि वॉर्डरने त्याला बोलावले आणि सरकारी मालमत्तेची अशी लूट करण्याचा कोणालाही हक्क नाही असे सांगून त्याने त्या भाजीपाल्याचे वजन करून किंमत मोजली.

एक कोटी तरी कैदेत

चीनमध्ये मजूर छावण्या नाहीत असे अनेक लेखकांनी लिहिले असले तरी ते चुकीचे आहे. याउलट दुसऱ्या काहींच्या मते दोन कोटी लोक चीनमध्ये कैदेत व मजूर छावण्यांत आहेत. पण ही दोन टोकांची व चुकीची मते झाली. चीनचे सरकार आकडेवारी देत नाही. पण राजबंद्यांचा आकडा लहान नसावा असे पास्कलिनीचे म्हणणे आहे. पाच टक्के

लोक आमच्याविरुद्ध आहेत आणि समाजवादाची उभारणी करण्यासाठी त्यांच्यावर सक्ती केली जाते असे सरकार सांगते. पास्कलिनीच्या म्हणण्याप्रमाणे दोन टक्के लोकांना अटकाव केला जातो असे मानले, तरीही एक कोटी साट लक्ष लोक मजूर छावण्यांत आहेत असे ठरते. कैद्यांत दोन प्रकार आहेत. एक गुन्हा केलेले व दुसरे चुका केलेले. चुका केलेल्यांना तीन वर्षांची शिक्षा होते आणि त्या शिक्षेचे स्वरूप 'श्रमातून शिक्षण' असे असते. या रीतीने जे छावण्यांत आहेत त्यांचा समावेश एक कोटी साट लक्ष कैद्यांत होत नाही.

रशियापेक्षा वेगळा मार्ग

पास्कलिनीचे असेही मत आहे, की चीनमधील मजूर छावण्या रशियातल्यासारख्या नाहीत. सोल्झनित्सिनसारख्यांनी रशियन राजबंद्यांच्या मजूर छावण्यांची वर्णने केली आहेत. तेथील भयंकर हालअपेष्टांची वर्णनेही शहारा आणणारी आहेत. चीनमध्ये याप्रकारे श्रमछावणीतील कैद्यांना वागवले जात नाही. भुकेले, उपाशी, संतप्त, असंतुष्ट कैदी पुरेसे काम करू शकत नाहीत हे ओळखून चीनने रशियाचा कित्ता गिरवला नाही. यामुळे या श्रमछावणीतील कैद्यांकडून कित्येक कामे चीनचे सरकार करून घेते आणि या छावण्या त्यास चांगल्याच फायदेशीर ठरल्या आहेत! अनेक कैद्यांचे श्रमातून शिक्षण होते व हा काळ संपला की पुढील आयुष्यभर ते या छावण्यांत राहून मजुरीची व इतर कामे करतात. म्हणजे छावण्यांतील वास्तव्य हे आजन्म असू शकते. खाण्यापिण्याची चंगळ नसते, पण उपासमार होत नाही. दुपारच्या जेवणासाठी चांगला पाऊण तास मोकळा मिळतो. हे रशियन छावण्यांतून कधी झाले नाही. बंदिजीवनाबाबतसुद्धा रशियापेक्षा चीनचा मार्ग उदार व वेगळा आहे. ४-९-७७ ⊙

बेल्जियन कला-इतिहासतज्ज्ञाला दिसलेला चीन

सायमन लेज हे बेल्जियन कला-इतिहासतज्ज्ञ. ते चीन व आग्नेय आशियात दहा वर्षे वास्तव्य करून होते. त्यांचे दोन प्रदीर्घ लेख न्यूयॉर्क रिव्हचू ऑफ बुक्स या पाक्षिकाने प्रसिद्ध केले आहेत. सायमन लेज हे खरे नाव नव्हे, टोपणनाव आहे. लेखक चीनमधील प्रगती नाकारीत नाही; पण त्याचबरोबर तेथील परिस्थितीची दुसरी बाजूही चितारणे त्याला आवश्यक वाटते. त्यांच्या दोन लेखांचा भावार्थ असा :

चीनमध्ये अनेक शहरे आहेत, पण फारच थोड्या ठिकाणी परकी लोकांना प्रवेश मिळतो. परदेशी पाहुण्यांना दाखवायची शहरे, ग्रामीण भाग, कारखाने ही सर्व मोजकी व ठराविक असतात. त्यांची हॉटेलेसुद्धा तीच ती असतात. तेथे सर्व प्रकारच्या सुखसोयी असतात. कलाविषयक उत्तम पुस्तके, अन्य वस्तू त्यांना तेथे मिळतात, एवढेच नव्हे, तर काही शहरांत परदेशी लोकांसाठी खास चित्रपटगृहे व नाट्यगृहे आहेत. नाट्यगृहात काही मोठे कलावंत नाटके करतात. चीनमध्ये निरनिराळ्या देशांच्या लोकावरील मैत्रीचे स्वागत करणारी पत्रके लावली जातात, फलक झळकतात, पण व्यक्तिगत मैत्री चिनी राज्यकर्त्यांना अमान्य आहे. त्यामुळे तुम्ही एखाद्या व्यक्तीची माहिती विचारली तर ती मिळत नाही.

माओच्या राजवटीने जुन्या वास्तू, कलाकृती यांची खास व्यवस्था ठेवली नाही. तसेच काही अत्यंत हिडीस अशी स्मारके बांधून पेकिंगसारख्या प्राचीन शहराची शोभा घालवली आहे. लोकांचे नेते या नावाने हे स्मारक ओळखले जाते. १९५० सालापासूनच पेकिंग शहराचे सौंदर्य नष्ट करायला सुरुवात झाली. या प्रचंड शहराचे सौंदर्य वाढवण्यासाठी व एकसुरीपणा घालवण्यासाठी त्याच्या निरनिराळ्या भागांत बांधलेल्या कमानी उपयोगी पडत. पण त्याच नष्ट करण्यात आल्या. रशियाच्या अनुकरणाने ही पाडापाड करण्यात आली. त्याला विरोध करणारा चीनचा नाणावलेला आर्किटेक्ट होता. पण त्याची निर्भर्त्सना झाली, त्याला जाहीर माफी मागावी लागली आणि आपल्या आर्किटेक्ट बापाची निर्भर्त्सना करणे

त्याला भाग पडले. शहरात अनेक प्रचंड भिंती होत्या. त्या बारा वर्षांच्या अवधीत पाडण्यात आल्या. सांस्कृतिक क्रांती सुरू होण्याच्या सुमाराला शहरातील अनेक जुन्या कमानी व वेशीही पाडायला सुरुवात झाली. पेकिंग शहरातील या विध्वंसामुळे क्रांतीचे कोणते ध्येय साध्य झाले हे केवळ माओलाच माहीत. ज्यांनी पूर्वीचे पेकिंग बघितले आहे त्यांना सध्याचे पेकिंग हे जुन्या शहराचे प्रेत असल्याचे आढळेल. शांघाय यापेक्षा वेगळे आहे. शांघायमधील वस्तुसंग्रहालयात कलेचे अनेक जुने नमुने आहेत, पण चिनी नागरिकांना ते पाहायला मज्जाव आहे.

चीनमध्ये नोकरशाही घट्ट पाय रोवून आहे आणि वरिष्ठ व कनिष्ठ, विशेष हक्कदार व साधे नागरिक यांच्यातील तफावतही कायम आहे. पूर्वीच्या काळात मांस खाणारे व पैशाच्या अभावी मांस न खाऊ शकणारे असा वर्गभेद होता. आता मोटर ज्यांना वापरायला मिळते व ज्यांना मिळत नाही असा भेद करावा लागतो. चीनमध्ये खाजगी मोटरी नाहीत. तेव्हा सरकारात व पक्षात जे हुद्देदार आहेत त्यांनाच मोटर मिळते. या मोटरींचेसुद्धा वर्ग आहेत. कनिष्ठ अधिकाऱ्यांना साध्या मोटरी आहेत, तर वरिष्ठांच्या मोटरी आरामशीर, त्यांना नेहमी पडदे. मोटरीवरून दर्जा ठरवला जात असल्याने व त्याप्रमाणे बागणूक मिळत असल्याने,जे लोक सरकारी कचेरीकडे काम असल्यास पायी वा सायकलवरून जातील त्यांना फार धक्के पडतात. मोटरने गेल्यास प्रवेश सुलभ. एकदा एका पश्चिम युरोपच्या वकिलातीचा वरिष्ठ अधिकारी सायकलने चिनी सरकारच्या कचेरीकडे जाण्याच्या तयारीत होता. पण तेवढ्यात या वकिलातीतील चिनी परिचारक त्या अधिकाऱ्यास म्हणाला, की सायकलवरून तुम्ही गेलात तर कोणीही प्रवेश देणार नाही. तुम्ही मोटरनेच गेले पाहिजे. या अधिकाऱ्याला त्याचे ऐकणे भाग पडले !

आगगाडीतील वर्गभेद नष्ट केल्याचा दावा चीन करतो. पण तोही खरा नव्हे. आपल्याकडे ज्याप्रमाणे तिसऱ्या वर्गाच्या डब्याला दुसरा वर्ग म्हणण्यात येऊ लागल्याने फरक झाला नाही, त्याचप्रमाणे चिनी आगगाडीतील मूळ वर्गही बदलले नाहीत. त्यांची नावे बदलली. तिसरा वर्ग हा केवळ बाकावर बसण्यासाठी आहे, दुसऱ्या वर्गात टणक बाकावर झोपावयास मिळते, तर पहिल्या वर्गात आरामात झोपता येते. त्यांचे भाडेही वेगवेगळे आहे. लष्करातील वर्गभेद चीनने नष्ट केल्याचा दावाही खरा नव्हे. अधिकारीवर्गाच्या जाकिटाला चार खिसे असतात व साध्या सैनिकाला दोन खिशांचे जाकीट घालावे लागते. या दोन खिशावाल्याला आरामशीर झोपून जाता येण्याची व्यवस्था असलेल्या डब्याचे तिकिटही मिळत नाही. प्रत्येक क्षेत्रात वर्गभेद आहेत आणि पगाराच्या प्रमाणातही मोठी तफावत आहे. पण केवळ पगारातच तफावत नाही, तर वरिष्ठ सरकारी व पक्षीय अधिकारी यांना अनेक सोयी उपलब्ध असतात. त्यांना स्वस्त दराचा, चांगल्या प्रतीचा व भरपूर प्रमाणात माल मिळतो. साध्या नागरिकांना हे मिळत नाही.

वशिलेबाजीचे काय ? तीही भरपूर आहे. स्वतः माओनेच आपल्या नातेवाईकांच्या बाबतीत वशिलेबाजी केली. त्याची बायको चिआंग चिंग ही काय लायकीची बाई आहे ? पण माओमुळे तिला एवढे स्थान मिळाले. आता माओ नाही, तेव्हा ती मागे रेटली गेली. माओची पुतणी परकी भाषा विद्यालयात शिकली, लगेच परराष्ट्र खात्यात लागली आणि राज्यशिष्टाचार (प्रोटोकोल) विभागाची प्रमुख झाली. एवढेच नव्हे, तर दुय्यम मंत्री म्हणूनही तिची नेमणूक केली गेली. केवळ तीस वर्षांच्या, अनुभव नसलेल्या या तरुणीला या बढत्या कशा मिळाल्या ? माओच्या नात्यामुळे. माओचा पुतण्याही तीस वर्षांच्या आत लिआओनिंग प्रांताच्या क्रांतिकारी समितीचा उपाध्यक्ष बनला आणि नंतर त्या प्रांताच्या कम्युनिस्ट पक्षाचा चिटणीस झाला. चिआंग चिंगची अगोदरच्या नवऱ्यापासूनची मुलगी अर्शीच हुद्देदार आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

चिनी नोकरशाहीत गुणावर बढती मिळते काय ? नाही. ती ज्येष्ठताक्रमाने मिळते. काही तरुण मध्यंतरी बढती मिळवू शकले, पण सांस्कृतिक क्रांतीने त्यांचे उच्चाटन केले. फारसा उत्साह न दाखवता काम केले की बढती मिळते हा नोकरशाहीचा जगभरचा नियम चीनमध्येही लागू आहे.

३१-७-७७ ⊙

चीनचे एक डोळस दर्शन

चीनसंबंधीच्या साहित्याचा महापूर ओसरलेला नाही. यात चिकित्सक पद्धतीने होणारे लिखाण थोडे असते. गाल्ब्रेथ यांच्यासारख्या विद्वानाने आठ दिवस चीनमध्ये वास्तव्य करून एक पुस्तक लिहिले आहे, पण त्यात बऱ्याच चुका आहेत. माओच्या नेतृत्वाखाली चीनने प्रगती केली, वेगळा मार्ग पत्करला. पण काही लेखकलेखिकांनी दाखवल्याप्रमाणे तेथे अगदी स्वर्ग अवतरला व विकासाचा हमखास यशस्वी होणारा मार्ग राज्यकर्त्यांना सापडला, असे म्हणता येणार नाही. या संदर्भात श्री. लटवाक यांचा कॉमेन्ट्री या प्रतिष्ठित अमेरिकन मासिकात प्रसिद्ध झालेला लेख उल्लेखनीय ठरेल.

एडवर्ड लटवाक हे वॉशिंग्टन सेंटर ऑफ फॉरेन पॉलिसी रिसर्च या संस्थेचे साहाय्यक संचालक आहेत. ए डिक्शनरी ऑफ मॉडर्न वॉर, इस्रायली आर्मी, कू देता असे त्यांचे ग्रंथ आहेत. अमेरिकेचे माजी संरक्षणमंत्री श्लेशिंगर यांच्यासह ते गेल्या वर्षी चीनला गेले होते. श्लेशिंगर हे रशियाबाबत कडक धोरण स्वीकारावे असे मानणारे असल्याने चीनने त्यांचे स्वागत मोठ्या प्रमाणावर केले आणि म्हणून तिबेटमध्ये परदेशी लोकांना जाण्याची संधी फारशी मिळत नाही तीही श्लेशिंगर यांना मिळाली. त्यांच्याबरोबर लटवाक यांनाही तिबेट, सिक्यिांग वगैरे भाग पाहाता आला. हे सर्वच पर्यटन लटकाव यांनी डोळसपणे केले आणि आपले निरीक्षण लेखरूपाने प्रसिद्ध केले.

दैन्य

लटवाक यांच्याबरोबर चिनी भाषेत प्रावीण्य मिळविलेला सहकारी होता. पण त्याच्याशीही चिनी अधिकारी एखाददुसऱ्या औपचारिक वाक्यांखेरीज विशेष बोलत नसत. त्यामुळे लोकांशी संपर्क आला, असे म्हणता येणार नाही, पण लटवाक यांना माओच्या निधनाने मोकळेपणाने हिंडण्याची संधी मिळाली. त्यामुळे त्यांना पेकिंगचे वेगळेच दर्शन झाले. माओच्या निधनानंतर तीन दिवस लटवाक यांच्याबरोबर त्यांचा मार्गदर्शक नव्हता. तेव्हा लटवाक व चिनी जाणणारा त्यांचा मित्र यथेच्छ फिरले. पेकिंगमध्ये मध्यवर्ती भागातले रस्ते सोडले, तर बाकीचे अनेक रस्ते अगदी मातीचे आहेत. बरेच कच्चे आहेत. लहान लहान झोपड्यांतून माणसे दिवस-रात्र काम करतात, लहान लहान उद्योग चालवतात. तेथील आरोग्यव्यवस्था, स्वच्छता याविषयी न बोललेले बरे. वीज व आधुनिक यंत्रसामग्री यांच्या अभावामुळे अंगमेहनत फार करावी लागते. कामाची ठिकाणे ही अशी आणि राहाण्याचीही तशीच. एकेका खोलीत आठ-आठ, दहा-दहा लोक राहातात. दोन कुटुंबेसुद्धा एकाच ठिकाणी राहातात. अनेक घरांतून वीज नाही. जेथे आहे तेथे तीस वॉटचे दिवे लावले होते. यावरून कितपत उजेड पडत असेल याची कल्पना येईल. सरकारने नवी घरे बांधली आहेत, पण तेथेही दिव्यांची व्यवस्था अशीच व तीन खोल्यांच्या घरात तीन कुटुंबे हे प्रमाण.

चीनमधील समानतेचा गौरव फार होतो. पण एकीकडे ही दैन्यावस्था, तर मोठमोठ्या अधिकाऱ्यांची निवासस्थाने सुसज्ज आहेत. लटवाक यांच्याबरोबर मार्गदर्शक वा दुभाषे म्हणून काम करणाऱ्या चिनी मध्यम पातळीवरील अधिकाऱ्यांनी त्यांना स्वतःच्या घरी कधी बोलावले नाही. पण राजनैतिक अधिकाऱ्यांच्या निवासस्थानांतून या घरांचे दर्शन होई. ती साधी होती. पण तीन खोल्यांचे एक निवासस्थान. या दुय्यम अधिकाऱ्यांच्या स्वतंत्र निवासस्थानापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांना अधिक ऐसपैस जागा मिळते व ती सुसज्ज असते. म्हणजे निवासस्थानांच्या बाबतीत कसलीही समानता नाही. कपड्यांच्या बाबतीत सारखेपणा वरवरचा दिसतो. म्हणजे माओ पद्धतीचा पेहराव सर्वजण करतात, पण

सामान्य चिनी सुती कपडा वापरतो; तर पुढे दर्जानुसार कापड उंची होत असते. अगदी वरिष्ठ अधिकारी उत्कृष्ट कापड वापरतात. पेकिंगमधील स्त्रिया एकाच धरतीचा पेहराव करीत असल्या, तरी शांघायमधील स्त्रियांच्या पोषाखात विविधता व रंगीबेरंगीपणा आहे.

गाल्ब्रेथ यांनी चीनची बरीच प्रशंसा केली आहे. पण लटवाक म्हणतात, पेकिंगमधील भाजीच्या दुकानाच्या समोरच्या रांगा त्यांना दिसल्या नाहीत. जेम्स रेस्टन हे न्यूयॉर्क टाइम्सचे नावाजलेले पत्रकार. पेकिंगमधील एका हॉस्पिटलची त्यांनी भरमसाट स्तुती केली होती. पण तेथील साधनसामग्री अतिशय सामान्य होती व काही मापनयंत्रे अत्यंत चुकीची आकडेवारी देत होती, हे रेस्टन यांना दिसले नाही. अनेक अमेरिकन सेनेटर्स व पत्रकार यांना मोटमोठे कॉंक्रिटचे टोकळे भरलेली गाडी जनावरांऐवजी स्त्रीपुरुष ओढत असतात हेही दिसले नाही व यामागे केवळ कष्ट आणि दैन्य आहे याची त्यांनी जाणीव ठेवली नाही.

नियोजन हे नासाडी कमी करणे व कार्यक्षमता वाढवणे यासाठी असते; पण विकासाची हनुमानउडी मारण्यास चीन निघाला, तेव्हा खर्च, गरज व शक्यता यांचा विचार न करता अनेक योजना हाती घेतल्या गेल्या. लटवाक यांनी एक जलविद्युत् केंद्र पाहिले. त्यालाच लागून औष्णिक केंद्र होते. वस्तुतः जलविद्युत केंद्र उभारताना पाणी वर्षभर मिळेल की नाही, हे पाहावयास हवे. ते न पाहाताच केंद्र उभारले गेले. परिणामतः पाण्याअभावी हे केंद्र वर्षातून काही काळ बंद ठेवावे लागते. जेव्हा ते चालू नसते, तेव्हा कोळशाचा उपयोग करून औष्णिक केंद्र चालवण्यात येते व चालू असते तेव्हा औष्णिक केंद्र बंद असते. साधनसामग्रीचा केवढा अपव्यय होतो, याची यावरून कल्पना येईल. खेड्यापाड्यांतून चिनी अंगमेहनत करतात, उत्पादनवाढीसाठी खूप मेहनत करतात, पण हे दृश्य सार्वजनिक मालकीच्या कारखान्यात दिसते असे नव्हे.

बराकीकरण

हुकुमशाहीत वैचारिक नियंत्रण सर्वंकष असते, तसे ते चीनमध्ये आहे. याचे दोन नमुने लटवाक यांनी नमूद केले आहेत. लटवाक तिबेटमध्ये गेले, तेव्हा तेथे तिबेटी भाषेऐवजी चिनी भाषेचे वर्चस्व त्यांना आढळले. ल्हासामधील पुस्तकांच्या दुकानात एकही तिबेटी पुस्तक वा हस्तलिखित नव्हते. जुने बौद्ध ग्रंथ तिबेटी लोकांना वाचण्याची संधी नाही, कारण ते शिल्लकच ठेवलेले नाहीत. इंग्रज व फ्रेंच यांनी साम्राज्ये चालवली, पण स्थानिक भाषा व संस्कृती यांचा विनाश केला नाही. येथे बरोबर उलट प्रकार चालू आहे.

वैचारिक नियंत्रणाचा आणखी एक नमुना रंगाच्या कारखानदाराकडून समजला. सरकारी धोरणापेक्षा वेगळे धोरण पुरस्कारणाऱ्यांना चित्रे काढण्यासाठी आपण रंग विकत नाही, असे कारखानदाराने सांगितले. लटवाक यांनी त्याला विचारले, की एखाद्या चित्रकाराला पक्ष्यांची, निसर्गाची चित्रे रंगवायची असली, तरी तुम्ही त्याची मते पाहून रंग विकणार काय? त्याने होकारार्थी उत्तर दिले. प्रतिगाम्यांना पक्ष्यांची चित्रे काढण्यासाठीसुद्धा रंग मिळत नाहीत. चीनचा आदर्श हा असा आहे. ५–६–७७ ⊙

व्हिएतनाममधील लोकजीवन

उत्तर व दक्षिण हे दोन्ही व्हिएतनाम आता कम्युनिस्ट अंमलाखाली आहेत. तेथील लोकजीवन कसे आहे? आंद्रे गेलिना या फ्रेंच धर्मगुरूने न्यूयॉर्क रिव्हच्यू ऑफ बुक्स या पाक्षिकाच्या १७ मार्चच्या अंकात यावर प्रकाश टाकला आहे. गेलिना हे चिनी भाषेचे तज्ज्ञ असून, १९४८ पासून ते सायगावमध्ये राहात होते आणि तेथील अलेक्झांडर ऑफ ऱ्होडस् सेंटर या शिक्षणसंस्थेत ते शिक्षकाचे काम करीत. व्हिएतनाममध्ये कम्युनिस्ट सत्ता आल्यावरही ते पंधरा महिने तेथेच होते आणि आता नुकतेच फ्रान्सला परतले आहेत. त्यांचा हा लेख चक्षुर्वै सत्यं असा आहे.

दक्षिणेत कम्युनिस्ट सत्ता स्थापन झाली तेव्हा प्रारंभी भीतीचे वातावरण पसरले. नंतर लोक काही प्रमाणात बाहेर वावरू लागले. पण पुढे भांडवलदारी संस्कृतीचे सर्व अवशेष नष्ट करून लोकजीवन शुद्ध करण्याची मोहीम सुरू झाली. या मोहिमेचा एक भाग म्हणून गेलिना यांच्या शिक्षणसंस्थेतील जवळजवळ ८० हजार ग्रंथ जाळले गेले. सरकारने एक आदेश काढून दोनएक हजार रुपयांपर्यंतचे चलन प्रत्येकाला बँकेतील आपल्या खात्यातून काढता येईल असे सांगितले. यामुळे अनेकांनी आत्महत्या केली. शेकडो लोक सर्व मालमत्ता हरवून बसले. काही कुटुंबांनी सामुदायिक आत्महत्या केली. अन्नाचा प्रचंड तुटवडा पडल्याने अनेकजण उपासमारीने मेले. कित्येक अगदी अस्थिपंजर होऊन गेले. गेलिना यांचेसुद्धा तीस पौंडांनी वजन घटले. व्हिएतनामी हे मासे खाणारे. पण बोटीतून लोक देशत्याग करतील या भीतीने समुद्रात मच्छिमारी बोटी नेण्यास बंदी घातली गेली. यामुळे माशांचा तुटवडा प्रचंड प्रमाणावर पडला. दोन पौंड मटण विकत घ्यायचे तर महिन्याचा अर्धा पगार खर्च होतो. अर्थात पूर्वाश्रमीचे श्रीमंत यातूनही मार्ग काढीत. सैनिकांच्या साहाय्याने काळ्या बाजारात ते आपल्याजवळील काही वस्तू विकून पैसे कमावीत. साठेबाजी करणे हा गुन्हा आहे. मधूनमधून यासाठी काहीजणांना फाशी दिले जाते. पण याही बाबतीत अकार्यक्षमता असल्याने साठेबाजी चालूच आहे. कम्युनिस्ट राजवट आली की वेश्याव्यवसाय बंद केला जातो. सायगावमध्येही तो बंद करण्याचा आदेश सुटला. पण अद्यापही हा व्यवसाय तेथे चालतो असे गेलिना यांचे म्हणणे आहे. या वेश्यांना आता सैनिकांचा आश्रय मिळतो. तसेच काळाबाजार चांगला तेजीत आहे.

गेलिना यांचे म्हणणे असे, की साधारणतः सैनिक इतके वाईट नाहीत. पण अनेकदा ते नागरिकांना छळत असतात. लष्करी राजवट असल्याने त्यांना विचारणारे कोणी नाही. मग कोणाच्याही घरात शिरावे व तेथे असलेली सायकल, रेडिओ वगैरे वस्तूंची पावती विचारावी. पावत्या सर्वांपाशी असतातच असे नाही. मग अशा वस्तू जप्त केल्या जातात. रस्त्यातून हे सैनिक पिस्तुले वगैरे घेऊन फिरतात आणि त्यांचा हुकूम ऐकला नाही, की गोळी घालतात. गेलिना यांचा अनुभव असा, की एकदा एक फेरीविक्या रस्त्यातून चटकन बाजूला झाला नाही त्याबरोबर सैनिकाने त्याला गोळी घालून ठार मारले. नव्या राजवटीने इतके नियम केले आहेत, की प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या तरी गुन्ह्याखाली पकडता येतो. याउलट काही सैनिक स्वतःच कधी ट्रान्समीटर तर कधी अन्य काही वस्तू एखाद्याच्या घरात नेऊन ठेवतात आणि त्याला पकडतात. अनेक नियमांमुळे व परवानगी मिळवण्यासाठी अनेक अधिकाऱ्यांकडे खेटे घालावे लागल्यामुळे नागरिक जिकिरीला येतात. एकाचा वृद्ध पिता मरण पावला. त्याच्या अत्यसंस्काराची परवानगी मिळण्यास आठ दिवस लागले. मेलेला माणूस हा तुझा बाप कशावरून? घरात माणसे किती? लग्न झाले आहे काय? सर्टिफिकेट आहे काय? असे एक ना अनेक प्रश्न!

नव्या कम्युनिस्ट संस्कृतीचा प्रसार करायचा तर नवे शिक्षण हवे.

त्यासाठी जाहीररीत्या अनेकांची निर्भर्त्सना होते. त्यांना आपल्या चुकांची कबुली द्यावी लागते. त्यावर सर्वांचेच भागते असे नव्हे, तर अनेकांना अटक होते आणि श्रमछावणीत त्यांची रवानगी होते. अटक झाल्याचे संबंधितांच्या नातेवाईकांनाही कळत नाही. सकाळी कामावर गेलेला माणूस रात्री परत आला नाही, की समजावे त्याला अटक झाली. या सर्वांना सुधारण्यासाठी श्रमछावणीत धाडण्यात येते. अशांची संख्या किमान चार ते पाच लाख आहे. नव्या राजवटीने शहरे मोकळी करून ग्रामीण भागात नव्या वसाहती निर्माण केल्या. तेथे अनेकांना हलवण्यात आले. ज्यांना शारीरिक श्रमाची सवय नाही त्यांनाही ते करावे लागत असल्याने त्यांना फार कष्ट होतात. या नव्या वसाहतीतील उत्पादन वाढले असेही नव्हे. साधनसामग्रीचा तुटवडा, लोकांचा अनुत्साह आणि त्यांना न झेपणारे श्रम यामुळे खर्चाच्या मानाने उत्पादन होत नाही. लोकांना ताबेदार करण्याचा आणखी एक व्याप योजण्यात आला आहे, तो म्हणजे शिरगणतीच्या निमित्ताने जमवलेली माहिती. शिरगणतीच्या तक्त्यात गेल्या सात वर्षांत तुम्ही कोठे होता, काय करीत होता, कोणाबरोबर व कोठे काम केले, मित्र कोण, ओळखीचे पाच लोक कोण, तुमचे राजकीय विचार कोणते होते इत्यादी माहिती द्यावी लागली. ही सारी माहिती जाहीररीत्या वाचण्याची सक्ती आहे. या माहितीच्या आधारे कोणालाही छळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. या स्थितीत विरोध कोण करणार? म्हणून निवडणूक झाली तेव्हा सत्ताधारी कम्युनिस्ट पक्षास ९९ टक्के मते पडली! व्हिएतनामच्या सरकारवर चीनपेक्षा रशियाचा प्रभाव अधिक असून रशियन तज्ज्ञ अनेक क्षेत्रांत आहेत.

या रीतीने बराकीकरण झालेल्या व्हिएतनामी लोकांना एकच दिलासा वाटतो व तो म्हणजे धर्माचा. प्रार्थनामंदिरातून आजकाल फार गर्दी होते. मार्क्स मागे लागल्यामुळे येशू वा बुद्ध जवळचा वाटतो!

२७-३-१९७७ ⊙

एका कोरियन कवीच्या बंदिवासाची कहाणी

दक्षिण कोरियातील कवी किम चि हा याच्या बंदिवासाची कहाणी चार्ल्स डग्लस लुमिस यांनी न्यूयॉर्क रिव्हयू ऑफ बुक्स या पाक्षिकात प्रसिद्ध केली आहे. किम याला १९७५ च्या मार्चमध्ये पकडण्यात आले. त्याच्यावर आरोप म्हणजे तो कम्युनिस्ट चळवळ करतो. हा आरोप खोटा आहे. कारण किम कम्युनिस्ट नाही. तो व त्याचे सहकारी यांचा दक्षिण कोरियात लोकशाहीच्या नावाखाली झोटिंगशाही चालवणाऱ्या अध्यक्ष पार्क यांनी छळ चालवला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष कार्टर यांनी मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कार जोरदारपणे चालवला असून रशियनांना त्यांनी या बाबतीत त्रस्त केले आहे. पण दक्षिण कोरियात कसल्याही प्रकारचे लोकशाही स्वातंत्र्य नसताही केवळ उत्तर कोरियाच्या कम्युनिस्ट राजवटीला शह देण्यासाठी अमेरिका दक्षिण कोरियातील लोकशाहीच्या आवरणाखालील झोटिंगशाहीला मदत का करते असा चार्ल्स लुमिस यांचा सवाल आहे.

१ मार्च १९७५ रोजी सेऊलमधील एका चर्चमध्ये अटरा नामवंत कोरियन नागरिक जमले व त्यांनी देशात पुन्हा लोकशाही स्थापन व्हावी अशी मागणी केली. यात थुन पो सन हे दक्षिण कोरियाचे माजी अध्यक्ष होते. त्याचप्रमाणे १९७१ साली ४५ टक्के मते मिळवलेले किम दाए जंग हे विरोधी पक्षाचे नेतेही होते. या अटराजणांवर खटले होऊन कोणाला पाच, तर कोणाला दहा वर्षांची शिक्षा झाली, तर काही सुटले. १५ मार्च ७५ रोजी किम चि हा या कवीला अटक झाली. त्याच्यावरील खटला चालला तेव्हा त्याला नैतिक पाठिंबा देण्यासाठी अमेरिकेत स्थापन झालेल्या आंतरराष्ट्रीय समितीतर्फे कोणा ना कोणाला तरी धाडले गेले. खटल्याच्या सुनावणीच्या अखेरीस चार्ल्स लुमिस तेथे उपस्थित होते.

दोन कैफियती

कवी किम याला एकांतवासात ठेवण्यात आले होते आणि त्याला त्याचे नातेवाईक भेटू शकत नसत. वाचायला पुस्तके नाहीत, की लिहायचे साहित्य नाही. रात्र रात्र त्याच्या कोटडीत प्रचंड दिवा लावलेला असे. त्यामुळे झोप मिळणे मुष्कील. मध्यंतरी किमने आपण कम्युनिस्ट असल्याची कबुली दिल्याचे दक्षिण कोरियन सरकारने जाहीर केले. पण जबरदस्तीने हा कबुलीजबाब लिहून घेतल्याचे किम याने लिहून आपली कैफियत मांडणारी दोन निवेदने चोरून तुरुंगाबाहेर धाडली. त्याने हा मजकूर तोंड धुवायच्या ब्रशने लिहिला होता. त्याच्या या दोन्ही कैफियती जपानमध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत.

चार्ल्स लुमिस यांनी किमच्या खटल्याची हकीकत देताना तेथील वातावरण चित्रित केले आहे. किम याला न्यायालयात आणले गेले म्हणजेच तो तेथे जमलेल्या घोळक्यातील आपल्या बायकामुलांना, नातेवाईकांना पाहू शकतो. खटला सुरू झाला की त्याला केवळ तीन न्यायमूर्तीच पाहावे लागतात. आणि अर्थात वकील. न्यायमूर्तीच्या टेबलाच्या खाली समोरच्या बाजूला टेपरेकॉर्डर ठेवलेला असतो. मुख्य न्यायाधीश केवळ कोर्टाला सुट्टी केव्हा होईल एवढेच बोलण्यापुरते तोंड उघडतो. बाकी तो गप्प राहातो, मधून मधून टेपरेकॉर्डर चालू आहे की नाही हे तो वाकून पाहातो. बाकी त्याला काही बोलावेसे वाटत नाही. तो अनेकदा आढ्याकडे पाहात बसतो. काही शब्द उच्चारले गेले, की त्याच्या कपाळाला आठ्या पडतात. दुसरा न्यायमूर्ती त्याच्या समोरच्या टेबलाकडेच फक्त पाहात होता व मधून मधून तो डुलक्याही घेई. तिसरा काही वेळा आपल्यापुढील कागदपत्र वाचण्याचा प्रयत्न करी. असे हे न्यायाधीश, न्यायाधीश वाटत नव्हते आणि न्यायालय हे न्यायालय वाटत नव्हते. सरकारला खरी माहिती कळायची ती टेपरेकॉर्डरच्या द्वारे.

किमच्या विरुद्धचा मुख्य पुरावा म्हणजे त्याच्या रोजनिशा. त्यातील मजकूर हा देशद्रोहात्मक आहे असे सरकारचे म्हणणे. लोकशाही स्वातंत्र्याची मागणी किम करतो, पण तो कम्युनिस्ट राजवट आणू पाहातो असा सरकारचा आरोप. दक्षिण कोरियाच्या दाराशीच असलेल्या उत्तर कोरियातील कम्युनिस्ट राजवटीमुळे कम्युनिस्टविरोधी कायदा केला गेला आहे आणि कम्युनिस्ट म्हणून कोणालाही अडकवून ठेवण्याचे सरकारी धोरण आहे. किम अटकेत पडला तो या कायद्याखालीच. तो कम्युनिस्ट आहे काय ? बिलकूल नाही. तो लोकशाही स्वातंत्र्य मागतो, समानतेची मागणी करतो. आपल्या भूमिकेच्या समर्थनार्थ तो नेहमी बायबलचा आधार घेतो. सुईच्या नेढ्यातून उंट जाईल, पण स्वर्गात श्रीमंत जाऊ शकणार नाही, ही बायबलमधील वचने तो विषमतेविरुद्ध वापरीत असतो.

लोकशाहीवर श्रद्धा

खटल्याच्या अखेरीला किम याने आपली जबानी दिली. त्यात तो स्पष्टपणे म्हणतो, की आपला समाज हा एक आजारी समाज आहे. त्याला बौद्धिक आजार झाला आहे. किम पिळवणूक करणाऱ्या भांडवलशाहीच्या विरुद्ध आहे; पण त्याचबरोबर कम्युनिस्ट राजवट त्याला मान्य नाही. त्याची अशी श्रद्धा आहे की दक्षिण कोरियात लोकशाही राजवट आली, की उत्तर कोरियातील कम्युनिस्ट राजवटही कोसळेल. दक्षिण कोरियात लोकशाही येईल याची त्याला खात्री वाटते.

आपल्याकडे आणीबाणीच्या काळात नियंत्रण होते त्याहीपेक्षा कडक नियंत्रण दक्षिण कोरियात आहे. त्यामुळे कोण व किती जण तुरुंगात आहेत याची लोकांना कल्पना नाही. सेऊलमध्ये रोज रात्री कर्फ्यू असतो, त्यामुळे मध्यरात्री रस्त्यात फिरता येत नाही आणि रात्री जर कोणी रस्त्यातून पळताना दिसले तर गोळी घालून मारण्याचा पोलिसांना अधिकार आहे. फक्त नाताळची आदली रात्र व वर्ष अखेरची रात्र याला अपवाद. मग त्या वेळेला अनेकजण सेऊलच्या तुरुंगाजवळील टेकडीवर जमतात आणि नाताळची गीते म्हणतात. लुमिस यांनी हेही सर्व पाहिले. किम याला एव्हापर्यंत शिक्षा झाली होती. त्याला जन्मठेपेची शिक्षा होऊन शिवाय सात वर्षांची शिक्षा देण्यात आली. याचा अर्थ जन्मभर त्याला बंदिवासातच राहावे लागेल. अर्थात पार्कची राजवट संपुष्टात आली आणि लोकशाही आली, तर हा कवी मुक्त होईल. भारतात जे झाले तेच दक्षिण कोरियात व्हावे अशीच कोणीही इच्छा करील. २४-४-७७ ◉

हिटलरची ब्रिटिश प्रेयसी

दुसरे युद्ध संपून तीस वर्षे झाली तरी हिटलर हा अद्यापही संशोधनाचा विषय आहे. आता डेव्हिड प्रिस-जोन्स यांनी हिटलरच्या ब्रिटिश प्रेयसीच्या जीवनावर प्रकाश टाकणारे पुस्तक 'युनिटी मिटफोर्ड – ए क्वेस्ट' लिहिले असून ते पुढील महिन्यात प्रसिद्ध होईल. या पुस्तकाच्या काही नमुना प्रती काही लोकांना दाखवत्या गेल्या आणि त्यातून बरेच वादळ उठले असून या वादळाचे पडसाद टेलिग्राफ, संडे टाइम्स इत्यादी ब्रिटिश पत्रांतून उमटत आहेत. डेव्हिड प्रिस-जोन्स याना सहा वर्षांपूर्वीच या विषयाची ओढ लागली आणि गेली तीन वर्षे ते अनेक प्रकारे संशोधन करीत होते. यात त्यांनी युनिटी मिटफोर्डच्या ओळखीच्या दोनशेपेक्षा अधिक लोकांच्या गाठीभेटी घेतल्या आणि माहिती संकलित केली. या युनिटी मिटफोर्डची कथा काय आहे ?

युनिटी मिटफोर्ड ही लॉर्ड रेड्सडेल यांची मुलगी. १९१४ च्या ऑगस्टमधील तिचा जन्म. लॉर्ड रेड्सडेल यांना सहा मुली व एक मुलगा. यांपैकी युनिटी ही चवथी. नॅन्सी व जेसिका या दोघी मुली लेखिका होत्या. ही

सातही अपत्ये आपल्या आईबापांपेक्षा गुणी होती आणि त्यामुळे त्यांच्या ती आवाक्याबाहेरची होती. ब्रिटनमधील फासिस्ट चळवळीचे जनक सर ओस्वाल्ड मोस्ले यांची पत्नी डायना ही युनिटीची बहीण. दुसरी बहीण डेबोरा ही डचेस ऑफ डिव्हॉनशायर आहे, आणि तिसरी जेसिका ही अमेरिकेत वास्तव्य करून असते. लेडी मोस्ले आणि डचेस ऑफ डिव्हॉनशायर यांचा प्रिस-जोन्स यांच्या पुस्तकाने भडका उडाला असून त्यांनी प्रिस-जोन्स यांना आवश्यक ती कागदपत्रेही बघू दिली नाहीत. जेसिका मात्र हे पुस्तक प्रसिद्ध व्हावयास हवे होते असे म्हणते; पण न्यू स्टेट्स्मनने तिला अभिप्राय लिहिण्यास सांगितला असता तिने नकार दिला.

युनिटीचे शिक्षण प्रायः घरीच झाले. कोणतेही काम ती चोख करीत असे अशी माहिती तिच्या एका दायीने दिली आहे. त्या काळात उमराव कुटुंबातील तरुण मुलींना ज्या प्रकारचे नृत्य, गायन वगैरेंचे शिक्षण मिळे तसे ते युनिटीला मिळाले होते. ती काहीशी खट्याळ होती, पण तिचा सहवास अनेकांना आवडत असे. ओस्वाल्ड मोस्ले यांनी १९३२ मध्ये ब्रिटिश युनियन ऑफ फासिस्ट्स् ही संघटना सुरू केली आणि थोड्याच महिन्यांत युनिटी तीत सामील झाली. जर्मनीत नाझींनी सत्ता हस्तगत केल्यावर १९३३ मध्ये प्रथमच न्यूरेन्बर्ग येथे एक मोठा मेळावा भरला होता आणि ब्रिटिश फासिस्ट संघटनेतर्फे गेलेल्या प्रतिनिधिमंडळात युनिटी होती. त्यावेळी युनिटी १९ वर्षांची होती आणि या मेळाव्यात तिने हिटलरला पाहिले तेव्हा ती पूर्णतः भारावून गेली. त्यानंतर म्युनिक येथे चालवल्या जाणाऱ्या विद्यालयात राहण्याची परवानगी युनिटीने मिळवली. तेथे इतरही काही प्रतिष्ठित ब्रिटिश घराण्यातील मुली होत्या. काय वाटेल ते करून हिटलरची ओळख करून घेण्याचा निर्धार युनिटीने केला होता.

त्या काळात हिटलरचे वास्तव्य म्युनिकला असे आणि म्युनिकच्या शॉपिंग भागातील ऑस्टेरिया नावाच्या हॉटेलात तो वारंवार येत असे. हिटलरच्या येण्याच्या सुमाराला युनिटीही त्या हॉटेलात जाई आणि त्याच्या शेजारच्या टेबलाशी बसे. हिटलरचे आपल्याकडे केव्हा लक्ष जाते याविषयी ती उत्कंठेने वाट पाहात असे. अखेरीस ९ फेब्रुवारी १९३५ रोजी तिच्या भाग्याचा दिवस उजाडला. हिटलरने तिला बोलावणे धाडले आणि

तिच्याबरोबर दुपारचे जेवण घेतले. युनिटीच्या आनंदाला काही पारावार राहिला नाही. त्यानंतर ती हिटलरबरोबर वारंवार हॉटेलात, राजकीय मेळाव्यात दिसू लागली. गोबेल्स कुटुंबाबरोबर ती अनेकदा राहात असे आणि अनेक नाझी नेत्यांशी तिची चांगली जानपेहचान होती. स्ट्रेचर हा नाझी नेता हिटलरच्या जवळचा. त्याच्या वृत्तपत्रात युनिटीने ज्यूंच्या विरुद्ध लेख लिहिला होता कारण ती कट्टर ज्यूद्वेष्टी बनली होती. हिटलरची गाडी बऱ्याच वेळा युनिटीच्या घरी तिला घेण्यासाठी पाठवली जाई. एकदा तर त्याने तिला आपल्या खास आगगाडीतूनच एका मेळाव्यासाठी नेले. रेल्वे मार्गावर लोक रात्रभर उभे राहून हेल हिटलरच्या घोषणा करीत आणि युनिटी त्यामुळे अगदी भारावून जात असे. तथापि हिटलरचे जे डोंगरावरील निवासस्थान होते, तेथे त्याची प्रेयसी इव्हा ब्रॉन हिलाच केवळ स्थान असल्याने हिटलरने युनिटीला तेथे कधीच नेले नाही. पण त्याच भागातील हॉटेलात मात्र तो तिला घेऊन जाई. युनिटीचा एक विशेष असा, की ती हिटलरलाही आपली मते स्पष्टपणे ऐकवीत असे. अशा स्वतंत्र वृत्तीच्या स्त्रिया हिटलरला आवडत नसत. युनिटी मात्र याला अपवाद होती.

पुढे पोलंडवर हिटलरने आक्रमण केले आणि इंग्लंडने युद्ध पुकारले. त्यामुळे युनिटीला जर्मनीत राहणेच अशक्य होते. ती म्युनिकच्या एका भव्य उद्यानात गेली आणि तिने आपल्या डोक्यावर गोळी झाडून घेतली. ती गोळी बरीच खोल गेली, पण युनिटी त्यामुळे मेली नाही. हिटलरने तिला स्वीडनमार्गे इंग्लंडला रवाना केले. मोस्ले यांना नंतर स्थानबद्ध केले गेले, पण युनिटीला तुरुंगाची हवा खावी लागली नाही. ४८ साली ती मरण पावली. हिटलरची ती प्रेयसी होती खरी, पण हे प्रेम रोमॅन्टिक होते. त्यांचे शारीरिक संबंध असल्याचा पुरावा नाही असे प्रिस-जोन्स यांचे म्हणणे आहे. हिटलरचा स्थापत्यविशारद व युद्धकालातील शस्त्रास्त्रनिर्मितीचा प्रमुख आल्बर्ट स्पिअर याचेही असेच म्हणणे आहे. १०-१०-७६ ◉

हिटलरविरोधी प्रतिकाराचा इतिहास

गेल्या महायुद्धात हिटलरची राजवट व त्याच्या युरोपभर धुमाकूळ घालणाऱ्या फौजा यांचा विविध प्रकारे प्रतिकार झाला होता. यासंबंधीची माहिती स्टीफन हॉस व राल्फ व्हाइट या दोघांनी संपादित करून 'रेझिस्टन्स इन युरोप' या नावाचे पुस्तक (पेलिकन) प्रसिद्ध केले आहे. हुकुमशाही व आक्रमण यांना प्रतिकार करताना किती साहस करावे लागते याची यावरून थोडी कल्पना येऊ शकते. प्रचारी वाङ्मयाचा प्रसार, भूमिगत आकाशवाणी व वृत्तपत्रे चालवणे, दोस्त फौजांना गुप्त माहिती पुरवणे, कैद्यांना पळून जाता यावे म्हणून व्यवस्था करणे, येथपासून तो घातपात, संप घडवून आणणे इत्यादी अनेक उपाय योजण्यात आले. गनिमी काव्याचा उपयोग करून अनेक ठिकाणी दोन हात केले गेले. हिटलरच्या फौजा युक्रेनमध्ये शिरल्या तेव्हा स्वतंत्र युक्रेनची स्वप्ने पाहाणारांनी रशियन सत्ता उखडली जात असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. पण युक्रेनच्या लोकांना स्वातंत्र्य मिळाले नाही. नाझी सैन्याने त्यांची दामटी वळली आणि रशियनांनीही त्याचा प्रतिकार हाणून पाडण्याची कोशीस केली.

पोलंडमध्ये यापेक्षा वेगळी परिस्थिती होती. जर्मन आक्रमण झाल्यावर पोलंडमधील अनेक गट एकत्र आले. १९४०च्या अखेरीस तर पोलंडमध्ये एक पर्यायी राज्यव्यवस्थाच जन्माला आली आणि या दुसऱ्या पोलंडचा व्यवहार सुरू झाला. त्याची स्वतःची न्यायालये होती, शाळा होत्या, पोलीस होते आणि दारूगोळ्याचे कारखानेही होते. जनरल कोमोरोस्कीच्या नेतृत्वाखाली प्रतिकारासाठी लष्करही उभे झाले होते. त्याला होम आर्मी म्हणत. या होम आर्मीखेरीज ज्यूंनी स्वतंत्रपणे प्रतिकार पथके उभी केली होती. ही पथके वॉरसाच्या 'घेटो' या ज्यू वस्तीत केंद्रित होती. ज्यूंच्या पथकाचा मोहरा रशियाकडे वळे, तर होम आर्मीची भिस्त पाश्चात्य देशांवर होती. १९४३ च्या एप्रिलमध्ये वॉरसामधील ज्यू वस्तीत उठाव झाला तेव्हा त्यात १३ हजार ज्यू मारले गेले व ५० हजार पकडण्यात आले.

रशिया आपल्याला मदत करील असे पोलिश लोकांच्या प्रतिकारपथकांना वाटले होते, पण स्टालिनने मदत दिली नाही. नाझीकडून हे प्रतिकार दल मारले जाईल हे त्याने पाहिले. यामुळे फक्त आपल्या मुठीत राहणाऱ्या कम्युनिस्ट दलांना मोकळे रान मिळेल असा त्याचा हिशोब होता.

अमानुष हत्याकांड

पोलंडमध्ये ऑसविट्झ् येथील नाझींनी स्थापन केलेली कैद्यांची छावणी कुविख्यात आहे. १९४४ च्या एप्रिलमध्ये या छावणीचा विस्तार शिगेला पोहोचला होता. तेव्हा छावणीत दीड लाख कैदी होते आणि ते केवळ पोलिश नव्हते तर तीस राष्ट्रांचे नागरिक होते. १९४२, ४३ व ४४ या तीन वर्षांत मिळून नाझींनी येथे पंचवीस लाख लोकांना गॅस चेंबरमध्ये कोंडून ठार मारले. कैद्यांना ठार मारण्यापूर्वी त्यांचे कपडे, चीजवस्तू, सोनेनाणे सर्व काढून घेतले जाई. सोने बर्लीनच्या बँकेकडे जाई, तर कपडे बॉंबवर्षावाने उध्वस्त झालेल्या जर्मनीतील गावात राहणाऱ्या जर्मन नागरिकांना वाटले जात. तथापि अनेक नाझी सैनिक कैद्यांकडील सोने लांबवीत. कैद्यांची उपासमार होत असताना नाझी मात्र यथेच्छ ताव मारीत. एका ओमेगा घड्याळावर एखादा कांदा कैद्याला मिळे, तर पाच डॉलरच्या नोटेवर पावाचा तुकडा मिळवता येई. ऑसविट्झ् छावणी ही त्यावेळी सर्वांत मोठी काळ्या बाजारासाची पेठ होती. उपासमार व कष्ट यापायी हजारो कैदी मरत.

या छावणीत प्रतिकाराची चळवळ संघटित करण्याच्या दिशेने प्रथम बॉर्सात पावले टाकली गेली. याचा मुख्य प्रणेता पिलेकी. या संघटनेने ऑसविट्झ्मध्ये गुप्त पथके उभी केली. त्यांनी नाझी अधिकाऱ्यांच्या कार्यालयात, खात्यांत काम करणाऱ्यांना वश केले. त्यांच्याकडून माहिती जमा करून ती गुप्त आकाशवाणीवरून दिली जाई. सात महिने ही आकाशवाणी चालू होती. छावणीतून जवळजवळ ४०० कैदी पळाले. १९४४ च्या ऑक्टोबरात अनेक नाझींचे खून करण्यात आले.

फ्रान्सचा पाडाव हिटलरने झटक्यात केला. फ्रान्समध्ये नाझींना प्रतिकार विशेष झाला नाही अशी समजूत आहे. पण ते खरे नाही. अनेक व्यक्ती व संघटना यांनी विविध प्रकारे प्रतिकार केला. रशियावर हिटलरने हल्ला केला नव्हता तोपर्यंत ते साम्राज्यवादी युद्ध म्हणूनच जगभरचे कम्युनिस्ट त्याचा धिक्कार करीत. फ्रेंच कम्युनिस्टांचे धोरण हेच होते. युद्ध थांबवून तह करा ही त्यांची मागणी होती. रशियावर हल्ला झाल्यावर मात्र लोकयुद्धाची घोषणा झाली आणि मग फ्रेंच कम्युनिस्टही प्रतिकार-संघटनात सामील झाले. पोलंडमधील प्रतिकारवाद्यांनी जुन्या संस्था जवळ केल्या, तर फ्रान्समध्ये नव्या संस्था उभ्या करण्यात आल्या किंवा जुन्यांची आमूलाग्र सुधारणा झाली. प्रतिकाराची चळवळ ही तेथे सुधारणावादी चळवळ ठरली.

युगोस्लाव्हियात टिटो यांच्या नेतृत्वाखाली झालेला प्रतिकार युरोपातील सर्वात मोठा प्रतिकार मानावा लागेल.

खुद्द जर्मनीतसुद्धा नाझींना प्रतिकार होत होता. या प्रतिकाराने व्यापक संघटित स्वरूप धारण केले होते असे म्हणणे कठीण जाईल, पण बरेच लोक नाझीविरोधी उठावात सहभागी होते. गेरस्टीन हा नाझी एस. एस. संघटना आतून पोखरण्यासाठी तीत सामील झाला होता. वेल्झेक ज्यूंची येथील सामुदायिक कत्तल त्याला पाहायला मिळाली होती. त्याने ही हकीकत बर्लीनमधील स्वीडीश वकिलातीच्या एका अधिकाऱ्याला सांगितली व तेथून ती ब्रिटिश पत्रात प्रसिद्ध झाली. बुश या नावाचा अधिकारी आपल्या गणवेशात स्फोटक पदार्थ ठेवणार होता आणि संचलनाच्या वेळी हिटलर आला की त्याच्या अंगावर उडी मारण्याचा बेत ठरला होता. उडी मारताच स्फोटक पदार्थ उडून दोघेही जळून गेले असते. परंतु तत्पूर्वी एका हवाई हल्ल्यात बुश जखमी झाल्याने हा बेत पार पडू शकला नाही. जर्मन ख्रिस्ती धर्मपीठ हे हिटलरी राजवटीबाबत द्विधाचित्त होते. काही धर्मगुरू हिटलरशी सहकार्य करीत, तर काही तटस्थ राहात. विरोध करणारेही थोडे होते. लष्कराचा मंत्री ब्लोम्बर्ग व लष्करी सरसेनापती फ्रिश या दोघांचा हिटलरच्या अनेक धोरणांना विरोध होता. त्यांच्यावर खोटे आरोप ठेवून त्यांना बडतर्फ करण्यात आले. वास्तविक ब्लोम्बर्ग यानेच लष्करात व्यक्तिशः हिटलरशी एकनिष्ठ राहण्याची शपथ प्रत्येक सैनिकाला व अधिकाऱ्याला घेण्याला लावण्याचा प्रघात १९३४ मध्ये सुरू केला होता.

परमेश्वराच्या नावाने ही शपथ घ्यावी लागे आणि तिचे फार मोठे मानसिक दडपण लष्करावर होते. लष्करात हिटलरविरोधी उठाव संघटित होऊ न शकण्याचे हेही एक कारण होते.

हिटलरने अनेक देश काबीज केले. तेथे नाझींची हुकुमत सुरू करतानाच स्थानिक परिस्थितीचे पुरेपूर निरीक्षण करून धोरण ठरवण्यात येई. १९४३-४४ पर्यंत नाझींना फारसा प्रतिकार या निरनिराळ्या देशांत झाला नाही. याचे कारण म्हणजे स्थानिक परिस्थितीचे विश्लेषण करून त्याप्रमाणे नाझी प्रशासक धोरण स्वीकारीत हे होते. तथापि प्रतिकार पुढे वाढत गेला आणि अनेकांनी प्रचंड धोका पत्करून आक्रमणाचा बीमोड करण्यासाठी जीवापाड श्रम केले. ३०-१०-७७ ◉

हिटलरचा स्थापत्यशास्त्रज्ञ

आल्बर्ट स्पिअर हा हिटलरचा स्थापत्यविशारद आणि युद्धकाळात जर्मनीच्या संरक्षणउत्पादनाचा प्रमुख. त्याला युद्धानंतर वीस वर्षांची शिक्षा झाली व तो नुकताच सुटला. बर्लिनजवळील स्पँडॉ येथील कारावासात असताना त्याने टॉयलेट पेपरवर आठवणी लिहिल्या आणि त्या चोरून बाहेर आल्या. त्या ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाल्या असून, ब्रिटिश व अमेरिकन पत्रांतून त्यावर मार्मिक अभिप्राय आले आहेत. हिटलर व त्याचा परिवार, जर्मनीतील युद्धकालीन वातावरण आणि राजकारण यावर या आठवणींनी उत्तम प्रकाश टाकल्याचा अभिप्राय ए. जे. पी. टेलर यांच्यासारख्या आधुनिक इतिहासाच्या तज्ज्ञाने दिला आहे. स्पिअरच्या आठवणींचा संग्रह अद्याप येथे आलेला नाही. पण हे सर्व अभिप्राय वाचल्यावर त्यांच्याच आत्मचरित्राची आठवण येणे साहजिक आहे. हे आत्मचरित्र येथे मिळू शकते. या आत्मचरित्रावरून हिटलरचा उदय कसा झाला, जर्मनीत राजकीय व सामाजिक परिस्थिती काय होती, समाजातील विविध गट कशा रीतीने हिटलरच्या उदयास कारणीभूत झाले, नाझी पक्षातील पुढाऱ्यांचे एकमेकांशी कसे संबंध होते आणि युद्धकालीन परिस्थिती कशी होती, याची चांगली कल्पना येते. स्पिअरच्या या आत्मचरित्राचा विशेष हा, की त्यात आत्मस्तुती नाही आणि एखाद्या शास्त्रज्ञाने आपल्यापुढील समस्येची चिकित्सा करावी तशा बुद्धीने त्याने हे सर्व लिखाण केले आहे.

हिटलरच्या भाषणांना हजारोंनी जमणाऱ्या दरिद्री व वैफल्यग्रस्त

लोकांत स्पिअर नव्हता. त्याचा बाप हाही स्थापत्यशास्त्रज्ञ होता. एका सुखवस्तू कुटुंबातील स्पिअरने बर्लिन विद्यापीठात वयाच्या २७ व्या वर्षी हिटलरचे भाषण ऐकले. त्या विद्यापीठात स्थापत्य शाखेत त्याला चांगली नोकरी होती. या भाषणाने तो भारावून गेला आणि भाषणात व्यक्त झालेल्या विचारांची छाननी करण्याचे भान न राहाता तो हिटलरच्या नॅशनल सोशॅलिस्ट पक्षात सामील झाला. हिटलरला प्रचंड, प्रभावशाली अशा स्थापत्याचे विलक्षण आकर्षण होते आणि जर्मनीचा व त्याहीपेक्षा हिटलरच्या मर्जीतील नामवंत स्थापत्यशास्त्रज्ञ टूरुट हा मरण पावल्यावर तर स्पिअर हाच हिटलरचा पहिल्या क्रमांकाचा स्थापत्यशास्त्रज्ञ झाला. त्याने हिटलरचे निवासस्थान भव्य व आकर्षक पद्धतीने बांधून दिले. बर्लिनमधील अनेक सार्वजनिक इमारती या त्याच्याच आराखड्याप्रमाणे तयार झाल्या. न्यूरेन्बर्गच्या झेपलिन मैदानावर नाझी पक्षाचा वार्षिक मेळावा भरे. हजारो लोक जमत. त्या वेळेला लोक अंधारात राहतील, पण त्यांच्या हातांतील झेंड्यांवर प्रकाश पडेल आणि व्यासपीठाच्या मागच्या जर्मन गरुडावर व हिटलर बोलू लागेल तेव्हा त्याच्यावर, प्रकाशाचा प्रचंड झोत पडून एखादा ताराच सजीव झाल्यासारखा वाटेल अशी स्पिअरने मांडणी केली. त्याने लोक आणि हिटलर अगदी भारावून गेले आणि स्पिअर हा हिटलरचा विश्वासू सहकारी झाला. स्थापत्यशास्त्रज्ञ म्हणून आपण कोणत्या इमारती कशा बांधल्या, याचे तपशिलवार वर्णन स्पिअरने दिले आहे.

हिटलरच्या परिवारात सामील झाल्यावर स्पिअरला हिटलरची व त्याच्या इतर सहकाऱ्यांची अगदी जवळून ओळख झाली. आपल्या विश्रांतीच्या काळात हिटलर आपल्या अनेक सहकाऱ्यांना अधिकाधिक तुच्छतेने वागवीत असल्याचे स्पिअरने पाहिले. अर्थात या सहकाऱ्यांवर बाहेर मात्र कोणी टीका करण्यास धजावत नसे. हिटलरला बुद्धिमान, स्वतंत्र व्यक्तित्व असलेल्या स्त्रियांचा सहवास बिलकूल आवडत नसे. तो एकदा म्हणाला,'अत्यंत बुद्धिमान अशा पुरुषाने मूर्ख वा सामान्य बाईशीच लग्न करावे. माझ्या कामात एखाद्या बाईने ढवळाढवळ केली, तर काय होईल, याची कल्पना करा. म्हणून मला विश्रांतीच्या काळात मनःशांती देईल अशीच स्त्री हवी.' आपण स्त्रियांच्या आकर्षणाचे विषय आहोत, याची हिटलरला जाणीव होती, पण त्या आपल्यावर व्यक्ती म्हणून प्रेम करतात, की आपल्या वैभवावर, अधिकारावर, याबद्दल त्याला संदेह वाटत असे. हिटलर ज्याप्रमाणे गोबेल्स, गोअरिंग, हिमलर, बोरमन यांची अनेकदा निर्भर्त्सना करीत असे, त्याचप्रमाणे ही मंडळीही एकमेकांना पाण्यात पाहात. गोबेल्सला परराष्ट्रमंत्री व्हायचे होते आणि म्हणून तो रिबेन्ट्रॉपविरुद्ध हिटलरचे मन कलुषित करण्याचा प्रयत्न करी. गोअरिंग हा मादक पदार्थांचे सेवन मोठ्या प्रमाणावर करीत असे. नाझी पक्षासाठी उद्योगपतींकडून पैसा जमा होई, त्याचाही हिशेब नीट ठेवला जात नव्हता. या पैशातून साठ लाख मार्क गोअरिंगला देण्यात आले होते. मादक पदार्थांच्या सेवनाचा परिणाम एका बैठकीत दिसून आला. पोलादाचे उत्पादन वाढवण्याचा विचार करण्याकरिता घेतलेल्या बैठकीत गोअरिंगने दोन तास भाषण केले व अखेरीस टेबलावर डोके ठेवून तो झोपी गेला! म्हणजे अत्यंत ध्येयासक्त, चारित्र्यवान असे सहकारी हिटलरने जमवले होते असे नव्हे.

हिटलरचा विश्वास संपादन केलेल्या स्पिअरवर शस्त्रास्त्रांच्या उत्पादनाची जबाबदारी टाकण्यात आली. त्याने अनेक सुधारणा केल्या व उत्पादन वाढवले. पण विशिष्ट मर्यादेनंतर जर्मनीच्या समाजातच बदल करावा लागेल, अशी उपाययोजना करणे भाग होते. हुकूमशाहीत कार्यक्षमता वाढते व लोकशाही ही कार्यक्षमतेला बाधक आहे, अशी समजूत आहे. पण स्पिअरने युद्धासाठी साधनसामग्री व मनुष्यबळ यांचा जास्तीत जास्त वापर करण्याबाबत जर्मनीची इंग्लंड, अमेरिका यांच्याशी जी तुलना केली आहे ती उद्बोधक असून, त्यावरून हुकूमशाही व कार्यक्षमता यांचे समीकरण आहे, असे म्हणता येणार नाही.

स्पिअर म्हणतो, की जर्मन नेते आपल्या लोकांकडून ज्या त्यागाची अपेक्षा करीत होते, तो स्वतः करण्याची मात्र त्यांची तयारी नव्हती. लोकांना अधिक सवलती दिल्या, की त्यांचे धैर्य टिकेल, अशी नाझी नेत्यांची समजूत होती. चर्चिल यांनी लोकांना आपण केवळ रक्त, घाम व अश्रू यांचेच आश्वासन देऊ शकतो, असे स्पष्टपणे म्हटले होते. हिटलर मात्र

'विजय निश्चितच आहे' अशी हमी देत होता. स्पिअर, मिल्च इत्यादींनी एक निवेदन हिटलरला दिले होते आणि देशातील सर्व साधनसामग्री संघटित करून शक्य तितक्या लवकर युद्ध समाप्त होईल हे पाहिले पाहिजे, असा इशारा दिला होता. १९४१ सालापर्यंत युद्ध थोडा काळ चालेल आणि शांततेचा काळ येईल, मग पुन्हा युद्ध होईल, अशा समजुतीनेच जर्मनीची अर्थव्यवस्था उभारली गेली होती. पण युद्ध लांबले.

साधनसामग्री संघटित करण्यासाठी अनावश्यक असे बांधकाम बंद करावे, अशी स्पिअरने सूचना केली. प्रथम ती मान्य झाली. पण प्रत्येक मंत्रालय आपापला अपवाद करू लागले. हिटलरनेही स्वतःसाठी प्रासादतुल्य निवासस्थान बांधले. हिटलरने आपल्या प्रेयसीसाठी असाच बंगला उभारला. याचे कारणच हे, की नऊ वर्षांच्या सत्तेनंतर हिटलरची राजवट भ्रष्ट बनली होती आणि पुढाऱ्यांना आपला ऐषआराम कमी करावासे वाटत नव्हते. हिटलर स्वतःच्या रक्षणाला अतिशय महत्त्व देत होता म्हणून बाकीचे अधिकारी तेच करीत होते. यासाठी प्रचंड खर्च होत होता. अनेक कारखान्यांतून मनुष्यबळ कमी पडत होते म्हणून इमारतींचे बांधकाम थांबवून मजूर या कारखान्यांत धाडावे, ही सूचना हिटलरने तत्त्वतः मंजूर केली. पण प्रत्यक्षात तसे झाले नाही. जे कामगार या रीतीने बांधकामावरून मुक्त झाले, त्यांना गाव वा विभाग सोडून जाण्यास बंदी होती. हा नोकरशाहीचा महिमा. नोकरशाही, नियम यांच्या काचामध्ये सारा समाज, अर्थसंघटना सापडली होती आणि लवचिकपणा राहिला नव्हता. इंग्लंड, अमेरिकेने स्त्रियांना कारखान्यांतून भरती केले. जर्मनीत हे झाले नाही. कारखान्यांत काम केल्यास स्त्रियांना शारीरिक व मानसिक ताण सहन करावा लागेल व त्यांची नीती बिघडून जर्मन श्रेष्ठत्व टिकणार नाही, अशी हिटलरपासून सर्वांची समजूत होती. नियमांचा काच व हिटलरचे तऱ्हेवाईक हुकूम यामुळे सेनाधिकाऱ्यांना स्वतंत्र निर्णय घेणे कठीण होऊन बसले. मोडलेले टँक दुरुस्त करून वापरणे हे सोपे व कमी खर्चाचे, पण हिटलरला ते मान्य नव्हते. नवीन टँकच वापरावे, हा त्याचा आग्रह. म्हणून युद्ध वाढत गेले, त्या प्रमाणात टँक कमी पडले. हिटलर व त्याचा परिवार यांनी आपल्या घरचा नोकरवर्गसुद्धा कमी केला नाही. याउलट स्थिती इंग्लंडमध्ये होती, असे स्पिअर म्हणतो. या स्थितीत हिटलरचा पराभव झाला.

हिटलरच्या या हुकूमशाही राजवटीचे स्पिअरने अगदी कठोर विश्लेषण केले आहे. हिटलरच्या जवळ वावरल्याने त्याला या राजवटीची चांगलीच ओळख होती. त्याने या हुकूमशाहीचे जे वैशिष्ट्य वर्णन केले आहे, तेही नमूद केले पाहिजे. त्याच्या म्हणण्याचा भावार्थ असा : हिटलरने हे दाखवून दिले, की आधुनिक हुकूमशाहीत सर्व थरांवर अत्यंत कर्तबगार व बुद्धिमान लोकांची गरज असते, असे नव्हे. आधुनिक यंत्रणा, आकाशवाणी, दळवळणाची साधने यांमुळे सर्व निर्णय एकाच ठिकाणी केंद्रित होतात आणि खालच्या पातळीवर निर्णय घेण्याची गरज उरत नाही. पूर्वीच्या हुकूमशाहीत असे होत नव्हते. आधुनिक साधनसामग्री, तंत्रज्ञान यांमुळे मात्र हिटलरला एकतंत्री राजवट आणणे व चालवणे शक्य झाले. या राजवटीची कल्पना स्पिअरसारख्या बुद्धिवान गृहस्थालाही आली. वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, सत्तापिपासा, राजकीय भोळेपणा, देशाच्या श्रेष्ठत्वाच्या मुलखावेगळ्या कल्पना अशा निरनिराळ्या कारणास्तव निरनिराळ्या क्षेत्रांतील लोक हिटलरला येऊन मिळाले. हिटलरच मार्ग दाखवील, असा विश्वास समाजातील अनेक थरांतील व्यक्तींना वाटत होता. त्यांना या हुकुमशाही राजवटीचे परिणाम काय होतील, याची कल्पना आली नाही. माक्याव्हेलीने हुकुमशाही व क्षयरोग यांची तुलना केली होती. क्षयाचे निदान प्रारंभी करता येत नाही, पण त्याच वेळी तो बरा करणे शक्य असते; उलट अखेरच्या अवस्थेत क्षय ओळखणे सोपे, पण बरा करणे कठीण. स्पिअर व जर्मन जनता यांना हाच अनुभव आला, असे प्रस्तावनाकार डेव्हिडसन यांनी म्हटले आहे.

२५-४-७६ ⊙

ॲलिस्टर कूकची 'अमेरिका'

अमेरिकन स्वातंत्र्याचा उद्घोष होऊन पुढील वर्षी ४ जुलैला दोनशे वर्षे होतात. या निमित्ताने अनेक ग्रंथ निघत आहेत. नियतकालिकांचे खास अंक प्रसिद्ध होत आहेत, येथील अमेरिकन सांस्कृतिक केंद्राने ॲलिस्टर कूक यांनी तयार केलेले अमेरिकेवरील लघुपट प्रदर्शित करण्याचा कार्यक्रम आखला. या लघुपटाचे चित्रण, त्यासोबत ॲलिस्टर कूक यांचे भाष्य हे सर्वच अत्यंत प्रसन्न आहे. ॲलिस्टर कूक हे गेली चाळीस वर्षे अमेरिकेत वास्तव्य करून आहेत. प्रथम टाइम्सचे व नंतर गार्डियनचे वार्ताहर म्हणून ते वावरत आले. यापैकी गार्डियनमध्येच ते कित्येक वर्षे असल्याने कूक व गार्डियन हे एकमेकाशी निगडीत झाले आहेत. ॲलिस्टर कूक यांचा विशेष असा, की गेली चाळीस वर्षे दर आठवड्याला एक याप्रमाणे ते बी. बी. सी. वरून अमेरिकेची खबर देणारे वार्तापत्र वाचतात. त्यापैकी काही बी. बी. सी. तर्फे प्रसिद्ध होणाऱ्या लिसनरमध्ये समाविष्ट होत असतात आणि काही निवडक भाषणांचे दोन संग्रहही प्रसिद्ध झाले आहेत. अमेरिकेच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन ॲलिस्टर कूक आपल्या या वार्तापत्रांतून घडवीत असतात. अमेरिकन समाजाच्या भावजीवनाशी समरस होऊनही ते त्याकडे काहीशा तटस्थपणे पाहात असल्यामुळे त्यातील विनोदी, हास्यकारक भाग त्यांच्या नजरेआड होत नाही. ॲलिस्टर कूक हे अमेरिकन नागरिक झाले आहेत आणि अमेरिकन काँग्रेसपुढे भाषण करण्याचा मान ब्रिटिशांपैकी एक विन्स्टन चर्चिल यांना मिळाला होता व त्यानंतर ॲलिस्टर कूक यांना. गेली चाळीस वर्षे अव्याहतपणे कूक यांचे वैशिष्ट्यपूर्ण वार्तापत्र बी. बी. सी.च्या श्रोत्यांना ऐकायला मिळते. त्या संबंधात एकाने बी. बी. सी.वरूनच कूक यांच्या विविध वैशिष्ट्यांचा परामर्श घेतला होता. ॲलिस्टर कूक यांचा अमेरिकेशी इलेक्ट्रॉनिक प्रेमसंबंध (लव्ह अफेअर) आहे असे त्याने गमतीने वर्णन केले होते. रॉबर्ट केनडींचा खून ज्या हॉटेलात झाला तेथेच त्यावेळी ॲलिस्टर कूकही राहात होते. या प्रसंगावर त्यांनी बी. बी. सी.वर केलेले भाषण हे सर्वात प्रभावी असे मानले जाते.

अशा या ॲलिस्टर कूक यांना बी. बी. सी. चित्रवाणीने अमेरिकेसंबंधी लघुपट तयार करण्यास सांगितले होते त्यावेळी त्यांनी 'अमेरिका' हे पुस्तक

लिहिले. लघुपटाप्रमाणेच हे पुस्तकही अतिशय लोकप्रिय झाले आहे. उत्कृष्ट छपाई व सुंदर रंगीत छायाचित्रे व चित्रे हे वाह्य वैशिष्ट्य झाले; पण त्याचे अंतरंग, म्हणजे जे लिखाण, ते त्यांचे खरे वैशिष्ट्य. अतिशय प्रसन्न शैली, विषयाची पक्की समज आणि मोजकी, अर्थपूर्ण माहिती यामुळे या ग्रंथाने कोणताही वाचक प्रभावित होतो. ॲलिस्टर कूक यांच्या या सर्व लिखाणाचे अधिष्ठान सहानुभूती हे आहे आणि त्यामुळे अमेरिकन समाज, त्याचे नेते, तसेच पूर्वीचे ब्रिटिश राज्यकर्ते वगैरेंच्या अवगुणाचे दर्शन घडवताना त्यांनी संयम दाखवला आहे. सहज जाता जाता ते कोपरखळी देतात आणि कोणतीही व्यक्ती ही परिपूर्ण नसते हे दाखवतात माहिती देतानाही ती थोडक्यात पण मार्मिक असावी याची ते काळजी घेतात. ब्रिटिश जेव्हा अमेरिकनांचा स्वातंत्र्याचा उठाव मोडायला गेले, तेव्हा अमेरिकेपाशी फार मोठे सैन्य नव्हते. ब्रिटिशांची अवजड शस्त्र-सामग्री हलवणे कठीण जाई. उलट अमेरिकन काही दिवस लढाई करीत व मग आपापल्या कामालाही जात आणि पुन्हा दोन हात करायला येत. हाच अनुभव अमेरिकनांना व्हिएतनाममध्ये दोनशे वर्षांनी आला असे ॲलिस्टर कूक सांगतात. हा ग्रंथ एखाद्या कांदबरीसारखा मनोवेधक आहे पण आपल्याकडे काहीजण करतात त्याप्रमाणे कूक यांनी इतिहासाची कादंबरी केलेली नाही.

व्यक्तिचित्रे

ॲलिस्टर कूक यांनी या ग्रंथात जी व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत ती खरोखरच त्यांच्या मर्मज्ञतेची साक्ष देणारी आहेत. वॉशिंग्टन, जेफर्सन, ॲडाम्स असोत किंवा एखादी साधी, पण इतिहासाशी संबंधित व्यक्ती असो, तिच्या गुणवैशिष्ट्यासह कूक ती आपणापुढे उभी करतात. वॉशिंग्टन कसा होता ? फ्रेंचांनी व्हर्जिनियात लढाई केली तेव्हा तो अगदी तरुण होता आणि त्या लढाईत त्याला कानांजवळून जाणाऱ्या बंदुकीच्या गोळ्यांचा आवाज मोठा आकर्षक वाटत असे. पुढे तोच अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाचा सेनापती झाला. त्याने एका श्रीमंत विधवेशी लग्न केले होते आणि मालमत्तेच्या व्यवहारात त्याला बराच रस होता. अधिकार, दर्जा, हुद्दा याबाबत वॉशिंग्टन विशेष संवेदनशील होता. वर्गावर्गांत काय संबंध असावे याबद्दल त्याच्या ठाशीव कल्पना होत्या. कूक लिहितात, आपल्याला कोणी स्पर्श केलेला त्याला आवडत नसे आणि जेव्हा तो अध्यक्ष झाला तेव्हा आपल्यासमोर कोणीही वसता कामा नये, उभेच राहिले पाहिजे असा त्याने दंडक घालून दिला होता. अध्यक्षीय सूत्रे घेण्यासाठी तो मिरवणुकीने, गाजावाजा करीत आला आणि त्याने कोणाशीही हस्तांदोलन केले नाही. हा सारा बडेजाव जेफर्सनला आवडला नाही आणि एक सेनेटर तर स्पष्टच म्हणाला, ' आपण (इंग्लंडच्या) तिसऱ्या जॉर्जला रामराम केला, पण आपला पहिला जॉर्ज स्वीकारला ! ' युद्धातील त्याच्या धैर्याने व शौर्याने सर्वांनाच प्रभावित केले होते. पण त्याच्या शांतता-कालीन कारकीर्दीने मात्र अनेक टीकाकार निर्माण केले. इतके की त्याने जेव्हा अध्यक्षपद सोडले तेव्हा एका पत्राने लिहिले, ' आनंदाचा कोणता क्षण असेल तर तो हाच ! ' पण हे एकांगी मत झाले. वॉशिंग्टनच्या मृत्यूची बातमी ऐकली तेव्हा नेपोलियन नतमस्तक झाला आणि ब्रिटिशांनी इंग्लिश खाडीत २१ तोफांची सलामी दिली !

फ्रँकलीन व जेफर्सन

फ्रँकलीन हाही अमेरिकेचा नामवंत अध्यक्ष. अमेरिकन जीवनावर त्याचा मोठा प्रभाव पडलेला आहे. सतराव्या वर्षी त्याने छापखाना काढला. पण केवळ छापखान्यातच नव्हे, तर अनेक प्रकारच्या नव्या उपकरणात त्याला रस होता. त्यामुळे फ्रँकलीनचे नाव अनेक ठिकाणी संबंधित आहे. वॉशिंग्टनच्या अगदी विरुद्ध असा त्याचा स्वभाव होता. त्याला बडेजाव, भपका आवडत नसे. एकदा तो घरी आला व एक पार्सल त्याने उघडले. त्याच्या पत्नीने लंडनहून चांदीच्या सुऱ्या मागवल्या होत्या त्या या पार्सलात होत्या. त्या पाहून फ्रँकलिनने आपल्या रोजनिशीत लिहिले, ' स्त्रियांची विलासी, चैनी वृत्ती आणि अहंकार यामुळे अनेक साम्राज्ये धुळीला मिळाली आहेत.' वॉशिंग्टन व मेडिसन यांना लोकशाही, राजकीय पक्ष यांचे विशेष प्रेम नव्हते. त्यांच्याच हाती असते तर अमेरिकन घटना इतकी स्वातंत्र्यवादी झाली असती की नाही याची

शंका आहे. पण अमेरिकेची घटना तयार करणाऱ्या घटनाकारांनी दोन टोकांच्या मतांचा विचार केला आणि प्रजासत्ताक स्थापन केले. राजेशाही हवी, की प्रजासत्ताक याचा निर्णय त्यांनी करून प्रजासत्ताक निश्चित केले. ही बैठक आटोपून बाहेर येणाऱ्या फ्रँकलिनला एका वृद्धेने विचारले, 'राजेशाही की प्रजासत्ताक?' फ्रँकलिन म्हणाला, 'प्रजासत्ताक. पण तुम्ही ते टिकवले तर!'

अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार करण्यात जेफर्सनचा भाग मोठा. जेफर्सन हे आपल्या बापाचे सतरावे अपत्य. फ्रान्स, युरोपमधील वास्तव्याचा त्याच्यावर परिणाम झाला होता व तो कट्टर स्वातंत्र्यवादी होता. जेफर्सन हाही वरच्या वर्गातला, पण अगदी साधा होता. काहीसा विक्षिप्त. त्याच्या निवासस्थानात अनेक नवलाईच्या वस्तू असत आणि तो स्वतः नव्या नव्या शोधांच्या नादात असे. युरोपभर फिरताना त्याने एक टिपणवही ठेवली होती व तेथे त्याला जे त्याज्य वाटे त्याची नोंद करून अमेरिकन प्रजासत्ताकात ते नसावे हे तो नोंदवून ठेवी. पदव्या नकोत, सरदार, उमराव नकोत. सर्वसामान्य माणसाच्या निवडशक्तीवर त्याचा अतोनात विश्वास होता. पण म्हणून त्याच्याभोवती सामान्य माणसांचा गराडा पडे असे नव्हे. उलट गर्दी त्याला आवडत नसे. ही व अशी अनेक व्यक्तिचित्रे, अमेरिकेच्या दोनशे वर्षांच्या इतिहासातील महत्त्वाच्या घटना, या समाजातील स्थित्यंतरे यांचे मनोज्ञ दर्शन ॲलिस्टर कूक यांनी या ग्रंथात घडवले आहे. त्यामुळे भारी किंमत असूनही कित्येक महिने खपाच्या बाबतीत व लोकप्रियतेत पहिल्या क्रमांकाचा मान या ग्रंथाला ब्रिटनमध्ये मिळाला. ६-७-७५ ◉

वॉटरगेटची कथा

वॉटरगेटचे पर्व संपुष्टात येत असले, तरी हा सर्व इतिहास सुसंगतपणे लिहिला जायचा आहे. वॉशिंग्टन पोस्टचे दोन वार्ताहर बुडवर्ड व बर्नस्टिन यांनी वॉटरगेट प्रकरण प्रथम उजेडात आणले, त्याचा दोन वर्षे सतत पाठपुरावा केला. त्यांनी प्रारंभ केल्यावर टाइम, न्यूयॉर्क टाइम्स्, न्यूजवीक, लॉस एंजल्स टाइम्स् इत्यादींनी या वॉटरगेट प्रकरणाचे धागेदोरे उकलण्यास मोठा हातभार लावला. बुडवर्ड आणि बर्नस्टिन यांनी पत्रकार या नात्याने या प्रकरणाचा कसा शोध घेतला याची कथा 'ऑल द प्रेसिडेंट्स मेन' या पुस्तकात निवेदन केली आहे. 'हम्पटी, डम्पटी,' हे जे बालगीत आहे त्यात अखेरीस हम्पटी, डम्पटीच्या पतनानंतर ऑल द किंग्स मेन—राजाचे सहचर—त्याला वाचवू शकत नाहीत अशी ओळ आहे. त्यावरून 'ऑल द प्रेसिडेंट्स मेन' हे नाव या पुस्तकाला देण्यात आले आहे. मूळ पुस्तक अगाथा ख्रिस्ती, पेरी मेसन, जेम्स बॉन्ड इत्यादींच्या रहस्यकथेसारखे असून रहस्यकथेचा आपल्या मनावर पगडा बसून आपण जसे ओढत जातो तसे हे पुस्तक आहे. यात काही अतिशय उत्कट क्षण आहेत, कधी भीतीचे आहेत, तर कधी या वार्ताहरांना आपल्या प्रतिष्ठेला धक्का लागतो की काय अशी भीती वाटावी असेही प्रसंग आहेत. स्वतःचे जीवित धोक्यात घालून दोघेही वार्ताहर या प्रकरणाचा पाठपुरावा करतात. मुख्य तपासणी ज्या बुडवर्ड व बर्नस्टिन यांनी केली, ते एकमेकांचे प्रारंभापासून मित्र होते असे नव्हे. उलट त्यांच्यात व्यावसायिक स्पर्धा व असूया होती. बर्नस्टिन हा अधिक भावनाशील आहे, तर बुडवर्ड सावध आहे.

पण एकदा दोघांनी वॉटरगेटच्या तपासाचे काम सुरू केल्यावर मग दोघात संपूर्ण सहकार्य होते. मतभेद झाले तर मतभेदाचा मुद्दा वा वार्ता द्यावयाची नाही असा त्यांच्यात अलिखित करार होता. वुडवर्डचे भाषेवर प्रभुत्व नव्हते; पण बर्नस्टिन त्याच्या लिखाणात सुधारणा करी. या दोघांना संपादक ब्रॅडली, रोसेनफिल्ड, सिमन्स या ज्येष्ठांचा सतत पाठिंबा होता आणि सतत विचारविनिमय करूनच पोस्टमध्ये वार्ता प्रसिद्ध होत. या सर्वांचे संघटित प्रयत्न वॉटरगेटच्या तपासामागे होते. अमेरिकेच्या इतिहासातील एका अत्यंत महत्त्वाच्या या प्रकरणाचा शोध पोस्टच्या दोन वार्ताहरांनी कसा घेतला आणि सहकाऱ्यांच्या सहकार्यामुळे पोस्टने ऐतिहासिक कामगिरी कशी बजावली याची समग्र माहिती या पुस्तकाच्या रूपाने वाचताना कोणताही वाचक भारावून गेल्याखेरीज राहणार नाही. या संपादक वर्गामागे प्रकाशिका मिसेस ग्रॅहॅम यांची दांडगी इच्छाशक्ती होती. त्यांनी निक्सन सरकारचा रोष पत्करला; व्यवसायावर गंडांतर येण्याचा धोका स्वीकारला; पण माघार घेतली नाही.

कामाची पद्धत

वॉशिंग्टन पोस्टचे हे दोन प्रतिनिधी वुडवर्ड व बर्नस्टिन यांची कामाची पद्धत ही सुद्धा नमुनेदार होती. साप्ताहिक सुटी, कामाचे सहा तास, असे घड्याळाकडे बघून त्यांनी काम केले नाही. एखादा गुप्तपोलीस ज्याप्रमाणे एखाद्या प्रकरणाचा पिच्छा पुरवतो तसे ते करीत. रात्ररात्र ते मिळालेल्या माहितीचा पाठपुरावा करीत, साक्षीपुरावा जमा करीत फिरत. व्हाइट हाऊसमध्ये असलेल्या एका माहितगार पण अनामिक अशा व्यक्तीची भेट वुडवर्ड अगोदर संकेत ठरवून एका गॅरेजमध्ये घेत. एकदा तर रात्री अकरापासून पहाटे पाचसहापर्यंत त्यांची चर्चा झाली आहे. दुसऱ्या वेळी बर्नस्टिन रात्री अकरापासून सकाळी सातपर्यंत मजकूर टाइप करीत बसले होते. रात्रभर काम करून पुन्हा हे दोघे सकाळी कचेरीत हजर असत. कोणाकडून माहिती मिळेल असे समजले, की दोघेही एकत्र वा स्वतंत्रपणे कोठेही जाण्यास तयार. परंतु माहिती कोणीही सांगा, तिला दोनचार ठिकाणाहून दुजोरा मिळेपर्यंत दोघेही ती कधी आपल्या पत्रात प्रसिद्ध करीत नसत. आवेशाच्या जोराधर भलतासलता शब्द जाऊ नये म्हणून त्यांच्या कॉप्या तपासल्या जात आणि वॉशिंग्टन पोस्ट विरुद्ध निक्सन असाच संघर्ष लागल्याची भावना पोस्टच्या संपादकवर्गाची झाल्यामुळे प्रत्येकजण वॉटरगेटवर प्रकाश टाकण्यास मदत करीत असे. या वार्ताहरांच्या कामाच्या पद्धतीचा विचार करताना अमेरिकन समाज, राज्यकर्ते यांच्यावरही प्रकाश पडतो. तसे पाहिल्यास हे दोघे काही नावाजलेले वार्ताहर नव्हते. बयानेही तिशीतले. पण सरकारातील मोठमोठे अधिकारी, ॲटर्नी जनरल, सेनेटर्स यांपैकी कोणालाही ते फोन करीत आणि माहिती काढीत वा मिळालेल्या माहितीला दुजोरा मिळतो की नाही हे पाहात. अगदी डॉ. किसिंजर यांच्याशीही वुडवर्डचे फोनवरून बोलणे झाले होते. त्यांच्यातील संवाद अमेरिकन समाज किती मोकळा आहे याची कल्पना देतो. सरकारातील अनेक व्यक्ती या वॉटरगेट प्रकरणात गुंतल्या होत्या. त्यांच्याबद्दल पुराव्यानिशी माहिती मिळाली तरीही दोघेही वार्ताहर खुद्द त्या व्यक्तीला आगाऊ कल्पना देत आणि बातमी वाचून दाखवीत. इन्कार वगैरे असेल तर प्रसिद्ध करीत.

गेट फुटले !

वॉटरगेटच्या प्रकरणाचा शोध घेण्याच्या या कामात वुडवर्ड व बर्नस्टिन यांना अनेक व्यक्तींचा उपयोग झाला. त्यांपैकी काही मोजक्या शब्दांत माहिती देत, पण ती द्यावनकशी असे. 'डीपथ्रोट' या टोपणनावाने या पुस्तकात ज्या अधिकाऱ्याचा उल्लेख अनेकदा येतो त्याने फार मोलाची माहिती दिली आहे. सरकारातील काहीजण निक्सन व त्यांच्या सहकाऱ्यांच्या बदमाशीमुळे संतप्त झाले होते. इतके बदमाश, निघृण, सत्तापिपासू आणि बेशरम लोक एकाच वेळी अधिकारावर क्वचित येतात. यांपैकी काही खाण, तेल, हॉटेल, जाहिरात इत्यादी व्यवसायात यशस्वी झालेले होते. त्यांना अमेरिकेच्या राजकीय संस्था, परंपरा, स्वातंत्र्य, राजकीय नेते, कायदा, घटना यांचे काहीही सोयरसुतक नव्हते. निक्सन यांना सत्तेचा हपाप होता आणि निक्सन सत्तेवर यावेत व राहावेत या एकाच हेतूने त्यांचे सहकारी भारावलेले होते. त्यामुळे त्यांना कसलाच

विधिनिषेध नव्हता. घरफोडी, हेरगिरी, खून या मार्गांचा अवलंब ते बिनदिक्कत करीत होते. त्यांची आपापसातील भाषा हीसुद्धा असंस्कृत होती. पण या लोकांच्या बदमाशीने संतप्त झालेल्या व्यक्ती सरकारात व बाहेर होत्या. वॉशिंग्टन पोस्ट धैर्याने या प्रकरणावर प्रकाश टाकण्यास तयार झाल्यावर व त्याची चिकाटी दिसल्यावर या संतप्त व्यक्तींनी माहिती पुरवली. हे प्रकरण उजेडात आणताना दोघेही वार्ताहर कमालीची सावधगिरी बाळगीत होते. त्यांच्या मनावरील ताण किती असेल याची कल्पनाच केलेली बरी. त्यातच एक गुन्हेगार जॉन डीन यांनी या दोघांना सांगितलेल्या हकिगतीचा इन्कार केला. दोघेही हतबल झाले. पण वार्ताहरांची चूक असेल तर ती क्षुल्लक होती. तथापि पुढे तेच खरे ठरले. गप्प बसण्यासाठी त्यांना लाच देण्यापर्यंतही एका अधिकाऱ्याने तयारी अप्रत्यक्षरीत्या दर्शवली होती. पण या सर्व अग्निदिव्यातून दोघेही वार्ताहर सहीसलामत सुटले आणि निक्सन ज्या आपल्या सहकाऱ्यांना वाचवण्यासाठी खोटे बोलत होते व ज्या सहकाऱ्यांविरुद्ध माहिती प्रसिद्ध होत असल्याने ते व त्यांचे जवळचे अधिकारी पोस्टविरुद्ध रान उठवीत होते, त्याच अधिकाऱ्यांना सरकारच्या वतीने पोस्टची माफी मागावी लागली. वुडवर्ड व बर्नस्टिन यांच्या व्यावसायिक जीवनातील हा मोठा क्षण होता. पुढे पोस्ट व इतर पत्रांनी पिच्छा पुरवून सळो की पळो करून सोडले तेव्हा निक्सन यांच्या भोवतीचे बदमाश एकमेकांचे गळे दाबण्यास तयार झाले. दरोडेखोर भांडले की यापेक्षा वेगळे काय होणार? हा तट फुटताच वॉटरगेट फुटले आणि मग पुराचा लोंढाच आला. या लोंढ्यात अखेरीला निक्सन वाहून गेले. १९-९-७४ ⊙

डॉ. किसिंजर

अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री डॉ. किसिंजर हे रशिया, भारत, बांगलादेश, पाकिस्तान, इराण अशा दौऱ्यावर होते. किसिंजर यांच्याभोवती एक गूढतेचे वलय निर्माण झाले आहे व ते त्यांना आवडतेही. डॉ. किसिंजर यांचे चरित्र प्रसिद्ध झाले असून मार्विन काल्ब व बर्नार्ड काल्ब या दोघा बंधूंनी मिळून हे साधारणतः साडेपाचशे पानांचे चरित्र लिहिले आहे. या ग्रंथावर अमेरिकन पत्रांतून चर्चा होत असून त्यात काय सांगायचे टाळले आहे यावर या टीकेत भर दिला जातो, परंतु पुस्तकाच्या गुणवत्तेबद्दल शंका व्यक्त होत नाही. काल्ब बंधूंनी हा चरित्रग्रंथ लिहिताना किती मेहनत केली असेल याची कल्पना येते.

मेहनत, महत्त्वाकांक्षा

मेहनत, महत्त्वाकांक्षा, गुप्ततेची व साहसाची आवड, बुद्धिमत्ता आणि शारीरिक ताकद या डॉ. किसिंजर यांच्या गुणवैशिष्ट्यांचे दर्शन आणि स्पष्टीकरण काल्ब बंधूंनी केले आहे. हॉर्वर्डमध्ये डॉक्टरेटचा प्रबंध मान्य झाल्यावर किसिंजर डॉक्टर झाले खरे, पण त्यांना प्राध्यापकाचा दर्जा मिळाला नव्हता. हॉर्वर्डमध्ये ते राहतील की नाही, हॉर्वर्डचा केवळ उपयोगच करून घेतील काय, अशी त्यांच्याबद्दल शंका होती. डॉ. किसिंजर यांना प्रारंभीच हा फटका बसला. तथापि त्यांना 'हॉर्वर्ड इंटरनॅशनल सेमिनार' या शाखेचे प्रमुख करण्यात आले आणि त्यामुळे जगातल्या अनेक बुद्धिवंतांशी त्यांचा संबंध येऊ लागला. या परिसंवादाचा बराच बोलबाला होऊन त्यात तत्कालीन ज्वलंत प्रश्नांचा विचार होत असे. वॉशिंग्टनहून अनेक मोठमोठे अधिकारी या परिसंवादासाठी हॉर्वर्डला येत. त्यामुळेही वॉशिंग्टनच्या वरिष्ठ सरकारी वर्तुळात डॉ. किसिंजर यांची उठबस होऊ लागली. याच सुमाराला 'कौन्सिल ऑफ फॉरेन रिलेशन्स' तर्फे चालणाऱ्या 'फॉरेन अफेअर्स' या अत्यंत प्रतिष्ठित अशा त्रैमासिकाचे संपादकपद डॉ. किसिंजर यांना देण्याचे घाटत होते, पण ते जमले नाही. तथापि रशियाच्या अणुशक्तीच्या आव्हानाला कशा रीतीने तोंड द्यावे याची सांगोपांग चर्चा करून अहवाल तयार करण्याच्या प्रकल्पात प्रमुख

म्हणून डॉ. किसिंजर यांची नेमणूक झाली. त्यासाठी ते हॉर्वर्डहून न्यूयॉर्कला गेले. डॉ. किसिंजर हे या प्रकल्पात इतके गढून जात, की त्यांच्या पत्नीने उशीर झाला म्हणून फोन केल्यास ते सरळ सांगत, 'माझ्याशी आता बोलू नको.' 'ती वाट पाहात असेल, तू असा काय बोलतोस,' असे त्यांचे मित्र सांगू लागले तर ते म्हणत, 'मला याची कल्पनाच नाही.' किंबहुना वेळेचे व पत्नीचेही त्यांना भान नव्हते. या सर्व अभ्यासातून त्यांनी 'न्यूक्लिअर वेपन्स ॲन्ड फॉरेन पॉलिसी' हे पुस्तक लिहिले. सर्व अमेरिकेत आणि नंतर जगभर त्याचा अतिशय गाजावाजा झाला. डॉ. किसिंजर मात्र चेष्टेने म्हणत, की टॉयनबी यांची पुस्तके न वाचताच त्यांचा गाजावाजा झाला, तसाच आपल्या या पुस्तकाचाही झाला आहे. निक्सन हे त्यावेळी राजकीय प्रांगणात होते. त्यांनी किसिंजरना पत्र लिहून या ग्रंथाची स्तुती केली. हॉर्वर्डने किसिंजर यांना प्राध्यापकाचा दर्जा दिला. एखाद्या विषयाचा पिच्छा धरला, की किसिंजर यांना वेळेचे भान कसे नसते हे पुढेही त्यांच्या जीवनात अनेकदा दिसून आले. १९६८ साली उत्तर कोरियाने अमेरिकेचे हेरगिरी करणारे विमान पाडले. त्यासंबंधी सर्व बाजूंचा विचारविनिमय करण्यासाठी डॉ. किसिंजर यांनी संबंधित अधिकाऱ्यांची जी बैठक घेतली, ती संध्याकाळी सुरू झाली व पहाटे दोन तीनला संपली व पुन्हा सकाळी सुरू झाली ! चीनशी समझोता होण्याच्या पूर्वी डॉ. किसिंजर यांनी विविध प्रकारची माहिती जमा करवून घेतली होती. त्याची एक प्रचंड फाइल तयार झाली. किसिंजर घरी गेल्यावर रात्री बराच वेळ ती वाचीत असत. चीनबद्दल त्यांनी अनेक तज्ज्ञांशी दीर्घकाळ चर्चा केली होती. पण आपल्या धोरणातील परिवर्तनाची त्यांनी कोणालाही कल्पना येऊ दिली नाही. किसिंजर यांच्या कामाचा दिवस सकाळी सातपासून सुरू होतो. संध्याकाळी सहासातपर्यंत तो चालू असतो; नंतर पार्ट्या, समारंभ वगैरे. त्यानंतरही घरी गेल्यावर तातडीची सरकारी कामे ते उरकतात. त्यांच्या या दुर्दम्य उत्साहापुढे व कामाच्या उरकामुळे इतरांचा पाडाव लागत नाही.

गुप्ततेची आवड

डॉ. किसिंजर यांच्या गुप्ततापेमाचे व कौशल्याचे प्रत्यंतर ते दोन वर्षांपूर्वी पेकिंगला गेले तेव्हा आले असले तरी त्यापूर्वी त्यांनी याप्रकारची अनेक गुप्ततेची कामे केली, प्रवास केला. जॉन्सन अध्यक्ष असताना त्यांनी व्हिएतनामबद्दल बरेच गुप्त काम केले होते. त्यानिमित्ताने त्यांचे अनेक दौरे झाले. किसिंजर यांचे बंडी, श्लेसिंगर वगैरे डेमॉक्रटिक पक्षाशी जवळचे संबंध असलेल्या विद्वानांशी मित्रत्वाचे संबंध असले तरी ते स्वतः त्या पक्षाच्या जवळचे नव्हते. जॉन केनेडी यांच्याबद्दल त्यांना आदर होता, पण केनेडी रोमॅन्टिक आहेत असे त्यांचे मत होते. या रोमॅन्टिसिझममुळे वास्तवाचा विसर पडेल ही त्यांची भीती. उलट बॉबी केनेडीबद्दल मात्र किसिंजर यांना आशा होती. त्यांची ही अशी मते असूनही डेमॉक्रटिक पक्षाचे जॉन्सन हे अध्यक्ष असताना किसिंजर यांचा उपयोग करून घेत हे नमूद करण्यासारखे आहे.

त्यांच्या महत्वाकांक्षेला, आपले विचार प्रत्यक्षात कृतीत उतरवण्याला व गोपनीय वृत्तीला निक्सन यांच्या कारकीर्दीत ते राष्ट्रीय सुरक्षा मंडळाचे प्रमुख झाले तेव्हा वाव मिळाला. परराष्ट्रमंत्र्यापेक्षा या पदाचे अधिकार कमी, पण डॉ. किसिंजर मात्र अधिक अधिकार भोगीत. पुढे तेच परराष्ट्रमंत्री झाले. चीनशी समझोत्याचे धोरण ठरल्यावर हालचाली सुरू झाल्या व मग डॉ. किसिंजर यांची पेकिंग भेट ठरली. पण सर्व गुप्तता राखायची होती. तत्पूर्वी द गॉल, अयुबखान, रुमानियाचे चिचेस्कू यांनी पेकिंग व वॉशिंग्टनमधील संदेशवाहनाचे काम केले होते. अयुब जाऊन याह्या आले तरी तेही हे काम करीत. अखेरीला भेटीचा तपशील ठरला, तेव्हा डॉ. किसिंजर सरळ पाकिस्तानला गेलेच नाहीत. ते टोकियो, सायगाव वगैरे करीत करीत भारतात आले व तेथून रावळपिंडीला गेले. दौऱ्याच्या प्रारंभी बरेच अमेरिकन वार्ताहर त्यांच्या मागोमाग येत होते, पण पुढे रावळपिंडीला येईपर्यंत तीनजणच उरले.

रावळपिंडीला आल्यावर डॉ. किसिंजर यांना थकवा आला असून विश्रांती घेण्याचा वैद्यकीय सल्ला मिळाल्याचे जाहीर झाले. रावळपिंडीच्या अमेरिकन वकिलाला एका डॉक्टरने तपासले व तोच किसिंजर असल्याची डॉक्टरची समजूत घातली गेली. त्याने किसिंजर यांचा फोटोही पाहिला नव्हता. किसिंजर यांची विचारपूस करावयास येणाऱ्यांना याह्याखानच पिटाळून लावीत. इकडे किसिंजर याह्याखान यांचा बंगला सोडून पहाटे लष्करी विमानतळावरून पेकिंगला गेले. अमेरिकन वार्ताहरांना याची कल्पनाच नव्हती. पेकिंगला जाण्यासाठी रावळपिंडीच्या लष्करी विमानतळावर किसिंजर गेले व ते विमानात चढताना पत्रकार एफ. एच. बेग यांनी त्यांना पाहिले. ते पूर्वी पाकिस्तानी परराष्ट्र कचेरीत होते. बेग यांनी पाकिस्तानी अधिकाऱ्याला विचारले, 'ते डॉ. किसिंजर आहेत काय?' तो म्हणाला 'हो.' 'ते कोठे चालले आहेत?' 'पेकिंगला.' बेग हे लंडनच्या डेली टेलिग्राफचे वार्ताहर होते. त्यांनी लंडनला तार ठोकली. रात्रपाळीच्या उपसंपादकाने ती तीनचार वेळा वाचली व बेग लेकाचा वेडा झालेला दिसतो असे म्हणून ती टाकून दिली! सर्व जगाला धक्का देणारी बातमी गुलदस्तात राहिली. किसिंजर परत रावळपिंडीला आले, पॅरिसला गेले व मग वॉशिंग्टनला. निक्सन यांनी पत्रकार परिषद घाईघाईने घेतली तेव्हा जगाला किसिंजर यांच्या भेटीची कल्पना आली!

१०-११-७४ ⊙

प्रा. जॉन केनेथ गाल्ब्रेथ यांचा प्रसन्न ग्रंथ

प्रा. जॉन केनेथ गाल्ब्रेथ यांचे लिखाण नेहमीच प्रसन्न असते. नर्म-विनोद, उपहास, सुभाषितवजा वाक्ये इत्यादींमुळे वाचक त्यांच्या लिखाणावर खूप असतो. आता त्यांचा नवा ग्रंथ आला आहे. नाव आहे, 'द एज ऑफ अन्सर्टेन्टि'. गाल्ब्रेथ यांना बी. बी. सी. ने आर्थिक वा सामाजिक कल्पनांसंबंधी चित्रपटमालिका तयार करण्यास १९७३ साली सुचवले होते. त्याप्रमाणे एक मालिका त्यांनी तीन वर्षे खपून तयार केली आणि त्यावर आधारित असा हा ग्रंथ आता प्रसिद्ध केला आहे. या चित्रपटमालिकेला व ग्रंथाला त्यांनी 'अनिश्चिततेचे युग' हे नाव दिले; कारण त्यांच्या मते गेल्या शतकातील आर्थिक विचारात स्थैर्य होते, तर सध्याच्या जगापुढील प्रश्न सोडवताना बरीच अस्थिरता, अनिश्चितता दिसते.

प्रसन्न शैली

गेल्या शतकात भांडवलदारांना भांडवलशाहीच्या यशाबद्दल खात्री होती, समाजवाद्यांना समाजाबद्दल असेच वाटत होते, साम्राज्यवाद्यांचा बसाहतींवर विश्वास होता आणि सत्ताधारीवर्गाला आपल्याला सत्ता गाजवायची आहे याबद्दल संदेह नव्हता. आजकाल मात्र यापैकी फारच

थोडी निश्चितता शिल्लक आहे. मानवजातीपुढील प्रश्नांची गुंतागुंत व व्याप पाहता निश्चितता वाटणे कठिणच आहे. ही मालिका तयार करताना गाल्ब्रेथ यांनी अशी विभागणी केली, की प्रथम व्यक्ती व त्यांच्या कल्पना आणि सिद्धांत यांची दखल घ्यावी आणि मग या सिद्धांताचे परिणाम तपासावे. प्रथम आर्थिक विचारांचा इतिहास आणि मग आर्थिक इतिहास. हा सारा इतिहास गाल्ब्रेथ यांनी अतिशय प्रसन्न शैलीत वर्णन केला आहे. तसे पाहिले तर यात नवीन काय आहे? फारसे काही नाही. पण ज्या प्रकारे हे सर्व लिखाण केले आहे त्याचा प्रभाव पडतो. काय सांगितले यापेक्षा कसे सांगितले याला महत्त्व येते आणि या शैलीने वाचक मोहित होऊन साडेतीनशे पानांचा ग्रंथ केव्हा संपतो हे कळत नाही.

थोरांच्या विचारांचा मागोवा

गाल्ब्रेथ यांनी आर्थिक विचार प्रगट करणाऱ्या प्रमुख व्यक्तींची ओळख करून देता देतानाच आर्थिक इतिहासही वर्णन केला आहे. यात ॲडॅम स्मिथ, रिकार्डो, माल्थस, हर्बर्ट स्पेन्सर, व्हेब्लेन, मार्क्स, एंजल्स, लेनिन, किन्स यांच्या व्यक्तित्वाचा व विचारांचा मागोवा घेतला आहे. साम्राज्यवादापासून रशियन क्रांतीपर्यंत आणि आपल्या कल्याणकारी राज्यापर्यंतचा आर्थिक इतिहासही गाल्ब्रेथ हाताळतात.

फ्रान्समध्ये जेव्हा शेतीलाच प्राधान्य देण्यात येत होते आणि समाजाच्या वरच्या थरात सुधारणा होत नव्हती, तेव्हा खालच्या थरातून क्रांती झाली. इंग्लंडमध्ये याप्रकारे हिंसक उठाव झाला नाही. तेथे औद्योगिक क्रांती झाली आणि समाजात परिवर्तन घडू लागले. या औद्योगिक क्रांतीचे वैचारिक समर्थन ॲडॅम स्मिथने केले. प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या सुखासाठी धडपडते व यातून संपत्ती कमावते. राष्ट्रही यातूनच संपत्तीचे संपादन करते. ही साधना करताना श्रमविभागणीचे तत्त्व योग्य. स्मिथने हे सर्व प्रतिपादन केले. पण पुढे रिकार्डो व माल्थस यांनी जगाचे भाकित वेगळेच केले. लोकसंख्येची वाढ ज्या प्रमाणात होईल, त्या प्रमाणात धान्य वा धनाची वाढ होणार नाही, यामुळे युद्धे होतील; रोगराई वगैरेनेच लोकसंख्या घटेल, असे त्यांचे मत. रिकार्डो व माल्थसपासून अर्थशास्त्र हे दुःखदायक शास्त्र बनले असे गाल्ब्रेथ म्हणतात.

व्हिक्टोरियन स्पेन्सर

हर्बर्ट स्पेन्सर हे तत्त्वज्ञानी, समाजशास्त्रज्ञ. पण व्हिक्टोरियन काळातील आर्थिक परिस्थितीला योग्य असे विचार वा सिद्धांत त्यांनी प्रतिपादन केले आहेत. 'बळी तो कानपिळी' हा डार्विनचा सिद्धांत स्पेन्सर यांनी सामाजिक बाबतीतही लागू केला. यामुळे अर्थातच संपत्तीला संरक्षण मिळाले. एखाद्याला संपत्ती का मिळते तर तो इतरांपेक्षा अधिक लायक असतो म्हणून. हा स्पेन्सर यांचा विचार होता. व्हिक्टोरियन काळातील साम्राज्यवादाला हा विचार उपकारकच होता. ते पुढे अमेरिकेत गेले आणि तेथील वाढत्या भांडवलशाहीला त्यांच्या विचारांचा मोठा आधार मिळाला. नव्याने संपत्ती निर्माण होत होती व वाढत होती. काही लोकांच्या हाती प्रचंड पैसा येत होता. ते तो कसा खर्च करीत वा आजही श्रीमंत आपला पैसा कसा खर्च करतात, याचा अभ्यास मात्र कोणी केला नाही. गाल्ब्रेथ म्हणतात, आर्थिक अभ्यास होतात ते गरीब काय खातात, पितात, राहतात कसे यांचे. पण श्रीमंत कसे राहतात याचाही तलास घेतला, तर गरीब असे का राहतात, यावरही प्रकाश पडेल!

अमेरिकेतील तत्कालीन श्रीमंतांविषयी व्हेब्लेनने मात्र लिहिले आहे. पण त्याने उपहासाची भाषा अवलंबली आहे. लोकांच्या डोळ्यावर येईल असा उपभोग आणि आराम ही श्रीमंतीची लक्षणे कशी झाली, याचे वर्णन व्हेब्लेन यांनी केले आणि उत्पादकवर्ग आणि केवळ पैशाची साधना करणारा वर्ग यांच्यातला फरक त्यांनी दाखवून दिला. व्हेब्लेन हे वैयक्तिक जीवनात स्त्रीसहवासाचे भोक्ते होते म्हणून हॉर्वर्ड विद्यापीठात त्यांना नेमायला इतर प्राध्यापक नाखूष होते. आपल्या बायका सुरक्षित राहणार नाहीत, ही त्यांची भीती होती. पण या बायकांची आपल्याला अगोदरच ओळख असल्याचे व्हेब्लेन यांनी सांगून टाकले!

मार्क्सच्या सिद्धांताचे विश्लेषण

मार्क्सच्या विचारांचा प्रभाव हा कोणत्याही अर्थशास्त्रज्ञापेक्षा दीर्घकाळ

टिकला आणि या विचारांची दीक्षा घेतलेल्यांच्या हाती अनेक देशांत सत्ताही आली. गाल्ब्रेथ यांनी मार्क्सचे वैयक्तिक जीवन व त्याचे सिद्धांत यांची विस्ताराने चर्चा केली आहे. कम्युनिस्ट जाहीरनाम्यातील कलमे देऊन ते म्हणतात, की गेल्या शतकात ती क्रांतिकारक वाटली. पण आजच्या कल्याणकारी राज्यात ती केव्हाच अंमलात आली आहेत. मार्क्सच्या विचारांप्रमाणे क्रांती केली ती लेनिनने. गाल्ब्रेथ यांना एक वृद्ध रशियन प्राध्यापक भेटला. त्याची व लेनिनची चांगली ओळख होती. लेनिनच्या नेतृत्वाचे रहस्य काय, असे गाल्ब्रेथनी विचारले तेव्हा तो म्हणाला, 'लेनिनने हुकूम दिला, की आम्ही लगेच चालून जात होतो! तेथे प्रश्न विचारावासा वाटतच नसे.'

मार्क्सने भांडवलशाहीच्या विनाशाचे जे भाकित केले होते ते १९३० सालानंतर खरे होणार, असे वाटू लागले. प्रचंड मंदी आली आणि लाखो लोक बेकार झाले पण किन्सने यातून मार्ग दाखविला. किन्स हे ब्रिटिश. पण त्यांच्या विचारांचे कृतीत रूपांतर झाले अमेरिकेत. सार्वजनिक कामे प्रचंड प्रमाणावर काढून बेकारी व मंदीचा प्रश्न सोडवण्याचा मार्ग त्यांनी दाखवला. यातून उत्पादन वाढले, प्रचंड उद्योग व महामंडळे स्थापन झाली. पण ती सुद्धा गाल्ब्रेथ यांच्या टीकेचा विषय झाली होती व अद्यापही आहेत. २-१०-७७ ◉

दोन शतकांतील प्रमुख अमेरिकन व्यंगचित्रकारांचा सचित्र परिचय

व्यंगचित्रे ही कोणत्याही काळाचा सर्वात खरा इतिहास होय असे इमर्सनने म्हटले आहे. मोठमोठ्या लेखांचा, संपादकीयांचा जेवढा प्रभाव पडत नाही इतका प्रभाव मार्मिक व्यंगचित्रांचा पडतो. बहुतेक देशांतील वृत्तपत्रांत व्यंगचित्रांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले असून, नामवंत व्यंगचित्रकारांना अतिशय मागणी असते व त्यांना तसा मानही मिळतो. लोकशाही स्वातंत्र्य असलेल्या देशांत व्यंगचित्रकारांना वाटेल तेवढी मोकळीक असते; पण सरकारी बंधने सांभाळूनही व्यंगचित्रकार आपले उपहासाचे शस्त्र वापरताना दिसतात. हंगेरीत कम्युनिस्ट राजवट आहे. पण तेथेसुद्धा व्यंगचित्रे व उपहासकथा यांची रेलचेल असते.

अमेरिकेतील गेल्या दोन शतकांमधील तीनशे प्रमुख व्यंगचित्रकारांचा परिचय करून देणारे पुस्तक 'अनजन्टलमन्ली आर्ट' या नावाने प्रसिद्ध झाले आहे. या पुस्तकात या कालखंडातील नामवंत व्यंगचित्रकारांची गाजलेली व्यंगचित्रेही देण्यात आली आहेत. चित्रकला ही प्रतिष्ठित मानली गेलेली असली तरी व्यंगचित्रे तशी मानली गेलेली नाहीत. 'टवाळा आवडे विनोद' या धर्तीवर टवाळखोरच व्यंगचित्रकार होतात अशी समजूत आहे. त्यामुळे व्यंगचित्रांना एक असभ्य कला असे मानण्याची प्रवृत्ती आहे. पण ही विचारसरणी साफ चुकीची आहे. वास्तविक उत्कृष्ट व्यंगचित्र ही उत्कृष्ट कलाकृतीच असते. आता राजकीय वा सामाजिक व्यंगचित्रांना तात्कालिक परिस्थितीची बैठक असते हे खरे; पण त्याचे हे अविभाज्य अंग मान्य केल्यानंतर व्यंगचित्रांत रस घेता येतो आणि खरा इतिहास म्हणून त्यांचे महत्त्वही पटते.



एड वॉटसन या व्यंगचित्रकाराच्या दृष्टीतून
अध्यक्ष निक्सन यांची अखेर, हे चित्र हेराल्ड ट्रिब्यूनमध्ये प्रसिद्ध झाले आहे

ब्रिटन : स्फूर्तिस्थान

अमेरिकन व्यंगचित्रकारांना अर्थात ब्रिटिश पत्रांतील व्यंगचित्रांपासून स्फूर्ती मिळाली. तथापि बदनामीविषयक अमेरिकन कायदा हा अधिक उदार असल्यामुळे ब्रिटिश व्यंगचित्रकारांपेक्षा त्यांच्या अमेरिकन बंधूंनी बरेच स्वातंत्र्य उपभोगले. म्हणून तर एखाद्या व्यंगचित्रात दारुड्या राजकारणी लोकांचे रेखाटन आहे, तर अमेरिकेतील दारूबंदीच्या काळात चोरट्या दारूचे विक्रेते, राजकारणी, पोलीस वगैरे सर्वांची कशी एक साखळी होती याचे चित्रण करणारे व्यंगचित्रही प्रसिद्ध झाले आहे. तथापि अमेरिकन व्यंगचित्रकारांपैकी काहींनी राजकीय मोहिमा काढून भ्रष्ट राजकारणी लोकांना शासन केल्याचीही उदाहरणे आहेत.

थॉमस नास्ट हा व्यंगचित्रकार एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीला होऊन गेला. त्या काळात विल्यम ट्विड या नावाचा एक पुढारी अतिशय भ्रष्ट होता. त्याने व त्याच्या सहकाऱ्यांनी मिळून न्यूयॉर्कमधील सुमारे वीस कोटी डॉलर्स फस्त केले. नास्टने एक व्यंगचित्र काढले त्यात ट्विड व त्याचे सहकारी गोलाकार उभे आहेत आणि कोणी पैसे खाल्ले ? असे विचारून प्रत्येकजण दुसऱ्याकडे बोट दाखवीत असल्याचे चित्रित केले होते.

ट्विड या व्यंगचित्राने भडकला. तो म्हणाला, माझे मतदार लेख वाचू शकत नाहीत, पण ते व्यंगचित्र पाहू शकतात. काहीही करून नास्टची व्यंगचित्रे बंद झाली पाहिजेत. ट्विड एवढ्यावर थांबला नाही. त्याने आपला एक सहकारी नास्टकडे धाडला आणि युरोपमधील कला-कृतींचा अभ्यास करण्यासाठी त्याला एक लाख डॉलर्स देऊ केले. त्यावर नास्टने विचारले, दोन लाख मिळतील काय ? त्याला होकारार्थी उत्तर मिळाले. पण ही चेष्टा होती. नास्टने ठरविले की, आपण युरोपला जाण्याऐवजी ट्विड व त्याचे सहकारी यांना तुरुंगात धाडणे योग्य. त्याप्रमाणे त्याने व्यंगचित्रांचा मारा सुरू केला आणि ट्विड व त्याची टोळी तुरुंगात गेली !

पक्षचिन्हाचा निर्माता

याच नास्टकडे अमेरिकेतल्या रिपब्लिकन पक्षाचे चिन्ह जे हत्ती त्याचा शोध लावल्याचे श्रेय जाते. डेमॉक्रटिक पक्षाने गाढव हे चिन्ह घेतले होते. नास्टने रिपब्लिकन पक्षाला हत्ती हे चिन्ह दिले. त्यासंबंधी व्यंगचित्रही प्रसिद्ध आहे.

तसे पाहिले तर मार्क ट्वेन हासुद्धा व्यंगचित्रे काढीत असे. इंग्लंडमध्येही थॅकरे, चेस्टर्टन हे लेखक व्यंगचित्रे काढीत.

अमेरिकेत नास्टप्रमाणे गिलमन, फ्रेडरिक ऑजर, होमर डेव्हनपोर्ट व हरब्लॉक हे व्यंगचित्रकार फार गाजले. थर्बरची व्यंगचित्रकला ही वेगळ्या धर्तीची आहे.

चळवळीत अग्रभागी

प्रत्येक राजकीय चळवळीच्या वेळीही व्यंगचित्रकार आघाडीवर राहिले. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाच्या वेळी ते सक्रीय होते त्याचप्रमाणे यादवी युद्धाच्या वेळीही होते. निरनिराळ्या अध्यक्षांची कारकीर्द, मंदीचा काळ, युद्ध, व्हिएतनाम युद्धाचा काळ, वॉटरगेट व निक्सन असे कितीतरी आकर्षक विषय व्यंगचित्रकारांना मिळाले. अमेरिकेत दारूबंदी होती तेव्हा त्यांनी चांगलीच धमाल उडवली. युद्धकाळात नाझींच्या 'स्वस्तिक' चिन्हामागचे भयानक स्वरूपही व्यंगचित्रकारांनी परिणामकारक चित्रांनी उघड केले. मॅकार्थी यांनी कम्युनिस्टविरोधी मोहीम काढून भल्याभल्यांना छळले. त्याविरुद्ध हरब्लॉक याची व्यंगचित्रे फार प्रभावी ठरली.

व्यंगचित्रांचा प्रभाव लक्षात घेऊनच अध्यक्षीय व गव्हर्नरच्या निवडणुकीत त्यांचा अनेकांनी उपयोग केला. आता टेलिव्हिजनवर व्यंगचित्रांचा वापर करण्याची प्रथा सुरू झाली आहे. पण टेलिव्हिजन केंद्रे आहेत सातशे आणि व्यंगचित्रकार आहेत डझनभर. वृत्तपत्रे, नियतकालिके यांच्या छपाईच्या तंत्रात आमूलाग्र बदल झाला आहे, पण व्यंगचित्रांशिवाय मात्र त्यांचे चालत नाही.

२२-५-७७ ◉



डेमॉक्रॅटिक पक्षाने गाढवाचे चित्र पक्षचिन्ह म्हणून घेतले, तर थॉमस नास्ट या व्यंगचित्रकाराने 'गाढवावरचा शहाणा' बनून हत्तीचे चित्र रिपब्लिकन पक्षाला बहाल केले

इटालियन कम्युनिस्ट पक्षाचा एक संस्थापक

इटली, फ्रान्स, पोर्तुगाल यांमधील कम्युनिस्ट पक्ष काही वेगळा मार्ग स्वीकारू इच्छितात. प्रारंभापासूनच रशियाच्या बाहेर व चीन वगळल्यास फ्रेंच व इटालियन कम्युनिस्ट पक्ष हे सर्वांत प्रबळ पक्ष होते. रशियाच्या एकछत्री नेतृत्वाचे संपूर्ण वर्चस्व न पत्करता समाजवादाचे ध्येय गाठण्याचे केवेगळे मार्ग असू शकतात असे इटालियन कम्युनिस्ट पक्षाचा नेता आज सांगतो. पण या वेगळ्या मार्गाचे सूतोवाच तोल्यात्ती यांनी केले होते व त्याहीपूर्वी अन्टोनियो ग्रामची यांनी. त्यांनी तुरुंगातून धाडलेल्या पत्रांचा संग्रह प्रसिद्ध झाला असून एका ध्येयवादी, बुद्धिमान, संवेदनाक्षम अशा व्यक्तित्वाची ओळख या पत्रांवरून होते. ग्रामची यांचा जन्म १८९१ मधला. ते जन्मदरिद्री नव्हते, पण सुखवस्तूही नव्हते लहानपणापासून त्यांची प्रकृती अशक्त आणि पाठीला पोक आलेले. ते सहासात वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांवर आपत्ती कोसळली. निवडणुकीत हरलेल्या उमेदवाराचे ते पाठीराखे होते. याचा सूड विजयी उमेदवाराने काढून त्यांच्यावर सरकारी पैशाच्या अफरातफरीचा आरोप ठेवण्यात आला व तो सिद्ध होऊन त्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली. या काळात ग्रामची, त्यांची आई, भावंडे यांचे फार हाल झाले. शाळा सोडून सरकारी खात्यात शिपायाची नोकरी करावी लागली. त्यामुळे ग्रामची यांची प्रकृती अधिक खालावली. पुढे ते शाळेत जाऊ लागले व पुढचे शिक्षणही त्यानी घेतले पण तत्त्वज्ञान, कला, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, साहित्य इत्यादी विषयांवर अभ्यासपूर्ण व स्वतंत्र लिखाण करणाऱ्या ग्रामचींच्या विद्यार्थीदशेची दशा वर्णावी तेवढी थोडीच ठरेल. तोळामासा प्रकृती व दारिद्र्य याला न डगमगता त्यांनी अभ्यास केला. त्याहीपेक्षा ते नेहमी हसतमुख राहिले. त्यांचा सहवास सर्वांना हवाहवासा वाटे, असे त्यांच्या विद्यार्थीदशेतल्या ओळखीच्या लोकांनी म्हटले आहे. त्यांचा मित्रपरिवार त्यामुळे मोठा. त्यांची आर्थिक ओढवस्त कायम टिकून राहिली, म्हणून ऐन हिवाळ्यात सुती कपडे घालण्याची पाळी त्यांच्यावर येई. यामुळे त्यांची प्रकृती अधिकच खालावली. पुढे समाजवादी साहित्याचा अभ्यास करून ते कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक झाले. रशियातील वास्तव्यात त्यांचे एका रशियन तरुणीवर प्रेम बसले. दोघे विवाहबद्ध झाले. त्यांना दोन मुले झाली. पण संसारसुख ग्रामची यांच्या वाट्याला आले नाही. इटालीत मुसोलिनीच्या फासिस्ट पक्षाचा उदय झाला होता आणि या पक्षाला ग्रामचींनी कडवा विरोध केला. फासिझमच्या संकटाकडे त्यांनी लोकांचे लक्ष वेधवले, त्यांना सावध करण्याचा प्रयत्न केला. यातच ग्रामची यांना वीस वर्षांची शिक्षा झाली. ते नंतर जिवंत बाहेर आलेच नाहीत.

कारावासातील ग्रामची यांचे जीवन कसे होते? याचे उत्तर त्यांच्या पत्रांवरून मिळते. ही पत्रे त्यांची पत्नी, मेव्हणी तानिया, आई यांना लिहिली आहेत. ग्रामची यांच्या पत्नीचा भावनात्मक तोल गेलेला होता. त्यामुळे मेव्हणी तानिया हीच त्यांना तुरुंगात भेटत असे. आपल्या पत्नीला व तानियाला त्यांनी पत्रे लिहिली आहेत, पण तानियाला लिहिलेली अधिक पत्रे या संग्रहात आहेत. ग्रामची यांना निरनिराळ्या गावच्या तुरुंगात धाडण्यात येत असे आणि मग तानियालाही ही यात्रा घडे. पण तिने सोशिकपणे हे सर्व केले. तुरुंगातील ग्रामची यांची सर्व टिपणे तिनेच जपली आणि ग्रामची यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या शवयात्रेलाही तीच हजर होती.

कारावासात ग्रामची यांनी रशियन भाषेचा अभ्यास सुरू केला. त्यांना फ्रेंच, इंग्लिश, स्पॅनिश, जर्मन या भाषा येत आणि त्यांतले ग्रंथ ते मागवीत. तत्त्वज्ञानाच्या बाबतीत क्रोचे यांच्या विचारांचा पगडा त्यांच्यावर होता. आणि इटलीच्या बौद्धिक जीवनाचा इतिहास लिहिण्यासाठी त्यांनी असंख्य ग्रंथ पालथे घातले. कधी ते अर्थशास्त्राची पुस्तके मागवताना दिसतात तर कधी राज्यशास्त्राची. साम्यवादी तत्त्वज्ञान त्यांनी पत्करले होते आणि कालांतराने सर्व जगच साम्यवादी बनेल आणि राज्यशासन असे काही उरणारच नाही अशी त्यांची धारणा होती.

कम्युनिस्ट क्रांती विकसित होऊन अखेरीला राज्यशासन (स्टेट) विलय पावेल हा लेनिनचा एक सिद्धांत होता. हे आज नजरेच्या टप्प्यातही नाही. उलट कल्याणकारी असो वा साम्यवादी, राज्यशासनाचा पसारा अधिकच वाढला असून सर्व जीवनावर त्याचा पगडा आहे. ग्रामची यांनी हा सिद्धांत स्वीकारला आहे. काही पत्रांतून ग्रामची हेगेलच्या तत्त्वज्ञानाची चर्चा करतात, तर दुसऱ्या काही पत्रांत साहित्यविषयक मते मांडतात. कॉनन डॉइलपेक्षा चेस्टर्टन हा कलागुणात कसा वरचढ आहे हे त्यांनी मार्मिकपणे विशद केले आहे. आपल्या मुलांचे शिक्षण कसे व्हावे यांच्या सूचना करता करता नव्या पद्धतीने काही पाठसुद्धा ते तयार करून देतात. शेक्स्पियरच्या नाट्यकृती ह्या त्यांच्या पत्रांचा विषय होतात आणि सौंदर्यशास्त्रातही त्यांना रस वाटतो. एवढेच नव्हे तर भाषाशास्त्राचेसुद्धा ते अभ्यासक होते. अतिरिक्त बौद्धिक जीवन हे काही वेळा संवेदनशीलतेला विरोधी होते. पण ग्रामची यांचे तसे झालेले नाही. तत्त्वज्ञानाच्या सिद्धांतांची चर्चा करणारे ग्रामची आपल्या मुलांना गोष्टीही सांगू पाहतात. बौद्धिक जीवनाने ते भावनाशून्य बनले नाहीत. त्यामुळे त्यांचे लिखाण कोरडे वाटत नाही. तसेच मार्क्सवादी असूनही अनेक मार्क्सवाद्यांप्रमाणे जडजंबाल शब्दांचे जंजाळ ते निर्माण करीत नाहीत. बुद्धी व भावना यांचा सुरेख संगम होऊन ग्रामची यांची भाषासुद्धा अतिशय अर्थवाही व प्रसन्न बनते. शारीरिक व्याधी, कारावास, पत्नी व मुलांचा वियोग हे सर्व सोसूनही ग्रामची शेवटपर्यंत उत्साही राहतात. त्यांच्या पत्रांतील लहान लहान उल्लेख हे ते आपल्या सुहृदांना किती जपत याची कल्पना देणारे आहेत. तथापि आपल्या व्याधी व हालअपेष्टा यांच्याबद्दल ग्रामची कधी दयेची याचना करीत नाहीत. इतका संवेदनाशील असलेला हा गृहस्थ इटलीतील तत्कालीन राजकीय परिस्थितीने हैराणही झालेला नव्हता. त्याने तुरुंगात आपले नाव राहील असा ग्रंथ निर्माण करण्याचे ठरवून त्याप्रमाणे आपले कारावासातील जीवन ठरवून टाकले. किती विषयांत त्यांना रस! किती नवीन प्रकारे विचार करण्याची प्रवृत्ती! याला खरा बुद्धिमंत म्हणतात.

३१-१०-७६ ⊙

द इटालियन्स– २५ वी आवृत्ती!

युद्धोत्तर काळात इटलीत येणाऱ्या परदेशी प्रवाशांचा ओघ वाढत जाऊन आता दर वर्षी दोन कोटी प्रवासी येत असतात. इटाली हा देश आहे तरी कसा? आणि इटालियन लोक कसे आहेत? याचे अत्यंत रसाळ, ओघवत्या भाषेत वर्णन करणारे पुस्तक लुईगी बार्झिनी यांनी प्रथम १९६४ साली लिहिले. या पुस्तकाने इतिहास निर्माण केला. इटलीमध्ये येणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत जशी अखंड वाढ होत असते, त्याचप्रमाणे या पुस्तकाच्या लोकप्रियतेतही खंड पडत नाही. अथेनियम या प्रकाशन संस्थेने हे पुस्तक १९६४ सालच्या सप्टेंबरात प्रसिद्ध केले आणि जानेवारी १९७५ पर्यंतच्या त्याच्या दहा आवृत्त्या निघाल्या. एकेका महिन्यात तीन-तीन, चार-चार आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यानंतर बुक ऑफ द मन्थतर्फे १९६५ साली एक आवृत्ती निघाली आणि मग बॅन्टम पुस्तकमालेने प्रकाशन सुरू केले. त्याची १४ वी आवृत्ती आता येथे उपलब्ध झाली आहे. (कि. सव्वा डॉलर) पण ती प्रसिद्ध होऊनही दोन वर्षे झाली. दहा वर्षांत पंचवीस आवृत्त्या निघाल्याने या पुस्तकाने एक विक्रमच केला असून विक्रम व्हावा अशाच रीतीने ते लिहिले आहे.

लेखक स्वतः इटालियन आहे पण त्याने आपल्या देशबांधवांचे गुण व दोष यांचे अतिशय मार्मिक भाषेत वर्णन केले आहे. दोष-दिग्दर्शन करताना त्याने विनोदाचा आश्रय घेतला असून इटालियनांचे हे दोष वाचतानाही राग येत नाही; तर करमणूक होते. इटालियन लोकांत विभागवार वा वर्गवार थोडा फार फरक जरूर आहे, पण एकंदरीत समान गुणदोष सर्वत्र दिसून येतील. जॉर्ज मिकेश या इंग्लंडमध्ये स्थायिक झालेल्या लेखकाची अनेक देशांसंबंधींची विनोदी पुस्तके लोकप्रिय झाली आहेत. बार्झिनी यांचे हे पुस्तक मात्र एकाच देशाबद्दल असून ते अधिक सखोल

आहे. पण तसे ते असूनही अगदी रंगतदार आहे.

खाजगी आणि सार्वजनिक गोंगाट !

इटलीचे आकर्षण पूर्वापार आहे आणि त्यामुळेच लक्षावधी प्रवासी इटलीत येत असतात. असे काही भाग आहेत की जेथे स्थानिक लोकांपेक्षा बाहेरचेच अधिक आहेत. इटलीत आल्यावर लोकांना आपण बंधमुक्त झाल्याचा आनंद मिळतो. औपचारिकपणाचे सारे बंध तोडून युक्ताहारविहार यापेक्षा मुक्ताहारविहार यात लोक दंग असतात. त्यांना कोठेही शिस्तीची बंधने दिसत नाहीत आणि सर्वत्र एकप्रकारची कलात्मक बेशिस्त असते. प्रवासीच नव्हे तर स्थानिक लोकही रस्त्यावर सकाळपासून मध्यरात्र उलटून गेली तरी फिरत असतात आणि त्यामुळे सर्व देशालाच जणू सुटी मिळाली आहे की काय असे वाटते. एखाद्या प्रवासी स्थानाचे वातावरण सर्वत्र पसरलेले असते.

बाहेरून आलेल्या प्रवाशाला प्रथम जाणवणारा विशेष म्हणजे इटालियन लोकांचे हावभाव, मोठ्याने बोलण्याची पद्धत. रस्ता, गाडी, स्टेशन कोठेही लोक मोठमोठ्याने बोलत असतात. या गोंगाटात कोणी हळू बोललेले ऐकूच येत नाही. प्रेमिकांनाही प्रेमकूजन करता येत नाही तर 'माझे तुझ्यावर प्रेम आहे' हे सुद्धा वर्तमानपत्रे विकणाऱ्या पोऱ्याच्या तालासुरावर म्हणण्याचा प्रसंग येतो. अगदी पहाटेसुद्धा एखादा इटालियन दुसऱ्याच्या खिडकीखाली उभा राहून राजकारणाची वा एखाद्या लफड्याची जोरजोरात चर्चा करताना आढळेल. मोठ्याने बोलण्याच्या या सवयीस हावभावांची जोड मिळालेली असते. चेहरा व हात यांचा इतका उपयोग इतरत्र क्वचित केला जात असेल. हॉटेलमध्ये गेल्यास एकच वेटर निरनिराळ्या ग्राहकांच्या पुढे कसे हावभाव करतो व त्यामुळे इटालियन या कलेत किती वाकबगार आहेत हे कळून येते.

रंगांची उधळण सर्वत्र झालेली असते आणि त्यामुळे वातावरणात ताजेपणा असतो. इटालियन माणूस कमालीच्या भावनात्मकतेने बोलत असला, त्याचे रागलोभ, दैन्य वा श्रीमंती तो हावभावांसहित व्यक्त करीत असला तरी खरा कोण व खोटा कोण हे ओळखणे मात्र कठीण. अतिशयोक्ती हा तेथे अलंकार नाही तर बोलण्याची, वागण्याची ती नेहमीची पद्धती आहे. नाटकीपणा हा इटालियनांचा स्थायीभाव आहे. मुसोलिनी हा उत्तम नाटकी होता. हिटलर व तो यात जमीन अस्मानाचे अंतर होते. हिटलर इटालीत व मुसोलिनी जर्मनीत निर्माणच झाला नसता आणि असता तर पचला नसता. मुसोलिनी हा अतिशय भित्रा होता व त्याच्या व्यक्तित्वात कोठेही कणखरपणा नव्हता. त्याच्या या पोकळ, बोगस व्यक्तित्वाचे बाझिनी यांनी उत्तम रेखाटन केले आहे.

बनवाबनवीचे अनेक प्रकार !

इटालियन माणसाला कुटुंब हे फार प्रिय, कुटुंबियांसाठी तो काय वाटेल ते करायला तयार असतो. खोटे बोलावे, भ्रष्टाचार करावा, पण आपला कुटुंबीय वाचवावा, त्याला मदत करावी ही इटालियनाची धारणा असते. पोपसुद्धा आपले नातेवाईक गादीवर यावे याची काळजी घेत आले यामागे हेच कुटुंबप्रेम आहे. हा देश गरीब आहे व त्यामुळे कुटुंबियांनी एकमेकाला सांभाळून घेण्याचा एकप्रकारे फायदा होतो, पण त्याचबरोबर गुणवत्तेपेक्षा वशिला प्रधान ठरतो आणि एकंदर सामाजिक जीवनाची पातळी खाली जाते. दारिद्र्याचा परिणाम असा झाला आहे, की प्राध्यापक, वकील वगैरे व्यावसायिकांना धड पुस्तकेही घेता येत नाहीत. अनेकांना दोन-दोन नोकऱ्या कराव्या लागतात. विद्यालये व विद्यापीठ यात म्हणूनच भ्रष्टाचारही भरपूर आहे. पण शस्त्रक्रियाप्रवीण म्हणून जे ओळखले जातात ते खरोखरच नावाजलेले आहेत.

अनेक छोट्या-मोठ्या कोर्टात न्यायाधिशांना बसण्यासाठी खुर्ची नाही व लिहावयास टेबल नाही. त्यांच्या कोर्टात अनेक खटले उभय पक्षांचे वकील अनेकदा समझोता करूनच मिटवून टाकतात. न्यायाधीश होणे वा सरकारी अधिकारी होणे हे काही सुखाचे नाही, कारण पगार फार थोडा. पण भ्रष्टाचार भरपूर असल्याने भरपाई होते. शिवाय दाक्षिणात्य इटालियनांना पगार किती मिळतो यापेक्षा मानमरातब मिळतो की नाही हे महत्त्वाचे वाटते. सलाम करायला शिपाई असला, पण पगार कमी असला तरी चालतो ! बनवाबनवी हातोहात होत असते आणि यात टोक गाठले आहे ते सिसलीच्या लोकांनी. तेथे गुंडांच्या टोळ्याच आहेत

आणि सिसिलियन गुंडांचा हता धरणारा क्वचित कोणी सापडेल.

आपण जे नाही तेच आहोत हे दाखवण्याचा खटाटोप साधारणतः सर्वच इटालियन करतात. मुसोलिनी हुकूमशहा होऊच शकत नव्हता, पण तो झाला. प्रसिद्ध लेखक मोराविया याच्यापाशी गडगंज संपत्ती आहे, पण तो शेतकरी, कामकरी लोकांचे जीवन रंगवितो; या वर्गातील तरुण मुलींबरोबर फिरण्यात त्याला धन्यता वाटते. यामुळे लोक फसतात. त्यांना वाटते मोराविया हा गरीब असला पाहिजे. पण ते खरे नाही. आपण जे नाहीत ते आहोत हे दाखविण्याचा हा सारा खटाटोप पण आपल्या प्रत्येकात एक इटालियन असतो आणि म्हणून इटलीत गेल्यावर आपण फसणार ही कल्पना असूनही इटलीचे आकर्षण कधीच कमी होत नाही.

८-५-७७ ⊙

मॅक्स मुल्लर यांची आत्मकथा

प्राच्यविद्येचे गाढे पंडित प्रा. मॅक्स मुल्लर यांचे आत्मचरित्र नुकतेच हाती लागले. निराद चौधरी यांनी मॅक्स मुल्लर यांच्यासंबंधी सुंदर पुस्तक लिहिले आहे (स्कॉलर एक्स्ट्रॉऑर्डीनरी). तथापि आत्मचरित्राची खुमारी वेगळीच असते. हे आत्मचरित्र अपुरे आहे. मरणाच्या अगोदर नऊ दिवस त्यांनी आपल्या मुलाकरवी ते वाचून व सुधारून घेतले होते. ही आत्मकथा अपुरी आहे; पण एका ज्ञानमय जीवनाची ओळख त्यावरूनही होत असल्याने अपुरी आत्मकथाही उल्लेखनीय ठरेल. या कथेत फापट-

पसारा नाही, सामान्य प्रसंगांची लांबण नाही आणि आत्मप्रौढी नाही. साधी भाषा, नाट्यमयतेचा अभाव हे सुद्धा या आत्मकथेचे वैशिष्ट्य आहे. नाट्यमयतेचा अभाव इतका आहे, की ऑक्सफर्डहून १८४८ साली ते पॅरिसला आले असता क्रांतिकारक उठाव झाला व मॅक्स मुल्लर उतरले होते त्या घराच्या खिडकीतून बंदुकीची गोळीसुद्धा आली. पण या सर्वांचे एका छोट्या परिच्छेदात त्यांनी वर्णन केले आहे. मॅक्स मुल्लर यांना यावेळी काळजी होती आपले ग्रंथ आणि मूल्यवान अशी हस्तलिखिते सुरक्षितपणे रेल्वे स्टेशनपर्यंत कशी नेता येतील याची– अखेरीला ते ती नेऊ शकले आणि त्यांचे प्रशियन राजदूत मित्र बन्सेन यांना त्यांनी फ्रेंच उठावाची माहिती दिली. त्यांनी मॅक्स मुल्लर यांना पंतप्रधान लॉर्ड पामर्स्टन यांना भेटावयास नेले. फ्रेंच उठाव आणि फ्रेंच राजाचे पलायन याची हकिगत पामर्स्टन यांना देणारे मॅक्स मुल्लर हेच पहिले होते. ही सारी हकिगत इतर कोणी बऱ्याच नाट्यमयतेने वर्णन केली असती; पण येथे तिचा पूर्णपणे अभाव आहे आणि तरीही या एका परिच्छेदात मॅक्स मुल्लर यांच्या दृष्टीने जेवढे महत्त्वाचे होते तेवढे सांगून झाले आहे. त्यांच्या स्वभावावर यामुळे प्रकाश पडतो तो वेगळाच.

मोठेपणाचा तोरा नाही

मॅक्स मुल्लर यांचा जन्म देसॉ या जर्मनीतील गावात झाला. हे गाव आता पूर्व जर्मनीत आहे. ते एक स्वायत्त संस्थान होते. त्याचा राजा लोकहितदक्ष होता, विद्येचा भोक्ता होता. मॅक्स मुल्लर हे मध्यमवर्गीय कुटुंबातील. त्यांच्या लहानपणीच वडील वारले. आईने कष्टपूर्वक त्यांचे शिक्षण केले. त्यांना एक बहीण होती. त्यावेळी अर्थात स्वस्ताई बरीच होती. शालेय शिक्षणानंतर माध्यमिक शाळेच्या शिक्षणासाठी मॅक्स मुल्लर लायपझिगला गेले व नंतर विद्यापीठीय शिक्षण त्यांनी बर्लीनला घेतले. शिष्यवृत्तीवर त्यांचे शिक्षण झाले. त्यांचे आजोबा (आईचे वडील) मोठे अधिकारी होते; पण याचा त्यांना विशेष फायदा झाला नाही. त्यांच्या एका श्रीमंत नातेवाईक स्त्रीने त्यांना दत्तक घेण्याचा बेत केला होता. आणि यानंतर ते सरकारात चांगल्या हुद्यावर लागले असते. पण त्याऐवजी ज्ञानाचा मार्ग त्यांनी स्वीकारला. जर्मनीतच त्यांनी संस्कृतचा अभ्यास सुरू केला होता आणि वेदांचे संशोधन करण्याची त्यांची इच्छा होती. याच उद्देशाने ते पॅरिसला आले. पॅरिसमध्ये त्यांच्या राहण्याची व्यवस्था एक जर्मन जहागीरदार हेगेडॉर्न हे करणार होते. ते त्यांच्या कामामुळे येऊ शकले नाहीत; पण पॅरिसमधील त्यांच्या निवासस्थानी राहाण्याची व्यवस्था मात्र झाली. मॅक्स मुल्लर हे पॅरिसला येण्यापूर्वी बर्लीन विद्यापीठातील एकापेक्षा एक नामवंत प्राध्यापकांचे पाठ त्यांनी ऐकले होते. त्यांनी या पाठांच्या विषयांची यादी दिली आहे. यावरून त्यांची काय जबरदस्त तयारी होती याची कल्पना येईल. या निमित्ताने त्यांनी निरनिराळ्या जर्मन प्राध्यापकांचे गुणदोष वर्णन केले आहेत. पण हे करताना स्वतःचे मोठेपण मिरवले नाही. जर्मनीत तेव्हा आपल्या गुरूबद्दल विद्यार्थ्यांत कमालीचा आदर होता. एकदा त्यांच्या शेजारचा एक विद्यार्थी मॅक्स मुल्लर यांना आदर वाटत असलेल्या प्राध्यापकाबद्दल अनुदारपणे बोलत होता, तेव्हा त्यांनी त्याला द्वंद्वयुद्धाचे आव्हान दिले. जर्मनीत अशा व इतर कारणास्तव तेव्हा अनेक द्वंद्वयुद्धे होत. पुढे ऑक्सफर्डला गेल्यावर त्यांना दिसले, की इंग्लिश विद्यार्थी भांडत; पण कोणी अपमानास्पद बोलला तर द्वंद्वापर्यंत मजल न जाता माफी मागून समझोता करीत असल्याचे त्यांना आढळून आले.

बर्नाफ यांची मदत

पॅरिसमध्ये बर्नाफ या नामवंत संस्कृततज्ज्ञाची मॅक्स मुल्लर यांनी गाठ घेतली आणि बर्नाफ यांचा त्यांना फार मोठा उपयोग झाला. आपले पाठ ऐकण्यासाठी बर्नाफ यांनी त्यांना आमंत्रण दिलेच, पण अनेक दुर्मिळ हस्तलिखितांच्या नकला करण्याचे काम दिल्याने मॅक्स मुल्लर यांचा उपजीविकेचा प्रश्न सुटला. अर्थात हे पैसे थोडेच असत आणि रात्र-रात्र जागून मॅक्स मुल्लर यांना हे काम करावे लागले. त्यांना अगदी माफक अशा हॉटेलात जेवावे लागे व कधी कधी जेवणाला सुटी देणे भाग पडे. त्यांना ऋग्वेदाची सटीक आवृत्ती प्रसिद्ध करायची होती. हे काम करण्यासाठी त्यांना रशियातील सेंट पिटर्सबर्ग विद्यापीठाचे बोलावणे आले होते.

पण बर्नाफ यांच्या सांगण्यावरून त्यांनी ते स्वीकारले नाही. शिवाय रशियात राहावयाचे तर उपजीविकेचे काय करायचे हा प्रश्न अधांतरीच होता. त्यांना हे आमंत्रण मिळाले होते बोयतलिंग्क यांच्याकडून. तेही संस्कृततज्ज्ञ होते. मॅक्स मुल्लर यांनी आमंत्रण नाकारल्यामुळे नंतर त्यांचे ऋग्वेदाचे खंड प्रसिद्ध होताच त्यांनी अत्यंत अनुदार टीका केली. परंतु यामुळे मॅक्समुल्लर यांच्या कीर्तीला बाधा पोहोचली नाही.

ऑक्सफर्ड विद्यापीठात

बर्नाफ यांनी मग मॅक्स मुल्लर यांना सुचवले, की ऋग्वेदाच्या प्रसिद्धीकरणाचा खर्च प्रचंड आहे व तो इस्ट इंडिया कंपनीतर्फे करण्याची व्यवस्था करणे योग्य होईल; कोणी प्रकाशक तो करणे शक्य नाही. त्याप्रमाणे मग मॅक्स मुल्लर लंडनला गेले. तेथे ते प्रशियन राजदूत बन्सेन यांच्याकडे गेले. बन्सेन यांना या विषयात रस होता आणि त्यांचे इंग्लंडच्या राजकीय वर्तुळात फार वजन होते. वर्षभर प्रयत्न करून अखेरीला ईस्ट इंडिया कंपनीने मॅक्स मुल्लर यांच्याकडे काम सोपवले. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसतर्फे ऋग्वेदाचे खंड प्रसिद्ध करण्याचे काम सुरू झाल्यावर मॅक्स मुल्लर तेथेच राहण्यास गेले. या छापखान्याचा मुख्य हा संस्कृत जाणणारा नव्हता; पण मुद्रण शुद्धतेबद्दल त्याचा कटाक्ष होता. त्याची ही दक्षता कौतुकास्पद होती. दीर्घकाळ हे काम चालणार होते व म्हणून मॅक्स मुल्लर ऑक्सफर्ड विद्यापीठाचे एम. ए. झाले आणि मग तेथेच प्रोफेसर झाले. २४-२५ व्या वर्षी इंग्लंडमध्ये आलेले मॅक्स मुल्लर चाळीस पंचेचाळीस वर्षे तेथेच स्थायिक होऊन तेथेच त्याचा देहांत झाला

पूल टाळणारा रस्किन

या आत्मकथेतला सर्वात उत्तम भाग म्हणजे ऑक्सफर्डच्या विद्यापीठीय जीवनाचे वर्णन. कोणीही विद्याप्रेमी गृहस्थ या परिसरात स्वतःला हरवून जाईल. मॅक्स मुल्लर तेथे पूर्णतः रमले होते. त्यांनी अत्यंत प्रेमाने ऑक्सफर्डच्या इमारती, बागा, ग्रंथालय यांची वर्णने केली आहेत. तेथील जुनी वास्तुकला कायम टिकवावी व तिला सुसंवादी अशाच नव्या वास्तू बांधाव्या असा रस्किनचा आग्रह होता. पण त्याचे न ऐकता एक पूल बांधला गेला आणि ट्रामही आली. रस्किनला याचा राग आला व म्हणून तो हा पूल टाळून जात असे व ट्रामचा उपयोग करीत नसे. त्यावेळच्या अनेक प्राध्यापक व प्राचार्यांचे अनेक विक्षिप्त नमुने मॅक्स मुल्लर यांनी वर्णन केले आहेत. तेव्हाचे एक कुलगुरू काय वाटेल ते झाले, कितीही उत्तम विनोद केला गेला तरी हसत नसत. बॉडले ग्रंथालयाचा ग्रंथपाल हा, दुर्मिळ ग्रंथ व हस्तलिखिते थोडक्या खर्चात मिळवण्यात पटाईत होता. पण तोंडाचा फटकळ व रागीट. गोल्डन ट्रेझरीचा संकलक पालग्रेव्ह यांच्या इंग्रजी वाङ्मयावरील भाषणावर सर्वजण निहायत खूष असत आणि इंग्रजी भाषेवरील त्याचे प्रभुत्व असामान्य होते. चार्लस लॅम्ब हा नेहमी उल्हसित वृत्तीचा होता. आणि थट्टामस्करी, विनोद त्याला फार प्रिय. पण त्याच्या गांभीर्यपूर्ण भाषणाकडेही यामुळे दुर्लक्ष होत असे.

मॅक्स मुल्लर यांना विद्यापीठाच्या राजकारणात रस नव्हता. विद्यापीठात त्यावेळेला अनेक सुधारणा होत होत्या. अनेक विद्यार्थी—असे होते की ज्यांचे त्यांच्या स्वतःच्या विषयाबद्दलचे ज्ञान परिपूर्ण होते. पाठ लिहून आणून वाचण्याची पद्धती नव्हती. तर 'प्रतिप्रश्ननेन सेवया' या न्यायाने विद्यार्थी व प्राध्यापक यांची प्रश्नोत्तरे होत आणि त्यांचे एकमेकांचे जिव्हाळ्याचे संबंध असत. मॅक्स मुल्लर यांचा आवडता छंद म्हणजे संगीत. ते स्वतः उत्तम पियानो वाजवीत. यामुळेही ते ऑक्सफर्डच्या विश्वात लोकप्रिय होते.

ही आत्मकथा मॅक्स मुल्लर यांच्या ऑक्सफर्डच्या जीवनाला प्रारंभ होतानाच संपते आणि त्यामुळे पुढचे त्यांचे अधिक संपन्न जीवन यात येत नाही. ही आत्मकथा अपुरी आहे आणि काही अपूर्ण गोष्टींप्रमाणे चटका लावणारी आहे.

२०-११-७७ ⊙

रसिक कलासमीक्षक केनेथ क्लार्क

केनेथ क्लार्क हे नाव कलासमीक्षेच्या क्षेत्रात आदरणीय मानले जाते. मध्यंतरी त्यांना लॉर्ड करण्यात आले. पण लॉर्ड या उपाधीशिवायच ते अधिक ओळखले जातात. ते आता सत्तरीच्या पुढे आहेत आणि त्यांच्या आत्मचरित्राचा दुसरा भाग 'द अदर हाफ' या नावाने प्रसिद्ध झाला आहे. चित्र व शिल्प यांचे जतन, संवर्धन यासाठी केनेथ क्लार्क हे दीर्घकाळ खपत असून यासंबंधीची आवड वाढवण्यात त्यांचा भाग मोठा आहे. पाश्चात्य देशांत चित्रकृतींचा लिलाव वा विक्री प्रचंड प्रमाणावर होत असते. धनिकांनी एकेक कलाकृती किती हजार वा लाख डॉलर्स किंवा पौंडाला घेतली याच्या बातम्या प्रसिद्ध होत असल्या तरी तेथील समाजात कलेची आवड किती प्रमाणात आहे याची कल्पना या वृत्तांवरून येत नाही. पॅरिस, लंडन, वॉशिंग्टन, न्यूयॉर्क इत्यादी शहरांतील वस्तुसंग्रहालये, आर्ट गॅलऱ्या पाहिल्यावर व तेथे होणारी गर्दी पाहिल्यावर ती येते.

दुहेरी कौशल्याचा प्रत्यय

केनेथ क्लार्क यांचे कलाविषयक अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांचा ताजा ग्रंथ 'ॲनिमल्स ॲन्ड द मेन' हा सध्या येथेही उपलब्ध आहे. त्यांचा सर्वात लोकप्रिय ठरलेला ग्रंथ म्हणजे 'सिव्हिलिझेशन'. एकट्या अमेरिकेत त्याच्या दहा लाख प्रती खपल्या. बी. बी. सी.ने प्रथम क्लार्क यांच्याकडून एक चित्रपटमालिका तयार करून घेतली आणि त्यावर आधारित असे पुस्तक नंतर प्रसिद्ध झाले. युरोपीय चित्र व शिल्पकृतींच्या अनुरोधाने त्यांनी संस्कृतीचा आलेख काढला आहे. या चित्रपटमालिकेतील दोन चित्रपट पाहण्याचा योग प्रस्तुत लेखकाला आला होता व त्यावरून क्लार्क यांचे भाष्य आणि छायाचित्रकाराचे कौशल्य यांचा प्रत्यय आला. क्लार्क यांचे हे पुस्तक एका निराळ्या विश्वात घेऊन जाते. क्लार्क सांगतात की, बी. बी. सी. वरून जेव्हा ही मालिका दाखवण्यात आली होती तेव्हा साधे कामगारही खिळून बसत आणि अनेकांनी त्यांना पत्रे लिहिली. पुढे वॉशिंग्टनला त्यांच्या सन्मानार्थ मोठा समारंभ झाला, लोकांनी त्यांचे प्रचंड स्वागत केले तेव्हा भावनाविवश होऊन त्याना रडूच कोसळले.

कलाविश्वात जन्मभर रमलेल्या क्लार्क यांचे आत्मचरित्रही असेच वेगळे आहे. एक विशेष असा, की त्यांनी स्वतः या क्षेत्रात प्रचंड काम केले असले तरी स्वतःची बढाई ते सांगत नाहीत. एवढेच नव्हे, तर स्वतःकडे गौणस्थान घेण्याकडेच त्यांचा ओढा आहे. एकाच बाबतीत त्यानी कमीपणा घेतला नाही व तो म्हणजे स्त्रियांच्या. स्त्रीसहवास आपल्याला नेहमीच आवडत आला असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. यामुळेच एका वृद्ध मित्राच्या मध्यमवयीन सेक्रेटरीला थोड्याच वेळात आपण वश केले व हा मित्र त्यामुळे अस्वस्थ कसा झाला हे ते सांगून जातात. हा भाग वगळला तर केलेले काम सांगावे, स्वतः पुढे घुसू नये या वृत्तीने त्यांनी आपले आत्मचरित्र लिहिले आहे.

महत्त्वाची कामगिरी

केनेथ क्लार्क यांची महत्त्वाची कामगिरी म्हणजे युद्धकाळात त्यांनी लंडन व ब्रिटनच्या इतर शहरांतील कलाकृतींचे केलेले संरक्षण. बॉम्बहल्ल्यात नॅशनल आर्ट गॅलरी व इतर ठिकाणच्या चित्रकृती नष्ट होण्याचा संभव होता. त्यावेळी कॅनडात त्यांची पाठवणी करावी अशी एक सूचना पुढे आली. मग चर्चिलनी त्यास सक्त विरोध केला. इंग्लंडची भूमी वाटेल तेवढी खोदा आणि त्यात या कृती ठेवा; मग त्या परदेशात जाता कामा नये असे चर्चिल यांनी बजावले. पण कलासंचालक या नात्याने केनेथ क्लार्क यांनी शोध घेण्यास सुरुवात केली. अखेरीस वेल्समध्ये त्यांना काही जुन्या गुंफा आढळल्या आणि त्यात या कृती सुरक्षितपणे ठेवण्यात

आल्या. त्या योग्य स्वरूपात राहाव्यात यासाठी बरेच श्रम घेतले जात. कलावंतांचाही योगक्षेम चालेल याची काळजी घ्यावी लागे. क्लार्क याबाबत दक्ष होते.

चित्र व शिल्पकृतींच्या आस्वादात आयुष्य घालवणाऱ्या क्लार्क यांनी नाटक, चित्रपट, संगीत या क्षेत्रांतही तितकाच रस घेतला होता आणि या क्षेत्रांतील अनेक नामवंतांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांची काही व्यक्तिचित्रे क्लार्क यांनी मार्मिकपणे रेखाटलेली आहेत. आंद्रे मोर्वा हे प्रसिद्ध फ्रेंच लेखक. डिझरायली, शेली, बायरन इत्यादींची त्यांची चरित्रे अतिशय चटकदार. केनेथ क्लार्क हे या चरित्रांचे भोक्ते. पण आंद्रे मोर्वा यांचा त्यांना अनुभव विचित्र आला. दुसऱ्या महायुद्धात पॅरिसचा पाडाव झाला, तेव्हा अमेरिकेच्या वाटेवर असताना ते इंग्लंडला आले आणि क्लार्क यांना भेटले. हिटलरविरुद्ध इंग्लंड उभे राहिले. हा फ्रांसचा अपमान व इतिहासाविरुद्ध गुन्हा आहे, असे ते क्लार्कला सांगू लागले. त्यांचा हाच सुर लागला होता, पण क्लार्क संतप्त होऊ लागले व अखेरीला पंधरा-वीस मिनिटांनंतर त्यांनी मोर्वा यांना दरवाजा दाखवला.

केनेथ क्लार्क यांनी व्हिवियन ली या नटीची व्यक्तिरेखाही अतिशय सहानुभुतीने रेखाटली आहे. ही गुणी नटी मानसिकदृष्ट्या दुर्बल होती आणि तिला वेडाचे झटके येत. त्याबद्दल कोणालाही करुणा वाटेल असेच केनेथ क्लार्क यांनी वर्णन केले आहे.

मॉमशी मैत्री

सॉमरसेट मॉम हे क्लार्क यांचे मित्र. फ्रांसमधील त्यांच्या निवासस्थानी वर्षातून आठवडाभर क्लार्क पती-पत्नींनी मुक्काम करावाच, असा त्यांचा आग्रह असे व त्याप्रमाणे हे दोघे मुक्काम करीत. क्लार्क लिहितात, की मॉम यांना स्वतःलाच बोलायला आवडे व दुसरा कोणी फार बोलू लागला, तर ते कंटाळून जात. काव्याचे वाचन ते परिणामकारक रीतीने करीत. मॉम स्वतः लोकात फार मिसळत नसत, पण त्यांचे सेक्रेटरी जिराल्ड हॅक्स्टन हे कोठल्याही लहान-मोठ्या हॉटेलात वा मद्यालयात जात, अनेकांशी रात्र-रात्र गप्पा मारत. यातून त्यांच्या हाती जे येई ते हॅक्स्टन मॉम यांना सांगत. मॉम यांच्या कथा-कादंबऱ्यांचा मसाला असा तयार होई. पत्ते खेळण्याचा मॉम यांना छंद होता, पण क्लार्क यांना ते आवडत नव्हते.

क्लार्क हिंदुस्थानात आले होते. येथील शिल्पांचे अनेक नमुने त्यांनी पाहिले. अजंटा व वेरूळ लेण्यांनी त्यांना मोह घातला. दक्षिण भारतात ते गेलेले दिसत नाहीत. मुंबईत त्यांचे ब्रिटिश कौन्सिलतर्फे भाषण झाले. भाषणाला तेवीस जण हजर होते ! मुंबईच्या फुटपाथवर झोपणारे लोक व रस्त्यातील भिकारी पाहून लवकर स्वदेशी परतणे त्यांना योग्य वाटले.

मन हेलावणारा भाग

क्लार्क यांनी आपल्या पत्नीचे व्यक्तिचित्रणही सुंदर रीतीने केले आहे विशेषतः तिच्या मरणाच्या अगोदर कीटस्‌ची 'इव्ह ऑफ सेंट ॲगनीज' ही कविता वाचून तिने कशी घेतली, हा भाग मन हेलावणारा आहे.

केनेथ क्लार्क यांनी या पुस्तकात अखेरीस वॉशिंग्टनमध्ये त्यांनी केलेले भाषण ग्रथित केले आहे व ते मार्मिक आहे. ज्या विषयाचा अभ्यास आनंदाने आपण करतो, तो विषय आत्मसात होतो. एखादा विषय, एखादी व्यक्ती, इतिहासाचा एखादा कालखंड याच्या प्रेमात पडल्यावर त्याचे जेवढे ज्ञान होते तेवढे ते कशाने होत नाही, हा त्यांचा सिद्धांत त्यांच्या कलाविषयक लिखाणावरून सिद्ध होतो. कलास्वाद हा विषय त्यांनी जन्म-भर टिकविला आणि त्यात ते रममाण झाले. 'सिव्हिलीझेशन'सारखे पुस्तक यामुळेच निर्माण होते. २९-१-७८ ⊙

जनरल द गॉल

नुकतेच निधन पावलेले फ्रेंच लेखक व विचारवंत आंद्रे मालरो हे जनरल द गॉल यांचे निकटचे मित्र व त्यांचे एक चहाते. द गॉल यांच्यावर मालरो यांची भक्तीच होती आणि ही त्यांची भावना द गॉल यांच्या सेवानिवृत्तीच्या काळात मालरो यांनी जी प्रदीर्घ मुलाखत घेतली तीत विशेष स्पष्ट होणारी आहे. अगोदरच राजकीयदृष्ट्या अस्थिर बनलेल्या फ्रान्सला अल्जीयर्सच्या युद्धाने प्रचंड धक्का दिला आणि राजकीय नेतृत्व कमी पडू लागले तेव्हा द गॉल यांच्याकडे अधिकारसूत्रे आली. दुसऱ्या महायुद्धातील त्यांची कर्तबगारी त्यांना उपयोगी पडली होती. पण फ्रान्सच्या राजकीय दुखण्यावर घटनादुरुस्तीचा इलाजही आवश्यक होता. तो द गॉल यांनी केला आणि फ्रान्स स्थिरावला. युद्धकाळातच मालरो हे द गॉल यांचे चहाते बनले होते व पुढे ते त्यांच्या मंत्रिमंडळात सांस्कृतिक खात्याचे मंत्री म्हणून नियुक्त झाले. ज्या इतिहासाच्या वा नियतीच्या गूढतेचे द गॉल यांना विशेष आकर्षण होते त्या नियतीची गंमत अशी, की राजकीय अस्थिरतेच्या वावटळीतून द गॉल हे फ्रान्सचे अध्यक्ष झाले आणि वावटळीमुळेच त्यांनाही अध्यक्षपद सोडावे लागले. त्यानंतर ते कोलोंबी या त्यांच्या गावच्या निवासस्थानात राहाण्यास गेल्यावर मालरो यांनी त्यांची मुलाखत घेतली. 'फॉलन ओक्स' या नावाने ही मुलाखत पुस्तकरूपाने प्रसिद्ध आहे. (हॅमिश हॅमिल्टन, लंडन. किं. २ पौंड)

मालरो यांची मुलाखत घेण्याची व लिहिण्याची पद्धती अगदी स्वतंत्र आहे. प्रश्नोत्तराच्या रूपाने ते मुलाखत लिहून काढीत नाहीत. सवाल-जबाब होतात, पण त्या निमित्ताने मालरो अनेक विचार प्रकट करतात आणि वातावरणनिर्मिती करण्यात तर त्यांचा हातखंडा आहे. ही मुलाखत असो वा 'अँटी मेमॉयर्स' या त्यांच्या आत्मचरित्रातील माओ, नेहरू यांच्या मुलाखती असोत, या वातावरणनिर्मितीची व वैशिष्ट्याची जाणीव झाल्याखेरीज राहात नाही. मालरो यांच्या एका चरित्रकाराने माओ यांच्या मुलाखतीसंबंधात टाकलेला प्रकाश मालरो यांच्या स्वभावाची वेगळी बाजू दाखवतो. माओ व मालरो यांची मुलाखत झाली तेव्हा पेकिंगमधील फ्रेंच वकिलातीतील दुभाषी हजर होता. त्याने ठेवलेली टिपणे पाहाता मालरो यांची लिखित मुलाखत अगदीच वेगळी वाटते, असे त्यांचा चरित्रकार

म्हणतो. मालरो यांचे त्यावर उत्तर असे, की मी वातावरणनिर्मिती करतो आणि कल्पना व वास्तव यांचे मिश्रणही करतो. मला याद्वारे ती व्यक्ती कशी आढळली हे चित्रित करायचे असते.

योगायोग

द गॉल यांची सर्व मुलाखत वाचल्यावर त्यांचे भव्य व्यक्तित्व, कडक स्वभाव आणि नियतीने आपणावर काही जबाबदारी टाकली आहे याची जाणीव यांचा प्रभाव पडतो. युद्ध सुरू झाल्यानंतर पंतप्रधान म्हणून नेमणूक झाल्यानंतर नियती जणू माझ्या बाजूने चालत होती असे चर्चिल यांनी म्हटले आहे. द गॉल यांना मात्र नियती त्यांच्या बाजूने कायमचीच चालत होती असे वाटत असावे. मालरो व द गॉल यांच्या या वार्तालापात अनेकदा इतिहास, नियती, योगायोग यांचा उल्लेख आला आहे. मालरो त्यांना याबाबतीत साथ देताना दिसतात. जनरल द गॉल यांची व केनडींची वॉशिंग्टन येथे भेट झाली त्याच्या आठवणी निघाल्या असता, मालरो द गॉल यांना सांगतात, 'केनेडींचा खून झाला त्या दिवशी तुमचा (द गॉल यांचा) वाढदिवस होता. नियतीचे व्यापार गूढ असतात. मायकेल एंजलो ज्या वर्षात मरण पावला त्या वर्षात शेक्सपियरचा जन्म झाला. पॅरिसमधील विजयाची कमान (आर्क द त्रिओंफ) नेपोलियनने पाहिलेली नव्हती, पण नेपोलियनच्या पुण्यतिथीच्या दिवशी सूर्य या कमानीच्या बरोबर मधून अस्तास जातो. १६ व्या लुईने फ्रान्सचा राजा म्हणून शेवटचे कृत्य कोणते केले होते? तर नेपोलियनला बोनापार्ट करून त्याला तोफखान्याचा प्रमुख म्हणून नेमले.'

इतिहास वा नियतीने आपल्यावर जबाबदारी टाकली असल्याच्या जाणिवेमुळेच द गॉल हे युद्धकाळातही एकटे व खंबीरपणे नाझीविरोधात उभे राहिले आणि आपण सर्व फ्रान्सचे प्रतिनिधी आहोत असेच ते मानीत असत. म्हणूनच चर्चिल यांनी त्यांना तुम्ही फ्रान्सच्या वतीने कसे बोलता? असे विचारले असता, मी जर साऱ्या फ्रान्सचा प्रतिनिधी नसतो तर तुमच्या या कार्यालयात कशासाठी आलो असतो? असा उलट सवाल द गॉल यांनी केला. द गॉल हे मालरो यांच्याशी बोलतानाही फ्रान्स असाच उल्लेख करतात, फ्रेंच जनता, फ्रेंच लोक असे काही म्हणत नाहीत. फ्रान्स हे एक प्रतीक आहे, एक स्वप्न आहे, अमूर्त कल्पना आहे व आपण त्याचे प्रतिनिधी आहोत ही द गॉल यांची स्वतःबद्दलची कल्पना होती. कामू यांच्याशी बोलतानाही जो फ्रेंच लेखक उत्तम लिखाण करतो तो फ्रान्सचीच सेवा करतो या द गॉल यांच्या उत्तरातही फ्रान्ससंबंधीची त्यांची कल्पना स्पष्ट होते. या फ्रान्सला मोठे करावे ही त्यांची महत्वाकांक्षा होती. इराणच्या शहांनाही 'स्वतंत्र राहा व देश मोठा करा' असा उपदेश त्यांनी केला होता. पण या मोठेपणापायी अत्याचार करावे, एकतर्फी हुकमत गाजवावी असे द गॉल यांना वाटत नव्हते. राजकीय पुढाऱ्यांविषयी त्यांना तिरस्कार होता आणि फ्रेंच राजकीय पुढाऱ्यांनी फ्रान्सचा एक काळ जो खेळखंडोबा केला तो पाहाता द गॉल यांची भावना समजू शकते.

द गॉल वॉशिंग्टनला गेले तेव्हा केनेडी यांनी त्यांचे उत्तम स्वागत केले. या दोघांची भेट निष्फळ ठरू नये यासाठी श्रीमती केनेडी या विशेष जागरूक होत्या. स्टालीनच्या भेटीची तऱ्हा वेगळी. द गॉल यांनी सांगितले, की स्टालीनला ते भेटले तेव्हा पहिला क्षण दोघांचाही स्तब्धतेत गेला. द गॉल यांची अपेक्षा होती, की स्टालीन युरोप वगैरेबद्दल बोलेल. पण त्याने वेगळीच सुरवात केली. तो म्हणाला, 'मी थोरे (फ्रेंच कम्युनिस्ट) यास तुमच्या हवाली करावे अशी बहुधा तुमची मागणी असेल. पण थोरे हा चांगला माणूस आहे. मी तुमच्या जागी असतो तर त्याला गोळी घालणार नाही.' यावर द गॉल यांनी उत्तर दिले, की 'फ्रेंच नागरिकांकडून सरकार जी अपेक्षा करते त्याप्रमाणे ते त्यांना वागवते.' मग मालरो यांनी स्वतःचा अनुभव सांगितला. क्रेमलिनमधील एका खान्याच्या वेळी एका उतावळ्या रशियन मंत्र्याने स्टालीनला शुभेच्छा देण्यासाठी 'टोस्ट' दिला. असे कधी करीत नाहीत. त्यामुळे स्टालीनला राग आला. त्याने 'टोस्ट'साठी मद्याचा ग्लास वर उचलला आणि म्हणाला, 'मला 'टोस्ट' देणारा हा वाहतुकमंत्री आहे. जर रशियातील वाहतूक नीट चालली नाही तर त्याला फासावर दिलं जाईल.' आणि हे म्हणून स्टालीनने हातातील ग्लास टेबलावर आपटून फोडला. मालरो यांनी हा प्रसंग निवेदन केला तेव्हा द गॉल यांच्या मनःचक्षूसमोर त्याचे चित्र उभे

राहिले आणि मग ते म्हणाले, 'स्टालीन हा आशियाई हुकुमशहाच होता आणि तसेच होणे त्याला पसंत होते.'

स्टालीनचे एक वाक्य मात्र द गॉल यांना पूर्णपणे पटले होते. ते म्हणजे 'अखेरीस मृत्यू हाच विजयी होतो' हे. या मृत्यूचा विचार द गॉल यांच्यावर तेव्हा प्रभाव गाजवीत होता आणि म्हणून ते मालरो यांना विचारीत होते, 'मी आत्मचरित्र लिहितो आहे खरं, पण त्याचा उपयोग काय?' मालरो याचा त्यावर प्रश्न असा, की 'जीवनाचा तरी अखेरीस उपयोग काय?'

इतकी तात्विक, गंभीर चर्चा करणाऱ्या द गॉल यांच्या या सेवानिवृत्त जीवनात काही हलकेफुलके होते की नाही? मालरो यांनी हेच द गॉल यांना विचारले. तेव्हा ते म्हणाले, 'हे तुम्ही माझ्या मांजराला विचारा. मी व ते बराच वेळ फिरतो. मी त्याच्याशी गप्पागोष्टीही करतो. पेशन्सचा डाव मांडून तो मी खेळतो आणि माझी नातवंडे आली की त्यांच्याशीही मी पेशन्स खेळतो.' म्हणजे 'असा कोणताही सिंहगड नाही, की ज्यासं द्रोणागिरीचा कडा नाही' हे 'राजसंन्यासा'तील नाटककाराचे वचन खरेच आहे!

१२-१२-७६ ⊙

गुन्नार मिर्डाल

'एशियन ड्रामा' या ग्रंथाने जगविख्यात झालेले स्वीडीश अर्थशास्त्रज्ञ गुन्नार मिर्डाल हे आता अमेरिकेवर ग्रंथ लिहीत असून तो पुढील वर्षी पूर्ण होईल. मिर्डाल हे ७८ वर्षांचे आहेत आणि तरीही ते सतत कामात दंग असतात. त्यांची मुलाखत लंडन टाइम्सने प्रसिद्ध केली आहे. मिर्डाल कुटुंब हे लोकविलक्षण आहे. त्यांच्या पत्नी अल्वा याही लेखिका आहेत; पण त्या निरनिराळ्या देशांत राजदूत होत्या. भारतातही त्या काही काळ स्वीडीश राजदूत म्हणून राहिलेल्या आहेत. नेहरू-कुटुंबाशी दोघांचे घनिष्ठ संबंध. म्हणून पंतप्रधान इंदिरा गांधी १९७२ साली स्वीडनला गेल्या असता दोघेही मेजवानीच्या प्रसंगी आवर्जून हजर होते. तेथे प्रा. मिर्डाल यांच्याशी प्रस्तुत लेखकाला चार-पाच मिनिटे बोलता आले. ते बोलण्याचालण्यात अतिशय साधे आहेत. दुसऱ्या दिवशी मिर्डाल गावाला जाणार असल्याने त्यांची अधिक काळ मुलाखत होऊ शकली नाही.

त्यांचा मुलगा जॅन मिर्डाल हा चीनमध्ये राहिला आणि त्याने तेथील ग्रामीण जीवनाचा अभ्यास करून दोन पुस्तके लिहिली आहेत. गेल्या वर्षी तो भारतात आला असता मुंबईत त्याने मुक्काम केला होता. स्वीडनमधून काही शिक्षक भारताच्या सफरीवर आले होते, त्यात जॅन व त्याची पत्नी हे होते.

चार वर्षांपूर्वीही गुन्नार यांना आर्थराइटिसचा त्रास होत असल्याने ते काठी टेकीतच आले व आता टाइम्सच्या मुलाखतीवरून असे दिसते, की त्यांचा हा विकार बळावला आहे. पण त्यामुळे कामात खंड पडलेला नाही. ते कधी सुटी घेत नाहीत; संध्याकाळी आणि शनिवार-रविवारही मिर्डाल काम करीत असतात. वेळ वाया जाऊ नये म्हणून ते दुपारचे

जेवणही अगदी थोडे घेतात. दुग्धाहारावरही ते राहतात. अखंड कामाची ही सवय आपल्याला आईवडलांकडून मिळाली असे मिर्डाल यांचे म्हणणे. त्यांचे आईवडील हे सोल्वाबों या खेड्यातले. निसर्गसुंदर असा हा भाग डलेकार्लिया या विभागात असून तेथील शेतकरी स्वातंत्र्यप्रिय म्हणून प्रसिद्ध आहेत. मिर्डाल यांचे आजोबा शेतकरी होते, तर त्यांचे वडील सुतार आणि नंतर कंत्राटदार म्हणून काम करीत. आपली पत्नी अल्वा हिची व आपली पहिली भेट कशी झाली हे गुन्नार मिर्डाल अद्याप सांगतात. ते व त्यांचे मित्र विद्यार्थीदशेत असताना सायकलवरून दूरवर गेले आणि एका शेतावरच त्यांनी मुक्काम टाकला. रात्री तेथील गवताच्या गंजीवर तिघेही झोपले. सकाळी उठले तेव्हा शेतमालकाच्या तीन मुली त्यांना दिसल्या. गुन्नार मिर्डाल यांचे त्यापैकी एकीशी प्रेम जमले. तीच अल्वा. आपले प्रदीर्घ वैवाहिक जीवन सुखाचे आणि बौद्धिकदृष्ट्या उत्तेजक झाले असे मिर्डाल यांचे म्हणणे. दोघांनी मिळून अनेक पुस्तके लिहिली आणि आपल्या नव्या कल्पना ती दोघे प्रथम चर्चा करून तपासत असतात.

अमेरिका – तेव्हा व आता

तीस वर्षांपूर्वी मिर्डाल यांनी अमेरिकेच्या निग्रो प्रश्नांबाबत ग्रंथ लिहिला आणि त्याने त्यांना कीर्ती मिळवून दिली. रॉकफेलर प्रतिष्ठानतर्फे प्रथम त्यांनी अमेरिकेच्या आर्थिक मंदीचा अभ्यास केला होता. तो काळ भयानक होता आणि मिर्डाल म्हणतात, तेव्हा अमेरिकन प्राध्यापक परिस्थितीचे वर्णन करीत, पण ती कशी सुधारावी हे मात्र सांगत नसत. सामाजिक पुनर्घटनेच्या विचाराला प्राधान्य मिर्डालना तेव्हापासून द्यावे असे वाटू लागले. अमेरिकेतून परतल्यावर मिर्डाल पतिपत्नीचा काळ राजकीय कार्यात गेला. ही १९३४ सालची गोष्ट. त्याही वेळी स्वीडनमध्ये लोकसंख्या घटत होती. तेव्हा मिर्डाल यांनी कल्याणकारी योजनांचा उपयोग लोकसंख्याघटीचा प्रश्न सोडवण्यासाठी कसा करावा यावर पुस्तक लिहिले. स्वीडनच्या समाजवादी पक्षाच्या धोरणावर याचा बराच प्रभाव पडला होता. त्यानंतर अमेरिकेत कार्नेगी प्रतिष्ठानला निग्रोंच्या प्रश्नांबाबत संशोधन करून पुस्तक प्रसिद्ध करायचे होते. प्रतिष्ठानला अमेरिकन किंवा साम्राज्यसत्ता असलेल्या देशांचा संशोधक नको होता. साहजिकच मिर्डाल यांची निवड झाली. मिर्डाल यांनी केवळ दोन साहाय्यक घेतले, रात्रंदिवस तीन वर्षे काम केले आणि ग्रंथ प्रकाशित केला. आता तीस वर्षांनी पुन्हा त्यांनी अमेरिकेत जाऊन संशोधनात्मक ग्रंथ लिहिला आहे. चलनवाढ व मंदी यातून अमेरिकेत उदारमतवादास एकप्रकारे विरोधी वातावरण तयार झाले आहे असे मिर्डाल म्हणतात. यामुळे समाजकल्याणाच्या योजनांना कात्री लागते.

एशियन ड्रामा

एशियन ड्रामा हा जो मिर्डाल यांचा गाजलेला ग्रंथ तो तयार होत असता त्यांना मानसिक कष्ट फार झाले. १९५३ साली ते स्वीडनच्या मंत्रिमंडळात व्यापारमंत्री होते. त्या नात्याने आग्नेय आशियात त्यांचा सहा आठवड्यांचा दौरा झाला. तेथील दैन्य पाहून मिर्डाल उद्विग्न झाले आणि यातून एशियन ड्रामाची कल्पना निघाली. हा ग्रंथ अडीच वर्षांत पूर्ण व्हायचा होता, पण त्याला दहा वर्षे लागली. कारण अधिकाधिक माहिती गोळा होऊ लागली होती. या प्रकारचे पुस्तक लिहायचे म्हणजे पहिल्या महायुद्धात खंदकात उभे राहण्यासारखेच आहे. खंदकात असताना गोळ्यांचा मारा व्हायचा व मार्ग सापडायचा नाही. आपल्याला असाच अनुभव आला असे मिर्डाल म्हणतात. आपल्या प्रत्येक तासाची किंमत किती ही मोजून त्यांनी अधिकाधिक वेळ खर्च केला खरा, पण तरीही दहा वर्षे लागलीच. काही वेळा आपल्याला मध्यरात्रीच जाग यायची आणि पुस्तक कसे व कधी पुरे होणार याच्या विचाराने डोके भणभणून जायचे अशी माहिती मिर्डाल यांनी दिली आहे. अर्थात हा ग्रंथ बाहेर पडल्यावर मिर्डाल यांची कीर्ती सर्वत्र पसरली. अनेक विद्यापीठांनी त्यांचा पदवी देऊन सन्मान केला. अनेक देशांची सरकारे त्यांचा सल्ला घेत असतात. मिर्डाल यांना मागासलेल्या देशांबद्दल सहानुभूती आहे, पण या देशांतील पुढारी अनेकदा लोकप्रियतेच्या नादी लागून चुकीचे निर्णय घेतात; कष्टाशिवाय, त्रासाशिवाय सुबत्ता येत नाही हे या पुढाऱ्यांनी लोकांना सांगितले पाहिजे असे त्यांचे मत आहे. १-८-७६ ◉

संभाषणकलेचा महर्षी गटे

प्रसिद्ध ब्रिटिश लेखक प्रिचेट यांचा 'संभाषण' या विषयावर एक मार्मिक लेख संडे टाइम्सच्या ताज्या अंकात प्रसिद्ध झाला आहे. संभाषणाची कला सर्वांनाच अवगत नसते. म्हणूनच स्वतःच्या बढाया आणि दुसऱ्यांची निंदा म्हणजे संभाषण, असे अनेकांना वाटते. काहीजणांना इतरांना न बोलू देता आपल्याच जिभेचा पट्टा सतत चालू ठेवणे हेच संभाषणाचे मर्म वाटते. यामुळे तसे अड्डे अनेक असतात, पण चांगल्या अर्थाने रंगणाऱ्या गप्पांचे अड्डे मोजकेच सापडतील. संभाषणाचे महत्त्व अनेकांनी यापूर्वी प्रतिपादन केले आहे. गटेने म्हटले आहे, की सोन्यापेक्षाही चकचकीत काय असते? तर प्रकाश, आणि प्रकाशापेक्षा आल्हाददायक काय असते? तर संभाषण. खुद्द गटेचे संभाषण असे आल्हाददायक व चमकदार असे आणि ते पुस्तकरूपाने त्याचा एक शिष्य एकरमान याने ग्रथित केले आहे. डॉ. जॉन्सनचा शिष्य जसा बॉस्वेल तसा गटेचा एकरमान. पण एकरमानप्रमाणेच इतरांनीही गटेचे अनेकविध विषयांवरील संभाषण ग्रथित केले असून, डेव्हीड लूक व रॉबर्ट पिक यांनी ते संपादित केले आहे. कवी, नाटककार, तत्त्वचिंतक आणि प्रशासक या विविध नात्याने गटे ओळखला जातो. त्याचे पाऊणशे वर्षांचे जीवन हे एक समृद्ध जीवन होते आणि तो काळ हा जर्मनीच्या जीवनातील एक संपन्न काळ मानला जातो. वायमार संस्कृती म्हणून ज्या संस्कृतीचा उल्लेख व गौरव होतो ती या काळातच वाढली.

संभाषणाचे प्रेम

संभाषणाची गटेला स्वभावतःच आवड होती. इतकी की तो एकटा असतानासुद्धा आपल्या ओळखीच्या व्यक्तीला काल्पनिक आमंत्रण देई व ती व्यक्ती जणू काही समोर बसली आहे अशा थाटात त्या व्यक्तीशी तो बोलत राही, किंवा चर्चा करी. चर्चा करायची तर दुसऱ्या व्यक्तीनेही बोलायला हवे पण येथे तर सारा कल्पनेचा खेळ. समोरची व्यक्ती कोणत्या शंका काढील, कोणते मत देईल, प्रश्न विचारील याची कल्पना करून गटे ती भूमिका वठवी व उत्तरे देई. कल्पनेतील व्यक्ती व तो स्वतः अशा दोन्ही भूमिका करून गटेची ही चर्चा चालत असे. त्यामुळे काही वेळा गटे एकटाच बोलत असल्याचे दृश्य दिसे. कल्पनेने ज्या व्यक्तीला बोलावणे धाडून ही चर्चा होत असे ती चिरपरिचित असणार नाही एवढी गटे खबरदारी घेई आणि दूरच्या, थोडी ओळख झालेल्या व्यक्तींना पाचारण केले जाई. कारण त्या ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत असतात असे त्याला वाटे. तो अनेकदा आपल्या कविता, कादंबऱ्या, नाटके स्वतः लिहीत नसे, तर लेखनिकाला सांगून लिहून घेई. हे करण्यापूर्वी त्याच्या डोक्यात संपूर्ण चित्र स्पष्ट असे. परंतु लेखनिकाला मजकूर सांगण्याच्या या पद्धतीचा जन्मही संभाषणाच्या प्रेमातून झालेला आढळेल.

वायमार येथे तो राजाचा सल्लागार व मित्र म्हणून वावरत असे व परिणामी अनेक लहानमोठ्या लोकांशी त्याचा जवळून संबंध येई.

त्यामुळे त्याचे जीवन विविध अनुभवांनी समृद्ध झाले होते आणि याचा प्रत्यय त्याच्या लिखाणाप्रमाणेच त्याच्या संभाषणातूनही येई. काव्य, कला, संस्कृती, तत्त्वज्ञान अशा अनेक विषयांवर त्याची वाणी अखंड चालत असे. मादाम द स्ताल ही अशीच संभाषणचतुर स्त्री होती. तिच्या निवासस्थानी गटेची वाक्गंगा वाहात होती; पण बैठक आटोपल्यावर त्याला वाटले तीच सतत बोलत होती, तर तिच्या मते गटेची रसवंती थांबत नव्हती; पण तो इतके चांगले बोलत होता, की इतरांना काही बोलावेसे वाटत नव्हते. दुपारच्या वा रात्रीच्या भोजनाच्या वेळी आवडत्या मद्याबरोबर आणि निवडक खाद्यपदार्थांची चव घेत गटे तासन् तास बोलत राही. त्याच्याकडे पाहुणे येत तेव्हा भोजनाचे पदार्थ तो निवडीत असे.

साहित्य व राजकारण

गटेची अनेक विषयांवरील मते वैशिष्ट्यपूर्ण शैलीत प्रगट होत असत. एके ठिकाणी तो म्हणतो की कवीने स्वतःचा भाष्यकार बनू नये. तसा तो झाला की कवी म्हणून तो संपतो. कवी जी निर्मिती करतो तिचा आस्वाद कवीच्या भूमिकेत जाऊनच वाचकास घेता येतो. त्या काळातील पुस्तकांच्या परीक्षणाबाबत गटे म्हणतो, की आजकाल पुस्तके वाचण्यासाठी लिहिली जात नाहीत तर ती परीक्षणासाठी लिहिण्यात येतात. तशी ती लिहिली जात असल्याने केवळ समीक्षकच पुस्तके वाचू लागले आहेत आणि सामान्य वाचकांना त्यांची केवळ मते कळत असतात.

धूम्रपान व जर्मनांचे बिअरप्रेम त्याला बिलकूल मान्य नव्हते. धूम्रपान हे रिकामटेकडेपणाचे लक्षण असून त्यामुळे आळस वाढतो. त्यातच बिअरची भर पडली तर लंबोदर होऊन माणूस सुस्त बनतो. बीअर व धूम्रपान यावर असाच पैसा खर्च होत गेला तर जर्मनी हे एक पोटभरूंचे राष्ट्र होईल आणि कला, विज्ञान वगैरे क्षेत्रांत त्याच्याकडून काहीही होणार नाही, असे गटेचे भाकित होते. प्रत्यक्षात मात्र तसे काही झाले नाही.

साहित्य व राजकारण यासंबंधात गटे म्हणतो, की लेखकाला आपले लिखाण राजकीयदृष्ट्या परिणामकारक व्हावे असे वाटत असेल, तर त्याला पक्षपाती बनावे लागते व तसा तो बनला, की कवी म्हणून, ललितलेखक म्हणून तो संपतो. त्याला स्वतंत्र बुद्धी, निःपक्षपाती वृत्ती यांना रामराम ठोकावा लागतो. माणूस म्हणून, नागरिक म्हणून कवीला त्याची जन्मभूमी प्रिय असेल. पण त्याच्या काव्याची भूमी ही सर्वात सुंदर व उदात्त असते. शिवाय मातृभूमीचे प्रेम म्हणजे तरी काय? एखाद्या लेखकाने चुकीचे पूर्वग्रह, संकुचित विचार यांच्याविरूद्ध जन्मभर लढा दिला असेल, लोकांना उदात्त विचार व भावना म्हणजे काय हे शिकवले असेल तर त्यापेक्षा वेगळी देशभक्ती ती काय असते? त्याच्याकडून वेगळी अपेक्षा करणे म्हणजे लष्करी अधिकाऱ्याने राजकीय मोहिमेत भाग घेतला नाही म्हणून त्याला दोष देण्यासारखे आहे.

नेपोलियनशी भेट

शेक्सपियर हा गटेचा आवडता नाटककार, त्याची नाटके म्हणजे सोन्याच्या तबकात ठेवलेले दागिने असे त्याला वाटे, तर तत्कालीन जर्मन वाङ्मय म्हणजे वशीत ठेवलेली सफरचंदे. नेपोलियन व गटे यांना एकमेकाबद्दल फार आदर. गटेची नेपोलियनशी भेट झाली तेव्हा गटेला त्याने त्याचे वय विचारले. आपले वय साठ असल्याचे गटे म्हणाला तेव्हा तू इतका तरुण कसा दिसतोस, असा प्रश्न नेपोलियनने केला. नंतर 'वेर्थरची दुःखे' ही गटेची कादंबरी आपण सात वेळा वाचल्याचे सांगून नेपोलियनने त्यावर मार्मिक भाष्य केले. नायकाच्या महत्त्वाकांक्षेच्या आड प्रेम येते असे दाखवणे वास्तवाशी जुळणारे नाही अशी टीका नेपोलियनने केली आणि प्रेमाचा असा परिणाम होत नाही असे तो म्हणाला. गटेने यावर उत्तर दिले, की आपण या दृष्टीने विचार केला नव्हता. नेपोलियनचा अभिप्राय ही अभिनव स्वरूपाची समीक्षा त्याला वाटली. नेपोलियनने नंतर गटेच्या शोकांतिकांचा उल्लेख केला. तो म्हणाला, शोकांतिका या राज्यकर्ते व लोक यांना शिक्षण देणाऱ्या शाळा आहेत. शोकांतिका ही कवीच्या प्रतिभेची कमाल असते. गटेने सीझरच्या जीवनावर नाटक लिहावे अशी सूचना नेपोलियनने केली व पॅरिसला येण्याचा आग्रह केला. गटे या भेटीने फारच प्रभावित झाला. १६-७-७८ ⊙

एक शोकात्म व्यक्तिमत्त्व – लिओ टॉलस्टॉय

टॉलस्टॉयची दीडशेवी जयंती नुकतीच झाली व त्या निमित्ताने अनेक वृत्तपत्रांनी व नियतकालिकांनी खास लेख लिहिले. भारत व रशिया यांच्यातील मैत्रीचा सांस्कृतिक दुवा सांधणारा म्हणूनही त्यांचा गौरव केला गेला. साहित्यिक म्हणून टॉलस्टॉय यांचे योग्य ते मूल्यमापन करण्याऐवजी साहित्यबाह्य गोष्टींनाच महत्त्व देण्यात आले. गांधींनी टॉलस्टॉय यांच्यापासून स्फूर्ती घेतली होती काय, गांधींच्याबद्दल टॉलस्टॉय यांचे काय मत होते, याचे उल्लेख करण्यात आले. परंतु टॉलस्टॉय यांची जी जीवनदृष्टी होती तिचा खोलात जाऊन कोणी फारसा विचार केला असे या लेखांवरून दिसत नाही. त्यांच्या जीवनदृष्टीकोनातून आजचा भारत व आधुनिक रशिया यांच्यात सुसंवाद आहे की नाही याचीही जाणीव न ठेवता केवळ टॉलस्टॉय यांच्या महर्षीपदाची स्तुती करण्यात आली. जन्मतिथीच्या निमित्ताने जुजबी लिखाणच खूप झाले. साहजिकच आयसाय बर्लिन यांनी टॉलस्टॉय यांच्यासंबंधी केलेल्या मार्मिक लिखाणाचा उल्लेख कुठेही आला नाही. आयसाय बर्लिन हे एक गाढे विद्वान आहेत. त्यांचे घराणे मुळचे रशियन ज्यू. फार काळापूर्वी ते इंग्लंडमध्ये आले. आयसाय बर्लिन हे ऑक्सफर्ड विद्यापीठात प्राध्यापक होते. (अद्यापही ते तेथेच असू शकतील.) मार्क्सवरील त्यांचे छोटेच पण उत्कृष्ट

पुस्तक आहे. स्वातंत्र्याबद्दलचीही त्यांची व्याख्याने प्रसिद्ध आहेत. टॉलस्टॉयबद्दल त्यांनी दिलेले व्याख्यान 'हेजहॉग ॲन्ड द फॉक्स' हे पुस्तिकेच्या रूपाने प्रसिद्ध झाले होते. परंतु आता त्यांचे लेख 'रशियन थिंकर्स' या नावाने प्रसिद्ध झाले असून (होगार्थ प्रेस, ६ पौं. ९५ पेन्स) त्यात 'हेजहॉग ॲंड द फॉक्स' याबरोबरच 'टॉलस्टॉय ॲंड एन्लायटन्मेंट' हाही लेख आहे. इंग्रजीखेरीज रशियन, फ्रेंच, जर्मन, इटालियन अशा भाषांवर प्रभुत्व असलेल्या आयसाय बर्लिन यांच्यासारख्यांचा ग्रंथ वा लेख वाचल्यावर; बुद्धिवंत कसा असावा आणि असतो याची यथार्थ कल्पना येईल आणि आपण तो शब्द किती सवंग बनवला आहे याचीही येईल.

दुटप्पीपणा

फार मोठा विचारवंत असा टॉलस्टॉयचा गौरव होतो आणि गांधींना त्यांच्या नैतिक व आर्थिक विचारांचे आकर्षण असल्याने यासंबंधातील त्यांचे श्रेष्ठत्व आपल्याकडे अचिकित्सक रीतीने स्वीकारले जाते. पण आयसाय बर्लिन यांनी आपल्या लेखाची सुरवातच एका रशियन समीक्षकाच्या वाक्याने केली आहे. तो म्हणतो, 'टॉलस्टॉयबद्दल दोन गोष्टी प्रामुख्याने सांगता येतील. एक म्हणजे तो उत्कृष्ट कादंबरीकार होता आणि निकृष्ट विचारवंत होता.' वस्तुनिष्ठ

विचारवंताप्रमाणे त्याचे मत हे समतोल नाही. तो सतत व अंतिम स्वरूपाचे प्रश्न विचारतो आणि दुसऱ्यांबरोबर स्वतःच्याही मनाची शांती नष्ट करतो. मानवप्राणी हा निष्कलंक असा जन्माला येतो; पण त्यानंतर तो त्यानेच निर्माण केलेल्या संस्था, व्यवस्था यांनी बिघडून जातो, असे टॉलस्टॉयचे मत होते. विचारवंत आणि आधुनिक सुधारणांचा प्रभाव पडलेले तज्ज्ञ हे सर्वच आपले निष्पाप मन कलंकित करतात अशी टॉलस्टॉयची समजूत असल्याने तो तज्ज्ञांच्या विरुद्ध आहे. त्यांच्यामुळे समाजाची अधोगती झाली, असे त्याला वाटते. हा जो ज्ञानविरोध आहे तो गांधीवादाला आकर्षक वाटणे साहजिकच आहे; कदाचित असे म्हणता येईल, की कम्युनिस्टांनीही खऱ्या ज्ञानाच्या विरोधी भूमिका घेऊन साचेबंद विचारांचा अवलंब केल्याने त्यांनाही हे मान्य असेल. पण या सृष्टीच्या नियमांची, मानवी व्यवहाराची खोलात जाऊन चौकशी करण्याची वृत्ती युरोपात वैचारिक क्रांतीपासून प्रगट झाली; आणि त्यातून आधुनिक वैज्ञानिक संस्कृतीचा जन्म झाला. या वृत्तीला मात्र टॉलस्टॉय यांचे विचार मारक आहेत. या आधुनिक संस्कृतीचे फायदे घ्यायचे, नवे कारखाने उभे करायचे आणि तरीही तज्ज्ञांना विरोध करायचा हा दुटप्पीपणा झाला. टॉलस्टॉयचा शासनसंस्थेलाही (स्टेट) विरोध होता. क्रांतीनंतर रशियात शासनसंस्था बळकट आणि निर्घृण झाली. मग टॉलस्टॉयशी आधुनिक रशियाचे नाते काय?

हाच प्रश्न आपल्याही बाबतीत विचारता येईल. रशियाप्रमाणे आपल्या येथील शासनव्यवस्था निर्घृण नाही. पण ती बळकट आहे आणि तिच्या सामर्थ्यापुढे व्यक्ती किती दुर्बल बनते हे आणीबाणीच्या काळात दिसून आलेच आहे.

आपल्याला काय हवे?

टॉलस्टॉयचे असेही मत होते, की मानवप्राणी हा बालवयात निष्पाप असतो, पण पुढे शिक्षणाबरोबर तो कलंकित होत जातो. शिक्षणाचा अभाव म्हणजे निसर्गाकडे परत जाणे आले. आपल्याला हे हवे आहे काय? आधुनिक संस्कृतीचा वारा न लागलेले आदिवासी हे निष्पाप असतील, पण त्यांचे जीवन सुखी व समृद्ध आहे असे मानता येईल काय? टॉलस्टॉयच्या या भूमिकेमुळे शेतीप्रधान संस्कृती त्याला पाहिजे होती असे स्पष्ट दिसते. तो शेतकऱ्यांना प्राधान्य देतो आणि यंत्रयुगाचा तिटकारा करतो. स्वयंपूर्ण ग्रामराज्ये, शेतीप्रधान समाज हे त्याला अभिप्रेत आहे. या प्रकारचा समाज निर्माण झाला की तो अधिक स्वतंत्र होईल; मग युद्ध, सरकारी दडपशाही, तुरुंग यांची गरज उरणार नाही असे टॉलस्टॉयना वाटे.

याउलट मार्क्सने शेतकऱ्यांविषयी कमालीचा तिरस्कार व्यक्त केला आहे आणि स्टालीनने जी समाजव्यवस्था उभी केली ती शेतकऱ्यांच्या कत्तली करूनच. युद्ध, दडपशाही व तुरुंग यांना स्टालीनने महत्त्व दिले आणि अद्यापही कम्युनिस्ट व्यवस्थेत ते कायम आहे. मग टॉलस्टॉयशी आधुनिक रशियाचे नाते काय? आणि तो रशिया व भारत यांच्यातील सांस्कृतिक दुवा आहे या म्हणण्यात तरी काय अर्थ आहे?

कम्युनिस्टांशी काय नाते?

आयसाय बर्लिन यांनी टॉलस्टॉयवरील आपल्या प्रदीर्घ लेखात लेखक व विचारवंत यांचे दोन स्थूल वर्ग कल्पिले आहेत. लेखक वर्ग हा एका विशिष्ट कल्पनेने, आदर्शाने भारावलेला असतो. त्याच कसोटीवर तो मानवी व्यवहाराची तपासणी व चित्रण करतो. दुसरा वर्ग अनेक कल्पनांनी, आदर्शांनी आकर्षित झालेला असतो. डोस्टोव्हस्की, टॉलस्टॉय वगैरे अनेक रशियन लेखक हे एका कल्पनेने, आदर्शाने भारावलेले होते. टॉलस्टॉयना इतिहासात स्वारस्य होते; पण पूर्वी काय झाले याचा तपास करावा हा हेतू यामागे नव्हता, तर ज्या घटना घडल्या त्या तशाच का घडल्या, त्यामागे मूलतत्त्व, मूल कारण कोणते याचा त्यांना शोध घ्यावासा वाटत असे. हे कारण अनेकदा हाती लागत नसल्याने इतिहास म्हणजे बहिऱ्या माणसासारखा आहे असे ते म्हणत. बहिरा माणूस न विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देतो तशी इतिहासाची अवस्था टॉलस्टॉयना दिसत होती. त्यांची ही कल्पना जे ग्राह्य मानतील त्यांना मार्क्सच्या विरोध विकासी भौतिकवादी ऐतिहासिक मीमांसेचा पुरस्कार करता येणार नाही. यात विसंगती असल्याने आधुनिक रशिया टॉलस्टॉयचा वारसा कसा सांगू शकेल?

एका व्यक्तीच्या हाती प्रचंड सत्ता देण्याला किंवा त्या व्यक्तीलाच सर्व ज्ञान असते असे मानण्याला टॉलस्टॉय तयार नव्हते. नेपोलियन हा प्रचंड बुद्धीचा, असामान्य प्रतिभेचा माणूस असून तो घटना नियंत्रित करतो अशी समजूत होती. टॉलस्टॉयना हे मान्य नव्हते. एखाद्या व्यक्तीच्या अंगी याप्रकारचे गुण असल्याचा दावा करणे वास्तवाशी विसंगत आहे असे टॉलस्टॉयना वाटत असल्याने मानवी शोकांतिकेचे दर्शन 'वॉर अँड पीस' मध्ये घडवताना नेपोलियनची व्यक्तिरेखा ही त्यांनी असामान्य अशी रंगवली नाही; तर दयनीय अशी रंगवली आहे.

आता स्टालीनच्या चुका रशियनांनी मान्य केल्या, तरी मार्क्स व लेनिन यांच्याही विचारांची फेरतपासणी होऊ शकते ही भूमिका ते वा कम्युनिस्ट घेऊ शकत नाहीत. पण म्हणूनच त्यांचे व टॉलस्टॉयचे नाते उरत नाही.

आयसाय बर्लिन म्हणतात, की टॉलस्टॉय हे या प्रचंड जीवनप्रवाहात पोहणारे आहेत; ते यात कुशल आहेत. पण या प्रवाहाच्या तळाशी काय आहे याचा ते सतत शोध घेत असतात. त्याहीपेक्षा आपण काय आहोत आणि नैतिक-दृष्ट्या आपण कोण असावयास हवे याबाबतीत त्यांच्या अंतर्मनात सतत झगडा चालू होता. त्यांचे अनेक भक्त होते, सारे जग त्यांच्या साहित्यकृतींचे कौतुक करीत होते; पण त्यांच्या अंतर्मनातील संघर्षाने ते विदीर्ण झाले होते. जगाच्या रंगभूमीवरील ही एक कमालीची शोकात्म अशी व्यक्तिरेखा आहे. २२-१०-७८ ◉

वेबस्टर-डिक्शनरी

मेरियम वेबस्टर डिक्शनरीची तिसरी व ताजी आवृत्ती आता येथेही मिळू लागली आहे. या डिक्शनरीत साडेचार लाख शब्द आहेत आणि त्यांचे विविध अर्थ, अर्थांच्या छटा सुबोधपणे दिल्या आहेत. या तिसऱ्या आवृत्तीसाठी ३५ लाख डॉलर्स एवढा खर्च आला. शब्दांच्या वापरासाठी चौदा हजार लेखकांच्या ग्रंथांचा हवाला दिलेला दिसेल. अचुकपणा, अर्थाची व्यापकता हे जे डिक्शनरीचे मुख्य विशेष हवेत त्याबद्दल कटाक्ष बाळगलेला येथे दिसेल. एकूण ७५७ संपादक यासाठी काम करीत होते. याखेरीज २०० सल्लागार नेमलेले होते. गणित, पदार्थविज्ञान, अणुविज्ञान, भाषाशास्त्र, अर्थ व राज्यशास्त्र अशा विविध ज्ञानशाखांचा एकेक तज्ज्ञ हा डिक्शनरीच्या मंडळावर कायम नेमलेला होता. केवळ दुसऱ्या एखाद्या डिक्शनरीत शब्द आहे म्हणून तो येथे घेतलेला नाही. असंख्य आकृत्या, रंगीत चित्रे यांचाही सढळ उपयोग केलेला आढळेल. वैद्यकीय शाखा असो वा प्राणीशास्त्र, त्यातील विविध शब्दांचे अर्थ दिलेले आहेत. युद्धकाळात व नंतर इंग्रजी भाषेत असंख्य शब्दांची भर पडली. त्यांचा अंतर्भाव या डिक्शनरीत आहे. महाविद्यालये, शिक्षणसंस्था, विद्यापीठे यांना इतकी उत्तम व अद्ययावत डिक्शनरी दुसरी मिळणार नाही.

वेबस्टर डिक्शनरी हे नाव तिचे पहिले जनक जे नोव्हा वेबस्टर यांच्यावरून पडले. १६ ऑक्टोबर १७५८ ला त्यांचा जन्म झाला व २८ मे १८४३ साली ते निधन पावले. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध त्यांनी पाहिले आणि संघराज्यात्मक घटना असावी यासाठी प्रचार करणारात ते होते. नवे राष्ट्र उभारताना केवळ भौतिक गोष्टींचाच विचार करून चालत नाही, तर त्यांच्या वैचारिक घडणीचीही व्यवस्था केली पाहिजे हा विचार करून वेबस्टर यांनी डिक्शनरी तयार करण्याचे कार्य अंगावर घेतले. त्यासाठी त्यांनी अमेरिका पालथी घातलीच, पण फ्रान्स व इंग्लंड येथेही वर्षभर वास्तव्य करून तेथील शब्दकोषांचे काम अभ्यासिले. १८२८ मध्ये म्हणजे वयाच्या सत्तराव्या वर्षी त्यांची डिक्शनरी प्रसिद्ध झाली. तिच्या अडीच हजार प्रती खपल्या. त्यांनी आपल्या डिक्शनरीत अनेक तांत्रिक, शास्त्रीय शब्दांचा समावेश केला. पुढे १८४१ साली म्हणजे वयाच्या ८३ व्या वर्षी त्यांनी आपल्या डिक्शनरीची सुधारलेली आवृत्ती प्रसिद्ध केली. वेबस्टर यांच्या मृत्यूनंतर जॉर्ज व चार्लस् मेरियम यांनी डिक्शनरीचे हक्क विकत घेतले. १८४७ ची आवृत्ती ही पहिली मेरियम-वेबस्टर डिक्शनरी म्हणून समजण्यात येते. त्यानंतर ही तिसरी आवृत्ती आहे. डिक्शनरी अद्ययावत् करण्यासाठी येणारा खर्च व खटाटोप पाहता या विसाव्या शतकातील तरी वेबस्टर डिक्शनरीची ही शेवटची आवृत्ती ठरेल व पुढील शतकात पुढील आवृत्ती प्रसिद्ध होईल. इंग्रजी भाषेच्या अभ्यासकांना या डिक्शनरीसारखा चांगला सोबती नाही. १६-२-७५ ◉

आर्थर कोस्लर यांच्या वयाला गेल्या सप्टेंबरमध्ये सत्तर वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने 'अस्ट्राइड टू कल्चर्स' (प्र. हचिन्सन किं. साडेपाच पौंड) हा गौरवग्रंथ प्रसिद्ध करण्यात आला आहे. कादंबरी, विज्ञान, राजकारण अशा विविध क्षेत्रांत नाणावलेले कोस्लर हे बॉबी फिशर व स्पास्की यांच्या बुद्धिबळ सामन्यावरही लिहितात आणि कोपरनिकस वगैरेंचे जीवन व कार्य यावरही ग्रंथ लिहितात. 'डार्कनेस ॲट नून' या त्यांच्या कादंबरीने इतिहास निर्माण केला. पाच लाखांवर प्रती एकट्या फ्रान्समध्ये खपलेल्या या कादंबरीत स्टालीनच्या अत्याचारी राजवटीवर विदारक प्रकाश टाकला असून ही कादंबरी जाळून टाकण्याचे प्रयत्न फ्रेंच कम्युनिस्टांनी केले, पण ते फोल ठरले. उलट निवडणुकीत त्यांचा मोठा पराभव होण्याच्या कामी ही कादंबरीच प्रभावी ठरली.

गौरवग्रंथात कोस्लर यांची जीवनदृष्टी, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान इत्यादी क्षेत्रांतील त्यांचे विचार यावर जाणकारांचे लेख आहेत. त्याचप्रमाणे काही व्यक्तिविषयक आहेत. जॉर्ज ऑर्वेल हे कोस्लर यांचे मित्र होते. पण आपल्या मित्राच्या पुस्तकांचा विशेष कठोर परामर्श घेण्याची ऑर्वेल यांची सवय होती. त्यांनी 'डार्कनेस ॲट नून'ची अनेक वैशिष्ट्ये न्यू स्टेट्समनमधील लेखात स्पष्ट केली, पण तीवर टीका करताना म्हटले, की एकट्या स्टालीनला दोष देता येत नाही. सर्व बोल्शेव्हिक सारखेच होते. न्यू स्टेट्समनचे संपादक किंग्स्ले मार्टीन यांनी पुन्हा या कादंबरीचे परीक्षण केले आणि ती कशी उत्कृष्ट आहे, प्रभावी आहे याचे दिग्दर्शन केले. ऑर्वेल व कोस्लर यांनी अनेक मोहिमा काढल्या, दोघांनाही स्पॅनिश यादवी युद्धाचा प्रत्यक्ष अनुभव होता. पुढे ऑर्वेल हे मरण पावले. कोस्लर यांनी ऑर्वेल यांच्यावर लिहिलेला मृत्युलेख गाजला. 'डार्कनेस ॲट नून' या कादंबरीने कोस्लर यांचे नाव झाले खरे, पण इंग्लंडमध्ये इंग्लिश लेखक होण्याची प्रेरणा त्यांना ऑर्वेल यांच्यामुळेच मिळाली होती.



आर्थर कोस्लर नाबाद ७०

काही मदतमोहिमा

आर्थर कोस्लर यांच्या लेखनसंसाराचे चित्र त्यांच्या पत्नीने या गौरव-ग्रंथात रंगवले आहे. एक पुस्तक लिहून संपवून दुसरे सुरू करण्याच्या मधल्या काळात कोस्लर अतिशय अस्वस्थ असतात, पण मग ग्रंथलेखन सुरू केले, की ते संपवण्याची त्यांना एवढी घाई का असते याचे उत्तर त्यांच्या पत्नीला मिळालेले नाही. कोस्लर हे सामाजिक जाणीव असलेले लेखक असून त्यांनी अनेक मदतमोहिमा हाती घेतल्या. यामुळेही त्यांना काही चांगले व काही वाईट अनुभव आले. जॉन ग्रिग यांनी या मोहिमेची माहिती करून दिली आहे.

कोस्लर स्वतः निर्वासित, अनिकेत होऊनच इंग्लंडमध्ये आले. दुसऱ्या युद्धाचे वेळी व त्यानंतरही अनेक लेखक निरनिराळ्या देशांत निर्वासित झाले. त्यांच्या मदतीसाठी कोस्लर यांनी एक निधी स्थापन केला. आपल्या पुस्तकाच्या रॉयल्टीचा दहा टक्के भाग या निधीत लेखकांनी द्यावा असे आवाहन त्यांनी केले. आल्डस हक्स्ले, स्टीफन स्पेन्डर वगैरे या मोहिमेत सामील झाले. कोस्लर यांचे 'डार्कनेस ॲट नून' या कादंबरीवरील नाटक तेव्हा न्यूयॉर्क येथे चालू होते. त्याचे चार हजार डॉलर्स त्यानी या निधीला देऊनच मोहीम सुरू केली.

स्पेनच्या तुरुंगात त्यांना फाशीची शिक्षा झाली होती, पण नंतर त्यांची सुटका झाली. त्यानंतर त्यांनी देहांताची शिक्षा रद्द करावी यासाठी मोठी प्रचारमोहीम काढली. ऑब्झर्व्हर पत्राने तिला साथ दिली. तुरुंगातील कैद्यांतील कल्पनाशक्ती, कलागुण यांनाही वाव देणे अगत्याचे आहे, असे वाटून त्यांनी कथा, कादंबरी, चित्रकला इत्यादींची स्पर्धा लावून बक्षिसे देण्याचे जाहीर केले. दरवर्षी चारशे पौंड म्हणजे आठ हजार रुपये व्याज येईल एवढा निधी त्यांनी स्वतःच्या पैशातून स्थापन केला. या स्पर्धेला उत्तम प्रतिसाद मिळाला. ब्रिटिश सरकारच्या गृहमंत्र्यांनी या मोहिमेचे स्वागत केले. निधी मग वाढत गेला, तेव्हा या पारितोषिकाला आपले नाव न देता दुसरे काही द्यावे असे कोस्लर यांनी सुचवले, पण गृहमंत्री वगैरेंनी ते ऐकले नाही.

१५-२-७६ ⊙

मानवी मेंदूच्या मर्यादा : कोस्लर यांचा नवा वैज्ञानिक ग्रंथ

आर्थर कोस्लर यांची बुद्धी अनेक विषयांत चालत असते. कादंबरीचे क्षेत्र त्यांनी प्रायः सोडले आहे व ते मुख्यतः विज्ञान आणि तत्त्वज्ञान यांच्याकडे वळले आहेत. कोस्लर हे मूलतः विज्ञानाचे विद्यार्थी व जर्मन वृत्तपत्रांत विज्ञानविषयक लिखाण ते फार पूर्वी करीत. आता गेल्या पंचवीस वर्षांतील विज्ञानविषयक साहित्याचा उपयोग करून त्यांनी लिहिलेले नवे पुस्तक (जेनस) प्रकाशनाच्या मार्गावर असून त्याचा काही भाग लंडनच्या ऑब्झर्व्हरने प्रसिद्ध केला आहे. यात त्यांनी मानवी मेंदूच्या मर्यादांची चर्चा केली आहे.

कोस्लर यांच्या विवेचनाचे सार असे : ६ ऑगस्ट १९४५ रोजी हिरोशिमावर अणुबॉंब पडला तोपर्यंत मृत्यू ही एकप्रकारे वैयक्तिक बाब होती. युद्धात सामुदायिक हत्या होत होती हे खरे; पण अणुबॉंबने मानवजात नष्ट करण्याची शक्ती निर्माण झाली. मानवी जीवन क्षणभंगुर आहे, पण मानवजातीचे अस्तित्व कायम आहे असे आपण मानत आलो. अणुबॉंबने मानवजातीचे अस्तित्व धोक्यात आले. मानवजातीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मानसिकदृष्ट्या रोगिष्टपणा. मानवाच्या इतिहासात प्राचीन काळापासून युद्धे होत आली आहेत. आधुनिक काळातही या युद्धांना तोटा नाही. १९४६ ते ६६ या काळात ४० युद्धे पारंपरिक शस्त्रास्त्रांनी लढली गेली. बर्लिनची कोंडी व क्युबा प्रकरणी अणुयुद्ध होण्याचा धोका निर्माण झाला.

मानवी बुद्धीच्या मर्यादांचा विचार केला, तर एकीकडे तंत्रकौशल्य फार मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसेल, तर दुसरीकडे मानवी समाजाला आपला व्यवहार मात्र कार्यक्षमतेने करता आलेला नाही, हेही मान्य करावे लागेल. निरनिराळ्या ग्रहांभोवती फिरणाऱ्या कृत्रिम उपग्रहांचे नियंत्रण करणे आपल्याला शक्य आहे, पण उत्तर आयर्लण्डचा प्रश्न मात्र सोडवता येत नाही. ही पृथ्वी सोडून मानव प्राणी चंद्रावर उतरू शकतो, पण पूर्व बर्लिनमधून प. बर्लिनमध्ये येणे कठीण जाते. उपग्रहांवर शस्त्रास्त्रेही पाठविण्याची व्यवस्था झाली असता आपल्या नद्या स्वच्छ कशा राहातील, हवा दूषित कशी होणार नाही याची चर्चा व त्यासाठी प्रयत्न करण्याचे कारण काय? अर्थात मानवजातीच्या नाशाची निश्चिती झाली आहे असे नव्हे. पण हे संकट टाळायचे असेल, तर केवळ युनोमध्ये ठराव होऊन भागणार नाही. त्यासाठी अधिक मूलभूत उपाय योजावे लागतील.

या उपायांचा विचार करताना मानवाच्या उत्क्रांतीतच काही दोष राहून गेला आहे काय, हा प्रश्न लक्षात घेणे भाग पडते. मानव प्राणी उत्क्रांत होईपर्यंत अनेक प्राणी निर्माण झाले व नाहीसे झाले. पण मानव प्राणी उत्क्रांत होण्याच्या अखेरच्या टप्प्यातच काहीतरी घोटाळा झाला असला पाहिजे. मानवातील युद्धे, निसर्गावर मात करण्याची त्याची बुद्धी आणि आपला व्यवहार करण्यातील अपयश, विचारशक्ती आणि द्वेषभावना व भावनात्मकतेचा प्रभाव अशी ही उत्क्रांतीच्या शेवटच्या टप्प्यातील दोषाची लक्षणे दिसतात. या संदर्भात तपासणी केली, तर सर्पादी प्राण्यांचा मेंदू आणि मानवी मेंदू यांची तुलना करणे भाग आहे. तशी तुलना केली तर मानवी मेंदूत सुसूत्रता साधण्याची व्यवस्था कमी दिसेल. जीवसृष्टीत मेंदूची उत्क्रांती होत गेली असून सर्पाच्या जातीतील प्राण्यांचा मेंदू हा सर्वात प्राचीन मानला जातो. दुसरी पायरी सस्तन प्राण्यांच्या मेंदूची व तिसरी मानवाची. या प्रत्येक अवस्थेतील मेंदूला स्वतःची जाणीव होत असते. काळ व स्थळ यांची कल्पना असते. गेल्या असंख्य वर्षांत या मेंदूची जी वाढ झाली, तिचे वर्णन करता लोकसंख्येच्या स्फोटाची उपमा द्यावी लागेल. मेंदूचा स्फोट असे या संदर्भात म्हणणे योग्य.

प्रारंभी जी भावनात्मकता होती तीवरच विचारशक्तीचे कलम झाले पण या दोघांची बेमालूम सांगड घातली गेली नाही. यामुळे मानव हा विचारशक्ती असलेला प्राणी झाला असला तरी विवेकी बनला असे नव्हे. म्हणून काही श्रद्धा, समजुती, अंधश्रद्धा यांच्यासाठी वाटेल त्या मर्यादेपर्यंत हिंसा करण्यास तो मागेपुढे पाहात नाही. एखादे तत्त्वज्ञान, ध्येय हे चुकत असले तरीही त्याच्या वेडापायी तो कोणताही त्याग करण्यास, हालअपेष्टा सहन करण्यास तयार होतो. यावरून एक निष्कर्ष असा निघतो, की मानवी प्राण्यापाशी कमालीची आक्रमणशीलता आहे असे नव्हे, तर आंधळी भक्ती, श्रद्धा आहे आणि त्यापायी तो आत्मघातास तयार होतो. म्हणून धर्मपीठ, वंश, घराणे, समाजव्यवस्थेचे एखादे चित्र अशा कारणास्तव लोक जान कुर्बान करतात. द्वेषापेक्षा निष्ठेपायी रक्तपात होतो. आणि मग मानवात संवाद होत नाही. एका जातीचा कुत्रा दुसऱ्या जातीच्या कुत्र्याची भाषा समजू शकतो, पण वाचाशक्ती मिळालेल्या मानवांना मात्र संवाद करता येत नाही व साधत नाही. शब्द ही अमोघ शक्ती खरी, पण शब्दांनी उत्कृष्ट काव्य निर्माण होते त्याचप्रमाणे हिटलरची भाषणेही होतात. यामुळे 'हो वा नाही म्हण; बाकीचे शब्द हे सैतानाचे असतात' हे बायबलमधील वचन मननीय ठरते.

शास्त्रज्ञ व हिटलर

शास्त्रज्ञांचा विषय निघाला तेव्हा या संदर्भात न्यू स्टेट्समनमधील एका ग्रंथपरीक्षणाचा उल्लेख करणे योग्य ठरेल. 'सायन्टिस्ट्स् अंडर हिटलर' या ग्रंथाचे हे परीक्षण असून त्यावरून असे दिसते, की बहुसंख्य शास्त्रज्ञ हिटलरच्या राजवटीत गप्प होते; त्यांनी प्रतिकार केला नाही. आयन्स्टिनसारखा पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ हा नाझीवादाचा प्रारंभापासून विरोधी होता. यामुळे या शाखेतील जर्मन शास्त्रज्ञांपैकी कित्येकांनी आयन्स्टिनचा मार्ग पत्करलेला दिसतो; पण इतर शाखांतील शास्त्रज्ञांबद्दल असे म्हणता येत नाही. तसे पाहिल्यास जर्मन शास्त्रज्ञांची परंपरा ही अ-राजकीय आहे आणि व्यक्तिगत विचार केला तर त्यापैकी बरेचसे सनातनी परंपरेचे आहेत. आयन्स्टिनने नाझीवादाला विरोध केला खरा; पण त्यालाही विरोध

हिटलरपूर्वीच सुरू झाला होता. यात प्रमुख भाग होता तो फिलिप लेनार्ड याचा. पुढे त्यानेच 'आर्य पदार्थविज्ञाना'चा पुरस्कार केला. त्याचा सहकारी स्टार्क हा होता.

या दोघांचा सिद्धांत असा, की खरी जर्मन परंपरा ही अनुभव व जर्मन जीवनातील वास्तवता यावर आधारित आहे, उलट आयन्स्टिन वगैरे ज्यूंनी अमूर्त कल्पना आणि गणित यावर भर दिला व त्यामुळे ते या परंपरेशी इमानदार नव्हते. अर्थात या आर्य पदार्थविज्ञानाला विद्वानांचा प्रतिसाद मिळाला नाही. पुढे हिटलरच्या कारकीर्दीत विद्यापीठातून विश्वासार्ह शास्त्रज्ञांची भरती होऊ लागली. याचा विपरीत परिणाम जर्मन पदार्थविज्ञानाच्या विकासावर झाला. परदेशांशी विज्ञानाच्या क्षेत्रातही संबंध तुटल्याने त्याचाही परिणाम चांगला झाला नाही. अनेक नामवंत शास्त्रज्ञ खाजगी उद्योगधंद्यात काम करू लागले व त्यामुळे संशोधनाची प्रगती खुंटली. याप्रकारे विज्ञानाच्या प्रगतीला विरोध असे वातावरण हिटलरशाहीत तयार झाले असता तिला शास्त्रज्ञांनी प्रतिकार केला काय? याचे उत्तर नकारार्थी मिळते. पण परीक्षणलेखक म्हणतो, याबाबत त्यांना दोष देण्याचा आपल्याला अधिकार काय? आपणही तसेच केले असते. परीक्षणातील हे आत्मपरीक्षण उल्लेखनीय ठरेल. १२-२-७८ ◉

क्रॉसमन रोजनिशी

रिचर्ड क्रॉसमन हे ब्रिटिश मजूर पक्षातील एक ढंगदार गृहस्थ. गेल्या वर्षी ते कॅन्सरने वारले. १९६४ साली मजूर पक्षाच्या हाती सत्ता आली तेव्हा ते घरबांधणी खात्याचे मंत्री होते. बेव्हन वगैरेंचा जो ट्रिब्यून गट म्हणून ओळखला जातो त्यात क्रॉसमन होते. 'न्यू स्टेट्स्मन'मध्ये ते दीर्घकाळ सहसंपादक होते व काही काळ संपादकही झाले. त्यांना संपादकपदावरून दूर करण्यात आले तेव्हा त्यांनी बरेच वादळ उठवले होते. त्यांचे व्यक्तिमत्व व विचार नेहमीच वादळ उठवीत. मंत्रिपदावर असताना त्यांनी रोजनिशी लिहिली वा खरे म्हणावयाचे तर टेप केली. त्यावरून पुस्तक प्रसिद्ध करण्याचे ठरले. पण सरकारी गुप्तस्वरूपाची माहिती प्रसिद्ध करण्यास तीस वर्षांची मर्यादा असते. त्या आधीच ही रोजनिशी प्रकाशात कशी आणावयाची हा प्रश्न उपस्थित झाला. प्रकाशक व 'संडे टाईम्स'चे संपादक यांच्यावर मनाई घातली गेली. ब्रिटिश मंत्रिमंडळाने एक वरिष्ठ अधिकारी रोजनिशी तपासण्यासाठी नेमला. चार महिने होऊन गेले तरी त्याचा निर्णय होईना. तेव्हा 'संडे टाइम्स'ने लेखमाला सुरू करून क्रॉसमन यांच्या रोजनिशीतील भाग प्रसिद्ध करण्यास प्रारंभ केला.

मंत्री गुप्ततेची शपथ घेतो या स्थितीत त्याने मंत्रिमंडळाच्या बैठकीतील व मंत्र्यामंत्र्यांतील संभाषणे, चर्चा यांना वाचा फोडावी काय याबद्दल दुमत आहे. लोकांना सत्य समजले पाहिजे अशी एक बाजू आहे. दुसऱ्या बाजूचे म्हणणे असे, की एखाद्याने त्याला हवी ती माहिती बाहेर

आणली म्हणजे तेच सत्य असते काय? शिवाय काही व्यक्ती मरण पावल्या आहेत, तर काही अधिकारावर आहेत. सनदी नोकर तर आपली बाजू मांडूच शकत नाहीत. तेव्हा तीस वर्षांचा जो नियम आहे तो साधारणतः बरोबर आहे. क्रॉसमन यांची रोजनिशी आताच प्रसिद्ध व्हावी असे म्हणणारांना हे मान्य नाही. यासंबंधात निर्बंध नको म्हणणारांना धक्का देणारा एक लेख 'लंडन टाइम्स'मध्ये वूड यांनी लिहिला आहे. क्रॉसमन हे ट्रिब्यून गटाचे म्हणजे जहाल विचारसरणीचे, तर हचू गेटस्केल मवाळ मानले जात. पण गेटस्केल यांचे नेतृत्व लाखमोलाचे आहे असे क्रॉसमन यांनी वूड यांच्यापाशी एकदा पार्लमेंटच्या कक्षात म्हटले. ते वूड यांनी प्रसिद्ध केले. तेव्हा क्रॉसमन संतप्त झाले व विश्वासभंग केला, पार्लमेंटच्या सभासदाचा हक्कभंग झाला असा ठराव क्रॉसमन आणणार होते. तथापि नंतर त्यांनी तो आणला नाही ही गोष्ट वेगळी. पण अनिर्बंध प्रकाशन हे क्रॉसमन यांनाही सरसहा मान्य होते असे म्हणणे कठीण.

जिवाजी कलमदाने

क्रॉसमन यांच्या रोजनिशीतील जे हप्ते प्रसिद्ध झाले आहेत त्यांपैकी पहिल्या दोन हप्त्यांत तरी विल्सन यांच्याबद्दल त्यांचा आदर व्यक्त होतो. त्याचप्रमाणे मंत्री हा कितीही अधिकारसंपन्न असला तरी खात्याचा प्रमुख, कारभारयंत्रणेतील लहान-मोठे अधिकारी त्याला अनेकदा निष्प्रभ करतात, त्याचे काही चालूच देत नाहीत याचा प्रत्यय क्रॉसमन यांनी कथन केलेल्या काही प्रसंगांवरून येतो. त्यांना करायच्या भाषणाच्या बरोबर विरुद्ध असे भाषण त्यांना अधिकाऱ्यांनी तयार करून दिले होते. क्रॉसमन यांनी वेगळा परिच्छेद जोडावयास लावला. एका विधेयकाचा मसुदा ते कार्यालय सोडून जाण्याच्या वेळेला घाईघाईने आणून देण्यात आला. क्रॉसमन यांनी नजर टाकताच त्यांना त्या मसुद्यात अनेक अनिष्ट कलमे आढळली. त्याबरोबर पुढील कार्यक्रमाला उशीर करूनही त्यांनी ते सर्व विधेयक तपासून बदलून टाकले. त्यांनी दिलेल्या हुकमांचा वेगळाच अर्थ लावण्यात येत असे व त्यामुळे त्यांचे अधिकाऱ्यांशी खटके उडत. एकदा तर मंत्रिमंडळाच्या बैठकीचे इतिवृत्तच चुकीचे होते. विल्सन जे बोलले नाहीत तेच त्यांच्या तोंडी घालण्यात आले. सरकारी अधिकारी एकमेकांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी किती जपतात हेही या रोजनिशीवरून स्पष्ट होते.

मंत्र्याला सरकारी कारभाराच्या प्रचंड विश्वात काय चालते याची सर्व माहिती असते काय? क्रॉसमन यांच्या मते ती नसते. प्रत्येकजण आपापल्या खात्याचा विचार करतो. क्रॉसमन मंत्री असता ब्रिटन फार मोठ्या आर्थिक संकटात होते, पण त्याची पूर्ण कल्पना त्यांना बरेच दिवस नव्हती. मंत्रिमंडळाच्या बैठकीला प्रत्येक मंत्री आपल्या खात्याच्या मागण्या घेऊन येतात आणि त्यांना इतर खात्यात काय चालले आहे हे माहितही नसते. ब्रिटनला पौन्डाचे अवमूल्यन लवकरच करावे लागेल ही माहिती एका पत्रकाराने क्रॉसमन यांना दिली. मंत्रिमंडळाच्या चर्चेत औपचारिकपणा असतो; परंतु पंतप्रधानाने निरनिराळ्या मंत्र्यांशी संबंध ठेवावयास हवा. निदान १९६४-७० या काळात विल्सन ते ठेवीत नसत. औपचारिक गप्पा, चहापान, भोजन यांच्या ते वाटेला जात नसत. एकटेच राहात. हुजूर पक्षाचे मंत्री सुटीच्या दिवशी त्यांच्या मळ्यावर वगैरे जमत, पार्ट्या देत, पण मजूर पक्षीयांपाशी असे मळे वगैरे नव्हते; पार्ट्याही होत नसत. त्यामुळे जे एकमेकांचे मित्र ते मंत्री होताच दुरावत जात. विल्सन हे तर सर्वांत अधिक दुरावलेले, एकाकी मुख्यमंत्री होते. १६-२-७५ ⊙

नासेरचे स्वभावदर्शन

लॉर्ड ट्रेव्हलिन हे १९५५ सालात इजिप्त-मध्ये ब्रिटिश राजदूत म्हणून नेमले गेले. त्यानंतर सुवेझवरून ब्रिटन व इजिप्त यांच्यात तेढ निर्माण झाली. तथापि त्या काळात व नंतरही लॉर्ड ट्रेव्हलिन यांचे व नासेरचे संबंध व्यक्तिगत मैत्रीचे राहिले. त्यांनी आता 'लंडन टाइम्स'मध्ये लेख लिहून दोघांतील काही संभाषणे उद्धृत केली आहेत. यामुळे नासेरच्या स्वभावाचे दर्शन घडते.

इजिप्तमध्ये नासेरचे एक प्रकारे अवमूल्यनच झाले आहे. नासेरच्या शवयात्रेच्या वेळी अनेक लोक रस्त्यात धाय मोकलून रडत होते. पण लोक-जीवनाचा प्रवाह पुढे वेगळ्या दिशेने वाहात राहिला आणि आता मात्र नासेरचे आपण मित्र होतो हे सांगण्याने इजिप्तमध्ये फारसा फायदा होत नाही अशी आज तरी स्थिती आहे. याच कारणास्तव दुबाईत नासेरचा पुतळा उभारण्या-साठी चौथरा बांधला गेला असला तरी त्यावर पुतळा उभारला गेला नाही व यापुढे तो उभारला जाईल असेही दिसत नाही.

लॉर्ड ट्रेव्हलिन हे राजदूत होते तरीही नासेरचे व त्यांचे सख्य जमले होते आणि सुवेझवरून इजिप्त व ब्रिटनमध्ये तेढ निर्माण होऊनही या दोघांतला वैयक्तिक स्नेह चालू राहिला. म्हणून १९७० साली लॉर्ड ट्रेव्हलिन कैरोला गेले तेव्हा त्यांचे चांगले स्वागत झाले. नासेरशी स्नेहाचे



संबंध असल्याने ट्रेव्हलिन अनेक विषयांवर त्यांच्याशी मोकळेपणाने गप्पा गोष्टी करीत. यातीलच काही त्यांनी आपल्या लेखात नमूद केल्या आहेत. त्यावरून नासेर हा कट-कार-स्थानात किती वाकबगार होता, आणि त्याचा स्वभावच कारस्थानी होता हे स्पष्ट होते.

फरुक विरुद्ध उठाव करून इजिप्शियन लष्क-राने सत्ता ताब्यात घेतली तेव्हा नगीब हा प्रमुख होता. पण त्याला नासेरने पदच्युत केले. त्या काळात ब्रिटिश व फ्रेंच यांची साम्राज्यसत्ता उतरणीला लागली होती. अशा वेळी अमेरिका व रशिया यांची मदत घेऊन युरोपियनांचे वर्चस्व नष्ट करण्याचा नासेरचा मनसुबा होता. म्हणून त्याने अरब राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. पण त्याच्या राष्ट्रवादात अरब देशांच्या स्वातंत्र्य-वादाला फारशी किंमत नव्हती. उलट सर्व अरब जगतावर इजिप्तचे म्हणजे आपले वर्चस्व स्थापन करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. प्रण सीरि-याशी त्याचे जमले नाही. लेबॅनॉन, जॉर्डन, सौदी अरेबिया या देशांत त्याला पाहिजे ते राज्य-कर्ते राज्यावर आणता आले नाहीत. येमेनमध्ये त्याने हस्तक्षेप केला, पण तो फसला आणि त्याच्या शेवटच्या काळात इस्रायलकडून जबर पराभव खाऊन सिनाई वगैरेंचा भाग इस्रायलच्या ताब्यात गेल्याचे त्याला पाहावे लागले. या दृष्टीने त्याचे

राजकीय जीवन हे तसे अपयशीच ठरले.

तथापि लॉर्ड ट्रेव्हलिन म्हणतात की वैयक्तिक जीवनात नासेर वेगळा होता. त्याला गप्पा मारणे आवडे, हास्य-विनोदात त्याला रस होता. त्याच्याशी कधी कंटाळवाणे संभाषण होत नसे. ट्रेव्हलिन यांना त्याने फरुकच्या विरुद्ध कसे कट-कारस्थान केले हे अनेकदा सांगितले. त्या काळात तो रात्र-रात्र बाहेर राही. त्यामुळे त्याच्या पत्नीला संशय आला. पण आपण बाहेरख्यालीपणामुळे रात्री घरी येत नाही असे नसून, फरुकविरुद्ध कट करीत असल्याने बाहेर राहतो हे त्याने तिला पटवून दिले. आपले राजकीय जीवन अशा प्रकारे कारस्थानाने सुरू केल्यामुळे लोकांशी अधिक मोकळेपणाने, त्यांना विश्वासात घेऊन वागण्याचा ट्रेव्हलिन यांचा सल्ला नासेरला मानवला नाही. आपल्या गुप्तहेरखात्याने भाग घेतला की कोटल्याही देशातील क्रांती यशस्वी होत नाही असे तो विनोदाने म्हणत असे, पण अनेक देशातील सरकारे उलथवण्याचे त्याचे प्रयत्न सतत चालत. सुवेझच्या कालव्याचे राष्ट्रीयकरण करण्याचे त्याने ठरवले तेव्हा ब्रिटन स्वारी करील असा त्याला संशय होता. म्हणून ' संडे टाईम्स 'ला मुलाखत देऊन त्याने इशारा दिला, की जर अशी स्वारी होऊन नवे सरकार स्थापन केले गेले, तर देशभर पसरलेले आपले गनिम नव्या पंतप्रधानाचा चोवीस तासांत मुडदा पाडतील!

सुदानमध्ये इजिप्तचे हस्तक लाचबाजीचा प्रयोग करून तेथील सरकार उलथून पाडू पाहातात काय असे लार्ड ट्रेव्हलिन यांनी एकदा नासेरला विचारले. तेव्हा तो म्हणाला, की लाच देण्याचे हे तंत्र आपल्याला मान्य नाही. या संदर्भात त्याने पत्रकारांची निर्भर्त्सना केली. तो म्हणाला, की पत्रकारांसारख्या दुय्यम दर्जाच्या लोकांना लाच देणे सोपे आहे, पण लाचबाजीने काही आपले धोरण पुढे रेटता येत नाही. ज्यांना आपण लाच देतो त्यांना केवळ पैशातच स्वारस्य असते, धोरणात नसते. एकदा जॉर्डनचा विषय निघाला. तेव्हा नासेरने जनरल ग्लबसंबंधीची फाईलच मागवली व ट्रेव्हलिन यांना वघण्यासाठी दिली. जनरल ग्लबच्या कार्यालयातच नासेरने आपला हस्तक ठेवला होता. पण यामुळे नासेरला ग्लब वा जॉर्डन यांच्याबद्दल अचूक माहिती मिळत असेल असे नव्हे. तथापि सुदानबद्दल वेगळा अनुभव आला. इजिप्तच्या संमतीशिवाय सुदानने स्वातंत्र्य जाहीर करावे असे ब्रिटिशांचे प्रयत्न होते. सुदानच्या पंतप्रधानांच्या कचेरीतील नासेरच्या हस्तकाने हे नासेरला कळवले तेव्हापासून सुदान-संबंधी लार्ड ट्रेव्हलिन यांच्याशी कोणतीही चर्चा अथवा व्यवहार नासेरने करण्याचे टाळले.

१९६७ सालच्या इस्त्रायली-अरब युद्धाच्या वेळी शर्म अल शेखवर कब्जा का केला? असा प्रश्न ट्रेव्हलिन यांनी नासेरला विचारला असता त्याने असे उत्तर दिले, की रशियाकडून सीरियाला असे कळवले गेले, की इस्त्रायल हल्ला करणार आहे; म्हणून इजिप्तने शर्म अल शेखचा कब्जा करून तिरान सामुद्रधुनीवर नियंत्रण ठेवण्याचे ठरवले. पण यामुळे इस्त्रायलला आपली कोंडी झाली आहे असे कारण दाखवून हल्ला करण्यास जागा मिळाली. आपण हल्ला करणार अशी खोटीच बातमी इस्त्रायलकडून रशियन हेरांना मुद्दामच दिली गेली नसेल काय? यामुळे इजिप्त चुकीचे पाऊल उचलील व स्वसंरक्षणार्थ हल्ला केल्याचे दाखविता येईल असा इस्त्रायलचा डाव नव्हता काय? या ट्रेव्हलिन यांच्या प्रश्नाने नासेर गोंधळून गेला.

हकीम अमीर हा इजिप्शियन सेनानी नासेरला आपला वारस होईल असे वाटत होते. पण १९६७ सालच्या युद्धातील पराभव, नंतरचा फोल ठरलेला उठाव यामुळे त्याने आत्महत्या केली. त्याला नासेरने मारले असा प्रवाद होता पण ट्रेव्हलिन यांना तो खरा वाटत नाही. अशा रीतीने नासेर हा कारस्थानी स्वभावाचा असल्याने त्याने कोणाचाच विश्वास संपादन केला नाही व त्याचाही कोणावर विश्वास नव्हता.

१३-३-७७ ⊙

इजिप्त, इस्रायल आणि रशिया

इजिप्तचे अध्यक्ष सादात यांनी रशियाबरोबरचा करार रद्द केला असून, रशियन वृत्तपत्रांतून त्यांच्यावर टीका होत आहे. सादात यांनी घेतलेल्या या निर्णयामागे बराच इतिहास आहे आणि तो अगदी नासेरच्या काळापर्यन्त मागे जातो. 'अल अहराम' या प्रख्यात, इजिप्शियन पत्राचे संपादक महंमद हैकल यांनी 'द रोड टू रमझान' हे पुस्तक लिहिले असून, त्यांत इजिप्त व रशिया यांचे संबंध कसे होते, यावर भरपूर प्रकाश टाकला आहे. महंमद हैकल हे नासेर यांचे दोस्त व सादात यांचाही त्यांच्यावर विश्वास. या दोघांच्या बरोबर अनेक महत्त्वाच्या प्रसंगी त्यांनी चर्चा, वाटाघाटी केल्या आहेत. हैकल यांचे हे स्थान लक्षात घेऊन रशियन, अमेरिकन राजदूत वा राज्यकर्ते यांच्याशीही त्यांच्या गाठीभेटी होत. इजिप्तच्या सरकारमधील विचाराची दिशा ओळखण्यासाठी हैकल यांच्या लिखाणाची तपासणी परदेशांत केली जात असे. तथापि सादात हे अध्यक्ष झाल्यानंतर हैकल हे संपादकपदावर फार काळ राहिले नाहीत. हैकल यांनी या पुस्तकात रशियाने इजिप्तला आर्थिक व लष्करी साहाय्य मोठ्या प्रमाणावर केले, याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे; पण नासेर, सादात व हैकल स्वतः यांनी रशियनांना इजिप्त हा तुमची वसाहत होणार नाही, हे अनेकदा बजावले होते. हैकल यांचे या रीतीने लिखाण प्रसिद्ध होऊ लागले, तेव्हा हैकल यांना काढून टाकावे, अशी सूचना रशियाचे अध्यक्ष पॉडगॉर्नी यानी सादात यांच्यापाशी केली होती. हे त्यांनी रशियन राजदूताला सांगितले, तेव्हा त्याने त्यावर विश्वास ठेवला नाही, पण ही गोष्ट खुद्द सादात यांनीच आपल्याला सांगितली, असा गौप्यस्फोट हैकल यांनी केला, तेव्हा राजदूताचा चेहरा गोरामोरा झाला. १९६७ सालापासून नासेर हे हैकल यांना मंत्रीपद देऊ पाहात होते, पण त्यांनी ते नाकारले. अखेरीस १९७० साली त्यांनी मंत्रीपद स्वीकारले. या पदावर राहूनही ते 'अल अहराम'चे संपादक होते व आपला साप्ताहिक स्तंभ चालवीत. पुढे सादात आले. त्यांचे व हैकल यांचे मतभेद झाले व म्हणून हैकल यांनी मंत्रीपद सोडले. सध्या ते ग्रंथलेखन करीत असतात.

सादात

नासेर यांच्या नंतर सादात आले. त्यांनी मॉस्कोची गुप्त वारी केली आणि इस्रायलविरुद्ध लष्करी उपाययोजना एकमेकांच्या सल्ल्याने करावी, अशी सूचना संमत झाली. पण रशियनांचे म्हणणे असे होते, की रशियन

नासेर आणि क्रुशेव ▶

जी आधुनिक विमाने देतील, त्यांचा उपयोग केवळ त्यांच्या परवानगीनेच व्हावा. सादात यावर गरम झाले. त्यांनी विचारले, उद्या इस्रायलने इजिप्तच्या अगदी आतल्या भागावरही बॉम्बफेक केली, तर मी प्रतिहल्ला करण्यासाठी तुमच्या आदेशासाठी वाट पाहात राहू काय? या प्रकारची तावेदारी मी बिलकूल मान्य करणार नाही. त्यानंतर ब्रेझनेव्ह यांनी आपली अट रद्द केली. सादात यांच्या कारकिर्दीच्या प्रारंभीच घडलेल्या या मुलाखतीनंतर दोघांत संशय निर्माण झाला व तो वाढतच गेला. शस्त्र-पुरवठ्यात दिरंगाई आणि नौदलासाठी तळाची मागणी यामुळे रशियाबद्दल सादात यांना संशय येत होता, तर सादात यांच्या राजवटीबद्दल रशियनांना विश्वास वाटत नव्हता, असे हैकल यांनी म्हटले आहे.

हैकल यांनी आणखी एक प्रसंग वर्णन केला आहे. तो असा, की सादात यांना मिग २३ ही तेव्हाची आधुनिक बॉम्बफेकी विमाने देण्याचे आश्वासन रशियाने दिले होते. यासाठी डॉलर्समध्ये पैसे देण्याचे ठरले. पण रशियनांनी मिग २१ ही जुनीच विमाने दिली व त्यासाठी डॉलर्स मागितले. सादात यांनी नकार दिला.

वास्तविक या मिग २१ जातीच्या विमानांचा अनुभव चांगला नव्हता. १९७० साली नासेर असताना या जातीची विमाने इजिप्तमध्ये आली. त्या-वेळी काही इस्रायली फॅन्टम विमाने इजिप्तच्या प्रदेशावर आली असता रशियन वैमानिकांनी त्यांचा पाठलाग केला. क्षणार्धात पाच मिग विमाने जमीनदोस्त झाली. नासेर नंतर हैकल यांना म्हणाले, 'रशियनांना चांगली अद्दल घडली. आपले वैमानिक वाकबगार नाहीत अशी टीका ते करीत. आता त्यांना धडा मिळाला. फॅन्टमपुढे मिग २१ विमाने टिकाव धरू शकत नाहीत हे त्यांना कळले हे बरे झाले!' सादात यांनाही हे टाऊक होते.

रशियनांचे वर्तन

रशियनांचे आढ्यताखोर वर्तन अनेक इजिप्शियन अधिकाऱ्यांना उद्वेगजनक वाटत असे. हैकल यांनी १९६७ सालचा प्रसंग वर्णन केला आहे. वरिष्ठ इजिप्शियन अधिकारी युद्धशास्त्र व शस्त्रास्त्रे यांचे आधुनिक शिक्षण घेण्यासाठी रशियात गेले असता त्यांना नवशिक्या सैनिकांप्रमाणे वागवण्यात आले. इजिप्शियन लष्करी अधिकाऱ्यांचा मान रशियन अधिकारी इजिप्तमध्येही ठेवीत नसत. रशियन नौदल-प्रमुख इजिप्शियन नौदल-प्रमुखाला न भेटताच अध्यक्षाला भेटे. इजिप्शियन अधिकारी हे वरिष्ठ वर्गाचे प्रतिनिधी आहेत म्हणून दुय्यम अधिकारी व सैनिक यांच्याशी संबंध जोडण्याचा प्रयत्न रशियनांकडून होई.

१९७२ साली सादात मॉस्कोला गेले असता मार्शल ग्रेचको यांनी युद्धात यश मिळवायचे तर कोणते गुण हवेत, याविषयी व्याख्यान दिले. ते म्हणाले : तुमच्यापाशी तीन गोष्टी हव्या : एक शस्त्रास्त्रे, दोन शिक्षण, तीन लढण्याची जिद्द. पहिल्या दोन तुमच्या सैन्यापाशी आहेत, पण तिसरी आहे की नाही हे तुम्ही आपल्या मनाला विचारा. सादात यांना हा आगाऊपणा वाटला.

१९७२ सालाचीच गोष्ट. सादात लिबियात गेले होते. इकडे कैरोच्या विमानतळावर काही रशियनांना जकात अधिकाऱ्यांनी अडवले आणि सामान खोलण्यास लावले. त्यांच्यापाशी सोन्याच्या विटा होत्या. १९७० सालापासूनच सोन्याच्या लहान-मोठ्या वस्तू रशियन अधिकारी नेत, पण पुढे विटा नेऊ लागले. शेवटी त्यांना अटकाव झाला. सारी वाहतूक अकरा तास थांबली. सादात यांच्याशी मग संपर्क साधला गेला तेव्हा रशियनांना त्यांच्या सामानासह जाऊ द्यावे असा हुकूम सादात यांनी दिला!

हे सर्व प्रसंग साचत गेले व १९७२ साली सादात यांनी रशियन अधिकाऱ्यांना इजिप्त सोडून जाण्यास फर्मावले. लगोलग पॉडगॉर्नी कैरोला आले. त्यांनी समझोता केला. आता रशियाशी झालेला करार सादात यांनी रद्द केला आहे. ११-४-७६ ◉

गोल्डा मायरची आत्मकथा

गोल्डा मायर यांचे आत्मचरित्र नुकतेच वाचनात आले.

गोल्डा मायर यांचा जन्म रशियातला. किव्ह येथे त्यांचे बालपण गेले. त्यावेळी म्हणजे या शतकाच्या पहिल्या दशकात रशियात ज्यूविरोधी वातावरण होते. आजही त्यात मूलभूत सुधारणा नाही. आपल्या घराखालून अनेक रशियन्स ज्यूविरोधी घोषणा करीत रस्त्याने फिरत असल्याचे गोल्डा मायर यांना आठवते. बालपणच्या या आठवणी आल्हाददायक नाहीत आणि घरच्या गरिबीमुळे 'बालपणीचा काळ सुखाचा' असेही त्या म्हणू शकत नाहीत. कपडे, खाणे-पिणे या सर्वच बाबतीत चणचण होती. आपल्या

वाट्याची कांजी आपल्या धाकट्या बहिणीला दिल्याने आपण कसे भुकेले राहात असू याची त्यांना आठवण आहे. गोल्डाची अनेक भावंडे मरण पावली आणि तरीही तिच्यासह चार जिवंत राहिली. या दारिद्र्यातून मार्ग काढण्यासाठी म्हणून गोल्डाचे वडील अमेरिकेला गेले आणि आपले कुटुंब त्यांनी सासऱ्याकडे ठेवले. गोल्डा व तिची मोठी बहीण शेयना या एकत्र वाढल्या व आपल्या जीवनावर या बहिणीचा फार मोठा परिणाम झाला असे गोल्डा मायर लिहितात. ही बहीण १९७२ साली वारली. वयाच्या चौदाव्या वर्षीच ही शेयना समाजवादी ज्यू चळवळीत होती. ही तेव्हा क्रांतिकारक चळवळ मानली जाई.

१९०६ साली हे कुटुंब अमेरिकेत आले. गोल्डाचे प्राथमिक शिक्षण मिलवाकीत झाले, पुढे उच्च माध्यमिक शिक्षण घेण्याची गरज नाही असे तिच्या मातापित्यांचे मत होते. पण तिने शिक्षण चालू ठेवण्याचा निर्धार केला आणि तिला डेनव्हर येथे विवाह करून राहिलेल्या शेयनाने बोलावून घेतले. आपली खरी बौद्धिक वाढ डेनव्हरला झाली असे गोल्डा मायर म्हणतात. येथेच ज्यूईश समाजवादी पक्षाच्या बौद्धिक वर्गात त्या सामील झाल्या. समाजवादी तत्त्वज्ञानाची आपल्याला आवड नव्हती, पण समाजवाद म्हणजे लोकशाही, सर्वांना काम व पिळवणुकीला मज्जाव अशी ढोबळ व्याख्या त्या शिकल्या. येथेच तिची मॉरिस मेयरसन या तरुणाशी गाठ पडली. त्यावेळी ती केवळ सोळा वर्षांची होती. दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडली. मॉरिसला तत्त्वज्ञान, साहित्य, संगीत यांची विशेष आवड व जाण. शेली, बायरनच्या कविता तो गोल्डास वाचून दाखवी. थोड्याच दिवसांत गोल्डास तिच्या वडलांचे पत्र आले व ती मिलवाकीला परत गेली. मिलवाकीत परतल्यावर पहिले युद्ध सुरू झाले आणि ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली पॅलेस्टाइनच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या ज्यू सैनिकांना मदत करणारे केंद्र गोल्डाच्या आईने घरातच चालवले. ज्यू राष्ट्रवादाची बीजे गोल्डाच्या मनात यावेळी रुजली. याचवेळी बेन गुरियन मिलवाकीत आले. पण मॉरिसबरोबर गोल्डा संगीताच्या कार्यक्रमास गेल्यामुळे बेन गुरियन व गोल्डा यांची भेट होऊ शकली नाही. पुढे गोल्डा मायर या बेन गुरियन यांच्या राजकीय शिष्या झाल्या. वयाच्या विसाव्या वर्षी गोल्डाचे

मॉरिसशी लग्न झाले व त्यांनी युद्धसमाप्तीनंतर पॅलेस्टाइनमध्ये जाऊन वास्तव्य करण्याचे ठरवले.

गोल्डा व मॉरिस १९२१ साली तेल अवीव्हला आले तेव्हा तेथे नव्याने वस्ती वाढू लागली होती. आणि उल्लेखनीय गोष्ट ही, की लेखक, कवी, संगीतकार, तत्त्वज्ञ यांनी तेल अवीव्हला वास्तव्य करून त्यांचे सांस्कृतिक जीवन विकसित करण्याचे प्रयत्न चालवले होते. पण गोल्डा व मॉरिस यांनी सामुदायिक वसाहतीत राहण्याचे ठरवले. या वसाहतीत गोल्डाने अनेक अंगमेहनतीची कामे केली. तेथील खडकाळ जमिनीत खड्डे खणून झाडे लावणे हे मोठे कष्टाचे. पण त्यातही गोल्डाने भाग घेतला. संध्याकाळी परतल्यावर हात हलवण्याची ताकदही राहात नसल्याचे त्या लिहितात. आता याच भागात सुंदर जंगल तयार झाले आहे. या वसाहतीत अनेक प्रकारची कामे गोल्डाने केली. ते जीवन काही आरामाचे नव्हते. या जीवनाचे वर्णन वाचण्यासारखे असून इस्त्रायल देशाचे नेतृत्व कोणत्या अनुभवातून घडले याची यावरून कल्पना येईल. तेथे स्त्रीमुक्तीची चर्चा वृत्तपत्रांतून व टेलिव्हिजनवरून रंगीबेरंगी वस्त्रांचे प्रदर्शन करून होत नव्हती. तर नवे सामुदायिक जीवन कष्टपूर्वक उभे करून आपोआपच स्त्री मुक्त होत होती. पुढे सामुदायिक वसाहतींची एक परिषद देगानिया येथे भरली तेव्हा गोल्डा मायर यांची बेन गुरियन प्रभृतींशी चांगली जानपेहचान झाली. सामुदायिक वसाहतीतील जीवनातील साचेबंदपणा मॉरिसला अमान्य होता. तत्त्वज्ञान, वाङ्मय, संगीत यावर बोलण्यासाठी त्याला कोणी सहप्रवासी मिळत नसत. त्यामुळे तो हताश होई. या वसाहतीत मुलांचे संगोपन सामुदायिकरीत्या होई. ते मॉरिसला मान्य नव्हते. त्यामुळे गोल्डास जरी आपल्याला मूल हवे असे वाटे, तरी या सामुदायिक वसाहतीत मूल वाढविण्यास मॉरिस तयार नव्हता. त्यांच्यात हा एक मतभेदाचा मुद्दा असे. पुढे ते दोघे जेरुस्लेमला आले. तेथे काम करू लागले आणि त्यांचे पहिले अपत्य तेथेच जन्मले. जेरुस्लेम येथील आयुष्यही आर्थिक चणचणीचेच होते.

दोन महायुद्धाच्या काळात या प्रकारचे जीवन जगत जगत गोल्डा मायर या ज्यूंच्या चळवळीत महत्त्वाच्या भूमिका करू लागल्या होत्या. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांत भाषणे त्या करीत आणि समाजवादी पक्षाच्या अधिकारपदावर असत. अखेरीला दुसऱ्या महायुद्धानंतर इस्त्रायलचा जन्म झाला. हा जन्मही तोफांच्या गडगडाटात झाला आणि नंतरही त्या देशाला कायम युद्धसदृश स्थितीत राहावे लागले. गोल्डा मायर यांनी या काळात राजदूत, परराष्ट्रमंत्री अशा अनेकविध पदांवर कामे केली. आंतरराष्ट्रीय परिषदा गाजवल्या. त्यानंतर १९५६ व १९६५ साली अरबांशी युद्ध झाले. त्यात इस्त्रायलला विजय मिळाला. नंतर गोल्डा मायर या पंतप्रधान झाल्या. त्या पंतप्रधान असताना १९७३ सालाच्या ऑक्टोबरमध्ये योमकिपुर या धार्मिक सणाच्या दिवसातच अरबांनी हल्ला केला. इजिप्तच्या फौजा इस्त्रायलमध्ये घुसल्या. त्यावेळेचे वातावरण गोल्डा मायर यांनी चित्रित केले आहे. ६ ऑक्टोबरला युद्धाची प्रत्यक्ष ठिणगी पडली खरी. पण मेपासूनच इस्त्रायलच्या गुप्तहेरांनी इजिप्त व सीरियात लष्करी जमवाजमव चालू असल्याची माहिती दिल्याने इस्त्रायल सज्ज होऊ लागले होते. सप्टेंबरमध्ये सीरियाने लष्करी तयारी वाढवल्याचे समजले. ३ ऑक्टोबरला सेनाधिकाऱ्यांची बैठक झाली तेव्हा मोशे दायन यांनी लष्करी परिस्थितीचा आढावा घेतला. सेनाधिकाऱ्यांचे मत पडले, की परिस्थिती हाताबाहेर गेलेली नाही. सीरिया व इजिप्त यांचा संयुक्त हल्ला होणार नाही, निदान सीरिया हल्ला करण्याच्या परिस्थितीत नाही, असा या अधिकाऱ्यांचा निष्कर्ष होता. ४ तारखेला गोल्डा मायर जेरुस्लेमहून तेल अवीव्हला गेल्या आणि नेहमीप्रमाणे रविवारी त्या परतणार होत्या. ५ तारखेला सीरियातील रशियन सल्लागारांची कुटुंबे स्वदेशी परत जात असल्याचे वृत्त कळले तेव्हा गोल्डा मायर सचिंत झाल्या. सेनापती, गुप्तहेर खात्याचे प्रमुख वगैरेंना सीरियाविषयीची ही बातमी महत्त्वाची वाटते काय असे त्यांनी विचारले तेव्हा त्यांना नकारार्थी उत्तर मिळाले. काही मंत्र्यांची बैठक घेतली त्यांचीही हीच प्रतिक्रिया होती. पण ५ तारखेला रात्री गोल्डा मायर अस्वस्थ चित्तानेच बिछान्यावर पडल्या. शंकेची पाल चुकचुकत होती आणि पहाटे चार वाजता फोन घणघणला. लष्करी सचिव सांगत होता की दुपारी इजिप्शियन व सीरियन फौजा संयुक्त हल्ला करण्याच्या पवित्र्यात आहेत! त्यानंतरचा युद्धाचा इतिहास सर्वश्रुतच आहे. २२-२-७७ ◉

सार्त्रचे अंधत्व

प्रसिद्ध फ्रेंच लेखक सार्त्र यास जवळजवळ अंधत्व आले आहे. ते तीन वर्षांचे होते तेव्हाच त्यांचा उजवा डोळा गेला होता आणि आता रक्तस्राव होऊन डाव्या डोळ्यानेही त्यांना फारसे काही दिसत नाही. त्यांना नुकतीच सत्तर वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने ऑब्झर्व्हरने त्यांची मुलाखत घेतली. आपल्याला काही रंग दिसतात, वस्तूंचे आकार दिसतात, पण वस्तू कोणती, व्यक्तीचा चेहरा कोणता वा कोणाचा हे काही कळत नाही. वाचन अर्थातच पूर्णतः बंद. ओळी दिसतात, दोन शब्दांच्यामधील अंतर दिसते; पण शब्द दिसत नाहीत. या स्थितीत वाचन व लिखाण बंद झाले आहे. वाचन व लेखन नसल्याने लेखक म्हणून आपल्याला जगताच येत नाही असे सार्त्र म्हणतात. पण यामुळे सार्त्र हे दुःखी झाले आहेत किंवा बंडखोर बनले आहेत असे नव्हे. तसे पाहिल्यास त्यांच्या शारीरिक व्यथेला काही वर्षांपूर्वी सुरुवात झाली. त्यांना काही माणसांचे भास होत; पण ते भासच असत. सिमोन द बोव्हूवार ही लेखिका त्यांची सहचरी. तिने आपल्या आत्मचरित्रात दोघांच्या सह-जीवनावर भरपूर प्रकाश टाकला आहे. ही त्यांची सहचरी त्यांना रोजची वृत्तपत्रे, पुस्तके वगैरे वाचून दाखवते. ते आकाशवाणी वगैरे ऐकतात. पण या सर्व वेळ घालवणाऱ्या गोष्टी. आपला जीवनाचा मुख्य उद्योग म्हणजे लिखाण. तेच बंद झाल्यामुळे बाकीच्या गोष्टी या निरर्थक वाटतात, असे सार्त्र यांचे म्हणणे आहे. विचार करण्याची शक्ती शाबूत असली व आतापर्यंत केलेल्या लिखाणापूर्वी विचारमंथनही बरेच होत होते, तरी आता लिखाण करण्याची शक्यता नष्ट झाल्याने विचारमंथनातही सार्त्र यांना रस वाटत नाही.

लिखाण व ध्वनिमुद्रण

अंधत्वामुळे लिखाण करता येत नसले तरी आधुनिक उपकरणांमुळे लिखाण थांबण्याची गरज नाही. टेपरेकॉर्डरचा उपयोग करून आपले विचार ध्वनिमुद्रित करता येतात आणि त्यावरून पुस्तक होऊ शकते.

रिचर्ड क्रॉसमन हे दिवंगत मजूरपक्षीय मंत्री. त्यांनी रोजनिशी न लिहिता ध्वनिमुद्रण करून ठेवले. त्यावरूनच त्यांची रोजनिशी तयार झाली. तिचा काही भाग संडे टाइम्सने प्रसिद्ध केला. याबद्दल सरकार व टाइम्स यांचा वाद झाला. क्रॉसमन यांनी ज्या उपायांचा अवलंब केला त्याच्या आधारे सार्त्र यांनीही लिखाण करावे असे त्यांना सुचवण्यात आले. सार्त्र यांची त्यास तयारी नाही. ते म्हणतात, वाणी व लेखन यात फार फरक आहे. आपण लिहितो तेव्हा लिहिलेला मजकूर वाचतो, पुन्हा वाचतो. कधी जलद, तर कधी सावकाश वाचतो. एखाद्या वाक्यापाशी आपण किती थांबू याला काही मर्यादा नसते. लिहिलेल्या वाक्यात काय चुकले हे पहिल्या झटक्यातच कळेल असे नव्हे. कदाचित त्या वाक्यात नको असलेला शब्द आला असेल, तर एक वाक्य अगोदरच्या वा नंतर येणाऱ्या वाक्याशी नीट जुळत नसेल. त्यामुळे एकदा वा अनेकदा वाचून असे वाक्य बदलले जाते. हे सर्व लिखाण करताना शक्य आहे, पण टेपरेकॉर्डरवर मजकूर सांगितला, तो ध्वनिमुद्रित झाला आणि पुन्हा ऐकावयास लागलो तर मुद्रणाच्या ठरलेल्या वेळातच ऐकावे लागते आणि मत बनवावे लागते. सार्त्र याला तयार नाहीत. आपल्याला हे ध्वनिमुद्रणाचे तंत्र जमणार नाही असे ते म्हणतात.

याचे आणखी एक कारण आहे. ते म्हणजे शैलीचे. सार्त्र शैलीला महत्त्व देतात. आजकाल तरुण लेखकांच्या मते आपल्याला जे काय सांगायचे असेल ते सांगावे, कसे सांगायचे याची काळजी करू नये. पण सार्त्र यांना मात्र शैलीचे महत्त्व वाटते. सोपेपणा त्यांनाही हवा, पण शब्दांची निवड, वाक्यरचना आणि या सर्वांचा अपेक्षित परिणाम याविषयी आपण बेफिकीर राहू शकत नाही अशी सार्त्र यांनी ग्वाही दिली आहे.

१९५७ साली विरोधविकासवादाची चिकित्सा करणारे पुस्तक त्यांनी लिहावयास घेतले तेव्हा साम्यवादी विचारांची त्यांनी फेरतपासणी सुरू केली होती. ते पुस्तक लिहिण्याची त्यांना एकप्रकारची घाई होती. म्हणून सार्त्र काही गोळ्या घेत. त्यामुळे विचारशक्ती अधिक गतिमान होते व तिप्पट वेगाने लेखन करता येते. अशा गोळ्या खाऊन त्यानी ग्रंथ पुरा केला. कम्युनिस्टांनी मार्क्सवाद विकृत बनवला अशी त्यांची धारणा झाली होती व मार्क्सवादी विचारसरणीतूनच त्यांनी कम्युनिस्टांवर टीका करणारा हा ग्रंथ लिहिला. आता त्यांनी फ्लोबेरवरील ग्रंथ बराचसा पुरा करीत आणला असला तरी लिखाण करणे शक्य नसल्याने तो अपुरा राहणार.

संगीताचा प्रभाव

सार्त्र यांच्यावर संगीताचा प्रभाव लहानपणापासूनच पडला आहे. त्यांचे आजोबा, आजी, आई हे सर्व पिआनो, ऑर्गन वगैरे उत्तम वाजवीत. आठव्या-नवव्या वर्षीच सार्त्र पिआनो वाजवायला शिकले. पुढे ते त्यावर अगदी अवघड चीजाही वाजवीत. काही काळ ते पिआनो शिकवतही. आता लिखाण व वाचन कमी झाल्यामुळे सार्त्र संगीत ऐकण्यात बराच वेळ घालवतात.

आपल्या या मुलाखतीत सार्त्र यांनी कामूबरोबर झालेल्या वादंगाचा उल्लेख केला आहे. वास्तविक दोघेही एककाळ दोस्त. गप्पागोष्टींत त्यांचा बराच वेळ जाई; पण नंतर कामूच्या एका लेखामुळे सार्त्र रागावले. अर्थात त्यांचे व कामू यांचे संबंध हळूहळू थंडावत आलेच होते. सार्त्र हे तोंडाचे फटकळ आहेत व त्यामुळे त्यांचे अनेकांशी खटके उडतात.

आर्थिक बाबतीत मात्र सार्त्र हे भाग्यवान आहेत. ते भरपूर पैसा मिळवतात व खर्च करतात आणि घराबाहेर पडले, की पाच-पाच दहा-दहा हजार रुपयांच्या रकमेइतक्या फ्रॅन्कच्या नोटा त्यांच्या खिशात असतात. तीन एक लाखांपर्यंत त्यांना प्राप्तीकरच भरावा लागतो. आपल्या मित्रमंडळींवर आणि अवलंबून असलेल्यांवर सार्त्र वाटेल तेवढा खर्च करीत असतात. सत्तराव्या वर्षीही त्यांच्या जीवनात, राहणीत फरक झालेला नाही. उत्तम हॉटेलात खाणे-पिणे, मित्र-मैत्रिणी, तात्पुरत्या सहचरी हे सर्व चालू आहे.

३-८-७५ ◉

सार्त्र आणि त्याच्या मैत्रिणीच्या

सिमोन द बोव्हूवार या फ्रेंच लेखिकेच्या आत्मचरित्राचा तिसरा व शेवटचा भाग—ऑल सेड अॅन्ड डन—आता पेंग्विनमध्ये मिळू लागला आहे. मनस्वी व मुक्त जीवन जगलेली ही लेखिका आहे. या जीवनाचे प्रतिबिंब तिच्या कथा-कादंबऱ्यांतून पडत असते. सार्त्र हा तिचा प्रियकर. दोघेही विवाहबद्ध न होता दीर्घकाळ एकत्र राहात आले आहेत. परंतु म्हणून एकनिष्ठतेच्या शपथा त्यांनी घेतलेल्या नाहीत. यामुळे रिचर्ड राईट वगैरे लेखक वा कलावंतांच्या सहवासात सिमोन द बोव्हूवार हिने आनंदाने काळ कंठिला आणि सार्त्रही अनेक स्त्रियांच्या सहवासाचा धनी झाला. आत्मचरित्राच्या या अखेरच्या खंडात लेखिकेने विविध अनुभव दिले आहेत. पण आत्मचरित्राचे स्वरूप इतर आत्मचरित्रांसारखे नाही. म्हणजे कालक्रमाप्रमाणे घडलेल्या घडामोडींचे वर्णन असे ते नाही. तर आपली प्रवासाची आवड, पुस्तकांची आवड, कलाप्रेम असे विषय घेऊन निरनिराळे अनुभव कथन केले आहेत.

रशियन जीवनाचे दर्शन

सार्त्र व सिमोन द बोव्हवार हे दोघे राजकीयदृष्ट्या डाव्या विचारांचे. त्यामुळे त्यांचा अनेक डाव्या नेत्यांशी परिचय झाला. रशिया, चीन, पूर्व युरोपीय देश, क्युबा, कोरिया अशा अनेक देशांत त्यांचा प्रवास होत असे. क्रुशेवप्रमाणे नासेरशी त्यांच्या गप्पा होत. सार्त्रची अनेक पुस्तके रशियात भाषांतरित होऊन विकली जात असल्याने त्याच्या नावे बरेच रूबल्स तेथे साठले होते. त्यातच लेखक संघाच्या बैठकींच्या निमित्ताने त्याला व सिमोन द बोव्हूवारला रशियातून बोलावणी येत. त्यांच्या या प्रवासात त्यांनी अनेक रशियन मित्र जोडले होते, पण त्यांपैकी काहींच्यावर पुढे वनवासाचा प्रसंग कोसळला.

रशियातील जीवनाचे दर्शन या लेखिकेने अलिप्तपणे घडवले असले, तरी जेव्हा ती व सार्त्र तेथे वारंवार जात, तेव्हा त्यांना तेथील अन्याय, अमानुषता यांचा निषेध करावासा वाटला नाही. दरवेळच्या भेटीत त्यांना निरनिराळे लेखक, कलावंत यांना तुरुंगवास कसा घडला होता याची हकीगत कळत असे व त्यामुळे दोघेही अस्वस्थ होत. त्यांची जी मार्गदर्शिका होती तिचे नाव लीना. तिचे वडील पहिल्यापासून बोल्शेव्हिक, लेनिन बरोबर त्यांचा फोटोही होता. त्यांनाच स्टालीनच्या राजवटीच्या अखेरीस तुरुंगात जावे लागले. आईलाही हीच शिक्षा झाली. स्टालीनच्या मृत्यूनंतर या दोघांची सुटका झाली. या अनुभवाने लीना हादरून गेली होती. १९५४ साली ती त्यांना प्रथम भेटली तेव्हा ती स्टालीनवादी होती; पण आपल्या आई-वडलांच्या शिक्षेनंतर ती स्टालीनविरोधी झाली. बापाला अटक होताच तिला विद्यापीठात शिकता येणार नाही असे सांगण्यात आले. पण तिने इन्हेन्बर्ग-कडे चिटणीस म्हणून काम करण्याची विनंती केली व त्याने ती मानली. यामुळे तिचे जीवन सुसह्य झाले. तिचे वैवाहिक जीवन हे निर्बंधरहित होते.

क्रुशेवचे मर्यादित स्वातंत्र्य

क्रुशेवनी स्टालीनशाहीतील निर्बंध सैल केले खरे, पण पूर्ण स्वातंत्र्य देणे त्यांच्या आवाक्याच्या बाहेरचे होते. किंबहुना, त्यांचे आसन डळमळीत होऊ लागताच त्यांनी दडपशाहीचाच मार्ग अवलंबिला. १९६३ मध्ये सार्त्र व सिमोन द बोव्हूवार ही दोघे लेखकपरिषदेसाठी मॉस्कोला गेली तेव्हा क्रुशेव यांनी पाश्चात्य लेखकांवर कडाडून हल्ला केला. अनेक

'अप्रामाणिक' जीवनाची हकीगत

रशियन लेखकांनी त्याच सुरात सूर मिळवला. पुढे क्रुशेव यांच्या सुटीतील निवासस्थानी परिषदेच्या सदस्यांना आमंत्रण मिळाले. तेथेही क्रुशेव यांनी पाश्चात्य लेखकांवर टीकास्त्र सोडले. (सार्त्र वगैरे मोठे लेखक. पण एकाही लेखकाची क्रुशेव यांचा हल्ला गैरलागू आहे, असे सांगण्याची छाती झाली नाही!) परिषदेचे हे लेखक-प्रतिनिधी कम्युनिस्टांचे सहप्रवासी होते तरीही त्यांच्यावर हे प्रहार झाले. नंतर त्यांना कळले, की फ्रेंच कम्युनिस्ट नेता तोरे याची व क्रुशेव यांची अगोदर भेट झाली होती व त्यांनी फ्रेंच लेखक कम्युनिस्टपक्षाच्या विरुद्ध असल्याचे त्यांना सांगितले होते. तोरे यांनी काहीही सांगितले तरी पाहुण्यांचा अपमान करणाऱ्या क्रुशेव यांची सांस्कृतिक पातळी व हा अपमान सहन करणाऱ्या लेखकांची लाचारी दोन्ही उल्लेखनीय ठरतील. क्रुशेव यांनी पुन्हा एकदा रशियन लेखकांवर बंधने घालायला सुरुवात याच सुमाराला केली होती. अनेक लेखक, पत्रकार, कलावंत तुरुंगात जात होते तेही या वेळीच. परंतु त्याचबरोबर भूमिगत वाङ्मयाचा प्रसारही होऊ लागला व तो पुढे वाढत गेला. क्रुशेव यांच्या पदच्युतीनंतर कलाक्षेत्रात थोडी मोकळीक मिळेल असे वाटले. पण थोड्याच दिवसांत भ्रमनिरास झाला. अनेक लेखक व कलावंत स्थानबद्ध झाले, श्रम-छावणीत पाठवले गेले. २३ व्या काँग्रेसमध्ये शोलोकॉव्ह-सारख्या सरकारी कृपाछत्राखाली वावरणाऱ्या लेखकाने सरळच सांगितले, की ज्या लेखकांवर खटला होऊन त्यांना शिक्षा झाली, यांना लेनिनच्या काळात गोळी घालूनच मारले असते. काही लेखक इन्हेन्बर्गमुळे तर काही सार्त्रमुळे सुटले. पण असे थोडे. बाकीचे बंदिवासातच राहिले.

फारच उशिरा जाग

तथापि, १९६८ साली चेकोस्लोव्हाकियावर रशियाने आक्रमण केले आणि मग सार्त्र व सिमोन द बोव्हूवार यांनी रशियाशी सर्व संबंध तोडले. या आक्रमणाचे बहुतेक सर्व रशियन लेखकांनी समर्थन केले होते. पण फ्रेंच कम्युनिस्ट पक्षाने निषेध केला, इटालियन पक्षाने क्षीण आवाजात निषेध नोंदवला. सार्त्र व त्यांची ही मैत्रीण संतप्त झाली. वास्तविक यासाठी त्यांना १९६८ सालपर्यंत थांबण्याची काय गरज होती हे कळू शकत नाही. त्यांच्याच ओळखीच्या बऱ्याच रशियन लेखकांवर यापूर्वीच आपत्ती आली होती. स्टालीनशाहीचा अमानुषपणा जगजाहीर होता. १९६८ साली चेकोस्लोव्हाकियावर रशियाने हल्ला केला खरा; पण तत्पूर्वी १९५६ सालीही हंगेरीवर केला होता. पूर्व जर्मनी, पोलंड यांतील लोकांचे उठाव दडपले होते. त्या वेळी या लेखकांना जाग आली नाही. जागतिक शांततेची पताका मिरवणारांच्या मेळाव्यात हे दोघे जमत. क्यूबापासून उत्तर कोरियापर्यंत फेऱ्या मारीत; अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन यांच्याकडून होणाऱ्या अन्यायाने विव्हळत; पण यांना स्टालीनशाहीतील अत्याचार दिसले नाहीत, त्यांच्या रशियन मित्रांवरील संकटाने त्यांचे डोळे उघडले नाहीत. ते उघडले १९६८ साली. पण उशिरा का होईना उघडले हेही कमी नव्हे. सोल्झेनित्सिन यांनी सार्त्र यांना भेटण्याचे नाकारले होते; कोस्लरनी त्यांना अप्रामाणिक ठरवले होते. वस्तुस्थिती या टीकेला पोषक अशीच आहे. भांडवलदारी लोकशाही समाजातील सर्व स्वातंत्र्य व सुख भोगायचे आणि कम्युनिस्ट राजवटीचे गोडवे गाऊन त्या जगातही मानसन्मान भोगायचे यात अप्रामाणिकपणाच दिसतो. सार्त्र व त्यांची ही मैत्रीण हे अप्रामाणिक जीवन कसे जगत होते त्याचीच ही हकिगत आहे.

१८-९-७७ ◉

अगाथा खिस्तीची आत्मकथा

अगाथा खिस्ती यांना रहस्यकथांची सम्राज्ञी असे सार्थपणे मानले जाते. त्यांच्या आत्मचरित्राची स्वस्त आवृत्ती आता मिळू लागली आहे. साधी, ओघवती भाषा हा अगाथा खिस्ती यांच्या रहस्यकथांचा विशेष या आत्मचरित्रातही दिसतो. त्यांनी रहस्यकथा लिहावयास बरीच उशिरा सुरुवात केली; पण नंतर त्यांच्या कादंबऱ्या, कथा व नाटके मिळून ७७ पुस्तके प्रसिद्ध झाली. काही कादंबऱ्या या अनेक वर्षे खपाच्या बाबतीत उच्चांक प्रस्थापित करणाऱ्या ठरल्या असून अद्याप त्यांचा खप चालूच आहे. हा सर्व खप काही कोटी प्रतींच्या घरात जातो. 'मर्डर ऑन द ओरिएंट एक्स्प्रेस' यासारखे त्यांच्या कादंबरीवरील चित्रपट फार लोकप्रिय ठरले. त्याचप्रमाणे 'विटनेस फॉर द प्रॉसिक्युशन' व 'माउस ट्रॅप' अशी नाटके लोकप्रियतेत नवे विक्रम करणारी म्हणून मान्यता पावली. यांपैकी माउस ट्रॅप हे नाटक लंडनमध्ये तीस वर्षांपैकी फार काळ एकाच नाटकगृहात चालू आहे.

अगाथा खिस्ती यांनी आपले आत्मचरित्र १९५० साली लिहावयास सुरुवात केली आणि पंधरा वर्षे ते त्या अधूनमधून लिहीत होत्या. ते जेव्हा पुरे झाले, तेव्हा त्या ७५ वर्षांच्या होत्या आणि नंतर दहा वर्षांनी त्यांचे निधन झाले. वयाला पंचाहत्तर वर्षे झाली असून आता आपल्या आयुष्यात विशेष काही घडणार नाही अशी त्यांची समजूत होती. पण मर्डर ऑन द ओरिएंट एक्स्प्रेस हा चित्रपट याच दहा वर्षांत निघाला. आणि माउस ट्रॅप नवे उच्चांक स्थापन करीत असल्याचेही त्यांनी याच वेळी पाहिले. तथापि, आत्मचरित्र लिहून पुरे झाल्यावर त्यांनी त्याला पुस्ती जोडली नाही.

या आत्मचरित्राचा विशेष असा, की लेखिकेने आत्मगौरवात आनंद मानला नाही. आपल्या पुस्तकांचा खप किती झाला, त्याविषयी कोणी काय लिहिले, सत्कारसमारंभ किती व कोठे झाले याचा उल्लेख अगाथा खिस्ती करीत नाहीत. इतर लेखक आणि लेखिका यांचेही उल्लेख नाहीत. आपल्याकडील काही आत्मचरित्रांशी तुलना केली तर हा विशेष अधिक जाणवेल. कारण आत्मगौरव आणि असत्यकथन यांचा मालमसाला अनेक साहित्यिक व राजकारणी यांच्या आत्मचरित्रांत आढळत असल्याने महाराष्ट्राचा गेल्या पन्नासएक वर्षांचा बराच खोटा इतिहास लिहिला गेला आहे. 'सर्व इंग्लिश जनतेला सतत मोहिनी घालणारी लेखिका' अशा शब्दांत चर्चिल यांच्यासारख्या भाषाप्रभूने अगाथा खिस्ती यांचा गौरव केला होता. पण या आत्मचरित्रात हे वाक्य कोठेही सापडणार नाही.

आत्मकथेचे आगळेपण

अगाथा खिस्ती यांच्या या आत्मकथेचे वैशिष्ट्यच हे आहे की ते साहित्यिक नाही. स्वतःच्या व इतर साहित्याची चर्चा ते करीत नाही. किंबहुना अगाथा खिस्ती यांनी स्वतःच्या जीवनात साहित्यनिर्मितीला अग्रक्रम दिला नसावा असाच ग्रह या आत्मकथेच्या वाचनाने होईल. तसा तो व्हावा असे लेखिकेचे जीवन व्यतीत झाले आहे. तिचा जन्म सुखवस्तू कुटुंबात झाला. वडील अमेरिकन व आई इंग्लिश. वडलांना अमेरिकेतच राहायचे होते. पण अखेरीला इंग्लंडमध्ये त्यांनी वास्तव्य केले. वडील हे आरामशीर जीवन जगणारे. धकाधक त्यांना मानवणारी नव्हती. वडलार्जित उत्पन्नावर चांगला संसार चालू होता. अगाथा या दायी, नोकराणी, स्वयंपाकीण असा लवाजमा असलेल्या कुटुंबात वाढल्या. पुढे वडील वारले तेव्हा खर्च कमी करावा लागला; पण अगदीच कंगालपणा

आला नव्हता. अगाथाचे शिक्षण हे त्या काळात सुखवस्तू मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलींना मिळे त्याच धर्तीचे होते. फ्रेंच भाषा शिकवण्यात येई, पिआनो वाजवण्याचे शिक्षण मिळे. चित्रकला, कशिदा वगैरे कला अवगत होत. अगाथा काही काळ पॅरिस येथेही होत्या. त्या काळात सुखवस्तू मध्यमवर्गीय मुलींची वाढ जशी होत असे, तशीच अगाथाची वाढ झाली. त्यांनी या जीवनाचे तपशीलवार वर्णन केले आहे.

तारुण्यात पदार्पण केल्यावर वरसंशोधन सुरू झाले. नृत्य-समारंभ, भोजन-समारंभ वगैरेंच्या निमित्ताने अनेकांच्या गाठीभेटी होत होत्या. अगाथा या दिसावयास सुंदर होत्या त्यामुळे अनेक तरुण त्यांना मागणी घालीत. एकाची मागणी त्यांनी मान्यही केली; पण पुढे विवाह झाला दुसऱ्याशीच. आणि तो म्हणजे आर्ची खिस्ती यांच्याबरोबर. पहिले महायुद्ध चालू होते आणि त्यावेळी झालेल्या परिचयाचे विवाहात रूपांतर झाले. एक मुलगीही झाली. पण थोड्याच वर्षांत आर्चीने घटस्फोट दिला. त्यानंतर काही काळ गेला आणि मध्यपूर्वेच्या प्रवासात ओळख झालेल्या मॅक्स मिलर यांच्याशी अगाथाने लग्न केले. मॅक्स मिलर हे पुराणवस्तुसंशोधक म्हणून ख्यातनाम झाले. अगाथा यापुढे आजी झाल्या. आणि त्यांचा संसार सुखाचा झाला.

लक्षणीय कौशल्य

अगाथा खिस्ती यांनी या आत्मकथेत आपल्या साहित्यिक संसारापेक्षा सांसारिक जीवनाची विस्तृत माहिती दिली आहे. घर कोठे घेतले, त्याचे भाडे किती, पडदे कोणते लावले येथपासून मुलगी झाल्यावर आपले दिवस कसे जात होते येथपर्यंत अगदी बारीकसारीक तपशील आहे. अगाथा खिस्ती यांना प्रवासाचे अतिशय वेड. त्यांच्या प्रवासाची अनेक वर्णने यात आहेत आणि त्यांनी विविध स्थळे आणि व्यक्ती या अगदी आपल्या डोळ्यांसमोर उभ्या केल्या आहेत. मर्डर ऑन द ओरिएंट एक्स्प्रेस या कथेत त्या गाडीचे वातावरण निर्माण करण्यातील लेखिकेचे कौशल्य लक्षणीय वाटते. पण आत्मकथा वाचल्यावर अगाथा खिस्ती यांनी किती वेळा याच गाडीने प्रवास केला होता याची कल्पना येते.

फार लवकरच्या वयात अनेकजण ललित लेखन करू लागतात. अगाथा खिस्ती यांनी त्या मानाने उशिरा सुरुवात केली आणि प्रारंभी त्यांची हस्तलिखिते साभार परतच आली. अखेरीला बॉडलेहेड या प्रकाशन संस्थेने त्यांचे 'मिस्टीरियस अफेअर्स ॲट स्टाइल्स' या कथेचे हस्तलिखित स्वीकारले. बॉडलेहेड या प्रकाशन संस्थेचे प्रमुख जॉन लेन यांनी त्यांना अटी घातल्या होत्या, त्या नवोदित लेखकांना कोणत्या दिव्यातून जावे लागते याची कल्पना देणाऱ्या होत्या. दोन हजार प्रती खपेपर्यंत एक दिडकीही मिळणार नाही, मग काही मिळेल. नियतकालिकात कादंबरी क्रमशः प्रसिद्ध झाली तर पन्नास टक्के प्रकाशकास द्यावे लागतील. पहिली पाच पुस्तके बॉडलेहेडकडेच प्रकाशित व्हावयास हवी. या अटी त्यांनी मान्य केल्या.

पहिल्याच पुस्तकाने त्या प्रसिद्धीस आल्या असे नव्हे. पण दोन-तीन पुस्तकांनंतर त्यांचा वाचकवर्ग तयार होऊ लागला. बॉडलेहेड बरोबरचा करार संपताच त्यांनी दुसरा प्रकाशक गाठला. आपल्या नाटकांत त्यांना विटनेस फॉर द प्रॉसिक्युशन हे फार आवडते. नाटकच्या पहिल्या प्रयोगाच्या वेळी आपण सचिंत असतो असे त्या लिहितात; परंतु या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाच्या वेळी आपल्या मनाची ही अवस्था नव्हती व प्रारंभापासून आपण खूष होतो अशी माहिती त्या देतात. लिखाणासाठी खास टेबल, खास साहित्य वगैरे त्यांना काही लागत नसे. अर्थात निवांतपणा हवा होता. एखाद्या कथेचे बीज कोठेही त्यांना सापडत असे आणि मग ते घोळत राही. कथेचा विचार डोक्यात घोळू लागला की रस्त्यात, गाडीत, दुकानातही विचारचक्र सुरू होई. आपण लहानपणी मांजराशी बोलत असू त्याचप्रमाणे आपल्या पात्रांशी बोलण्याची सवय पडली होती. सार्वजनिक ठिकाणी अगाथा खिस्ती अशा पुटपुट्या लागत आणि मग आजूबाजूचे लोक बघत राहात. त्या प्रसिद्ध लेखिका बनल्या तेव्हा लोक त्यांना ओळखू लागल्यावर या पुटपुट्यांचे त्यांना काही वाटत नसे. पण तत्पूर्वी किंवा ज्यांना माहीत नसेल त्यांना ही बाई वेडपट आहे असे वाटे.

न मानवणारी मते

प्रणयाराधन, विवाह, घटस्फोट इत्यादींसंबंधी अगाथा खिस्ती यांची मते आजच्या पिढीला मान-

अगाथा ख्रिस्ती : छायाचित्रांचा अल्बम

वरून पहिले : अगाथा ख्रिस्ती आपल्या कन्येसमवेत.

वरून दुसरे : बालपणीचे निवासस्थान-ॲशफिल्ड.

वरून तिसरे : बगदादमधील आपल्या निवासस्थानी चहापान.

वरून चौथे : मॅथ्यु या नातवासमवेत.

वरून पाचवे : १९०६ सालची तरुण व देखणी अगाथा.

वणारी नाहीत. गूढता, अद्‌भुताचे आकर्षण, कल्पनाविलास यांचा मिलाफ त्या काळातील प्रणयाराधनात कसा झाला होता याची त्यांनी चर्चा केली आहे. स्वतःवर घटस्फोटाची वेळ आली तेव्हा त्या अतिशय उद्विग्न झाल्या. घटस्फोट घेऊ पहाणारांनी मुलांचा विचार करावा, सुलभ घटस्फोटामुळे अनेक सामाजिक विकृती कशा निर्माण झाल्या आहेत हे लक्षात घ्यावे, असे त्या म्हणतात. त्यांचा पहिला पती हा दुसऱ्या स्त्रीच्या प्रेमात पडला व म्हणून त्याने घटस्फोट घेतला. तथापि, त्याच्या नावाने त्या अकांडतांडव करीत नाहीत.

आपल्या जीवनात अनेक आनंदाचे क्षण आले असले तरी स्वतःच्या पैशाने पहिल्यांदा मोटर विकत घेतली तेव्हा आणि बकिंगहॅम राजवाड्यात राणीबरोबर चहापान केले तेव्हा जेवढा आनंद झाला, तेवढा दुसऱ्या कोणत्याही वेळी झाला नाही असे त्या म्हणतात.

Pussycat, Pussycat,
where have you been ?
I've been to London
to visit the Queen.

या ओळी त्या भेटीनंतर गुणगुणत होत्या.

आत्मकथेचा शेवट करताना त्या म्हणतात, की मला आयुष्यात अनेक गोष्टी मिळाल्या आणि आपल्याला तक्रार करण्यासारखे काही नाही. आपण अत्यंत समाधानी आहोत. या समाधानाचे आवरण या आत्मकथेभोवती आहे.

११-३-७९ ◉

अगाथा खिस्ती आणि रहस्यमय अपघात

रहस्यकथांची सम्राज्ञी अगाथा खिस्ती दिवंगत झाल्यावर अनेक वृत्तपत्रांत, नियतकालिकांत लेख आले. 'न्यू स्टेट्स्मन 'मध्ये रिची काल्डर यांनी एक-दोन आठवणी दिल्या आहेत त्या उल्लेखनीय ठरतील. १९२६ सालातील ही घटना आहे. काल्डर हे त्यावेळी नुकतेच वार्ताहर म्हणून लंडनच्या वृत्तपत्रात काम करू लागले होते. ४ डिसेंबर १९२६ रोजी सरे परगण्यात चुनखडीच्या एका टेकडीवरून एक छोटी गाडी उलटून पडली होती. तीत एक फर कोट होता आणि इतर काही वस्तूंवरून गाडी अगाथा खिस्ती यांची असावी असा अंदाज बांधण्यात आला होता. त्यावेळी 'द मर्डर ऑफ रोजर ॲक्रॉइड' ही अगाथा खिस्ती यांची नववी रहस्यकथा गाजत होती. अगाथा खिस्ती यांची गाडी अशी उलटल्याचे कळताच पोलीस आणि वार्ताहर यांची धावपळ सुरू झाली. पोलिसांतर्फे एक जाहिरातसुद्धा प्रसिद्ध करण्यात आली. प्रथम दोनशे पोलीस शोधाला लागले व नंतर ही संख्या तीनशेवर गेली. पोलिस-कुत्रे आले. विमानसुद्धा घिरट्या मारीत होते. वार्ताहरांनी त्या भागात शोधाशोध चालवली. अगाथा खिस्ती यांचा विवाह बारा वर्षांपूर्वी कर्नल आर्चिबाल्ड खिस्ती यांच्याबरोबर झाला होता आणि त्यांना एक मुलगी होती. तथापि अगाथा खिस्ती या मानसिक ताणामुळे आजारी झाल्या होत्या व काही काळ खिस्ती पतिपत्नी दक्षिण फ्रान्समध्ये राहात.

१९२६ सालात हे कुटुंब सनिंगडेलमध्ये स्टाइल्स येथे राहात होते. ४ डिसेंबर रोजी अगाथा बाहेर गेल्या होत्या व काही वेळाने परत आल्या तेव्हा त्यांच्या सेविकेने त्यांना सांगितले, की कर्नल खिस्ती हे सामान घेऊन मिस नील या त्यांच्या मैत्रिणीकडे गेले आहेत. त्याबरोबर अगाथा अतिशय संतप्त व अस्वस्थ झाल्या. कर्नल खिस्ती हे मिस नीलकडे गेले होते व ते खाना घेण्याच्या तयारीत होते. त्या दोघांनी विवाह करण्याचे ठरवले होते. तेवढ्यात कर्नल खिस्ती यांना अगाथाच त्यांच्याकडे येत असल्याचे कळल्याने जेवण न घेताच ते अगाथा यांना वाटेत गाठण्यासाठी मोटर घेऊन निघाले. त्यानंतर दोघांचा पत्ता लागत नव्हता आणि त्यातच ही उलटलेली मोटर दिसली.

एक आठवडा शोध लावण्यात गेला. पोलिसांनी जवळजवळ चाळीस मैलांचा परिसर धुंडाळला. डेली मेल या पत्राने शोध लावणारास शंभर पौंडांचे बक्षीस जाहीर केले. १३ डिसेंबरला हॅरोगेट येथून डेली मेलकडे एक फोन आला. तेथे थेरेसा नील या नावाने राहावयास आलेली स्त्री ही अगाथा खिस्तीच असली पाहिजे असे फोन करणाराचे मत होते. लगेच पोलीस व वार्ताहर धावले. ती स्त्री अगाथा खिस्तीच होती. कर्नल खिस्तीही तेथे आले. ४ डिसेंबर रोजी काय झाले याचे संपूर्ण विस्मरण अगाथा खिस्ती यांना झाले होते. अनेक प्रश्न विचारण्यात आले, पण त्यांना त्यावेळचे काहीच आठवत नव्हते.

पुढे दुसरे महायुद्ध झाले. रिची काल्डर बॉम्ब-हल्ल्यात जखमी झाल्याने हॉस्पिटलमध्ये पोहोचवले गेले, त्यांची शुद्ध गेली होती. ती आली व त्यांनी औषध घेण्यासाठी डोळे उघडले. औषध देणारी स्त्री म्हणजे दुसरीतिसरी कोणी नव्हती. त्या अगाथा खिस्ती होत्या. युद्धात त्या परिचारिकेचे काम करीत असत.

१५-२-७६ ⊙

होते कुरूप वेडे

परीकथांचा राजा, डॅनिश लेखक हॅन्स ख्रिश्चन अँडरसन याची शंभरावी पुण्यतिथी साजरी झाली. त्याच्या व्यक्तित्वावर प्रकाश टाकणारा लेख ऑब्झर्व्हरच्या रंगीत साप्ताहिक आवृत्तीत प्रसिद्ध झाला आहे. तो स्वतः अतिशय कुरूप होता. 'अग्ली डकलिंग' ही कथा त्याच्या कुरूपपणावरूनच त्याला सुचली असावी. आपला चेहरामोहरा हा असा कुरूप असल्याची त्याला सतत जाणीव असे. अँडरसन हा उंचच उंच होता. विद्यार्थीदशेत तो लंबू अँडरसन म्हणून ओळखला जाई. अँडरसन जसा उंच तसाच अतिशय लुकडा होता. त्याचे डोळे खोल गेलेले होते आणि पापण्या मोठ्या असल्याने ते नेहमी अर्धे झाकले आहेत असे वाटे. त्याचे पाय व हात लांबच लांब आणि हात बरेच पसरट होते. त्याचे पाय इतके लांब होते की त्याचे पायमोजे कोणीही वापरू शकत नसे. अँडरसनचे नाक लांबच लांब होते. त्याचा भालप्रदेश मात्र आकर्षक होता.

अनेक मानसिक तणावांखाली अँडरसन वावरत असे. झोपेत पलंगावरून पडला तेव्हा त्याला धक्काच बसला. आपल्याला कॅन्सर होईल, असे त्याला वाटू लागले. रस्ता ओलांडताना त्याला स्वतःची खात्री वाटत नसे. तो मग कोणाचा तरी आधार घेऊन रस्ता ओलांडी. परदेशच्या प्रवासाला निघाला, की त्याला सारखे वाटे आपण आपला पासपोर्ट हरवला. मग तो त्याच धास्तीत राही. आपल्या पासपोर्टवर चुकीची माहिती लिहिली असल्याचीही त्याला भीती वाटे. त्याने एकदा हिवाळी कोट शिंप्याकडे शिवायला दिला. तो वेळेवर तयार झाला नाही म्हणून शिंप्याने दुसरा कोट त्याला घालायला दिला. पण तो घालून आपण रस्त्यात गेलो आणि त्या कोटाचा मालक आपणास भेटला, तर आपली फजिती होईल या शंकेने तो बेजार झाला. कुत्री, चोर, खिसेकापू यांची त्याला अशीच भीती वाटे. घराला आग लागून आपण त्यात होरपळून मरणार या कल्पनेने तर तो नेहमीच बेजार होई. यासाठी तो प्रवासातही आपल्या सामानात एक दोरखंड बाळगीत असे. त्याला आणखी एका भीतीने असेच पछाडलेले होते, ती म्हणजे अपघाताची. ज्या घरात किंवा हॉटेलात तो राही ते कोसळून त्याखाली आपण गाडले जाऊ असे त्याला सतत वाटत असे. यासाठी झोपताना तो शेजारी टेबलावर एक छोटा फलक ठेवी. त्यावर लिहिलेले असे: 'मी खरोखरच मेलेलो नाही'. आपण मेल्यावरही आपल्या मित्रांनी आपली हाताची शीर कापावी असा त्याचा आग्रह होता. कारण आपण खरोखर मेलो नसताना जर आपले प्रेत शवपेटीत ठेवले गेले आणि शवपेटी बंद झाल्यावर आपण जागा झालो, तर कसे होईल ही शंका त्याला सतावीत असे. दातदुखी ही त्याच्या मागे लागलेली पीडा होती; इतकी, की पुढे दाताच्या कवळ्या बसवल्या तरीही ही दातदुखी होतीच!

हॅन्स ख्रिश्चन अँडरसनच्या व्यक्तित्वात अनेक परस्परविरोधी घटकांचे मिश्रण झाले होते. त्याच्यापाशी उत्तम विनोदबुद्धी होती, पण तो नेहमी एकाकी व दुःखी वाटे. स्वतःच्या गुणांची, सामर्थ्याची त्याला जाणीव होती आणि त्याच्या या आत्मकेन्द्रित वृत्तीखाली लीनताही होती. उदारपणा व कंजूषपणा, वरिष्ठ वर्गात वावरण्याची हौस असूनही गरिबीबद्दल कळवळा, मातृभूमीबद्दल कमालीच्या प्रेमाबरोबरच कमालीचा द्वेष त्याच्या ठायी होता. प्रवासाचा त्याला कंटाळा येई, पण त्याच्या काळात त्याच्याइतका प्रवास केलेला लेखक सापडणे कठीण होते. लोकांनी आपल्यावर प्रेम करावे, आपली वाहवा करावी अशी त्याची तीव्र इच्छा होती.

असा हा अँडरसन स्त्रीप्रेमाच्या बाबतीत भुकेला आणि एकाकी राहिला. पाच स्त्रिया त्याच्या आयुष्यात आल्या. पण त्याच्यावर कोणीच प्रेम न केल्यामुळे तो अविवाहित राहिला. एकीने त्याला प्रेमाचे पत्र लिहिले तेव्हा तो दुसरीच्या प्रेमात पडला होता, पण तिनेही त्याला साद दिली नाही. स्त्रीसौख्य न मिळालेला हा परीकथांचा राजा पॅरिसमध्ये एका वेश्यागृहात गेला, पण तेथे आपण एका युवतीशी फक्त गप्पागोष्टी करून आलो असे त्याने लिहून ठेवले आहे. अखेरपर्यंत त्याला गृहिणी, सखी मिळाली नाही व त्याचे स्वतःचे असे घर नव्हते. राजेरजवाडे, अमीरउमराव यांच्या सहवासाचा तो भुकेला होता, पण ही मंडळी फारशी बुद्धिवान नाहीत याची त्याला कल्पना होती. तथापि बाप चांभार व आई धोबीण अशी स्थिती असलेल्या अँडरसनला सामाजिक प्रतिष्ठेची विलक्षण आस होती. म्हणून तो या दरबारी लोकांत वावरे. वास्तविक अँडरसनसारखा नामवंत लेखक आपल्याबरोबर आहे यात या दरबारी लोकांना अभिमान वाटत असे. १७-८-७५ ◉

एका कवीची आत्मकहाणी

पाब्लो नेरुदा हे चिलीचे कवी. त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले आहे. क्रांतीचे कवी म्हणून त्यांचा गौरव होतो. त्यांच्या काव्यावर अनेक देशांतील हजारो लोक लुब्ध होत आणि नेरुदा जेथे जेथे गेले, तेथे तेथे त्यांच्या रसिकांनी त्यांना भरपूर दाद दिली. याच नेरुदा यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले असून या कवीच्या बहुरंगी व बहुढंगी जीवनाचे दर्शन त्यावरून वाचकाला होते.

नेरुदा यांचा जन्म एका कामगार कुटुंबात चिलीच्या दक्षिण भागात झाला. शालेय शिक्षण पुरे झाले नाही तोच त्यांचे भटके जीवन सुरू झाले. स्पॅनिश युद्ध सुरू झाले तेव्हा अनेक ध्येयवादी तरुण लेखक, कवी त्यात सामील झाले त्यात नेरुदा यांचा समावेश होता. या काळात युरोपातील नव्या जाणिवांची त्यांना ओळख झाली. पुढे लोर्का वगैरे कवींची व त्यांची मैत्री जमली व नेरुदा कम्युनिस्ट बनले. ते शेवटपर्यंत कम्युनिस्टच होते. चिलीला परतल्यावर राजकारण व साहित्य या दोन्ही क्षेत्रांत ते वावरत होते. त्यांच्या काव्याने सामान्य जनांची मनेही हेलावत. या काव्यातून ते क्रांतीचा संदेश देत होते. लॅटिन अमेरिकन देशांत राजकीय व आर्थिक स्थैर्य कधीच नव्हते व आजही नाही. नेरुदा यांच्या-सारख्यांच्या जीवनात यामुळे चढउतार होणे अगदी अपरिहार्य होते.

भूमिगत भ्रमंती

नेरुदा हे कधी त्यांच्या देशाचे राजदूत झालेले दिसतात, तर कधी त्यांना भूमिगतही राहावे लागले आहे. ब्रह्मदेश, सिलोन वगैरे देशांत ते चिलीचे राजदूत होते. राजदूत असले, तरी चिली हा देश गरीब असल्याने त्याच्या राजदूतालाही सामान्य स्थितीतच राहावे लागे. पण चिलीमध्ये सरकार बदलले आणि मग जेव्हा नेरुदा यांच्यावर देशत्याग करायचा प्रसंग आला, तेव्हाच्या काळातील अनुभव हे अधिक चित्तवेधक व चित्तथरारक आहेत. १९४८ ते १९५२ पर्यंत त्यांना वनवासात राहावे लागले. या काळात चिलीबाहेर असतानाही नेरुदा यांच्यावर चिलीच्या गुप्तहेरांची पाळत होती. त्यांच्या तावडीतून सुटण्यासाठी त्यांना अनेक युक्त्या योजाव्या लागल्या. कोणा देशाकडे आश्रय मागावा, तर तो मिळेलच याची खात्री नसे. मग लपून छपून दिवस काढावे लागत. त्यामुळे आज कोणा सामान्य कामगाराकडे, तर उद्या कोणा लेखक वा प्राध्यापकाकडे अशी त्यांची भ्रमंती सतत चालू होती.

त्यांना नंतर स्टालीन पारितोषिकही मिळाले. याच पारितोषिकाचे नाव बदलून ते लेनिन पारितोषिक झाले. नेरुदा १९५० साली हिंदुस्थानात आले असता पं. नेहरूंना भेटले होते. पण त्यांचे नेहरूंकडे बरेच थंडे स्वागत झाले. त्या काळात येथील कम्युनिस्ट पक्षाने आक्रमक धोरण स्वीकारले होते आणि रशियाही भारतासंबंधी विरोधी दृष्टी बाळगून होता. साहजिकच नेहरूंनी नेरुदा यांना फारसा थारा दिला नसावा. जागतिक शांततेच्या बाबतीत दोन्ही सत्तागट एकमेकांवर दोषारोप करतात, असे उत्तर देऊन नेहरूंनी नेरुदा यांची कम्युनिस्ट गटाची वकिली अमान्य केली. नेरुदा यांनी हे सर्व नाराजीने नमूद केले असले, तरी नेहरूंची भूमिका चूक नव्हती. रशियन गट हाच केवळ शांततावादी अशी तेव्हा परिस्थिती नव्हती व आजही नाही.

चीनमधील अनुभव

लेनिन (तेव्हाचे स्टालीन) पारितोषिक मादाम सन येत सेन यांना मिळाले होते. ते त्यांना देण्यासाठी नेरुदा व इन्हेनबर्ग यांना चीनला १९५१ साली धाडण्यात आले. पारितोषिक देण्याचा समारंभ पेकिंगच्या रशियन वकिलातीत झाला. चाऊ एन लाय, चू तेह वगैरे हजर होते. नंतर भोजन होऊन कॉफीपान चालू असता मादाम सन येत सेन यांनी सिगरेटची एक पेटी काढली. ती सोन्याची होती व तीत हिरे जडविलेले

होते. मादाम सन येत सेन यांनी ती नेरुदा यांना बघायला दिली व त्यांनी तिचे कौतुक करून ती परत केली. पण नंतर उठता उठता त्यांनी नेरुदांना विचारले, की माझी पेटी तुम्ही परत केली काय? त्यांनी ती केल्याचे सांगितले. पण ती मिळेना. अखेरीस मादाम सन येत सेन यांच्या पर्समध्येच ती सापडली. तथापि त्यांनी व्यक्त केलेल्या अविश्वासाने नेरुदा उद्विग्न झाले. आत्मचरित्रात ते संतापून लिहितात, की चीनमधील सांस्कृतिक क्रांतीने ही रत्नजडित पेटी काढून घेतली असेल नेरुदा यांची ही केवळ अपेक्षा असावी. चीनचा आणखी एक विचित्र अनुभव नेरुदा यांना आला. ते व इन्हेनबर्ग यांना चीनमध्ये इंग्लिश पद्धतीचे जेवण दिले जाई. त्याचा त्यांना वीट आल्याने चिनी पद्धतीचे जेवण हवे, असे या दोघांनी त्यांच्या मार्गदर्शकांना सांगितले. पण दरवेळी अशक्य म्हणून उत्तर मिळे. यावर चिडून नेरुदा यांनी आपल्या परतीच्या प्रवासाची तयारी करण्यास सांगितले. ही मात्रा लागू पडली व चिनी जेवण त्यांना लगेच मिळू लागले.

स्टालीन व रशिया

नेरुदा हे कम्युनिस्ट खरे, पण त्यांच्या आवडीनिवडी, जीवनपद्धती ही भांडवलदारी वर्गास शोभणारी. ते आपल्याजवळील दुर्मिळ ग्रंथांचे वर्णन आत्मचरित्रात करतात त्याचप्रमाणे अनेक जातींचे शिंपले कसे जमा केले, याचे चवीने वर्णन करतात. विविध देशांतील खाद्यपदार्थ, चैनीचे जीवन यांचा त्यांनी उपभोग घेतलाच, पण किती स्त्रियांचा त्यांनी उपभोग घेतला याची गणतीच नाही. याचे त्यांनी सविस्तर वर्णन केले आहे. कोलंबोत एका मेहतरिणीवरच ते लुब्ध झाले आणि सरळ तिचा हात धरून त्यांनी शरीरसुख मिळविले. हॉटेल, सभागृह, शेतातील गवताची गंजी अशी कोणतीही जागा नेरुदा यांना स्त्रीसमागमासाठी चालत असे. हे सर्व सुखोपभोग घेऊनही क्रांतीचे कवी म्हणून त्यांनी लौकिक मिळवला होता! आपल्याकडील फॅशनेबल क्रांतिकारक लेखक-कवींनी नेरुदा यांच्याप्रमाणे वनवासातले हाल काढले नसले, तरी सुखोपभोगाबाबत त्यांचा आदर्श ठेवलेला आढळेल.

नेरुदा हे स्टालीन पारितोषिकाच्या निवड समितीवर असत. त्यामुळे दरवर्षी त्यांना रशियात जावे लागे. पण स्टालीनची व त्यांची कधी बातचीत झाली नाही. पारितोषिकासाठी निवड करताना स्टालीनने निवड समितीला कोणाचीही शिफारस कधी केली नव्हती. फक्त एकदाच अपवाद केला व तो खुद्द नेरुदा यांचा. त्यांचे नाव स्टालीननेच सुचवले.

क्रुशेव यांनी स्टालीनच्या दुष्कृत्यांचा पाढा वाचला, तेव्हा नेरुदा यांना धक्का बसला. या दुष्कृत्यांची जबाबदारी आपल्यावर आहे, सर्व कम्युनिस्टांवर आहे, असे ते म्हणतात व पुन्हा असे प्रकार होता कामा नयेत हे पाहिले पाहिजे, असेही त्यांचे मत होते. पण चेकोस्लोव्हाकियावर रशियाने, स्टालीनच्या वारसांनीच १९६८ साली टँक घातले, तेव्हा नेरुदा यांचे स्वातंत्र्यप्रेम जागृत झाले नाही. भांडवलशाही शाही देश आणि बायका यांच्याबाबतीत स्वातंत्र्यप्रेम, पण रशियाच्या बाबतीत मौन अशी त्यांची स्थिती होती. यात त्यांच्यातल्या कवीपेक्षा राजकारणी व पंथवादी अधिक दिसतो.

त्यांचा मित्र आयन्दे याचा चिलीतील राज्यक्रांतीत खून झाल्यानंतर बाराच दिवसांनी नेरुदा मरण पावले. १७-७-७७ ◉



आभार

खालील व्यक्ती आणि संस्था यांनी या पुस्तकासाठी लागणारी छायाचित्रे दिली याबद्दल आभार !

टाईम्स ऑफ इंडिया, रेफरन्स सेक्शन

महाराष्ट्र टाईम्स

इंटरनॅशनल कम्युनिकेशन एजन्सी, USA

एंबसी ऑफ पिप्रल्स रिपब्लीक ऑफ चायना

इस्रायल कॉन्स्युलेट

गटे इन्स्टिट्यूट

इन्फर्मेशन ऑफिसर, फ्रेंच एंबसी

क्षमस्व

पृष्ठ	शुद्ध	अशुद्ध
२९	ए. पी. पी.	ए. जी. पी.
३७	बारा	बार
३९	ट्रॉट्स्की	टॉटस्की
४१	औद्योगिक	आद्योगिक
६६	सांगतात की	सांगतात डी
८५	पोर्ट्रेट	पोट्रेट
९२	हॉवर्ड	हॉवर्ड
१३१	निर्घृण	निघृण
१३२	किसिंजर	किसिजर
१४३	हात	हता

REFBK-0022779

प्रे स्टी ज
प्र का श न